कौपीतकी ब्राह्मण हेंहि होय. यजुर्वेदाची जी कृष्णयजुर्वेद म्हणून शाखा आहे तिचें ब्राह्मण तैत्तिरीय ब्राह्मण हें होय. तसेंच यजुर्वेदाची जी वाजसनेयिसंहिता किंवा शुक्लयजुर्वेद म्हणून शाखा आहे तिचें शतपथ ब्राह्मण प्रसिद्ध आहे. सामवेदावर प्रौढब्राह्मण व अद्भुतब्राह्मण अशीं दोन मुख्य आहेत. अथर्ववेदाचें गोपथ म्हणून एक ब्राह्मण प्रसिद्ध आहे.

संहितांचा अर्थ समजल्यावर ब्राह्मणें समजण्यास कठिण नाहींत. आणि संहितांत प्रथम ऋक्संहिता. यास्तव तिचें भाषांतर केल्यानें वेदाचें स्वरूप समजावयास सुगम होईल असें समजून हा **यत्न** आम्हीं करीत आहों. मुख्य भाषांतर मराठी आहे; तथापि आपल्या देशांत ज्यांला मराठी समजत नाहीं असे गुजराथी, कानडी, बंगाली वगैरे लोक त्यांसहि वाचतां यावें म्हणून तूर्त बहुतेकांस समजते अशी जी इंग्रजी भाषा तींतहि तर्जुमा केला आहे. परंतु मुख्य भाषांतर मराठींत असल्यामुळें टिपा सर्व मराठींत दिल्या आहेत.

हा **यत्न** केवळ असंस्कृतज्ञ लोकांसच समजावा असा आमचा हेतु नाहीं. ज्यांस संस्कृताचें ज्ञान नाहीं त्यास मराठी भाषांतर व टिपा इतकें उपयोगी पडेल. परंतु ज्यांस संस्कृताचा परिचय असेल त्यांसाठीं संहिता व पदें, आणि संहितेची भाषा फार प्राचीन असल्यामुळें समजण्यास अवघड पडते म्हणून अर्वाचीन संस्कृतांत प्रत्येक मंत्राचा अन्वय 'भाषा' रूपानें दिला आहे, तो उपयोगी पडेल अशी आशा आहे.

ज्यांस इंग्रजीच भाषांतर मात्र उपयोगी पडणार आहे त्यांणीं तूर्त तितक्यानेंच तृप्त राहणें अवश्य आहे; कारण कीं, टिपा मराठीप्रमाणें इंग्रजींतहि देण्याची तूर्त सवड नाहीं. परंतु टिपा इंग्रजींत

देण्याची सवड नाहीं इतक्याच कारणामुळें इंग्रजींत तर्जुमाहि घालूं नये हे योग्य नाहीं असें समजून तो तर्जुमा तूर्त आम्हीं दिला आहे. इंग्रजीप्रमाणें हिंदुस्तानांत प्रचारांत असलेली मराठी-शिवाय दुसरी भाषा इंग्रजीप्रमाणें आम्हास अवगत असती तर इंग्रजीऐवजीं तशा भाषेत तर्जुमा केला असता.

ऋग्वेदसंहितेसारिखा प्राचीन ग्रंथ लावण्याचें काम कठीण आहे म्हणून सांगावयास नकोच. कोणताहि ग्रंथ फार जुना असला म्हणजे त्यांतील प्रथम तर भाषा समजत नाहीं. प्रसिद्ध भाषेस अनुसरून नाहींत अशीं अनेक रूपें, अनेक प्रयोग, अनेक शब्द असल्यामुळें ग्रंथ दुर्बोध होतो. शिवाय तशा ग्रंथांतील विचार, कल्पना, व त्या करण्याची आणि बोलून दाखविण्याची पद्धतिहि त्याच्या भाषेप्रमाणेंच आर्ष असते. कितीएक विशेषनामें आढळतात त्यांविषयीं प्रस्तुतकाळीं माहिती नसल्यामुळें दुर्बोधत्व वाढतें. तशा प्राचीन ग्रंथांत वर्णिलेले आचार, प्रचार व संप्रदाय चालू प्रसंगीं प्रसिद्ध नसल्यामुळें काठिन्य येतें. त्यामुळे कितीएक प्रसंगीं वेगळे वेगळे अर्थ करणारे वेगळे वेगळे अर्थ करूं लागतात. त्या वरून वस्तुतः असलेलें काठिन्य वाढतें. अशी फार प्राचीन ग्रंथांची दशा होते. आणि ही स्थिति वेदास बऱ्याच अंशीं लागू आहे. परंतु ह्या सर्व अडचणी दूर व्हाव्या म्हणून आम्हीं मराठी टिपांत बहुतेक ठिकाणीं अर्थाची फोड करून सांगूं. त्यामुळें वेदाचा अर्थ काय आहे याविषयीं व तो करण्यास काय काय नडी येतात याविषयीं वाचणाऱ्यांस विचार करितां येईल.

ऋग्वेदसंहितेचा अर्थ करण्याच्या कामीं आम्ही सर्व प्रकारच्या साहाय्यभूत ग्रंथांचा उपयोग करूं. ज्यांनीं ज्यांनीं या विषयावर आजवर मेहनत घेऊन त्यामत केला आहे त्या सर्वांचे ग्रंथ यथाशक्ति

पाहून नंतर अर्थाचा निश्चय करण्याचा यत्न करूं. या संहितेवर सायणाचार्यांचें भाष्य आहे त्याचा पूर्ण विचार करून, जेव्हां जेव्हां त्या भाष्यापासून भिन्न अर्थ करण्याचा प्रसंग येईल तेव्हां तेव्हां आमच्या अर्थास काय काय आधार आहे तें आरंभीं तरी बहुत-करून तपशीलवार सांगत जाऊं. कारण हा आमचा **यत्न** अशा प्रकारचा आहे, आणि अशा हेतूनें केला आहे कीं, फार परि-श्रम केल्यावरती वेदवाणीचा काय अर्थ आहे तो आमच्या शक्ती-प्रमाणें दिला आहे व तो लोकांस समजावा इतकेंच नव्हे, पण तो योग्य आहे कीं नाहीं हें विद्वज्जनांस सांगतां यावें. वेदाचा अर्थ करण्यास अनेक अडचणी आहेत व जीं पाहिजेत तीं सर्व साधनें आम्हांस नसतील यामुळें, आणि वेदाचा अभ्यास विद्वज्जनांनीं करावा तसा ते अगदींच करीत नाहींत यामुळें वेदाचा अर्थ समजावा तसा आम्हांस क्वचित् न समजेल ह्याविषयीं आमची पूर्ण खात्री आहे. तथापि आमच्या आर्यबांधवांस आम्ही खात्रीपूर्वक व निश्चयानें सांगतों कीं, खरोखर एक अर्थ आहे असें आम्हांस ठाऊक असतां तो आम्हांस अथवा लोकांस आवडणार नाहीं म्हणून किंवा चालत आले-ल्या प्रचारास व समजुतीस विरुद्ध आहे म्हणून समजून उमजून दु-सरा अर्थ आम्ही कधीं देणार नाहीं; आणि वर सांगितलेल्या अडचणी-तील या भीतीनें आम्ही **यत्न** चालविण्यास सोडणार नाहीं. ज्या ठिकाणीं दुर्बोधामुळें अगदींच निरुपाय होईल त्या ठिकाणीं आम्ही तसेंच सांगण्यास काहींमात्र संशय घेणार नाहीं. कारण कीं, आमचा हेतु इतकाच आहे कीं, परमपुरातन, परमपूज्य आणि परमप्रमाणीभूत जो वेद त्याचा अभ्यास लोकांनीं करावा, आणि अर्थ सकल आर्यजनांनीं जाणून घ्यावा. तो हेतु कसा सिद्धीस जाईल याच गोष्टीकडे आमच्या सर्व परिश्रमांचें पर्यवसान राहील, म्हणू-

नच सर्व कठिण कठिण स्थळीं अर्थ लावण्यास कोणकोणतीं साधनें उपलब्ध आहेत व कोणत्या गोष्टींविषयीं काठिन्य आहे व कोणत्या गोष्टींचा खुलासा झाल्यास सर्व अर्थ लागेल हें सांगत जाऊं.

ऋग्वेदाचीं दहा मंडलें आहेत. त्यांत एक हजारापेक्षां किंचित् अधिक सूक्तें आहेत. प्रत्येक सूक्तांत सरासरीनें दहा ऋचा या मानानें दहा हजारांपेक्षां थोड्याशा अधिक ऋचा आहेत. आमचे मासिक भागांत आरंभीं टिपा फार द्याव्या लागतील व त्या जेथें जेथें अवश्य दिसतील तेथें तेथें शेवटपर्यंत देऊं. परंतु एकच वैषम्य पुनःपुनः येत जाईल तेव्हां त्या त्या सर्व ठिकाणीं टिपांची जरूर पडणार नाहीं. यावरून आम्हांस वाटतें कीं, प्रस्तुतपेक्षां उत्तरोत्तर अधिक अधिक भाषांतर व मूळ आणि थोड्या थोड्या टिपा येत जातील. तथापि नांवानें आबालवृद्धांस अगदीं प्रसिद्ध, परंतु अर्थानें अगदीं अज्ञात असा जो वेद त्याचा अर्थ सकल आर्यांस समजावा हा आमचा उद्देश आहे, त्यापेक्षां पुनरुक्तीचा दोष झाला तरी सोसावा; परंतु लोकांची वासना या अति अमूल्य विषयाकडे वळवावी म्हणून एकच खुलासा वारंवार देण्यास प्रसंगपरत्वे आळस करणार नाहीं.

तथापि अति गहन असा मानलेला (आणि कांहीं कारणांनीं कचित् तसा आहे खरा) व परम पुराण, आणि अनेक कारणांमुळें भाषेच्या संबंधानें व विचारांच्या संबंधानें कठिण असा जो वेद त्याचें भाषांतर केलें तरी तें एखाद्या कल्पित कादंबरीप्रमाणें सुबोध, एखाद्या अर्वाचीन कवितेप्रमाणें सुरस अथवा एखाद्या ठुमरी किंवा रागांतील मधुरतेप्रमाणें असें कोणी आशा करूं नये. परंतु वेदाच्या रचना केल्या नंतर किती हजार वर्षांपूर्वी लोकीं कोठें प्रथम स्फुट केल्या व त्यांच्या पाठा विचार करीत करीत पाठकांनीं भाषांतर वा-

चीत जावें अशी आमची प्रार्थना आहे, म्हणजे अर्थ समजत नाहीं अशी निराशा होणार नाहीं. मूळ अर्थ हजारों वर्षांपासून आजपर्यंत करणाऱ्यानीं जे श्रम ज्या उद्देशानें केले आहेत त्याच ज्ञानेच्छेच्या उद्देशानें त्याप्रमाणें थोडा श्रम केला पाहिजे तरच भाषांतर समजेल असें कितीएक सूक्ताविषयीं कबूल करणें अवश्य आहे. आणि तसें झाल्यावरहि जर दुर्दैवेंकरून वाचकाची निराशा होईल तर त्याचा दोष वाचक कृपा करून भाषांतरकर्त्यालाच सगळा न लावितील, अशी आशा आमच्यानें केल्याविना राहवत नाहीं. कारण कीं आम्ही केवळ अर्थग्राहक आहों, अर्थकारक नाहीं. भांडारांत जें असेल तें आणून आम्ही आमच्या प्रिय वाचकांपुढें ठेवू बाहेरचें आणून भांडारांतील हें आहे अशी अथवा भांडारात अर्थ असून तो नाहीं अशी प्रतारणा करणार नाहीं. आणि या आमच्या कारभारात आम्हास देवाचे प्यारे सकल आर्यजन आपल्या "मित्रतेचा, अर्थाचा, आणि सच्छात्ररूपी "संततींत जें बळ नित्य असतें त्याचा अनुग्रह करून साहाय्य "करितील" यात संशय नाहीं. कारण कीं आम्ही

समिंद्रसंखिम ईमहे त राये त सुवीर्ये ।
स शक उत नः शकदिन्द्रो वसु दयमानः ॥
ऋ १।१०।६.

भाषांतरकर्ता.

ऋग्वेद.

ऋषिर्विश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दा । अग्निर्देवता । गायत्री च्छन्द ।

ह्या सूक्ताचा ब्रह्मयज्ञात विनियोग आहे. आणि अग्निमीळे या मन्त्राचा उत्सर्जन व उपाकर्म यामध्यें अग्नीच्या उद्देशानें होम करण्याविषयीं विनियोग आहे.

सूक्तम् १.

ॐ अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् ।
होतारं रत्नधातमम् ॥ १ ॥

अग्निम् । ईळे । पुरःऽहितम् । यज्ञस्य । देवम् । ऋत्विजम् ।
होतारम् । रत्नऽधातमम् ॥ १ ॥

अग्निः पूर्वेभिर्ऋषिभिरीड्यो नूतनैरुत ।
स देवाँ एह वक्षति ॥ २ ॥

अग्निः । पूर्वेभिः । ऋषिऽभिः । ईड्यः । नूतनैः । उत ।
सः । देवान् । आ । इह । वक्षति ॥ २ ॥

भाषायाम्

१ पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजं होतारं रत्नधातममग्निमीडे ॥
२ अग्निः पूर्वैर्नूतनैश्च ऋषिभिरीड्य । स देवानिहावहतु ॥

वेदार्थयत्न.

सूक्त १.

ऋषि, विश्वामित्राचा पुत्र मधुच्छन्द; देवता, अग्नि; छंद, गायत्री.

१. पुरोहित, यज्ञाचा देदीप्यमान ऋत्विज्, होता, [आणि] संपत्तीचें अतिशयेंकरून देणारा अग्नि त्यास मी स्तवितों.

२. अग्नि पूर्वींच्या ऋषींनीं तसाच नव्या ऋषींनीं स्तुत्य [होय]; तो देवांस येथें आणो

Hymn 1.

To Agni By Madhuchchhandas, son of Vis'vamitra Metre Gáyatrí

1 I praise Agni, the representative, the resplendent priest of the sacrifice, the invoker [of the gods], the best giver of wealth

2 Agni is [a god] to be praised by sages ancient and by sages modern May he bring the gods hither

---

१ 'पुरोहित' याचा पदश अर्थ 'पुढें ठेविलेला' म्ह आपल्या ऐवजी पुढे केलेला, अर्थात् प्रतिनिधि किंवा वकील अग्नीस देवांचा पृथ्वीवरील पुरोहित असें पुष्कळ ठिकाणी वेदांत म्हटलें आहे कारण कीं, अग्नि हा मनुष्यांनीं दिलेलें हवि देवांकडेस पोहचवितो आणि ते आपण्यास पृथ्वीवर देव त्यालाच पाठवितात — 'होता' म्ह बोलाविणारा, अर्थात देवांस म्हणूनच ते नांव यज्ञसपादक जे १६ ब्राह्मण असतात त्यांतून एकास पडलें आहे येथे अग्नीस जसें ऋत्विज् असें आदरार्थ म्हटलें आहे तसेंच होता हें पद लाविलें आहे

२ या ऋचेवरून स्पष्ट होतें कीं, या सूक्ताच्या कर्त्याच्या मताप्रमाणें कितीएक ऋषि म्हणजे वेदमंत्रांचे कर्ते अथवा द्रष्टे प्राचीन आणि कितीएक नवीन होते, व तो आपणास नवीनांपैकीं समजतो सबब हा मंत्र लक्षांत ठेवण्याजोगा आहे

अग्निना रयिमश्नवत्पोषमेव दिवेदिवे ।
यशसं वीरवत्तमम् ॥ ३ ॥

अग्निना । रयिम् । अश्नवत् । पोषम् । एव । दिवेऽदिवे ।
यशसम् । वीरवत्ऽतमम् ॥ ३ ॥

अग्ने यं यज्ञमध्वरं विश्वतः परिभूरसि ।
स इद्देवेषु गच्छति ॥ ४ ॥

अग्ने । यम् । यज्ञम् । अध्वरम् । विश्वतः । परिऽभूः । असि ।
सः । इत् । देवेषु । गच्छति ॥ ४ ॥

अग्निर्होता कविक्रतुः सत्यश्चित्रश्रवस्तमः ।
देवो देवेभिरागमत् ॥ ५ ॥ ॥ १ ॥

अग्निः । होता । कविऽक्रतुः । सत्यः । चित्रश्रवःऽतमः ।
देवः । देवेभिः । आ । गमत् ॥ ५ ॥ ॥ १ ॥

यदङ्ग दाशुषे त्वमग्ने भद्रं करिष्यसि ।
तवेत्तत्सत्यमङ्गिरः ॥ ६ ॥

यत् । अङ्ग । दाशुषे । त्वम् । अग्ने । भद्रम् । करिष्यसि ।
तव । इत् । तत् । सत्यम् । अङ्गिरः ॥ ६ ॥

भाषायाम्.

३ अग्निना यशोयुक्तं वीरवत्तमं रयिं पोषं [च] एव दिवेदिवे [यजमानो]ऽश्नुयात् ॥
४ हे अग्ने [त्वं] यमध्वरं यज्ञं विश्वतः परिभूरसि स एव देवेषु गच्छति ॥
५ अग्निर्होता कविक्रतुः सत्यश्चित्रश्रवस्तमः देवो देवैरागच्छतु ॥
६ अङ्ग अग्ने त्वं यद्भद्रं दाशुषे करिष्यसि तत् हे अङ्गिरः सत्यं तवैव ॥

३. अग्नीच्या योगानें [यजमान] यश:संपन्न [आणि] उत्तम वीर्यवान पुत्रांनीं युक्त अशा धनदौलतीसच दिवसानुदिवस पावो.

४. हे अग्नी, ज्या विघ्नरहित यज्ञासभोंवालीं तूं परिवेष्टन करून राहतोस तोच [यज्ञ] देवाप्रत प्रविष्ट होतो.

५. अग्नि [हा] कुशल, कपटरहित [आणि] अतिशयेंकरून कीर्तिमान् [असा] होमसंपादक [होय]. [तो] देव [अग्नि] देवांसहित येथें येवो.

६. हे बा अग्नी, तूं हविर्दान करणाराचें जे कल्याण करिशील तें, हे अंगिरा, खरोखर तुझेंच कल्याण [होतें].

3. Through Agni may the worshipper obtain from day to day nothing but wealth and prosperity accompanied by renown and full of valorous progeny.

4. That sacrifice alone of which thou, Agni, art the protector on all sides, reaches unobstructed the gods.

5. May Agni, the skilful, true and most renowned minister of sacrifice,—*Agni the god come hither* with the gods.

6 The good, Agni, that thou mayest confer on the giver of oblations, becomes, O Angiras, truly thine own.

---

३. या मंत्रांतील 'पोष' शब्दाचा अर्थ सायणाचार्य 'वर्धमान होणार' असा विशेषणार्थी करितात; पण वेदांत हा शब्द पुष्कळ ठिकाणीं आलेला आहे आणि याचा नेहमीं 'भरभराट' 'दौलत' असाच अर्थ होतो, व विशेषणार्थी होत नाहीं. ऋ. मं १, सू. ९३, ऋक् २ पाहा तेथें सायणाचार्यच 'अभिवृद्धि' म्हणजे भरभराट असा अर्थ करितात तोच आम्हीं प्रस्तुत स्थळीं घेतला आहे —'पावो'='अश्नवत्' सायणाचार्य पावतो असा अर्थ करितात; पण लेट्चें रूप आहे म्हणून पावो हाच अर्थ युक्त आहे. व सायणाचार्यांनींहि ऋ. १. ४०. ६-७ यांत तसाच केला आहे तो पाहा.

४. 'विघ्नरहित'='अध्वर.' मंत्राचें हृद्गत असें आहे कीं, ज्या यज्ञाचें संरक्षण अग्नि चारी बाजूंस राहून करितो तोच यज्ञ निर्विघ्नपणे परिपूर्ण होऊन देवांस तृप्तिदायक होत असतो —'देवाप्रत प्रविष्ट होतो.' मुळामध्ये 'देवांच्या ठिकाणीं जातो' असें आहे, म्ह देवांस पोंहचता होतो.

६. 'अङ्गिरा' (अङ्गिरस्) हें अग्नीचें वाचक आहे त्याचा खरोखर अर्थ काय आहे ते खात्रीपूर्वक सांगवत नाहीं; पण "अंगिरस" या नावाचे कोणी मानी असल्याचें आढळतें; आणि ते देवयोनि आणि मनुष्ययोनि यांमध्यें मानिले आहेत. त्यां-

उप॑ त्वाग्ने दि॒वेदि॑वे॒ दोषा॑वस्तर्धि॒या व॒यम् ।
नमो॒ भर॑न्त॒ एम॑सि ॥ ७ ॥
उप॑ । त्वा॒ । अ॒ग्ने॒ । दि॒वेऽदि॑वे । दोषा॑ऽवस्तः । धि॒या । व॒यम् ।
नमः॑ । भर॑न्तः । आ । इ॒म॒सि॒ ॥ ७ ॥
राज॑न्तमध्व॒राणां॑ गो॒पामृ॒तस्य॒ दीदि॑विम् ।
वर्ध॑मान॒ स्वे दमे॑ ॥ ८ ॥
राज॑न्तम् । अ॒ध्व॒राणा॑म् । गो॒पाम् । ऋ॒तस्य॑ । दीदि॑विम् ।
वर्ध॑मानम् । स्वे । दमे॑ ॥ ८ ॥
स नः॑ पि॒तेव॑ सू॒नवेऽग्ने॑ सूपाय॒नो भ॑व ।
सच॑स्वा नः स्व॒स्तये॑ ॥ ९ ॥ ॥ २ ॥
सः । नः॒ । पि॒ताऽइ॑व । सू॒नवे॑ । अग्ने॑ । सु॒ऽउ॒पा॒य॒नः । भ॒व॒ ।
सच॑स्व । नः॒ । स्व॒स्तये॑ ॥ ९ ॥ २ ॥

भाषायाम्.

७ हे अग्ने वयं नमो भरन्तो दिवेदिवे दोषावस्तर्धिया त्वामुपैम
८ अध्वराणां राजानमृतस्य दीदिवं गोपां स्वे दमे वर्धमानम् ॥
९ हे अग्ने स [त्वं] नः सूनवे पितेव सूपायनो भव । स्वस्तये नः सचस्व ॥

स 'सूने पुत्र' असें म्हटलें आहे त्या स मनुष्यजातीचे आदिपुरुष आणि स्वर्गीचें सुख मनुष्यांप्रत प्राप्त करून देणारे असें मानलेलें आहे ते देवांनीं मनुष्यलोकीं आपुल्याप्रमाणें पाठविलेले असे कोठकोठें मानलेलें आढळतात आणि अग्नीला सुद्धा याच अर्थी हा शब्द लाविलेला असेल असें वाटतें — तें......तूंझेच कल्याण होतें' मह अग्नीने उपासकास सांगितलें म्हणजे उपासक अग्नीला हवि अर्पण करितो व तेणेंकरून अग्नीचा लाभ होतो

७. हे रात्रीच्या वेळीं प्रकाशणाऱ्या अग्नी, प्रतिदिनीं आम्ही भक्तिपूर्वक नमन करीत तुझ्या संनिध येत असतों.

८. जो तूं यज्ञांचा राजा, धर्मकृत्याचा परम देदीप्यमान रक्षक [आणि] आपल्या स्वताहाच्या घरीं मोठा होणारा [असा] होस.

९. म्हणून, हे अग्नी, जसा पिता पुत्राला सुगम असतो तसा तूं आम्हांप्रत हो; आमच्या कल्याणास्तव आम्हांबरोबर राहा.

7. To thee, Agni, that shinest by night, we daily approach, offering our respects with a pious mind;

8. who art *the king of sacrifices*, the resplendent *protector of the sacred law*, and who growest in thine own home.

9. Be thou, therefore, Agni, accessible to us as is a father to his son. Be with us for our good.

---

७. 'दोषावस्तर्' हे दोषावस्तृ याचें संबोधन होय. वस् (=प्रकाशणें) यापासून विवस्वान्, उषस्, इत्यादि शब्द निघाले आहेत. सायणाचार्य 'रात्रंदिवस' असा क्रियाविशेषणार्थी अर्थ करितात. हा शब्द ऋग्वेदांत आणखी दोन ठिकाणां आला आहे. म. ४, सू. ४, ऋ. ९ आणि म. ७, १५, ऋ. १५ पाहा. शिवाय आश्वलायन श्रौतसूत्रांत "यदि सायम् । दोषावस्तर्नम. स्वाहेति । यदि प्रातः । प्रातर्वस्तर्नम. स्वाहेति" (३ १२ ४) असें लिहिलें आहे त्यावरून दोषावस्तर् ही दोषावस्तृ याची संबोधनविभक्ति आणि 'रात्रीच्या वेळीं प्रकाशणारा' हा अर्थ युक्त दिसतो.—"नमन करीत" मुळांत 'नमन धारण करणारे' असा अक्षरशः अर्थ आहे.

८. 'यज्ञांचा राजा'=राजन्तमध्वराणाम्.' सायनाचार्य 'राजन्तम्' याचा येथें शोभणारा, प्रकाशणारा असा अर्थ करितात; पण राज् धातूचा अर्थ राजा असणें, मालक असणें असा वेदांत होतो. उदाहरणार्थ 'विश्वस्य दिवश्चाध राजसि' हे (ऋ. १. २५. २०) पाहा. शिवाय 'त्वं वाजस्य श्रुत्यस्य राजसि' (ऋ १.३६.१२) येथें खुद्द सायणाचार्यांनीच आमच्या प्रमाणें अर्थ केला आहे तो पाहा.—'आपल्या घरीं' म्ह. यज्ञशाळेंत अग्नि प्रदीप्त होतो त्या स्थळीं.

९. 'म्हणून' हें पद 'स......भव' असा जो प्रयोग आहे त्यापासून गम्यमान आहे हें सांगावयास नकोच.

सूक्तम् २.

ऋषिर्विश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दाः । देवता-१-३ वायुः ; ४-६ इन्द्रवायू ; ७-९ मित्रावरुणौ । गायत्री च्छन्दः ।

वायवा याहि दर्शतेमे सोमा अरंकृताः ।
तेषां पाहि श्रुधी हवम् ॥ १ ॥

वायो इति । आ । याहि । दर्शत । इमे । सोमाः । अरंऽकृताः ।
तेषाम् । पाहि । श्रुधि । हवम् ॥ १ ॥

वायं उक्थेभिर्जरन्ते त्वामच्छा जरितारः ।
सुतसोमा अहर्विदः ॥ २ ॥

वायो इति । उक्थेभिः । जरन्ते । त्वाम् । अच्छ । जरितारः ।
सुतऽसोमाः । अहःऽविदः ॥ २ ॥

वायो तव प्रपृञ्चती धेना जिगाति दाशुषे ।
उरूची सोमपीतये ॥ ३ ॥

वायो इति । तव । प्रऽपृञ्चती । धेना । जिगाति । दाशुषे ।
उरूची । सोमऽपीतये ॥ ३ ॥

इन्द्रवायू इमे सुता उप प्रयोभिरागतम् ।
इन्दवो वामुशन्ति हि ॥ ४ ॥

इन्द्रवायू इति । इमे । सुताः । उप । प्रयःऽभिः । आ । गतम् ।
इन्दवः । वाम् । उशन्ति । हि ॥ ४ ॥

भाषायाम्

१ हे दर्शनीय वायो आयाहि । इमे सोमा अलङ्कृता । तान्पिब । हवं [च] शृणु ॥
२ हे वायो सुतसोमा अहर्विदो जरितारस्त्वामच्छोक्थैर्जरन्ते ॥
३ हे वायो प्रपृञ्चत्युरूची तव धेना सोमपीतये दाशुषे गच्छति ॥
हे इन्द्रवायू इमे सुता [सन्ति] । प्रयोभिरुपागतम् । इन्दवो हि वामुशन्ति ॥

सूक्त २.

ऋ., विश्वामित्राचा पुत्र मधुच्छन्द. देवता, १-३ वायु, ४-६ इन्द्रवायू, ७-९ मित्रावरुण. वृत्त, गायत्री.

१. हे सुंदर वायू, येथें ये; हे सोमरस [तुजकारितां] तयार केले आहेत. ते पी [आणि] [आमची] प्रार्थना ऐक.

२. हे वायू, [यज्ञ]समय जाणणारे स्तोते सोमरस सिद्ध करून तुझ्या उद्देशानें स्तोत्रें गात आहेत.

३. हे वायू, तुझी लुब्ध [आणि] लांब जिह्वा सोमपानासाठीं हविर्दात्याकडेस जात असते.

४. हे इंद्रवायू हो, हे सोमरस [तुमच्या कारितां येथें आहेत] [आम्हांस] सुखें घेऊन या. कां कीं, [हे] सोमरस तुमची वांछा करीत आहेत.

Hymn 2.[1]

To *Vâyu* 1-3, *Indra* and *Vâyu* 4-6, and *Mitra-and-Varuṇa* 7-9. By *Madhuchchhandas* son of *Vis'vâmitra*. Metre–*Gâyatrî*.

1. Come hither, handsome Vâyu. [For thee] these Soma-draughts are prepared. Drink of them [and] hear our invocation.

2. The singers, Vâyu, cognizant of the proper time, having prepared Soma-draughts, are addressing their hymns to thee.

3. Thy tongue, Vâyu, that is eager and long, goes to the worshipper for drinking Soma.

4. Indra and Vâyu, here are Soma-libations for you. Approach ye with pleasures [for us]. For the libations are desiring you.

---

१. 'वायु' म्हणजे पवनरूप देवता. वायुदेवतेचा संबंध इंद्रदेवतेशीं फार आहे आणि फारकरून जसा अग्नीचा सोमाशीं संबंध आहे (अग्नीषोमी, सूर्याचंद्रमसी असे पुष्कळ ठिकाणीं आढळते) तसा वायूचा इंद्राशीं संबंध आहे. आणि इंद्रवायूंची स्तुति एकत्र केलेली आढळते. वायूच्या योगानें इंद्र जयी होतो असें कोठकोठे वर्णिलें आहे. जेथे वायु जातो तेथें वृद्धि होते असें वेदांत सांगितलें आहे.

३. 'जिह्वा'='धेना.' 'धेना' शब्दाचा अर्थ बहुतकरून धेनु म्ह. दूध देणारी गाई असा होतो. आणि तोच अर्थ येथें कोणी करितात, पण तो नीट दिसत नाहीं. सायणाचार्य येथें वाचा असा अर्थ करितात; परंतु आम्हीं येथें केलेला अर्थ त्यापेक्षां फार सोडून नसतां अधिक समर्पक दिसतो.—'लुब्ध'=लुब्धतां, 'सोमानें [?] रेकरून [?]' सायणाचार्य

वायविन्द्रश्च चेतथः सुतानां वाजिनीवसू ।

तावा यातमुप द्रवत् ॥ ५ ॥ ३ ॥

वायो इति । इन्द्र. । च । चेतथ । सुतानाम् । वाजिनीवसू इति

वाजिनीऽवसू । तौ । आ । यातम् । उप । द्रवत् ॥ ५ ॥ ३ ॥

वायविन्द्रश्च सुन्वत आ यातमुप निष्कृतम् ।

मक्ष्वि१त्था धिया नरा ॥ ६ ॥

वायो इति । इन्द्र. । च । सुन्वतः । आ । यातम् । उप । निःऽकृतम् ।

मक्षु । इत्था । धिया । नरा ॥ ६ ॥

मित्रं हुवे पूतदक्षं वरुणं च रिशादसम् ।

धियं घृताचीं साधन्ता ॥ ७ ॥

मित्रम् । हुवे । पूतऽदक्षम् । वरुणम् । च । रिशादसम् ।

धियम् । घृताचीम् । साधन्ता ॥ ७ ॥

भाषायाम्

५ हे वाजिनीवसू हे वायो [त्वम्] इन्द्रश्च चेतथ । तौ [युवां] द्रवत्(=शीघ्रम्) उपायातम् ॥

६ हे वायो [त्वम्] इन्द्रश्च हे नरौ सुन्वतो निष्कृतमित्था धिया मक्षु (=शीघ्रम्) उपायातम् ॥

७ पूतदक्षं मित्रं रिशादसं वरुणं च [इत्येतौ] घृताचीं धियं साधयन्तौ [आ] ह्वयामि ॥

साहून लुब्ध असा अर्थ केला आहे, पण पृच् धातूचा अर्थ भरणें, कोणाची भरती अथवा भरभराट करणें असा आहे तो या ठिकाणीं 'आपणास भरून घेणारी,' 'तृप्ति होईपर्यंत पिणारी' असा अभिप्रेत

'६ तुमची योग्य,' तुम्ही यावे अशी इच्छा

५. हे चपलाश्वगामी वायू आणि इंद्र हो, हे तयार केलेले सोमरस तुम्ही पाहात आहां. तर तुम्ही उभयतां धांवत येथे या.

5. Vâyu and Indra, possessed of quick horses, you observe these extracted Somas. Come ye then both hither running.

६. हे वायू, तूं आणि इंद्र असे दोघे, हे शूरांनो, [आमच्या] सत्य स्तवनानें उपासकाच्या सोमरसाप्रत लौकर या.

6. Vâyu, and thou Indra, ye heroes, come ye both quickly to the Soma of the worshipper by this sincere prayer.

७. ज्याचें मन पवित्र होय त्या मित्रास आणि शत्रूतें खाऊन टाकणाऱ्या वरुणास मी बोलावितों; ते दोघे [माझ्या अंगीं] घृताद्र स्तवनाची प्रेरणा करणारे [होत].

7. I invoke Mitra of pure mind and Varuna the *destroyer of the enemy*—both inspirers of the prayer rich with clarified butter.

---

५. 'हे' इ०पदशः अर्थ 'हे वायू, [तू] आणि इंद्र, तयार केलेल्या सोमरसास, हे चपलाश्वगामी हो पाहात आहां.'

'चपलाश्वगामी'='वाजिनीवसू.' वाजिनीवसु या शब्दाचा अर्थ सायणाचार्य 'अन्न जीमध्यें देतात अशी क्रिया तींत राहणारा.' असा बहुत ठिकाणीं करितात आणि प्रस्तुत स्थळींहि 'हविरन्नाच्या संततींत म्ह. मालिकेंत राहणारा' असा करितात. वस्तुतः वाजिनीवसु हें विशेषण वेदांत पुष्कळ ठिकाणीं (ऋ.२. ३७. ५,५ ७४.६,८.५. ३,१०. ४०. २ इत्यादि पाहा) अश्विदेवांस लाविलेलें आढळतें. आणि क्वचित् इंद्रासहि लाविलेलें आहे (ऋ.३.४२.५,१०.९६.८पाहा) आतां अश्विदेव तर घोडेस्वार होत असें त्यांच्या नांवावरून सुद्धां उघड होय, व इंद्र हा चपळ घोडे धांवडून जातो अथवा उपासकाचा सोम पिण्यास येतो असें वेदांत सांगितलें आहे. यावरून वाजिनीवसु याचा अर्थ अश्ववान् असा सर्वत्र लागतो. शिवाय याच अर्थाचें वाजिनीवन्त् असेंहि विशेषण आहे आणि तें अश्विदेव, इंद्र, उषा, सरस्वती आणि अश्विदेवांचा रथ यांस लाविलेलें आढळतें, व हे सगळे चपळ घोड्यांवर बसून जातात असें वेदांत प्रसिद्ध आहे. वाजिनीवसु यांत पदें वाजिन् (अश्व) आणि वसु (द्रव्य ज्यास आहे तो. अर्थात् °वान्) अशीं आहेत. पूर्वपदाच्या अंतीं दीर्घ स्वर नसतांही समासांत येतो याविषयीं दिवावसु (ऋ. ८. ३४. १), स्वावसु, प्रभूवसो (ऋ. १. ५७ ४) या शब्दांवरून स्पष्ट होतें व याच शब्दांवरून 'वसु' हें आस्पद असतें म्ह. 'ज्याला आहे तो' असा अर्थ होतो हेंहि उघड होतें.

'तर तुम्ही'='तौ [युवाम्.]' स त्वम्=तर तूं, सोऽहम्=तर मी, ते वयम्=तर आम्ही, ते यूयम्=तर तुम्ही असे प्रयोग फार ठिकाणीं येत जातात.

६. 'हे शूरांनो,'='नरा' म्ह. वायु

ऋतेन॑ मित्रावरुणावृतावृधावृतस्पृशा ।
क्रतुं॑ बृहन्त॑माशाथे ॥ ८ ॥

ऋतेन॑ । मित्रा॑वरुणौ । ऋत॒ऽवृ॒धौ । ऋत॒ऽस्पृ॒शा ।
क्रतु॑म् । बृ॒हन्त॑म् । आ॒शा॒थे॒ इति॑ ॥ ८ ॥

क॒वी नो॑ मि॒त्रावरु॑णा तुविजा॒ता उ॑रु॒क्षया॑ ।
दक्षं॑ दधाते अ॒पस॑म् ॥ ९ ॥ ४ ॥

क॒वी इति॑ । नः॒ । मि॒त्रावरु॑णा । तु॒वि॒ऽजा॒तौ । उ॒रु॒ऽक्षया॑ ।
दक्ष॑म् । द॒धा॒ते॒ इति॑ । अ॒पस॑म् ॥ ९ ॥ ४ ॥

भाषायाम्.

८. हे ऋतवृधावृतस्पृशौ मित्रावरुणौ [युवां] बृहन्तं क्रतुमृतेनाशाथे ॥
९. कवी तुविजातावुरुक्षयौ मित्रावरुणौ नोपसं दक्षं दधाते ॥

आणि इंद्रच. वेदांत नर हा शब्द देवास पुष्कळ ठिकाणीं लाविलेला आढळतो ='उपासकाच्या.' अक्षरशः 'सोमरस काढणाऱ्या यजमानाच्या.'

७ 'शत्रूंते खाऊन टाकणाऱ्या'='रिशादसम्.' या शब्दाचा खरा काय अर्थ आहे ते स्पष्ट समजत नाहीं सायणाचार्यांनीं केलेला अर्थ येथें आम्हीं दिला आहे. रिशादस् हें विशेषण मरुतांस आणि इतर देवांस लाविलेलें आढळतें 'घृताई स्तवनाची' म्ह. घृत ज्याबरोबर अर्पण केलें जातें अशा स्तवनाची.

'मित्र' याचा मूळ अर्थ स्नेही, दोस्त. त्यावरून मनुष्यांचें प्रिय इच्छिणारा (मित्रमो नृणाम् ऋ ७ ६२. ४) जो आहे त्य म्ह. दिवसरूपी देव त्यास मित्र असें नांव पडलें. मित्रदेव मनुष्यांचें बरें इच्छिणारा व त्यांचा स्नेह करणारा असें वर्णन आढळतें.

'वरुण' म्ह. रात्रिरूपी देवता. मित्र आणि वरुण या दोन्ही देवतांचें जोडपें आहे केवळ मित्रास अनुलक्षून केलेली स्तुति नाहीं आणि केवळ वरुणास अनुलक्षून केलेली स्तुति फारच थोडी आहे. मित्र आणि वरुण या दोघांस मिळून अनेक ठिकाणीं स्तविलें आहे. मित्राचे आणि वरुणाचे गुण काय काय आहेत, ते काय पराक्रम करितात, कोठें राहतात, कसे चालतात, ते कोणास अनुकूळ आणि कोणास प्रतिकूळ आहेत या सर्व गोष्टी मित्रावरुणांवरचीं सूक्तें येतील तसतशा उघड दिसून येतील.

८. हे सत्यधर्मानें आनंद पावणारे, [आणि] सत्यधर्मातें रक्षणारे मित्रावरुण हो, सत्यधर्माच्या योगानें [तुमची] मोठी वांछा तृप्त होत असते.

8. Ye Mitra and Varuna, taking delight in the sacred law, and defending the sacred law, have by the sacred law attained your great desire.

९. प्रज्ञावान, जन्मतःबलवान, [आणि] विस्तीर्णस्थली वास करणारे मित्रावरुण आम्हांस कुशल बुद्धि देत असतात.

9. Mitra and Varuna, the wise, born mighty, and living in wide space, have conferred upon us an active intellect.

---

८. 'सत्यधर्माच्या योगाने [तुमची] मोठी वांछा तृप्त होत असते' म्ह. तुम्हांस असन्मार्गा, अयज्ञकर्ते आणि उपासनारहित जे लोक त्यांच्या करण्यापासून आनंद होत नाही, तर सोमाविषयी वगैरे जी तुमची मोठी वांछा ती आर्य जनांच्या खऱ्या धर्मापासूनच तृप्त होते.—'वांछा'='क्रतुम्.' क्रतु शब्दाचे अर्थ वेदांत होतात ते येणेप्रमाणे—१ उद्देश, युक्ति; २ इच्छा, वांछा (जसे पुरोळाशं जुषस्व नः, इन्द्र क्रतुर्हि ते बृहन् ऋ. ३. ५२. ४); ३ शक्ति, प्रभाव, कुशलपण; ४ बुद्धि, प्रज्ञा (जसे, हस्ते पर्जं भराति शीर्षणि क्रतुम् ऋ. २. १६. २); ५. ज्ञान.—'मित्रावरुण' म्ह. मित्र आणि वरुण हे दोघे देव. जसे मित्रावरुण तसे अग्नीषोमौ (अग्नि आणि सोम), सूर्याचन्द्रमसौ (सूर्य आणि चंद्रमा), द्यावापृथिवी (स्वर्ग आणि पृथिवी) हे देव दोनदोन एकत्र येत असतात.

९. 'कुशल बुद्धीतें'='दक्षम् अपसम्'. यांत दक्षम् हे नाम आणि अपसम् हें विशेषण. सायणाचार्य दक्षम् म्ह. बल आणि अपसम् म्ह. कर्म असा अर्थ करितात. परंतु अपस् शब्द या मंत्रांत आद्युदात्त नाहीं आणि कर्म या अर्थी जो अपस् शब्द आहे तो आद्युदात्त आहे (अपः) व अंतोदात्त अपस् शब्द (अपाः) विशेषणार्थी आहे आणि त्याचा अर्थ वेदांत चपल, कुशल, असा किंवा चपल आणि कुशल काम करणारा अर्थात् कारागर, असा होतो.

सूक्तम् ३.

ऋषिर्विश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दा । देवता- १-३ अश्विनौ; ४-६ इन्द्रः; ७-९ विश्वेदेवाः; १०-१२ सरस्वती । गायत्री च्छन्दः ।

अश्विना यज्वरीरिषो द्रवत्पाणी शुभस्पती ।
पुरुभुजा चनस्यतम् ॥ १ ॥

अश्विना । यज्वरीः । इषः । द्रवत्पाणी इति द्रवत्ऽपाणी । शुभः । पती इति । पुरुऽभुजा । चनस्यतम् ॥ १ ॥

अश्विना पुरुदंससा नरा शवीरया धिया ।
धिष्ण्या वनतं गिरः ॥ २ ॥

अश्विना । पुरुऽदंससा । नरा । शवीरया । धिया । धिष्ण्या । वनतम् । गिरः ॥ २ ॥

भाषायाम्.

१. हे द्रवत्पाणी शुभ पती पुरुभुजावश्विनौ [युवां] यज्वरीरिषश्चनस्यतम् ॥

२. हे पुरुदंससौ नरौ धिष्ण्यावश्विनौ [युवां] शवीरया धिया गिरो वनतम् ॥

सूक्त ३.

देवता, १-३ अश्विदेव, ४-६ इंद्र, ७-९ विश्वेदेव, १०-१२ सरस्वती. ऋषि, पूर्ववत्. वृत्त, पूर्ववत्.

१. हे चपलाश्वगामी, कल्याणाधिपति,[1] बहुसंपत्तिमान अश्वी हो, हें यज्ञसंबंधि अन्न तुम्ही तृप्ति होईपर्यंत खा.

२. हे आश्चर्यकारक बहुकृत्यकर्ते, शूर [आणि] दानशाली अश्वी हो, तुम्ही शक्तियुक्त आदरबुद्धीनें आमचीं स्तवनें मान्य करून घ्या.

HYMN 3.

To the *As'vins* (1-3), *Indra* (4-6), the *Vis'hve Devás* (7-9) and *Sarasvatí* (10-12). Author and metre as before.

1. O As'vins, riding on quick horses, lords of prosperity, and bestowers of plenty *of food*, eat the sacrificial offerings to your satisfaction.

2. O As'vins, achievers of many wonderful deeds, valorous, and renowned *for liberality*, *accept* our prayers with your mighty goodness.

---

१. 'चपलाश्वगामी' (=द्रवत्पाणी) म्ह. चपल घोड्यांवर बसून जाणारे. द्रवत् म्ह. चपल आणि पाणि म्ह. घोड्याचा खूर (ऋ. २. ३१. २ पाहा). द्रवत्पाणि या शब्दाप्रमाणें द्रवदश्व असें एक ('रथास' लाविलेलें, ऋ. ४. ४३. २) विशेषण आहे त्याचाहि अर्थ या शब्दाच्या अर्थाप्रमाणेंच आहे.

'अश्वी'=अश्विनी.' अश्विन् शब्दाचा मूळ अर्थ घोडेस्वार. त्यावरून घोडेस्वार देव अथवा घोड्यावर बसून जाणारे कोणी एक मानिलेले दोन देव. हे प्रकाशाभिमानी (प्रकाशरूपी) देव होत. ते प्रभातकालीं अथवा दिवसांतून तीनदा यज्ञास येतात. त्यांचा रथ सुवर्णाचा आहे व ते रथांतून त्वरें उपासकांस आणितात. त्यांच्या रथास लाविलेले घोडे जुपलेले असतात. अश्विदेव आपल्या उपासकांस संकटांतून मुक्त करण्याला येतात, आणि मुक्त करितात; ते रोग्यांस बरे करितात आणि म्हाताऱ्यांस पुनः तरुण करितात. त्यांच्या आईचें नांव सरण्यू आणि बापकोचें अश्विनी असें सांगितलें आहे. हे 'घोडेस्वार देव' कोण समजावयाचे त्याविषयीं निर्णय होत नाहीं. यास्क (निरुक्त १२.१) म्हणतात कीं, "अश्वि-
" देव हे आकाशांत प्रथम दिसतात...
" त्यांत अश्व (घोडे) आहेत म्हणून
" त्यांचें नांव अश्वि[देव] असें और्-
" णभाव म्हणतो. तर अश्विदेव हे
" कोण? ते द्यावापृथिवी होत असें
" कोणी म्हणतात. ते दिवसरात्रन्दी
" होत असें कोणी म्हणतात. कोणी
" म्हणतात ते सूर्य आणि चंद्रमा होत.
" दोघे राजे पुण्य करणारे होते तेच

दस्रा॑ युवाक॑वः सु॒ता नास॑त्या वृ॒क्तब॑र्हिषः ।
आ या॑तं रुद्रवर्तनी ॥ ३ ॥

दस्रा॑ । यु॒वाक॑वः । सु॒ताः । नास॑त्या । वृ॒क्तऽब॑र्हिषः ।
आ । या॒त॒म् । रु॒द्र॒व॒र्त॒नी॒ इति॑ रु॒द्रऽव॒र्त॒नी॒ ॥ ३ ॥

इन्द्रा या॑हि चित्रभानो सु॒ता इ॒मे त्वा॒यवः॑ ।
अण्वी॑भि॒स्तना॑ पू॒तासः॑ ॥ ४ ॥

इन्द्र॑ । आ । या॒हि॒ । चि॒त्र॒भा॒नो॒ इति॑ चित्रऽभानो । सु॒ताः । इ॒मे । त्वा॒ऽयवः॑ ।
अण्वी॑भिः । तना॑ । पू॒तासः॑ ॥ ४ ॥

इन्द्रा या॑हि धि॒येषि॒तो विप्र॑जूतः सु॒ताव॑तः ।
उप॒ ब्रह्मा॑णि वा॒घतः॑ ॥ ५ ॥

इन्द्र॑ । आ । या॒हि॒ । धि॒या । इ॒षि॒तः । विप्र॑ऽजूतः । सु॒तऽव॑तः ।
उप॑ । ब्रह्मा॑णि । वा॒घतः॑ ॥ ५ ॥

इन्द्रा या॑हि॒ तूतु॑जान॒ उप॒ ब्रह्मा॑णि हरिवः ।
सु॒ते द॑धिष्व न॒श्चनः॑ ॥ ६ ॥ ५ ॥

इन्द्र॑ । आ । या॒हि॒ । तूतु॑जानः । उप॑ । ब्रह्मा॑णि । ह॒रि॒ऽव॒ः ।
सु॒ते । द॒धि॒ष्व॒ । नः॒ । चनः॑ ॥ ६ ॥ ५ ॥

भाषायाम्.

३. हे दस्रौ नासत्यौ वृक्तबर्हिष सुता युवाकव [सन्ति]। हे रुद्रवर्तनी आयातम् ॥
४ हे चित्रभानो इन्द्र आयाहि। अण्वीभिस्तना पूता इमे सुतास्त्वदीया [सन्ति] ॥
५ हे इन्द्र [त्व] धियेषितो विप्रजूतो वाघत सुतवतो ब्रह्माण्युपायाहि ॥
६. हे हरिवन्निन्द्र [त्वं] ब्रह्माणि तूतुजान उपायाहि। न सुते चनो दधिष्व ॥

"अश्विदेव झाले असे इतिहासकर्ते "म्हणतात......त्यांचा वेळ सूर्यो-"दयापर्यंत असतो" हे अर्थी म्हणजे ज्यास संस्कृतांत मागाहून अश्विनीकुमार असें नाव पडलें आहे आणि जे नकुलसहदेवाचे बाप असें भारता-[illegible]त वर्णिलें आहे तेच होत.

२ 'आश्चर्यकारक बहुकृत्यकर्ते'= 'पुरुदससा' म्ह बहुत अद्भुत कृत्यें करणारे अद्भुतकृत्यें म्ह च्यवन ऋषीस वृद्धपण आलें असता त्यास पुन तरुण केला (ऋ १ ११६. १०), विमदाला कमगु ही स्त्री मिळवून दिली (ऋ १. ११२. १९) तीं व त्यासारिखीं दुसरीं.

३. हे अद्भुतकर्मकर्ते, सत्य अश्वी हो, हे शुद्ध दर्भांवर ठेविलेले सोमरस तुमचे आहेत. तर हे रुद्रवर्तनी हो, तुम्ही येथें या.

४. हे सुंदरतेजस्क इंद्रा, तूं ये; हे बोटांनीं काढलेले नित्य पवित्र सोमरस तुझे आहेत.

५. हे इंद्रा, विद्वान पुरुषांच्या योगानें प्राप्त होतोस असा जो तूं तो [आमच्या या] स्तवनानें प्रेरित होत्साता सोमरस अर्पण करणाऱ्या यजमानाच्या प्रार्थनेप्रत ये.

६. हे हरिताश्व इंद्रा, तूं फार त्वरा करून [या] प्रार्थनेप्रत ये; [आणि] आमच्या [ह्या] सोमरसानें तृप्त पाव.

3. [As'vins], achievers of wonderful deeds, and truthful ones, yours are [these] Somas placed on the Kus'a grass. Come, therefore, ye Rudravartani

4. Come hither, Indra, of beautiful splendor. Thine are these Somas pressed by the fingers and ever pure

5 Indra, who art moved by the learned, come hither, moved by [this our] praise, to the prayers of the worshipper who has pressed the Soma [for thee].

6. Indra, come hither quickly to our prayers, thou with the tawny horses. Gratify thyself with our Soma.

३. 'तुमचे'= युवाकव. 'युवाकु शब्दाचा अर्थ नित्य 'तुम्हा दोघांचा' असाच होतो उदकांनीं वगैरे मिश्रित असा (सायणांनीं केलेला) होत नाहीं. ऋ. १. १२०. ३. यांत सायणाचार्यांनीं सुद्धां आमच्या सारिखाच अर्थ केला आहे—'रुद्रवर्तनी' हें अश्विदेवांचेंच विशेषण येत असतें. ह्याचा अर्थ काय असेल तो असो. सायणाचार्य 'शत्रूस रडविणारे' अशा भावार्थानें भाष्यांत लिहितात. अश्विदेवांच्या विशेषनामाप्रमाणे वापरलेले आढळतें यास्तव आम्हीं हें पद तसेंच राहू दिलें आहे.

५. मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, विद्वानांनीं (कवींनीं) केलेल्या स्तुतीनें इंद्र येत असतो तसाच तो हीं जी मी स्तुति करीत आहें ती ऐकून येओ आणि सोमरस काढून अर्पण करणाऱ्या उपासकाची प्रार्थना स्वीकारो—'प्रार्थना'='ब्रह्माणि' ब्रह्म हा शब्द मोठ्या महत्त्वाचा आहे हें सांगावयास नकोच. परंतु त्याचा अर्थ संहितेंत बहुत करून प्रार्थना, स्तवन, स्तोत्र, स्तोम अथवा भक्ति करण्याची धर्मबुद्धि मनांत येते ती असा होतो. तेव्हां हा शब्द आद्युदात्त (ब्रह्म) असतो आणि नित्य नपुंसकलिंगी असतो आणि ब्रह्मा असा जो अंतोदात्त पुंल्लिंगी शब्द आहे त्या-

ओमा॑सश्चर्षणीधृतो॒ विश्वे॑ देवास॒ आ ग॑त ।
दा॒श्वांसो॑ दा॒शुषः॑ सु॒तम् ॥ ७ ॥
ओमा॑सः । च॒र्ष॒णि॒ऽधृ॒तः॒ । विश्वे॑ । दे॒वा॒सः॒ । आ । ग॒त॒ ।
दा॒श्वांसः॑ । दा॒शुषः॑ । सु॒तम् ॥ ७ ॥
विश्वे॑ दे॒वासो॑ अ॒प्तुरः॑ सु॒तमा ग॑न्त॒ तूर्ण॑यः ।
उ॒स्रा इ॑व॒ स्वस॑राणि ॥ ८ ॥
विश्वे॑ । दे॒वासः॑ । अ॒प्ऽतुरः॑ । सु॒तम् । आ । ग॒न्त॒ । तूर्ण॑यः ।
उ॒स्राःऽइ॑व । स्वस॑राणि ॥ ८ ॥
विश्वे॑ दे॒वासो॑ अ॒स्रिध॑ एहि॑मायासो अ॒द्रुहः॑ ।
मेधं॑ जुषन्त॒ वह्न॑यः ॥ ९ ॥
विश्वे॑ । दे॒वासः॑ । अ॒स्रिधः॑ । एहि॑ऽमायासः । अ॒द्रुहः॑ ।
मेध॑म् । जु॒ष॒न्त॒ । वह्न॑यः ॥ ९ ॥

भाषायाम्.

७. हे ओमाश्चर्षणिधृतो विश्वे देवा दाश्वांसो [यूयं] दाशुषः सुतमागच्छत ॥
८. हे विश्वे देवास्तूर्णयोप्तुरो [यूयं] सुतं स्वसराण्युस्रा इवागच्छत ॥
९. एहिमाया वह्नयो विश्वेदेवा अस्रिधोद्रुहो मेधं जुषन्तु ॥

चा अर्थ ब्रह्मदेव असा वेदांत होत नाही, तर स्तोत्र (ब्रह्म) करणारा, सोम तयार करणारा असा व यज्ञांत जे होता, पोता इत्यादि ऋत्विज असतात त्यांपैकी एक, व क्षत्रिय नव्हे तो ब्राह्मणजातीचा मनुष्य असा अर्थ होतो.

६. 'तृप्ति पाव'= चनो धा.' चनः हा शब्द धा या धातूच्या क्रियापदाच्याच संयोगी येतो. आणि 'चनो धा' म्ह. तृप्ती पावणे, खुष होणे, संतोष अथवा आनंद पावणे. ज्याने तृप्ति होते ते द्वितीयेत अथवा सप्तम्यंत असते. जसे 'चनो दधीत गिरो मे' (ऋ. २ ३५. १), अग्नि. स्तोम चनो दधीत (ऋ. ८.१९.११) यदि मे रणं सुते उक्थे वा दधसे चनः (ऋ. ८.३२.६)= 'हरिताश्व'= हरिवान्' म्ह. पिंगट रंगाचे अश्व ज्याच्या रथास जोडलेले आहेत असा. इंद्राचे घोडे (किरणें?) पिंगट रंगाचे आहेत असें पुष्कळ ठिकाणी आले आहे.

७. सरक्षण करणारे [आणि] मनुष्यांतें आधार देणारे हे विश्वेदेव हो, [सपत्ति]दाते असे जे तुम्ही ते हविर्दात्याच्या सोमाप्रत या

८ हे विश्वेदेव हो, कुशल [आणि]चपल असे जे तुम्ही ते, गाई आपल्या गोठ्याकडेस [धावत जा तात] त्याप्रमाणे [या] सोमाकडेस धावत या

९. अकल्याण न करणारे, मायाकुशल, वैररहित असे रथारूढ विश्वेदेव [हे] हविरन्न ग्रहण करोत

7 Visve Devâs, protectors and supporters of men, come ye givers to the Soma of the giver (the worshipper)

8 Visve Devâs, come ye diligent ones quickly to the Soma like as the cows run to their abodes

9 May the beneficent, artful Visve Devâs, free from hatred and mounted on chariots, enjoy this offered food

---

७ ' विश्वेदेव ' याचा शब्दशः अर्थ ' सकल देव ' असा आहे पण जसे मरुत् देव यांचा गण आहे अथवा आदित्य देव यांचा गण आहे तसा ' विश्वेदेव ' हा देवगण असावा असें दिसत सायणाचार्यांहि 'विश्वेदेव' म्ह विश्वेदेव या नांवाचे देवविशेष असा अर्थ करितात, परतु यास्क विश्वेदेव म्ह त्या नांवाचे देवविशेष असा अर्थ न करितां विश्वे शब्द सर्व, सकल या अर्थी घेतात आतां ' विश्वेदेव ' हा देवविशेषांचा गण घेतला तर त्या गणांत कोणकोणते देव येतात आणि कोणकोणते येत नाहीत हे जरी स्पष्ट समजत नाहीं तरी ज्याप्रमाणें इन्द्रदेवता पृथक् मरुद्गण पृथक्, तसे विश्वेदेव हा पृथक गण अशा समजुतीने त्यांचें नांव संहितेंत येत असें दिसत

आपल्या लोकांत वैश्वदेव करितात तो या विश्वेदेवांस अनुलक्षूनच करितात हे सांगावयास नकोच

८ 'गाई आपल्या गोठ्याकडेस [धांवत जातात] त्याप्रमाणें '=उस्रा इव स्वसराणि' सायणाचार्य 'सूर्यकिरण दिवसाप्रत जसे जातात तद्वत' असा अर्थ करितात आणि यास्कांनाहि स्वसर पदाचा अर्थ दिवस असा केला आहे आतां उस्रा याचा अर्थ गाई असा होतो याविषयीं ऋ १ ७१ २ यावरील सायणाचार्यांचच भाष्य पाहा आणि ज्या रीतीनें स्वसर शब्दाची प्रक्रिया करून दिवस असा अर्थ यास्क करितात तशाच रीतीनें स्रियते गम्यतेऽत्र इति सरम् गृहम् असा अर्थ होण्यास अडचण दिसत नाहीं

९ 'मायाकुशल'=' एहिमायास ' हा शब्द संदिग्धार्थ आहे याचा अर्थ सायणाचार्य सुद्धां निश्चयानें करू शकत नाहींत परतु अहिमाय (सर्पाप्रमाण मायावी) जो शब्द वेदांत येतो त्याचा आणि या शब्दाचा अर्थ एकच असेल असें समजून येथें निर्वाह केला आहे —

पावका नः सरस्वती वाजेभिर्वाजिनीवती ।
यज्ञं वष्टु धियावसु ॥ १० ॥
पावका । नः । सरस्वती । वाजेभिः । वाजिनीऽवती ।
यज्ञम् । वष्टु । धियाऽवसुः ॥ १० ॥
चोदयित्री सूनृतानां चेतन्ती सुमतीनाम् ।
यज्ञं दधे सरस्वती ॥ ११ ॥
चोदयित्री । सूनृतानाम् । चेतन्ती । सुऽमतीनाम् ।
यज्ञम् । दधे । सरस्वती ॥ ११ ॥
महो अर्णः सरस्वती प्र चेतयति केतुना ।
धियो विश्वा वि राजति ॥ १२ ॥ ६ ॥ १ ॥
महः । अर्णः । सरस्वती । प्र । चेतयति । केतुना ।
धियः । विश्वाः । वि । राजति ॥ १२ ॥ ६ ॥ १ ॥

भाषायाम्.

१० पावका वाजिनीवती धियावसु सरस्वती वाजैर्नो यज्ञं वष्टु ॥
११ सूनृतानां चोदयित्री सुमतीनां चेतन्ती सरस्वती यज्ञं दधे ॥
१२ सरस्वती केतुना महोर्णः प्रचेतयति । विश्वा धियो विराजति [च] ॥

' रथारूढ'=' वहय ' यांहि हे येथें वि-शेषण आहे ' धन वाहून आणणारें ' असे सायण म्हणतात आम्ही केलेल्या अर्थास प्रयोगप्रमाणें पुष्कळ आहेत.

१०. पावन करणारी, चपला श्वगामिनी [आणि] पुष्कळ लोकांनीं पूज्य अशी सरस्वती आमच्या यज्ञाची मोठ्या उत्सुकतेनें वाछा करो

10 May Sarasvatî the purifier, the goddess mounted on a charger, [and] rich in the prayer of men greedily wish for our sacrifice

११ मधुर गायनाची प्रेरणा करणारी [आणि] चांगल्या भजनबुद्धि देणारी सरस्वती यज्ञ सपादीत असते.

11 Sarasvatî, the inspirer of joyous hymns and provoker of good pious feelings, brings about the sacrifice

१२. सरस्वती आपल्या प्रकाशानें मोठा उदकप्रवाह प्रगट करिते ती सकल प्रार्थनांची स्वामिनी होय

12 Sarasvatî exhibits with her light a great flood of water She governs all pious prayers

१० 'चपलाश्वगामिनी '=' वाजिनीवती' वर २ ऱ्या सूक्ताच्या ५ व्या मंत्रावरील टीप पाहा

'सरस्वती' ही एक वेदांत देवता कल्पिली आहे सरस्वती हे वस्तुत एका नदीचें नांव आहे आणि ऋग्वेदांत जीं जीं स्तोत्र सरस्वतीविषयी आहेत त्यांत सरस्वती म्हणजे नदी हें बहुत करून स्पष्ट दिसून येत पण जरी प्रथम सरस्वती ह नदीचें नांव होत तथापि सरस्वतीनदीच्या कांठीं यज्ञ होत होते म्हणून तिच्यावरहि इतर पदार्थांप्रमाण ऋषींनी देवत्वाचा आरोप केला चपलाश्वगामिनी हें विशेषण इतर देवांस जसें लाविलें आढळत तसें सरस्वतीस येथे लाविल आहे त्यांत विशेष प्रयोजन आहे अस दिसत नाहीं सरस्वती म्हणजे वाग्देवी अशी जी कथा पुराण इतिहासांत वगैरे आहे तिचा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं येथ ती केवळ नदी आणि नदीरूपी देवताच आहे

'मोठ्या उत्सुकतेनें'='वाजेभि' शब्दश बलानें ' 'जोरान '

११ 'यज्ञ सपादीत असते' म्ह यज्ञ करण्याची इच्छा उत्पन्न करिते

१२ प्रकाशाने मोठा उदकप्रवाह प्रगट करिते'= महो अर्ण प्र चेतयति केतुना' याच हा काय असेल त स्पष्ट समजत नाही सायण सरस्वती नदी कर्मानं म्ह प्रवाहरूपी कर्मानं पुष्कळ उदकप्रगट करिते" असा अर्थ करितात

सूक्तम् ४.

ऋषिर्विश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दाः । इन्द्रो देवता । गायत्री छन्दः ।

सुरूपकृत्नुमूतये सुदुघामिव गोदुहे ।
जुहूमसि द्यविद्यवि ॥ १ ॥

सुरूपऽकृत्नुम् । ऊतये । सुदुघाम्ऽइव । गोऽदुहे ।
जुहूमसि । द्यविऽद्यवि ॥ १ ॥

उप नः सवना गहि सोमस्य सोमपाः पिब ।
गोदा इद्रेवतो मदः ॥ २ ॥

उप । नः । सवना । आ । गहि । सोमस्य । सोमऽपाः । पिब ।
गोऽदाः । इत् । रेवतः । मदः ॥ २ ॥

भाषायाम्.

१. गोदुहे(=गोदोहगाय) सुदुघामिवोतये सुरूपकृत्नुं द्यविद्यव्याह्वयामः ॥

२. हे सोमपा. [त्वं] नः सवनान्युपागच्छ । सोम [च] पिब । रेवतस्तव मदो गोद एव [भवति] ॥

सूक्त ४.

देवता, इन्द्र; ऋषि आणि वृत्त पूर्ववत्.

१. प्रयासाशिवाय दूध काढूं देणाऱ्या गाईस दोहनार्थ जशी [हाक मारितात] तसे आम्ही, सुंदर कर्मे करणाऱ्या इंद्रास रक्षणासाठीं प्रत्येक दिवशीं हाक मारितों.

२. [हे इंद्रा], तूं आमच्या यज्ञांप्रत ये. हे सोमपान करणाऱ्या, तूं [हा] सोम पी; [का कीं] संपत्तिमान् जो तूं त्या तुला [सोमाचा] माद उत्पन्न झाला म्हणजे आम्हास गाई खचित प्राप्त होणार.

Hymn 4.

To Indra. *Author* and *metre* as before.

1. We invoke Indra the doer of beautiful deeds for protection daily like a good milch-cow for the purpose of milking.

2. Come hither to our sacrifices. Partake of the Soma, O Soma drinker. The intoxication of thee the rich certainly gives us cows.

---

१. यांतील उपमा लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. इद्र आपल्या उपासकाच्या अगदी स्वाधीन होऊन जातो आणि हळळेल्या दुभत्या गाईस हाक मारितांच ती जशी येते तसा बोलावितांच तो येतो अशी कवीची कल्पना आहे.

२. 'संपत्तिमान् इ०.' शब्दश: भाषांतर, 'संपत्तिमानाचा माद गाई देणारा [होय].' सोम पिऊन इद्रास माद उत्पन्न झाला म्हणजे तो उपासकाला गाई मिळवून देतो असें ऋषीचें हृद्गत आहे वास्तव इद्रास सोम पिण्यास बोलावितो देव सोम पिऊन त्यास माद चढला म्हणजे ते आपल्या उपासकास धनदौलत देतात, संकटापासून बचावितात, युद्धांत मदत करितात आणि त्यांच्या शत्रूचा पराजय करितात असें वेदांत फारकरून सर्वत्र आढळते.

सोम हा शब्द वेदांत मोठ्या महत्त्वाचा आहे. त्याचा अक्षरश: अर्थ पिळून काढलेला (रस) असा (सुधातूपासून) होतो तेव्हां अक्षरश: अर्थ पाहिला असतां अमुक वल्लीविशेषाचा रस असें होत नाहीं पिळून काढलेला रस म्हणजे मद्य असाच होतो. सोम मधुर, स्वादिष्ठ, तुरट, रसवान् आणि मादकारक असतो आणि इद्राने सोमपान केल्यावर इद्रासमोर कोणी शत्रु उभा राहू शकत नाहीं असें वर्णिलें आहे (ऋ ६. ४७ । २). उत्तरोत्तर सोम हें वल्लीविशेषाचेंच नांव पडलें. व सोमरसावर देवत्व आरोपून त्यास एक

अथा ते अन्तमानां विद्याम सुमतीनाम् ।
मा नो अति ख्य आ गहि ॥ ३ ॥

अथ । ते । अन्तमानाम् । विद्याम । सुऽमतीनाम् ।
मा । नः । अति । ख्यः । आ । गहि ॥ ३ ॥

परेहि विग्रमस्तृतमिन्द्रं पृच्छा विपश्चितम् ।
यस्ते सखिभ्य आ वरम् ॥ ४ ॥

परा । इहि । विग्रम् । अस्तृतम् । इन्द्रम् । पृच्छ । विपःऽचितम् ।
यः । ते । सखिऽभ्यः । आ । वरम् ॥ ४ ॥

उत ब्रुवन्तु नो निदो निरन्यतश्चिदारत ।
दधाना इन्द्र इद्दुवः ॥ ५ ॥ ७ ॥

उत । ब्रुवन्तु । नः । निदः । निः । अन्यतः । चित् । आरत ।
दधानाः । इन्द्रे । इत् । दुवः ॥ ५ ॥ ७ ॥

भाषायाम्.

३. अथ तेन्तस्था. सुमती. [वय] विद्याम । नो मातिख्यः । आगच्छ ॥

४. परेहि । यस्तव सखिभ्य आ वरम् [अस्ति] [त] विग्रमस्तृत विपश्चित-मिन्द्र पृच्छ

५. उतेन्द्र एव दुवो दधाना अन्यतश्चिन्निरारत [इति] निदो (=निन्दका.) नो ब्रुवन्तु ॥

महापराक्रमी देवता करून टाकिले व ऋग्वेदाचें एक सगळें मंडल (९ वें) सोमास अर्पण केलें आहे. या सोमावि-षयी उत्तरोत्तर पुष्कळ लिहावें लागेल. वास्तव येथें केवळ दिग्दर्शन केलें आहे.

३. तुझे उत्तम अंतस्थ अनुग्रह आम्हीं जाणावे असें कर. तू आमच्या अतिक्रम करू नकोस, येथें ये.

3. May we know thy inmost favours Do not pass us over. Come hither.

४. जा, आणि तुझ्या मित्रापेक्षा जो उत्तम [होय], जो बुद्धिमान्, अजित [आणि जो] प्रज्ञावान् असा इंद्र त्यास विचार,

4 Go and ask Indra, the wise, the unconquered, the sage, and who is better than thy friends,

५. कीं 'तुम्ही इंद्राचीच सेवा कराल तर सकल अन्य [देवता]स अगदीच अतराल' असे आमचे निंदक आम्हास म्हणोत कीं काय,

5. whether the revilers may say to us that we might indeed be lost to all other gods by serving Indra alone;

---

३. 'जाणावे असे कर'='विद्याम' म्ह. तुझे जे अगदीं आंतील, किंवा फार प्रिय अनुग्रह, मेहरबानग्या, त्या आम्हांस मिळोत – 'अतिक्रम करू नकोस,' आम्हांस वगळू नकोस

४ 'तुझ्या मित्रापेक्षा जो उत्तम होय'='यस्ते सखिभ्य आ वरम्'. वरम् हे अव्यय आहे आणि त्याचा अर्थ ('कशाच्या तरी पेक्षा) चांगले' असा होतो जसे, अभ्यर्ष देवान्साखिभ्य आ वरम्=तू आपल्या मित्रांपेक्षा देवांस चांगलें पूज (ऋ ९ ४५ २) अय सखिभ्य आ वरं मान्ध श्रोण च तारिषत्=याणे आंधळ्यास आणि पांगळ्यास त्या सातांपेक्षा चांगले तारिले (ऋ १० २५ ११)–'विचार'='पृच्छ' याचे कर्म ५ व्या आणि ६ व्या मंत्रांत जे प्रश्न आहेत तेच होय इंद्राला विचारावयाचे ते हे का, आम्हांस आमचे निंदक म्हणतात का, तुम्ही इंद्राचीच सेवा करितां दुसऱ्या देवाची करीत नाहीं, तर दुसरे सगळे देव तुम्हांस अतरतील, तर असे त्यांनीं म्हटल्यास चिंता नाहीं ना? आम्ही त्यांस सांगत असतों कीं, अतरले तर अतरोत, आम्हांस इंद्र आहे तितका पुरे; तर असें आमचे उत्तर बरोबर आहे ना? तुझ्या भरवशावर आम्हीं राहावे ना? (५.) दुसरे विचारावयाचें असें कीं, अदेवभक्त जन आम्हांस भाग्यशाली असें उपहासानें म्हणतात आणि खरोखर आम्हांस भिकारी समजतात; तर ते आम्हांस तसे करोत, आम्ही इंद्राचा आश्रय सोडणार नाहीं असे आम्ही समजतों ते बरोबर आहे ना? म्ह आम्हां खुशाल तुझ्या भरवशावर राहावे ना? (६)

५ 'सकल अन्य [देवता]स अतराल' ='अन्यत चित् निरारत' म्ह अन्य देवांस मुकाल द्वितीयपुरुषी अनेकवचन। अन्यत ही अन्यस्मात् या ऐवजी पंचमी आहे 'निरारत' याविषयी, 'मा ते गोदत्र निरराम राधस '=हे गाई देणाऱ्या इंद्रा, तुझ्या अनुग्रहास आम्ही न मुकू असें कर (ऋ. ८. २१ १६)

उत नः सुभगाँ अरिर्वोचेयुर्दस्म कृष्टयः।
स्यामेदिन्द्रस्य शर्मणि ॥ ६ ॥

उत। नः। सुऽभगान्। अरिः। वोचेयुः। दस्म। कृष्टयः।
स्याम। इत्। इन्द्रस्य। शर्मणि ॥ ६ ॥

एमाशुमाशवे भर यज्ञश्रियं नृमादनम्।
पतयन्मन्दयत्सखम् ॥ ७ ॥

आ। ईम्। आशुम्। आशवे। भर। यज्ञऽश्रियम्। नृऽमादनम्।
पतयत्। मन्दयत्ऽसखम् ॥ ७ ॥

अस्य पीत्वा शतक्रतो घनो वृत्राणामभवः।
प्रावो वाजेषु वाजिनम् ॥ ८ ॥

अस्य। पीत्वा। शतक्रतो इति शतऽक्रतो। घनः। वृत्राणाम्। अभवः।
प्र। आवः। वाजेषु। वाजिनम् ॥ ८ ॥

भाषायाम्.

६. दस्मं [च पृच्छ] उत अरयः कृष्टयो नः सुभगान्वोचेयुः। इन्द्रस्यैव शर्मणि स्याम [वा न वेति] ॥

७. यज्ञश्रियं नृमादनं पतयन्मन्दयत्सखमेतमाशुमाशव आभर ॥

८. हे शतक्रतो इमं पीत्वा [त्वं] वृत्राणां हन्ताभवः। वाजेषु [च] वाजिनं प्रावः ॥

आणि, 'मा वो दात्रान्मरुतो निरराम'—हे मरुतांनो, तुमच्या देणगीस आम्ही न मुकू असे करा (ऋ. ७.५६.२१), हें उदाहरण पाहा.

६. कीं 'हे अद्भुत कर्में करणाऱ्या [इंद्रा], देवद्रोही जन आम्हास भाग्यशाली असें ह्मणोत कीं काय? आम्हीं इंद्राच्याच आश्रयाखालीं राहावें [कीं नाहीं]?'

७. यज्ञाचें शोभविणारा, मनुष्यांतें माद आणणारा, सख्या [इंद्रा]ला धांवविणारा व त्याला मादयुक्त करणारा जो शीघ्रमादी [सोम] त्यास शीघ्रगामी [इंद्रा]प्रत अर्पण कर.

८. हे बहुमेधावी [इंद्रा], तूं ह्या [सोम] पिऊन [पूर्वी] शत्रूस मारिता झालास; [आणि] युद्धांत योद्ध्यास संरक्षिता झालास.

6 [ask] the performer of wonderful deeds, whether ungodly men may call us fortunate, [and] whether we should remain under the protection of Indra alone

7. Offer to quick [Indra] the quickly intoxicating [Soma] that graces the sacrifice, intoxicates men, [and] makes our friend [Indra] fly quick [to us and] be intoxicated

8 Indra, possessed of many wisdoms, thou hast [before], having partaken of this (Soma), become the destroyer of our enemies, thou hast protected the warrior in battles.

---

६. 'देवद्रोही' 'अरि.'. अरिः हें रूप अरीः (अर्य=अरय.) ह्याऐवजीं असावेंसें वाटतें. कृत्य. पाचें विशेषण.

७. 'सख्या इंद्राला धांवविणारा व त्याला मादयुक्त करणारा'='पतयत्-मन्दयत्सखम्'=सखाय पतयन् मादयथ. आमचा सखा जो इंद्र त्याला आमच्या यज्ञामत धांवत येण्याची इच्छा उत्पन्न करणारा व तो धांवत आल्यानंतर त्याला माद उत्पन्न करणारा. अर्पण केलेला सोम पाहून इंद्र शीघ्रचारी होऊन धांवत येतो आणि पिऊन मादयुक्त होतो असा ऋषीचा भावार्थ—'शीघ्रगामी' म्ह. लवकर धांवून येणाऱ्या.

८. यापूर्वी तू सोम पिऊन आमच्या व इतर उपासकांच्या शत्रूंचा नाश केलास व तुझे उपासक लढाईत गुतले असतां त्यांचे तू संरक्षण केलेस. यास्तव आताहि येऊन सोम पी असें कवीचें हृद्य. इंद्राला सोम अर्पण केल्यावर तो मादयुक्त होऊन उपासकाच्या शत्रूंचा नाश करितो आणि त्यास लढाईत बचावितो असें वेदांत जिकडे तिकडे आहे—'बहुमेधावी'='शतक्रतु' शतक्रतु हा शब्द फार महत्त्वाचा आहे त्याचा मूळअर्थ शत म्ह शेकडो, अर्थात् अनेक, आहेत क्रतु म्ह बुद्धि, प्रज्ञा, मेधा ज्यास असा. हें विशेषण इंद्रास बहुतकरून लाविलेलें आढळतें तथापि इतर देवांसहि

तं त्वा वाजेषु वाजिनं वाजयामः शतक्रतो ।
धनानामिन्द्र सातये ॥ ९ ॥

तम् । त्वा । वाजेषु । वाजिनम् । वाजयामः । शतक्रतो इति शतऽक्रतो ।
धनानाम् । इन्द्र । सातये ॥ ९ ॥

यो रायो३ऽवनिर्महान्त्सुपारः सुन्वतः सखा ।
तस्मा इन्द्राय गायत ॥ १० ॥ ८ ॥

यः । रायः । अवनिः । महान् । सुऽपारः । सुन्वतः । सखा ।
तस्मै । इन्द्राय । गायत ॥ १० ॥ ८ ॥

भाषायाम्.

९ हे शतक्रतो इन्द्र तं वाजिनं त्वां धनानां सातये वाजेषु वाजयाम ॥
१० यो रायो महानवनिः सुन्वतः [च] सुपारः सखा तस्मा इन्द्राय गायत ॥

क्वचित् छापिलेले आहे नंतर मागाहून क्रतुशब्दाचा अर्थ यज्ञ असा करूं लागले आणि जुने जे वेदमंत्र त्यांत शतक्रतूचा अर्थ बरोबर न समजून 'शंभर यज्ञ करणारा' असा अर्थ समजूं लागले, आणि त्यानंतर इंद्रानें शंभर यज्ञ केले आणि इंद्रत्व पावला व कोणी मानव शंभर यज्ञ करील तर इंद्रास आपलें इंद्रत्व जाईल अशी भ्रांति पडते, आणि तो नव्याण्णव यज्ञ होतपर्यंत उगी राहतो आणि शंभराव्या यज्ञास आरंभ होताच मत्सरी व भित्र्या मानवाप्रमाणे विघ्नसंतोषी होऊन रंभादिकांस पाठवून विघ्न करवितो अशा प्रकारचे भाकड रचले गेले आणि पुराणे, इतिहास, सूत्रे इत्यादि ग्रंथांत अंतर्गत होऊन प्रमाणीभूत झाले 'शतक्रतु' म्ह० बहुमेधावी असा सायणाचार्य सुद्धां पुष्कळ ठिकाणां अर्थ करितात, त्याचे उदाहरण पुढच्याच मंत्रांत शतक्रतु शब्द आला आहे त्यावरील त्याचे भाष्य पाहा

९. यास्तवच, हे बहुमेधावी इंद्रा, लूट मिळावी म्हणून आम्ही लढाईत तुला आमचा योद्धा करून पाठवितो.

१०. जो संपत्तीचा सागर, जो मोठा, जो सहज पार पाडणारा, जो सोम अर्पण करणाऱ्या उपासकाचा मित्र, त्या इंद्राप्रत तुम्ही गा.

9. Therefore, Indra possessed of many wisdoms, we move thee to be our champion in battles, that we may obtain booties

10 Sing unto that Indra, who is a stream of wealth, who is great, who is a saviour, and who is the friend of the worshipper that presses the Soma [for him].

---

९. 'यास्तव......तुला'='त त्वा.' ऋ १. २. ५. यावरची 'तर तुम्ही' याविषयींची टीप पाहा — 'लूट मिळावी म्हणून'='धनानां सातये.' धन शब्दाचा मूळ अर्थ (धन्=हन्, शत्रूस मारून त्याजकडून हरण केलेलें द्रव्य) या मंत्रांत आला आहे. बहुतकरून वेदसंहितांत हाच अर्थ असतो

१०. 'संपत्तीचा सागर'='रायो अवनि'. पदशः अर्थ 'संपत्तीचा प्रवाह,' संपत्तीचा आशय, संपत्तीचा आकर. अवनिशब्द येथें व ऋग्वेदसंहितेंत इतर स्थळीं स्त्रीलिंगी आहे. ऋ. १. ६१. १० या स्थळीं सायणाचार्य सुद्धां प्रवाह अशाच भावार्थानें निर्वाह करितात. ऋ. १. १९०. ७ हाहि मंत्र पाहा.

सूक्तम् ५.

ऋषिर्विश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दाः । इन्द्रो देवता । गायत्री च्छन्दः ॥

आ त्वेता नि षीदतेन्द्रमभि प्र गायत ।
सखायः स्तोमवाहसः ॥ १ ॥

आ । तु । आ । इत । नि । सीदत । इन्द्रम् । अभि । प्र । गायत ।
सखायः । स्तोमऽवाहसः ॥ १ ॥

पुरूतमं पुरूणामीशानं वार्याणाम् ।
इन्द्रं सोमे सचा सुते ॥ २ ॥

पुरुऽतमम् । पुरूणाम् । ईशानम् । वार्याणाम् ।
इन्द्रम् । सोमे । सचा । सुते ॥ २ ॥

स घा नो योग आ भुवत्स राये स पुरंध्याम् ।
गमद्वाजेभिरा स नः ॥ ३ ॥

सः । घ । नः । योगे । आ । भुवत् । सः । राये । सः । पुरंऽध्याम् ।
गमत् । वाजेभिः । आ । सः । नः ॥ ३ ॥

यस्य संस्थे न वृण्वते हरी समत्सु शत्रवः ।
तस्मा इन्द्राय गायत ॥ ४ ॥

यस्य । सम्ऽस्थे । न । वृण्वते । हरी इति । समत्ऽसु । शत्रवः ।
तस्मै । इन्द्राय । गायत ॥ ४ ॥

भाषायाम्. . .

१. आ तु आ इत । निषीदत । स्तोमवाहसो हे सखाय इन्द्रमभि प्रगायत ॥

२. पुरूणां पुरूतमं वार्याणामीशानमिन्द्रं सोमे सुते सचा [प्रगायत] ॥

३ स ह नो योग आभुवत् । स राये । स पुरन्ध्याम् । स वाजैर्नै आगच्छतु ॥

४. सस्थे समत्सु यस्य हरी शत्रवो न वृण्वते तस्मा इन्द्राय गायत ॥

सूक्त ५

ऋषि, पूर्ववत् देवता, इंद्र वृत्त, गायत्री.

१ या, हे मित्रांनो, स्तोत्रें रचून लौकर या, [आणि] बसा. [आणि] इंद्राविषयीं गा

२ धनाढ्यांत परम धनाढ्य [आणि] इष्ट वस्तूंचा स्वामी जो इंद्र त्याप्रत, सोम गाळताच गा

३ तो आमच्या कार्मी जवळ राहो, तो संपत्ति देओ, तो आम्ही हविरन्न समर्पण करितांना [जवळ राहो], तो आम्हासाठीं धन घेऊन येओ

४ ज्याच्या पिंवळ्या घोड्यांच्या जोडीस द्वंद्वयुद्धांत [अथवा] समरांगणांत शत्रु घेरीत नाहींत त्या इंद्राप्रत तुम्ही गा.

HYMN 5

Author as before To *Indra* Metre *Gayatri*

1 Come hither, come, friends quickly, offering hymns, and sing forth in honour of Indra,

2 the Soma being extracted, sing forth in honour of Indra, the richest of the rich and the lord of riches

3 May he be present in our work may he give us wealth may he be present when we pour out the libation, may he come to us with booty

4 Sing in honour of that Indra whose pair of tawny horses the enemies do not surround in a duel or in battles

---

१ या मंत्राचा अर्थ लावतांना असें समजावयाचें की, मंत्रकर्ता आपल्या मित्रांस यावयास व बसून इंद्राची स्तुति गावयास सांगतो आहे — 'स्तोत्र रचून'—'स्तोमवाहस' पदशः अर्थ स्तोत्रें वाहून आणणारे, म्हणजे जशी देवाची पूजा करतांना पुष्पादि सामग्री घेऊन येतात तशा स्तोत्रें रचून घेऊन या असा भावार्थ — 'लौकर' हा अर्थ मूळांत जें 'तु' हें अव्यय आहे त्यापासून गम्यमान आहे

२ 'धनाढ्यांत परम धनाढ्य'—'पुरूतमं पुरूणाम्' पुरूतम याचा अर्थ स्पष्ट असतां सायणाचार्य पुरूंस म्हणजे शत्रूंस त्रासविती (तामयति) तो असा अतिक्लिष्ट आणि निराधार अर्थ करितात तें कळत नाहीं — 'सोम गाळताच'—'सोमे सचा सुते' सचा हें क्रियाविशेषण — 'गा' हें क्रियापद पूर्वीच्या मंत्रांत आहे तेंच येथ अध्याहृत केलें पाहिजे

३ हा मंत्र बघड आहे तथापि त्याच्या शब्दरचनेंत थोडेंसें काठिण्य दिसतें परंतु आम्हीं केलेल्या अर्थाविं

सुतपाव्ने सुता इमे शुचयो यन्ति वीतये ।
सोमासो दध्याशिरः ॥ ५ ॥ ९ ॥

सुतऽपाव्ने । सुताः । इमे । शुचयः । यन्ति । वीतये ।
सोमासः । दधिऽआशिरः ॥ ५ ॥ ९ ॥

त्वं सुतस्य पीतये सद्यो वृद्धो अजायथा ।
इन्द्र ज्यैष्ठ्याय सुक्रतो ॥ ६ ॥

त्वम् । सुतस्य । पीतये । सद्यः । वृद्धः । अजायथाः ।
इन्द्र । ज्यैष्ठ्याय । सुक्रतो इति सुऽक्रतो ॥ ६ ॥

आ त्वा विशन्त्वाशवः सोमास इन्द्र गिर्वणः ।
शं ते सन्तु प्रचेतसे ॥ ७ ॥

आ । त्वा । विशन्तु । आशवः । सोमासः । इन्द्र । गिर्वणः ।
शम् । ते । सन्तु । प्रऽचेतसे ॥ ७ ॥

भाषायाम्.

५. इमे शुचयो दध्याशिर सुता सोमा सुतपाव्ने वीतये यन्ति ॥

६ हे सुक्रतो इन्द्र त्व सुतस्य पीतये ज्यैष्ठ्याय [च] सद्यो वृद्धोजायथा ॥

७ हे गिर्वण इन्द्र आशव. सोमास्त्वामाविशन्तु । प्रचेतसे तुभ्य श सन्तु ॥

षयी सशय दिसत नाही 'कामी'='यो-गे'='सपत्नी देओ'='राये [आ भुवत्]'. अक्षरश 'तो आम्हास सप-त्नीसाठी [म्ह सपत्निमद] होओ'='हविरन्न समर्पण करिताना'='पुर-ध्याम' या शब्दाचा अर्थ सायणाचार्य निश्चयाने करू शकत नाहीत

४ 'पिवळ्या घोड्यांच्या जोडीस'='हरी'. इद्र हा आपल्या रथास पिवळ्या घोड्यांची जोडी जोडीत अ-सतो व ते घोडे अति चपल आणि पराक्रमी आहेत असे वेदात वर्णिलेले आढळते. त्या घोड्यास 'शत्रु घेरीत नाहीत' म्हणजे शत्रूच्याने त्यांचा अ-तिक्रम अथवा पराजय होऊ शकत नाही

५. हे पिळून काढलेले पवित्र [आणि] दधिमिश्रित सोमरस सोमपी [इंद्रा]नें प्राशन करावे म्हणून त्याजकडेस जात आहेत.

5. These extracted Somas, pure and sweetened by curds, are going to the Soma-drinking India that he may drink them.

६. हे सुप्रज्ञ इंद्रा, तूं सोम पिण्यासाठीं आणि सकल देवांमध्यें प्रभुत्व भोगण्यासाठीं वाढलेलाच एकदम जन्मलास.

6. O Indra of excellent wisdom, thou wert at once born grown-up for drinking the extracted Soma and for enjoying superiority over the other gods.

७. हे प्रियाव्हान इंद्रा, शीघ्रमादक सोमरस तुझ्या [पोटां]त शिरोत आणि तुज बुद्धिमंताला सुखकारक होवोत.

7. Indra, who lovest to be invoked, let the quickly intoxicating Somas enter thy stomach and let them gratify thee who art wise.

---

५. 'सोमपी'='सुतपावन्.' म्हणजे सोम पिणारा. हे इंद्राचे नांव आहे. केवळ विशेषण नव्हे.—'जात आहेत.' उपासक सोमरसाचे प्याले इंद्रास अर्पण करून आपल्या समोर ठेवून म्हणतो आहे की, हे पाहा सोमरस इंद्राकडेस जात आहेत.

६. हा मंत्र कितीएक कारणांमुळे लक्ष्यांत ठेवण्याजोगा आहे. एक तर 'क्रतु' शब्दाचा अर्थ बुद्धि किंवा प्रज्ञा होतो आणि शतक्रतु म्हणजे शंभर यज्ञ केलेला असा नव्हे तर शंभर प्रज्ञा ज्यास आहेत तो असे जे आम्हीं पूर्वी सांगितले आहे त्याचे पुष्टीकरण सुक्रतु या शब्दांत आहे दुसरी ही गोष्ट की, सर्व देवांचा राजा जो इंद्र तो या मंत्राच्या कर्त्याच्या मताप्रमाणे अनादि नव्हे; परंतु जन्मलेला आहे. आणि तिसरें असे की, इंद्र जन्मला त्याचे सार्थक्य (या मंत्राच्या कर्त्याच्या समजुतीप्रमाणे) इतकेंच की, त्याणें देवांचे आधिपत्य करून सर्वांच्या वांट्यापेक्षां मोठा सोमाचा वांटा घ्यावा.—'वाढलेलाच'='वृद्धः.' म्हणजे इंद्र इतरांप्रमाणे जन्मतांच लहान नव्हता, मोठाच एकदम निपजला.

७. 'प्रियाव्हान'='गिर्वणः.' म्ह. लोकांनीं आपला धांवा अथवा स्तुति करावी अशी ज्याला आवड आहे तो. ऋषि इंद्रास सोमरस आवडेत म्हणून कसा आळवितो आहे ते लक्ष्यांत ठेवण्याजोगे आहे.

८. हे बहुप्रज्ञ इंद्रा, तुला स्तोत्रांनीं, तुला स्तुतींनीं [पूर्वी] वाढविलेले आहे. तर तुला आमच्या स्तवनवाणी वाढवोत.

8. [Indra] of many wisdoms, thee have hymns magnified, thee the praises [of former poets] May our praises [now] magnify thee.

९. अखंड आश्रय देणारा इंद्र आम्हांस अशी हजारपट शक्ति देवो कीं, जिजमध्यें सकल पराक्रम [वास करीत] असतील.

9. May Indra, who grants imperishable aid vouchsafe that thousand-fold strength unto us in which are contained all acts of valour.

---

८. 'बहुप्रज्ञ'=' शतक्रतु'. वर सहाव्या मंत्रावरची टीप पाहा या स्थळींहि सायणाचार्य बहुप्रज्ञ असा एकपक्षीं (दुसरे पक्षी बहुकर्मा असा) अर्थ करितात. या मंत्रांत कितीएक गोष्टी लक्ष्यांत ठेवण्याजोग्या आहेत. एक तर ही कीं, या ऋषीच्या समजुतीप्रमाणें इंद्राचे महत्त्व वाढलें तें उपासकांच्या स्तोत्रांनीं वाढलें आहे (आणि हें खरेंच आहे; कारण कीं, ज्ञानोबा, नामदेव आणि शेवटीं विशेषेंकरून तुकारामाच्या अभंगांनीं विठोबास 'वाढविलें' आहे हें कोण कबूल करणार नाहीं?) दुसरें असें कीं, या ऋषीच्या म्हणण्याप्रमाणें हें जें सूक्त आहे तें अनादि नव्हे; कारण तें अनादि असतें तर पूर्वी स्तोत्रांनीं वगैरे तूं वाढलास तसा आतां आमच्या स्तवनवाणींनीं तूं वाढ असें म्हणण्याचें अवश्य नव्हतें.

सायणाचार्य 'स्तोमाः' म्ह. साम गाणारांचीं स्तोत्रें आणि 'उक्था' म्ह. 'शस्त्राणि' असा नियत अर्थ करितात; पण तसें करण्याची आवश्यकता दिसत नाहीं.

९. 'अशी हजारपट शक्ति'=' इमं सहस्रिणं वाजम्' इम याचा अर्थ या ठिकाणीं किंचित् लक्ष्यांत ठेवण्याजोगा आहे. तो येथें दर्शक सर्वनामार्थी आहे, पुरुषवाचक सर्वनामार्थी नाहीं. 'ईदृशं' या अर्थी समजला पाहिजे. सहस्रिणम् हे शक्तीस जसें येथें विशेषण लाविलें आहे तसेंच ऋ. १. ३०. ८. यांत साहाय्य (ऊति) यास, ऋ. १.३१ १०,६४.१५,५-५४.१३ यांत संपत्ति (रायः) शब्दास आणि ऋ ६.४५ ३२ यांत देणगी (राति) यास लाविलेलें आहे. त्याचा अर्थ सायणाचार्य 'बहुत' असा करितात. तोच अर्थ प्रस्तुतस्थळीं 'हजारपट' या शब्दाचा समजावयाचा

या मंत्रांत इंद्राजवळ ऋषि काय मागतो याचा विचार आपण केला म्हणजे ऋषिजन देवांपाशीं मोठे आणि ते विष्णूच्या पक्ष स्वर्गा लाभ मागतील मग त्यापासून देवांचा देव विष्णु म्हणून मानून घेईल या पौराणिक कथेची गोष्ट समजून घेईल. वेदांत ब्राह्मणांनी देवांस दर्शन बनावि-

मा नो मर्तां अभि द्रुहन्तनूनामिन्द्र गिर्वणः ।
ईशानो यवया वधम् ॥ १० ॥ १० ॥

मा । नः । मर्ताः । अभि । द्रुहन् । तनूनाम् । इन्द्र । गिर्वणः ।
ईशानः । यवय । वधम् ॥ १० ॥ १० ॥

भाष्यायाम्.

१०. हे गिर्वण इन्द्र नस्तनूनां मर्ता मा अभिद्रुहन् । ईशान [च त्वं] वधं यवय ॥

लेलें दृष्टीस पडत नाहीं. ऋषि हे देवाचे आपण उपासक आणि देव करितील तर आपलें कल्याण होईल अशीच सुबुद्धि बाळगीत होते.

या मंत्राचा अर्थ करितांना आम्हांस यजम् आणि सनेत् यांचा अर्थ सायणांस सोडून केला आहे त्यास अनेक प्रमाणें आहेत आणि त्यांतून कितीएक तर सायणाचार्यांच्या भाष्यांतीलच आहेत.

सूक्तम् ६.

ऋषिर्विश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दा. । देवता-१-३ इन्द्र ; ४ ६,८,९ मरुत ;
५, ७ मरुत इन्द्रश्च; १० इन्द्रः । गायत्री छन्दः ॥

युञ्जन्ति ब्रध्नमरुषं चरन्तं परि तस्थुषः ।
रोचन्ते रोचना दिवि ॥ १ ॥

युञ्जन्ति । ब्रध्नम् । अरुषम् । चरन्तम् । परि । तस्थुषः ।
रोचन्ते । रोचना । दिवि ॥ १ ॥

भाष्यायाम्

१ परितस्थिवांसश्चरन्तमरुषं ब्रध्नं युञ्जन्ति । दिवि रोचनानि रोचन्ते ॥

१० हे प्रियाव्हान इंद्रा, आम्हास मर्त्यजन उपद्रव न करोत. आमचा प्रभु असा जो तू तो [आपलें] वज्र [आम्हावर] पडू देऊ नकोस.

10 Indra, who lovest to be invoked, may mortals never hurt us Mayst thou the lord of our lives ward off thy thunderbolt [from us]

१० या मन्त्रांत इतकीच प्रार्थना आहे कीं, हे इंद्रा आम्हास मर्त्यजनांपासून किंवा अमर्त्य जो आमचा प्रभु तू त्यापासून उपद्रव न होवो – 'प्रियाव्हान' वर सातव्या मन्त्रावरची टीप पाहा – 'आमचा प्रभु' = 'तनूनामीशान' पदश अर्थ तर शरीराचा प्रभु असा आहे, पण 'तनु' हा शब्द 'आपण', 'आम्ही' जो बोलत आहे त्याचें शरीर म्हणजे स्वत तोच, अशा अर्थी वेदांत वापरलेला आढळतो. ऋ २ ९ २, १० ४७ इत्यादि पाहा – 'वज्र' = 'वधम्'. सायणाचार्य वधशब्दाचा अर्थ येथे मरण असा करितात, पण वधशब्दाचा अर्थ वेदांत पुष्कळ ठिकाणी मारणारा आणि विशेषकरून इंद्राचें वज्र असा होतो. याविषयी ऋ १ ५२ १५ यावरील सायणाचेंच भाष्य पाहा त्या ठिकाणी भृष्टिमता वधेन म्हणजे तीक्ष्ण धारेच्या वज्रानें असा त्यांनीच अर्थ केला आहे

सूक्त ६

ऋषि, पूर्ववत् देवता १, ३ इंद्र, ४ ९ मरुत्, ५ ७ इंद्र आणि मरुत्, १० इंद्र वृत्त, पूर्ववत्

Hymn 6

Author, as before *To Indra* (1 3), the *Maruts* (4 9), *Indra* and the *Maruts* (5 7), *Indra* (10) Metre as before

१. लाल घोडा चालता चालता त्यास जवळचे लोक त्यास जोडीत आहेत आकाशांत चांदण्या [अजून] चमकत आहेत

1 The bystanders are harnessing the red horse, as he goes, to the chariot The stars are still shining in the sky

१ हे सूक्त बरेंच कठिण आहे व-राच त्याचा भाग रूपकयुक्त आहे त्यामुळें अर्थ स्पष्ट होऊं शकत नाहीं – 'लाल घोडा' म्ह. सकाळीच आरक्तवर्णांनें आच्छादित असून उगवणारा जो सूर्य तोच किंवा त्याचा घोडा, व लोक इंद्र असें सायणाचें भाष्य आहे परंतु याचा मात्र अर्थ ते स्पष्ट न करतां असा करितात

युञ्जन्त्यस्य काम्या हरी विपक्षसा रथे ।
शोणा धृष्णू नृवाहसा ॥ २ ॥
युञ्जन्ति । अस्य । काम्या । हरी इति । विऽपक्षसा । रथे ।
शोणा । धृष्णू इति । नृऽवाहसा ॥ २ ॥

°केतुं कृण्वन्नकेतवे पेशो मर्या अपेशसे ।
समुषद्भिरजायथाः ॥ ३ ॥
केतुम् । कृण्वन् । अकेतवे । पेशः । मर्याः । अपेशसे ।
सम् । उषत्ऽभिः । अजायथाः ॥ ३ ॥

आदह स्वधामनु पुनर्गर्भत्वमेरिरे ।
दधाना नाम यज्ञियम् ॥ ४ ॥
आत् । अह । स्वधाम् । अनु । पुनः । गर्भऽत्वम् । आऽईरिरे ।
दधानाः । नाम । यज्ञियम् ॥ ४ ॥

भाषायाम्.

२ विपक्षसौ शोणौ धृष्णू नृवाहसावस्य काम्यौ हरी रथे युञ्जन्ति ॥
३ हे मर्या [अयम्] अकेतवे केतुमपेशसे पेश कृण्वन्नुषाद्भिः सहाजायत ॥
४ अथानन्तर यज्ञिय नाम दधाना [मरुतः] स्वधामनु पुनर्गर्भत्वमेरिरे ॥

मंत्राचे तात्पर्य असे दिसते की, आकाशांत अजून चांदण्या झिलमिलना-हेत इतक्यांत आरक्तवर्ण सूर्य रथास जोडलेल्या घोड्याप्रमाणे चालून येत आहे हे प्रभातवर्णन आहे, व पुढच्या ऋचा सुद्धा तशाच अर्थाच्या समजल्या पाहिजेत

° केतु मह आनिष्ट येतो तेव्हां व महर्णात या मंत्राचा जप करतात आणि महमखांत या मंत्राने केतूचे हवन करतात परंतु यांत केतु या कल्पित महाचा कांहींच संबंध दिसत नाही.

२. ते याच्या दोन आवडत्या घोड्यांस रथाच्या प्रत्येक बाजूस जोडीत आहेत. जे घोडे आरक्तवर्णाचे, चलाख [आणि] शूर [इंद्रा]स वाहून आणण्यास योग्य होत.

2 They are harnessing to his chariot, one on each side, his favourite pair of tawny horses, that are chesnut, fiery and able to carry their brave lord.

३. हे गड्यांनो, हा सूर्य अंधाराचे ठायीं उजेड आणि अरूपाचे ठायीं रूप उत्पन्न करीत करीत उषांबरोबर जन्मत असतो.

3. Causing light for darkness and form where there is no form this god is, ye men, born along with the dawns.

४. त्यानंतर लागलेच, पूज्य नाम धारण करणारे [मरुद्देव] आपल्या परिपाटीप्रमाणें पुनः निपजतात.

4. Immediately after that those [Maruts] that bear a name that is worthy to be adored are born again according to their custom.

---

२. सकाळीं उगवणारा जो सूर्य तो इंद्र होय असें (सायणाचार्यांप्रमाणे) समजून या मंत्राचा अर्थ केला पाहिजे.—'याच्या'=' अस्य'. म्ह. इंद्राचे.

३. 'अंधाराचे ठायीं उजेड'= 'केतुमकेतवे.' 'अरूपाचे ठायीं रूप' =' अपेशसे पेशः'. ज्याला प्रकाश नाहीं त्याला प्रकाश आणि ज्याला रूप नाहीं त्याला रूप देणारा असाहि अर्थ (सायणाचार्यांनीं केलेला) संभवतो — 'गड्यांनो '=' मर्याः.' सूक्त म्हणणारा आपल्या जवळ असणाऱ्या सोबत्यांस म्हणतो आहे.—' जन्मत असतो'=' समजायथाः.' द्वितीयपुरुषीं आहे; पण संबोधन 'गड्यांनो' याचे असल्यामुळें तृतीयपुरुषी अर्थ बरावा लागला आहे — उषांबरोबर' उषा म्हणजे प्रभात, पहांट हीच कोणी एक देवता कल्पिली आहे व त्या अनेक आहेत असेंहि मानिले आहे, व वेदांत कितीएक सुंदर स्तोत्रे या देवतेच्या नांवचीं आहेत. तीं पुढें येत जातील.

४. 'त्यानंतर लागलेच'=' आत् अह.' म्हणजे सूर्यरूपी इंद्राचें जन्म झाल्याबरोबर. इंद्र निघतांच मरुतांहि निघतात असें तात्पर्य.— आपल्या परिपाटीप्रमाणे' =' स्वधामनु.' स्वधाशब्दाचा हा येथें केलेला अर्थ पुष्कळ दुसऱ्या मंत्रांत आढळतो. सायणाचार्य बहुतकरून अन्न अथवा उदक असा अर्थ करीत असतात.—' पुनः निपजतात '= ' पुनर्गर्भत्वम् एरिरे.' पुनः गर्भत्वास पावले, पुनः गर्भ झाले, पुनः जन्म घेते झाले. एरिरे हा पूर्ण भूतकाळ आहे.

युञ्जन्त्यस्य काम्या हरी विपक्षसा रथे ।
शोणा धृष्णू नृवाहसा ॥ २ ॥

युञ्जन्ति । अस्य । काम्या । हरी इति । विऽपक्षसा । रथे ।
शोणा । धृष्णू इति । नृऽवाहसा ॥ २ ॥

*केतुं कृण्वन्नकेतवे पेशो मर्या अपेशसे ।
समुषद्भिरजायथाः ॥ ३ ॥

केतुम् । कृण्वन् । अकेतवे । पेशः । मर्याः । अपेशसे ।
सम् । उषत्ऽभिः । अजायथाः ॥ ३ ॥

आदह स्वधामनु पुनर्गर्भत्वमेरिरे ।
दधाना नाम यज्ञियम् ॥ ४ ॥

आत् । अह । स्वधाम् । अनु । पुनः । गर्भऽत्वम् । आऽईरिरे ।
दधानाः । नाम । यज्ञियम् ॥ ४ ॥

भाषायाम्.

२ विपक्षसौ शोणौ धृष्णू नृवाहसावस्य काम्यौ हरी रथे युञ्जन्ति ॥
३ हे मर्या [अधम्] अकेतवे केतुमपेशसे पेश कृण्वन्नुषद्भि सहाजायत ॥
४ अथानन्तर यज्ञिय नाम दधाना [मरुत.] स्वधामनु पुनर्गर्भत्वमेरिरे ॥

मन्त्राचे तात्पर्य असे दिसते की, आकाशात अजून चांदण्या झिळमिळता-हेत इतक्यात आरक्तवर्ण सूर्य रथास जोडलेल्या घोड्याप्रमाणे चालून येत आहे हे प्रभातवर्णन आहे, व पुढच्या ऋचा सुद्धा तशाच अर्थाच्या समजल्या पाहिजेत.

---

* केतु ग्रह अनिष्ट येतो तेव्हां व ग्रहणात या मन्त्राचा जप करतात आणि ग्रहमखात या मन्त्राने केतूचे हवन करतात परंतु यात केतु या कल्पित ग्रहाचा कांहीच संबंध दिसत नाही

२. ते याच्या दोन आवडत्या घोड्यांस त्याच्या प्रत्येक बाजूस जोडीत आहेत. जे घोडे आरक्तवर्णाचे, चलाख [आणि] शूर [इंद्रा]स वाहून आणण्यास योग्य होत.

३. हे गड्यांनो, हा सूर्य अंधाराचे ठायीं उजेड आणि अरूपाचे ठायीं रूप उत्पन्न करीत करीत उषांबरोबर जन्मत असतो.

४. त्यानंतर लागलेच, पूज्य नाम धारण करणारे [मरुद्देव] आपल्या परिपाटीप्रमाणें पुनः निपजतात.

2. They are harnessing to his chariot, one on each side, his favourite pair of tawny horses, that are chesnut, fiery and able to carry their brave lord.

3. Causing light for darkness and form where there is no form this god is, ye men, born along with the dawns.

4. Immediately after that those [Maruts] that bear a name that is worthy to be adored are born again according to their custom.

---

२. सकाळी उगवणारा जो सूर्य तो इंद्र होय असे (सायणाचार्यप्रमाणे) समजून ह्या मंत्राचा अर्थ केला पाहिजे.—'याच्या'='अस्य'. म्ह. इंद्राचे.

३. 'अंधाराचे ठायीं उजेड'='केतुमकेतवे.' 'अरूपाचे ठायीं रूप'='अपेशसे पेशः'. ज्याला प्रकाश नाहीं त्याला प्रकाश आणि ज्याला रूप नाहीं त्याला रूप देणारा असाहि अर्थ (सायणाचार्यांनीं केलेला) संभवतो.—'गड्यांनो'='मर्याः.' सूक्त म्हणणारा आपल्या जवळ असणाऱ्या लोकांस म्हणतो आहे.—'जन्मत असतो'='समजायथाः.' द्वितीयपुरुषी आहे; पण संबोधन 'गड्यांनो' यानें असल्यामुळें तृतीयपुरुषी अर्थ करावा लागला आहे.—'उषांबरोबर' उषा म्हणजे प्रभात, पहाट हीच कोणी एक देवता कल्पिली आहे व त्या अनेक आहेत असेंहि मानिलें आहे, व वेदांत कितीएक सुंदर स्तोत्रें या देवतेच्या नांवचीं आहेत. तीं पुढें येत जातील.

४. 'त्यानंतर लागलेच'='आत् अह.' म्हणजे सूर्यरूपी इंद्राचे जन्म झाल्याबरोबर. इंद्र निघतांच मरुत्हि निघतात असें तात्पर्य.—'आपल्या परिपाटीप्रमाणें'='स्वधामनु.' स्वधाशब्दाचा हा येथें केलेला अर्थ पुष्कळ दुसऱ्या मंत्रांत आढळतो. सायणाचार्य बहुतकरून अन्न अथवा उदक असा अर्थ करीत असतात.—'पुनः निपजतात'='पुनर्गर्भत्वम् एरिरे.' पुनः गर्भस्थापन पावले, पुनः गर्भ झाले, पुनः जन्म घेते झाले. एरिरे हा पूर्ण भूतकाळ आहे.

वीळु चिदारुजत्नुभिर्गुहा चिदिन्द्र वह्निभिः ।
अविन्द उस्रिया अनु ॥ ५ ॥ ११ ॥

वीळु । चित् । आरुजत्नुऽभिः । गुहा । चित् । इन्द्र । वह्निऽभिः ।
अविन्दः । उस्रियाः । अनु ॥ ५ ॥ ११ ॥

देवयन्तो यथा मतिमच्छा विदद्वसुं गिरः ।
महामनूषत श्रुतम् ॥ ६ ॥

देवऽयन्तः । यथा । मतिम् । अच्छ । विदत्ऽवसुम् । गिरः ।
महाम् । अनूषत । श्रुतम् ॥ ६ ॥

भाषायाम्

५ हे इन्द्र दृढमपि भञ्जद्भिर्गुहायामपि वहद्भिरुस्रिया अन्वविन्दः ॥

६ देवयन्तो यथा मतिमच्छ गिरो विदद्वसु महान्तं श्रुतमनूषत ॥

ह्याचा अर्थ वेदांत बहुतकरून रीति-वर्तमानकाळाप्रमाणे होत असतो म्ह-णून गर्भत्वम् एरिरे ह्याचा अर्थ निपजत असतात असा करण्यांत आला आहे.

५. हे इंद्रा, कठिण [पर्वतास] सुद्धा फोडणारे, [आणि] गुहेमध्यें सुद्धा तुला वाट दाखवून नेणारे जे [मरुत्] त्यांच्या योगेकरून तू गाई शोधून काढिता झालास.

६. [मग] भाविक जे देवभक्त ते, द्रव्य मिळवून देणारा, मोठा, आणि प्रख्यात जो [मरुद्गण] त्याचीं स्तवनें, बुद्धिमत [इंद्रा]चीं जशीं [गाते झाले] तशींच गाते झाले.

5 O Indra, by their aid who break asunder even the hard rock and who guide thee even into the cave, thou didst discover the cows.

6. [Then] pious men sang hymns in honour of the wealth-bestowing, , great and renowned [host of Maruts] as they did in honour of the wise [Indra]

---

५. स्वर्गांतील गाई पणिनामक दैत्यांनी हरण करून नेल्या आणि अति कठिण अशा पर्वतांतील अंधकारमय गुहेंत लपवून ठेविल्या तो पर्वत फोडण्यास आणि गुहा हुडकून काढण्यास मरुतांनी इंद्रास साहाय्य केलें त्यामुळें इंद्राने त्या गाई सोडविल्या अशा कथेस अनुलक्षून वेदांत पुष्कळ सूक्तें व ऋचा आहेत 'गाई शोधून काढिता झालास' हें केवळ रूपक आहे गाई म्हणजे प्रकाश अथवा सूर्यकिरण, किंवा मेघोदक त्यांचा अंधकाररूपी अथवा मेघरूपी असुराने अपहार केलेला असतो हें सरेंच व त्या गाई शोधून काढण्यास सूर्यरूपी इंद्राची अथवा मेघभेदनकृत्पादक वृष्टिशक्तिरूप इंद्राची व त्याचे स्नेही जे वायुरूप मरुत् त्यांची आवश्यकता नाहीं असा कोण म्हणू शकेल?

साधारण संस्कृतांत मरुत् शब्दाचा अर्थ साधारण देव असा समजतात, पण वेदांत तसा अर्थ होत नाहीं तर मरुत् म्हणजे त्या नावाचे देवविशेष होत. ते मरुत् वायूच समजले पाहिजेत त्यांनाच रुद्र असेंहि म्हणतात ते एकशें ऐंशीं (ऋ ८. ८५ ८) किंवा सत्तावीस आहेत (ऋ १.१३३ ६) त्यांच्या बापाचें नांव रुद्र आणि आईचें नांव पृश्नि त्यांस सिंधूचे पुत्र असेंहि म्हटलें आहे, तसेंच त्यांस द्यूचे (आकाशाचे) पुत्र असेंहि म्हटलें आहे मरुतांचा संबंध इंद्राशीं फार आहे. ते त्याचे स्नेही, साहाय्यकर्ते आणि त्याचें मोठेपण वाढविणारे होत ते सोन्याचीं शस्त्रें व विजा धारण करितात ते पावसाचा वर्षाव करितात ते दिवसाही सुद्धां अंधकार उत्पन्न करितात, आणि पृथ्वीवरजिकडे तिकडे पाऊस पाडितात आणि ऊष्मा नाहींसा करितात ते पर्वत, पृथिवी आणि उभय भुवनें कांपवितात ते झाडें मोडून टाकितात इत्यादि त्यांचा विषय वेदांत सांगितले आहे.

६ 'बुद्धिमत'='मतिम्'-[मत]

इन्द्रेण सं हि दृक्षसे संजग्मानो अबिभ्युषा ।
मन्दू समानवर्चसा ॥ ७ ॥

इन्द्रेण । सम् । हि । दृक्षसे । सम्ऽजग्मानः । अबिभ्युषा ।
मन्दू इति । समानऽवर्चसा ॥ ७ ॥

अनवद्यैरभिद्युभिर्मखः सहस्वदर्चति ।
गणैरिन्द्रस्य काम्यैः ॥ ८ ॥

अनवद्यैः । अभिद्युऽभिः । मखः । सहस्वत् । अर्चति ।
गणैः । इन्द्रस्य । काम्यैः ॥ ८ ॥

अतः परिज्मन्ना गहि दिवो वा रोचनादधि ।
समस्मिन्नृञ्जते गिरः ॥ ९ ॥

अतः । परिऽज्मन् । आ । गहि । दिवः । वा । रोचनात् । अधि ।
सम् । अस्मिन् । ऋञ्जते । गिरः ॥ ९ ॥

भाषायाम्

७ अबिभ्युवेन्द्रेण सह सजग्मानो दृश्यसे हि । मन्दू समानवर्चसौ ॥

८ मखोऽनवद्यैरभिद्युभिरिन्द्रस्य काम्यैर्गणैर्बलवद् [यथा तथा] अर्चति ॥

९ हे परिज्मन्नतो दिवो वा रोचनादध्यागच्छ । अस्मिन्गिरः समृञ्जते ॥

म्ह इंद्रानें गाई शोधून काढतांच मरुतांचे तात्पर्य हें की, मरुतांच्या साहाय्यानें इंद्रानें गाईंचा शोध लावितांच देवभक्त जे ऋषि वगैरे त्यांनीं इंद्राची जशी स्तुति केली तशी मरुद्गणांचीहि केली.

७. कारण कीं, भ्याला नाहीं असा जो इंद्र त्यासह चाल करून जात असतांना [हे मरुद्गणा], तूं दृष्टीस पडलास. [तूं आणि इंद्र असे] उभयतां संतोष पावले [आणि] एकसारिखे तेजस्वी [दिसलां.]

८. सुंदर [आणि] दिव्य जे इंद्राचे प्रिय गण त्यांसहवर्तमान [हा] यज्ञ मोठ्यानें [इंद्राची] स्तुति गात आहे.

९. हे भटकणाऱ्या मरुद्गणा, तूं तिकडून किंवा आकाशाच्या तेजस्वी प्रदेशांतून इकडे ये. या [तुझ्या येण्या] विषयीं [आमच्या] वाणी उत्सुक आहेत.

7. For, host of Maruts, thou wert seen marching forth together with Indra who was not frightened: both were delighted and equally endowed with spirit.

8. With a loud voice and joined by the favourite attendants of Indra, who are blameless and divine, this sacrifice is singing [his praises.]

9. O wandering host, come hither, whether from yonder or from the bright region of heaven. Our prayers are striving together for this (thy coming).

---

७. '[हे मरुद्गणा,] तूं.' मरुद्गण याचे वाचक पद वरील मंत्रांत जसे नाहीं तसे यांतहि नाहीं. तथापि तें अर्थावरून गम्यमान आहे हे सांगावयास नकोच. सायणाचार्यहि, असाच अर्थ करितात — 'चाल करून जात असतांना' (='संजग्मानः'), अर्थात् शत्रूवर — 'भ्याला नाहीं असा.' इंद्र न भितां शत्रूवर चाल करून गेला असे तात्पर्य.

८. 'यज्ञ'='मखः.' म्ह. या यज्ञाचे संपादणारे ऋत्विज. भावार्थ असा दिसतो कीं, इंद्राचा जय झाला ही गोष्ट जसे आम्ही या यज्ञांत गात आहों तसेच इंद्राचे प्रिय मित्र जे मरुद्गण तेहि गात आहेत. मरुद्गण गात आहेत ही मंत्रकर्त्यांची कल्पना करीत आहे.

९. 'भटकणाऱ्या'='परिज्मन्.' म्ह. इकडे तिकडे फिरणाऱ्या. हें विशेषण पवनरूपी मरुद्देवांस यथायोग्य लाविले आहे यांत संशय नाहीं. — 'तिकडून' (='अत.') म्ह. अंतरिक्षांतून (पृथ्वी आणि आकाश यांच्यामध्ये असलेल्या प्रदेशांतून) असें सायणाचार्य म्हणतात. परंतु या लोकांतून म्ह. पृथ्वीवरून असा अर्थ चांगला संभवतो. — 'या [तुझ्या येण्या] विषयीं [आमच्या] वाणी उत्सुक आहेत'='सम् अस्मिन् ऋञ्जते गिरः.' याचा अर्थ सायण 'या [कर्मा] च्या ठायीं [असलेला ऋत्विज्] स्तोत्रें चांगल्या रीतीनें तयार करीत आहे' असा करितात. वस्तुतः 'ऋञ्जते' हें अनेकवचनी क्रियापद आहे आणि

इतो वा सातिमीमहे दिवो वा पार्थिवादधि ।
इन्द्रं महो वा रजसः ॥ १० ॥ १२ ॥

इतः । वा । सातिम् । ईमहे । दिवः । वा । पार्थिवात् । अधि ।
इन्द्रम् । महः । वा । रजसः ॥ १० ॥ १२ ॥

भाषायाम्.

१० इतो वा दिवो वा पार्थिवादधि महतो वा रजस इन्द्र सातिं याचामहे ॥

त्या शब्दाचा अर्थ ' प्रयत्न करीत आहेत ' असा आहे आणि त्याच भावार्थाने आम्हीं भाषांतर केले आहे तथापि अत्य पादाचा अर्थ संदिग्ध आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

सूक्तम् ७

ऋषिविश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दा । इन्द्रो देवता । गायत्री च्छन्दः ॥

इन्द्रमिद्गाथिनो बृहदिन्द्रमर्केभिरर्किणः ।
इन्द्रं वाणीरनूषत ॥ १ ॥

इन्द्रम् । इत् । गाथिनः । बृहत् । इन्द्रम् । अर्केभिः । अर्किणः ।
इन्द्रम् । वाणीः । अनूषत ॥ १ ॥

भाषायाम्.

१ इन्द्रमेव गाथिन इन्द्रम् [एव] अर्केरर्किण इन्द्रम् [एव] वाण्यो बृहद्गायिषु ॥

१०. आम्ही इंद्राजवळ या आकाशांतून किंवा पृथिवींतून किंवा महान् अंतरिक्षांतून धन [देत असे] प्रार्थितों.

10. We pray to Indra for riches either from this heaven or from the earth or from the spacious intermediate region.

१०. मंत्राचा भावार्थ असा कीं, आम्ही इंद्राजवळ धनदौलत मागतो. मग तो आम्हांस ती स्वर्गांतून आणून देओ किंवा पृथ्वीवरून अथवा अंतरिक्षांतून आणून देओ. मुळांत जो 'अधि' शब्द आहे त्याचा अर्थ करून, पासून, आंतून असा केला पाहिजे.

सूक्त ७.

ऋषि, पूर्ववत्. देवता, इंद्र. वृत्त, गायत्री.

१. इंद्राचीच स्तुति गायक लोक मोठ्यानें गात असतात; इंद्रालाच अर्कपाठक अर्कांनीं स्तवित असतात. इंद्रालाच फडानें गाणारे लोक स्तवित असतात.

Hymn 7.

Author, as before. To Indra. Metre Gáyatrí.

1. Indra alone is loudly celebrated by the singers; Indra alone is celebrated by hymn-singers with their hymns; Indra is celebrated by the choristers.

१. या मंत्रांत गायक तीन प्रकारचे सांगितलेले आहेत, गायक (गाथिनः), अर्कपाठक (अर्किणः) आणि फडानें गाणारे लोक (वाणीः). सायणाचार्यांच्या म्हणण्याप्रमाणें गाथिनः म्हणजे सामें अथवा सामवेदांतील मंत्र गाणारे ऋत्विज होत. अर्किणः म्हणजे ऋग्वेदांतील मंत्र म्हणणारे आणि वाणीः म्ह. इतर जे राहिलेले ऋत्विज त्यांनीं गाइलेले यजुर्वेदांतील मंत्र. असें असले तरी गाथिनः, अर्किणः आणि वाणीः हे निरनिराळ्या प्रकारचे गाणारे असावे असें दिसतें खरें. आणी अर्क हें एक प्रकारचें गायन असावें असें दिसतें.

या मंत्रांत इंद्राचें केवळ सर्वव्यापी वर्चस्वी स्पष्ट उघड दिसतें. इंद्राचाच अनेक प्रकारचीं स्तोत्रें आणि गायनें गातात, इतर देवांस नाहींत असा भावार्थ आहे. एकंदर मंत्रांत सुद्धां हाच शोक आहे.

इन्द्र इद्धर्योः सचा संमिश्ल आ वचोयुजा।
इन्द्रो वज्री हिरण्ययः ॥ २॥

इन्द्रः। इत्। हर्योः। सचा। संऽमिश्लः। आ। वचःऽयुजा।
इन्द्रः। वज्री। हिरण्ययः॥ २॥

इन्द्रो दीर्घाय चक्षस आ सूर्यं रोहयद्दिवि।
वि गोभिरद्रिमैरयत् ॥ ३॥

इन्द्रः। दीर्घाय। चक्षसे। आ। सूर्यम्। रोहयत्। दिवि।
वि। गोभिः। अद्रिम्। ऐरयत्॥ ३॥

इन्द्र वाजेषु नोऽव सहस्रप्रधनेषु च।
उग्र उग्राभिरूतिभिः॥ ४॥

इन्द्र। वाजेषु। नः। अव। सहस्रऽप्रधनेषु। च।
उग्रः। उग्राभिः। ऊतिऽभिः॥ ४॥

भाषायाम्.

२. इन्द्र एव हर्योर्वचोयुजा [द्वयेन]साक समिश्र [अस्ति]। इन्द्र [एव] वज्री। [इन्द्र एव] हिरण्यय ॥

३ इन्द्र. सूर्यं दीर्घाय चक्षसे दिव्यारोहयत्। अद्रि गोभिर्व्यैरयत् ॥

४ हे इन्द्र वाजेषु सहस्रप्रधनेषु च [उग्रस] [त्वम्]उग्राभिरूतिभिरस्मानव ॥

२. इंद्रच पिवळ्या घोड्यांची सांगवाच एकदम जुपली जाणारी जोडी वापरतो. इंद्रच वज्रधारी, [इंद्रच] सुवर्णमय [होय.]

2. Indra alone has the *pair of tawny horses that* harness themselves together at his command. Indra [alone] is the wielder of the thunderbolt, [Indra alone] bedecked with gold.

३. इंद्रच सूर्याला आकाशावर चढवून त्याला दूरपर्यंत पाहण्याची शक्ति देता झाला. [इंद्रच] गाईंसाठीं पर्वत फोडिता झाला.

3. It was Indra who seated the sun in heaven that it may see afar. It was Indra that broke the *mountain for the cows.*

४. हे इंद्रा युद्धांत आणि सहस्रद्वंद्वी समरांगणांत आम्हांस शक्तिमान् तूं आपल्या शक्तिमान् संरक्षणानीं रक्षण कर.

4. O Indra, mayst thou mighty defend us in battles and in fights of a thousand duels with thy mighty protections.

---

२ 'इंद्रच' इ०. भावार्थ असा कीं, पिवळ्या घोड्यांची जोडी कीं जीस आज्ञा होतांच आपल्या आपण जोडिली जाते ती इंद्रालाच आहे. तशी जोडी दुसऱ्या देवांकडेस नाहीं. तसेंच दुसऱ्या देवांला वज्र नाहीं आणि दुसऱ्या देवाला सुवर्णमयत्व नाहीं.

३. 'सूर्याला आकाशावर चढवून' इ०. पदशः अर्थ असा कीं, 'इंद्रानें दूर दर्शना (म्हणजे दृष्टी) साठीं सूर्यास आकाशांत चढविलें', म्ह. सूर्य आकाशांत चढतो आणि दूर प्रदेशांवर आपली दृष्टि पोंहचवितो हा प्रताप इंद्राचा आहे —'गाईंसाठीं पर्वत फोडिता झाला' (= वि गोभिः अद्रिं ऐरयत्') म्ह. पर्वत फोडून गाई बाहेर काढिता झाला. या ठिकाणीं गाई म्ह. उदकें आणि पर्वत म्ह. मेघ अथवा ढग. ढग फोडून उदकें खालीं पाडिता झाला असा भावार्थ. या रूपकाविषयीं ६ व्या सूक्ताच्या ५ व्या मंत्रावर पूर्वी दिलेली टीप पाहा.

हे जे येथें व वेदांत दुसऱ्या अनेक ठिकाणीं उदकरूपी गाईचें आणि मेघरूपी पर्वताचें रूपक आलें आहे तें लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे. एक तर कारण असें कीं, त्यामुळें पुष्कळ मंत्र समजण्यास सोपे जातील; आणि दुसरें हें कीं, अर्वाचीन म्ह. वेदाच्या मागाहून झालेल्या पुराणादिक ग्रंथांत पर्वतांस पक्ष होते आणि ते इंद्रानें छेदिले, इंद्रानें पर्वतांचा उच्छेद केला, पर्वत सर्व आकाशभर फिरत होते आणि इंद्रास भिऊन कोणीएक पर्वत समुद्रांत दडून राहिले इत्यादि कथा आहे, तिचें बीज या रूपकांत आहे, व या रूपकावरून या सर्व कथेचा विस्तार वाढविलेला आहे, असें दिसून येईल.

इन्द्रं वयं महाधन इन्द्रमर्भे हवामहे ।
युजं वृत्रेषु वज्रिणम् ॥ ५ ॥ १३ ॥

इन्द्रम् । वयम् । महाऽधने । इन्द्रम् । अर्भे । हवामहे ।
युजम् । वृत्रेषु । वज्रिणम् ॥ ५ ॥ १३ ॥

स नो वृषन्नमुं चरुं सत्रादावन्नपा वृधि ।
अस्मभ्यमप्रतिष्कुतः ॥ ६ ॥

सः । नः । वृषन् । अमुम् । चरुम् । सत्राऽदावन् । अप । वृधि ।
अस्मभ्यम् । अप्रतिऽस्कुतः ॥ ६ ॥

तुञ्जेतुञ्जे य उत्तरे स्तोमा इन्द्रस्य वज्रिणः ।
न विन्धे अस्य सुष्टुतिम् ॥ ७ ॥

तुञ्जेऽतुञ्जे । ये । उत्ऽतरे । स्तोमाः । इन्द्रस्य । वज्रिणः ।
न । विन्धे । अस्य । सुऽस्तुतिम् ॥ ७ ॥

भाषायाम्

५. महाधने वयमिन्द्र हवामहे । अर्भे [च] [वयम्] इन्द्र [हवामहे] । वृत्रेषु [वय] वज्रिण युज [हवामहे] ॥

६. स [त्व] हे सत्रादावन्वृषन् अस्मभ्यममु चरुमपवृणु । अस्मभ्यमप्रतिष्कुतो[सि] ॥

७. य उत्तरे तुञ्जे तुञ्जे (=उत्तरोत्तरे तुञ्जे) वज्रिण इन्द्रस्य स्तोमा [सन्ति] [ताम्] अस्य [स्तोमरूपा] सुस्तुतिम् [अह] न विन्धे ॥

---

४. 'सहस्रद्वंद्वी समरांगणांत'='सहस्रधनेषु' ज्यांत हजारो द्वंद्वें लढत असतात अशा युद्धांत, अथवा 'ज्यांत हजारो लुटी सांपडतात अशा युद्धांत' असाहि अर्थ समजतो.

'उग्र उग्राभिरूतिभि' या अत्यपदांतील प्रास लक्ष्यांत ठेवावे. प्रासालंकाराची गोडी केवळ आधुनिक कवींसच आहे असें नाहीं.

५. इंद्रालाच आम्ही मोठ्या युद्धात हाक मारितो [आणि] इंद्रालाच लहान युद्धात हाक मारितो. [त्या आमच्या] वज्रधारी सहाय्यासच शत्रूंशीं लढण्यास [आम्ही हाक मारितो.]

5. It is Indra we invoke in a great fight, it is Indra we invoke in a small fight. It is our ally the wielder of the thunderbolt [that we invoke] against our enemies.

६. तर, हे वीर्यवान् शीघ्रदात्या, तूं आम्हांसाठीं हा मेघ फोडून उघड. [कां कीं] तूं आमचा निषेध करणारा नव्हेस.

6. Therefore do thou, O manly and quickly-generous [Indra], break open this cloud for us [For] *thou art never opposed to us*

७. एका संकटाहून दुसऱ्या संकटाच्या वेळीं पूर्वीपेक्षा उत्तम होतात अशा ज्या वज्रधारी इंद्राच्या स्तुती त्या याच्या उत्तम स्तुती मला करिता येत नाहींत असें नाहीं.

7. Whatever the hymns of Indra the wielder of the thunderbolt, that become more and more excellent in each succeeding danger, I am not without such excellent praises of him

५. 'मोठ्या' इ०. युद्ध मोठें असो किंवा लहान असो त्यांत शत्रूशीं लढण्यास आम्ही बोलावितों ते इंद्रालाच बोलावितों. वैदिक युगांत देवांचा उपयोग लोक काय समजत होते त्याचा हा एक चांगला मासला आहे.

६. 'तर...तू' = 'स [त्वम्]' या प्रकारच्या प्रयोगाविषयीं पूर्वीं लिहिलेंच आहे — 'हा मेघ,' "हा आम्हांसमोर दिसतो आहे हा", सायण.

७. हा मंत्र किंचित् कठिण आहे. आम्हीं केलेल्या भाषांतराचा भावार्थ हा आहे कीं, इंद्राच्या उपासकांवर जसजसे हल्ले होतात तसतशीं उत्तरोत्तर चांगलीं चांगलीं स्तोत्रें ते आपली मुक्ति त्या त्या संकटांपासून व्हावी म्हणून करीत असतात तर तसली जी उत्तम स्तुति ती मला करितां येत नाहीं असे नाहीं.

या ऋचेंत दोन शब्द कठिण आहेत; एक 'तुञ्जेतुञ्जे' आणि दुसरा 'विन्धे'. सायणाचार्य 'तुञ्जेतुञ्जे' म्ह 'ते ते जे फल देणारे दुसरे देव' असा आणि 'विन्धे' म्ह. 'मला मिळत नाहीं' (= न विन्दे) असा अर्थ करून सर्व मंत्राचा अर्थ "इतर देवांच्या ज्या "उत्कृष्ट स्तुती त्या सर्व केल्या तरी "वज्रयुक्त इंद्राची योग्य स्तुति माझ्या-"नें होत नाहीं." असा करितात. यास्क 'तुञ्जेतुञ्जे' याचा 'त्या त्या दानीं' असा अर्थ करितात "

वस्तुतः 'विन्धे' हें क्रियापद ज्या

वृषा यूथेव वंसगः कृष्टीरियर्त्योजसा ।
ईशानो अप्रतिष्कुतः ॥ ८ ॥
वृषा । यूथाऽइव । वंसगः । कृष्टीः । इयर्ति । ओजसा ।
ईशानः । अप्रतिऽस्कुतः ॥ ८ ॥
य एकश्चर्षणीनां वसूनामिरज्यति ।
इन्द्रः पञ्च क्षितीनाम् ॥ ९ ॥
यः । एकः । चर्षणीनाम् । वसूनाम् । इरज्यति ।
इन्द्रः । पञ्च । क्षितीनाम् ॥ ९ ॥
*इन्द्रं वो विश्वतस्परि हवामहे जनेभ्यः ।
अस्माकमस्तु केवलः ॥ १० ॥ १४ ॥ २ ॥
इन्द्रम् । वः । विश्वतः । परि । हवामहे । जनेभ्यः ।
अस्माकम् । अस्तु । केवलः ॥ १० ॥ १४ ॥ २ ॥

भाषायाम्.

८. वंसगो (=वृषभो) यूथानीवाप्रतिष्कुत ईशानो वृषा कृष्टीरोजसेयर्ति ॥

९. य [इन्द्रश्] चर्षणीनां वसूनां [च] एक इरज्यति (=ईष्टे)। [य] इन्द्रः पञ्च क्षितीनाम् [एक इरज्यति] ॥

१०. हे जना [वय] विश्वतः [स्थलात्] परि युष्मभ्यमिन्द्र हवामहे । [स] केवलोस्माकमस्तु ॥

विध् धातूपासून विधवा (विधवा शब्द वि आणि धव यापासून झालेला नाहीं. धव हाच विधवा यांतून 'वि' विषयी चुकीच्या समजुतीनें काढिलेला आहे) आणि विधुर शब्द निघाले आहेत त्याचे रूप आहे. अर्थ, 'कशाच्या तरी हीन अथवा विरहित असणें.'

* गृह्मसूत्रांत या मंत्राचा विनियोग इंद्राच्या आव्हानाकडे करितात.

८. जसा [एकादा] पोळ [गुराच्या] कळपांजवळ जातो तसा बलवान् [इंद्र] सर्वदा [आणि] अप्रतिहत [होत्साता] [आपल्या] शक्तीसहित मनुष्यांकडे येतो.

8. Like a bull walking towards his herds the mighty [Indra] comes up with his power towards men, the lord unopposed.

९. कारण कीं, तो मनुष्यांचा [आणि] वस्तूंचा एकटा प्रभु होय; इंद्र पंचजनांचा [एकटा प्रभु होय].

9. For he is the sole ruler of men [and] of things: Indra [is the sole ruler] of the five tribes.

१०. तुम्हां [सकल] लोकांसाठीं आम्ही इंद्राला सर्व स्थलाहून बोलावितों. तो सगळा आमचाच होओ.

10. We call Indra from every quarter for you people. May he be wholly ours.

---

८. मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, जसा एकादा जवान पोळ गुराच्या कळपाजवळ जातो आणि त्यास दुसरे पोळ हरकत (प्रतिहत) करूं शकत नाहींत व त्यामुळें तो सगळ्या पोळांचा राजा असल्याप्रमाणें चालतो तसा इंद्र आपल्या उपासकाजवळ त्यांची पूजा घेण्यास वगैरे येतो, तेव्हां त्यास कोणीहि हरकत करूं शकत नाहींत. तो आपलें बळ सगळें घेऊन येतो. वेदांत इंद्रास व इतर देवांस शक्तीविषयीं आणि सौंदर्याविषयीं पोळाची उपमा पुष्कळ ठिकाणीं दिलेली आहे — 'पोळ,' 'वंसग.'. वंसग हा शब्द वेदांत पुष्कळ ठिकाणीं आला आहे. त्याचा अर्थ पोळ (अथवा बैल) असा होतो सायणाचार्य पोळ "चांगल्या रीतीनें चालतो म्हणून त्याचें नांव 'वंसग' " असें पडलें आहे अशी व्युत्पत्ति करितात.

९. 'कारण कीं तो'='यः'. सर्वनिर्देशनामाचा असा अर्थ पुष्कळ ठिकाणीं करावा लागतो — 'मनुष्यांचा,' 'चर्षणीनाम्' चर्षणिशब्दाचा अर्थ चालणारा=जंगम असा कदाचित् होईल. आणि तसा घेतला तर चर्षणीनां म्हणजे 'जंगमांचा' असें भाषांतर करावें. परंतु सायणाचार्यांप्रमाणें आम्हीं केलेला अर्थ युक्त दिसतो — 'पंचजनांचा.' आर्य लोकांचे पांच विभाग अथवा कुळें होतीं असें दिसतें. हे 'पंचजन' वेदांत पुष्कळ ठिकाणीं आढळतात; परंतु सायणाचार्य ब्राह्मणादि चार वर्ण आणि निषाद (म्ह. कोळी वगैरे रानटी लोक) हा पांचवा असे मिळून पांच वर्ण असें म्हणतात. असें म्हणण्यास अडचण

सूक्तम् ८.

ऋषिर्विश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दा । इन्द्रो देवता । गायत्री छन्द ॥

एन्द्र॑ सान॒सिं र॒यिं स॒जित्वा॑नं सदा॒सह॑म् ।
वर्षि॑ष्ठमू॒तये॑ भर ॥ १ ॥

आ । इ॒न्द्र॒ । सा॒न॒सिम् । र॒यिम् । स॒ऽजित्वा॑नम् । स॒दा॒ऽसह॑म् ।
वर्षि॑ष्ठम् । ऊ॒तये॑ । भ॒र ॥ १ ॥

नि येन॑ मुष्टिह॒त्यया॒ नि वृ॒त्रा रु॒णधा॑महै ।
त्वोता॑सो॒ न्यर्व॑ता ॥ २ ॥

नि । येन॑ । मु॒ष्टि॒ऽह॒त्यया॑ । नि । वृ॒त्रा । रु॒णधा॑महै ।
त्वाऽऊ॑तासः । नि । अर्व॑ता ॥ २ ॥

इन्द्र॒ त्वोता॑स॒ आ व॒यं वज्रं॑ घ॒ना द॑दीमहि ।
जये॑म॒ सं यु॒धि स्पृधः॑ ॥ ३ ॥

इन्द्र॑ । त्वाऽऊ॑तासः । आ । व॒यम् । वज्र॑म् । घ॒ना । द॒दी॒म॒हि॒ ।
जये॑म । सम् । यु॒धि । स्पृधः॑ ॥ ३ ॥

भाषायाम्.

१ हे इन्द्र सानसिं सजित्वानं सदासहं वर्षिष्ठं [च] रयिम् [अस्माकम्] ऊतये आभर ॥

२ येन [रयिणा] वृत्राणि (=शत्रून्) मुष्टिहत्यया निरुणधामहै [वृत्राणि] नि [रुणधामहै] । त्वयोताः (=त्वया रक्षिताः) [वयम्] अर्वता नि [रुणधामहै] ॥

३ हे इन्द्र त्वयोता (=त्वया रक्षिता) वय घनेन वज्रमाददीमहि । स्पृधो युधि संजयेम [च] ॥

इतकेंच का, अति प्राचीन काळी चार वर्णांचा भेद नव्हता तो मागाहून झाला असें समजण्यास कितीएक कारणें आहेत

१० 'तुम्हां सकळ लोकांसाठीं'= 'व जनेभ्य '—'सर्वस्थळांहून', 'विश्वत परि' —'तो सगळा आमचाच होओ' म्ह त्याची सर्व कृपा आम्हांवरच होओ ती दुसऱ्या उपासकांकडेस न जाओ

सूक्त ८.

ऋषि, मधुच्छंद. देवता, इंद्र. वृत्त, गायत्री.

१. हे इंद्रा, सुख देणारी, यशस्कर, सर्वकाळ स्थिर राहणारी [आणि] सर्वांत मोठी दौलत [आम्हांस] आनंद होण्यासाठीं घेऊन ये.

२. ज्या [दौलती]च्या योगेंकरून आम्हीं तुवा राखित असे [आमच्या] मुष्टींनीं शत्रूस मारून फडशा पाडूं, [किंवा] घोड्यावर बसून मारून फडशा पाडूं.

३. हे इंद्रा, आम्हीं [आपला] सोटा [हातीं] घेतला म्हणजे तुवा राखिलेले असे जे त्या आम्हीं तुझें वज्रच धारण केल्याप्रमाणे होओ; [आणि] [आमच्या] शत्रूंवर आम्हांस युद्धांत जय मिळो.

HYMN 8.

To *India* By *Madhuchchhandas*. Metre *Gáyatrí*.

1 O Indra, bring [us] for [our] pleasure a blissful, victorious, everlasting *[and] most powerful prosperity*:

2. whereby we under thy auspices may crush down our enemies with our fists, crush down with our horses.

3 O Indra, may we armed with our club be, under thy auspices, armed [as if] with thy thunderbolt; may we vanquish our enemies in battle.

---

१. 'घेऊन ये' म्हणजे 'तूं ये आणि बरोबर ...... आण'.

२. 'मारून फडशा पाडूं', 'निरुणधामहै'—'घोड्यावर बसून,' 'अर्वता.' अक्षरशः, घोड्यानें किंवा घोड्यावर बसलेल्या स्वाराच्या योगानें.

या मंत्रावरून इतकें स्पष्ट दिसण्याजोगें आहे कीं, वेदांचे ऋषि देवांपाशीं काय मागत होते आणि ते कशाकरितां मागत होते हें समजून येतें आणि देवांवर त्यांची किती दृढ भक्ति होती हेंहि उघड दिसून येतें.

३. मंत्राचा भावार्थ—आम्ही सोटे हातांत घेऊन लढाईंत गेलों म्हणजे जणु काय तुझें वज्रच आम्हीं धारण केल्याप्रमाणें आम्हांस शक्ति देओ; कारण तूं आमचें रक्षण करणार त्यापेक्षां आमच्या सोट्याच्या अंगीं तुझ्या वज्राची शक्ति सहज येईल.

या मंत्राच्या द्वितीयपादाचें भाषांतर जरा अक्षर सोडून करावें लागलें आहे. परन्तु अर्थ स्पष्ट समजावा म्हणून तस

वयं शूरेभिरस्तृभिरिन्द्र त्वया युजा वयम् ।
सासह्याम पृतन्यतः ॥ ४ ॥

वयम् । शूरेभिः । अस्तृऽभिः । इन्द्र । त्वया । युजा । वयम् ।
सुसह्याम । पृतन्यतः ॥ ४ ॥

महाँ इन्द्रः परश्च नु महित्वमस्तु वज्रिणे ।
द्यौर्न प्रथिना शवः ॥ ५ ॥ १५ ॥

महान् । इन्द्रः । परः । च । नु । महिऽत्वम् । अस्तु । वज्रिणे ।
द्यौः । न । प्रथिना । शवः ॥ ५ ॥ १५ ॥

समोहे वा य आशत नरस्तोकस्य सनितौ ।
विप्रासो वा धियायवः ॥ ६ ॥

सम्ऽओहे । वा । ये । आशत । नरः । तोकस्य । सनितौ ।
विप्रासः । वा । धियाऽयवः ॥ ६ ॥

भाषायाम्.

४ हे इन्द्र वय त्वया युजा (=सहायेन) [युक्ता. सन्त] वय शूरैरस्तृभि· [इव युक्ता भूत्वा] पृतन्यत (=युयुत्सून् शत्रून्) सासह्याम ॥

५ इन्द्रो महान्[अस्ति] [महतो]पि च परस्ताद्[अस्ति] । वज्रिणे [इन्द्राय] महत्त्वमस्तु । [वज्रिणे] प्रथिम्ना द्यौरिव [प्रथित] शवः (=बलम्) [अस्तु] ॥

६. विप्रा धियायवो (=भजका) नरा यथा समोहे तोकस्य सनितौ चाशत (=इष्टमापु),

---

करणे जरूर आहे —'आपला सोटा हाती घेतला म्हणजे तुझें वज्र धारण केल्याप्रमाणे होओ'='वज्र घना आददीमहि' पदश अर्थ —'सोट्या[च्या रूपा]नें वज्र धरिलेसें होओ' 'घना' ही घनशब्दाची तृतीया आहे, व सायणाचार्यहि तसेच म्हणतात

४. हे इंद्रा, तुझें [एकट्याचें] साहाय्य मिळवून आम्ही [जणुं काय] [अनेक] शूर योद्ध्यांच्याच योगानें [आमच्या] लढखोर शत्रूंस जिंकून टाकूं असें कर.

४. O Indra, may we with thee for our ally, may we completely conquer our enemies, [as if] with the aid of [many] heroes armed with slings.

५. इंद्र मोठा आणि [मोठ्यापेक्षां]हि अधिक [आहे]. वज्रधारी [इंद्रा]च्या अंगीं मोटेपण राहो, [आणि] आकाशाप्रमाणें [त्याचें] बल विस्तीर्ण [असो.]

5. Great is Indra and yet more [than great]. May he possess greatness. May his power be as extensive as heaven.

६. युद्धाविषयीं आणि अपत्यप्राप्तीविषयीं स्तुतिगायक व भाविक पुरुषांची जशी मनकामना पूर्ण होते; [आणि],

6. As wise and pious men attain their wishes in battle and as regards the obtaining of progeny; [and]

---

४. मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, जर एकट्या इंद्राचें साहाय्य मिळेल तर अनेक योद्ध्यांची मदत मिळाल्याशी होईल, तर हे इंद्रा, तशा तुझ्या साहाय्यानें आम्ही शत्रूंचें निर्दलन करून टाकूं असें कर.

'योद्ध्यांच्या योगानें'='अस्तृभिः.' अक्षरशः अर्थ, 'गोफणीनें लढणाऱ्या योद्ध्यांच्या योगानें.'

५. 'अधिक'='परः'. परः या शब्दाचा अर्थ सायणाचार्य 'परम', 'श्रेष्ठ' असा करितात. परंतु श्रेष्ठ या अर्थाचा जो परशब्द तो आद्युदात्त (परः) असतो आणि परस् शब्द अव्यय असून अंतोदात्त (पुरः) आहे. त्याचा अर्थ 'दूर', 'वर', (परस्तात्) 'अधिक' असा होतो. ऋ ५. ३०.५ यांत सायणाचार्यांनीच 'वर' असा अर्थ केला आहे तो पाहा.—'विस्तीर्ण'=' प्रथिना.' प्रथिना ही प्रथिमन् शब्दाची तृतीया असल्याप्रमाणें रूप दिसतें. पदशः अर्थ, 'प्रसृतपणानें त्याचें बल आकाशाप्रमाणें असो.'

६. या ऋचेपासून शेवटपर्यंत हें सूक्त कांहींसें कठिण आहे, आणि तो कठिणपणा शब्दार्थावरून झालेला नाहीं; परंतु अन्वयार्थावरून झालेला आहे. आम्हीं ६ व्या ऋचेपासून तो १० व्या ऋचेपर्यंत एक अन्वय घेतला आहे. या पांच मंत्रांचें तात्पर्य असें आहे कीं, इंद्राची स्तुति गाणारे आणि इंद्राचें ध्यान करणारे जन जसे युद्धांत जय पावतात व संततिसंपन्न होतात (६), आणि इंद्राचें पोट उपासकांनीं दिलेला पुष्कळ सोम पिऊन समुद्राप्रमाणें भरपूर होऊन आणि त्या सोमानें इंद्राचें तोंड

यः कुक्षिः सोमपातमः समुद्र इव पिन्वते ।
उर्वीरापो न काकुदः ॥ ७ ॥
यः । कुक्षिः । सोमऽपातमः । समुद्रःऽइव । पिन्वते ।
उर्वीः । आपः । न । काकुदः ॥ ७ ॥
एवा ह्यस्य सूनृता विरप्शी गोमती मही ।
पक्वा शाखा न दाशुषे ॥ ८ ॥
एव । हि । अस्य । सूनृता । विऽरप्शी । गोऽमती । मही ।
पक्वा । शाखा । न । दाशुषे ॥ ८ ॥
एवा हि ते विभूतय ऊतय इन्द्र मावते ।
सद्यश्चित्सन्ति दाशुषे ॥ ९ ॥
एव । हि । ते । विऽभूतयः । ऊतयः । इन्द्र । माऽवते ।
सद्यः । चित् । सन्ति । दाशुषे ॥ ९ ॥

भाषायाम्.

७ सोमपातम [इन्द्रस्य] कुक्षि समुद्र इव यथा पिन्वते काकुदश् [च] यथोर्व्यो (=विस्तीर्णा) आप इव सन्ति,

८ एव ह्यस्य विरप्शी (=विपुला) गोमती महती सूनृता(=संपद्) दाशुषे पक्वा शाखेव [भवति],

९ एव हि [च] हे इन्द्र तव विभूतयो (=विपुला) ऊतयो मादृशे दाशुषे सद्यश्चित्सन्ति,

एकाद्या तलावाप्रमाणें भरून जाऊन इंद्रास जसा मोठा आनंद होतो (७), त्याप्रमाणे इंद्र हविर्दात्यास जी देणगी देतो ती विपुळ, गाईंनी युक्त, आणि मोठी असते, आणि पिकलेल्या फळांनी भरलेल्या वृक्षशाखेसारिखी आनंदकारक होते (८), आणि त्याप्रमाणेंच मजसारिख्या हविर्दात्याला हा इंद्र विपुळ मनें एकदम प्राप्त करून देतो (९), आणि या सर्व कारणासाठी आम्ही इंद्राचे स्तोत्र व चरित्र गाऊया म्हणजे तो आमचें स्तोत्र ऐकून धावत येईळ आणि हा जो आम्ही सोम तयार केळा आहे तो पिऊन जाईल (१०)

'मनकामना पूर्ण होते' 'आशत' याचा पदशः अर्थ 'प्राप्त झाले', 'पावले' अर्थात इच्छेप्रत.

७. अतिशय सोम पिणारें [इंद्राचें] पोट समुद्राप्रमाणें जसें भरतें, [आणि] पाण्याच्या आशयासारिखें जसें [इंद्रा]चें तोंड [सोमा]नें भरलेलें [दिसतें],

८. तशीच त्याची विपुल, [व] गोसंपन्न मोठी देणगी उपासकाला पक्क फळांनीं भरलेल्या वृक्षशाखेप्रमाणें [होत असते]; [आणि]

९. तसेच, हे इंद्रा, तुझे विपुल प्रसाद मजसारिख्या उपासकासाठीं तत्काळ सिद्ध असतात; [आणि]

7. as Indra's belly that drinks the largest quantity of Soma becomes swollen like the ocean, and as the cavity of his palate is as full with [Soma] as a collection of water;

8. so his bounteous gift, great and rich in cows is to the worshipper like a branch of a tree, laden with ripe fruit; [and]

9. so too, Indra, thy magnificent favours are at once ready for a worshipper like me; [and]

७. 'तोंड'='काकुदः'. हे काकुद् याचें अनेकवचन आहे. काकुद् हे जरी एकवचन येथे असावे, तरी 'आपः' हे अनेकवचन असल्यामुळें त्याच्या आकर्षण संबधानें 'काकुदः' हेंहि अनेकवचन झाले.

८. 'देणगी'='सूनृता.'—'वृक्षशाखेप्रमाणे.' येथें जसे पक्क हे शाखेस विशेषण लाविले आहे तसें ऋ. १,१७५३ यांत याच अर्थी वृक्षास लाविलें आहे ते पाहा.

एवा ह्यस्य काम्या स्तोम उक्थं च शंस्या ।
इन्द्राय सोमपीतये ॥ १० ॥ १६ ॥

एव । हि । अस्य । काम्या । स्तोमः । उक्थम् । च । शंस्या ।
इन्द्राय । सोमऽपीतये ॥ १० ॥ १६ ॥

भाषायाम्.

१०. एवं हि [च] अस्य काम्यौ स्तोम उक्थं च [इत्येतौ] इन्द्राय सोमपीतये शंस्यौ [स्त.] ॥

सूक्तम् ९.

ऋषिर्विश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दाः । इन्द्रो देवता । गायत्री च्छन्द. ॥

इन्द्रेहि मत्स्यन्धसो विश्वेभिः सोमपर्वभिः ।
महाँ अभिष्टिरोजसा ॥ १ ॥

इन्द्र । आ । इहि । मत्सि । अन्धसः । विश्वेभिः । सोमपर्वऽभिः ।
महान् । अभिष्टिः । ओजसा ॥ १ ॥

एमेनं सृजता सुते मन्दिमिन्द्राय मन्दिने ।
चक्रिं विश्वानि चक्रये ॥ २ ॥

आ । ईम् । एनम् । सृजत । सुते । मन्दिम् । इन्द्राय । मन्दिने ।
चक्रिम् । विश्वानि । चक्रये ॥ २ ॥

भाषायाम्.

१. हे इन्द्र [त्वम्] ओजसा आयाहि । महानभिष्टि.(=सहायम्) [त्वं] विश्वैः सोमपर्वभिरन्धसा मत्स (=हृष्टो भव) ॥

२. [सोमे] सुते [सति] एन मन्दि [सोम] मन्दिन इन्द्रायासृजत । विश्वानि [वस्तूनि] चक्रये (=कृतवते) चक्रि [सोममासृजत] ॥

१०. तसेंच इंद्रास आवडणारें स्तोत्र आणि चरित्र हीं गावीं, कीं जेणेंकरून इंद्र येऊन सोम पिईल.

10. so too Indra's favourite *praise* and *song* should be chanted, that he may come and drink the Soma.

१०. की 'जेणेंकरून इंद्र येऊन सोम पिईल'='इंद्राय सोमपीतये'='इंद्राय सोमं पातुम्'=यथा इंद्रः सोमं पिबेत् सोमपीतये हे तुमर्थ अव्यय आहे इंद्राय सोमपीतये याचा पदशः अर्थ 'इंद्राला सोम पिण्यासाठीं'.

सूक्त ९.

ऋषि, मधुच्छंद. देवता, इंद्र. वृत्त, गायत्री.

Hymn 9

To *Indra*. By *Madhuchchhandas* Metre *Gáyatri*.

१. हे इंद्रा, [तूं] येथें ये. मोठा साहाय्यकारी [असा तू आपल्या] तेजासहित [येऊन] सकल सोमयज्ञांच्या प्रसंगीं हवि घेऊन तृप्त हो.

1. Come hither, Indra, with thy might. Do thou great helper regale thyself with the oblation at all the Soma-sacrifices.

२. सोमरस काढून तयार होतांच आनंदी इंद्रास तो आनंदकारक [सोम] अर्पण करा. सकल वस्तु उत्पन्न करणाऱ्या [इंद्रा]ला [सकल गोष्टी] सिद्ध करून देणारा [सोम अर्पण करा].

2. The Soma being extracted, pour out the exhilarating Soma to joyful India, the efficacious [Soma] to the Maker of all things

१. 'साहाय्यकारी' म्ह. युद्धांत शत्रूचा पराजय करण्याच्या कामीं मदत करणारा.—'सकल सोमयज्ञाच्या प्रसंगी.' 'विश्वेभिः सोमपर्वभिः' पर्व म्हणजे प्रसंग, यज्ञकाळ सोमपर्व म्हणजे ज्या प्रसंगी सोम अर्पण केला जातो असा यज्ञप्रसंग.—'हवि घेऊन तृप्त हो' 'अन्धसो मत्स्व' याचा अर्थ पदशः 'अन्नानें तृप्त हो.'

२. 'आनंदी इंद्रास.' म्ह. सोम पिण्याविषयीं आनंद ज्याला झाला आहे अशाला.—'आनंदकारक सोम' सोमपान केल्याने माद (अमल) येऊन हर्ष होतो म्हणून त्यास आनंदकारक असें

मत्स्वा सुशिप्र मन्दिभिः स्तोमेभिर्विश्वचर्षणे ।
सचैषु सवनेष्वा ॥ ३ ॥

मत्स्व । सुऽशिप्र । मन्दिऽभिः । स्तोमेभिः । विश्वऽचर्षणे ।
सचा । एषु । सवनेषु । आ ॥ ३ ॥

असृग्रमिन्द्र ते गिरः प्रति त्वामुदहासत ।
अजोषा वृषभं पतिम् ॥ ४ ॥

असृग्रम् । इन्द्र । ते । गिरः । प्रति । त्वाम् । उत् । अहासत ।
अजोषाः । वृषभम् । पतिम् ॥ ४ ॥

सं चोदय चित्रमर्वाग्राध इन्द्र वरेण्यम् ।
असदित्ते विभु प्रभु ॥ ५ ॥ १७ ॥

सम् । चोदय । चित्रम् । अर्वाक् । राधः । इन्द्र । वरेण्यम् ।
असत् । इत् । ते । विऽभु । प्रऽभु ॥ ५ ॥ १७ ॥

भाषायाम्.

३ हे सुशिप्र विश्वचर्षणे एषु सवनेष्वा स्तोमैः साकं मन्दिभिः [सोमैः] माद्य ॥

४ हे इन्द्र [एतास्] तव गिरः [अहम्] असृजम् । [तास्] त्वां प्रत्युदहासत (=उद्गत्य प्राप्नुवन्) । अजोषा वृषभं पतिम् [उदहासत] ॥

५ हे इन्द्र चित्रं वरेण्यं राधोऽर्वाक् संचोदय । तुभ्यं [हि] विभु प्रभु [राधः] स्यादेव ॥

म्हटलं आहे = [सकळ गोष्टी] सिद्ध करून देणारा'=' चक्रिम् ' याचा अक्षरशः अर्थ, 'करणारा'='कार्यकारी' = कार्यसिद्धि करणारा कारण की, सोम पिऊन देव उपासकांची कार्ये करितात म्हणून

३. हे सुमुख [इंद्रा], हे सगळ्याकडेस जाणाऱ्या [इंद्रा], तू [ह्या] हर्षकारक सोमरसानीं [आणि] स्तोत्रानीं या यज्ञात हर्ष पाव.

४. हे इंद्रा, मीं तुझ्या ह्या स्तुती गाइल्या आहेत. त्या उत्सुक [होऊन] वीर्यवंता तुज पतीप्रत वर गेल्या आहेत.

५. हे इंद्रा, सुंदर [आणि] श्रेष्ठ संपत्ति इकडे पाठवून दे [कारण कीं] विस्तीर्ण [आणि] मोठी [संपत्ति] तुझ्याजवळ असेलच [यांत संशय नाहीं].

3 [Indra,] possessed of good lips, O thou who goest to all men, regale thyself with the exhilarating Somas and with the praises, in these sacrifices

4 These praises, Indra, I have sung in honour of thee Eager they have gone up to thee their manly husband

5 Indra, send hither *beautiful* [and] choice wealth. [For] doubtless there must be with thee extensive and powerful wealth.

---

३ 'सुमुख,' हा अर्थ आम्हीं 'सुशिप्र' या शब्दाचा केला आहे सायणाचार्य येथें सुशिप्र म्हणजे चांगली हनवटी ज्याची अथवा चांगले नाक ज्याचे असा अनिश्चित अर्थ करितात. आम्हीं दिलेल्या अर्थाचे तात्पर्य असें कीं, 'ज्याचे ओठ चांगले आहेत तो' याला आधार इतका आहे कीं, जेथें जेथें हा शब्द येतो तेथें तेथें बहुत करून सोमपानाच्या संबंधाच्या भाषणांत आलेला आहे. 'सोम पिण्याविषयीं ज्याचे तोंड कुशल आहे' असा भावार्थ—'सगळ्यांकडेस जाणाऱ्या', 'विश्वचर्षणे' म्ह. जो सगळ्यांची पूजा ग्रहण करण्याकरितां जिकडे तिकडे जातो तो—'या यज्ञांत', 'एषु सवनेषु आ.' म्हणजे सोम पिळून काढून (सवन) तुला ज्यांत अर्पण करीत आहों अशा प्रसंगी.

४ या ऋचेंत स्तुतीस पतीकडेस जाणाऱ्या स्त्रियांची उपमा विवक्षित आहे—'उत्सुक [होऊन]', 'अजोषा'. अजोषा हें स्त्रीलिंगी अनेकवचन होय; 'गिर.' याचें विशेषण जोष म्हणजे तृप्ति नाहीं ज्यांस त्या अजोषा. परंतु सायणाचार्य क्रियापद समजतात आणि 'तादृशीगिर.' हें कर्म अध्याहृत घेतात, व अजोषा. याच्या पुढे असलेल्या 'वृषभं पतिम्' या शब्दांचा संबंध पूर्ववाक्याशीं लावितात. जोष (म्हणजे तृप्ति) हा शब्द वेदांत पुष्कळ ठिकाणी आला आहे. ऋ १. १२०. १ वगैरे पाहा.

५ 'असेलच [यांत संशय नाहीं]' ='असत् इत्' असत् हें लेट्चें रूप आहे याचा अर्थ असावी, असली पाहिजे असा होतो

अस्मान्त्सु तत्र चोदयेन्द्र राये रभस्वतः ।
तुविद्युम्न यशस्वतः ॥ ६ ॥

अस्मान् । सु । तत्र । चोदय । इन्द्र । राये । रभस्वतः ।
तुविऽद्युम्न । यशस्वतः ॥ ६ ॥

सं गोमदिन्द्र वाजवदस्मे पृथु श्रवो बृहत् ।
विश्वायुर्धेह्यक्षितम् ॥ ७ ॥

सम् । गोऽमत् । इन्द्र । वाजऽवत् । अस्मे इति । पृथु । श्रवः । बृहत् ।
विश्वऽआयुः । धेहि । अक्षितम् ॥ ७ ॥

अस्मे धेहि श्रवो बृहद्द्युम्नं सहस्रसातमम् ।
इन्द्र ता रथिनीरिषः ॥ ८ ॥

अस्मे इति । धेहि । श्रवः । बृहत् । द्युम्नम् । सहस्रऽसातमम् ।
इन्द्र । ताः । रथिनीः । इषः ॥ ८ ॥

वसोरिन्द्रं वसुपतिं गीर्भिर्गृणन्त ऋग्मियम् ।
होम गन्तारमूतये ॥ ९ ॥

वसोः । इन्द्रम् । वसुऽपतिम् । गीःऽभिः । गृणन्तः । ऋग्मियम् ।
होम । गन्तारम् । ऊतये ॥ ९ ॥

भाषायाम्.

६ तस्माद् हे तुविद्युम्न इन्द्र अस्मान्रभस्वतो यशस्वतश्[च] राये सम्यक्चोदय ॥

७ हे इन्द्र विश्वायुस् [त्वम्] अस्मभ्य गोमद्वाजवत्पृथु बृहदक्षित [च] श्रव सदेहि ॥

८. हे इन्द्र अस्मभ्य बृहच्छ्रव सहस्रदातृतम द्युम्न ता रथिनीरिषश्[च] देहि ॥

९ वसोर्वसुपतिमृग्मियमूतये गन्तारमिन्द्र गीर्भिर्गृणन्तो [वय] ह्वयाम ॥

६. त्यापेक्षा हे महातेजस्वी इंद्रा, आम्हाला संपत्ति मिळविण्याविषयीं अशी प्रेरणा कर कीं, जेणेकरून आम्हांस आवेश येऊन आम्ही यशस्वी होऊं.

७. हे इंद्रा, सकलांचा जीव असा जो तूं तो आम्हास गोसंपन्न, अश्वसंपन्न, विस्तीर्ण, मोठें [आणि] अक्षय असें भाग्य दे.

८. मोठी कीर्ति, [आणि] सहस्रावधि लाभानीं भरलेला अधिकार आम्हास दे; हे इंद्रा, तूं गाडे भरून धान्य [देत असतोस] तें [आम्हास दे]

९. संपत्तीचा स्वामी, स्तवनीय, [आणि] संरक्षण करण्यासाठीं [उपासकाप्रत] येणारा जो इंद्र त्याला स्तुतींनीं गाऊन आम्ही बोलावितों.

6. Inspirit us, then, Indra of mighty splendor, to the attainment of wealth, so that we may be energetic and glorious

7. Give us thou, Indra, who art the life of all, wealth that shall have cows and horses, that shall be extensive and great, and shall be inexhaustible.

8. Give us great fame [and] power coupled with thousands of benefits, [and], Indra, those cartfuls of corn [that thou bestowest].

9. Praising with songs we invoke Indra, the lord of riches, who deserves to be praised [and] who goes to protect [his worshipper].

---

६. 'त्यापेक्षा'='तत्र'. ज्यापेक्षा 'विस्तीर्ण [आणि] मोठी संपत्ति तुझ्या जवळ असेलच [यांत संशय नाही]' त्यापेक्षा

मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, आम्हास चांगली संपत्ति दे म्हणजे आमच्या अंगीं उत्साह उत्पन्न होऊन आम्ही यशस्वी होऊं अर्थ स्पष्ट समजावा म्हणून या मंत्रानें भाषांतर किंचित् विस्तारलें आहे.

७. 'अश्वसंपन्न'='वाजवत्'. वाज-शब्दाचा अर्थ अश्व असाहि होतो. आणि खुद्द सायणाचार्यांनीच ऋ ५. ८४.२ आणि ३.३०.११ या मंत्रांतील भाष्यांत हाच अर्थ केला आहे. असें असतां येथें वाज म्हणजे अन्न असाच ते अर्थ करितात!

८ 'सहस्रावधि लाभानीं भरलेला अधिकार'. 'सहस्रसातम शुष्मम्' याचा पदशः अर्थ, 'पुष्कळ हजार फायदे ज्यापासून मिळतात तो अधिकार'

९. 'संपत्तीचा स्वामी'='पतिः वसु-

सुतेसुते न्योकसे बृहद्बृहत एदरिः ।
इन्द्राय शूषमर्चति ॥ १० ॥ १८ ॥

सुतेऽसुते । निऽओकसे । बृहत् । बृहते । आ । इत् । अरिः ।
इन्द्राय । शूषम् । अर्चति ॥ १० ॥ १८ ॥

भाषायाम्

१०. अरि (=उपासक) सुतेसुते न्योकसे बृहत इन्द्राय बृहच्छूषमर्चति । अर्यमेव [च स्तुयति] ॥

पति'. वसुपति इतक्यावरूनच जरी 'सपत्नीचा स्वामी' असा अर्थ झाला असता तरी 'वसो वसुपति' आणि 'वसूनां वसुपतिः' असे प्रयोग वेदांत पुष्कळ आढळतात ऋ ३ ३० १९; ४ १७ ६; ३ ३६ ९ इत्यादि मंत्रांत पाहा. सायणाचार्यहि त्या ठिकाणीं 'वसूनां वसुपतिः' याचा संबंध एकत्र घेतात.

सूक्तम् १०.

ऋषिर्विश्वामित्रपुत्रो मधुच्छन्दा । इन्द्रो देवता । अनुष्टुप् छन्दः ॥

*गायन्ति त्वा गायत्रिणोऽर्चन्त्यर्कमर्किणः ।
ब्रह्माणस्त्वा शतक्रत उद्वंशमिव येमिरे ॥ १ ॥

गायन्ति । त्वा । गायत्रिणः । अर्चन्ति । अर्कम् । अर्किणः ।
ब्रह्माणः । त्वा । शतक्रतो इति शतऽक्रतो । उत् । वंशम्ऽइव । येमिरे ॥ १ ॥

भाषायाम्

१ हे शतक्रतो त्वा गायत्रिणो गायन्ति । [तुभ्यम्]अर्किणोऽर्कमर्चन्ति । ब्रह्माणस्त्वा वंशमिवोद्येमिरे ॥

* या मंत्राचा विनियोग उदकशांतींत जपार्थ आहे पण अर्थावरून पाहतां या मंत्राचा संबंध उदकशांतीकडे काय आहे त्याचा विचार थोडक्यांतच होतो.

१०. जेथें जेथें सोम असेल तेथें तेथें सुख पावणारा जो महान् इंद्र, त्याला उपासक मोठें स्तोत्र गातो, [आणि] आपणाकडेसच [बोलावितो].

10. The eager worshipper sings a great song for and invites to himself the great Indra who tarries to regale himself in every place where Soma is offered.

१०. 'जेथे जेथे सोम असेल तेथे तेथे सुख पावणारा...त्याला'='सुते सुते न्योकसे'. अक्षरशः 'प्रत्येक सोमाच्या ठायीं रमणाऱ्याला', म्हणजे जेथे जेथे सोमरस काढून उपासक इंद्रास अर्पण करितात तेथे तेथे राहून तृप्ति पावणारा जो इंद्र त्याला.—'स्तोत्र गातो' =' शूषमर्चति.' सायणाचार्य 'इंद्राय शूषमर्चति' याचा अर्थ "इंद्राला बल वर्णितो म्हणजे इंद्राचा पराक्रम वर्णितो" असा करितात. परंतु 'इंद्राय' ही चतुर्थी षष्ठ्यर्थी घेववत नाहीं. आणि येथे अवश्यहि नाहीं. कारण कीं 'शूष' याचा अर्थ स्तोत्र असा होतो. आणि "इमं महे विदथ्याय शूषं शश्वत्कृत्व ईड्याय प्रजभ्रुः" (ऋ. ३.५४.१) यांत आणि "कुत्सा एते हर्यश्वाय शूषम् इ०" (ऋ. ७.२५.५) यांत खुद्द सायणाचार्यांनींच तसा अर्थ केला आहे. व इतर पुष्कळ मंत्रांत शूष म्हणजे स्तोत्र असा अर्थ होतो. ऋ. १०.९६.२;१.६२.१;५.४१.७इत्यादि पाहा.—'उपासक'='अरिः'. अरिशब्दाचा अर्थ अक्षरशः उत्सुक=देवांची भक्ती करण्याविषयीं तत्पर=यजमान=उपासक. मंत्राचें तात्पर्य असें कीं, या वेळीं इंद्र सोम अर्पण करणाऱ्या अनेक उपासकांकडेस बसला असेल त्याला मी उपासक मोठ्यानें सूक्त गाऊन इकडे बोलावीत आहें.

सूक्त १०.

ऋषि, मधुच्छंद. देवता, इंद्र. वृत्त, अनुष्टुभ्.

१. [हे इंद्रा], गायत्रें म्हणणारे तुला गायत्र म्हणून गातात; अर्क म्हणणारे अर्क गातात. हे शतप्रज्ञ इंद्रा, ब्रह्में म्हणणारे उपासक तुला वेळूप्रमाणे उंच करितात.

Hymn 10

To *Indra*. By *Madhuchchhandas*. Metre, *Anushtubh*.

1. The singers of *gâyatras* sing their *gâyatras* to thee; the singers of *arkas* offer thee their *arkas*. O possessor of hundred wisdoms, the singers of *brahmas* raise thee like a bambu.

१ हा मंत्र जरी अगदीं सोपा आहे आणि तात्पर्य एकदम ध्यानांत येतें तथापि गायत्रें अर्क, आणि ब्रह्में या स्तोत्रवाचक शब्दांमध्ये वृत्तांत भेद

यत्सानोः सानुमारुहद्भूर्यस्पष्ट कर्त्वम् ।
तदिन्द्रो अर्थं चेतति यूथेन वृष्णिरेजति ॥ २ ॥
यत् । सानोः । सानुम् । आ । अरुहत् । भूरि । अस्पष्ट । कर्त्वम् ।
तत् । इन्द्रः । अर्थम् । चेतति । यूथेन । वृष्णिः । एजति ॥ २ ॥
युक्ष्वा हि केशिना हरी वृषणा कक्ष्यप्रा ।
अथा न इन्द्र सोमपा गिरामुपश्रुतिं चर ॥ ३ ॥
युक्ष्व । हि । केशिना । हरी इति । वृषणा । कक्ष्यऽप्रा ।
अथ । नः । इन्द्र । सोमऽपाः । गिराम् । उपऽश्रुतिम् । चर ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. यत्सानोः सानुमारुहद्भूरि कर्मास्पष्ट (=अपश्यत्) [च] तदिन्द्रोऽर्थं चेतति । यूथेन वृष्णिरेजते ॥

३. हे सोमपा इन्द्र केशिनौ वृषणौ कक्ष्यप्रौ हरी युङ्क्ष्व हि । अथ (=अनन्तरम्) अस्माकं गिरामुपश्रुतिं चर ॥

काय हे स्पष्ट सांगवत नाहीं परंतु हीं निरनिराळीं वृत्तें आहेत, निदान स्तोत्रांचे निरनिराळे भेद आहेत यांत संशय नाहीं. गायत्री म्हणून जें वृत्त आहे त्यावरून गायत्र याचा विशेष अर्थ समजण्यास मार्ग दिसतो. कारण कीं, गायत्री म्हणजे गायत्रवृत्तबद्ध ऋचा. यावरून गायत्र म्हणजे गायत्री छंदांत गाइलेलीं गानें. परंतु अर्क आणि ब्रह्में हीं कोणत्या प्रकारचीं गानें? भाष्यकार म्हणतात कीं, 'गायत्रिण' म्हणजे 'उद्गाते,' 'अर्किण' म्हणजे 'होते' आणि 'ब्रह्माण' म्हणजे 'ब्रह्मादि इतर' ऋत्विज.

'वेळूप्रमाणे उंच करितात' या उपमेचें स्वारस्य काय तें स्पष्ट कळत नाहीं. सायणाचार्यहि निश्चयानें सांगूं शकत नाहींत ते म्हणतात, "जसे नाड्यावर "चढून खेळणारे भोरपी नाडा उभारि- "तात तसा याला ते उन्नत करितात हा "एक अर्थ; नाहीं तर सन्मार्गानें चा- "लणारे लोक जसे आपल्या कुळाची "कीर्ति वाढवितात तसे इंद्राची कीर्ति "ते वाढवितात, असा अर्थ." कसें असलें तरी आपल्या गायनांनीं इंद्राची कीर्ति वाढवितात असें तात्पर्य आहे यांत संशय नाहीं

'शतक्रतु' याजवर पूर्वी ऋ. १.४.८ याजवर दिलेली टीप पाहा.

२. जेव्हां [यजमान] एका पर्वतशिखरापासून दुसऱ्या पर्वतशिखरावर चढतो [आणि] मोठें कर्म आरंभितो तेव्हा इंद्र यजमानाचें प्रयोजन समजतो. [आणि] तो कामवर्षक कळपाबरोबर कांपतो.

2. When [the sacrificer] ascends one summit after another [and] commences the great work, Indra knows [the sacrificer's] object, [and] accomplisher of desires he trembles with the flock.

३. तूं [तुझी] अयाळी, जवान [आणि] पुष्ट पिवळ्या घोड्यांची जोडी जोड. आणि मग हे सोम पिणाऱ्या इंद्रा, आमचीं स्तोत्रें ऐकण्यासाठीं ये.

3. Harness thy pair of maned, youthful [and] stout tawny horses, and then, Soma-drinking Indra, come to hear our prayers.

---

२. या मंत्राचा पूर्वार्ध जरी अगदीं सोपा आहे आणि तिसऱ्या आणि चौथ्या पादांचा शब्दार्थ स्पष्ट आहे तरी भावार्थ समजत नाहीं. म्हणून आम्हीं सगळ्याच मंत्राचा अर्थ सायणाचार्यांप्रमाणे दिला आहे. वस्तुत. अर्थ असा दिसतो कीं, 'जेव्हां [सूर्यरूपी] इंद्र एक शिखरापासून दुसऱ्या शिखरावर चढतो आणि मोठें कर्म पाहतो तेव्हां तो (इंद्र) अर्थ अवलोकन करितो आणि मेंढा कळपाबरोबर कांपतो.' पहिल्या दोन चरणांचा भावार्थ असा कीं, 'सूर्यरूपी इंद्र जेव्हां उगवून एका पर्वतावरून दुसऱ्या पर्वतावर चढतो आणि अनेक कर्में (मनुष्यांनीं आरंभिलेलीं) पाहतो, तेव्हां' परंतु तिसऱ्या चरणांत 'अर्थ अवलोकन करितो' आणि चौथ्या चरणांत 'मेंढा' म्हणजे काय?

सायणाचार्यांचा भावार्थ असा — 'यजमान समिधा वगैरे आणण्यासाठीं एका पर्वतापासून दुसऱ्या पर्वतावर चढतो आणि यागादि कर्म आरंभितो तेव्हां इंद्र यजमानाचा हेतु काय आहे तो समजतो, आणि मरुद्गणरूपी कळपासह तो कामना पूर्ण करणारा इंद्र यज्ञास येऊं लागतो.' परंतु यजमान हें अध्याहृत करावें लागतें, आणि 'अस्पट' याला अप्रयोगसिद्ध आणि साधारण अर्थास विरुद्ध अर्थ करावा लागतो.

एहि स्तोमाँ अभि स्वराभि गृणीह्या रुव ।
ब्रह्म च नो वसो सचेन्द्र यज्ञं च वर्धय ॥ ४ ॥
आ । इहि । स्तोमान् । अभि । स्वर । अभि । गृणीहि । आ । रुव ।
ब्रह्म । च । न । वसो इति । सचा । इन्द्र । यज्ञम् । च । वर्धय ॥ ४ ॥
उक्थमिन्द्राय शंस्यं वर्धनं पुरुनिष्षिधे ।
शक्रो यथा सुतेषु णो रारणत्सख्येषु च ॥ ५ ॥
उक्थम् । इन्द्राय । शंस्यम् । वर्धनम् । पुरुनिःऽसिधे ।
शक्रः । यथा । सुतेषु । न । ररणत् । सख्येषु । च ॥ ५ ॥
तमित्सखित्व ईमहे तं राये तं सुवीर्ये ।
स शक्र उत नः शकदिन्द्रो वसु दयमानः ॥ ६ ॥ १९ ॥
तम् । इत् । सखिऽत्वे । ईमहे । तम् । राये । तम् । सुऽवीर्ये ।
स । शक्र । उत । न । शकत् । इन्द्र । वसु । दयमान ॥ ६ ॥ १९ ॥

भाषायाम्

४ हे वसो इन्द्र [त्वम्] एहि । स्तोमानभिस्वर । [तान्] अभिगृणीहि । [तान्] आरुहि । अस्माकं ब्रह्म च यज्ञं चापि वर्धय ॥

५ यथा शक्र [इन्द्र] अस्माकं सुतेषु सख्येषु च रणेत् [तथा] पुरूणि निषेध इन्द्राय वर्धनमुक्थं शंस्यम् [अस्ति] ॥

६ [वयं] तमेव सखित्वायेमहे (=याचामहे) । [तम्] एव [राये] ईमहे । तम् [एव] सुवीर्याय [ईमहे] । उत स शक्र इन्द्रो वसु दयमानो (=ददत्, दत्त्वा) अस्माञ्छक्नुयाद् (=अवेत्) ॥

४. येथें ये, या स्तोत्रांची वाहवा कर, वाखाणणी कर, त्यास शाबास म्हणून स्वीकारून घे. हे कृपाळू इंद्रा, तूं आमचें स्तोत्र आणि आमची उपासना पण फलद्रूप कर.

4. Come hither, applaud our prayers, praise *them*, receive *them* approvingly; good Indra, bless our prayer and with it our sacrifice.

५. अनेक शत्रूंचा नाश करणाऱ्या इंद्राला तृप्तिकारक स्तोत्र गावें, की जेणेकरून शक्तिमान् [इंद्र] आमच्या सोमावर आणि सेवेवर कृपा करील.

5. An agreeable hymn has to be sung unto Indra *the destroyer of many* enemies, so that the mighty [Indra] may accept with pleasure our Somas and our friendships

६. त्यालाच मैत्रीसाठीं आम्ही प्रार्थितों, त्यालाच धनासाठीं [आणि] त्यालाच सुशौर्यासाठीं [प्रार्थितों]. म्हणून तो शक्तिमान् इंद्र द्रव्य देऊन आम्हास साहाय्य करो.

6. To Him alone we pray for friendship, to Him for wealth, to Him for great valour. May then he the mighty Indra bestow riches [upon us] and help us

---

५. 'तृप्तिकारक'='वर्धनम्'. जेणेकरून इंद्रास सुख होईल असे. 'अनेक शत्रूंचा नाश करणाऱ्या'='पुरूनि.षिधे' हा अर्थ सायणाचार्यास अनुसरून दिला आहे; व तो ते केवळ धात्वर्थावरून काढितात, प्रयोगावरून सिद्ध करीत नाहीत. ऋग्वेदांत नि षिध् शब्द बराच आढळतो. त्याचा अर्थ 'देणगी' असा दिसतो आणि त्यावरून पुरूनि षिध् म्हणजे अनेक आहेत देणग्या ज्याच्या तो असा या मंत्रांत घेण्यास कांहीं अडचण दिसत नाहीं. 'सेवेवर' मूळामध्ये 'सख्यत्वावर' असें आहे. आम्ही इंद्राशीं मैत्री करून त्याची सेवा करितों त्याजवर असा भावार्थ.

६. 'सुशौर्यासाठीं'='सुक्षि' 'सुक्षत्रानि,' 'शौर्यवान पुत्र' असाहि अर्थ चांगला समजतो.

सुविवृतं सुनिरजमिन्द्र त्वादातमिद्यशः ।

गवामप व्रजं वृधि कृणुष्व राधो अद्रिवः ॥ ७ ॥

सुऽविवृतम् । सुनिःऽअजम् । इन्द्र । त्वाऽदातम् । इत् । यशः ।

गवाम् । अप । व्रजम् । वृधि । कृणुष्व । राधः । अद्रिऽवः ॥ ७ ॥

नहि त्वा रोदसी उभे ऋघायमाणमिन्वतः ।

जेषः स्वर्वतीरपः सं गा अस्मभ्यं धूनुहि ॥ ८ ॥

नहि । त्वा । रोदसी इति । उभे इति । ऋघायमाणम् । इन्वतः ।

जेषः । स्वःऽवतीः । अपः । सम् । गाः । अस्मभ्यम् । धूनुहि ॥ ८ ॥

भाषायाम्

७ हे अद्रिवन्निन्द्र त्वया दत्तमेव यशः सुविवृतं सुनिरजं [चास्ति] । गवां व्रजम् [अस्मभ्यम्] अपवृतं कुरु । राधः कुरु [च] ॥

८ ऋघायमाणं त्वामुभे रोदसी नहीं वतः । स्वर्वतीरपो जय । [ताश्च] गा अस्मभ्यं सधूनुहि(=सम्प्रेरय) ॥

७ हे इंद्रा, तुवां दिलेलेंच वैभव सर्वत्र पसरतें [आणि] अनायासानें प्राप्त होतें. [यास्तव] गाईंचा गोठा [आम्हासाठीं] उघड [आणि] हे वज्रधारी, [आम्हाला] दौलत दे.

८. तू जेव्हा संतापतोस तेव्हा पृथ्वी आणि आकाश ह्या दोनी तुला आवरून धरूं शकत नाहींत. [तर हे इंद्रा], तू आकाशांतील उदकें जिंकून हरण कर [आणि] [त्या] गाई आम्हास दे.

7. That wealth alone, Indra, which thou givest spreads in all directions [and] is easily obtainable. Throw open; then, the cow-fold [and], Thunderer, give us wealth

8. Not both the earth and sky are able to overpower thee when thou ragest Conquer thou the heavenly waters and send down to us those cows.

---

७. 'तुवां दिलेलें,' 'त्वादातम्' याचा अर्थ या ठिकाणीं 'तुवां शोधिलेलें' असा सायणाचार्य करितात. पण आम्हीं दिलेला अर्थ सुयुक्तिक आणि स्थलोचित आहे इतकेंच नव्हे, पण दुसऱ्या दोन मंत्रांत खुद्द सायणाचार्यांनींच केलेल्या अर्थास अनुसरून आहे. 'प्रति चिन्मन्युमभिजस्त्वादातमा पशुं ददे' (ऋ ५.७.१०) यावर व 'यदिन्द्र चित्र मेहनास्ति त्वादातमद्रिवः। राधस्तन्नो......आ भर' (ऋ ५.७.३०) यावर 'त्वा दायपार्थे' (अर्थात् तूं देत असतोस ते) असा ते अर्थ करितात तो पाहा—'सर्वत्र पसरतें'—परिवृतम्', आणि 'अनायासानें प्राप्त होतें'=सुनिरजम्' हे अर्थ भाष्यास अनुसरून केले आहेत भाष्यकार धातूच्या अर्थाप्रमाणेंच अर्थ करितात. प्रयोगावर आधार नाहीं—'गाईंचा गोठा उघड' म्ह. इंद्राच्या घरीं गाई पुष्कळ आहेत त्यांचा गोठा उघडून त्या ज्या गाई तीच दौलत आम्हांस दे असें ऋषीचें म्हणणें अथवा असेंहि तात्पर्य संभवतें कीं, आकाशांत उदकधारारूपी गाई ज्या अभ्ररूपी गोठ्यांत कोंडून राहिल्या आहेत त्या तो गोठा फोडून बाहेर काढ, म्हणजे पाऊस पाड, मग आम्हांस दौलत सहज मिळेल. पुढचा मंत्र पाहा—'वज्रधारी,' 'अद्रिवान्' हें विशेषण बहुतकरून इंद्रास लाविलेलें वेदांत आढळतें 'अद्रिवान्' याचा पदशः अर्थ अद्रि आहे ज्यास तो अद्रि म्हणजे वज्र असें सायणाचार्य म्हणतात.

८ मंत्राचा भावार्थ—तूं जेव्हां मेघरूपी वृत्राबरोबर लढतोस आणि भयंकर विद्युत्पात तेच कोणी शस्त्रप्रहार करितोस तेव्हां आकाश आणि पृथिवी हीं भितात आणि तूं त्यांस पावन

आश्रुत्कर्ण श्रुधी हवं नू चिद्दधिष्व मे गिरः ।
इन्द्र स्तोममिमं मम कृष्वा युजश्चिदन्तरम् ॥ ९ ॥
आश्रुत्ऽकर्ण । श्रुधि । हवम् । नु । चित् । दधिष्व । मे । गिरः ।
इन्द्र । स्तोमम् । इमम् । मम । कृष्व । युजः । चित् । अन्तरम् ॥ ९ ॥
विद्मा हि त्वा वृषन्तमं वाजेषु हवनश्रुतम् ।
वृषन्तमस्य हूमह ऊतिं सहस्रसातमाम् ॥ १० ॥
विद्म । हि । त्वा । वृषन्ऽतमम् । वाजेषु । हवनऽश्रुतम् ।
वृषन्ऽतमस्य । हूमहे । ऊतिम् । सहस्रऽसातमाम् ॥ १० ॥
आ तू न इन्द्र कौशिक मन्दसानः सुतं पिब ।
नव्यमायुः प्र सू तिर कृधी सहस्रसामृषिम् ॥ ११ ॥
आ । तु । नः । इन्द्र । कौशिक । मन्दसानः । सुतम् । पिब ।
नव्यम् । आयुः । प्र । सु । तिर । कृधि । सहस्रऽसाम् । ऋषिम् ॥ ११ ॥

भाषायाम्

९ हे आश्रुत्कर्ण [त्वमस्माकं] हवं शृणुहि । इदानीमेव मम गिरो धत्स्व । हे इन्द्र इमं मम स्तोमं युजो(=मित्राद्)अप्यन्तरं (=समीपतरं) कुरु ॥

१० त्वां हि [वयं] वाजेषु वृषतमं हवनश्रुतं [च] विद्म । वृषतमस्य [तव] सहस्रदातृतमामूतिमाह्वयाम ॥

११ हे कौशिक इन्द्र [त्वं] शीघ्रम् [आयाहि] । मन्दसानो (=हृष्टस्) [त्वं] सुतं पिब । [मम] नव्यमायुः सम्यक्प्रतर । [मां च] सहस्रसां(=सहस्रलाभानुभवन्तम) ऋषिं कुरु ॥

नाहींस होतोस तर वृत्राला मार, उदकें खाली पाड, आणि त्याच गाई आम्हांस दे. मेघोदकास वेदांत गाई असे म्हटलें आहे आणि इंद्र वृत्राशीं लढून त्या जिंकून घेतो असे अनेक ठिकाणीं वाणलेलें आहे

९. ज्याचे कान ऐकतात असा हे इंद्रा, आमची ही हाक ऐक; ह्या माझ्या स्तुती आताच स्वीकारून घे. हे इंद्रा, ह्या माझ्या स्तोत्राला तूं [आपल्या] मित्राहिपेक्षा जीवलग कर.

9. O Thou whose ears hear, hear my call Just now accept my prayers. Make this my hymn, Indra, dearer [to thee] than even a friend.

१०. कारण कीं, तूं युद्धप्रसंगात परम वीर्यवान् [आणि] हाक ऐकणारा आहेस हे आम्ही जाणतों. ह्मणून तुझा परम वीर्यवंताचा सहस्रावधिद्रव्यदायक आसा आम्ही मागतो.

10. For we know thee [to be] most valorous and attentive to invocation in battles. We, therefore, implore the protection of thee the most valorous, that confers a thousand benefits.

११. ये, कौशिक इंद्रा, लवकर ये [आणि] आनंद पावून [हा] आमचा सोम पी. [माझे] तरुणवय फार दिवस राख [आणि] हजारो लाभ ज्याला होतील असा मला ऋषि कर.

11. Come hither quick, O' Kaus'ika Indra, [and] with delight drink our Soma Lengthen [my] youth greatly [and] make me a poet obtaining a thousand benefits.

---

९ ही ऋचा फार सुंदर आहे तिची भाषा जशी श्राव्य आहे तसाच तिचा अर्थ फार रमणीय आहे यांत संशय नाहीं. ऋषीची उत्सुकता, दृढ भक्ति आणि प्रेम ही फार उत्कृष्ट दिसून येतात — 'मित्रापेक्षांहि जीवलग'= 'युजश्चिद्न्तरम्' युज. ही युज् शब्दाची पचमी आणि अतर ही अत (जवळ या अर्थाचा शब्द) याची 'तर'प्रत्ययान्त कोटी. अत म्हणजे जवळचा. अतर अधिक जवळचा, अतम अत्यंत जवळचा.

१०. ऋचेचा भावार्थ. तुझे उपासक लढाईत तुला हाक मारितात तेव्हां तीं तू ऐकितोस आणि त्यांस साहाय्य करितोस. अत एव तुला आम्ही हाक मारीत आहो तर ज्याच्या पासून सहस्रावधि लाभ होतात असा आश्रय तू आम्हांस दे.

या ऋचेवरून व वेदांतील बहुतेक ऋचांवरून सिद्ध होतें कीं, ब्राह्मणांनी ब्रह्मकर्म करावें, क्षत्रियांनी युद्ध आणि राज्य करावें इत्यादि जे आचार मागाहून प्रचारांत आले ते वैदिक युगांत ठाऊक नव्हते कारण ऋषि जसे यज्ञ करीत आणि वेदमंत्रांनी देवभक्ति करा-

*परि त्वा गिर्वणो गिर इमा भवन्तु विश्वतः ।
वृद्धायुमनु वृद्धयो जुष्टा भवन्तु जुष्टयः ॥ १२ ॥ २० ॥
परि । त्वा । गिर्वणः । गिरः । इमाः । भवन्तु । विश्वतः ।
वृद्धऽआयुम् । अनु । वृद्धयः । जुष्टाः । भवन्तु । जुष्टयः ॥ १२ ॥ २० ॥

भाषायाम्

१२ हे गिर्वण एता गिरस्त्वां विश्वत परिभवन्तु । वृद्धायु [त्वाम्]अनु वृद्धयो [भवन्तु] । [त्वया] जुष्टा जुष्टयो भवन्तु ॥

स तसे युद्धहि करीत होते, आणि यज्ञांत अर्पण केलेले हवि आणि सोम सेवन करण्यासाठी जसे इंद्रादिकांस बोलावीत तसेच ते युद्धांत जाऊन लढत असतांना आपणांस त्या देवांनी मदत करावी आणि यश यावे अशी प्रार्थना करीत असत

११ ही पण ऋचा फार चमत्कारिक व महत्त्वाची आहे हिजवरून दोन गोष्टी फार महत्त्वाच्या दिसून येतात पहिली–मंत्रकर्ता ऋषि होण्याची इच्छा करितो आणि त्यासाठी इंद्रास प्रार्थितो दुसरी–ऋषि म्हणजे केवळ निरपेक्ष तप करून राहणारे महापुरुष होते असा साधारण जनाचा समज आहे त्याला ही ऋचा विरुद्ध आहे ऋषि झाल्यानें हजारो फायदे होत होते हें त्याम दिसून येते हे फायदे म्हणजे आमच्या युगांत कविजनांस जे लाभ होतात तेच असे समजले पाहिजे

'कौशिक इंद्रा' या सूक्ताचा कर्ता जो मधुच्छन्द तो कुशिककुळांतला होता कौशिक म्हणजे कुशिककुळांत झालेला येथे इंद्रास हे विशेषण लावण्याचे कारण असे दिसते कीं, इंद्र हा कुशिककुळाचा मोठा मित्र होता व त्यावर त्याची कृपा होती आमच्या युगांतहि 'पुंडलिकाचा विठ्ठ', असे म्हणण्याची रूढि नाहीं असे नाहीं – 'ठवकर ये' हा अर्थ 'आ तु' या अव्ययांपासून गम्यमान आहे –'तरुणवय'=नव्यम् आयु ' शब्दश अर्थ 'नवे वय '

* या मंत्राचा विनियोग विवाहसंस्कारांत दंपतीस सूत्रवेष्टन करते समयी करितात; परंतु या मंत्राचा त्या कर्माकडे काय संबंध आहे याचा विचार करितां, 'परि त्वा'='तुझ्या सभोंताला' हे शब्द त्यांत आले आहेत इतकेच कारण दिसते

१२. हे गिर्वणा [इंद्रा], [आमच्या] ह्या वाणी तुला सर्व बाजूंनीं वेष्टोत. तुझ्या जीवास सुखी करून [त्या] [आम्हांस] सुखकर होओत, तुला संतुष्ट करून [मग] आम्हांस संतोषकारक होओत.

12. May these prayers, O lover of prayers, crowd round thee on all sides. Having increased the pleasure of thy life may they then become pleasures [to us]; having been enjoyed [by thee] may they become [our] enjoyments.

१२. भावार्थः—ह्या ज्या या सूक्तात आम्हीं वाणी गाइल्या आहेत त्या तुजप्रत प्रविष्ट होओत, आणि तुला सुख देओत व तुला त्यांपासून संतोष होओ. तसें झाल्यानंतर मग आम्हांस त्या सुखकर आणि संतोषकर होओत. म्हणजे तूं आम्हांस हें सूक्त गृहण करून घेऊन सुख आणि संतोष कर.

'गिर्वण' हें इंद्रास आणि अग्नीस लाविलेलें विशेषण आढळतें. त्याचा अर्थ 'ज्याला स्तुति आवडते तो'. तें इंद्र आणि अग्नि ह्या देवांचें जणुं काय विशेषनामच बनून गेलें आहे. आणि मघत् हें जसें वेदांत देवविशेषाचें नांव असून मागाहून देवाचें सामान्यनाम झालें तसेंच गिर्वण हें सामान्यनाम होऊन देववाचक झालें आहे. त्यावरून संस्कृत भाषेस गिर्वाणभाषा (=देवभाषा) असें आपण म्हणत असतों.—'सर्व बाजूंनीं वेष्टोत.' जशा दासी वेष्टितात तशा.—'तुला संतुष्ट करून'. पदशः अर्थ, 'तुझ्या कडून उपभोगिलेल्या अशा [होऊन].'

सूक्तम् ११.

ऋषिर्मधुच्छन्दस पुत्रो जेता । इन्द्रो देवता । अनुष्टुप् छन्द ॥

*इन्द्रं विश्वा अवीवृधन्त्समुद्रव्यचसं गिरः ।
रथीतमं रथीनां वाजानां सत्पतिं पतिम् ॥ १ ॥

इन्द्रम् । विश्वाः । अवीवृधन् । समुद्रऽव्यचसम् । गिरः ।
रथिऽतमम् । रथिनाम् । वाजानाम् । सत्ऽपतिम् । पतिम् ॥ १ ॥

सख्ये त इन्द्र वाजिनो मा भेम शवसस्पते ।
त्वामभि प्र णोनुमो जेतारमपराजितम् ॥ २ ॥

सख्ये । ते । इन्द्र । वाजिनः । मा । भेम । शवसः । पते ।
त्वाम् । अभि । प्र । नोनुमः । जेतारम् । अपराऽजितम् ॥ २ ॥

पूर्वीरिन्द्रस्य रातयो न वि दस्यन्त्यूतय ।
यदी वाजस्य गोमतः स्तोतृभ्यो मंहते मघम् ॥ ३ ॥

पूर्वीः । इन्द्रस्य । रातयः । न । वि । दस्यन्ति । ऊतयः ।
यदि । वाजस्य । गोऽमतः । स्तोतृऽभ्यः । मंहते । मघम् ॥ ३ ॥

भाषायाम्

१ विश्वा गिर समुद्रव्यचस (=समुद्रवद्व्यापक) रथिनां रथितमं वाजानां सत्पतिं पतिमिन्द्रमवीवृधन् ॥

२ हे शवसस्पते (=बलपते) इन्द्र [वय] वाजिन (=शूरस्य) तव सख्ये [तिष्ठन्तो] मा भैष्म । [वयम्] अपराजितं जेतारं त्वामभि प्रणोनुम ॥

३ यदीन्द्र स्तोतृभ्यो गोमतो वाजस्य मघं मंहते (=ददाति) [तर्हि]तस्य पूर्व्यो (=विपुला) रातय ऊतयश् [च] न विदस्यन्ति (विनश्यन्ति) ॥

---

* या मन्त्राचा विनियोग इन्द्रास बळि देण्याच्या कर्मात करितात

सूक्त ११.

ऋषि, मधुच्छंदाचा पुत्र जेता. देवता, इंद्र. वृत्त, अनुष्टुभ्.

१. समुद्राप्रमाणें व्यापक, रथींमध्यें उत्तम रथी [आणि] द्रव्यांचा पराक्रमी प्रभु अशा इंद्राला सकल स्तुतींनीं वाढविलें आहे.

२. हे पराक्रमी इंद्रा, तुज शक्तिमंताच्या मैत्रींत [राहून] आम्ही न भिऊं असें कर. जयशाली [आणि] पराभव न पावणाऱ्याला तुला आम्ही पराकाष्ठेच्या उत्सुकतेनें स्तवीत आहों.

३. जर गोसंपन्न संपत्तीचें धन इंद्र स्तोत्यांस [एक वेळ] देईल तर त्याच्या विपुळ देणग्या [आणि] त्याचे अनुग्रह [कधीं] संपणार नाहींत.

Hymn 11.

To *Indra* By *Jetri*, son of *Madhuchchhandas*. Metre *Anushtubh*.

1. Universal praises have glorified Indra who is as great as the ocean, who is the best charioteer of [all] charioteers [and] the mighty lord of riches.

2. May we never, O Indra, lord of might, be afraid [while] in the friendship of thee the mighty one. We most earnestly pray to thee the unconquered conqueror.

3. If Indra [once] gives to those who praise him the wealth of a booty consisting of cows, his copious gifts and kindnesses will be without end.

---

१. 'पराक्रमी.' 'सत्पतिम्.' हा शब्द वेदांत पुष्कळ मंत्रांत आला आहे. ते सर्व मंत्र पाहतां येथें केलेला अर्थ युक्त दिसतो. सायणाचार्य 'सतां पालकः' असा अर्थ करितात. हा शब्द लढाईच्या संबंधानें व शौर्याच्या संबंधानें फार येतो. प्रस्तुत मंत्रांत तरा तसाच संबंध आहे. कारण कीं 'रथी' म्हणजे रथावर बसून युद्ध करणारा असा अर्थ आहे. 'वाजानां सत्पतिम्' म्हणजे 'द्रव्यांचा पराक्रमी प्रभु' असाहि अर्थ संभवतो

२. 'तुज शक्तिमंताच्या', 'वे वाजिनः'. वाजीशब्दाचा अर्थ येथें सायणाचार्य अन्नवान् असा करितात; पण तो येथें नीट बसत नाहीं. अन्नवानाच्या मैत्रींत राहण्यापेक्षां शक्तिमंताच्या मैत्रीत राहणारा विशेष निर्भय राहील हें सांगावयास नको. तशांत वाजी म्हणजे शक्तिमन हा अर्थ सायणाचार्यांनीच अनेक स्थळीं दिला आहे. ऋ. ६.५५.४, ८.२.३.३८, आणि ९.७ ८. या मंत्रांतील भाष्य उदाहरणार्थ पाहा.

३. मंत्राचा भावार्थ असा दिसतो

पुरां भिन्दुर्युवा कविरमितौजा अजायत ।
इन्द्रो विश्वस्य कर्मणो धर्ता वज्री पुरुष्टुतः ॥ ४ ॥

पुराम् । भिन्दुः । युवा । कविः । अमितऽओजाः । अजायत ।
इन्द्रः । विश्वस्य । कर्मणः । धर्ता । वज्री । पुरुऽस्तुतः ॥ ४ ॥

त्वं वलस्य गोमतोऽपावरद्रिवो बिलम् ।
त्वां देवा अबिभ्युषस्तुज्यमानास आविषुः ॥ ५ ॥

त्वम् । वलस्य । गोऽमतः । अप । अवः । अद्रिऽवः । बिलम् ।
त्वाम् । देवाः । अबिभ्युषः । तुज्यमानासः । आविषुः ॥ ५ ॥

तवाहं शूर रातिभिः प्रत्यायं सिन्धुमावदन् ।
उपातिष्ठन्त गिर्वणो विदुष्टे तस्य कारवः ॥ ६ ॥

तव । अहम् । शूर । रातिऽभिः । प्रति । आयम् । सिन्धुम् । आऽवदन् ।
उप । अतिष्ठन्त । गिर्वणः । विदुः । ते । तस्य । कारवः ॥ ६ ॥

भाषायाम्

४ इन्द्र पुरां भेत्ता युवा कविरमितौजा विश्वस्य कर्मणो धर्ता वज्री पुरुस्तुतश्[च] अजायत ॥

५ हे अद्रिवन् गोमतो (=गवां हर्तु) वलस्य बिलं त्वमपावृणोः । तुज्यमाना देवा अभीतवन्त. [सन्तस्] त्वामापुः ॥

६ हे शूर तव रातिभिः सिन्धुमावदन्नहं प्रत्यायम् । हे गिर्वणः कारव उपातिष्ठन्त । [ते] तस्य तव विदुः ॥

की, जर इंद्र एकदा लढाईत यश देऊन गाईचीं वगैरे लूट मिळवून देईल तर मग इंद्रानें ती दिलेली संपत्ति जन्मभर पुरेल पुन लढाईंत जाण्याची आणि द्रव्य मिळविण्याची गरज लागणार नाहीं.

४. इंद्र [जो जन्मला तो] [शत्रूंचीं] नगरें फोडून टाकणारा, तरुण, बुद्धिमंत, अमितपराक्रमी, सकल कर्मांचा पोषक, वज्र धारण करणारा, [आणि] बहुतांनीं स्तविलेला [असा] जन्मला.

4. India was born a destroyer of the [enemies'] towns, youthful, wise, of unmeasured power, a supporter of all actions, a wielder of the thunderbolt [and] praised by many.

५. हे वज्रधारी [इंद्रा], गाई घेऊन बसलेल्या वलाचें बीळ तूंच फोडून उघडिता झालास. त्रासलेले देव निर्भयपणें तुलाच मदत करिते झाले.

5. Thou didst, Thunderer, break open the hole of Vala who possessed the cows. Thee did the distressed gods aid without being terrified.

६. हे शूरा, मी तुझ्या प्रसादानिमित्त तुजप्रत सोमाची वाखाणणी करीत करीत आलों आहें, आणि हे गिर्वणा, [इतर] कवि जवळ उभे आहेत; तर ते तुला जाणतात.

6. O valiant one, I, proclaiming the goodness of the Soma, have come to thee for thy favours. The poets stood by, O lover of prayers, and they, therefore, know thee.

४. '[शत्रूंचीं] नगरें फोडून टाकणारा'='पुरां भिन्दुः.' इंद्रानें शत्रूंचीं नगरें फोडिलीं असें वेदांत सांगितलें आहे. हीं नगरें म्हणजे आकाशांत जे ढग असतात ते होत व त्यांवर विद्युद्रूपी वज्रप्रहार करून तीं फोडिलीं जातात असें रूपक आहे. हीं पुरें इंद्रानें फोडिलीं म्हणून इंद्रास 'पुरंदर' असें नांव पडलें आहे.

मंत्राचा भावार्थ असा कीं, इतरांच्या जन्मासारिखें इंद्राचें जन्म नव्हे. तो जेव्हां जन्मला तो एकदमच तरुण, आणि पुरें फोडणारा इत्यादि जन्मला.

५ 'गाई घेऊन बसलेल्या वलाचें बीळ.' "वल म्हणून कोणी एक राक्षस. "त्याणें देवांच्या गाई हरण करून "एका बिळांत म्हणजे गुहेंत लपवून "ठेविल्या. इंद्रानें त्या बिळासभों-"ताली आपल्या सैन्यानें वेढा घातला, "आणि त्या बिळापासून गाई बाहेर का-"ढिता झाला." अशी कथा सायणाचार्य लिहितात.

वस्तुतः आकाशांतून पावसाच्या पाण्याच्या ज्या धारा पडतात त्या गाई. त्यांला मेघरूपी राक्षस जो वल तो आवरून गुहेंत (अभ्रांत) ठेवितो. त्या इंद्र सोडवितो म्हणजे विद्युद्रूपी वज्रप्रहारांनीं उदकें अवनीवर पाडितो या गो-

मायाभिरिन्द्र मायिनं त्वं शुष्णमवातिरः ।
विदुष्टे तस्य मेधिरास्तेषां श्रवांस्युत्तिर ॥ ७ ॥

मायाभिः । इन्द्र । मायिनम् । त्वम् । शुष्णम् । अव । अतिरः ।
विदुः । ते । तस्य । मेधिराः । तेषाम् । श्रवांसि । उत् । तिर ॥ ७ ॥

इन्द्रमीशानमोजसाभि स्तोमा अनूषत ।
सहस्रं यस्य रातय उत वा सन्ति भूयसीः ॥ ८ ॥ २१ ॥ ३ ॥

इन्द्रम् । ईशानम् । ओजसा । अभि । स्तोमाः । अनूषत ।
सहस्रम् । यस्य । रातयः । उत । वा । सन्ति । भूयसीः ॥ ८ ॥ २१ ॥ ३ ॥

भाषायाम्.

७. हे इन्द्र त्व मायाविन शुष्ण मायाभिरगातर. (=पराजय) । तस्य तव मेधिरा विदु । तेषां श्रवांसि (=वैभवानि) उत्तर (=वर्धय) ॥

८. स्तोमा ओजसेशानमिन्द्रमभ्यनाविषु । यस्य रातय. सहस्रमुत वा भूयस्य. सन्ति ॥

हीनें रूपक हे आहे.—'मदत करिते झाले'='आविषु' म्हणजे वलास मारण्याच्या कामीं.

६ ह्या मत्राचा शब्दार्थ उघड आहे तथापि भावार्थ उघड समजत नाही. आम्ही शब्दश अर्थ करून सायणाचार्याप्रमाणेच केला आहे तथापि 'रातिभि' याचा अर्थ 'प्रसादांनी' असा असतां 'प्रसादांकरितां' असा केलेला बरोबर आहे असे दिसत नाही. तसेच तिसऱ्या व चवथ्या चरणाचें तात्पर्य काय आहे तें नीट समजत नाही. सायणाचार्य 'कारव' म्हणजे ऋत्विज असे म्हणतात

एक अर्थ असा समवतो—हे शूरा, तुझ्या प्रसादेंकरून मेघोदकास (जें तू पाडिलेंस म्हणून पूर्वाल मत्रांत सांगितलें त्यास) मी भेटलो, म्हणजे तू मेघ फोडून उदक बाहेर काढिलेस तेव्हां तें मी पाहिले आणि त्यास भेटावयास पुढे आलो (प्रति आयम्) आणि त्याची प्रशसा केली. त्यावेळी दुसरे कवि पण जवळ उभे होते म्हणून त्यास तुझा महिमा समजला.

---

७ हे इंद्रा, तू मायावी शुष्णास मायेनें जिंकिता झालास म्हणून तुला कविजन जाणतात. [वास्तव] त्यांचीं वैभवें वाढीव

८ बळाच्या योगानें प्रभु असा जो इंद्र त्याला [आमच्या या] स्तोत्रांनीं स्तविलें आहे; ज्याच्या कृपा सहस्र अथवा त्याहूनहि अधिक [आहेत]

7. With thy designs thou didst crush the designing S'ushna Therefore the poets know thee Make their fortunes prosper

8 [These our] prayers have praised Indra, the ruler on account of his power, whose favours are thousand or even more

---

७. शुष्ण म्हणून एक असुर होता असें सायणाचार्य म्हणतात शुष्णवध इंद्रानें केला या गोष्टीचा उल्लेख वेदांत बहुत ठिकाणा आला आहे शुष्ण म्हणजे पाणी शोषण करणारा मेघरूपी असुरच असावा – 'वास्तव' म्ह तू शुष्णाला मायेनें (=कपटानें) मारिलें या कारणासाठीं तुझा जो तो शुष्णहननाचा पराक्रम तेणेंकरून तू कविजनांत विख्यात झालास आणि ते तुझी कीर्ति गाऊं लागले

८ 'बळाच्या योगानें प्रभु' = ओजसा ईशानम ' म्हणजे ज्याचें प्रभुत्व उगीच मानलेलें नाहे, पण खरोखर त्याला शक्ति आहे म्हणून त्यास प्रभु असा मानितात

सूक्तम् १२.

ऋषि कण्वपुत्रो मेधातिथिः। अग्निर्देवता। ६ अग्निर्निर्मथ्योग्निराहवनीयश्च। गायत्री च्छन्दः॥

°अग्निं दूतं वृणीमहे होतारं विश्ववेदसम्।
अस्य यज्ञस्य सुक्रतुम्॥ १॥

अग्निम्। दूतम्। वृणीमहे। होतारम्। विश्वऽवेदसम्।
अस्य। यज्ञस्य। सुऽक्रतुम्॥ १॥

अग्निमग्निं हवीमभिः सदा हवन्त विश्पतिम्।
हव्यवाहं पुरुप्रियम्॥ २॥

अग्निम्ऽअग्निम्। हवीमऽभिः। सदा। हवन्त। विश्पतिम्।
हव्यऽवाहम्। पुरुऽप्रियम्॥ २॥

भाषायाम्.

१. [वय] होतारं विश्ववेदसं सुक्रतुमग्निमस्य यज्ञस्य दूतं वृणीमहे॥
२. विशांपतिं हव्यवाहं पुरुप्रियं (=बहुप्रियं) सदाग्निमग्निं हवीमभिरह्वयन्॥

° हा मंत्र गृहमखोल प्रत्यधिदेवतोच्या आह्वानामध्ये अग्नीच्या आह्वानार्थ योजिलेला आहे.

सूक्त १२.

ऋषि, कण्वाचा पुत्र मेधातिथि. देवता, अग्नि. वृत्त, गायत्री.

१. होता, सकलधनसंपन्न [आणि] कुशल अग्नी या [आमच्या] यज्ञाचा दूत [व्हावा असें] आम्ही इच्छितो.

२. अग्नीला आणि अग्नीलाच आह्वनेंकरून सदा बोलावितात; [जो अग्नि] जनांचा प्रभु, हव्य वाहून नेणारा, आणि बहुतास प्रिय [होय]

Hymn 12.

To Agni. By Medhátithi, son of *Kaṇva.* Metre *Gáyatrí.*

1. We choose as the messenger of this sacrifice Agni the invoker the possessor of all riches [and] possessed of great wisdom.

2. Agni and Agni alone they ever invoke with [their] invocations—[Agni] the lord of men, the bearer of oblations [and] dear to many.

---

१. मन्त्राचा भावार्थ असा आहे की, ह्या यज्ञांत जे आम्ही हवि अर्पण करितो ते देवांकडेस पोहचविण्याकरितां आम्ही अग्नीची योजना करितो, अग्नीस आमचा दूत करितो.—होता म्हणजे यज्ञसंपादक एक ऋत्विज याचें नांव होय. अग्नि हा देव आणि मनुष्य यांच्यामध्यें दूतत्व करितो असें अनेक ठिकाणीं वेदांत वर्णिलें आहे.

२ 'अग्नीला आणि अग्नीलाच'= 'अग्निमग्निम्.' नेहमीं अनेक प्रसंगीं अग्नीलाच बोलावितात, दुसऱ्यास बोलावीत नाहींत. ही केवळ अग्नीची प्रशंसा आहे. कारण की, वस्तुतः दुसऱ्या देवांसहि (इंद्र, वायु, इत्यादिकांस) बोलावितात हें सांगावयास नकोच. या प्रकारची प्रशंसा वेदांत पुष्कळ ठिकाणीं येत जाईल. त्याविषयीं येथें सूचना आम्हीं दिली म्हणजे पुरे आहे. कारण की, कृष्णाचें वर्णन कृष्णभक्त करूं लागले म्हणजे कृष्णास सकल देवांपेक्षां उंच, रामाचें वर्णन रामभक्त करूं लागले म्हणजे रामास सकल देवांपेक्षां उच्च, शिवाचे भक्त शिवास सकल देवांपेक्षां उच्च, विठोबाचे भक्त विठोबास सकल देवांपेक्षां उच्च, आणि खंडोबाचे भक्त खंडोबास सकल देवांपेक्षां उच्च करीत असतात हें कोणास ठाऊक नाहीं ?

'आह्वनेंकरून'='हवीमभिः.' म्हणजे अग्नीनें यावें अशा हाका मारून. आह्वन म्हणजे बोलाविणें—'हव्य वाहून नेणारा' देवांकडेस—'बहुतांस प्रिय', पूजकांस.

अग्ने देवाँ इहा वह जज्ञानो वृक्तबर्हिषे ।
असि होता न ईड्यः ॥ ३ ॥
अग्ने । देवान् । इह । आ । वह । जज्ञानः । वृक्तऽबर्हिषे ।
असि । होता । नः । ईड्यः ॥ ३ ॥
ताँ उशतो वि बोधय यदग्ने यासि दूत्यम् ।
देवैरा सत्सि बर्हिषि ॥ ४ ॥
तान् । उशतः । वि । बोधय । यत् । अग्ने । यासि । दूत्यम् ।
देवैः । आ । सत्सि । बर्हिषि ॥ ४॥
घृताहवन दीदिवः प्रति ष्म रिषतो दह ।
अग्ने त्वं रक्षस्विनः ॥ ५ ॥
घृतऽआहवन । दीदिऽवः । प्रति । स्म । रिषतः । दह ।
अग्ने । त्वम् । रक्षस्विनः ॥ ५ ॥
अग्निनाग्निः समिध्यते कविर्गृहपतिर्युवा ।
हव्यवाड् जुह्वास्यः ॥ ६ ॥ २२ ॥
अग्निना । अग्निः । सम् । इध्यते । कविः । गृहऽपतिः । युवा ।
हव्यऽवाट् । जुहुऽआस्यः ॥ ६ ॥ २२ ॥

भाषायाम्.

३. हे अग्ने [त्वं] जज्ञानः (=जातः) [सन्] देवानिह वृक्तबर्हिषे आवह । [त्वं हि] अस्माकमीड्यो होतासि ॥

४. हे अग्ने यस्मात्त्वं दूत्यं यासि [तस्माद्] उशतस्तान्विबोधय । आ[गत्य च] देवैः [सह] बर्हिषि निषीद ॥

५ हे घृताहवन दीदिवन्नग्ने त्वम् [अस्माकं] रक्षस्विनो रिषतः प्रति दहस्म ॥

६. कविर्गृहपतिर्युवा हव्यवाड् जुह्वास्योऽग्निः अग्निना समिध्यते ॥

३. हे अग्नी, तूं उत्पन्न होतांच दर्भासन घालून वाट पाहात बसलेल्या उपासकाजवळ देवाला येथें घेऊन ये. [कारण कीं] तूं आमचा श्लाघ्य होता होस.

४. हे अग्नी, ज्यापेक्षां त्वां दूतपण पतकारिलें आहे [त्यापेक्षां] त्या उत्सुक देवांस जागे कर; [आणि] त्यांसह [या] दर्भासनावर येऊन बैस.

५. हे घृताहवन, देदीप्यमान अग्नी, राक्षसांचा सहवास करून आम्हांस उपद्रव करणाऱ्या [शत्रूं]स तूं जाळून भस्म कर.

६. मेधावी, गृहपति, तरुण, हवि वाहून नेणारा [आणि] ज्वालामुख असा अग्नि अग्नीच्या योगानें पेटविला जावो.

3. O Agni, so soon as thou art born bring hither the gods to the worshipper who has prepared a seat of Kus'as [for thee]. [For thou] art our praiseworthy priest.

4. Awake, Agni, those eager gods, since thou becomest the messenger. With them sit down on the Kus'a-seat.

5. O resplendent Agni, invoked with ghee, burn thou away [our] enemies associating with the devils.

6. By means of Agni is lighted Agni, the wise, the lord of the house, the youthful, the bearer of the oblation, [and] the flame-tongued.

३. 'उत्पन्न होतांच.' म्हणजे तुला आम्ही अरणींत घर्षणाच्या योगानें उत्पन्न करितांच. अग्नीला अरणींत उत्पन्न करीत — 'दर्भासन घालून वाट पाहात बसलेल्या उपासकाजवळ', 'वृक्तबर्हिषे.' पदशः 'दर्भ ज्यानें कापिले (कापून पसरिले) आहेत त्याजकडे'. 'वृक्तबर्हि' हें उपासकाचेंच वाचक झालें आहे.

४. 'जागे कर,' 'विबोधय.' वैदिक युगांतील भाविक जन आळशी नव्हते. ते मोठ्या पहाटेस जागे होऊन अग्नीला प्रदीप्त करीत आणि देवांनाहि त्यानंतर जागे करून त्या पहाटेस हव्यादि पूजा अर्पण करून उपासना करीत. पहाटेस उठून देवांची हव्यादिकांनी उपासना करण्याची चाल उत्तरोत्तर पुढें दिसून येईल — 'उत्सुक', 'उशन.', म्हणजे उठून हवि भक्षण्याविषयीं इच्छा करणारे.

५. 'घृताहवन' म्हणजे तूप अर्पण करून ज्याला बोलावितात तो.

शत्रूचा नाश कर, आम्हांस उपद्रव देणाऱ्यांस नाहींसे कर आणि आम्हांस सुखी कर अशी प्रार्थना वेदांत पुष्कळ भरलेली आहे. ती उत्तरोत्तर पुष्कळ येत जाईल.

कविमग्निमुप स्तुहि सत्यधर्माणमध्वरे ।
देवममीवचातनम् ॥ ७ ॥

कविम् । अग्निम् । उप । स्तुहि । सत्यऽधर्माणम् । अध्वरे
देवम् । अमीवऽचातनम् ॥ ७ ॥

यस्त्वामग्ने हविष्पतिर्दूतं देव सपर्यति ।
तस्य स्म प्राविता भव ॥ ८ ॥

यः । त्वाम् । अग्ने । हविःऽपतिः । दूतम् । देव । सपर्यति ।
तस्य । स्म । प्रऽअविता । भव ॥ ८ ॥

यो अग्निं देववीतये हविष्माँ आविवासति ।
तस्मै पावक मृळय ॥ ९ ॥

यः । अग्निम् । देवऽवीतये । हविष्मान् । आऽविवासति ।
तस्मै । पावक । मृळय ॥ ९ ॥

स नः पावक दीदिवोऽग्ने देवाँ इहा वह ।
उप यज्ञं हविश्च नः ॥ १० ॥

सः । नः । पावक । दीदिऽवः । अग्ने । देवान् । इह । आ । वह ।
उप । यज्ञम् । हविः । च । नः ॥ १० ॥

भाषायाम्.

७ कविं सत्यधर्माणं देवममीवचातनं (=रोगनाशकम्) अग्निमध्वरे उपस्तुहि ॥

८ हे देव अग्ने यो हविष्पतिस्त्वां दूतं सपर्यति तस्यैव [त्वं] प्राविता भव ॥

९. यो हविष्मानग्निं (=हे अग्ने त्वां) देववीतये आविवासति तस्मै हे पावक [त्वं] मृळय ॥

१०. स [त्वं] हे पावक दीदिवन्नग्ने अस्मभ्यं देवानिहास्माकं यज्ञं हविश्चोपावह ॥

६. 'अग्नीच्या योगाने अग्नि पेटवि-ला जातो,' 'अग्निनाग्निः समिध्यते' ह्याचा भावार्थ काय असेल तो नीट समजत नाही. शब्दार्थ स्पष्ट दिसत-च आहे -'गृहपति,' म्हणजे यजमा-नाच्या गृहाचे पालन करणारा असे सायणाचार्य म्हणतात -'ज्वालामुख' अथवा 'ज्वालाजिह्व' ज्वालाच आहे मुख किंवा जिह्वा ज्याची तो.

७ मेधावी, सत्यधर्मा [आणि] अनिष्टनाशक जो देव अग्नि त्याचें यज्ञांत स्तवन कर.

7. Praise in the sacrifice the wise Agni, whose law is correct, the god who destroys disease

८. हे देवा अग्नी, जो हविर्युक्त [उपासक] तुला दूताला पूजितो त्याचाच तू संरक्षणकर्ता हो.

8. O god Agni, be thou the protector of him alone who serves thee with his oblations.

९ जो हविर्युक्त [उपासक] देवांस भोजन पोंहचावें म्हणून अग्नीला पूजितो त्याला, हे पावका, तूं प्रसन्न हो.

9 He who, in order to feast the gods, serves Agni with his oblations,—to him be favourable, O Pâvaka!

१०. म्हणून हे पावका, हे देदीप्यमान अग्नी, तू देवांस येथे आमच्या यज्ञाला आणि आमच्या हवीकडे घेऊन ये.

10 Do thou then, O Pâvaka, O resplendent Agni, bring the gods hither to our sacrifice and to our oblation

---

७. 'सत्यधर्मा', म्ह ज्याची आज्ञा सत्य अथवा सत्यधर्मप्रवर्तक आहे — 'अनिष्टनाशक,' म्हणजे रोगादिकांचा नाश करणारा.

८ भावार्थ असा दिसतो की, जो उपासक अग्नीला हवि अर्पण करून भजतो त्याचेंच त्याणे संरक्षण करावें, इतरांचें म्हणजे अग्नीला हवि अर्पण न करणारे जे अनार्य वगैरे लोक भजत नाहात त्याचें करू नये — 'हविर्युक [उपासक]', 'हविष्पति.' म्हणजे जो हवीचा मालक आहे असा भक्त.

९ या मन्त्रांत प्रथम पादांत अग्नीविषयीं तृतीय पुरुषीं बोलून तृतीय पादांत अग्नीला पावक हें संबोधन करून द्वितीय पुरुषी उच्चार आहे असे प्रयोग वेदांत पुष्कळ ठिकाणीं येत जातील — 'पावक' हे अग्नीचे नांव.

१० 'म्हणून ..तू'='स [त्वम्]' म्हणजे ज्यापेक्षां तुला पुजणाऱ्या हविर्युक्त उपासकाचें संरक्षण तू करितोस आणि त्याला प्रसन्न होतोस त्यापेक्षां.

स नः स्तवान आ भर गायत्रेण नवीयसा ।
रयिं वीरवतीमिषम् ॥ ११ ॥
सः । नः । स्तवानः । आ । भर । गायत्रेण । नवीयसा ।
रयिम् । वीरऽवतीम् । इषम् ॥ ११ ॥
अग्ने शुक्रेण शोचिषा विश्वाभिर्देवहूतिभिः ।
इमं स्तोमं जुषस्व नः ॥ १२ ॥ २३ ॥
अग्ने । शुक्रेण । शोचिषा । विश्वाभिः । देवहूतिऽभिः ।
इमम् । स्तोमम् । जुषस्व । नः ॥ १२ ॥ २३ ॥

भाषायाम्.

११. स [त्वं] नवीयसा [अनेन] गायत्रेण स्तूयमानः [सन्] रयिं वीरवतीमिष [च] अस्मभ्यमाभर (=आनय) ॥

१२. हे अग्ने [त्वं] शुक्रेण शोचिषा विश्वाभिर्देवहूतिभिश्[च] इममस्माकं स्तोमं जुषस्व ॥

११. म्हणून, [हे अग्नी], अगदी नवीन रचलेल्या [या] आमच्या स्तोत्राच्या योगाने स्तविलेला असा तू वैभव [आणि] शूरपुत्रसपन्न सपत्तीतें घेऊन ये.

१२. हे अग्नी, तू [आपल्या] शुद्ध तेजाच्या योगानें [आणि] आम्हीं केलेल्या सकल देवसेवाच्या योगानें हें आमचें स्तोत्र ग्रहण कर.

11 Bring hither then, praised by [this] our newest hymn, prosperity [and] plenty accompanied by valorous progeny

12 O Agni, by virtue of [thy] brilliant splendor [and] by virtue of all [our] invocations of the gods, accept this our hymn

११ हा मत्र दोन कारणांमुळे लक्षांत ठेवण्याजोगा आहे पहिले,–ऋषिजन आपापल्या देवतांची स्तुति करू लागले म्हणजे जुन सूक्त म्हटले तर देवास तादृश प्रिय होणार नाही असे समजून अगदी नवीन रचून सूक्त म्हणत आणि तेणेंकरून स्तुति करीत तशा प्रकारचे हे स्तोत्र आहे दुसरे,–देवापाशी मागावयाच्या वस्तु म्हटल्या म्हणजे मोक्ष, सायुज्य स्थान इत्यादि नहुत्या, तर धन, दौलत, शूर सतति, सपत्ति वगैरे मागत असत याच गोष्टींची आवश्यकता वैदिक युगांत ज्यास्ती होती यांत सशय नाही आणि विशेषकरून शौर्यवान् पुत्रांची तर आवश्यकता फार होती कारण की, आमचे आर्य पूर्वज या देशांत जेव्हां पहिल्याने आले तेव्हां त्यांच्या आसपास अनार्य म्हणजे या देशाचे मूळचे राहिवासी, ज्यांस शानी आपण महार, कोळी गाड, भिल्ल, वगैरे म्हणतो आणि ज्यांस ते दस्यु, कृष्णत्वच् वगैरे म्हणत, ते राहत होते, आणि हे लोक त्यांच्याशीं हमेशा लढत असे वेदावरून दिसतें त्या त्या लढाईत शूर पुत्रांची जरूर फार पडे हें सांगावयास नकोच

१२ मत्राचा भावार्थ असा की, अग्नि परम दैदीप्यमान आहे आणि त्याची सेवा अनेक वेळ या उपासकाने केली आहे, तर ही गोष्ट लक्षांत ठेवून अग्नीने हे स्तोत्र स्वीकारून घ्याव म्हणजे जरी अग्नि आपल्या मोठेपणामुळे उपासकाच स्तोत्र स्वीकारून घेईल न घेईल याविषयीं सशय आहे तथापि उपासकाने अनेक वेळ पूर्वी सेवा व भजन केल आहे त्यापेक्षां त्या गोष्टीकडे लक्ष देऊन हे स्तोत्र गृहण करावं

सूक्तम् १३.

ऋषि कण्वपुत्रो मेधातिथि । आप्रीसूक्तम् । देवता–१ इध्म समिद्धो वाग्नि । २ तनूनपात् । ३ नराशंस । ४ इळ । ५ बर्हि । ६ देवीर्द्वार । ७ उषासानक्ता । ८ दैव्यौ होतारौ प्रचेतसौ । ९ तिस्रो देव्य सरस्वतीळाभारत्य । १० त्वष्टा । ११ वनस्पति । १२ स्वाहाकृतय । गायत्री छन्द ॥

सुसमिद्धो न आ वह देवाँ अग्ने हविष्मते ।
होत पावक यक्षि च ॥ १ ॥

सुऽसमिद्ध । न । आ । वह । देवान् । अग्ने । हविष्मते ।
होत । पावक । यक्षि । च ॥ १ ॥

भाषायाम्

१ हे अग्ने सुसमिद्धस् [त्व] देवानस्माक हविष्मते [यजमानाय] आवह । अपि च हे होत हे पावक तान् यज ॥

सूक्त १३.

ऋषि, कण्वकुळात जन्मलेला मेधातिथि. देवता, १ सुसमिद्ध, २ तनूनपात्, ३ नराशंस, ४ इळा, ५ बर्हि, ६ द्वार, ७ उषा आणि रात्र, ८ प्रचेतस, ९ तीन देवी (सरस्वती, इळा, भारती), १० त्वष्टा, ११ वनस्पति, १२ स्वाहा. वृत्त, गायत्री.

१. हे अग्नी, तूं आतां चांगला पेटला आहेस, तर देवास [या] आमच्या हवि देणाऱ्या [यजमाना]कडेस घेऊन ये, आणि हे होत्या, हे पावका अग्नी, तूं त्यांस पूज.

HYMN 13.

By *Medhâtithi* of the family of *Kanva*. To 1 *Susamiddha*, 2 *Tanûnapât*, 3 *Narâs'amsa*, 4 *Ilâ*, 5 *Barhis*, 6 The *Doors*, 7 *Ushas* and *Night*, 8 *Prachetasau*, 9 The three goddesses (*Sarasvati*, *Ilâ*, and *Bhârati*), 10 *Trashtâ*, 11 *Vanaspati*, 12 *Svâhâ*. Metre *Gâyatri*.

1. Well kindled do thou, Agni, bring the gods hither to our sacrificer, and, O brilliant invoker, sacrifice to them.

---

१. 'हे आप्रीसूक्त' होय. आप्रीसूक्तांत ज्या देवता येतात त्या वर दिल्या आहेत त्यांत. त्यांपैकी 'सुसमिद्ध' हे अग्नीचे विशेषण होय. 'तनूनपात्' हेहि अग्नीचे नांव आहे. त्याप्रमाणेच 'नराशंस'. 'बर्हि' म्हणजे दर्भ. 'द्वार' म्हणजे (ज्या खोलींत यज्ञ करावयाचा तिचीं) दारे, दरवाजे. 'उषा' म्हणजे प्रभात हे प्रसिद्धच आहे. 'सरस्वती' ही नदीरूपी देवता. भारती ही वाग्रूपी देवता 'त्वष्टा' म्हणजे देवांचा सुतार, विश्वकर्मा. 'वनस्पति' म्हणजे वृक्ष अथवा वृक्षापासून झालेलें लांकूड, म्हणजे ज्या खांबास यज्ञपशु बांधावयाचा तो खांब (यूप). आणि 'स्वाहा' हा होमहव्य देतांना उच्चारावयाचा एक उद्गार.

आप्रीसूक्ताचा पशुयज्ञाच्या वेळीं विनियोग करीत होते असे म्हणतात. आप्रीसूक्तांत बहुतकरून ११ ऋचा असतात ऋग्वेदाची दश मंडळें मिळून दहा आप्रीसूक्तें आहेत तीं येणेप्रमाणे.— १.१३; १.१४२; १.१८८; २ ३; ३.४; ५.५; ७२; ९.५; १० ७०, १० ११०. यांचे कर्ते निरनिराळ्या कुळांतील निरनिराळे पुरुष होते. 'आप्री' हें नांव आप्रीसूक्तांत ज्या देवता येतात त्यांस आपणास प्रिय अथवा अनुकूळ करून घेणें हा त्या सूक्तांच्या वक्त्यांचा उद्देश आहे म्हणून पडलें आहे असे म्हणतात. हीं दहा आप्रीसूक्तें अशाप्रकारचीं आहेत कीं, त्यांत वर सांगितलेल्या देवता, वर सांगितलेल्याच क्रमानें बहुतकरून येतात. व त्यांच्या क्र-

मधुमन्तं तनूनपाद्यज्ञं देवेषु नः कवे ।
अद्या कृणुहि वीतये ॥ २ ॥

मधुऽमन्तम् । तनूऽनपात् । यज्ञम् । देवेषु । नः । कवे ।
अद्य । कृणुहि । वीतये ॥ २ ॥

नराशंसमिह प्रियमस्मिन्यज्ञ उप ह्वये ।
मधुजिह्वं हविष्कृतम् ॥ ३ ॥

नराशंसम् । इह । प्रियम् । अस्मिन् । यज्ञे । उप । ह्वये ।
मधुऽजिह्वम् । हविःऽकृतम् ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. हे कवे, हे तनूनपात्, [त्वम्] अद्य नो मधुमन्तं यज्ञं देवानां वीतये तेषु कुरु (=प्रापय) ॥

३. [अहं] प्रियं मधुजिह्वं हविष्कृतं नराशंसमिहास्मिन्यज्ञे उपह्वये ॥

चावा भावार्थहि एकच असतो. आणि विशेष लक्ष्यांत ठेवण्याजोगें इतकें आहे की, ऋग्वेदांत यज्ञास अथवा यज्ञप्रसंगास अनुलक्षून न रचलेलीं अनेक सूक्तें आहेत व त्यांचा यज्ञाशीं वस्तुतः कांहीं संबंध नाहीं, तशीं हीं आप्रीसूक्तें नव्हेत. तीं यज्ञाला अनुलक्षूनच रचलेलीं व यज्ञप्रसंगीं विनियोज्य होत असें स्पष्ट दिसतें.

"तूं आतां चांगला पेटला आहेस"= 'सुसमिद्ध.'. 'सुसमिद्ध' हें वस्तुतः विशेषण आहे व तसेंच समजून आम्हीं भाषांतर केलें आहे. सायणाचार्य 'सुसमिद्धनामक' अग्नि असा अर्थ करितात. तसा केला तरी मूळचा शब्दार्थ सोडण्याचें कारण दिसत नाहीं.—'आमच्या यजमानाकडेस'= 'नो हविष्मते.' सूक्तकर्ता एक कवि अथवा ऋषि होय व यज्ञ करणारा यजमान निराळा. यजमानानें दक्षिणा वगैरे देऊन कामीं लाविलेला ऋषि त्या यजमानाच्या तर्फे अग्नीची स्तुति करीत आहे. अति प्राचीन काळीं यजमान निराळा आणि स्तुति करणारा ब्राह्मण (ऋषि) निराळा असें नसे. जो यज्ञ करी तोच आपल्या तर्फे देवाची स्तुति करी. भटाभिक्षुकांचें आणि श्रोत्री ब्राह्मणाचें प्रयोजन मागाहून पडूं लागलें. पण या आप्रीसूक्तांत वक्ता वेगळा व यजमान वेगळा असें स्पष्ट होतें. त्यावरून हीं आप्रीसूक्तें परम प्राचीन (इतर सूक्तांप्रमाणें) नसावीं असें दिसतें.—'हे होत्या'. अग्नीस होता असें म्हट. त्याचीं उदाहरणें पूर्वीं आलींच आहेत.—'त्यास पूज'. अग्नि येऊन देवांस आपणाबरोबर आणितो आणि त्यांचें यजन (पूजन, हवि इत्यादि देऊन भजन) यजमानासाठीं करितो असें वेदांत अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. अग्नींत टाकिलेलें हवि देवांप्रत पोंहचतें व देवांस अग्नीच प्रसन्न करितो असें मानीत.

२. हे मेधावी तनूनपात् [अग्नी], [हें] आमचें सोमयुक्त हवि देवांनीं भक्षावें ह्मणून तें [तू] आज त्यांजप्रत प्रविष्ट कर.

३. प्रिय, मधुरवचन [आणि] हवि निष्पन्न करणारा जो नराशंस त्याला येथें या [यज्ञां]त मी बोलावितों.

2. O wise Tanûnapât, do thou this day take [this] our oblation accompanied by the sweet Soma to the gods that they may enjoy it.

3. I invoke here in this [sacrifice] Narâs'amsa the beloved, the sweet-tongued [and] the perfector of the oblation.

---

२. 'मेधावी तनूनपात्'='कवितनूनपात्.' तनूनपात् म्हणजे तनूनपात् या नावाचा अग्नि असें सायणाचार्य म्हणतात. तें अग्नीचें एक नांव आहे यांत संशय नाहीं; पण तें कशावरून पडलें हें निश्चयानें सांगवत नाहीं. असें म्हणतात कीं, स्वताहाच्या शरीराचा म्हणजे आपला (तन्वाः) पुत्र म्हणून तनूनपात् होय; कारण अग्नी दुसऱ्यापासून उत्पन्न झालेला नव्हे, स्वताहाच उत्पन्न होतो. पण वस्तुतः काय व्युत्पत्ति असेल ती असो.—'सोमयुक्त'='मधुमन्तं'. म्हणजे मधुर सोमरस ज्याबरोबर अर्पण केला आहे तसें हवि. 'रसयुक्त' असाहि (सायणाचार्यांनीं केलेला) अर्थ होऊं शकेल. मधु म्हणजे सोम असा अर्थ होतो याविषयीं ऋ. १.१५.११ यावरील सायणाचार्यांचें भाष्य पाहा.

3. 'प्रिय' म्हणजे देवांचा आवडता असें सायणाचार्य म्हणतात —'मधुरवचन' म्ह. देवांजवळ जाऊन मधुरवचनांनीं त्यांस प्रसन्न करून मनुष्यांजवळ त्यांस आणणारा —'हवि निष्पन्न करणारा'='हविष्कृतम्' म्हणजे हवि विस्तवावर ठेविल्यानें सिद्ध होतें आणि नंतर देवास अर्पणीय होतें म्हणून.—'नराशंस'. हें अग्नीचें एक नांव होय. परंतु कशावरून पडलें तें निश्चयानें सांगवत नाहीं. "नराणां शंसः"=मनुष्यें ज्याची स्तुति करितात तो असें सायणाचार्य म्हणतात 'नराशंस' हें क्वचित् 'पूषा' या देवास लाविलेलें विशेषण आढळतें. कित्येकांच्या मतें 'नर्यशंह' म्हणून जो झंद (पारसिकांच्या आद्य) भाषेंत शब्द आहे तो आणि हा एकच, आणि मनुष्यांचा राजा असा अर्थ होय दुसरे कित्येक म्हणतात कीं, त्याचा अर्थ 'सर्व मनुष्यांस इष्ट' 'सर्व मनुष्यांनीं वाखाणलेला' असा होतो. मूळ अर्थ कोहा असो, 'नराशंस' म्हणजे अग्नीचें एक नांव अथवा त्याची एक विभूति होय यांत संशय नाहीं.

अग्ने सुखतमे रथे देवाँ ईळित आ वह ।
असि होता मनुर्हितः ॥ ४ ॥
अग्ने । सुखऽतमे । रथे । देवान् । ईळितः । आ । वह ।
असि । होता । मनुःऽहितः ॥ ४ ॥

स्तृणीत बर्हिरानुषग्घृतपृष्ठं मनीषिणः ।
यत्रामृतस्य चक्षणम् ॥ ५ ॥
स्तृणीत । बर्हिः । आनुषक् । घृतऽपृष्ठम् । मनीषिणः ।
यत्र । अमृतस्य । चक्षणम् ॥ ५ ॥

वि श्रयन्तामृतावृधो द्वारो देवीरसश्चतः ।
अद्या नूनं च यष्टवे ॥ ६ ॥ २४ ॥
वि । श्रयन्ताम् । ऋतऽवृधः । द्वारः । देवीः । असश्चतः ।
अद्य । नूनम् । च । यष्टवे ॥ ६ ॥ २४ ॥

भाषायाम्

४ हे अग्ने, ईळितस् [त्वं] सुखतमे रथे देवानावह । [त्वं हि] मनुष्यहितो होतासि ॥

५ हे मनीषिणो [यूयं] घृतपृष्ठं बर्हिरानुषक् स्तृणीत । यत्र [बर्हिषि] अमृतस्य (=अमराणां) चक्षणं (=दर्शनं) [स्यात्] ॥

६. ऋतवर्धका असश्चन्त्यो द्वारो देव्यः अद्य अद्यैव यजनाय विश्रयन्ताम् ॥

४. हे अग्नी, [तूं] स्तविलेला [होत्साता] परम सुखकारक रथात [बसवून] देवास इकडे घेऊन ये. [कारण कीं तू] मनुष्यास हितकारक असा होता आहेस.

4. Agni, being praisec bring thou the gods hithei in the easiest chariot [For thou art a hotri (invoker) favourable to men.

५ हे बुद्धिमंत [ऋत्विजांनो], जे त्यांजवर तूप पसरल्याप्रमाणें मृदु आहेत असे दर्भ जवळ जवळ आथरा, [की] ज्यावर मरणरहित [देवां]चें दर्शन [होईल].

5. Strew, learned priests, the Kus'a grass close, soft as if sprinkled with clarified butter, that we may see the immortal ones thereon.

६. सत्यधर्माची प्रवृत्ति करणाऱ्या [आणि] अप्रतिम अशा द्वार[रूपी] देवी आज, आताच यज्ञ व्हावा म्हणून उघडोत.

6. May the divine Doors the promoters of the sacred rite and without an equal, this day, this very time, be opened that we may sacrifice.

---

४. 'स्तविलेला'='ईळित'. हा जो ईळित शब्द या मन्त्रात आहे त्यावरून हा मन्त्र इळा देवीस अनुलक्षून आहे अशी सूचना समजावयाची —'परमसुखकारक रथात' यावरून इतकें सिद्ध होतें कीं, वैदिक युगांत रथ होते व त्यांत कौशल्य सर्जून सुख होई अशी युक्ति करीत असत. म्हणजे कितीएक सुखकारक व कितीएक हालण्यानें क्लेशकारक होते असें दिसून येतें —'होता' या नांवाचा ऋत्विज् होता याचा अर्थ 'बोलाविणारा.' अग्नीला होता म्हणण्याचें कारण हें कीं, होत्याप्रमाणें तो देवास बोलावितो

५. 'दर्भ'='बर्हि' 'बाह' शब्दाचा उच्चार या मन्त्रांत आला यावरून ही ऋचा बर्हिनामक अग्नीस अनुलक्षून आहे असें सायणाचार्य म्हणतात —'ज्यावर देवांचें दर्शन होईल' म्हणजे ज्यांवर देव येऊन बसतील. यज्ञांत देवास बैठक घालीत ती दर्भांची घालीत व तिजवर तूप शिंपडल्याप्रमाणें ती गुळगुळीत व नरम असे. दर्भांचें आसन घालणें यांत फार आश्चर्य नाहीं कारण अजून तरी गालिचा आंथरणारे लोक थोडेच पण लवाळ्याची अथवा शेंदीच्या पातांची हातरी बसावयास घालणारे पुष्कळ

६ ही ऋचा यज्ञ ज्या खोलीत करीत तिच्या म्हणजे यज्ञशाळेच्या दरवाजाविषयीं आहे —'सत्यधर्माची प्रवृत्ति करणाऱ्या.' म्हणजे दरवाजे उघडल्यावर सत्यधर्मक्रियेस म्ह यज्ञास आरंभ होतो म्हणून आणि यज्ञ हाच (आर्य लोकांचा) सत्यधर्म.—'यज्ञ व्हावा म्ह-

नक्तोषासा सुपेशसास्मिन्यज्ञ उप ह्वये ।
इदं नो बर्हिरासदे ॥ ७ ॥

नक्तोषसा । सुऽपेशसा । अस्मिन् । यज्ञे । उप । ह्वये ।
इदम् । नः । बर्हिः । आऽसदे ॥ ७ ॥

ता सुजिह्वा उप ह्वये होतारा दैव्या कवी ।
यज्ञं नो यक्षतामिमम् ॥ ८ ॥

ता । सुऽजिह्वौ । उप । ह्वये । होतारा । दैव्या । कवी इति ।
यज्ञम् । नः । यक्षताम् । इमम् ॥ ८ ॥

इळा सरस्वती मही तिस्रो देवीर्मयोभुवः ।
बर्हिः सीदन्त्वस्रिधः ॥ ९ ॥

इळा । सरस्वती । मही । तिस्रः । देवीः । मयःऽभुवः ।
बर्हिः । सीदन्तु । अस्रिधः ॥ ९ ॥

भाषायाम्.

७. सुपेशसे (=सुरूपे) नक्तोषसावस्मिन्यज्ञे नो बर्हिरासीदितुम् [अहम्] उपह्वये ॥

८. [अह] तौ (=प्रसिद्धौ) सुजिह्वौ कवी दिव्यौ होतारावुपह्वये । ताव-स्माकमिम यज्ञ यजताम् ॥

९. इळा सरस्वती मही [चेत्येतास्] तिस्रो मयोभुवः (=सुखोत्पादका) अस्रिध (=अहिंसा) देव्यो बर्हिषि सीदन्तु ॥

पून'='पष्टवे.' हें तुमर्थ अव्यय होय. 'पष्टुम्' या ऐवजी. वस्तुत. पष्टुम् हें द्वितीयेचें रूप आहे तसेंच 'पष्टवे' हें चतुर्थीचें होय. अर्थ एकच. तुमर्थ अव्ययाऐवजी पष्टुम्, पष्टवे, पष्टोः आणि पष्टो हीं रूपें वेदांत संभवतात.—'अस्रिम'='असक्षत.'. हा शब्द किंचित् कठिण आहे. सायणाचार्य निश्चयपूर्वक अर्थ करीत नाहींत आम्ही प्रयोगान्तरांत अनुसरून केला आहे.

७. रूपवती ज्या रात्र आणि उषा त्यांस या यज्ञांत [मी] बोलाविलों, [कीं त्यांनीं] येऊन [या] आमच्या कुशासनावर वसावें.

८. सुजिह्व, असे जे ते मेधावी दिव्य दोन होते त्यांस [मी] बोलावितो. ते आमचा हा यज्ञ संपादोत.

९. इळा, सरस्वती [आणि] मही [ह्या] तीन कल्याणकारक [आणि] दुःख न देणाऱ्या देवी कुशासनावर बसोत.

7. I invoke the beautiful Night and Dawn in this sacrifice that they may come and sit on this our Kus'a grass.

8. I invoke those two divine hotris, who are good-tongued [and] wise. May they perform this our sacrifice.

9. May Ilâ, Sarasvatî [and] Mahi, three blissful and unhurting goddesses sit on the Kus'a seat.

---

७. 'रात्र आणि उषा' म्हणजे येथें रात्र आणि उषा यांच्या अभिमानिनी देवी समजावयाच्या, रात्र आणि प्रभात हे काळ समजावयाचे नाहींत असें सायणाचार्य म्हणतात.–' त्यांनीं येऊन वसावें'='आसदे.' 'आसदे' हे चतुर्थ्यन्त तुमर्थे अव्यय आहे. 'यष्टवे' ही जशी पूर्वोक्त ऋचेंत तुमर्थी चतुर्थी आहे तशी आसदे हीहि आहे हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. तात्पर्य असें कीं, रात्र आणि उषा एतद्रूपी देवतांनीं येऊन या दर्भासनावर बसावें म्हणून त्यांस मी बोलावीत आहे.

८ या मन्त्रांत सांगितलेले दोन होते म्हणजे दोन प्रकारचे अग्नी (दैव्यहोतृनामक) असें सायणाचार्य म्हणतात. दुसऱ्या आप्रीसूक्तांवरून पाहतां हे दोघे 'प्रचेतसनामक' दोघे देव होत. ते दोघे म्हणजे अग्नि आणि आदित्य अथवा अग्नि आणि वरुण अथवा वरुण आणि आदित्य होत.–'सुजिह्व' म्हणजे सुवक्ते, गोड बोलणारे.

९. 'इळा'. (इडा) हे अन्नाचे अथवा स्तुतीचें नांव आहे. येथें स्तुतिरूपी देवतेचें नांव होय. 'सरस्वती' म्हणजे नदीविशेष त्याची देवता. 'मही' ह्या शब्दाचा मूळ अर्थ 'मोठी'. परतु ह्या मन्त्रांत तो अर्थ नाहीं. तें एका देवतेचें नांव आहे. अन्य आप्रीसूक्तांत इळा, सरस्वती आणि भारती अशा तीन देवी वर्णिल्या आहेत त्यापेक्षां येथें सांगितलेली मही ही भारतीच घ्यावी कीं काय? सायणाचार्य तर घेतातच. परतु इतर दोन आप्रीसूक्तांत मही ही देवता आली आहे यास्तव ही स्वतंत्र असावी असें दिसतें सायणाचार्य म्हणतात कीं, या तीन देवी म्हणजे अग्नीच्याच वेगवेगळ्या विभूती होत.

इह त्वष्टारमग्रियं विश्वरूपमुप ह्वये ।
अस्माकमस्तु केवलः ॥ १० ॥

इह । त्वष्टारम् । अग्रियम् । विश्वऽरूपम् । उप । ह्वये ।
अस्माकम् । अस्तु । केवलः ॥ १० ॥

अव सृजा वनस्पते देव देवेभ्यो हविः ।
प्र दातुरस्तु चेतनम् ॥ ११ ॥

अव । सृज । वनस्पते । देव । देवेभ्यः । हविः ।
प्र । दातुः । अस्तु । चेतनम् ॥ ११ ॥

स्वाहा यज्ञं कृणोतनेन्द्राय यज्वनो गृहे ।
तत्र देवाँ उप ह्वये ॥ १२ ॥ २५ ॥

स्वाहा । यज्ञम् । कृणोतन । इन्द्राय । यज्वनः । गृहे ।
तत्र । देवान् । उप । ह्वये ॥ १२ ॥ २५ ॥

भाषायाम्.

१० इह अग्रिय विश्वरूप [च] त्वष्टारम् [अहम्] उपह्वये । [स] केवलोऽस्माकमस्तु ॥

११. हे देव वनस्पते [त्व] देवेभ्य [इद] हविरवसृज । [तस्य हविषो] दातुश्चेतन मास्तु ॥

१२. [हे ऋत्विज] यज्वनो गृहे इन्द्राय स्वाहया यज्ञ कुरुत । [अह] तत्र देवानुपह्वये ॥

१०. श्रेष्ठ [आणि] विश्वरूप त्वष्ट्याला [मी] या [यज्ञा]त बोलाविंतों. [तो] सगळा आमचाच होओ

११. हे देवा वनस्पती, तूं हें हवि देवाप्रत प्रविष्ट कर. [या] हविर्दात्या [यजमाना]ची प्रसिद्ध भरभराट होओ.

१२. यजमानाच्या घरीं स्वाहा म्हणून इंद्रासाठीं यज्ञ करा; [मी] तेथें देवास बोलाविंतो.

10 I invoke Tvashtri, the foremost and the multiform, here. May he be wholly ours.

11. Give to the gods, O god Vanaspati, [this] oblation. May the offerer [of it] prosper.

12 Offer a sacrifice to Indra in the house of the sacrificer with [the exclamation] Svâhâ; I invoke the gods thither.

१०. 'त्वष्टा' हा देवाचा सुतार अथवा विश्वकर्मा त्वष्ट्यानें सकल प्राणी निर्माण केले, त्याणे देवांचीं हत्यारें करून दिलीं (उदाहरणार्थ इंद्राचे वज्र), तो देवाचा शिल्पी होय, तो मनुष्यांचीं व जनावरांचीं शरीरें निर्मितो, तो वृद्धि, ऋद्धि, आणि सौंदर्य यांचा दाता होय इत्यादि वेदांत सांगितलें आहे. त्वष्टा आणि सूर्य एकच असे मागाहून मानूं लागले. त्याला या ऋचेंत 'विश्वरूप' असें म्हटलें आहे त्याचें कारण बहुतकरून असें असावें कीं, तो सकळ वस्तूंस रूप (सौंदर्य) देत असतो असें प्रसिद्ध आहे. सायणाचार्य त्वष्टा म्हणजे येथें अग्नीचीच एक विभूति असें म्हणतात — 'तो सगळा आमचाच होओ' म्ह. तो इतर उपासकांकडे न जाओ. त्याची पूर्ण कृपा आम्हांवर, इतरांवर न होओ असें जेव्हां म्हणावयाचें असतें तेव्हां वैदिक ऋषि 'तो सगळा आमचाच होओ' असा सुंदर प्रयोग करितात

११. 'देवा वनस्पती'. हा वनस्पति म्हणजे यूप म्हणून जो लाकडाचा खांब पशूस बांधण्याकरितां असतो तो होय. पण तो खांब झाला तरी अग्नीचीच एक विभूति होय असें सायणाचार्य म्हणतात. यज्ञशालेच्या दरवाजांवर जसें देवत्व आरोपिलें तसाच या यूपावर देवत्वाचा आरोप केला आहे. यज्ञाला जीं जीं उपकरणें लागत तीं तीं सर्व यज्ञसिद्धीस अवश्य आहेत असें समजून त्यांस देव असें कल्पून त्यांस सूक्तें गोंविलें आहे.

१२. 'स्वाहा म्हणून'. 'स्वाहा' शब्द वेदांत क्रियाविशेषणार्थी आढळतो. जर मूळशब्द आकारान्त असेल तर येथें 'स्वाहया' ऐवजी तृतियेचें रूप समजलें पाहिजे. यज्ञहवि अर्पण करितांना 'स्वाहा' असें जें म्हणतात तोच हा शब्द सायणाचार्य येथें स्वाहा म्हणजे एक अग्नीचीच विभूति असें म्हणतात.

या आप्रीसूक्तांत विशेष इतकें लक्षांत ठेवण्याजोगें आहे कीं, त्यांतील प्रत्येक ऋचेंत वेगवेगळी देवता सांगितली आहे. आणि फार प्राचीन जीं सूक्तें ऋग्वेदांत आहेत त्यांतीलसें हें केवळ भक्तिद्योतक स्तवनाचें सूक्त नव्हे तर यज्ञाच्या संबंधानें रचलेलें आहे.

सूक्तम् १४.

ऋषिः कण्वपुत्रो मेधातिथिः । विश्वे देवा देवता । गायत्री च्छन्दः ॥

ऐभिरग्ने दुवो गिरो विश्वेभिः सोमपीतये ।
देवेभिर्याहि यक्षि च ॥ १ ॥

आ । एभिः । अग्ने । दुवः । गिरः । विश्वेभिः । सोमऽपीतये ।
देवेभिः । याहि । यक्षि । च ॥ १ ॥

आ त्वा कण्वा अहूषत गृणन्ति विप्र ते धियः ।
देवेभिरग्न आ गहि ॥ २ ॥

आ । त्वा । कण्वाः । अहूषत । गृणन्ति । विप्र । ते । धियः ।
देवेभिः । अग्ने । आ । गहि ॥ २ ॥

भाषायाम्.

१. हे अग्ने एतैर्विश्वैर्देवैः [साकम्] [अस्माकं] दुव (=परिचर्या) गिरः (=स्तुतीश्) [च प्रति] सोमपीतये आयाहि । [तान्] यज च ॥

२. हे विप्र कण्वास्त्वामाह्वयन्ति । [ते] तव धियः (=त्वयि या परिचर्या-धियस्ता) गृणन्ति । हे अग्ने त्वं देवैः [सह] आगच्छ ॥

सूक्त १४.

ऋषि आणि वृत्त, पूर्ववत्. देवता, विश्वेदेव.

१. हे अग्ने, [आमची जी ही] सेवा [आणि हीं] स्तोत्रें त्यांजप्रत त्या विश्वे देवासहवर्तमान सोमपानार्थ ये आणि यज्ञ पूर्ण कर.

२. [हे अग्ने] कण्वानीं तुला ही हाक मारिली आहे; हे मेधावी [अग्ने], ते तुझ्या विषयींच्या भक्तींचा घोष करीत आहेत; हे अग्ने, तूं देवासहवर्तमान येथें ये.

HYMN 14.

To the Vis've Devas Author and Metro as before

1. With those Vis've Devas come hither, Agni, to our service [and] prayers for drinking Soma, and perform the sacrifice.

2. The Kanvas are invoking thee; wise Agni, they are singing forth their pieties towards thee; come hither, Agni, with the gods.

---

१. 'विश्वेदेव' याचा पदशः अर्थ सकळ देव. पण देवांचा वर्गविशेष या अर्थी 'विश्वेदेव' याचा प्रयोग आढळतो याविषयीं सूक्त तीन ३. ऋ. ७ यावरील टीप पाहा (पृष्ठ १८)

मन्त्राचा भावार्थ असा कीं, अग्निनें विश्वेदेवांस घेऊन यावें आणि त्यांचें यजन करावें येण्याचें प्रयोजन सोमपान करणें हें होय — 'यज्ञ पूर्ण कर' म्हणजे मानवी होता जसा यज्ञ संपादितो तसा अग्निनें येऊन यज्ञ संपादावा. यज्ञ संपादण्याची शक्ति अग्नीस असल्याविषयीं पूर्वीं आलेंच आहे.

२. 'कण्वांनीं तुला ही हाक मारिली आहे.' असें दिसून येतें कीं, जो कवि अथवा ऋषि सूक्त रची आणि गाई त्याजबरोबर त्याच्या कुटुंबांतील सगळीं माणसें तें सूक्त गात. आणि तें सूक्त ऋषीनें (म्हणजे कवीनें) जर एकट्यानें गाइलें तर तें तो आपल्या कुटुंबाच्या तर्फे गातो अशी समजूत असे. म्हणजे ख्रिस्ती लोकांमध्यें जशी कुटुंबातील सर्व माणसें एकत्र जमून प्रार्थना करितात तशी करण्याची चाल प्राचीन आर्य लोकांत होती. आणि कोणत्याहि ऋषीनें सूक्तें रचिलीं तरी तीं त्याच्या कुटुंबातील वंशज मागाहून आपलीं सूक्तें आहेत असें समजून म्हणत असत. तूर्त काठेवाडांत व दुसऱ्या आर्यप्रदेशांत भाटांनीं रचिलेली कविता प्रत्येक रजपूत कुळांत पुरातन काळापासून चालत आलेली ती आपली स्वतःचीच असें समजून गात असतात. व जर एखादें घराणें पुस्तक अथवा दागिना घराच्या बाहेर देण्यास लोक नाखुष असतात तद्वत् ती कविता बाहेर जाऊं देत नाहींत. त्याप्रमाणेच ऋग्वेदसूक्तांची अवस्था प्राचीनकाळीं होती. ज्यांच्या पूर्वजां

इन्द्रवायू बृहस्पतिं मित्राग्निं पूषणं भगम् ।
आदित्यान्मारुतं गणम् ॥ ३ ॥

इन्द्रवायू इति । बृहस्पतिम् । मित्रा । अग्निम् । पूषणम् । भगम् ।
आदित्यान् । मारुतम् । गणम् ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. [अहम्] इन्द्रवायू बृहस्पतिं मित्रेण [सहितम्] अग्निं पूषणं भगमादित्यान्मारुतं गणं [च] [ह्वये] ॥

ऋषींनीं स्तोत्रें रचिलीं त्याच्या त्याच्या कुटुंबांत व मागाहून वंशांत तीं तीं स्तोत्रें गात आणि प्रार्थना करीत. नंतर कांहीं काळानें हा सर्व सूक्तें एकत्र करून त्यांची संहिता (वेदव्यासानें?) केली तेव्हां हीं ऋग्वेदाचीं सूक्तें अशाच असंहितस्थितींत होतीं.

म्हणून ह्या सूक्ताचा कर्ता मेधातिथि एकटाच होता तरी तो कण्वकुळांतील असल्यामुळें त्याच्या कुळांतील लोक त्याजबरोबर प्रार्थनेस बसले होते असें समजलें पाहिजे.–'घोष करीत आहेत' म्हणजे हें प्रस्तुत सूक्त म्हणून.–'देवांसहवर्तमान ये.' अग्नि इतर देवांस घेऊन येतो आणि अर्पण केलेलें हविरन्न त्यांजकडून खाववितो, अथवा त्यांस न आणितां तें अन्न घेऊन जातो आणि देव असतील तेथें पोहचवितो अशी प्राचीन आर्यजनांची समजूत इतकी प्रसिद्ध आहे कीं, ती जिकडे तिकडे वेदमंत्रांत व्यापून आहे.

३. इंद्र, वायु, बृहस्पति, मित्र, अग्नि, पूषा, भग, आदित्यगण [आणि] मरुद्गण यांस [मी बोलावितों].

3. [I invoke] Indra, Vâyu, Brihaspati, Mitra, Agni, Pûshan, Bhaga, the Âdityas and the host of the Maruts.

३. 'बृहस्पति' म्हणजे 'प्रार्थनेचा अथवा स्तुतीचा प्रभु' ही एक देवता होय, आणि ती वेदांत मोठी महत्त्वाची आहे. बृहस्पति हा मनुष्यांनी देवांला अर्पण केलेली स्तुति अथवा प्रार्थना सफल करितो त्यालाच वाचस्पति आणि ब्रह्मणस्पति (ब्रह्मण =स्तुतीचा, पति='प्रभु') असेंहि नांव आहे. तो देवभक्तांचा कनवाळू आणि भक्तिरहित नास्तिकांपासून त्यांचें संरक्षणकर्ता असें वर्णिलें आहे. तो देवांप्रत केलेल्या स्तुतीचा प्रभु असल्यामुळे त्यास देवांचा पुरोहित असें म्हणतात आणि यावरूनच त्याला मागाहून इंद्रादि देवांचा गुरु मानिला आहे, आणि तो मोठा वक्ता आहे असें पुराणांत वगैरे प्रसिद्ध झालें आहे दैत्यांचा गुरु शुक्र आणि देवांचा बृहस्पति असें पुराणादिकांत जें सांगितलें आहे व त्या संबधानें ज्या कथा वर्णिल्या आहेत त्यांचें बीज वेदांत बृहस्पतीविषयीं जें सांगितलें आहे त्यांत आहे -'पूषा' हीहि वेदामध्यें एक बरीच महत्त्वाची देवता होय पूषा म्हणजे पोषणाची, अभिवृद्धीची व भरभराटीची देवता तो अन्नाचा प्रभु (इळस्पति) आहे, त्याच्या घरीं अन्न भरलेलें आहेत, त्याजजवळ सर्व विपुल आहे (विश्ववेदा, पुरुवसु), तो देवांस घेऊन येतो व मनुष्यांचें रक्षण करितो तो प्रकाश घेऊन येतो, तो सकळ जनांस पाहतो, तो सोन्याच्या तारवांतून समुद्रावर व अंतरिक्षांत चालतो, त्याच्या मागून त्याच्या मार्गानें सूर्य व तारे जातात, तो मनुष्यांचे मार्ग सुरक्षित ठेवणारा होय, इत्यादि त्याविषयीं वेदांत वर्णिलें आहे. तें मागाहून उत्तरोत्तर येत जाईल - 'भग' हाहि एक वैदिक देव आहे. तो अदितीचा मुलगा आणि कल्याणाचा दाता. उषा ही त्याची बहीण होय. असें वेदांत सांगितलें आहे -'आदित्य.' आदित्यशब्दाचा अक्षरशः अर्थ 'अदितीचे पुत्र' असा आहे. पण ते किती आहेत व त्यांचीं नांवें काय हे निश्चयानें सांगवत नाहीं केव्हां केव्हां एकट्या वरुणासच आदित्य असें म्हटलें आहे. मित्र आणि वरुण यांसच केव्हां केव्हां आदित्य म्हटलें आहे इतर ठिकाणीं वरुण, मित्र आणि अर्यमा यांस तें नांव दिलें आहे, अथवा त्यांजबरोबर इंद्र हा चौथा आदित्य गणिला जातो. केव्हां केव्हां पांच आदित्य सांगितले आहेत, ते सविता, भग, वरुण, मित्र आणि अर्यमा. इतर ठिकाणीं सहा सांगितले आहेत ते मित्र, अर्यमा, भग, वरुण आणि दक्ष. क्वचित् ते सात आहेत असाहि उल्लेख आहे व आठांचाहि उल्लेख आहे. 'वसु' म्हणून जे देवविशेष वेदांत सांगितले आहेत त्यांजबरोबर यांचा उच्चार फारकरून येतो - 'मरुद्गण' पुढीं ६ व्या सूक्तांत ५ व्या ऋचेवरची टीप पाहा (पृष्ठ ४०)

प्र वो भ्रियन्त इन्दवो मत्सरा मादयिष्णवः ।

द्रप्सा मध्वश्चमूषदः ॥ ४ ॥

प्र । वः । भ्रियन्ते । इन्दवः । मत्सराः । मादयिष्णवः ।

द्रप्साः । मध्वः । चमूऽसदः ॥ ४ ॥

ईळते त्वामवस्यवः कण्वासो वृक्तबर्हिषः ।

हविष्मन्तो अरङ्कृतः ॥ ५ ॥

ईळते । त्वाम् । अवस्यवः । कण्वासः । वृक्तऽबर्हिषः ।

हविष्मन्तः । अरम्ऽकृतः ॥ ५ ॥

भाषायाम्

४. [हे देवा] [इमे] मत्सरास् (=तृप्तिकरा) मादयिष्णवो द्रप्सा मधुरा-श्चमूषद (=पात्रस्थिता) इन्दवो युष्मभ्य प्रभ्रियन्ते ॥

५ [हे अग्ने] त्वामवस्यवो वृक्तबर्हिषो हविष्मन्तोलङ्कर्तार कण्वा ईडते ॥

४. [हे देव हो], हे जे पात्रांत घातलेले संतोषकारक, माद उत्पन्न करणारे, थपथप गळणारे, गोड सोमरस ते तुम्हास अर्पण केले आहेत.

५. [हे अग्नी], [तुझ्या] कृपेविषयीं उत्सुक, [तुझ्यासाठीं] कुशासन पसरून सिद्ध असलेले, हवि घेऊन तयार असलेले आणि परिचर्यायुक्त [असे] कण्व तुजप्रत स्तवीत आहेत.

4. To you are offered, ye gods, [these] Somas standing in the cup, that are agreeable, intoxicating, falling in drops, [and] sweet.

5. [Agni], the Kaṇvas, desirous of [thy] favour, ready with the seat of the Kus'a grass, carrying the sacrificial oblation, [and] prepared to sacrifice, are [thus] praising thee.

---

४. वर तिसऱ्या ऋचेत जे देव सांगितले व पहिल्या आणि दुसऱ्या ऋचांत जे देव सांगितले त्यांस या चवथ्या ऋचेंत सोम अर्पण केले आहेत. ही ऋचा लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. तींत सोमाचे कितीएक प्रसिद्ध गुण वर्णिले आहेत. एक तर सोमरस 'मत्सर' म्हणजे हर्षकारक, किंवा संतोषकारक होत. पण इतकेच नव्हे, तर ते 'मादयिष्णु' म्हणजे माद आणणारे, अमल चढे असें करणारे शिवाय ते 'द्रप्स' म्हणजे थपथप गळणारे, व तेणेकरून पानाची इच्छा उत्पन्न करणारे. सोम गाळतांना खालीं भांडें (चमस=प्याला) ठेविलें म्हणजे त्यांत ते गळत म्हणून 'द्रप्स' असे त्यास म्हटले आहे. त्याशिवाय सोमरस हे मधुर, गोड ('मधु') होते, आणि ते प्याल्यांत घातलेले आहेत ते देवांस दिसतच आहेत. यावरून या सोमरसाचें स्वरूप व त्याची मातबरी किती होती ते सहज दिसून येते. 'माद आणणारे' हा सोमाचा गुण वेदामध्यें प्रसिद्ध आहे आणि देवांस सोमरस अर्पण करितांना बहुतकरून हा सोम मादकारक आहे यास्तव तुम्ही प्या अशी प्रार्थना उपासक करीत होते असें अनेक ऋचांवरून दिसून येतें. आधुनिक मद्यपी आधुनिक मद्याची प्रशंसा यापेक्षा चांगली करूं शकेल?

५. 'कण्व तुजप्रत स्तवीत आहेत.' म्हणजे कण्वकुळांत उत्पन्न झालेले आम्ही स्तवीत आहों, यास्तव तूं ये. देवांस आळविण्याची आणि प्रसन्न करून घेण्याची उत्सुकता प्राचीन आर्यजनांची कशी होती ते या ऋचेवरून दिसून येते.

घृतपृष्ठा मनोयुजो ये त्वा वहन्ति वह्नयः ।
आ देवान्त्सोमपीतये ॥ ६ ॥ २६ ॥

घृतऽपृष्ठाः । मनःऽयुजः । ये । त्वा । वहन्ति । वह्नयः ।
आ । देवान् । सोमऽपीतये ॥ ६ ॥ २६ ॥

तान्यजत्रॉ ऋतावृधोग्ने पत्नीवतस्कृधि ।
मध्वः सुजिह्व पायय ॥ ७ ॥

तान् । यजत्रान् । ऋतऽवृधः । अग्ने । पत्नीऽवतः । कृधि ।
मध्वः । सुऽजिह्व । पायय ॥ ७ ॥

ये यजत्रा य ईड्यास्ते ते पिबन्तु जिह्वया ।
मधोरग्ने वषट्कृति ॥ ८ ॥

ये । यजत्राः । ये । ईड्याः । ते । ते । पिबन्तु । जिह्वया ।
मधोः । अग्ने । वषट्ऽकृति ॥ ८ ॥

भाषायाम्

६ [हे अग्ने] ये घृतपृष्ठा मनोयुजो वह्नयो (=वाहास्) त्वां वहन्ति [तैः] देवान् सोमपानार्थमा[वह] ॥

७ हे अग्ने यजनीयान्सत्यवर्धकांस्तान्पत्नीसहितान्[अत्र] स्थापय। हे सुजिह्व [तान्] मधु (=सोम) पायय [च] ॥

८ हे अग्ने ये [ये] यजनीया ये [ये] ईड्या (=स्तवनीयास्) ते [ते] [सर्वे देवा] वषडित्युक्ते सति तव जिह्वया मधु पिबन्तु ॥

६. [हे अग्नी], जे [तुझे] मृदु आणि नरम पाठीचे घोडे, [तुझ्या] मनात [संकल्प] येताच जुपले जाणारे असे, तुला वाहून नेत असतात [त्याच्या योगें करून] देवास सोम पिण्याकरिता येथें [आण].

७. हे अग्नी, त्या यजनीय [आणि] यज्ञवर्धक [देवा]स त्याच्या पत्नींसहित घेऊन ये; [आणि] हे सुजिह्व [अग्नी], [हा] मधुर सोमरस त्यास पाज.

८. हे अग्नी, जे [जे म्हणून] यजनीय [आणि] जे [जे] स्तुत्य [असतील] ते [ते सकल देव] [हा] मधुर सोमरस, वषट् असें म्हणताच, तुझ्या जिह्वेनें पिओत.

6. [By means of] the horses which have backs as soft and smooth as clarified butter [and] which, harnessing themselves promptly according to thy wish, carry thee, [bring thou] hither, [Agni], the gods to drink the Soma.

7. Put here with their wives those adorable gods that promote the sacrifice and, sweet-tongued [Agni], make them drink of the sweet Soma.

8. Whatever [the gods], Agni, that deserve to be sacrificed to [and] whatever [the gods] that deserve to be praised, may they drink of the sweet Soma with thy tongue, so soon as Vashat is pronounced

६. 'मृदु आणि नरम पाठीचे'= 'घृतपृष्ठ' पदश. अर्थ, तुपाप्रमाणे [गुळगुळीत आणि नरम] आहे पाठ ज्यांची — 'तुझ्या मनात येतांच जुपले जाणारे'= 'मनोयुज.'. म्हणजे त्यास हातानें जुपावे लागत नाहीं. जुपण्याचा संकल्प तुझ्या मनात आला कीं ते तत्क्षणीच जुपले जातात. मंत्राचा भावार्थ असा आहे का, तुझे सुंदर जे घोडे तूं त्यास जोडीत असतोस आणि जे तुझा रथ ओढीत असतात ते तूं आपल्या रथास जोडून त्यांना देवांस बसीव आणि त्यांस इकडे घेऊन ये.

७ 'यज्ञवर्धक'='ऋतावृध'. ऋत- वृध् याचा अर्थ बहुतकरून सत्यधर्मापासून म्हणजे यज्ञापासून आनंद पावणारे, यज्ञाच्या योगानें सुख पावणारे असा निरय होत असतो. सायणाचार्य यज्ञवर्धक असा अर्थ करितात तो संभवत नाहीं असें दिसत नाहीं. यास्तव तो येथें आम्हीं घेतला आहे. परंतु यज्ञानें तुष्ट होणारे यजत्र असा अर्थ केल्यास चांगला — 'घेऊन ये'='कृधि. अभरद्', 'ठेव' 'येथें ठेव.' हा-ते 'वषट्-कृति' पद [illegible] हे [illegible] शब्द आमच्या मनास [illegible] असेल. [illegible] १३ व्या सूक्ताच्या २ ऱ्या मंत्रांत कृपाचा प्रयोग असाच

आकीं सूर्यस्य रोचनाद्विश्वान्देवाँ उषर्बुधः ।
विप्रो होतेह वक्षति ॥ ९ ॥
आकीम् । सूर्यस्य । रोचनात् । विश्वान् । देवान् । उषःऽबुधः ।
विप्रः । होता । इह । वक्षति ॥ ९ ॥
विश्वेभिः सोम्यं मध्वग्न इन्द्रेण वायुना ।
पिबा मित्रस्य धामभिः ॥ १० ॥
विश्वेभिः । सोम्यम् । मधु । अग्ने । इन्द्रेण । वायुना ।
पिब । मित्रस्य । धामऽभिः ॥ १० ॥
त्वं होता मनुर्हितोऽग्ने यज्ञेषु सीदसि ।
सेमं नो अध्वरं यज ॥ ११ ॥
त्वम् । होता । मनुःऽहितः । अग्ने । यज्ञेषु । सीदसि ।
सः । इमम् । नः । अध्वरम् । यज ॥ ११ ॥

भाषायाम्.

९ विप्रो होता [अग्निः] उषर्बुधो विश्वान् देवान्सूर्यस्य रोचनात् (=दीप्तप्रदेशाद्) अत्रावहतु ॥

१० हे अग्ने [त्वं] विश्वै[देवैः सह] इन्द्रेण वायुना मित्रस्य धामभि[विभूतिभिश्च सह] मधुरं सोमं पिब ॥

११ हे अग्ने मनुर्हितो होता त्वं यज्ञेषु [नि]षीदसि । स [त्वम्] अस्माकमिममध्वरं यज ॥

केला आहे तो पाहा—'सुजिह्व' म्हणजे चांगली जिव्हा अथवा वचन, वाणी आहे ज्याची तो

८ ही ऋचा फार चमत्कारिक आहे. १ त्या ऋचेत अग्नीस 'विश्वे देवांला' आणण्याविषयी प्रार्थना झाली २ त्या ऋचेत साधारण रीतीने 'देवांस' घेऊन ये म्हणून सांगतले ३ त्या ऋचेत इंद्र, वायु, बृहस्पति, मित्र, पूषा, भग आदित्यगण आणि मरुद्गण हे जे मुख्य देव त्यांचा विशेष निर्देश करून त्यास मी बोलाविलो असे ऋषि म्हणाला. ७ त्या ऋचेत वर सांगितलेल्या सगळ्या देवांच्या नायका पण आण असे सांगितले इतके झाले तरी ऋषीच्या मनात शंका राहिली का, न जाणो याच्या बाहेरहि कांहीं देव व देवी राहिल्या असतील, व ते मधुर सोमाला चुकतील यास्तव म्हणतो का, जे जे म्हणून पूजनीय, यजनीय, आणि स्तवनीय देव असतील ते सगळे येऊन हा सोम पिओत. आता यानंतर दुसरे राहिलेच नाहीत यांत संशय नाही

वषट् (किंवा वौषट्) हा एक ओम् आणि स्वाहा शब्दाप्रमाणेच परम गूढ आणि संदिग्ध अर्थाचा शब्द आहे याज्येच्या अंती त्याचा उच्चार होताच केल्यावर अध्वर्यूने हवि अग्नींत टाकावं असा नियम आहे

९. विद्वान् होता [असा जो अग्नि तो] प्रातःकाळीं जागृत होत असणाऱ्या विश्वे देवास सूर्यप्रकाशित स्वर्लोकाहून येथे घेऊन येओ.

9. May the learned priest Agni bring hither from the region of solar light the Vis've Devas (*All the Gods*) that awake with the dawn

१० हे अग्नी, तूं विश्वेदेव, इंद्र, वायु [आणि] मित्राच्या विभूती यांसहवर्तमान [हे] सोमाचे मधुर पेय पी.

10. With the Vis've Devas with Indra, Vâyu, and, with the forms of Mitra, drink thou, Agni, this sweet drink of Soma.

११. हे अग्नी, मनुष्यांस हितकारक असा तू होता यज्ञामध्ये बसत असतोस; तर तू हा आमचा यज्ञ संपाद.

11. Thou, Agni, sittest in the sacrifices an invoker beneficent to men Do thou, therefore, perform this our sacrifice.

---

९. '*प्रातःकाळी जागृत होत असणाऱ्या.*' असे लक्ष्यांत ठेविले पाहिजे की, आधुनिक आर्यजनासारिखे प्राचीन आर्यजन आळशी व उशीर होईपर्यंत बिछान्यावर पडून राहणारे नव्हते. ते मोठ्या पहाटेस उठून देवयजन करीत. त्याप्रमाणे हें सूक्तहि मोठ्या पहाटेस म्हणत आहेत असें कल्पिलें पाहिजे. आपण पहाटेस उठून यजन करीत आहों, पण देव उठले असतील की नाहीं अशी ऋषीस प्रथम शंका आली म्हणून म्हणतो की, देव प्रातःकाळी जागृत होणारे आहेत — 'विश्वे देवास' याचा 'सकलदेवास' असाहि अर्थ केल्यास चालेल. पण सूक्त ३ ऋ. ७ यावरील टीप १८ व्या पृष्ठावर पाहा.

१०. 'विश्वे देव' सूक्त ३ ऋ. ७ यावरील टीप १८ व्या पृष्ठावर पाहा — '*मित्राच्या विभूती*'='मित्रस्य धामभिः'. धाम याचा अर्थ गण असा येथे कोणी करितात. आम्ही सायणास अनुसरून अर्थ केला आहे. मित्राच्या विभूती म्हणजे पूषा, भग, सविता, सूर्य ह्या असाव्या. — 'सोमाचें मधुर पेय'=सोम्य मधु=मधुं सोमम् अग्नीने येऊन देवांसहित सोम प्यावा म्हणून ऋषि कशी विनवणी करीत आहे ते पाहा.

११. '*मनुष्यांस हितकारक*'=मनुर्हित.'. म्ह. देवांस मर्त्य जनांच्या यज्ञाप्रत बोलावून आणून तेणेंकरून हित करणारा — 'बसत असतोस'. साधारण मानवी होता बसत असतो तसा — 'आमचा', म्ह. कण्वांचा.

युक्ष्वा ह्यरुषी रथे हरितो देव रोहितः ।
ताभिर्देवाँ इहा वह ॥ १२ ॥ २७ ॥

युक्ष्व । हि । अरुषीः । रथे । हरितः । देव । रोहितः ।
ताभिः । देवान् । इह । आ । वह ॥ १२ ॥ २७ ॥

भाषायाम्.

१२ [हे अग्ने] [त्वम्] अरुषी रोहितो हरितो (=वडवा) रथे युङ्क्ष्व हि । ताभिर्देवानिह आवह ॥

सूक्तम् १५.

ऋषि. कण्वपुत्रो मेधातिथि । देवता—१ ऋतव । २ मरुत । ३ त्वष्टा । ४ अग्नि । ५ इन्द्र । ६ मित्रावरुणौ । ७-१० द्रविणोदा. । ११ अश्विनौ । १२ अग्नि । गायत्री चन्द ॥

इन्द्र सोम पिब ऋतुना त्वा विशन्त्विन्दवः ।
मत्सरासस्तदोकस ॥ १ ॥

इन्द्र । सोमम् । पिब । ऋतुना । आ । त्वा । विशन्तु । इन्दवः ।
मत्सरासः । तत्ऽओकसः ॥ १ ॥

भाषायाम्.

१ हे इन्द्र [त्वम्] ऋतौ सोम पिब । मत्सरास् (=तृप्तिकरास्) तदोकस इन्दव (=सोमबिन्दवस्) त्वामाविशन्तु ॥

१२. हे देवा [अग्ने], पिवळ्या [आणि] लाल घोड्या तूं [आपल्या] रथास जोडच [आणि] त्याच्या योगेंकरून देवास इकडे घेऊन ये.

12. Do thou, god Agni, harness thy tawny [and] red mares to [thy] chariot [and] bring hither the gods by means of them.

१२. 'पिवळ्या'=अरुषी.'. सायणाचार्य जाणारी, चपळ, असा अर्थ करितात आणि 'हरितः' (घोड्या) याचा 'नेण्यास समर्थ' असा धात्वर्थास अनुसरून अर्थ सांगतात.

ह्या अग्नीच्या घोड्या कोणी ज्याला असाच्या असें म्हणण्यास सबळ कारणे आहेत.

देवांस आणण्याविषयीं अग्नीची किती प्रकारें आणि किती वेळ विनवणी झाली तें लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे. घोड्यावरून, रथांतून आणि शेवटा घोड्या जोडून देवांस घेऊन ये असें ऋषि म्हणतो.

सूक्त १५.

ऋषि आणि वृत्त, पूर्ववत्. देवता-१ ऋतु, २ मरुत्, ३ त्वष्टा, ४ अग्नि, ५ इंद्र, ६ मित्रावरुण, ७-१० द्रविणोदा, ११ अश्वी, १२ अग्नि.

१. हे इंद्रा, तूं योग्य काळीं सोम पी. [सोमरसाचे] तृप्तिदायक विंदु तुझ्या उदरांत, तेंच त्याचे घर असल्याप्रमाणें, रिघोत.

Hymn 15.

Author and Metre as before. To the *seasons* (1), The *Maruts* (2), *Twashtri* (3), *Agni* (4), *Indra* (5), *Mitrávarunau* (6), *Dravinodás* (7-10), The *As'vins* (11), *Agni* (12).

1. Indra, drink the Soma in season. May the gratifying drops [of Soma] enter thy stomach as if that were their home.

१. अनुक्रमणिकेप्रमाणे पहिल्या ऋचेची देवता 'ऋतव' म्हणजे वसन्तादि ऋतु होत. पण तसें म्हणण्यास येथें 'ऋतुना'. हा शब्द आला आहे याशिवाय दुसरें कारण कांहीं नाहीं. वस्तुत या ऋचेची देवता इंद्रच समजावयाची

'योग्यकाळीं'='ऋतुना.' म्हणजे अर्पण करण्यास योग्य असा जो काळ आम्ही समजतों आणि ज्या तशा काळीं आम्ही सोम अर्पण करितों त्या काळी पी. पिण्यास अवकाश कर नकोस – 'तेंच त्याचें घर असल्याप्रमाणें'. हे शब्द ('तदोकसः') फार चमत्कारिक

मरुत॑: पिब॑त ऋतुना॑ पोत्राद्यज्ञं पु॑नीतन ।
यूयं हि ष्ठा सु॑दानवः ॥ २ ॥
मरु॑तः । पिब॑त । ऋतुना॑ । पोत्रात् । यज्ञम् । पुनीतन ।
यूयम् । हि । स्थ । सुऽदानवः ॥ २ ॥
अभि यज्ञं गृ॑णीहि नो ग्नावो॑ नेष्टः पिब॑ ऋतुना॑ ।
त्वं हि र॑त्नधा असि ॥ ३ ॥
अभि । यज्ञम् । गृणीहि । नः । ग्नावः । नेष्टरिति । पिब॑ । ऋतुना॑ ।
त्वम् । हि । रत्नऽधाः । असि ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. हे मरुतः [यूयम्] ऋतौ पोत्रात् [सोम] पिबत । यज्ञं पुनीत । यूयं हि सुदानवः स्थ ॥

३. हे स्त्रीमन् नेष्ट. [त्वम्] अस्माकं यज्ञमभिगृणीहि । ऋतौ पिब । त्वं हि रत्नधा (=रत्नस्य दाता) असि ॥

आहेत. कोणी झाला तरी आपल्या घरांत मोठ्या सुखानें, औत्सुक्यानें व आनंदानें शिरतो. तसेंच हे आम्हीं अर्पण केलेले सोमरस मोठ्या सुखानें, औत्सुक्यानें व आनंदानें तुझ्या पोटांत शिरोत; म्हणजे त्यामुळें तुला आनंद होईल यांत संशय नाहीं. इंद्रानें सोम प्यावा म्हणून सूक्तवक्त्याची केवढी उत्सुकता आहे पाहा!

२. हे मरुतांनो, तुम्ही पोत्रांतून योग्य काळीं [सोम] प्या, [आणि ह्या] यज्ञास शोभा आणा; कारण कीं तुम्ही मोठे दाते आहां.

2. Maruts, drink [the Soma] in season from the cup, [and] grace the sacrifice. For you are great givers.

३. हे पत्नीसहिता नेष्ट्या, तू आमचा [हा] यज्ञ मान्य करून घे, [आणि] योग्य काळीं [सोम] पी. कारण कीं तूं उत्कृष्ट संपत्तीचा दाता आहेस.

3. Accept our sacrifice, O wife-accompanied Neshtri, [and] drink [the Soma] in season. For thou art a giver of excellent wealth.

---

२. 'पोत्रांतून,' 'पोत्रात्,' पोत्र या भांड्यांतून. पोत्र म्हणजे (सायणाचार्य म्हणतात) पोता म्हणून जो ऋत्विज असतो त्याचे भांडें अथवा पात्र.—'योग्य काळीं.' वरील टीप पाहा. 'योग्य काळीं सोम प्या' याच्या संबधानें ऋत्विज् शब्दाची व्युत्पत्ति लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. कारण अर्पण केलेला सोम देवांनीं योग्य काळीं प्यावा अशी जशी उपासकांची इच्छा असे तसाच तो योग्य काळीं अर्पावा म्हणजे योग्य काळीं यज्ञ करावा हे मोठें भूषण मानण्याचा प्रचार होता. त्यावरूनच योग्य काळीं (ऋतुना) यजतो (यजते) म्हणून ऋत्विज् असे भूषणार्थ नांव उपासकास पडलें.—'कारण कीं तुम्ही मोठे दाते आहां'. हा अर्थ आम्ही 'यूयं हि ष्ठा सुदानवः.' या शब्दांचा केला आहे. तो करण्यास शब्दांची, व्याकरणाची अथवा अन्वयाची कांहीच अडचण नाहीं; किंबहुना तसाच केला पाहिजे असें स्पष्टपणे दिसतें पण 'सुदानवः.' हें पद सर्वानुदात्त असल्यामुळें त्यावरून त्या अर्थास अडचण येते. त्याचा विचार करतां 'कारण कीं, हे मोठे दाते हो, तुम्ही आहां' असा अर्थ केला पाहिजे. परंतु 'तुम्ही आहां' म्हणजे काय? यांत विधिपद मुळींच नाहीं. यास्तव 'यूयं हि ष्ठा सुदानवः.' असा पाठ धरून आम्हीं भाषांतर केलें आहे. असें करण्यास आम्हांस सबळ कारण असें दिसतें कीं, पुढच्या (३ ऱ्या) ऋचेंत आणि ५ व्या ऋचेंत शेवटच्या चरणांत प्रस्तुत ऋचेच्या शेवटल्या चरणांत असलेल्या कारणासारिखेंच कारण सोम पिण्यासाठीं सांगितलें आहे. 'त्वं हि रत्नधा असि' आणि 'तथेद्धि तस्म्यमसृतम्' हीं जशीं सोम कां प्यावा याचीं कारणें आहेत तसेंच 'यूयं हि ष्ठा सुदानवः.' हें हि कारण आहे, आणि त्या कारणाचा अर्थ 'सुदानवः' अशा स्वरांचा पाठ घेतल्याशिवाय होणार नाहीं.

३. या ऋचेंत थोडीशी अडचण आहे. आम्ही अर्थ स्पष्ट केला आहे. पण 'पत्नीसहित नेष्टा' हा कोण? सायणाचार्यांप्रमाणें 'नेष्टा' म्हणजे 'त्वष्टा' देव (मं० सू० १३ ऋचा १० पाहा—

अग्ने देवाँ इहा वह सादया योनिषु त्रिषु ।
परि भूष पिब ऋतुना ॥ ४ ॥

अग्ने । देवान् । इह । आ । वह । सादय । योनिषु । त्रिषु ।
परि । भूष । पिब । ऋतुना ॥ ४ ॥

ब्राह्मणादिन्द्र राधसः पिबा सोममृतूरनु ।
तवेद्धि सख्यमस्तृतम् ॥ ५ ॥

ब्राह्मणात् । इन्द्र । राधसः । पिब । सोमम् । ऋतून् । अनु ।
तव । इत् । हि । सख्यम् । अस्तृतम् ॥ ५ ॥

युवं दक्षं धृतव्रत मित्रावरुण दूळभम् ।
ऋतुना यज्ञमाशाथे ॥ ६ ॥ २८ ॥

युवम् । दक्षम् । धृतऽव्रता । मित्रावरुणा । दुःऽदभम् ।
ऋतुना । यज्ञम् । आशाथे इति ॥ ६ ॥ २८ ॥

भाषायाम्.

४ हे अग्ने [त्वं] देवानिहावह । [तांस्] त्रिषु योनिषु (=स्थलेषु) सादय (=स्थापय) । [तान्] परिभूष (=अलङ्कुरु) । ऋतौ पिब ॥

५ हे इन्द्र [त्व] राधसो ब्राह्मणाद् (=ब्रह्मपात्राद्) ऋतूननु सोम पिब । तवैव हि सख्यमस्तृतम् (=अविनष्टम्) [अस्ति] ॥

६ हे धृतव्रतौ मित्रावरुणौ [युवां] दुर्दभं (दुष्प्रतारणीयं) दक्ष (=बल) [तेन च ?] ऋतौ यज्ञमाशाथे ॥

टीप पाहा) आणि 'पत्नीसहित' म्हणजे 'स्त्रिया ज्याला आहेत तो ' पण ह्या स्त्रिया कोणाच्या ते ते सांगत नाहीत साधारण 'ग्ना' हे देवस्त्रियांचे नाव आहे व साधारण 'नेष्टा' हे एका ऋत्विजाचे नांव आहे पण येथें नेष्टा म्हणजे ऋत्विग्विशेष घेऊन निर्वाह होणार नाही. तेव्हां सायणाचार्यांप्रमाण 'त्वष्टा'

असा अर्थ समजणे भाग दिसते. 'मान्य करून घे'='अभि गृणीहि' पदश अर्थ, 'पाषाण,' 'वरा आहे असे म्हण '-'कारण की, तू उत्कृष्ट संपत्तीचा दाता आहेस' हें सोम यांस अशी जी प्रार्थना केली त्याचे कारण अथवा हेतु होय.

४. हे अग्नी, तूं देवांस येथे आण, [आणि] तीन ठिकाणीं बसीव, [आणि] शोभीव. [आणि] योग्य काळीं [सोम] पी.

५. हे इंद्रा, तू हवी [ठेवण्या]च्या ब्रह्मपात्रातून योग्य काळीं सोम पी. कारण कीं तुझीच मैत्री अविनाशी [होय]

६. ज्यानीं [या जगांत] नियम बांधिले आहेत असे हे मित्रावरुण हो, जिची प्रतारणा करितां येत नाहीं अशी शक्ति तुम्हां दोघास प्राप्त झाली आहे [आणि म्हणूनच] योग्य काळीं तुम्हांस यज्ञहवि प्राप्त होते.

4. Agni, bring the gods hither, seat [them] in three places, beautify [them]. And drink [the Soma] in season.

5. Drink the Soma in season, Indra, out of the vessel of the Brahma-priest, which contains the oblation. For the friendship of thee only is everlasting.

6. Mitra and Varuna, *who enforce your laws* [in this universe], you [have attained] a power that cannot be deceived, [and therefore you] receive the sacrifice in season.

---

४. 'तीन ठिकाणीं'='त्रिषु योनिषु.' म्हणजे ज्या तीन ठिकाणीं अग्नि असतो तीं तीन स्थळे –'शोभीव'='परिभूष.' 'तू त्याच्या सभोंती राहा' असाहि अर्थ होईलसे वाटते.

५. या मंत्रांत एक शब्दाविषयीं अडचण आहे तितकी सेरीज करून बाकी सोपा आहे. 'राधस.' हा शब्द कठिण आहे राध म्हणजे धन, अन्न; आणि देवास द्यावयाचें अन्न (हवि) असाहि अर्थ होतो. व आम्हीं हा शेवटचा घेतला आहे. पण 'राधसो ब्राह्मणात्' हा प्रयोग कठिण आणि विलक्षण. दुसऱ्या रीतीनें अर्थ करण्यास सुगम मार्ग दिसत नाहीं. 'ब्राह्मण' म्हणजे ब्रह्मा म्हणून जो यज्ञांत ऋत्विज् असतो त्याचें पात्र. सायणाचार्य 'राधसो ब्राह्मणात्' म्हणजे 'धनभूत ब्रह्मपात्रातून' असे म्हणतात. पण अन्नमय ब्रह्मपात्रातून म्हटल्यास शोभेल असे समजून आम्हीं अर्थ केला आहे– 'कारण कीं तुझीच मैत्री अविनाशी होय,' इतर देवांची अथवा मनुष्यांची तशी नव्हे, ती नाशवंत आहे. ही केवळ प्रशंसा आहे. इंद्रास सोम पिण्यास सांगितलें त्याचें हें कारण आहे

६. हा मंत्र बराच कठिण आहे. काठिन्य हें कीं, 'दूळभ दक्षम्' म्हणजे काय आणि त्याचा संबंध कशाशीं ल्यावयाचा? दक्ष म्हणजे शक्ति, बळ, प्रताप; आणि दूळभ (दुर्, दभ=दंभ) म्हणजे जिची प्रतारणा करितां येत नाहीं तो. दक्ष हें द्वितीयान्त पद आम्हीं 'आशाथे' या क्रियापदाचें (यज्ञम् हेंहि कर्म

द्रविणोदा द्रविणसो ग्रावहस्तासो अध्वरे ।
यज्ञेषु देवमीळते ॥ ७ ॥
द्रविण ऽदाः । द्रविणस । ग्रावंऽहस्तास । अध्वरे ।
यज्ञेषु । देवम् । ईळते ॥ ७ ॥
द्रविणोदा ददातु नो वसूनि यानि शृण्विरे ।
देवेषु ता वनामहे ॥ ८ ॥
द्रविण ऽदाः । ददातु । नः । वसूनि । यानि । शृण्विरे ।
देवेषु । ता । वनामहे ॥ ८ ॥
द्रविणोदाः पिपीषति जुहोत प्र च तिष्ठत ।
नेष्ट्रादृतुभिरिष्यत ॥ ९ ॥
द्रविण ऽदाः । पिपीषति । जुहोत । प्र । च । तिष्ठत ।
नेष्ट्रात् । ऋतुऽभिः । इष्यत ॥ ९ ॥

भाषायाम्

७ द्रविणसो (=द्रव्य वाञ्छन्तो) ग्रावहस्ता अध्वरे यज्ञेषु [च] द्रविणोदां देवमीडते ॥

८ यानि [कानि] वसूनि शुश्रुविरे [तानि तानि] द्रविणोदा अस्मभ्य ददातु । [वय हि] तानि देवेषु (=देवयजनार्थं) वनामहे (=प्रार्थयामहे) ॥

९ द्रविणोदा पिपासति । [यूय] जुहुत । प्रतिष्ठत च । नेष्ट्रादृतौ [सोमम] इष्यत (आसृजत) ॥

आहे तसेच) कर्म समजतों परंतु सर्व ऋचेचा अर्थ ' ज्योनीं '[या जगांत] नियम बांधिले आहेत 'असे हे मित्रावरुण हो, कौशल्याने केलां [आणि] कठिण [असा] ' यज्ञ तुम्ही दोघे वेळावर पावत असतां' असाहि केल्यास चालेल.

७. द्रव्याची इच्छा करणारे [उपासक] द्रव्यदात्या देवाला हातांत [सोम]पाषाण घेऊन अध्वरांत [आणि] यज्ञांत स्तवितात.

८. जीं [जीं] [म्हणून] धनें ऐकून ठाऊक आहेत [तीं] द्रव्यदाता [अग्नि] आम्हांस देओ. तीं आम्ही देवप्रीत्यर्थ वांछितों.

९. द्रव्यदात्या [अग्नीस] [सोम] पिण्याची इच्छा झाली आहे. [तर उपासक हो, तुम्ही] हवन करा, आणि संमुख उभे राहा. नेष्ट्रांतून योग्य काळीं [सोम] घाला.

7. Desirous of riches [the worshippers] with the [pressing] stones in their hands praise the god who is the giver of riches in the Soma-[and-other] sacrifices.

8. May [Agni] the giver of riches give us whatever riches are heard of. Towards the [service of the] gods we desire them.

9. [Agni] the giver of riches wishes to drink [Soma]. Pour out oblations [to him], and stand forward. Offer from the neshtra-vessel in season.

---

७. 'द्रव्यदात्या' = 'द्रविणोदाः.' हें विशेषण सायणाचार्य द्वितीयेचें एकवचन आहे असें समजतात. आणि पक्षीं प्रथमा समजून 'त्वं पिब' इतकें अध्याहृत घेतात. आम्हीं त्याच्या पहिल्या अर्थास अनुसरून भाषांतर केलें आहे. पण 'द्रविणोदाः' हें द्रविणोदान् या अर्थी रूप चमत्कारिक आहे यांत संशय नाहीं. 'द्रविणोदा' हें 'द्रविणोद' याचें अनेकवचनी प्रथमेचें रूप संभवेल (ऋ. १. ५३. १ पाहा); परंतु तसें मानिल्यास तें 'ग्रावहस्तासः' याचें जें अध्याहृत विशेष्य 'ऋत्विज' त्याचें विशेषण होईल. आणि ऋत्विजास अथवा उपासकांस द्रव्यदाते हें विशेषण लावण्यास स्वारस्य नाहीं. शिवाय पुढील दोन ऋचांत द्रविणोदाः हें अग्निवाचक (या ऋचेंत आहे तसें) असून अग्नीला लाविलें आहे.— '[सोम]पाषाण' = ग्राव. सोम ज्यांत कुटीत त्या पाषाणास ग्राव अशी संज्ञा आहे.— 'अध्वरांत आणि यज्ञांत' = 'अध्वरे यज्ञेषु.' 'अध्वर' म्हणजे सोमयज्ञ आणि 'यज्ञ' म्हणजे दुसरे विशेष यज्ञ असें सायणाचार्य म्हणतात — 'देवाला'. हा देव म्हणजे येथें अग्नि समजावयाचा..

८. 'देवप्रीत्यर्थ' = 'देवेषु.' म्हणजे धनें मिळवून देवांची सेवा यज्ञादिकांनीं आम्हांस करितां यावी याकरितां. मंत्रवाक्याचा भावार्थ असा आहे कीं, अमुक प्रकारचीं धनें आम्हांस दे म्हणून सांगणें अवश्य नाहीं. जीं जीं धनें लोकांच्या ऐकण्यांत आलेलीं आहेत तीं तीं सर्व तूं आम्हांस देओ.

९. मंत्राचा म्हणणें कीं, अग्नीस सोम पिण्याची इच्छा झाली आहे तर

यत्त्वा तुरीयमृतुभिर्द्रविणोदो यजामहे ।
अध स्मा नो ददिर्भव ॥ १० ॥

यत् । त्वा । तुरीयम् । ऋतुऽभिः । द्रविणःऽदः । यजामहे ।
अध । स्म । नः । ददिः । भव ॥ १० ॥

अश्विना पिबतं मधु दीद्यग्नी शुचिव्रता ।
ऋतुना यज्ञवाहसा ॥ ११ ॥

अश्विना । पिबतम् । मधु । दीद्यग्नी इति दीदिऽअग्नी । शुचिऽव्रता ।
ऋतुना । यज्ञऽवाहसा ॥ ११ ॥

गार्हपत्येन सन्त्य ऋतुना यज्ञनीरसि ।
देवान्देवयते यज ॥ १२ ॥ २९ ॥

गार्हऽपत्येन । सन्त्य । ऋतुना । यज्ञऽनीः । असि ।
देवान् । देवऽयते । यज ॥ १२ ॥ २९ ॥

भाषायाम्.

१० हे द्रविणोद यस्माद् [वय] त्वां तुरीयमृतावृतौ यजामहे तस्मात् [त्वम्] अस्माक ददि(=दाता) भव ॥

११ हे दीप्यग्नी (=द्योतमानाग्नियुक्तौ) शुचिव्रतौ यज्ञवाहसौ (=यज्ञवाहकौ) अश्विनौ, [युवाम्] ऋतौ मधु (=मधुर सोम) पिबतम् ॥

१२ हे सन्त्य (=दात) [अग्ने] [त्व] गार्हपत्येन ऋतौ यज्ञनीरसि । [तस्मात्] देवयते देवान्यज ॥

लौकर त्याला नेष्ट्रातून सोम अर्पण करा–'नेष्ट्रातून' 'नेष्टा' म्हणून जो यज्ञात ऋत्विज् असतो त्याचे पात्र 'नेष्ट्र' होय असे सायणाचार्य म्हणतात– 'घाला', 'इष्यत' इष् धातूचा (घालणे, सोडणे, ओतणे) हा अर्थ इतर बऱ्याच ठिकाणी आला आहे

१०. हे द्रव्यदात्या [अग्नी], ज्याअर्थी आम्ही तुला चवथा [समजून] योग्यकाळीं यज्ञानें भजतों त्याअर्थी आम्हांस तूं दाता हो.

११. हे देदीप्यमान अग्नीनें युक्त [आणि] शुचिव्रत [आणि] यज्ञाला वाहून नेणारे असे अश्वी हो, तुम्हीं [हा] मधुर सोमरस योग्य काळीं प्या.

१२. हे [इष्ट]दात्या [अग्नी], तूं गृहपति या नात्यानें योग्य काळीं यज्ञनायक आहेस. [तर] [या] देवभक्तासाठीं [तूं येऊन] देवयजन कर.

10. Inasmuch as, Giver of riches, we sacrifice to thee in season as the Fourth, be thou therefore a giver to us.

11. As'vins, accompanied by brilliant Agni, observers of pure laws, [and] carriers of the sacrifice, drink in season [this] sweet Soma.

12. By thy position as 'Lord of the house', O beneficent [Agni], thou art the leader of the sacrifice in season. [Therefore] sacrifice to the gods in behalf of [this] pious worshipper.

१०. 'चवथा [समजून] ... भजतों'. 'चवथा' म्हणजे काय आणि पहिले तीन कोण? सायणाचार्यांच्या छापील भाष्यांत 'तुरीय' (चवथा) याच्या अर्थावर भाष्यच नाहीं, ते कदाचित् छापतांना चुकून राहिलें असावें. परंतु गार्हपत्यादि जे तीन अग्नी अथवा अग्नीच्या तीन विभूती त्या तीन आणि द्रव्यदाता अग्नि ('द्रविणोदा:') हा चवथा असेलसें दिसतें. कारण ७ वी, ८ वी, ९वी आणि ही १० वी या ऋचांत जो 'द्रविणोदा:' शब्द आला आहे आणि ज्याचें भाषांतर 'द्रव्यदाता [अग्नि]' असें आम्हीं केलें आहे ते केवळ विशेषण समजावयाचें नाहीं, तर अग्नीचे विशेषनामाप्रमाणें नाव समजावयाचें असें दिसतें

११. 'देदीप्यमान अग्नीनें युक्त' 'दीद्यग्नी.' सायणाचार्य म्हणतात "प्रकाशणारे असे आहवनीयादि अग्नी ज्याजबरोबर आहेत असे."—'शुचिव्रत' म्हणजे ज्यांचे नियम अथवा ज्यांची वर्तणूक पवित्र आहे असे—'अश्वी.' या देवजोडीविषयीं पूर्वी सूक्त ३ ऋ. १ यावर १४ व्या पृष्ठावर दिलेली टीप पाहा.

१२. मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, अग्नीला गृहपति अशी संज्ञा आहे त्यापेक्षां तो यज्ञाचा नायक म्हणजे मुख्य अधिकारी, पुरस्कर्ता होय. यास्तव त्याणें येऊन मंत्रचका जो देवभक्त त्याजकरितां देवास यज्ञ करावा यांत गृहपति-(अथवा गार्हपत्य)- शब्दावर श्लेष आहे अग्नीला यज्ञ संपादण्याची शक्ति आहे व तो पुरोहित आणि होता

सूक्तम् १६.

ऋषि. कण्वपुत्रो मेधातिथि । इन्द्रो देवता । गायत्री च्छन्द ॥

आ त्वा वहन्तु हरयो वृषण सोमपीतये ।
इन्द्र त्वा सूरचक्षस ॥ १ ॥

आ । त्वा । वहन्तु । हरयः । वृषणम् । सोमऽपीतये ।
इन्द्र । त्वा । सूरऽचक्षसः ॥ १ ॥

भाषायाम्

१ वृषण त्वां हरय सोमपानार्थमावहन्तु । हे इन्द्र सूर्यसदृशास [ते] त्वाम् [आवहन्तु] ॥

आहे असे पूर्वी पुष्कळ ठिकाणी आले-च आहे — 'देव भक्तासाठा' = 'देवयते' देवयन् म्हणजे देवाची भक्ति करणारा आणि जे अनार्य देवाची भक्ति अथवा देवांस यज्ञ करीत नसत त्यांचे नांव अदेवयन् असे आहे.

सूक्त १६.

ऋषि आणि वृत्त, पूर्ववत्

देवता, इंद्र.

१ हे इंद्रा, [तुझे] पिंवळे घोडे तुला बलवताला सोम पिण्यासाठीं येथें वाहून आणोत, सूर्याप्रमाणें दिसणारे [ते घोडे] तुला येथे [आणोत]

HYMN 16

To *Indra* Author and Metre as before

1 May [thy] tawny horses, bring hither thee, who art manly, for drinking Soma, [may they] brilliant as the sun [bring] thee, O Indra

---

१ मंत्राचें तात्पर्य इतकेंच कीं, सूर्याप्रमाणे ज्यांची कांति जिकडे तिकडे एकदम पसरते असे इंद्राचे पिंवळे घोडे बलवत इंद्राला सोमपानार्थ मंत्रयक्त्याजवळ आणोत, म्हणजे ते घोडे आपल्या रथास जोडून इंद्र येओ आणि सोम पिओ

'बलवताला'='वृषणम्' हा शब्द वैदिक भाषेत मोठ्या महत्त्वाचा आहे. वृषन् म्हणजे मूळ अर्थ वर्षण करणारा, गाळणारा या अर्थी वृषन् हे विशेषण मेघाला लाविलेले आढळतें (ऋ १ १८१ ८) आणि धारा आणि गाईच्या कासेसहि लाविलेले आहे त्यानंतर वर्षण म्हणजे सेचन, (= रेताचें सेचन) करण्यास समर्थ असा जो तो असा अर्थ होतो, म्हणजे पुरुषत्व ज्याला आहे, जो नपुंसक नव्हे तो या अर्थी वृषन् हे पुरुषजातीच्या प्राण्यास (जसे पुरुषास, घोड्यास, बैलास) लाविलेले आढळते नंतर केवळ शक्तिमान् असा याचा अर्थ होतो या अर्थी तें मनुष्यांस मरुद्गणास व इतर देवांस लागत, व वस्तूलाहि लागते (उदाहरणार्थ सोम, रथ, वज्र, पाषाण, ध्वज, शस्त्र इत्यादि) व भाववाचक विशेष्यांलाहि लागते (उदाहरणार्थ स्तोम=स्तुति, ध्वनि, यज्ञ, तेज, संपत्ति इत्यादि) नंतर वृषन् याचा नामाप्रमाणे प्रयोग केलेला आढळतो, आणि त्याचा अर्थ पुरुषत्व ज्याला आहे असा पुरुष, नपुंसक नव्हे तो, जो षंढ (=वध्रि) नव्हे तो, नंतर स्त्रीची कामना ज्याला आहे असा मनुष्य, कामातुर पुरुष, नंतर मादीची इच्छा करणारा कोणत्याहि जनावरजातीचा नर वृषन् हें विशेषण इंद्राला, अग्नीला वगैरे देवांस लाविलेले पुष्कळ ठिकाणीं आढळते त्याचा अर्थ वीर्यवान्, शूर, पुरुषत्वोपेत असा समजला पाहिजे परंतु सायणाचार्य वृषन् शब्दाच्या धात्वर्थास अनुलक्षून वर्षण करणारा, कामांचा म्हणजे मनुष्यांचे हेतु पूर्ण करणारा असा अर्थ करून पुष्कळ ठिकाणीं निर्वाह करितात

पुरुषत्व ज्याला आहे तो म्हणजे नवऱ्याचें काम बजाविण्याच्या स्थितींत जो असतो तो बलवान् होय अशी कल्पना सर्वकाळा सर्व देशा आहे म्हणूनच पुरुषत्ववाचक अथवा पतित्ववाचक जितके शब्द आहेत

इमा धाना घृतस्नुवो हरी इहोप वक्षतः ।
इन्द्रं सुखतमे रथे ॥ २ ॥

इमाः । धानाः । घृतऽस्नुवः । हरी इति । इह । उप । वक्षतः ।
इन्द्रम् । सुखऽतमे । रथे ॥ २ ॥

इन्द्रं प्रातर्हवामह इन्द्रं प्रयत्यध्वरे ।
इन्द्रं सोमस्य पीतये ॥ ३ ॥

इन्द्रम् । प्रातः । हवामहे । इन्द्रम् । प्रऽयति । अध्वरे ।
इन्द्रम् । सोमस्य । पीतये ॥ ३ ॥

उप नः सुतमा गहि हरिभिरिन्द्र केशिभिः ।
सुते हि त्वा हवामहे ॥ ४ ॥

उप । नः । सुतम् । आ । गहि । हरिऽभिः । इन्द्र । केशिऽभिः ।
सुते । हि । त्वा । हवामहे ॥ ४ ॥

भाषायाम्.

२. हरी इन्द्रमेता घृतस्नुवो धाना (=भ्रष्टयवतण्डुलान्) [प्रति] सुखतमे रथे अत्रोपवहताम् ॥

३. इन्द्र प्रातर्हवामहे । इन्द्र प्रयति (=प्रारब्धे) अध्वरे [हवामहे] । इन्द्र सोमस्य पानार्थं [हवामहे] ॥

४. हे इन्द्र [त्वम्] अस्माक सुतम् (=अभिषुत सोम) [प्रति] केशिभिर्हरिभिरागच्छ । [सोमे] सुते (=अभिषुते) [सति] हि [वय] त्वा हवामहे ॥

तितके बलवाचक होतात याचे उत्तम उदाहरण मालवणी कोकणी भाषेत आहे तिकडचे लोक म्हणतात की, 'माका उठाक घोपाण नाय'=मला उठावयाला घोपण नाही. घोपण म्हणजे घोवपण, घोव म्हणजे नवरा त्यावरून घोपण म्हणजे नवरेपणा=शक्ति. त्याप्रमाणे स्त्रियाहि आपल्याविषयी बोलत असतात

२. तुपानें थपथपीत अशा ह्या लाह्याजवळ पिवळे घोडे इंद्राला परम सुखकारक रथातून येथें वाहून आणोत.

३. इंद्राला आम्ही प्रातःकाळी, इंद्राला यज्ञ चालू होताच, इंद्राला आम्ही सोमपानार्थ बोलावीत असतों.

४ हे इंद्रा, तूं [आपल्या] अयाळी पिवळ्या घोड्यांच्या योगानें आमच्या [ह्या] सोमाप्रत ये; कारण कीं, सोम पिळून काढताच आम्ही तुला बोलावीत आहों.

2 To these grains of parched corn suffused with *clarified butter may Indra's* pair of tawny horses bring him down in the easiest chariot.

3. Indra we invoke in the morning, [invoke] Indra at the commencement of the sacrifice, Indra for drinking the Soma.

4. Come up, Indra, to our extracted Soma by means of thy maned tawny horses. For we are calling thee *directly* the Soma is extracted.

---

२. 'तुपाने थपथपीत अशा लाह्याजवळ'. देवांस अर्पण करावयाचे पदार्थ अति प्राचीनकाळी काय काय होते त्याचा हा चांगला मासला आहे. अति प्राचीन काळीं गुरें ढोरें, त्यापासून झालेले अथवा केलेले खाद्य पदार्थ आणि धान्य हीच आर्यलोकांची मुख्य संपत्ति होती. व तशा संपत्तीचे भाग ते आपल्या देवांस अर्पण करीत. जे उत्तम अन्न, *मिष्टान्न* समजून ते स्वतः खात तेच त्या काळी ते आपल्या देवांस अर्पण करीत आणि त्यासच ते यज्ञ असे म्हणत. लाह्या आणि तूप अर्पण करण्याचा जो प्रचार पूर्वकाळी चालू होता तो अजून बंद पडला नाहीं. कारण अक्षता, लाह्या आणि घृत यांशिवाय कोणती पूजा, कोणती क्रिया, आणि कर्म आपण करीत असतो!

३. सायणाचार्य म्हणतात की, "प्रातःकाळी कर्मारंभी म्हणजे प्रातःसवनाच्या वेळी आम्ही इंद्राला बोलावितो; तसाच सोमयागास आरंभ होताच म्हणजे माध्यंदिन सवन म्हणून जे दोनप्रहरी यजन व्हावयाचे त्यावेळी इंद्राला आम्ही बोलावितो; तसाच यज्ञाच्या समाप्तीच्या वेळी म्हणजे तृतीयसवनाच्या वेळी सोमपानार्थ इंद्राला बोलावितो." असा अर्थ इष्ट दिसतो खरा. आम्हीं त्यासच अनुलक्षून पण पदशः अर्थ केला आहे.

४. 'कारण कीं, सोम पिळून काढताच' इत्यादि हे कारण लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे. उपासक म्हणतो कीं, आम्ही सोम काढून इतर देवांस अजून अर्पण केला नाहीं अथवा आम्हीही प्यालो नाहीं, काढताच प्रथम तुला हाक मारितों आहों. यास्तव हे इंद्रा, तू ये

वैदिक युगांतील परम प्राचीन काळी सोमरस कसा तयार करीत हे नक्की सम-

सेमं नः स्तोममा गह्युपेदं सवनं सुतम् ।
गौरो न तृषितः पिब ॥ ५ ॥ ३० ॥

सः । इमम् । नः । स्तोमम् । आ । गहि । उप । इदम् । सवनम् । सुतम् ।
गौरः । न । तृषितः । पिब ॥ ५ ॥ ३० ॥

इमे सोमास इन्दवः सुतासो अधि बर्हिषि ।
ताँ इन्द्र सहसे पिब ॥ ६ ॥

इमे । सोमासः । इन्दवः । सुतासः । अधि । बर्हिषि ।
तान् । इन्द्र । सहसे । पिब ॥ ६ ॥

अयं ते स्तोमो अग्रियो हृदिस्पृगस्तु शंतमः ।
अथा सोमं सुतं पिब ॥ ७ ॥

अयम् । ते । स्तोमः । अग्रियः । हृदिऽस्पृक् । अस्तु । शम्ऽतमः ।
अथ । सोमम् । सुतम् । पिब ॥ ७ ॥

भाषायाम्.

५ स [त्वम्] अस्माकमिम स्तोममिम सुतम् (=अभिषुत) सोम [च] उपागच्छ । [त्व] तृषितो गौर इव [त सोम] पिब ॥

६. इमे इन्दवः. सोमा अधि बर्हिषि सुता (=अभिषुता) [सन्ति] । हे इन्द्र [त्व] तान्सहसे (=बलाय) पिब ॥

७ अयमग्रियो हृदिस्पृक् स्तोमस्तुभ्य शतमोस्तु । अनन्तर सुतम् (अभिषुत) सोम पिब ॥

जल्यास फार चांगले होईल यांत संशय नाहीं ऋग्वेदाचें सगळें नववें मंडळ सोमाविषयी आहे, व त्याशिवाय इतर मंडळांतहि पुष्कळ सूक्तें व सूक्तभाग सोमाविषयी आहेत. तूर्त इतकें दिग्दर्शन करणें आहे कीं, सोमवल्ली आणून मावे म्हणून जे पाषाण असत त्यांजमध्ये कुटून मग ते तुकडे एका चाळणी सारिख्या पात्रांत ठेवून त्याजवर पाणी घालीत आणि खाली एक द्रोण म्हणून पात्र ठेवीत. त्यांत सोमाचे बिंदु गळत. ते आंबट असावे असे दिसते. मग त्यांत दहीं, पीठ वगैरे पदार्थ घालून अमल चढे अशा रीतीनें त्यास शिजवीत मग तो अमरी झाल्यावर देवास अर्पण करीत व आपण पीत

५. तर [हे इंद्रा], तूं आमच्या ह्या स्तुतीप्रत, आमच्या ह्या सोमसवनाप्रत ये, [आणि] ताहानेलेल्या गौरमृगाप्रमाणे [सोमरस] पी

६. हे सोमबिंदु दर्भांवर गाळून काढिले आहेत. ते बळ येण्यासाठीं, हे इंद्रा, तू पी.

७. [हे इंद्रा], हें उत्तम [आणि] अंत करणास वेधणारे स्तोत्र तुला परमसुखकारक होओ. त्यानंतर [हा] पिळून काढिलेला सोम तू पी.

5 Come therefore thou to this our prayer, to this our sacrifice of the expressed Soma. Drink like a thirsty stag

6 These dropping Somas have been expressed on the Kus'a grass Drink them, Indra, to obtain strength.

7 May this prayer [which is] excellent [and] touching to the heart be most agreeable to thee Drink then, [Indra], the expressed Soma

५ मत्राचा भावार्थ असा आहे की, आम्ही तुझी जी ही स्तुति करीत आहों आणि तुला जो हा सोम अर्पण करीत आहों ती स्तुति आणि तो सोम ग्रहण करण्याकरितां तू ये आणि गौरमृग ताहनेलेला असून पाणी पितो तसा तू हा सोम पी—'गौरमृग'='गौर' हें कोणतें जनावर होतें तें निश्चयानें सांगवत नाहीं पण अक्षरशः पाहतां तें एक प्रकारचें सफेत जनावर अथवा सारंग असावेंसे दिसतें हरिण पाणि पिऊं लागलें म्हणजे मोठ्या झपाट्यानें एकदम पुष्कळ पीतें म्हणून प्रसिद्ध आहेच. घोड्यासारिखें अथवा बैलासारिखें मद मद पीत नसतें —'तर तू'='स [त्वम्]' सू. १ ऋचा ९ यांजवरील टीप पृ ६ वर, आणि सू ८ ऋ. ९ यांजवरील टीप पृष्ठ २८ वर पाहा. 'स इमम्' याचा संहितापाठांतील 'सेमम्' हा संधि लक्षात ठेवण्याजोगा आहे

६ 'दर्भांवर गाळून काढिले आहेत', 'सुतास अधि बर्हिषि' म्हणजे गाळून दर्भांवर पात्रांत ठेविले आहेत—'बळ येण्यासाठीं ..पी'='सहसे पिब.' ते पी म्हणजे तुला बळ येईल असा भावार्थ सोमपान केल्यानें बळ येतें, अंगांत शक्ति येते व पराक्रम करण्याचा आवेश प्राप्त होतो असें पूर्वी सांगितलेंच आहे

७. मत्राचा भावार्थ असा आहे की, या ठिकाणीं दोन वस्तु तुला अर्पण केल्या आहेत, पहिली या सूक्तद्वारा केलेली स्तुति, आणि दुसरी ही की, गाळून तयार केलेला सोम. हें स्तोत्र तुला अगोदर मान्य होओ आणि तें मान्य झाल्यावर तू हा सोम पी

सूक्तकर्त्याच्या मतें त्याचें सूक्त किती चांगलें आहे आणि कसें मनोवेधक आहे व त्यामुळें तें इंद्रास कसें मान्य होण्याजोगें आहे हे लक्षांत ठेविलें पाहिजे

विश्वमित्सवनं सुतमिन्द्रो मदाय गच्छति ।
वृत्रहा सोमपीतये ॥ ८ ॥

विश्वम् । इत् । सवनम् । सुतम् । इन्द्रः । मदाय । गच्छति ।
वृत्रऽहा । सोमऽपीतये ॥ ८ ॥

भाषायाम्.

८. इन्द्रो विश्वमपि सुत सवनम् (=अभिषुत सोम) [प्रति] मदाय गच्छति । वृत्रहा सोमपानाय [गच्छति] ॥

८. जेथें जेथें सोम काढितात तेथें तेथें तो सोम प्यावा म्हणून [आणि] मादयुक्त व्हावें म्हणून वृत्रघ्न इंद्र जात असतो.

8 To every expressed Soma whatsoever India the killer of Vritra goes, that he may drink the Soma [and] be intoxicated.

८. 'जेथे जेथे सोम काढितात तेथे तेथे'='विश्वमित्सवन सुतम्' पदश, 'पिळून काढिलेल्या प्रत्येकहि सोमाप्रत' म्हणजे सर्व उपासकाकडेस सोम पिऊन मादोत्पन्न हर्ष पावण्यासाठी इंद्र जात असतो कितीहि उपासक असले तरी त्या सर्वांचा सोम पिण्यास इंद्र जातो एकाचा सोम पिऊन आतां माझी तृप्ति झाली, आतां दुसऱ्या कडेस मी जात नाहीं असे म्हणत नसतो — 'वृत्रघ्न'. वृत्राला मारणारा वृत्र हा शब्द वेदांत मोठ्याच महत्त्वाचा आहे ह्याचा अक्षरश अर्थ, 'घेरणारा', 'वेष्टणारा' वेदांत असे रूपक आहे कीं, आकाशांतून मेघोदकें जी जमिनीवर पडतात त्याच कोणी गाई होत त्या आकाशांत वृत्र हा घेरून अडवितो, त्यांस खालीं येऊ देत नाहीं मग इंद्र वृत्राशीं लढतो आणि त्याला आपल्या वज्रानें प्रहार करून मारितो त्या वज्राच्या धारेस सुवर्णासारिखी कांति आहे. इंद्राने वृत्राला मारितांच उदकें (अथवा उदकरूपी गाई) खालीं येऊन जमिनीवर वाहू लागतात या वृत्राशीं इंद्र युद्ध करितो तेव्हां सकळ पृथ्वी आणि आकाश थरथरां कांपतात

आतां हें जें रूपक सांगितलें त्यावरून साफ दिसून येईल की, वृत्र म्हणजे ज्यांत उदकें आवरून राहिल्याप्रमाणे भासतात तो ढग अथवा मेघ इंद्राचे वज्र म्हणजे विद्युल्लता, आणि वज्रप्रहार म्हणजे मेघाची जी गर्जना होते ती, इंद्राचे आणि वृत्राचे युद्ध म्हणजे पाऊस पडण्यापूर्वी विजाचे जे गडगडाट आणि मेघगर्जना होतात तेच होय. आणि इंद्र म्हणजे ह्या सर्व गोष्टी आकाशांत जिच्या मतापानें होतात ती दिव्यशक्ति

नतर वृत्र हे पुराणांतरीं व इतिहासांत वगैरे एका असुराचे नांव झालें आणि इंद्राने त्याला मारिलें त्याविषयीं विस्तारानें कथा रचल्या गेल्या

आम्ही जो प्रथम वृत्र शब्दाचा अर्थ सांगितला त्यावरून साधारण शत्रूचेंहि नांव वृत्र असे पडलें आणि अशा अर्थी वेदांत पुष्कळ स्थळीं तो शब्द वापरलेला आढळतो व प्रस्तुतस्थळीं तरी सायणाचार्य 'वृत्रहा' याचा अर्थ 'शत्रूस मारणारा' असा (आम्हांस वाटतें जरूर नसतां) करितात

'मादयुक्त व्हावें म्हणून' हा उद्देश लक्ष्यांत ठेवण्याजोगा आहे यांत संशय नाहीं

सेमं नः काममा पृण गोभिरश्वैः शतक्रतो ।
स्तवाम त्वा स्वाध्यः ॥ ९ ॥ ३१ ॥

सः । इमम् । नः । कामम् । आ । पृण । गोभिः । अश्वैः । शतक्रतो
इति शतऽक्रतो ।
स्तवाम । त्वा । सुऽआध्यः ॥ ९ ॥ ३१ ॥

भाषायाम्.

९. स [त्वं] हे शतक्रतो गोभिरश्वैश् [च] इमम् (=एतादृश=गोश्वसन्निधाम्) अस्माक काममापूरय । [वय] त्वां सुबुद्धय स्तवाम ॥

सूक्तम् १७.

ऋषि कण्वपुत्रो मेधातिथि । इन्द्रावरुणौ देवता । छन्द –
१–३–६–२ गायत्री । ४ ५ पादनिचृत् ॥

इन्द्रावरुणयोरहं सम्राजोरव आ वृणे ।
ता नो मृळात ईदृशे ॥ १ ॥

इन्द्रावरुणयो । अहम् । सम्ऽराजोः । अवः । आ । वृणे ।
ता । नः । मृळातः । ईदृशे ॥ १ ॥

भाषायाम्.

१ अह सम्राजोरिन्द्रावरुणयोरव (=अवनम्) आवृणे । तावस्मादृशे [जनाय] मृडताम् । अथवा । तादृशाय, अस्मभ्य मृडताम् ॥

९. तर हे शतप्रज्ञ [इंद्रा], तूं आमची ही इच्छा गाई [आणि] घोडे देऊन पूर्ण कर. तुला आम्ही भाविक अंतःकरणानें स्तवीत राहूं.

9. Do thou, therefore, possessed of a hundred wisdoms, fulfil this our desire by [giving us] cows and horses. With pious hearts we will be praising thee.

९. 'शतप्रज्ञ'. पूर्वी सू. ४ ऋचा ८ यांतील 'बहुमेधावी' शब्दावरील टीप पाहा.—'ही'='इमम्.' म्हणजे गाई, घोडे मिळावे ही इच्छा. दुसरी इच्छा वर प्रदर्शित केलेली नाही. इमम् म्हणजे येथें 'एतादृशम्' असा अर्थ करावा. 'गोभिरश्वैः एतादृशम् (=एतत्संबन्धि-नम्=गोअश्वसंबन्धिन) कामम्' असा अन्वय घेऊन' अर्थ करावा. 'इमम्' याजविषयी पूर्वी ३४ व्या पृष्ठावर ९ व्या ऋचेवरील टीप पाहा.—'गाई घोडे देऊन'. पदशः, 'गाईंनी [आणि] घोड्यांनी'. इतक्या मोठ्या देवापाशी एवढें मोठे स्तोत्र करून शेवटी सूक्तकार मागतो काय तें पहा. पण परम पुरातन वैदिक युगांत गुरें ढोरें हीच मोठी संपत्ति असे, यापुढे दुसरें काहीच नसे हे आपण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

सूक्त १७.

ऋषि आणि वृत्त, पूर्ववत्. देवता—इंद्रावरुणौ (इंद्र आणि वरुण हे उभयतां).

१. मी महाराजे इंद्रावरुण यांची कृपा भाकितो. ते आम्हां सारिख्यांवर दया करोत.

Hymn 17.

To *Indra* and *Varuna*. Author and Metre as before.

1. I wish for the support of the great kings Indra and Varuna. May they favour such persons as we are.

१. 'कृपा भाकितो.' 'अवः आवृणे,' रक्षण इच्छितों, त्यांनी माझें रक्षण करावें असें मी इच्छितों—'आम्हां सारिख्यांवर'=नः ईदृशे.' ऋग्वेदांत ईदृक् शब्द चारच ठिकाणीं आला आहे आणि तो अशाच प्रयोगी बहु-[illegible] आला आहे. [illegible] [illegible] देऊन [illegible] येथें [illegible] आहे. [illegible] [illegible] (ऋ. ६ १९. ५) ही ऋचा [illegible] पाहा. [illegible] वेदांत [illegible]

गन्तारा हि स्थोऽवसे हवं विप्रस्य मावतः ।
धर्तारा चर्षणीनाम् ॥ २ ॥

गन्तारा । हि । स्थः । अवसे । हवम् । विप्रस्य । माऽवतः ।
धर्तारा । चर्षणीनाम् ॥ २ ॥

अनुकामं तर्पयेथामिन्द्रावरुण राय आ ।
ता वां नेदिष्ठमीमहे ॥ ३ ॥

अनुऽकामम् । तर्पयेथाम् । इन्द्रावरुणा । रायः । आ ।
ता । वाम् । नेदिष्ठम् । ईमहे ॥ ३ ॥

युवाकु हि शचीनां युवाकु सुमतीनाम् ।
भूयाम वाजदाव्नाम् ॥ ४ ॥

युवाकु । हि । शचीनाम् । युवाकु । सुऽमतीनाम् ।
भूयाम । वाजऽदाव्नाम् । ॥ ४ ॥

भाषायाम्.

२ [हे इन्द्रावरुणौ] चर्षणीनां (=मनुष्याणां) धर्तारौ [युवां] हि मत्सदृशस्य विप्रस्य हवम् अवसे (=अवनाय) गन्तारौ स्थ. ॥

३ हे इन्द्रावरुणौ [युवां] राय अनुकाममातर्पयेथाम् (=तृप्तिर्यथा स्यात्तथा आपूरयतम्) । तौ युवां [वयं] नेदिष्ठमीमहे (=याचामहे) ॥

४ [वयं] हि युवयोः शचीनाम् (=अवनकर्मणां) युवयोः वाजदाव्नां (=वाजस्य दात्रीणां) सुमतीनां [च] भूयाम ॥

येतो तो सुद्धा बहुतकरून चतुर्थ्यन्तच येतो

या ऋचेतील प्रार्थना किती नम्र आणि मार्मिक आहे पाहा. रक्षण करणारे देव 'महाराज' होत, म्हणजे मोठ्या शक्तीचे व अधिकाराचे राजे होत; आणि त्यांचें, रक्षण करण्याचें तो दीन, दास, ही त्यांच्या स्थितीत आहे असें उपासक मेधावी (मेधातिथि ऋषि) म्हणतो. हा जो दैन्यभाव [illegible] त्याला, आणि देवाधिदेव विष्णूच्या छातीवर ब्राह्मणानें लाथ मारिली आणि तेणेंकरून जे क्षत पडलें तो एक अलंकारच आहे असे समजून विष्णूनें ते क्षत [illegible] आणि तो आजपर्यंत ब्राह्मणाचा प्रसाद [illegible] या अघोर [illegible] केवढा फरक आहे पाहा!

२. कारण कीं, जनाचे प्रभु असे जे तुम्ही ते मजसारिख्या कवीच्या हाकेला [ऐकून], रक्षण करण्यासाठीं, जात असतां.

३. हे इंद्रावरुण हो, तुम्ही [आमच्या] इच्छेप्रमाणें [आम्हांस] धनें देऊन तृप्त करालच, म्हणून तुम्ही [आमच्या] अतिसंनिध असावें असें आम्ही प्रार्थितों.

४. कां कीं, तुमच्या पराक्रमांचे आम्ही [विषय] होऊं, तुमच्या द्रव्यदात्या प्रसादांचे [आम्ही विषय होऊं] असें करा.

2. For, protectors of the people you [O Indra and Varuna,] go at the call of a poet like me in order to protect [him].

3. You will, Indra and Varuna, satisfy us by the grant of riches according to [our] desire We therefore pray you [to be] nearest [to us].

4. For may we belong to your prowess, may we belong to your wealth-bestowing favours.

---

२. इंद्रावरुणाची करुणा भाकतो असे जें पूर्वऋचेंत सांगितलें त्याचें कारण या ऋचेंत आहे. तें हें कीं, मजसारिख्या दीन कवीनें इंद्रावरुणास हाक मारिली कीं, तिजसरशीं ते त्याचें संरक्षण करण्यासाठीं जात असतात. ही मन्त्रवक्त्याची भाविक भक्ति लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे.

३. 'अतिसंनिध असावें,' 'नेदिष्ठम्'='म्हणून तुम्ही. .असावे'='ता वाम्'='नेदिष्ठमीमहे' याचा 'आम्ही तुम्हांस अगदी जवळचे नातलग समजून तुम्हांजवळ धनें मागत आहों' असाहि अर्थ होऊं शकेल. आणि तो वर दिलेल्या अर्थापेक्षां चांगला दिसतो. नेदिष्ठ म्हणजे अगदीं जवळचा नातलग, परम सगा, परम प्रिय असा सबंधी कसाहि अर्थ केला तरी 'नेदिष्ठम्' हे येथे क्रियाविशेषण घेणें अवश्य आहे. परम प्रिय सगा असेल तो जशी मनकामना पूर्ण करील तशी दुसरा कोणीहि केवळ 'अगदी संनिध' असल्या कारणानेंच करणार नाहीं.

आम्ही वर केलेला अर्थ सायणाचार्यांस अनुसरून केला आहे.

४. या मन्त्रांत 'युवाकु' शब्द आहे त्याचा अर्थ 'तुम्हा दोघांचा' असा समजून आम्हीं भाषांतर केलें आहे 'युवाकु' म्हणजे 'युवयो' असा जरी षष्ठीचा अर्थ आहे तरी तें येथें अव्यय आहे—'युवाकु' हा शब्द असाच अव्ययार्थी पण चतुर्थी ऐवजीं आणखी एकदा ऋग्वेदांत आला आहे तो "दुहीयन्मित्रधितये युवाकु राये च नो मिमीत वाजवत्यै" (ऋ १ १२०. ९) यांत आहे—'तुमच्या पराक्रमानें आम्ही [विषय] होऊं असें करा'= 'युवाकु शचीनां भूयाम'. पदशः अर्थ, 'आम्ही तुमच्या पराक्रमाचे व्हावे असें करा' = आम्हासाठीं तुम्ही पराक्रमाचो

इन्द्रः सहस्रदाव्नां वरुणः शंस्यानाम् ।
क्रतुर्भवत्युक्थ्यः ॥ ५ ॥ ३२ ॥
इन्द्रः । सहस्रऽदाव्नाम् । वरुणः । शंस्यानाम् ।
क्रतुः । भवति । उक्थ्यः ॥ ५ ॥ ३२ ॥
तयोरिदवसा वयं सनेम नि च धीमहि ।
स्यादुत प्ररेचनम् ॥ ६ ॥
तयोः । इत् । अवसा । वयम् । सनेम । नि । च । धीमहि ।
स्यात् । उत । प्रऽरेचनम् । ॥ ६ ॥
इन्द्रावरुण वामहं हुवे चित्राय राधसे ।
अस्मान्त्सु जिग्युषस्कृतम् ॥ ७ ॥
इन्द्रावरुणा । वाम् । अहम् । हुवे । चित्राय । राधसे ।
अस्मान् । सु । जिग्युषः । कृतम् ॥ ७ ॥

भाषायाम्.

५ इन्द्रो वरुणश् [च] सहस्रदातृणां शासनीयानां [मध्ये स्तः] । [तयो] क्रतु (=प्रज्ञा) उक्थ्यो (=स्तवनीयो) [भवति] ॥

६ तयोरेव अवसा (=अवनेन) वयं [धनं] सनेम (=लभेमहि) निदधीमहि च । अपि च प्ररेचनमस्तु ॥

७ हे इन्द्रावरुणौ अहं चित्राय राधसे युवामाह्वयामि । [युवाम्] अस्मान्सुसु [यथा स्यात्तथा] जिग्युषो (=जितवतो=जययुक्तान्) कुरुतम् ॥

कृपे करावी—'तुमच्या द्रव्यदात्या प्रसादाचे आम्ही [विषय] होऊं असें करा'='वाजदाव्ना युवाकु सुमतीनां भूयाम' म्हणजे तुम्ही आम्हांवर तुमचे द्रव्यदाते प्रसाद (=ज्यापासून द्रव्यप्राप्ति होते असे प्रसाद) करावे

सायणाचार्य—"कारण कीं, प्राचीना "[म्हणजे आमच्या] कर्माचें [जें "सोमरूपी हवि ते] युवाकु म्हणजे "वसतीवरी उदकांनीं आणि दूध "सातू इत्यादि दुसऱ्या द्रव्यांनीं मि "श्रित [आहे] [त्या प्रमाणेच] सु "मतीनां म्हणजे सुशब्दयुक्त अशा "ऋत्विजांचें [स्तोत्ररूप वचनहि] यु"वाकु आहे, म्हणजे नानाविध स्तुत्य "गुणांनीं मिश्रित [आहे], त्यापेक्षां "हे इन्द्रावरुण हो, तशा प्रकारचें हवि "स्वीकारणारे जे तुम्ही त्या तुमच्या "[प्रसादे करून] वाजदाव्ना म्हणजे अ "न्नप्रद पुरुषामध्यें आम्हां [मुख्य] "होऊं असें करा". युवाकु शब्दाचा अर्थ ते 'मिश्रित' असा करितात, आणि 'सोमरूप हवि' आणि 'स्तोत्ररूप वचन' आणि 'मुख्य' हे इतके शब्द अध्याहृत घेतात. परंतु 'युवाकु' शब्दाविषयी सूक्त ३ ऋचा ३ यावर दिलेली १६ व्या पृष्ठावरची 'तुमचे' या विषयींची टीप पाहा

५. सहस्रावधि द्रव्यातें देणारे [आणि] स्तवनीय जे [देव] त्यांतून इंद्र [आणि] त्यांतून वरुण हा [आहे]. [याची] प्रज्ञा स्तुतिपात्र [आहे].

5. Indra [is one] of those [gods] that bestow a thousand-fold wealth [and] deserve to be praised Varuna [too] is [one] of them. [Their] wisdom deserves *to be praised*

६. त्याच दोघांच्या कृपेनें असे घडो कीं, आम्हास [धन] मिळो आणि आम्हास [त्याचा] संग्रह करितां येओ, आणि त्याहूनहि आमच्या जवळ अधिक उरो.

6. Through their favour, *then, may we obtain* [wealth] and may we lay it by, nay, may we have even a surplus.

७. हे इंद्रावरुणांनो, मी सर्वप्रख्यात संपत्ती [मिळण्या]साठीं तुमचा धांवा करीत आहें. तुम्ही आम्हास उत्तम यशस्वी करा.

7. Indra and Varuna, I *invoke you for famous* wealth. Make us great victors

५. आम्हीं होईल तितका पदशः आणि सरळ अन्वय घेऊन अर्थ केला आहे. सायणाचार्य अन्वय किंचित् निराळा घेतात. ते म्हणतात "सहस्रा- "वधि द्रव्यातें देणारे जे त्यांत इंद्र "धनदानाचा क्रतु म्हणजे कर्ता होय, "म्हणजे पुष्कळ धन देतो असा अर्थ. "तसाच वरुण स्तुत्य जे आहेत त्या "जमध्यें उक्थ्य म्हणजे स्तुतिपात्र "आहे, म्हणजे परम स्तवनीय असा "अर्थ." 'क्रतु' शब्दाविषयीं पृष्ठ २६ यांजवर ८ व्या ऋचेवर 'बहुमेधावी' शब्दाविषयीं दिलेली टीप पाहा

६. मंत्रवक्त्याचा भावार्थ असा आहे कीं, 'इंद्रावरुणांच्या कृपेनें आम्हास धन मिळो म्हणजे आम्हीं त्याचा उपभोग घेऊं असें होओ, आणि उपभोगूनहि समहास ठेवितां येईल असें घडो आणि इच्छेप्रमाणे संग्रहीं ठेविल्यानंतरहि आणखी धन उरो'. देवांच्या कृपेने आपलें अमुक कल्याण होओ किंवा आपणास अमुकाची प्राप्ति होओ असे प्राचीन आर्य प्रार्थीत त्याचा हा चांगला मासला आहे.

७. या मंत्रांत प्रथमार्धांत क्रियापद व त्याचा कर्ता हे एकवचनी आहेत. पण शेवटच्या चरणांत 'मला' यशस्वी करा असें न म्हणतां 'आम्हांस' यशस्वी करा असे म्हटलें आहे. याचें कारण इतकेंच कीं, प्रथमार्धांत जें एकवचन आहे तें वृत्तसुखार्थ समजाययाचें. कारण कीं, हें सूक्त जरी मेधातिथीनें रचिलें तथापि तो ज्या कुळांतला पुरुष होता त्या कुळांतील सर्व मनुष्यांच्या वतीनें तो बोलत आहे म्हणून अनेक वचनयुक्त आहे. पूर्वी १४ व्या सूक्तांतील

इन्द्रावरुण नू नु वां सिषासन्तीषु धीष्वा ।
अस्मभ्यं शर्म यच्छतम् ॥ ८ ॥

इन्द्रावरुणा । नु । नु । वाम् । सिसासन्तीषु । धीषु । आ ।
अस्मभ्यम् । शर्म । यच्छतम् ॥ ८ ॥

प्र वामश्नोतु सुष्टुतिरिन्द्रावरुण यां हुवे ।
यामृधाथे सधस्तुतिम् ॥ ९ ॥ २३ ॥ ४ ॥

प्र । वाम् । अश्नोतु । सुऽस्तुतिः । इन्द्रावरुणा । याम् । हुवे ।
याम् । ऋधाथे इति । सधऽस्तुतिम् ॥ ९ ॥ २३ ॥ ४ ॥

भाषायाम्.

८. हे इन्द्रावरुणौ [युवाम्] अस्मभ्य वां सिषासन्तीषु धीष्वा (=धीषु अधिकरणे) शीघ्रमेव शर्म (=स्थलं) यच्छतम् (=दत्तम) ॥

९. हे इन्द्रावरुणौ [अह] यां सुस्तुति हुवे (=उच्चारयामि) सा युवामश्नोतु (=आप्नोतु) । याम् (=अपि च तां) सहस्तुति [युवाम्] ऋध्नुतम् ॥

२ त्या ऋचेंत 'कण्वांनों तुळा ही हाक मारिली आहे' याजवर दिलेली टीप पाहा ='सर्वप्रख्यात सपत्नीसाठीं,'='चित्राय राधसे.' चित्र म्हणजे इतकें सुंदर कीं, ज्याजकडे लोक पाहतात आणि त्याची प्रशंसा व प्रख्याति करितात.

८. हे इंद्रावरुणानो, तुम्हां दोघाची प्राप्ति व्हावी असे जे मनोरथ त्यात तुम्ही आम्हास लौकर लौकर स्थळ द्या.

8 Indra and Varuna, give us a place quickly in those desires which wish for you both.

९. हे इंद्रावरुणानो, [ही] जी मी [तुमची] चांगली स्तुति गात आहें [ती] तुम्हाप्रत प्रविष्ट होओ; आणि ही [तुम्हां दोघाची] एकत्र केलेली स्तुति तुम्ही सफळ करा.

9 Indra and Varuna, may this good praise which I am singing reach you both; and may you fulfil that prayer addressed to you both.

---

८. 'तुम्हां दोघांची प्राप्ति व्हावी असे जे मनोरथ त्यांत' इ० ='वां सिषासन्तीषु धीषु आ'. 'वाम्' ही त्वम् याची द्विवचनी द्वितीया ऋचेचा भावार्थ असा आहे कीं, 'तुमची प्राप्ति व्हावी अशा ज्या बुद्धी त्यांत आम्हास जागा द्या'. म्हणजे तुमची प्राप्ति करून घेण्याविषयीं आम्हास बुद्धी द्या. धीषु ही जर सतिसप्तमी केली तर 'तुम्हां दोघांची प्राप्ति व्हावी असे आमचे मनोरथ असल्यामुळें तुम्ही आम्हास लौकर लौकर आश्रय द्या' असें भाषांतर करावें. परंतु सतिसप्तमी करण्यास 'आ' याची अडचण आहे. सतिसप्तमीच्या मागून 'आ' येत नसतो. आणि हा 'आ' 'यच्छतम्' याजबरोबर उत्तरपादांत येणे बरोबर दिसत नाहीं.

९ मंत्राचे तात्पर्य इतकेंच कीं, हे इंद्रावरुणानो, ही चांगली स्तुति तुमची दोघांची मिळून मी एकत्र केली आहे ती तुम्ही सफळ करा ='चांगली स्तुति'='सुस्तुति' म्हणजे जी चांगली, सुश्राव्य, मधुर, आणि तुम्हास प्राप्य व्हावी म्हणून मी श्रम करून रचिली आहे अशी. सूक्तवक्ता आपल्याच सूक्ताची आपणच प्रशंसा करतो असे समजावयाचें नाहीं, तर जी चांगली होण्याविषयीं आपण फार श्रम केले आहेत ती असा भावार्थ ='जी गात आहें'='यां हुवे'. 'याम्' हें कर्म आणि 'हुवे' हे क्रियापद 'हुवे' याचा अर्थ बहुत करून 'बोलावितों' असा होतो, परंतु केव्हां केव्हां त्याच संबंधाचे दुसरेहि अर्थ होतात. आणि उच्चारणे, गाणें, हाहि अर्थ होतो तो आम्हीं येथें घेतला आहे. (उदाहरणार्थ, 'आदित्यानां नाम अह्वे' असें ऋ. ३.५६.४ यांत, 'अन्धाय भरमह्वयत्' असें ऋ १. ११७ १८ यांत, 'वो नाम हुवे' असें ऋ. ७ ५६. १० यांत आलें आहे ते पाहा) परंतु सायणाचार्य हुवे याचा धात्वर्थ 'बोलावितों' हा कायम ठेवून 'यां सुष्टुतिं [प्रति] हुवे' असा अन्वय करून 'प्रति' याचा (आम्हास वाटतें कीं कारण नसतां) अध्याहार करितात ='आणि ती...... सफळ करा'='याम् ऋधाथे'. 'एकत्र केलेली स्तुति,' 'सधस्तुतिम्.' सधस्तुतिम् ... सह

सूक्तम् १८.

ऋषि कण्वपुत्रो मेधातिथि । १-३ ब्रह्मणस्पति ।४ ब्रह्मणस्पतिरिन्द्रश्च सोमश्च । ५ ब्रह्मणस्पतिर्दक्षिणा च । ६-८ सदसस्पति । ९ सदसस्पति-र्नराशंसो वा । गायत्री च्छन्द ॥

सोमानं स्वरणं कृणुहि ब्रह्मणस्पते ।
कक्षीवन्तं य औशिजः ॥ १ ॥

सोमानम् । स्वरणम् । कृणुहि । ब्रह्मण । पते ।
कक्षीवन्तम् । य । औशिज· ॥ १ ॥

भाषायाम्.

१ हे ब्रह्मणस्पते [त्व] सोमानि (=सोम सुतवन्त) [मां] कक्षीवन्तम् [इव] स्वरण (=प्रकाशनवन्त) कुरु । यः [कक्षीवान्] औशिज [आसीत्] ॥

सूक्त १८.

ऋषि आणि वृत्त पूर्ववत्. देवता—१-५ ब्रह्मणस्पति (परंतु चवथींत इंद्र आणि सोम ह्या आणि पाचवींत दक्षिणा ह्याहि देवता आहेत); ६-९ सदसस्पति (परंतु नवव्वीमध्यें सदसस्पति अथवा नराशंस ही देवता होय).

१. हे ब्रह्मणस्पती, सोम अर्पण करणारा [जो मी त्या म]ला औशिज कक्षीवाना [प्रमाणें] तेजःपुंज कर.

HYMN 18.

To *Brahmaṇaspati* (1-5, with *Indra* and *Soma* in 4 and with *Dakshiṇā* in 5), *Sadasaspati* (6-9, but in 9 *Sadasaspati or Narás'aṁsa*).

1. *Brahmaṇaspati*, make [me], who offer Soma, brilliant [like] Kakshivân the son of Us'ij.

---

१. या मंत्रांत थोडीशी अडचण आहे आणि ती ही की, त्यांत दोन मुख्य शब्दांचा अध्याहार केला पाहिजे. मंत्राचा पदशः अर्थ, 'हे ब्रह्मणस्पते जो औशिज होय त्या सोम अर्पण करणाऱ्या कक्षिवानाला तेज पुंज कर.' परंतु हा मंत्र कक्षीवानानें केलेल्या सूक्तांत नाहीं. कण्वकुळोत्पन्न मेधातिथीनें केलेल्या सूक्तांत आहे म्हणून 'मला' (=मेधातिथीला) हें एक आणि 'प्रमाणें' हें एक अशी दोन पदें सायणाचार्याप्रमाणें अध्याहृत घेऊन आम्हीं निर्वाह केला आहे. परंतु तसें करण्यास निरुपाय आणि सायणाचार्यांचा आधार याशिवाय कारणें नाहींत असें म्हणणें सांप्रत अवश्य आहे.

'औशिज कक्षीवाना [प्रमाणें'= 'कक्षीवन्तं य औशिजः'. औशिज म्हणजे (सायणाचार्य म्हणतात) 'उशिजेचा पुत्र.' ऋ. १. ११२. ११ यावरील भाष्यांत ते म्हणतात कीं, "उशिज् म्हणून दीर्घतमा ऋषीची बायको." पण कथा अशी आहे कीं, कलिंग देशाच्या एका राजास पुत्रसंतान नसल्यामुळे त्यानें आपल्या राणीला दीर्घतमा या नांवाच्या ऋषीकडेस जावयास सांगितलें. पण तो ऋषि वार्धक्यामुळें वगैरे कमनीय नव्हता म्हणून तिणें त्याजजवळ आपली उशिज् नांवाची दासी पाठविली. तिच्या पोटीं दीर्घतमापासून झालेला जो पुत्र त्याचें नांव कक्षीवान्. तोच मागाहून कक्षीवान् ऋषि म्हणून प्रसिद्ध झाला. हा कक्षीवान् पुष्कळ वेदसूक्तांचा कर्ता होय. आणि तो क्षत्रियाच्या दासीचा पुत्र होता म्हणून त्याचीं सूक्तें इतर सूक्तांपेक्षां कमी पूजनीय आहेत असें मानीत नाहींत.

'ब्रह्मणस्पति' पूर्वी १४ व्या सूक्ताच्या तिसऱ्या ऋचेवर दिलेली टीप पाहा.

यो रेवान्यो अमीवहा वसुवित्पुष्टिवर्धनः ।
स नः सिषक्तु यस्तुरः ॥ २ ॥

यः । रेवान् । यः । अमीवऽहा । वसुऽवित् । पुष्टिऽवर्धनः ।
सः । नः । सिसक्तु । यः । तुरः ॥ २ ॥

मा नः शंसो अररुषो धूर्तिः प्रणङ्मर्त्यस्य ।
रक्षा णो ब्रह्मणस्पते ॥ ३ ॥

मा । नः । शंसः । अररुषः । धूर्तिः । प्रणक् । मर्त्यस्य ।
रक्ष । नः । ब्रह्मणः । पते ॥ ३ ॥

स घा वीरो न रिष्यति यमिन्द्रो ब्रह्मणस्पतिः ।
सोमो हिनोति मर्त्यम् ॥ ४ ॥

सः । घ । वीरः । न । रिष्यति । यम् । इन्द्रः । ब्रह्मणः । पतिः ।
सोमः । हिनोति । मर्त्यम् ॥ ४ ॥

भाषायाम्.

२ यो रेवान् [अस्ति] य अमीवहा (=रोगघातको) वसुवित् (संपत्तेर्दाता) [य] पुष्टिवर्धन यश् [च] तुरो (=बलवान्) [अस्ति] स [ब्रह्मणस्पतिः] अस्मान् सिषक्तु ॥

३ हे ब्रह्मणस्पते अस्मानररुषो (=दुष्टस्य) मर्त्यस्य शंसो धूर्तिश् [च] मा प्रणक् (=मा संप्रणश्यतु) । [त्वम्] अस्मान्रक्ष ॥

४ स एव वीरो [भवति] न [च] रिष्यति (=विनश्यति) यमिन्द्र ब्रह्मणस्पति सोमश् [च] हिनोति (=सृजति) ॥

२. जो संपत्तिमान्, जो रोगनाशक, जो द्रव्य मिळवून देणारा, जो अभिवृद्धि करणारा, [आणि] जो शक्तिमान् [होय] तो [ब्रह्मणस्पति] सदैव आमचे पाठबळ असो:

३. दुष्ट मर्त्यांचा शाप [अथवा] उपद्रव आम्हांस न बाधो. हे ब्रह्मणस्पती, तूं आम्हास रक्ष.

४. ज्या मर्त्यावर इंद्र, ब्रह्मणस्पति [आणि] सोम [हे] लोभ करितात तोच [मर्त्य] शूर [होतो आणि तोच मर्त्य] नाश पावत नाहीं.

2. He who is wealthy, who destroys disease, who is liberal, [and] increases prosperity, and who is valiant, may that [Brahmanaspati] be our constant helper.

3. May neither the curse nor the harmful imprecation of the wicked mortal injure us. Protect us, Brahmanaspati.

4. That mortal alone becomes a hero and does not perish whom Indra, Brahmanaspati [and] Soma love

---

२. ब्रह्मणस्पति हा संपत्ति मिळवून देतो, रोग दूर करितो, आणि उपासकांची भरभराट करितो असें वेदांत सांगितलें आहे—'सदैव आमचे पाठबळ असो'='न सिषक्तु.' अक्षरशः अर्थ, 'नित्य आमच्या बरोबर असो,' म्ह आमचे रक्षण करण्यासाठीं नित्य सिद्ध असो

३. 'उपद्रव'='धूर्ति ' सायणाचार्य 'धूर्ति' हे 'शंस' या शब्दाचे विशेषण होय असें समजून ' उपद्रवकारक शाप' असा 'धूर्त. शंस.' याचा अर्थ करितात परंतु प्रयोगांतराकडेस लक्ष्य देऊन आम्हां आपलें भाषांतर केलें आहे—'मर्त्यांचा' मरणशील जो मनुष्य त्याचा 'मर्त्य' हा उत्कृष्ट शब्द आलीकडे व्यवहारांतून गेला आहे, पण मूळ ऋचेचा अर्थ यथायोग्य होण्यासाठीं अप्रसिद्ध असला तरी चांगला हयार्थदर्शक आहे म्हणून आम्ही तो प्रचारांत आणण्याच्या हेतूनें येथे वापरला आहे. व दुसरेहि असेच कितीएक निवडक शब्द या भाषांतरांत वापरीत जाऊं.

४. आर्यजनांचें देवांवर किती अवलंबन होतें ते या मंत्रावरून दिसून येतें. त्यांची अशी पक्की खात्री आणि दृढ भक्ति होती कीं, जर देव करितील तरच आपलें कल्याण होईल—'लोभ करितात'='हिनोति ' या धातूहून 'हित' (लोभ ठेविलेला, प्रीति ज्यावर केली आहे तो, अर्थात् स्नेही) हा शब्द निघाला आहे. आणि 'प्रीति करीत नाहीं तो' अहित=शत्रु—सोम'=

त्वं तं ब्रह्मणस्पते सोम इन्द्रश्च मर्त्यम् ।
दक्षिणा पात्वंहसः ॥ ५ ॥ ३४ ॥

त्वम् । तम् । ब्रह्मणः । पते । सोम । इन्द्र । च । मर्त्यम् ।
दक्षिणा । पातु । अंहसः ॥ ५ ॥ ३४ ॥

*सदसस्पतिमद्भुतं प्रियमिन्द्रस्य काम्यम् ।
सनिं मेधामयासिषम् ॥ ६ ॥

सदसः । पतिम् । अद्भुतम् । प्रियम् । इन्द्रस्य । काम्यम् ।
सनिम् । मेधाम् । अयासिषम् ॥ ६ ॥

भाषायाम्.

५ तं मर्त्यं हे ब्रह्मणस्पते त्वम् [अंहसो] (=दुरितात्) [पाहि] । इन्द्रश्च दक्षिणा [च] अंहसः पातु ॥

६ अद्भुतमिन्द्रस्य प्रियं काम्यं सदसस्पतिम् [अहं] सनिं (=धनं) मेधां [च] याचे ॥

'सोम' येथें सोम ही सोमरसावरची देवता समजावयाची पूर्वोक्त सूक्त ४ ऋचा २ यांतील 'सोम' शब्दावरील टीप २२ व्या पृष्ठावर पाहा

* या मंत्राचा विनियोग अनुमंत्रणीय होमांत करितात

५. त्या मर्त्याला, हे ब्रह्मणस्पती, तूं संकटापासून [रक्ष]; [आणि] सोम, इंद्र [आणि] दक्षिणा हींहि रक्षोत.

६. आश्चर्यकर [आणि] इंद्राचा प्रिय आवडता जो सदसस्पति त्याजवळ मी सपत्ती [आणि] बुद्धी ह्या मागत आहे.

5. Brahmaṇaspati, protect thou and may Soma, Indra and Dakshiṇâ [too] protect that mortal from danger.

6 I pray to the wonderful Sadasaspati, the dear [and] beloved [friend] of India, for wealth [and] wisdom

---

५. 'त्या मर्त्याला' म्हणजे ज्याजवर ब्रह्मणस्पति, सोम, इंद्र हे लोभ ठेवितात असे पूर्वोक्त मंत्रांत सांगितलें त्या भाविक उपासकाला –'दक्षिणा' सायणाचार्य येथे "दक्षिणा या नांवाची देवी" इतकेंच म्हणतात. यज्ञांत ब्राह्मणाला जी गाय दान देत. तिचें नांव दक्षिणा त्यानंतर गाई न देतां दुसरी देणगी ब्राह्मणास दिली तरी तिचेंहि नांव 'दक्षिणा' असें पडलें. प्रस्तुत ठिकाणीं 'दक्षिणा' म्हणजे दक्षिणा जी देणगी तद्रूपी देवता. दक्षिणेस देवता केली यांत आश्चर्य मानण्याजोगें कांहीं नाहीं. कारण मनुष्यांनीं प्यावयाचा आणि देवांस पाजावयाचा जो सोम तोहि देव होऊन बसला व या 'दक्षिणे' देवीबरोबर या मंत्रांतच संनिध आहे.

६. 'आश्चर्यकर'='अद्भुतम्' 'दृष्टीला अगोचर,' 'अदृश्य', 'दृष्टी न पडणारा' असाहि अर्थ होईल –'सदसस्पति' या पदाचा अक्षरशः अर्थ 'घराचा पति.' हे घरावरच्या देवतेचें नांव होय. जसा 'सोम' म्हणजे सोमरसायरची देवता, 'अग्नि' म्हणजे आगीची देवता, 'वायु' म्हणजे वाऱ्याची देवता, 'ब्रह्मणस्पति' म्हणजे स्तुतीची देवता, तशी 'सदसस्पति' म्हणजे गृहदेवता अथवा घराची देवता. सदसस्पतीला (ब्रह्मणस्पतीला बृहस्पति जशी तशी) सदस्पति अशीहि संज्ञा आहे त्याला इंद्राचा प्रिय मित्र आणि आश्चर्यकारक कां म्हटलें आहे कळत नाहीं सायण म्हणतात इंद्राबरोबर तो सोम पीतो म्हणून तो त्याला प्रिय होय वस्तुतः सदसस्पति इंद्राला ज्या यज्ञांत यथेष्ट खाण्याला अन्न आणि पिण्याला सोम मिळतो तसा यज्ञ यजमानाकडून करवितो. म्हणजे घरांत विपुलता असलेली पाहून यज्ञ करावा अशी प्रेरणा उपासकाला होते, म्हणून सदसस्पति हा इंद्राला प्रिय आणि आवडता झाला असावा. आणि इंद्रासारिख्या देवाचा प्रिय आणि आवडता अशी सदसस्पतीसारिख्या क्षुद्र देवाची वाखाणणी करणें हें स्वाभाविक आहे कारण कीं, कोणाहि मनुष्याची आपण स्तुती करूं लागलों म्हणजे तो मनुष्य अमुक एक मोठ्या मनुष्याच्या किंवा राजाच्या प्रीतींतला आहे असें म्हणण्याची चाल आहेच.–'मागत आहे'=अयासिषम्'

यस्मा॑दृ॒ते न सिध्य॑ति य॒ज्ञो वि॑प॒श्चित॑श्च॒न ।
स धी॒नां योग॑मिन्वति ॥ ७ ॥

यस्मा॑त् । ऋ॒ते । न । सिध्य॑ति । य॒ज्ञः । वि॒पः॒ऽचित॑ः । च॒न ।
सः । धी॒नाम् । योग॑म् । इ॒न्व॒ति ॥ ७ ॥

आदृ॑ध्नोति ह॒विष्कृ॑तिं॒ प्राञ्चं॑ कृणोत्यध्व॒रम् ।
हो॒त्रा दे॒वेषु॑ गच्छति ॥ ८ ॥

आत् । ऋ॒ध्नो॒ति॒ । ह॒विःऽकृ॑तिम् । प्राञ्च॑म् । कृ॒णो॒ति॒ । अ॒ध्व॒रम् ।
हो॒त्रा । दे॒वेषु॑ । ग॒च्छ॒ति॒ ॥ ८ ॥

भाषायाम्.

७ यस्मादृते विपश्चितोपि (=विदुषोपि) यज्ञो न सिध्यति स [सदसस्पतिः] धियां (=भक्त्यात्मकबुद्धीनां) योगं (=प्रयोगम्) इन्वति (=प्रेरयति)॥

८. अनन्तरं [सदसस्पतिः] हविष्कृतिमृध्नोति । अध्वरं [च] प्राञ्चं (=निरिच्छतया चलन्तं) करोति । [तदनन्तरमस्माकं] होत्रा (=स्तुतिः) देवेषु गच्छति ॥

सायणाचार्य मागणे, प्रार्थणे हा अर्थ न शाला गेला, प्राप्त झालों असा करितात, आणि सगळ्या मंत्राचें भाष्य "मेधा मिळविण्यासाठीं मी सदस- "स्पतीजवळ प्राप्त झालों आहें; जो "सदसस्पति आश्चर्यकर, इंद्राला प्रिय, "कमनीय, धनदाता (सनि) असा होय" असें करितात. पण 'या' धातूचा अर्थ मागणे, प्रार्थणें, इच्छिणे असा होतो याविषयीं अनेक प्रयोग आहेत. त्यांतून ऋ. १.२४.११ आणि १. ५८. ७ यांत खुद सायणाचार्यांनी या धातूचा अर्थ याचणे, मागणे असा केला आहे तो पाहा. दुसरे प्रयोग अनेक आहेत.

७. ज्याखेरीज प्रज्ञावताचाहि यज्ञ सिद्धीस जात नसतो तो [सदसस्पति] [प्रथमत:] बुद्धींस यजन करण्याविषयींची प्रेरणा करितो;

८ आणि नतर यज्ञपाक सिद्ध करितो [आणि] यज्ञ चालू करितो. [आणि मग आमची] प्रार्थना देवाप्रत जाते.

7 He without whom the sacrifice even of a wise man does not prosper—that [Sadasaspati] [first] prompts the exercise of the pious feelings;

8 and then he perfects the sacrificial food [and] sets the sacrifice in motion [Our] prayer [then] reaches the gods

---

७ मन्त्रवक्त्याचा भावार्थ असा आहे की, देवास यजन करून भजावे अशी जी बुद्धीस प्रेरणा होते ती प्रथम सदसस्पति करितो, (नतर काय करितो तें पुढच्या मन्त्रात पाहा) आणि त्या सदसस्पतीचा पराक्रम असा आहे की, त्याविना मोठ्या विद्वानाचाहि यज्ञ सिद्धीस जात नाही सदसस्पति ती प्रेरणा कशी करितो आणि त्यावाचून यज्ञसिद्धि होत नाही हा पराक्रम त्याला कोठून व कसा आला हें स्पष्ट सांगवत नाही पण घरात सर्व सुख असले म्हणजे यज्ञ करण्याची प्रेरणा होते असा भावार्थ असावा, आणि यज्ञसिद्धीस अवश्य असलेला साधने (धान्य, मांस, सोम इत्यादि) सदसस्पतीकडून न मिळतील तर (म्हणजे घरात नसतील तर) यज्ञ सिद्धीला जाणें नाही असा भावार्थ आहे असें दिसतें

८ यज्ञ करण्याविषयी बुद्धीला सदसस्पति प्रेरणा करितो असें पूर्वोक्त मन्त्रात सांगतले त्यानतर काय होतें तें प्रस्तुत मन्त्रात सांगतो प्रेरणा केल्यावर सदसस्पति यज्ञहवि सिद्ध करितो म्ह॰ उपासकाकडून तयार करवितो आणि यज्ञ चालू (प्राञ्च) करितो आणि नतर आम्हा की देवाची स्तुती करितो ती देवाप्रत प्रविष्ट होते म्हणजे हवि तयार होताच आम्ही देवास येण्याविषयीं आणि ते भक्षण करण्याविषयीं प्रार्थना करितो

'सदसस्पति' म्हणजे ज्याविषयी गृहदेवता अथवा ज्यांत यज्ञसामग्री असते त्या घराची देवता होय, त्याविषयी तो हवि तयार करवितो आणि यज्ञ चालू करवितो असे म्हणण्यांत अर्थयोग्यता आहे यांत सशय नाही

नराशंसं सुधृष्टममपश्यं सप्रथस्तमम् ।
दिवो न सद्ममखसम् ॥ ९ ॥ ३५ ॥

नराशंसम् । सुऽधृष्टमम् । अपश्यम् । सप्रथःऽतमम् ।
दिवः । न । सद्मऽमखसम् ॥ ९ ॥ ३५ ॥

भाषायाम्.

९ [अहं] नराशंसं सुधृष्टमम् (=अतिशयेन धार्ष्ट्ययुक्तं) सप्रथस्तमं (=विस्तीर्णतमं) दिवं सद्ममखसमिवापश्यम् ॥

सूक्तम् १९.

कण्वपुत्रो मेधातिथिर्ऋषिः । अग्निमरुतौ देवता । गायत्री च्छन्दः ॥

प्रति त्यं चारुमध्वरं गोपीथाय प्र हूयसे ।
मरुद्भिरग्न आ गहि ॥ १ ॥

प्रति । त्यम् । चारुम् । अध्वरम् । गोऽपीथाय । प्र । हूयसे ।
मरुत्ऽभिः । अग्ने । आ । गहि ॥ १ ॥

भाषायाम्.

१ [त्वं] त्यं (=तं तं प्रसिद्धं) चारुमध्वरं प्रति (=अध्वरमध्वरं प्रति) गोपीथाय (=सोमपानाय) प्रहूयसे । [तस्मात्] हे अग्ने [त्वं] मरुद्भिः [सह] आगच्छ ॥

९. परम धारिष्टवान्, [आणि] अति विस्तीर्ण नराशंस [अग्नि] मला द्युलोकाच्या स्थानातील तेजानें भरलेला असा दृष्टीस पडला.

9. I have seen the most valiant [and] the most extensive Narás'aṁsa [to be] full of the splendor of the centre of heaven.

९. हा मंत्र कठिण आहे. परंतु त्याचे प्रथमचे दोन चरण सोपे आहेत. शेवटल्या चरणाचाच अर्थ कठिण आहे. 'दिवो न सद्ममखसम्' यांतील विशेषणाचा आणि उपमेचा अर्थ काय आहे तो कळत नाही. सद्ममखसम् म्हणजे सायणाचार्य सन्नमहसम्= प्राप्ततेजस्कम् असा अर्थ करितात; आणि शेवटील पादाचें, " [सूर्यचंद्रादि] दिव्य लोकाप्रमाणे तेजस्वी असा जो नराशंस त्यास" असे भाष्य करितात.

वस्तुतः भावार्थ असा दिसतो की, 'मी नराशंस पाहिला तो इतका अतिप्रचंड (सुधृष्टम) आणि इतका परम विस्तीर्ण (सप्रथस्तम) होता कीं, तो सूर्यलोकाप्रमाणे देदीप्यमान दिसला.' परंतु सद्ममखसम् याचा अर्थ फार संदिग्ध आहे यांत सशय नाहीं.

कितीएकांच्या मते सद्ममखसम् म्हणजे 'सदनीं (=यज्ञशाळेंत) मख (=यज्ञ) करणारा' असा अर्थ. परंतु 'दिवो न' याचा अर्थ मग नीट होणार नाहीं. कसेहि करून या अंत्यचरणाविषयीं निर्वाह करणें आहे असे म्हणणे भाग आहे.

'नराशंस' हें अग्नीचे नांव आहे याविषयीं सू. १३ ऋ. ३ यावरील टीप पाहा.

नराशंस मंत्रवक्त्याच्या दृष्टीस पडला व तो सूर्यलोकाप्रमाणें तेजःपुंज होता तो कसा याची कल्पनाच करणें आहे

सूक्त १९.

ऋषि आणि वृत्त पूर्वीप्रमाणे. देवता अग्नि आणि मरुत्.

Hymn 19

To *Agni* and the *Maruts*. Author and Metre as before.

१. जो जो म्हणून सुंदर यज्ञ असतो त्या त्या यज्ञाप्रत सोम पिण्यास तुला बोलावीत असतात; [तर] हे अग्नी, मरुतांसह तू येथे ये.

1. To every handsome sacrifice thou art invoked to drink the Soma; come hither, Agni, with the Maruts.

१. 'जो जो म्हणून सुंदर यज्ञ असतो त्या त्या यज्ञाप्रत,'=' त्य चारुमध्वरम्' 'त्य' हे सर्वनाम जरी 'स' या अर्थी आहे तथापि त्याचा भावार्थ

नहि देवो न मर्त्यो महस्तव क्रतुं परः ।
मरुद्भिरग्न आ गहि ॥ २ ॥

नहि । देवः । न । मर्त्यः । महः । तव । क्रतुम् । परः ।
मरुत्ऽभिः । अग्ने । आ । गहि ॥ २ ॥

ये महो रजसो विदुर्विश्वे देवासो अद्रुहः ।
मरुद्भिरग्न आ गहि ॥ ३ ॥

ये । महः । रजसः । विदुः । विश्वे । देवासः । अद्रुहः ।
मरुत्ऽभिः । अग्ने । आ । गहि ॥ ३ ॥

भाषायाम्.

२ महतस्तव क्रतु (=यज्ञं) पर (=परस्तात्) देवो न हि [अस्ति] मर्त्य [अपि] न [अस्ति] । [तस्मात्] हे अग्ने [त्व] मरुद्भि [सह] आगच्छ ॥

३ ये अद्रुहो (=द्वेषरहिता) देवा [मरुत] महतो रजसो (=महतोन्तरिक्षलोकस्य) विदु (=निवासस्थानत्वेन जानन्ति) । हे अग्ने [त्व] [ते] विश्वै (=सकलै) मरुद्भि [सह] आगच्छ ॥

आम्हां येथें दिल्याप्रमाणे असतो

ऋचेचा भावार्थ असा आहे का 'हे अग्नी, जो कोणी सुदर यज्ञ करितो तो तला आपल्या यज्ञाप्रत सोम पिण्यास बोलावीत असतो यास्तव मरुतांस घे ऊन तू या आमच्या यज्ञाप्रत ये' 'गोपीपाय' याचा अर्थ 'सोम पिण्यास' हा सायणाचार्याप्रमाणे केला आहे परतु 'दूध पिण्यास' असा अर्थ चागला समवतो

मरुत् म्हणजे सामान्य देव नव्हेत, तर वायुरूपी देवता होत याविषयी पृष्ठ ४० सूक्त ६ मत्र ५ यावरील टीप पाहा

२. कारण की महान् असा जो तूं त्या तुझ्या प्रज्ञेपलीकडे [कोणी] देव नाहीं, [कोणी] मर्त्य नाहीं; [तर] हे अग्नी, मरुतासह तूं येथें ये.

३ हे अग्नी, जे [मरुत्] देव महान् अतरिक्षात राहत असतात [आणि] जे कोणाचें घाईट करणारे नव्हेत त्या सकल मरुतासह तू येथें ये

2 For neither god nor mortal is above the wisdom of thee, who art great, come hither, Agni, with the Maruts

3. Those that dwell in the vast ethereal regions [and] are harmless,—come hither, Agni, with all those divine Maruts.

---

२ या ऋचेचा भावार्थ असा आहे की, 'हे अग्नी, तू इतका बुद्धिमान् आहेस का, तुझ्या बुद्धीच्या पलीकडे देव जाऊ शकत नाहीं आणि मर्त्य मनुष्यहि जाऊ शकत नाहीं यास्तव हे अग्नी, तू मरुतांस घेऊन आमच्या या यज्ञाप्रत ये '

या ऋचेत जो पर' शब्द आहे त्याचा अर्थ आम्हा पलीकडे' असा अव्ययार्थी केला आहे सायणाचार्य 'पर ' म्हणजे 'उत्कृष्ट' असा अर्थ करितात, आणि 'क्रतुम्' म्हणजे कर्मविशेष' असा अर्थ करून 'उल्लङ्घ्य' (=उल्लङ्घन करून) या पदाचा अभ्याहार करितात परंतु पर हें येथे अंतोदात्त पद आहे, त्याचा अर्थ अव्ययार्थी 'वर', 'पलीकडे', 'आधक' असा होतो आणि 'श्रेष्ठ' या अर्थाचा पर' शब्द आद्युदात्त (पर) आहे याविषयी सूक्त ८ ऋचा ५ याजवर दिलेली ५४ व्या पृष्ठावरील टीप पाहा

क्रतु' शब्दाचा अर्थ 'बुद्धि' असा होतो याविषयी पूर्वी पुष्कळ ठिकाणा सांगितलच आहे पृष्ठ ३४ सूक्त ५ मत्र ८ याजवरील टीप पाहा

३ 'जे महान् अतरिक्षात राहत असतात,'='ये महो रजसो विदु ' अक्षरश अर्थ, 'जे मोठ्या अतरिक्षाप्रत जाणतात' म्हणजे ज्यास मोठ्या अतरिक्षाचा परिचय आहे 'जे अतरिक्ष प्रदेशात राहतात' हे विशेषण वायुरूपी देवास योग्य आहे यात सशय नाहा

'कोणाचे घाईट करणारे नव्हेत,'= 'अद्रुह ' म्हणजे निरूपद्रवी,=दुसऱ्या देवांप्रमाण दु ख देणारे नव्हेत, कल्याण करणारे

सायणाचार्य 'ये महो रजसो विदु ' याचा अर्थ 'जे वर्षण प्रकार जाणतात' असा करितात परतु 'रज ' म्हणजे अतरिक्षादि लोक असा अर्थ यास्कांनी केला आहे आणि मरुत् हे अतरिक्ष प्रदेशात राहतात असें पुष्कळ ठिकाणीं वेदात आल आहे

ये उग्रा अर्कमानृचुरनाधृष्टास ओजसा ।

मरुद्भिरग्न आ गहि ॥ ४ ॥

ये । उग्राः । अर्कम् । आनृचुः । अनाधृष्टासः । ओजसा ।

मरुत्ऽभिः । अग्ने । आ । गहि ॥ ४ ॥

ये शुभ्रा घोरवर्पसः सुक्षत्रासो रिशादसः ।

मरुद्भिरग्न आ गहि ॥ ५ ॥ ३६ ॥

ये । शुभ्राः । घोरऽवर्पसः । सुऽक्षत्रासः । रिशादसः ।

मरुत्ऽभिः । अग्ने । आ । गहि ॥ ५ ॥ ३६ ॥

ये नाकस्याधि रोचने दिवि देवास आसते ।

मरुद्भिरग्न आ गहि ॥ ६ ॥

ये । नाकस्य । अधि । रोचने । दिवि । देवासः । आसते ।

मरुत्ऽभिः । अग्ने । आ । गहि ॥ ६ ॥

भावार्थम्.

४ ये उग्रा (=प्रचण्डा) [स्वेन] ओजसा (=बलेन) अनाधृष्टा (=अतिरस्कृता) [मरुत] अर्कमानृचु (=गायन जगु), हे अग्ने [त्व] [तै] मरुद्भि [सह] आगच्छ ॥

५ ये [मरुत] शुभ्रा (=शोभमाना) घोररूपा सुबला रिशादस. (=शत्रुघातकाश्) [च], हे अग्ने [त्व] [तै] मरुद्भि [सह] आगच्छ ॥

६ ये देवा [मरुत] नाकस्योपरि रोचने (=तेजस्विनि) द्युलोके आसते, हे अग्ने [त्व] [तै] मरुद्भि [सह] आगच्छ ॥

४. हे अग्नी, जे प्रचंड [मरुत्] गायन गात असतात [आणि] ज्यांचे बळ इतके आहे कीं, त्यास कधींहि कोणी जिंकिलेलें नाहीं, त्या मरुतांसह, तूं येथें ये.

५. हे अग्नी, जे तेजस्वी, घोररूपधारी, सुप्रतापी [आणि] शत्रूंते खाऊन टाकणारे [असे होत], त्या मरुतांसह तूं येथें ये.

६. हे अग्नी, जे मरुदेव आकाशावर [असलेल्या] देदीप्यमान स्वर्गी [आहेत], त्या मरुतांसह तूं येथें ये.

4 [Those] mighty [Maruts] that sing the song [and] that by virtue of their power remain unconquered —come hither, Agni, with those Maruts

5 [Those] who are resplendent, have frightful shapes, are great in power, [and] are destroyers of the enemy—come hither, Agni, with those Maruts.

6 [Those] divine [Maruts] who sit in resplendent heaven above the sky—come hither, Agni, with those Maruts

---

४. ऋचेचा भावार्थ असा आहे कीं जे मरुत् प्रचंड होत, जे अंतरिक्षांत वायुगर्जनारूप गायन गातात आणि ज्यांचें बळ इतके अनिवार्य आहे कीं, त्यास कोणी जिंकू शकत नाहीं अशा मरुतांसह, हे *अग्नी*, तूं येथें ये.

'गायन गात असतात'='अर्कम् आनृचु.' 'अर्क' शब्दाचे अर्थ दोन आहेत, किरण आणि गायन. आणि 'अर्क' शब्द ज्या अर्च् धातूपासून निघाला आहे त्याचेहि दोन अर्थ होतात. प्रकाशणें, आणि गाणें. दोन्हीहि अर्थ वेदांत प्रसिद्ध आहेत. 'आनृचु' हा पूर्णभूतकाळ *रीतिवर्तमान* काळाच्या अर्थी योजिला आहे. व असे प्रयोग वेदांत अनेक ठिकाणीं येतात, त्यांचीं उदाहरणें पूर्वी दिलीच आहेत — 'ज्यांचें बळ इतकें आहे कीं, त्यास कधींहि कोणी जिंकिलें नाहीं'. हा अर्थ 'अनाधृष्टास ओजसा' या दोन शब्दांचा आहे. 'अनाधृष्टास' म्हणजे, तुम्हीं माझ्या बरोबर लढण्यास या असें ज्यांस म्हणण्यास कोणासहि धैर्य होत नाहीं ते आम्हीं केलेलें भाषांतर अक्षरशः नाहीं. स्पष्ट अर्थ समजावा म्हणून *विस्तरानें* केलें आहे

५ या मंत्रांत मरुदेवांस लाविलेलीं तेजस्वी, घोररूपधारी इत्यादि विशेषणें लक्ष्यांत ठेवण्याजोगीं आहेत 'घोररूपधारी,' 'सुप्रतापी,' आणि 'शत्रूंते खाऊन टाकणारे' हीं विशेषणें मित्र आणि पूज्य देवतेस कितीहि अयुक्त असलीं तरी तीं मरुतांसारिख्या देवतांस शोभतात यांत संशय नाहीं।

६. मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, आकाशाविशीहि उंच असा जो द्युलोक त्यांत वास करणाऱ्या मरुतांसह आगमन कर. जिसच्या मंत्रांत मरुदेव अंतरिक्ष

य ईङ्खयन्ति पर्वतान्तिरः समुद्रमर्णवम् ।
मरुद्भिरग्न आ गहि ॥ ७ ॥

ये । ईङ्खयन्ति । पर्वतान् । तिरः । समुद्रम् । अर्णवम् ।
मरुत्ऽभिः । अग्ने । आ । गहि ॥ ७ ॥

आ ये तन्वन्ति रश्मिभिस्तिरः समुद्रमोजसा ॥
मरुद्भिरग्न आ गहि ॥ ८ ॥

आ । ये । तन्वन्ति । रश्मिऽभिः । तिरः । समुद्रम् । ओजसा ।
मरुत्ऽभिः । अग्ने । आ । गहि ॥ ८ ॥

भाषायाम्.

७ ये [मरुत.] पर्वतान् (=मेघान्) तिर अर्णव समुद्र (=क्षुब्धं समुद्रम्, अन्तरिक्षरूपिण समुद्रात्परस्तात्) ईङ्खयन्ति (=गमयन्ति), हे अग्ने [त्व] [तै] मरुद्भि [सह] आगच्छ ॥

८ ये [मरुत] रश्मिभि (=स्वकीयतेजस किरणै) ओजसा [च] तिर समुद्रम् [आत्मानम्] आतन्वन्ति (=प्रसारयन्ति), हे अग्ने [त्व] [तै] मरुद्भि [सह] आगच्छ ॥

राहतात असें सांगितले त्यास येथे वस्तुत विरोध येत नाही, कारण की, कोणत्याहि देवतेची प्रशसा करूं लागले म्हणजे अर्वाचीन कवींप्रमाणे प्राचीन ऋषी सुद्धा खरोखर असलेल्या गुणांपेक्षा अथवा योग्यतेपेक्षां अधिक गुणांचा अथवा योग्यतेचा आरोप त्या त्या देवतांवर करीत असतात

७. जे [मरुत्] पर्वतांस खवळलेल्या समुद्रापलीकडे हाकून नेतात त्या मरुतासह, हे अग्नी, तू येथें ये.

८ जे [मरुत्] [आपल्या] किरणानीं [आणि] तेजानें सर्व व्यापून समुद्रापलीकड जातात त्या मरुतासह, हे अग्नी, तू येथें ये

7 [Those Maruts] who drive away the mountains across the waving sea —come hither, Agni, with those Maruts

8 [Those Maruts] who spread themselves beyond the ocean with [their] rays [and] splendor—come hither, Agni, with those Maruts

---

७ या ऋचेचा भावार्थ असा आहे की, अतरिक्षरूपी समुद्रापलीकडे मेघरूपी पर्वतांस हाकून लावणारे जे मरुत् त्यांसह अग्नीने यावें

'पर्वतांस', 'पर्वतान्' 'पर्वत' शब्दाचा अर्थ मेघ असा अर्वाचीन संस्कृतांत तर होतोच पण तो कशाकरितां होतो त्या कारणाचे बीज या व अशा प्रकारच्या मत्रांत आहे ते लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे जे जे शब्द पर्वतवाचक ते ते याप्रमाणेच मेघवाचक झाले आहेत -'खवळलेल्या', 'अर्णवम्' हा 'अर्णव' शब्द येथें विशेषणार्थी आहे, साधारण सस्कृतात नेहमी नामार्थी असतो, व उदक असाच त्याचा अर्थ होतो

'समुद्रापलीकडे'= तिर समुद्रम्' 'तिर' हें शब्दयोगि अव्यय असून त्याचा सबध द्वितीयान्त नामाशीं होतो सायणाचार्य 'तिर' हें क्रियाविशेषण समजून 'कुर्वन्ति' असें क्रियापद अध्याहृत घेतात, आणि "अर्णं म्हणजे "उदकयुक्त समुद्रामत तिरस्कृत करितात म्हणजे खवळवितात" असा अर्थ क रितात पण तसे करण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं 'तिर' हे शब्दयोगि अव्यय आहे यास्तव 'पर्वतान् तिर अर्णव समुद्रमीङ्खयन्ति' असा अन्वय करणें उचित आहे

मरुत् म्हणजे वायुरूपी देवता मेघरूपी पर्वतांस अतरिक्षरूपी समुद्रापलीकडे हाकून लावीत असतात ही केवळ स्वभावोक्ति आहे, तेव्हां त्याविषयां विशेष सांगावयास नको

८ मत्राचा भावार्थ —मरुत् आपले किरण आणि आपल तेज अतरिक्षरूपी समुद्रापलीकडेहि पसरतात, म्हणजे ज्यांच्या तेजाचे किरण सर्व अतरिक्ष व्यापून त्याच्या पलीकडेहि पोंहचतात त्या मरुतांसह अग्नीनें येथें यावें

मरुतांस तेज म्हणजे बळ आहे असे म्हणण हे योग्यच आहे, पण त्यांच्या प्रकाशाचे किरण सर्व आकाश व्यापून त्या पलीकडेस पसरतात असें म्हणणं ही केवळ मरुतांची प्रशस्ति दिसते या मत्रांत तरी समुद्र' म्हणजे अंतरिक्षरूपी समुद्र समजला पाहिजे

अभि त्वा पूर्वपीतये सृजामि सोम्यं मधु ।
मरुद्भिरग्न आ गहि ॥ ९ ॥ ३७ ॥ १ ॥

अभि । त्वा । पूर्वऽपीतये । सृजामि । सोम्यम् । मधु ।
मरुत्ऽभिः । अग्ने । आ । गहि ॥ ९ ॥ ३७ ॥ १ ॥

भाषायाम्.

९ पूर्वपीतये (=सर्वेभ्योपि देवेभ्य पूर्वं पातुम्) मधुर सोम त्वामभि सृजामि (=आवर्जयामि) । [तस्मात्] हे अग्ने त्व मरुद्भि. [सह] आगच्छ ॥

सूक्तम् २०.

कण्वपुत्रो मेधातिथिर्ऋषि । ऋभवो देवता । गायत्री छन्द ॥

अयं देवाय जन्मने स्तोमो विप्रेभिरासया ।
अकारि रत्नधातमः ॥ १ ॥

अयम् । देवाय । जन्मने । स्तोम. । विप्रेभिः । आसया ।
अकारि । रत्नऽधातम. ॥ १ ॥

भाषायाम्.

१ अय रत्नधातम (=रत्नानि अतिशयेन दातृतम) स्तोम विप्रै (=अस्माभि ऋत्विग्भि) [ऋभ्वात्मने] दिव्यजनाय आसया (=समक्षम्) अकारि (=रचितोस्ति) ॥

९. [सर्वांच्या] अगोदर [तुला] प्यावयास मिळावें म्हणून [हें] सोमरसाचें मधुर पेय मी तुला अर्पण करीत आहें; तर हे अग्नी, तू मरुतांसह येथे ये.

9. To thee I pour out the sweet drink of Soma, that thou mayest drink first [of all]—come hither, Agni, with the Maruts.

९. मंत्राचा भावार्थ स्पष्टच आहे. पण त्यांत लक्ष्यांत ठेवण्याजोगें इतकें आहे कीं, मंत्रवक्ता ऋषि एकाद्या लाडक्या मुलाचें प्रीतिपूर्वक गोड शब्दांनीं लालन करितात तसें अग्नीचें लालन करून म्हणतो कीं, सर्व देवांस अर्पण करण्यापूर्वी तुला सोम अर्पण करीत आहें, यास्तव मरुतांस घेऊन तू ये आणि सोमपान कर.

यांत सोमपानासाठीं अग्नीनें मरुतांसह यावें म्हणून ऋषीनें कशी विनवणी केली आहे तिच्याकडेस लक्ष्य दिलें पाहिजे.

सूक्त. २०

ऋषि आणि वृत्त पूर्वीप्रमाणें.
देवता ऋभु.

१. अत्यंत विपुल संपत्ति देणारें हें स्तोत्र [या ऋभूच्या] दिव्य गणासाठीं स्तोत्यांनीं [ऋभूच्या] समक्ष रचिलें आहे.

Hymn 20

To the *Ribhus* Author and Metre as before

1. This hymn, the best giver of wealth, is composed extempore by the poets in honour of the divine race of the Ribhus.

१. हें सूक्त ऋभु या देवांविषयीं आहे. ऋभु हे प्रथम मनुष्य असून मागाहून देव झाले असें वेदांत सांगितलें आहे. ते तिघे आहेत; एकाचें नांव ऋभु, दुसऱ्याचें विभु आणि तिसऱ्याचें नांव वाज. ते देवांचे कारागिर होते त्यांनीं इंद्रास रथ आणि घोडे करून दिले त्यांच्या बापाचें नांव 'आंगिरस सुधन्वा' ऋभूंस सूर्यानें अमर केलें त्यांनीं आपल्या आईबापांस म्हातारपणांतून तरुण केलें. ते त्वष्टा या देवाचे शिष्य होत. त्वष्ट्यानें एक यज्ञपात्र (चमस) केलें होतें, त्याचीं ऋभूंनीं आपल्या चातुर्याच्या योगानें चार पात्रें केलीं म्हणून त्वष्ट्यास राग वाटला आणि त्यामुळें त्यानें ऋभूंस मारण्याचा प्रयत्न केला. ऋभु हे आकाश तोलून धरितात त्यांनीं अनेक वेगवेगळ्या प्रकारचीं संकटें निवारिलीं, असें कित्येक सूक्तांत सांगितलें आहे ऋभुविषयाचीं सूक्तें फार चमत्कारिक आहेत. तीं पुढें येत जातील.

य इन्द्राय वचोयुजा ततक्षुर्मनसा हरी ।
शमीभिर्यज्ञमाशत ॥ २ ॥

ये । इन्द्राय । वचःऽयुजा । ततक्षुः । मनसा । हरी इति ।
शमीभिः । यज्ञम् । आशत ॥ २ ॥

तक्षन्नासत्याभ्यां परिज्मानं सुखं रथम् ।
तक्षन्धेनुं सबर्दुघाम् ॥ ३ ॥

तक्षन् । नासत्याभ्याम् । परिऽज्मानम् । सुऽखम् । रथम् ।
तक्षन् । धेनुम् । सबःऽदुघाम् ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. ये इन्द्राय वचोयुजौ (=वचसैव युज्यमानौ) हरी (=हर्यश्वौ) मनसा (=मन सकल्पेन मनश्चातुर्येण वा) ततक्षु (=अकार्षु) [ते ऋभव] [तादृशी-भि.] शमीभि. (=चातुर्यकर्मभि) यज्ञमाशत (=यज्ञियत्व प्रापु) ॥

३. [ऋभव] नासत्याभ्या परिज्मान (=परिगन्तार) सुख रथमतक्षन् [ते] सबर्दुघा (=क्षीरस्य दोग्ध्री) धेनुमतक्षन् ॥

या पहिल्या मत्राचे तात्पर्य असें आहे कीं, सूक्त गाणारे जे आम्ही त्या आम्हा कवींनी हे सूक्त ऋभुगणासाठीं येथल्या येथेच ऋभूसमक्ष रचिलें आहे, म्हणजे पूर्वी पाठ करून तें आता या ठिकाणी आम्ही म्हणत आहों असे नाहीं; आतांच्या आतांच रचून म्हणत आहों

ऋभूच्या समक्ष आतांच्या आतांच सूक्त रचून गात आहो हा जो अर्थ सांगितला तो लक्ष्यात ठेविला पाहिजे कारण कीं, त्यावरून वेदांतील सर्व सूक्तें अनादि आहेत असे जे म्हणणे तें कस सिद्ध होतें असा प्रश्न निघतो.

'अत्यत विपुल सपत्तीने देवविणारे', 'रत्नधातम'. अक्षरश अर्थ, 'संपत्तीने अतिशयेकरून देणारे' म्हणजे हें स्तोत्र आम्ही गाइले, म्हणजे आम्हांस ऋभुदेव अति विपुल संपत्ती देतील

'[ऋभूच्या] दिव्य गणासाठीं,' 'देवाय जन्मने' म्ह. ऋभुदेवांचा जो गण त्यासाठीं

'समक्ष'='आसया' म्हणजे 'तोंडावर,' 'समुख' अक्षरश, 'तोंडाने' 'समक्ष' हा पर्यवसित अर्थ प्रयोगांतरावर लक्ष्य देऊन केला आहे

'स्तोत्यांनीं'=विप्रेभि, म्हणजे आम्ही जे कवी त्यांहीं सूक्त रचणारा आणि गाणारा वस्तुत एकलाच मेधातिथि आहे, तथापि 'आम्ही स्तोत्यांनीं' हा अनेकवचनी प्रयोग कां केला याविषयी पूर्वी सांगितलेच आहे

२. जे [ऋभु] तोंडानें आज्ञा केल्यावरोवर जुपली जाणारी घोड्यांची जोडी इंद्राकरितां मनःसंकल्पानें निर्मिते झाले ते [ऋभु] आपल्या कौशल्यकृत्यांच्या योगानें यज्ञाप्रत पावले.

३. ते सभोंवताली फिरणारा सुखकारक रथ अश्वींकरितां निर्माण करिते झाले. ते दूध देणारी गाय निर्माण करिते झाले.

2. [The Ribhus] who by their wisdom fashioned for Indra his pair of tawny horses that yoke themselves at his command, attained the sacrifice by their acts of skill.

3. They fashioned for the truthful As'vins their chariot, circumambient and easy. They fashioned the cow that gives ambrosia.

---

२. या मंत्राचा भावार्थ असा आहे की, ऋभूंनी इंद्राचे घोडे करून दिले हें जे त्यांचे कौशल्याचे कृत्य त्या कृत्यामुळे आणि दुसऱ्या अशाच कौशल्याच्या कृत्यांमुळे ते देवत्व पावले आणि त्यानंतर त्यांस मनुष्ये यज्ञ करू लागलीं.

'तोंडाने आज्ञा केल्यावरोबर जुंपली जाणारी,' 'वचोयुजा'. म्हणजे ज्यास हाताने जोडावयाचे अवश्य नाहीं, जोडले जा असे सांगितले म्हणजे आपले आपण त्यास जोडले जातात अशा घोड्यांची जोडी.

इंद्रासाठीं घोडे करून दिले हा ऋभूंचा पराक्रम या मंत्रांत वर्णिला आहे आणि प्रथम मनुष्य असून आपल्या कौशल्याने देवांसाठीं घोडे वगैरे करून दिले म्हणून ऋभु देव झाले असे सांगण्याचा भावार्थ आहे.

३. या मंत्रांत ऋभूंनीं अश्विदेवांस रथ करून दिला हा त्यांचा पराक्रम वर्णिला आहे. आणि क्षीर देणारी धेनु त्यांणी निर्माण केली हाहि पराक्रम वर्णिला आहे. ही धेनु कोणती व कोणासाठीं त्यांनीं निर्मिली ते या ऋचेवरून समजत नाहीं. जिला मागाहून कामधेनु म्हणूं लागले आणि जिच्या विषयीं पुराणांतरीं वगैरे अनेक कथा आपण वाचतो तीच ही? किंवा जसे इंद्राला घोडे करून दिले, आणि अश्वींस रथ करून दिला तशीच ही गाय दुसऱ्या एकाद्या देवास अथवा एकाद्या उपासकास करून दिली ते समजत नाहीं.

'सभोंवताली फिरणारा' म्हणजे पृथ्वीसभोंवताली फिरणारा, सूर्याप्रमाणे पृथ्वीसभोंवताली प्रदक्षिणा करणारा, अर्थात् आकाशांतून पृथ्वीसभोंवताली नेणारा.

'अश्वींकरितां' अश्वी हे कोण देव आहेत त्याविषयीं पूर्वी टीप दिली आहे ती पृष्ठ १४ वर सूक्त ३ ऋचा १ यावर पाहा.

युवा॑ना पि॒तरा॒ पुन॑: स॒त्यम॑न्त्रा ऋजू॒यव॑: ।
ऋ॒भवो॑ वि॒ष्ट्य॑क्रत ॥ ४ ॥
युवा॑ना । पि॒तरा॑ । पुन॒रिति॑ । स॒त्यऽम॑न्त्राः । ऋ॒जुऽयव॑: ।
ऋ॒भव॑: । वि॒ष्टी । अ॒क्र॒त ॥ ४ ॥
सं वो॒ मदा॑सो अग्म॒तेन्द्रे॑ण च म॒रुत्व॑ता ।
आ॒दि॒त्येभि॑श्च॒ राज॑भिः ॥ ५ ॥ १ ॥
सम् । वः॒ । मदा॑सः । अ॒ग्म॒त॒ । इन्द्रे॑ण । च॒ । म॒रुत्व॑ता ।
आ॒दि॒त्येभि॑: । च॒ । राज॑ऽभिः ॥ ५ ॥ १ ॥
उ॒त त्यं च॑म॒सं नवं॒ त्वष्टु॑र्दे॒वस्य॒ निष्कृ॑तम् ।
अक॑र्त च॒तुर॒: पुन॑: ॥ ६ ॥
उ॒त । त्यम् । च॒म॒सम् । नव॑म् । त्वष्टु॑: । दे॒वस्य॑ । निःऽकृ॑तम् ।
अक॑र्त । च॒तुर॑: । पुन॒रिति॑ ॥ ६ ॥

भाषायाम्.

४ सत्यमन्त्रा (=सत्यवचना) ऋजूयव (=ऋजव) ऋभवो विष्टचा (=चातुर्यकर्मणा) स्वकीयौ पितरौ पुनर्युवानावकार्षु ॥

५ [हे ऋभव] मदयुक्ता सोमा मरुत्वता इन्द्रेण च राजभिरादित्यैश्च सह युष्मान्समगच्छन्त ॥

६ उत (=अपि च) त्य (प्रसिद्ध) देवेन त्वष्ट्रा कृत नवं चमस [यूयं] पुनश्चतुर अकृषत ॥

४. सत्यवचनी [आणि] प्रामाणिक ऋभु कौशल्याच्या योगानें [आपल्या] आईबापांस पुनः तरुण करिते झाले.

५. [नंतर हे ऋभुदेव हो], मरुद्युक्त इंद्राबरोबर [आणि] राजे आदित्य यांजबरोबर तुम्हांस मदकारक सोम प्राप्त झाले.

६. शिवाय त्वष्टा देवानें तयार केलेला जो तो नवा पेला त्याचे तुम्ही पुनः चार पेले करिते झालां.

4. The truth-speaking, honest Ribhus made [their] parents young again by their [skilful] work.

5. [Then O Ribhus] you came to be offered the intoxicating Somas, in company with Indra accompanied by the Maruts, and with the kingly Ādityas.

6. Besides, you again made into four that new bowl fashioned by the god Tvashtā.

---

४. ऋभूंनीं आपल्या आईबापांस वृद्धवयांत पुनः तरुण केले हा एक त्यांचा पराक्रम पुष्कळ ठिकाणीं वेदांत सांगितला आहे तोच या मंत्रांत आला आहे.

'सत्यवचनी'='सत्यमन्त्राः.' याचा 'ज्यांची योजना बिनचूक आहे ते' असाहि अर्थ होण्याचा संभव आहे.

'कौशल्याच्या योगानें'='विष्टी.' हे 'विष्टी' पद येथें तृतीयान्त क्रियाविशेषण आहे. अक्षरशः अर्थ, 'कृत्यानें', 'कामानें' असा आहे. त्यावरून कौशल्यकृत्यानें असें तात्पर्य

५. या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, वर सांगितलेलीं कृत्यें ऋभूंनीं केल्यानंतर ऋभूंस अमरत्व प्राप्त झालें आणि त्यांस इंद्रादि देवांप्रमाणें सोम अर्पण होऊं लागला.

'मरुद्युक्त इंद्राबरोबर' म्हणजे ज्याजबरोबर मरुत् आहेत अशा इंद्रासह.

'आदित्यांबरोबर' इ०. सायनाचार्य म्हणतात कीं, "ऋभूंस इंद्रादि" त्यांसह तृतीयसवनाच्या वार्णी सो" मपान असतें " 'आदित्य' याविषयीं सू. १४ ऋ. ३ यावरील पृष्ठ १०२ वर टीप पाहा.

या मंत्रांत आदित्यांस राजे असें म्हटलें आहे त्याजकडेस लक्ष्य द्यावें. ऋग्वेदांत देवांस 'राजे' म्हणण्याची चाल पुष्कळ आहे. उदाहरणार्थ.—"राजन् एनांसि शिश्रथः कृतानि " असें वरुणास म्हटलें आहे (१. २४. १४. यांच सूक्तांतले ७. ८. १२. १३ हे मंत्र पाहा). न य राजा इन्द्रः आ दभत् १. १७८. २,युष्मी राजा वृत्रहा सोमपावा ५.४०.४, असें इंद्राविषयीं म्हटलें आहे; वरुण मित्र. अर्यमा क्षत्रे राजानः आसत ७ ६६.११, आणि नि दुर्गा पि द्विषः पुरो प्रन्ति राजान एषाम् १.४१. ३ असें आदित्यांविषयीं म्हटलें आहे. यांशिवाय दुसरे अनेक प्रयोग आहेत. देवांस राजा अ-

ते नो रत्नानि धत्तन त्रिरा साप्तानि सुन्वते ।
एकमेकं सुशस्तिभिः ॥ ७ ॥

ते । नः । रत्नानि । धत्तन । त्रिः । आ । साप्तानि । सुन्वते ।
एकम्ऽएकम् । सुशस्तिऽभिः ॥ ७ ॥

अधारयन्त वह्नयोऽभजन्त सुकृत्यया ।
भागं देवेषु यज्ञियम् ॥ ८ ॥ २ ॥

अधारयन्त । वह्नयः । अभजन्त । सुऽकृत्यया ।
भागम् । देवेषु । यज्ञियम् ॥ ८ ॥ २ ॥

भाषायाम्.

७ ते [यूयम्] [अस्माकमेताभिः] सुशस्तिभि अस्माक सुन्वते (=यजमानाय) त्रिरा (=त्रि आवृत्तानि) रत्नानि एकैक धत्त (=दत्त) । त्रिरावृत्तानि साप्तानि (=सप्तसंख्याकानि कर्माणि) [सपादयत च] ॥

अथवा । ते [यूयम्] [अस्माकमेताभि] सुशस्तिभि अस्माक सुन्वते (=यजमानाय) त्रिरावृत्तानि साप्तानि (=सप्तसंख्याकानि) रत्नानि धत्त (=दत्त) ॥

८ वह्नय (=यज्ञस्य सपादयितार) [ऋभव] अधारयन्त (=मरणाद्रक्षिता)। सुकृत्यया (=सुकर्मभि) देवेषु यज्ञिय भागमभजन्त ॥

धवा राजे असें म्हणण्याचे तात्पर्य असें कीं, देव हे आम्हा मनुष्यांचे राजे होत आणि राजा जसा प्रजांचे पालन करितो तसे आमचें पालन ते करितात आणि प्रजाप्रमाणें पाप न करण्याविषयी व सन्मार्गानें चालण्याविषयी वगैरे त्यांच्या आज्ञा आम्हा पाळिल्या पाहिजेत.

६ त्वष्टा हा देवांचा शिल्पी होय. तो देवांचा विश्वकर्मा सूक्त १३ मंत्र १० पृष्ठ ९८ याजवरील टीप पाहा त्वष्ट्यानें केलेला सोम पिण्याचा पेला एक होता त्याचे ऋभूनीं चार केले असें पूर्वी सांगितलेंच आहे.

७. तर [हे ऋभूंनो], तुम्ही [आमच्या ह्या] सुस्तवनाच्या योगेंकरून आमच्या यजमानाला क्रमानें एक एक अशीं त्रिवार धनें द्या; [आणि] सातसातपट जीं त्रिवार कर्मे तीं संपादन करा.

८. यज्ञनिष्पादक [ऋभु] अमर्त्य झाले, [आणि] [आपल्या] चातुर्याच्या योगानें देवांमध्ये यज्ञसंबंधी हविर्भाग पावले.

7. Confer, therefore, ye [Ribhus], by [virtue of these our] good prayers, the three-fold riches upon our sacrificer, one by one; [and] accomplish the thrice seven-fold works.

8. Accomplishers of the sacrifice [the Ribhus] were preserved [from death]; by [their] skill they obtained a part of the sacrifice among the gods

७. या मंत्रांतील सर्व शब्द सोपे आहेत आणि पदशः अर्थ स्पष्ट दिसत आहे तथापि भावार्थ कठिण आहे. आम्हीं सायणांस अनुसरून अर्थ केला आहे. परंतु आमच्या मनाची खात्री तो अर्थ नीट आणि सर्वांशी खरा असेल अशी होत नाहीं तथापि दुसरा अर्थ असा आम्हीहि सांगूं शकत नाहीं कीं, ज्यामध्ये कांहींच अडचणी येणार नाहींत. आम्हांस वाटतो तो सरळ अर्थ असा —"तर "[हे ऋभूंनो], तुम्ही आमच्या ह्या "सुस्तवनाच्या योगेंकरून आमच्या य- "जमानास क्रमानें एक एक अशीं "त्रिवार सातपट धनें द्या." परंतु "त्रिवार सातपट" म्हणजे काय आणि तीं कोणतीं धनें? आम्हीं जो सायणांस अनसरून वर अर्थ दिला आहे त्यांत सायणाचार्यांप्रमाणें त्रिवार धनें म्हणजे उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ मिळून त्रिवार. आणि 'सातपट जीं त्रिवार कर्में' (हा इतका अर्थ केवळ 'साप्तानि' इतक्या एका शब्दाचा त्रिवार हे पुनः अध्याहृत घेऊन ते करितात) म्हणजे "अग्न्याधेय, दर्शपूर्णमास इत्यादि जे सात हविर्यज्ञ तो एक वर्ग, औपासन होम, वैश्वदेव इत्यादि सात पाकयज्ञांचा दुसरा वर्ग, आणि अग्निष्टोम, अत्यग्निष्टोम इत्यादि सात सोमसंस्थ यज्ञांचा तिसरा वर्ग." परंतु 'साप्त' यांत 'सप्तसंख्याक कर्मे' इतक्या अर्थाचा समावेश लक्षणेनें तरी या स्थलीं होईल असें आम्हांस वाटत नाहीं. शिवाय 'एकमेकम्' हे पद सायणाचार्य 'त्रिवार' धनांकडेस मात्र घेतात. कर्मांकडेस त्याचा संबंध लावीत नाहींत, आणि अन्वयाकडे पाहूं गेलें असतां 'सातपट त्रिवार कर्में' याजकडेसच त्याचा संबंध लावावा हें योग्य दिसतें.

८ ह्या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, ऋभु हे आपल्या कौशल्याच्या योगानें (म्हणजे होमास अवश्य अशा चमसादिक वस्तू निर्माण करून असें सायणाचार्य म्हणतात) अमरत्व प्रथम मनुष्य असतांहि पावले आणि मग सहजच मानवी प्राणी त्यांस इतर देवांप्रमाणें यज्ञहवि अर्पण करूं लागले. ते देवांपैकीं झाले.

सूक्त २१.

ऋषि आणि वृत्त पूर्वीप्रमाणें. देवता इंद्राग्नी.

१. मी इंद्राग्नींस येथें बोलावितों. आम्हास त्यांचेच स्तोत्र आवडतें. [कारण कीं], ते दोघेहि अत्यंत सोम पिणारे [होत].

२. त्याला [च] यज्ञांमध्यें स्तवा; हे वीर हो, इंद्राग्नींचें [च] गौरव वाढवा; त्यांला [च] [तुम्ही आपल्या] गायत्रांत गा.

HYMN 21.

To *Indrâgni* (*i. e. Indra* and *Agni*). Author and Metre as before.

1. I invoke here Indra and Agni; we love their praises exclusively. [For] they are both the greatest drinkers of Soma.

2. Them ye shall praise in your sacrifices; ye heroes, ye shall glorify Indra and Agni. Sing their praises in [your] *gâyatras*.

---

१. ही ऋचा लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. तिचा भावार्थ स्पष्टच आहे. इंद्र आणि अग्नि हे सोम फार पीत असतात यास्तव त्यांच्याच स्तुती करणे हें आम्हास आवडतें, इतरांच्या आवडत नाहींत म्हणून त्यास मी बोलावितों असे मंत्रवक्त्याचें हृद्ग. सोम फार पिणारे आहेत म्हणून इंद्राग्नी हे ऋषीस प्रिय होत व स्तुत्यर्ह होत हें कारण लक्ष्यांत ठेवण्याजोगें होय.

'इंद्राग्नीस' म्हणजे इंद्र आणि अग्नि यास. वेदांत कितीएक देवांचीं जोडपीं येतात. जसें अग्नीषोमौ, सूर्याचन्द्रमसौ, मित्रावरुणौ, इन्द्रावरुणौ; त्यांपैकींच इन्द्राग्नी हे आहे. सूक्त २ मंत्र ८ यावरील टीप १२ व्या पृष्ठावर पाहा.

'आम्हास त्यांचेच स्तोत्र आवडतें=' 'तयोरित्स्तोममुश्मसि.' म्हणजे इतरांचें आवडत नाहीं. ही केवळ प्रशंसा आहे. याच ऋषीनें पूर्वील सूक्तांत मरुतांची व ऋभूंची स्तुति केली आहे व इतर देवांचीहि या पूर्वींच्या सूक्तांत केली आहे ती पाहा. या प्रशंसेविषयीं सूक्त १२ ऋचा २ यावर दिलेली. ८२ व्या पृष्ठावरची टीप पाहा.

'अत्यंत सोम पिणारे होत'='सोमं सोमपातमा.' सोमं या द्वितीयेचा संबंध सोमपातमा. याशीं करावयाचा. सायणाचार्य पिबताम् या क्रियापदाचा अध्याहार करून त्याच्याशीं सोमम् याचा संबध लावितात, पण तसें करण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं.

२. 'त्याला[च]'='ता' म्ह. इंद्राग्नीलाच.–हे 'वीर हो,'='नरः' हें संबोधन कण्वकुळांतील जो मेधातिथि या सूक्ताचा वक्ता त्याजबरोबर गाणारे जे लोक होते त्यांचें आहे.–'गायत्रांत गा' ='गायत्रेषु गायत.' गायत्रें म्हणजे एक प्रकारचीं गायनें, फारकरून गायत्रवृत्तामध्यें असलेलीं गायनें, या सूक्तांप्रमाणें सूक्तें. गायत्रशब्दावर सूक्त १० ऋचा १ यावर दिलेली टीप ६४ व्या पृष्ठावर पाहा.

ता मित्रस्य प्रशस्तय इन्द्राग्नी ता हवामहे
सोमपा सोमपीतये ॥ ३ ॥
ता । मित्रस्य । प्रऽशस्तये । इन्द्राग्नी इति । ता । हवामहे
सोमऽपा । सोमऽपीतये ॥ ३ ॥
उग्रा सन्ता हवामह उपेदं सवनं सुतम् ।
इन्द्राग्नी एह गच्छताम् ॥ ४ ॥
उग्रा । सन्ता । हवामहे । उप । इदम् । सवनम् । सुतम् ।
इन्द्राग्नी इति । आ । इह । गच्छताम् ॥ ४ ॥
ता महान्ता सदस्पती इन्द्राग्नी रक्ष उब्जतम् ।
अप्रजाः सन्त्वत्रिणः ॥ ५ ॥
ता । महान्ता । सदस्पती इति । इन्द्राग्नी इति । रक्षः । उ —
अप्रजा । सन्तु । अत्रिण ॥ ५ ॥

भाषायाम्.

३ ताविन्द्राग्नी मित्रस्य प्रशस्तये (=कीर्तये) [वय] तौ [इन्द्राग्नी] महे (=आह्वयाम) । सोमपौ [तौ] सोम पातु [हवामहे] ॥

४ उग्रौ (=ओजस्विनौ) [स तावपि] सन्तौ (=साधू) [इन्द्राग्नी] इद सुत (=अभिषुत) सोम प्रति हवामहे (=आह्वयाम) । [तौ] इह आगच्छताम् ॥

५ हे इन्द्राग्नी तौ महान्तौ सदस्पती (=गृहपती) [युवां] रक्ष (=अधोमुख पातयतम्) । अत्रिण (=भक्षका राक्षसा) अप्रजा सन्तु ॥

३. मित्राची प्रसन्नता प्राप्त व्हावी म्हणून त्या इंद्राग्नींस, त्या [इंद्राग्नीं]स [आम्ही] बोलावितो; त्या सोम पिणाऱ्या [इंद्राग्नीं]स [आम्ही] सोम पिण्यासाठीं [बोलावितो].

3. These Indrāgni, these, we invoke for the favour of Mitra; [we invoke] the two Soma-drinking [gods] to drink the Soma.

४ बलवान् [आहेत तरीहि] कल्याण करणारे [जे] इंद्राग्नी त्यांस गाळून काढिलेल्या या सोमाप्रत आम्ही बोलावितों. [तर] इंद्राग्नी येथें येओत.

4. We call the mighty [but] kind [Indra and Agni] to this sacrifice of extracted Soma May Indra and Agni come hither.

५. तर हे इंद्राग्नी हो, मोठे [आणि] गृहपती [असे जे] तुम्ही ते राक्षसाला नाहींसे करा. [आम्हास] खाऊन टाकणाऱ्या राक्षसाचें निसंतान होओ.

5. Ye, therefore, Indra and Agni, great protectors of the house, suppress the Rakshas May the destructive demons be void of issue.

---

३. 'मित्राची प्रसन्नता व्हावी म्हणून'='मित्रस्य प्रशस्तये' म्हणजे मित्रानें आम्हांवर प्रसन्न व्हावें या उद्देशानें. मित्र हा एक वैदिक देव आहे. याविषयीं पूर्वी सूक्त २ ऋचा ७ याजवर दिलेली टीप ११ व्या पृष्ठावर पाहा.

'सोम पिणाऱ्या [इंद्राग्नी]स.' सोम पिणारे हें विशेषण आदरार्थी येथें लाविलें आहे. उपासकानें अर्पण केलेला सोमरस पिणारे असें तात्पर्य.

'[आम्ही] बोलावितो.' सूक्त म्हणणारा एकटाच (मेधातिथि) आहे, तथापि त्याजबरोबर त्याच्या कुटुंबाची दुसरी माणसें अनेक होतीं म्हणून अनेकवचन घातलें आहे. पूर्वी सूक्त १४ मंत्र २ याजवर पृष्ठ १०० यांत दिलेली टीप पाहा.

४. 'बलवान् [आहेत तरीहि] कल्याण करणारे'='उग्रा सन्ता' सन्ता (=सन्तौ) ह्याचा अर्थ 'कुशल', 'चतुर' असाहि होईल. तसा केल्यास 'बलवान् आणि चतुर' असा अर्थ करावा — 'गाळून काढिलेल्या या सोमाप्रत' म्हणजे ज्या यज्ञांत सोम काढून अर्पण केला जातो अशा यज्ञाप्रत

५ 'गृहपती,'='सदस्पती,' म्हणजे उपासकाच्या घराचें रक्षण करणारे यज्ञ करणाऱ्याच्या घरादाराचे रक्षण करितात असे —'नाहींसे करा'='उब्जतम्' अक्षरशः पायांखालीं घाला, चिरडून टाका. ऋ १. ८५. ९ याजवरील सायणाचार्यांचें भाष्य पाहा.

'आम्हांस खाऊन टाकणाऱ्या राक्षसाचें निसंतान होओ.' ही विनंती ऊ-

तेन॑ स॒त्येन॑ जागृ॒तमधि॑ प्रचे॒तुने॑ प॒दे ।
इन्द्रा॑ग्नी॒ शर्म॑ यच्छतम् ॥ ६ ॥ ३ ॥
तेन॑ । स॒त्येन॑ । जा॒गृ॒तम् । अधि॑ । प्र॒ऽचे॒तुने॑ । प॒दे ।
इन्द्रा॑ग्नी॒ इति॑ । शर्म॑ । य॒च्छ॒तम् ॥ ६ ॥ ३ ॥

भाषायाम्.

६. हे इन्द्राग्नी तेन सत्येन [युवां] प्रचेतुने पदे (=प्रज्ञापके स्थले) अधि जागृतम् । [युवामस्मभ्य] शर्म (=शरणस्थान) यच्छत (=दत्तम्) ॥

क्षयात ठेवण्याजोगी आहे. हे राक्षस म्हणजे कोण? 'अत्त्रिन्' याचा शब्दशः अर्थ 'खाऊन टाकणारे' असा आहे.

सूक्तम् २२.

कण्वपुत्रो मेधातिथिर्ऋषि । देवता १-४ अश्विनौ । ५-८ सविता । ९-१० अग्नि । ११ देव्य । १२ इन्द्राणीवरुणान्यग्नाय्य. । १३ १४ द्यावापृथिव्यौ । १५ पृथिवी । १६ विष्णुर्देवो वा । १७-२१ विष्णुः । गायत्री च्छन्द ॥

प्रा॒त॒र्युजा॒ वि बो॑धया॒श्विना॒वेह ग॑च्छताम् ।
अ॒स्य सोम॑स्य पी॒तये॑ ॥ १ ॥
प्रा॒तः॒ऽयुजा॑ । वि । बो॒धय॒ । अ॒श्विनौ॑ । आ । इ॒ह । ग॒च्छ॒ता॒म् ।
अ॒स्य । सोम॑स्य । पी॒तये॑ ॥ १ ॥

भाषायाम्.

१. प्रातर्युजौ (=प्रात काळे अश्वौ रथे योजयन्तौ) अश्विनौ विबोधय (=प्रबोधय) । [तौ]अश्विनौ अस्य सोमस्य पानाय अत्र आगच्छताम् ॥

६. आणि हें [वर म्हटलेलें] खरें आहे तर तुम्ही प्रसिद्ध स्थानीं जागृत राहा. हे इंद्राग्नीहो, [तुम्ही आम्हांस] आश्रय द्या.

6. And since that is true, be ye wakeful, Indra and Agni, in a conspicuous place. Indra and Agni, give [us] protection.

६. 'हें [वर म्हटलेलें] खरें आहे तर'=तेन सत्येन.' म्हणजे तुम्हांविषयीं जे आम्हीं या सूक्तांत सांगितलें ते खरें आहे त्यापेक्षां, म्हणजे आम्ही तुम्हांविषयीं मनःपूर्वक स्तुती करीत आहों त्यापेक्षां.

'प्रसिद्ध स्थानीं'='अधि प्रचेतुने पदे.' म्हणजे ज्या ठिकाणाहून आम्हांस तुम्ही नीट पाहूं शकाल अशा प्रमुख स्थळीं. मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'ज्यापेक्षां आम्ही तुमची स्तुती मनःपूर्वक प्रीतीनें करीत आहों त्यापेक्षां तुम्ही प्रसिद्ध स्थळीं आम्हांसाठीं जागृत राहून आम्हांस आश्रय द्या, आणि आमचें संरक्षण करा.'

सूक्त २२.

ऋषि आणि वृत्त पूर्ववत्. देवता—१-४ अश्वी, ५-८ सविता, ९-१० अग्नि, ११ देवी, १२ इंद्राणी, वरुणानी, अग्नायी, १३-१४ द्यावापृथिवी, १५ पृथिवी, १६-२१ विष्णु (१६ विष्णु अथवा देव).

Hymn 22.

To the *As'vins* (1-4), *Savitá* (5-8), *Agni* (9-10), *Devis* (11), *Indráni*, *Varunáni* and *Agnáyi* (12), *Dyávápṛithivi* (13-14), *Pṛithivi* (15), *Vishṇu* (16-21) in the sixteenth *Vishṇu* or *Deva*.

१. प्रातःकाळीं [आपला रथ] जुंपणाऱ्या [अश्वीं]ला जागृत कर; अश्वी येथें येवोत; हा सोम पिण्यासाठीं [अश्वी येथें येवोत].

1. Wake [the As'vins] that harness [their chariot] in the morning. May the As'vins come hither to drink this Soma.

१. 'प्रातःकाळीं [आपला रथ] जुंपणाऱ्या'= 'प्रातर्युजा.' म्हणजे जे अश्वी प्रातःकाळीं आपल्या रथास घोडे जोडून गमन करीत असतात. 'अश्वी'-विषयीं सूक्त ३ मंत्र १ पृष्ठ_१४ यांजवरील टीप पाहा. 'प्रातर्युजा' याचा अर्थ "प्रातःसवनानें संयुक्त" असा सायणाचार्य करितात.

'अश्वींला जागृत कर.' "हे होता अध्वर्यूला म्हणत आहे" असें सायणा-

या सुरथा रथीतमोभा देवा दिविस्पृशा ।
अश्विना ता हवामहे ॥ २ ॥

या । सुऽरथा । रथिऽतमा । उभा । देवा । दिविऽस्पृशा ।
अश्विना । ता । हवामहे ॥ २ ॥

या वां कशा मधुमत्यश्विना सूनृतावती ।
तया यज्ञं मिमिक्षतम् ॥ ३ ॥

या । वाम् । कशा । मधुऽमती । अश्विना । सूनृताऽवती ।
तया । यज्ञम् । मिमिक्षतम् ॥ ३ ॥

नहि वामस्ति दूरके यत्रा रथेन गच्छथः ।
अश्विना सोमिनो गृहम् ॥ ४ ॥

नहि । वाम् । अस्ति । दूरके । यत्र । रथेन । गच्छथः ।
अश्विना । सोमिनः । गृहम् ॥ ४ ॥

भाषायाम्.

२. यावुभावश्विनौ देवौ सुरथौ रथितमौ दिविस्पृशौ (=द्युलोकस्पृशौ) [च स्तः] तौ [अश्विनौ वयं] हवामहे ॥

३. हे अश्विनौ युवयोर्या कशा (=प्रतोद) मधुमती सूनृतावती (=प्रियध्वनियुक्ता) [चास्ति] तया [इमं] यज्ञं मिमिक्षतं (=सेक्तुमिच्छतम्) ॥

४. यत् सोमिनो गृहं [प्रति] [युवां] रथेन गच्छथः तद् हे अश्विनौ युवयोर्दूरे नास्ति हि ॥

यार्थ म्हणतात. 'अश्वीस (स्तोत्राने!) जागृत कर' यावरून बोलणारा मोठ्या पहाटेस उठून देवभजन करण्यास सिद्ध झाला आहे हे सांगावयास नकोच. आपले पूर्वज पहाटेस उठून देवयजन करीत यासंबंधी पूर्वी आम्ही सांगित- लेच आहे.

'हा सोम पिण्यासाठी' म्हणजे जो सोम अर्पण करीत आहे तो असा अर्थ. देवांना बोलाविण्याचें मुख्य प्रयोजन म्हटलें म्हणजे त्यांनी येऊन हविरन्न खावे आणि सोम प्यावा असें होते.

२. ज्यांचे रथ चांगले, जे रथींमध्ये उत्तम रथी [असे] उभयता आकाशस्पर्शी अश्वी देव, त्यास [आम्ही] बोलावितो.

३. हे अश्वी हो, जो तुमचा चाबूक मधुररसानें भरलेला [आणि] मंजुळ ध्वनि करणारा तेणेंकरून [ह्या] यज्ञावर सेचन करा.

४. कारण कीं, हे अश्वी हो, सोमरस काढून अर्पण करणाऱ्या [भजका]चें घर तुम्हास दूर नाहीं, का कीं, [तुम्ही] तेथें रथांत बसून जात असतां.

2. Those two gods, possessed of a good chariot; [and] excellent charioteers [and] touching the sky [*with their chariot*] we invoke those As'vins.

3 With your whip, As'vins, which is full of sweet juice [and] has a sweet sound, sprinkle this sacrifice.

4. For to you, As'vins, the house of the Soma-sacrificer, whither you go in your chariot, is not far off.

---

२. मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'ज्याचे रथ चांगले आहेत आणि जे रथ हांकण्याविषयीं अति कुशल आणि ज्यांचे रथ इतके मोठे आणि उंच आहेत कीं, ते आकाशापर्यंत पोहचतात अशा दोनाहि अश्वी देवांस आम्ही येथें यज्ञास बोलावितो.'

'जे रथींमध्ये उत्तम रथी' कितीहि मोठा शूर अथवा योद्धा असला तरी प्रस्तुतकाळीं आपण त्याची प्रशंसा करूं लागलो म्हणजे त्याला गाडी चांगली हाकतां येते असें आपण म्हणणार नाहीं. परन्तु प्राचीन काळच्या योद्ध्यांचें वर्णन होऊं लागलें म्हणजे तो उत्तम रथी म्हणजे गाडी चांगली हाकणारा असें आपल्या पाहण्यांत येतें. याचें कारण काय? याचें उत्तर इतकें आहे कीं, प्राचीन काळीं रस्ते आतां आहेत तसे सुंदर बांधलेले नसत. रानांत आवडधोबड रस्त्यावरून गाडी हाकणें म्हणजे अजूनहि कठिण काम आहे मग प्राचीन काळीं तर (अरण्यें वगैरे अडचणी फार असल्यामुळें) फारच कठिण असेल यांत संशय नाहीं. म्हणून मानवी शूरांस जें विशेषण लागतें तेंच ह्या सूक्ताच्या कर्त्यानें सहजच अश्वींस लाविलें आहे. अश्वी हे उत्तम रथांत बसून आकाशमार्गानें गमन करितात असें वेदांत वर्णन आहे.

३. अश्वींस जसा उत्तम रथ आहे असें आर्यजन म्हणत, तसेंच त्यांचा मधुररसानें भरलेला आणि मधुर ध्वनीनें युक्त असा चाबूक आहे असेंहि म्हणत असत, तेंच या मंत्रांत सांगितलें आहे. कारण घोडे आणि रथ आहेत त्यांस चाबकाशिवाय कसें चालेल?

हिरण्यपाणिमूतये सवितारमुप ह्वये ।
स चेत्ता देवता पदम् ॥ ५ ॥ ४ ॥
हिरण्यऽपाणिम् । ऊतये । सवितारम् । उप । ह्वये ।
सः । चेत्ता । देवता । पदम् ॥ ५ ॥ ४ ॥
अपां नपातमवसे सवितारमुप स्तुहि ।
तस्य व्रतान्युश्मसि ॥ ६ ॥
अपाम् । नपातम् । अवसे । सवितारम् । उप । स्तुहि ।
तस्य । व्रतानि । उश्मसि ॥ ६ ॥

भाषायाम्.

५ [अहं] हिरण्यपाणिं सवितारमूतये आह्वयामि । देवेषु [हि] स पदस्य (=अस्माकं स्थानस्य) चेत्ता (=द्रष्टा भवति) ॥

६. अपां नपात (=पुत्र) सवितारम् अवसे (=रक्षणाय) उपस्तुहि । तस्य व्रतानि (=कर्माणि) [हि] [वयम्] उश्म (=कामयामहे) ॥

चाबकानें 'या यज्ञावर सेचन करा' म्हणजे या आमच्या यज्ञावर अनुग्रह करा मधुररसानें म्हणजे गोडीनें भरलेला चाबूक आहे तेणेंकरून जर यज्ञावर सेचन केलें तर चाबकांत असलेली गोडी यज्ञांत येईल असा भावार्थ आहे या ठिकाणीं यज्ञ म्हणजे देवांस अर्पण करावयाचे जे अन्नादि पदार्थ ते असा अर्थ समजावयाचा

४ मंत्राचें तात्पर्य असें कीं, 'जो भक्त यज्ञांत अश्वींस सोमरस अर्पण करीत असतो त्याचे घरा अश्वी हे रथांत बसून जातात, त्यापेक्षां अश्वांस तें घर लांब आहे असें नाहीं अतएव वरच्या मंत्रांत जी प्रार्थना केली ती आमची प्रार्थना अश्वी सहज मान्य करू शकतील.'

प्राचीन आर्य लोक आपल्या आराध्यदेवतांची कशी विनवणी करीत त्याचा हा एक चांगला मासला आहे.

५. ज्याचे हात सुवर्णमय [आहेत] त्या सवित्यास [आमचें] रक्षण करण्यासाठीं मी येथें बोलावितों. देवामध्यें स्थान जाणणारा तो होय.

६. उदकाचा पुत्र असा जो सविता त्याला [आमचे] रक्षणासाठीं स्तव. त्याचीं व्रतें आम्हांस आवडतात.

5 I call the golden-handed Savitâ hither for [our] protection; among the gods he is the one that sees the place

6. Praise Savitâ the son of the waters for protection. We love his ordinances.

---

५. या सूक्तांतील ५ पासून ८ पर्यंत ऋचा 'सवित्या' देवाविषयीं आहेत. सविता हा वैदिक देव मोठ्या महत्त्वाचा आहे याजविषयीं वेदांत पुष्कळ सूक्तें येतात सविता म्हणजे सूर्याभिमानिनी देवता, म्हणजे सूर्यरूपी देव. सविता देव सकळ वस्तूंच्या अंगीं प्राण निर्माण करितो. सूर्याचे जे किरण तेच सवित्याचे हात त्याला चित्रभानु म्हणजे चित्रविचित्र रंगाचा प्रकाश ज्याचा आहे तो, असें नांव आहे त्याला 'नृचक्षा' ('मनुष्यांस पाहणारा,') 'हिरण्यहस्त,' 'हिरण्यपाणि,' 'हिरण्याक्ष,' 'सुपाणि', सुजिह्व,' 'सुरत्न, 'पूर्णगभस्ति', 'विश्वधर्मा', 'विश्वानर', 'विचर्षणि' (भटकणारा) इत्यादि विशेषणें लाविलेलीं आढळतात.

या सवित्या देवाला 'हिरण्यपाणि' म्हणजे सोन्याच्या हाताचा म्हटलें हें योग्यच आहे. कारण कीं, सूर्यकिरण हे सुवर्णाच्या कांतीचे असतात.

'देवांमध्ये स्थान जाणणारा तो होय'=स वेत्ता देवता पदम्' देवता हें या ठिकाणीं क्रियाविशेषण अव्यय होय, 'देवेषु' या अर्थी. 'देवांमध्ये स्थान जाणणारा तो होय' म्हणजे सकळ देवांपैकीं हा देव उपासकाचें स्थान कोठें आहे हें जाणणारा होय असा अर्थ.

सायणाचार्य या तृतीयपादाचा अर्थ करितात तो येणेंप्रमाणें.-"तो सविता " देव या मन्त्रांत सांगितलेली देवता " होऊन पदम् म्हणजे यजमाना" नें ज्या पदाप्रत पावावें त्या पदाप्रत " म्हणजे स्थानाला वेत्ता म्हणजे " दाखविणारा होतो."-'हिरण्यपाणि' याचाहि सायणाचार्य यजमानाला देण्याकरितां हातांत सुवर्ण 'धारण करणारा' असा अर्थ करितात

६. 'उदकाचा पुत्र...त्याला'=अपां नपातम् 'उदकाचा पुत्र' हें विशेषण नित्य अग्निवाचक असतें. त्याचा अर्थ उदकांत जन्मलेला म्हणून उदकाचा पुत्र असा होतो. आकाशांत मेघोदकें असतात आणि त्यांत विद्युद्रूपी अग्नीची उत्पत्ति होते म्हणून त्यास उदकांत जन्मलेला असें समजून 'उदकाचा पुत्र' अशी संज्ञा अग्नीला मिळाली आहे. परंतु सवित्या देवास लाविलेलें हें विशेषण ज्यांत आहे असा हा एकच प्रयोग दिसतो-'[आमचें] रक्षणा-

विभक्तारं हवामहे वसोश्चित्रस्य राधसः ।
सवितारं नृचक्षसम् ॥ ७ ॥

विऽभक्तारम् । हवामहे । वसोः । चित्रस्य । राधसः ।
सवितारम् । नृऽचक्षसम् ॥ ७ ॥

सखाय आ नि षीदत सविता स्तोम्यो नु नः ।
दाता राधांसि शुम्भति ॥ ८ ॥

सखायः । आ । नि । सीदत । सविता । स्तोम्यः । नु । नः ।
दाता । राधांसि । शुम्भति ॥ ८ ॥

अग्ने पत्नीरिहा वह देवानामुशतीरुप ।
त्वष्टारं सोमपीतये ॥ ९ ॥

अग्ने । पत्नीः । इह । आ । वह । देवानाम् । उशतीः । उप ।
त्वष्टारम् । सोमऽपीतये ॥ ९ ॥

भाषायाम्.

७. वसुनः (=समीचीनस्य) चित्रस्य (=सुन्दरस्य) [च] राधसः (=धनस्य) विभक्तारं नृचक्षसं (=नराणां द्रष्टारं) सवितारं [वयं] हवामहे ॥

८. हे सखायः, आ[गच्छत] निषीदत [च] । सविता[हि] अधुना अस्माभिः स्तवनीयः । राधसां (=धनानां) दाता [सः] शुम्भति (=शोभते) ॥

९. हे अग्ने, देवानाम् उशतीः (=आगन्तुमिच्छन्तीः) पत्नीः त्वष्टारं [च] सोमपानाय इह उपावह ॥

साठी स्तव'=' अवश्ये उपस्तुहि.' हे मनपर्का जाळ असलेल्या दुसऱ्या उपासकाला सांगतो आहे अशी कल्पना करावी.—' त्याचीं व्रतें आम्हांस आवडतात.' म्हणजे सवित्याच्या प्रीत्यर्थ जीं कार कर्में करावयाचीं असतात तीं करणें हे आम्हांस आवडतें. तीं कर्में म्हणजे अमुक वेळीं सवित्यास सोमादि अर्पण करून त्यास भजणें, इत्यादि.

७. चांगली [आणि] सुंदर संपत्ती वाटून देणारा [आणि] मनुष्यातें पाहणारा [जो] सविता त्याला [आम्ही] बोलावितों

८. हे मित्रांनो, या बसा, आतां आम्हांस सवित्याची स्तुति गावयाची आहे; [तो] संपत्तींचा दाता तेजःपुंज प्रकाशत आहे.

९. हे अग्नी, [इकडे येण्याविषयीं] उत्सुक [ज्या] देवांच्या पत्नी त्यांस, [आणि] त्वष्ट्यास सोम पिण्यासाठीं येथें घेऊन ये.

7. We invoke Savitâ the distributor of beneficent [and] beautiful wealth, [and] the observer of men.

8. Friends, come [and] sit down; Savitâ has now to be praised by us, [he] the bestower of riches is shining brightly.

9. Agni, bring hither the anxious wives of the gods [and] [the god] Tvashtâ to drink [our] Soma.

---

७. मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, सविता म्हणजे सूर्य उगवला म्हणजे या जगांत जी संपत्ति आहे ती निरनिराळ्या मनुष्यांस जणु काय वांटली जाते. कारण सूर्य उगवण्याच्या पूर्वी अंधार असल्यामुळें सर्व वस्तु एकत्र घोटाळ्यांत पडल्यासारिख्या असतात, आणि सूर्य उगवतांच प्रत्येक मनुष्यास आपलें काय आणि दुसऱ्याचें काय ते समजतें, त्यामुळे सूर्यदेवता सविता हा संपत्ती वाटून देतो जणु काय असें कल्पिलें आहे

'मनुष्यातें पाहणारा,' म्हणजे कोण मनुष्य काय करितो हे आपण प्रत्यक्ष पाहणारा. हे विशेषण सूर्यरूपी जो सविता देव त्याला उत्तम रीतीनें योग्य दिसते हे सांगावयास नकोच

८ मंत्रकर्ता म्हणतो आहे कीं, 'हे मित्र हो 'या, आपण सवित्याची स्तुती' करीत बसू या; तो संपत्तीतें देणारा सविता उगवून प्रकाशत आहे. यास्तव स्तुतीचा समय झाला आहे.'

हा मंत्र लक्ष्यांत ठेवून ह्याचा विचार करण्याजोगा आहे. ऋग्वेदांतील सूक्तें सगळीं कुटुंबाचीं माणसे. मिळून अथवा सगळी मित्रमंडळी मिळून गात होते आणि ख्रिस्ती लोकांसारिखे सामाजिक प्रार्थना करीत होते असे सूक्त १४ मंत्र ३ यांजवरील टिपेंत (पृष्ठ १०० या स्थळीं) सांगितले आहे त्याला हें प्रमाण विशेष आहे.

९. ही आणि पुढची (दाहवी) ऋचा अग्निविषयीं आहे मंत्रवक्ता म्हणतो कीं, 'देवांच्या स्त्रिया हा आमचा सोम पिण्यासाठीं यावयास आधींच उत्सुक आहेत, तर त्यांस आणि त्याजबरोबर त्वष्टा देवास सोमपानार्थ. इकडे आमच्या यज्ञाजवळ घेऊन ये.'

त्वष्टा हा कोण आहे याविषयीं पूर्वी सांगितलेंच आहे. सूक्त १३ ऋचा १०

आ ग्ना अग्न इहावसे होत्रां यविष्ठ भारतीम् ।
वरूत्रीं धिषणां वह ॥ १० ॥ ५ ॥

, आ । ग्नाः । अग्ने । इह । अवसे । होत्राम् । यविष्ठ । भारतीम् ।
वरूत्रीम् । धिषणाम् । वह ॥ १० ॥ ५ ॥

भाषायाम्.

१०. हे यविष्ठ अग्ने, ग्नाः (=देवपत्नी.) अवसे (=रक्षणाय) आ[वह] । होत्रां भारतीं वरूत्रीं धिषणां [च] [आ]वह (=आनय) ॥

यावरची टीप पृष्ठ ९८ यावर पाहा.

सोम पिण्यासाठीं अग्नीनें देवांस व देवांच्या बायकांस उपासकाजवळ घेऊन येणें हे अग्नीचें काम वेदांत प्रसिद्ध आहे.

देवपत्नींविषयीं उल्लेख जो वेदांत येतो तो त्वष्ट्यासीं (या ऋचेंत आहे तसा) येतो. याविषयीं ऋ. ७. ३५. ६ 'त्वष्टा ग्नाभिः इह शृणोतु,' १०.६६. ३ 'त्वष्टा नो ग्नाभिः सुविताय जिन्वतु, १.१६१. ४ 'त्वष्टा ग्नासु अन्तः नि आनजे,' हीं स्थलें पाहा.

१०. हे परम तरुण अग्नी, [तू] देवपत्नींस [आमच्या] रक्षणासाठीं येथें [आण]—होत्रा, भारती, वरूत्री [आणि] धिषणा यांस घेऊन ये.

10. O youthful Agni, bring the goddesses hither for [our] protection, [bring] Hotrâ, Bhârati, Varûtrî [and] Dhishanâ.

. . .

---

१०. 'परम तरुण अग्नी,'='यविष्ठ अग्ने' अग्नीला 'यविष्ठ' अति तरुण हें विशेषण पुष्कळ ठिकाणीं लागलेलें आढळतें. त्या विशेषणाच्या योग्यतेविषयी सांगावयास नकोच; कारण कीं, अनादि काळापासून अग्नि आहे तरी तो पुरातन काळीं होता तसाच अजूनहि तरुणच आहे.

'होत्रा' म्हणजे आव्हानाची देवता, हाकेची देवता. देवतांस स्तोते जी हाक मारितात तद्रूपी एक मानिलेली देवता.

'भारती' म्हणजे वाग्रूपी देवता. पूर्वी सूक्त १३ मंत्र ९ यावरील टीप ९६ व्या पृष्ठावर पाहा.

'वरूत्री' म्हणजे संरक्षणाची देवता. संरक्षण करण्याविषयीं जिला मनुष्यें बोलावितात अशी एक वैदिक देवता.

'धिषणा' हीहि एक वैदिक देवता आहे. हिचें काम मनुष्यास संपत्ती प्राप्त करून देणें आणि मनुष्यांवर देवांची कृपा करून देणें. सायणाचार्य धिषणा म्हणजे वाग्रूपी देवता असें म्हणतात. आणि तें संयुक्त आहे, कारण कीं मनुष्यांच्या वाचा म्हणजे देवांप्रत केलेल्या प्रार्थना देवांचा प्रसाद मनुष्यांवर होई असें करून देवांकडून त्यांस द्रव्य मिळवून देतात, असा आर्यजनांचा भरंवसा होताच.

आतां ज्या देवपत्नी (ग्नाः) मंत्रांत सांगितल्या त्या होत्रा, भारती, वरूत्री आणि धिषणा ह्याच किंवा देवपत्नी वेगळ्या आणि ह्या देवता वेगळ्या हें ह्या मंत्रावरून स्पष्ट होत नाहीं, पण एकच असाव्या असें दिसतें. देवपत्नीस घेऊन ये असें साधारण रीतीनें सांगून मग देवपत्नींपैकीं कित्येकींचीं नांवें सांगितलीं आहेत असें दिसतें.

आव्हानाची देवता म्हणजे काय आणि ती कशाला कल्पिली, आणि भारती व धिषणा ह्या वाग्रूपी देवता कशाला कल्पिल्या, आणि वरूत्री ही संरक्षणाची देवता कल्पिण्याची आवश्यकता काय आहे? असा प्रश्न निघेल तर आमच्याच्या शीतळा देवी कशाला कल्पिल्या? माता जोगणी (जादूचा उपद्रव न होऊं देणारी), माता खोडियार (खोडकर मनुष्यांपासून उपद्रव होऊं न देणारी देवी) (गुजराथेंत), मरी (पटकीची देवी), वाघजाई (वाघाचा उपद्रव न होऊं देणारी) आणि सटवाई (सहाव्या दिवशीं मूल मरूं न देणारी) ह्या व दुसऱ्या देवी कशाला पाहिजेत आणि त्या कशाला कल्पिल्या? हेंच त्या प्रश्नाचें उत्तर

अभि नो देवीरवसा महः शर्मणा नृपत्नीः ।
अच्छिन्नपत्राः सचन्ताम् ॥ ११ ॥

अभि । नः । देवीः । अवसा । महः । शर्मणा । नृऽपत्नीः ।
अच्छिन्नऽपत्राः । सचन्ताम् ॥ ११ ॥

इहेन्द्राणीमुप ह्वये वरुणानीं स्वस्तये ।
अग्नायीं सोमपीतये ॥ १२ ॥

इह । इन्द्राणीम् । उप । ह्वये । वरुणानीम् । स्वस्तये ।
अग्नायीम् । सोमऽपीतये ॥ १२ ॥

भाषायाम्.

११ महत्यो देव्यो नृपत्न्य. अवसा (=प्रसादेन) शर्मणा (=कल्याणेन [च सह] अच्छिन्नपक्षा अस्मानभिसचन्ताम् (=आभिमुख्येन सेवन्ताम्) ॥

१२ [अहम्] इन्द्राणीं वरुणानीम् अग्नायीं [च] स्वस्तये सोमपानाय [च] अत्रोपाह्वयामि ॥

११. मोठ्या [अशा ज्या] मनुष्यांच्या स्वामिनी देवी [त्या] प्रसादासहित [आणि] कल्याणासहित अच्छिन्नपक्ष येथें आम्हाकडेस येओत.

११. May the goddesses, the protectresses of men, come hither unto us swiftly with their protection [and] support.

१२. इंद्राणी, वरुणानी [आणि] अग्नायी यास [आमचें] कल्याण करण्यासाठीं [आणि] सोम पिण्यासाठीं मी येथें बोलावितों.

12. I invoke here Indrâṇi, Varuṇânî [and] Agnâyî for doing good [to us] [and] for drinking [our] Soma.

---

११. 'मनुष्यांच्या स्वामिनी देवी' म्हणजे वरच्या (१० व्या) मंत्रांत ज्या देवपत्नी म्हणून सांगितल्या त्याच येथें समजावयाच्या. 'मनुष्यांच्या स्वामिनी' म्हणजे मनुष्यांचें पालन करणाऱ्या असे सायणाचार्य म्हणतात —'अच्छिन्नपक्ष' म्हणजे ज्यांचे पक्ष छिन्न (तुटले) नाहींत अशा. यांत या देवींस पक्ष्यांची साम्यता विवक्षित आहे. 'अच्छिन्नपक्ष येओत' 'म्हणजे जसे पक्षी अच्छिन्नपक्ष असले तर लवकर येतील तशा येओत — ' प्रसादासहित [आणि] कल्याणासहित.' म्हणजे प्रसाद आणि कल्याण घेऊन येओत.-येओत आणि आम्हांस प्रसन्न होऊन आमचें कल्याण करोत असें तात्पर्य —'येथें आम्हाकडेस येओत'='नः अभिसचन्ताम्' शब्दशः अर्थ, 'मदतीसाठीं आम्हाकडेस येओत '

नवव्या ऋचेंत देवांच्या पत्नींचें आव्हान केलें आहे त्यांत 'देवानां पत्नी' असे शब्द आहेत, आणि या अकराव्या मंत्रांत 'नृपत्नी.' (=नृणां पत्नी) असे शब्द आहेत. त्यावेरुन त्या मंत्रांत देवपत्नीरूपी देवी आणि या मंत्रांत नृपत्नी म्हणजे मनुष्यपत्नीरूपी देवी असा अर्थ होण्याचा चांगला संभव आहे.*आणि तसें केलें तर नृपत्नी म्हणजे कोणी मनुष्यांच्या स्त्रिया मरून, जसे 'पितर' हे (देव झाले तशा), देवी झालेल्या देवी असे समजावें

१२. इंद्राणी, वरुणानी आणि अग्नायी ह्या अनुक्रमे इंद्र, वरुण आणि अग्नि ह्यांच्या बायका. 'इंद्राणी' शब्दाचा अर्थ 'इंद्राची बायको.' त्याप्रमाणेंच वरुणानी आणि अग्नायी यांविषयीं समजावयाचें. परंतु इंद्राची ही जी बायको तिचें नांव काय आणि अग्नीच्या व वरुणाच्या बायकोचें नांव काय आहे तें समजत नाहीं. मागाहून झालेल्या ग्रंथांत इंद्राची बायको 'शची' अशी कथा आहे, आणि 'स्वाहा' ही अग्नीची बायको असे सांगितलें आहे. परंतु 'शची' शब्दाचा अर्थ प्रथम काय होता आणि मागाहून शची म्हणजे इंद्राची बायको कशी झाली यांविषयीं पुढें सांगण्यांत येईल.

°मही द्यौः पृथिवी च न इमं यज्ञं मिमिक्षताम् ।

पिपृतां नो भरीमभिः ॥ १३ ॥

मही । द्यौः । पृथिवी । च । नः । इमम् । यज्ञम् । मिमिक्षताम् ।

पिपृताम् । नः । भरीमऽभिः ॥ १३ ॥

तयोरिद्घृतवत्पयो विप्रा रिहन्ति धीतिभिः ।

गन्धर्वस्य ध्रुवे पदे ॥ १४ ॥

तयोः । इत् । घृतऽवत् । पयः । विप्राः । रिहन्ति । धीतिऽभिः ।

गन्धर्वस्य । ध्रुवे । पदे ॥ १४ ॥

भाषायाम्

१३ महती द्यौः [महती] पृथिवी च अस्माकमिमं यज्ञं मिमिक्षतां (=सेक्तुमिच्छतां=सिञ्चताम्) । भरणैरस्मान्पूरयताम् ॥

१४ तयोरेव घृतवत् (=रसवत्=स्निग्धरसार्द्रं) पयो विप्रा (=मेधाविनो) गन्धर्वस्य ध्रुवे पदे (=आकाशे) लिहन्ति ॥

° ही ऋचा पुण्याहवाचनांत कलशाराधनसमयीं योजिली आहे.

१३. मोठ्या [अशा ज्या] द्यावापृथिवी त्या उभयता आम-च्या या यज्ञावर [मधुर रसाचें] सेचन करोत. त्या आम्हास पोष-णानीं भरपूर करोत.

१४. त्यांचेंच स्निग्ध पय दे-वभजक लोक आपल्या भक्तीच्या योगानें गंधर्वांच्या अचल स्थला-च्या ठायीं चाटीत असतात.

13 May the great Heaven and Earth sprinkle [with sweetness] this our sacrifice; may they fill us with nourishments

14 It is the fatty milk of these two that the singers taste in the eternal home of the *Gandharva*

१३. 'मोठ्या' हें स्वभावोक्तियुक्त विशेषण येथे द्यावापृथ्वीस लाविलें तें यथायोग्य आहे यांत संशय नाहीं — '[मधुररसाचें] सेचन करोत,' 'मिमिक्षताम्' 'अक्षरश., 'सेचन करोत,' 'भिजवोत,' 'आर्द्र करोत' म्हणजे यज्ञाला (सोमरस इत्यादि जे पदार्थ यज्ञात देवांस अर्पण करावयाचे त्या पदार्थांला) मधुर करोत 'मिमिक्षताम्' या क्रियापदाच्या अर्थाविषयीं याच सूक्ताच्या ३ ऱ्या मंत्रावरील टीप पाहा — 'पोषणानीं भरपूर करोत' म्हणजे पुष्टिकारक पदार्थांनीं आम्हांस भरून टाकोत.

१४ 'त्यांचेंच' म्ह. द्यावापृथिवींचेंच — स्निग्ध पय' म्ह चिकण दूध. 'देवभजक लोक...चाटीत असतात'= 'विप्राः रिहन्ति' या शब्दांचा भावार्थ काय आहे तें स्पष्ट समजत नाहीं आणि द्यावापृथिवींचें चिकन दूध तें कोणतें व तें देवभक्त यसें चाटितात ते नीट समजत नाही आम्हीं सायणास अनुसरून शब्दशः अर्थ केला आहे ते म्हणतात कीं, "गंधर्वांचे अचल स्थळ म्हणजे अंतरिक्ष, म्हणजे आकाश; "आणि द्यावापृथिवींचे दूध म्हणजे "उदक'" गंधर्वांचें स्थळ म्हणजे आकाश हा अर्थ खरा दिसतो आणि मंत्राचें तात्पर्य असें दिसतें कीं, देवभक्तांस जें मिष्ट उदक आकाशांतून पडत म्हणजे वर्षत असलेलें प्यावयास मिळतें तें द्यावापृथिवींचेंच दूध होय. अथवा या जगांत सपत्तिरूप मिष्ट दूध जें देवभक्तांस प्यावयास मिळतें ते आकाशांतून पडणारें द्यावापृथिवींचेंच मिष्ट दूध होय किंवा हे चिकण दूध म्हणजे सोमरस असाहि कवीचा भावार्थ असेल

'गंधर्वांचें अचल स्थल'='गन्धर्वस्य ध्रुव पदम्' गंधर्व म्हणून एक प्रकारचा देवयोनींतील प्राणी आहे. आणि गंधर्व ही एक प्रकारची देवांची विशेष जातहि आहे अर्वाचीन म्हणजे पुराणादिक ग्रंथांत गंधर्व हे स्वर्गीचे गायक होते आहेत असें सांगितलें आहे परंतु वेदांत गंधर्व हा एकच व्यक्ति आहे असें बहुतकरून सांगितलेलें आढळतें आणि ऋग्वेदांत गंधर्वांविषयीं जे उल्लेख आहेत त्यांचें तात्पर्य स्पष्ट उमजत नाहीं'आहे.

°स्योना पृथिवि भवानृक्षरा निवेशनी ।
यच्छा नः शर्म सप्रथः ॥ १५ ॥ ६ ॥

स्योना । पृथिवि । भव । अनृक्षरा । निऽवेशनी ।
यच्छ । नः । शर्म । सऽप्रथः ॥ १५ ॥ ६ ॥

भाषायाम्.

१५. हे पृथिवि [त्वम्] अस्मभ्यं स्योना (=सुखा) अनृक्षरा (=अकण्टका) निवेशनी (=विश्रान्तिस्थलवती) [च] भव । [अस्मभ्य] विस्तृतमाश्रयं [च] [प्र] यच्छ ॥

"गंधर्वाचा संबंध सूर्याशी फार आहे. तो सूर्याच्या घोड्याचा लगाम आपल्या हातांत धरून रथ हाकतो. आणि तो आकाशांत अति उच स्थळीं असतो. त्याच्या हातीं लखलखीत शस्त्रे असतात. त्याच्या अंगावर सुवासित आणि लखलखीत वस्त्रे आहेत, आणि तो पृथ्वीवर उजेड पाडतो तो आकाशांतून मोठ्या स्वरेनें चालतो आणि त्याला आकाशांतून मोठ्या झपाट्यानें उडत जाणारा जो सुपर्ण (=पक्षी) म्हणजे सूर्य त्याची उपमा दिलेली आढळते सविता, पूषा आणि सोमदेव यांच्याशा याचा संबंध फार येतो. आणि सोमाची उपमा त्याला दिलेली आढळते

'गंधर्वास स्वर्गांचीं उदकें (=मेघोदकें) ठेवून असतात आणि तीं उदकें त्याच्या समक्ष खालीं भूमीवर वाहतात असें सांगितलें आहे. आणि हीं जीं खालीं वाहणारीं उदकें त्यांत दिव्य सोमरस असतो अशी विवक्षा पुष्कळ सूक्तांत दिसते. त्या सोमाचा रक्षक आणि दाता गंधर्व आहे असें सांगितले आहे असेंहि सांगितले आहे कीं, सोमवल्लीच्या अंगीं दिव्य सोमशक्ति येई असें करणारे गंधर्व कितीएक आहेत. गंधर्व म्हणून जो कोणी आहे त्याची बायको अप्सरा असें सांगितलें आहे. तिलाच 'अप्या योषा' आणि 'अप्या योषणा' असें नांव आहे. 'गंधर्व' आणि 'अप्या योषा' यांच्या पासून मनुष्यजातीचें जे पहिलें जोडपें यम आणि यमी त्यांची उत्पत्ति झाली. 'गंधर्व' याचा अधिकार अविवाहित कन्येवर मोठा असतो. अविवाहित युवति प्रथम 'गंधर्व' याची असते, मग ती सोमाची होते आणि त्यानंतर अग्नीची होते. आणि विवाहसमयीं नवरी नवऱ्याच्या स्वाधीन करण्याच्या पूर्वी गंधर्वाची प्रार्थना केली पाहिजे. गंधर्वाचीं विशेषणें 'विश्वावसु' (सर्व द्रव्ये ज्याजवळ आहे तो), 'दिव्य, आणि 'वायुकेश ' अशीं आढळतात गंधर्वाच्या गायनाविषयींहि क्वचित स्थळीं उल्लेख येतो (ऋ. १०. १७७. २) गंधर्वास देवांचीं गुप्तें ठाऊक असतात इत्यादि वेदांत सांगितलें आहे."

° ह्या ऋचेचा उपयोग याज्ञिक भूस्पर्शनाकडेस करितात.

१५. हे पृथ्वी, [तूं आम्हांस] सुखकारक, कंटकरहित [आणि] विश्रांती घेण्यास स्थल देणारी हो; आम्हांस विस्तीर्ण आश्रय दे.

15. O Earth, be thou blissful, thornless, [and] harbouring [unto us], give unto us an extensive abode.

१५. 'आम्हांस विस्तीर्ण आश्रय दे' म्हणजे आम्हांस पुष्कळ आसरा मिळो; जेणेंकरून आम्हांस सुख होईल असें विस्तीर्ण स्थल तुझ्या पाठीवर आम्हांस मिळो. यांत केलेली प्रार्थना पृथ्वीला उद्देशून करण्याजोगी आहे यांत संशय नाही.

°अतो देवा अवन्तु नो यतो विष्णुर्विचक्रमे ।
पृथिव्याः सप्त धामभिः ॥ १६ ॥
अतः । देवाः । अवन्तु । नः । यतः । विष्णुः । विऽचक्रमे ।
पृथिव्याः । सप्त । धामऽभिः ॥ १६ ॥

भाषापाम्.

१६ यस्मात् [स्थलाद्] विष्णु विचक्रमे (=पदानि स्थापितवान्) तस्मात् [स्थलात्] देवा पृथिव्या सप्त धामभि (?) अस्मानवन्तु ॥

° या ऋचेपासून या सूक्ताच्या समाप्तीपर्यंत सहा ऋचांस विष्णुसूक्त म्हणतात व यांतील "अतो देवा०" व "इदं विष्णु०" या मंत्रांचा उपयोग याज्ञिक प्रायश्चित्तहोमांत व यज्ञोपवीताभिमंत्रणांत वगैरे अनेक ठिकाणी करितात

१६. जेथून विष्णूनें पावलें टाकिलीं तेथून [येऊन] देव पृथ्वीच्या सप्त धामांनीं आम्हास रक्षोत.

16 May the gods protect us with the seven places of the earth, from thence whence Vishnu put his steps

१६ येथपासून ते सूक्ताच्या शेवटपर्यंत मंत्र विष्णुविषयीं आहेत असें अनुक्रमणिकेवरून दिसून येईल.

हा सोळावा मंत्र पदशः अर्थ घेऊन पाहिला तर सोपा आहे आणि भावार्थहि सोपा आहे. कारण कीं, देव आम्हास रक्षोत हेंच तात्पर्य आहे. पण 'जेथून विष्णूनें पावलें टाकलीं' तीं जागा कोणती आणि 'पृथ्वीचीं सप्त धामें' म्हणजे काय?

सायणाचार्याचें भाष्य आहे तें असें.—
" विष्णु म्हणजे परमेश्वर सप्त धामांनीं
" म्हणजे गायत्री वगैरे सात वृत्ताच्या
" साधनांनीं ज्या पृथ्वीवरून म्हणजे
" पृथ्वीच्या ज्या प्रदेशावरून पावलें
" टाकिता झाला त्या भूप्रदेशाहून देव
" आम्हास रक्षोत.
" तैत्तिरीय ब्राह्मणांत असें सांगितलें
" आहे कीं, 'विष्णूस पुढें घालून देव
" वृत्ताच्या योगानें हे अजिक्य लोक
" जिंकिते झाले.' पृथिवीच्या प्रदेशा-
" हून रक्षण म्हणजे भूलोकीं असले-
" ल्या पापापासून रक्षण असा अर्थ "

परंतु 'जेथून विष्णूनें पावलें टाकिलीं तेथून देव पृथ्वीच्या सप्त धामांनीं आम्हांस रक्षोत' हा पदशः अर्थ सयुक्तिक आणि स्पष्ट व अक्लिष्ट दिसतो.

विष्णु ही देवता वैदिक युगानंतरच्या काळीं जशी प्रख्यात आणि प्रमुख आहे तशी वेदांत नाहीं. वेदांत विष्णु हा इतर देवांप्रमाणें एक देव आहे किंबहुना तो इतर कितीएक देवांपेक्षां कमीच मानिलेला आहे. अग्नि, इंद्र, मित्र, वरुण, अश्वी, उषा, सोम (सोमरसाची देवता) यांचें जितकें माहात्म्य वेदांत आहे तितकें सुद्धां विष्णूचें वैदिक युगांत नव्हतें असें दिसून येतें.

ऋग्वेदांत विष्णूविषयीं जें सांगितलें आहे त्यास आणि पुराणांत वगैरे त्याजविषयीं सांगितलेल्या कथांस पुष्कळ अंतर आहे. विष्णूस अजून बायकोची व मुलांची आणि संसार करण्याची जरूर लागली नव्हती. तो ब्राह्मणाकडून छाया मागून घेऊन त्यांतच आपला मान आहे असें मानून घेण्यास शिकला नव्हता.

वेदांत त्याविषयीं सांगितलें आहे त्याचा सारांश येणेंप्रमाणें—तो तीन पावलें टाकितो आणि तीन पावलांत सकल भुवनाचें आक्रमण करितो. तो ज्या ज्या ठिकाणीं आपलें पाऊल ठेवितो तेथें तेथें सुखें असतात. तो सकल प्राण्यांचें एकटा रक्षण करितो. त्याचें फार उच्च पाऊल जेथें पडतें तेथें पुण्यवंत मनुष्य राहत असतात. विष्णु हा इंद्राचा सखा होय, आणि तो इंद्राबरोबर सोम पितो आणि इंद्रास वृत्र मारण्याला मदत करितो. केव्हां केव्हां त्याला इंद्रानें शक्ति दिली व केव्हां केव्हां इंद्रास त्यानें शक्ति दिली असेंहि सांगितलें आहे. इंद्रासाठीं विष्णु सोम सिद्ध करितो असेंहि सांगितलें आहे. विष्णूचें

इदं विष्णुर्वि चंक्रमे त्रेधा नि दंधे पदम् ।
समूळ्हमस्य पांसुरे ॥ १७ ॥

इदम् । विष्णुः । वि । चक्रमे । त्रेधा । नि । दधे । पदम् ।
सम्ऽऊळ्हम् । अस्य । पांसुरे ॥ १७ ॥

भाषायाम्.

१७ इद [जगत्] विष्णुः विचक्रमे । [एतस्मिन्] त्रीणि पदानि निदधे । अस्य [विष्णो] पांसुरे [पदे] [इद जगत्] समूढम् (=समाहृतम्) ॥

आव्हान पूषा देवासह फार करून होतें; केव्हां केव्हां मरुत् आणि त्वष्टा यांजबरोबर होतें. त्वष्टा हा स्त्रियांच्या पोटीं गर्भ उत्पन्न करितो आणि विष्णु गर्भाशय उत्पन्न करितो (विष्णुर्योनिं कल्पयतु त्वष्टा रूपाणि पिंशतु ऋ. १०. १८४ १). विष्णूचें आव्हान सविता, वात, सूर्य, अश्वी वगैरे देवांबरोबरहि होत असतें

यावरून असें दिसून येईल कीं, विष्णु म्हणजे सूर्यरूपीच देवता सूर्य उगवतो तेव्हां त्याचें पहिलें पाऊल (पद) पडतें असें समजावयाचें; तो मध्याह्नीं आकाशमध्यात येतो तेव्हां तें दुसरें पाऊल, आणि तो मावळला म्हणजे तें तिसरें पाऊल. आणि हीं तिन्हीं पावलें झालीं म्हणजे सूर्यरूपी विष्णु सकल भुवनाचें आक्रमण संपवितो म्हणजे तीन पावलांनीं सकल भुवन व्यापून जातो हे खरेंच आहे त्याप्रमाणेंच सूर्य जेथें जेथें असतो तेथें तेथें त्याच्या प्रकाशाच्या योगें वरून कांति आणि सुख वाढतें वास्तव सूर्यरूपी जो विष्णु तो जेथें जेथें पाऊल टाकितो तेथें तेथें सुखें असतात हें खरेंच (दोन चार दिवस सूर्य मुळींच उगवला नाहीं अशी कल्पना करा म्हणजे आपणांस किती सुखें अंतरतील तीं पाहा) त्याप्रमाणेंच सूर्याचें अति उच्चस्थान जें मध्याह्नीचें स्थान तेंच तद्रूप विष्णूचें अति उच्च पाऊल. तें अति उच्च प्रदेशीं असल्यामुळें पुण्यवंत प्राणी व देव तेथें राहत असतील असें समजणें हे साहजिक आहे विष्णु सकल प्राण्यांचें संरक्षण करितो हें खरेंच. कारण सूर्य जर या जगांतून नाहींसा होईल तर सर्व प्राणी मरून जातील आणि तो इंद्राचा स्नेही हेंहि खरेंच कारण कीं, सूर्य नसेल तर सोम कसा उत्पन्न होईल, आणि पाऊस कसा पडेल?

आणि यावरून विष्णु जेथून पावलें टाकितो तेथून येऊन देव आम्हांस रक्षोत, म्हणजे तात्पर्य असें कीं, तेथून देव येतील तर ते सुखें घेऊन येतील.

वर सांगितलेल्या सारांशावरून विष्णूच्या वामनावताराची अथवा त्रिविक्रमावताराची कथा कशी रचिली गेली हे वाचकांच्या लक्ष्यांत सहज येऊन चुकेल त्रि=तीन, विक्रम=पाऊल=तीन पावलांचा देव अर्थात् सूर्यरूपी देवता

१७. या [भुवना]वरून विष्णु चालत असतो, [आणि] तीनदा पाऊल टाकितो [सकल भुवन] त्याच्या धूलिमय [पावला]च्या आंत झांकून जातें.

17. This [universe] Vishnu traverses; he puts his triple step. [This universe] becomes collected within his dusty [triple step].

१७ वरील टिपेंतील सारांशांत जें सांगितलें आहे तेंच येथें आलें आहे. भावार्थ असा आहे कीं, 'सूर्यरूपी विष्णु तीन पावलें चालून सर्व भुवन व्यापून टाकितो. आणि तो इतक्या झपाट्यानें चालतो कीं, त्याच्या पावलांची जी धूळ उडते तींत सकल भुवन झांकून जातें.'

'तीनदा पाऊल टाकितो'='त्रेधा निदधे पदम्' हे जे शब्द आहेत त्यांत वामनावताराचें आणि त्रिविक्रमावताराचें बीज आहे हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

'आंत झांकून जातें,' 'समूढम्' म्हणजे पाऊल या भुवनाच्या बाहेर जातें आणि भुवन पावलापेक्षां लहान दिसतें असें तात्पर्य

'विचक्रमे' आणि 'पद निदधे' या क्रियापदांचा अनुक्रमें करून 'चालत असतो' आणि 'पाऊल टाकितो' असा रीतिवर्तमानकाळीं अर्थ केला आहे. वैदिक संस्कृतांत पूर्णभूत अथवा पूर्णवर्तमान काळ असलेल्या क्रियापदांचा रीतिवर्तमानकाळीं असल्याप्रमाणें अर्थ करावा लागतो याविषयीं पूर्वीं लिहिलेच आहे. उदाहरणार्थ सूक्त ६, मंत्र ८ यांजवर दिलेली (पृष्ठ ३८) 'पुनर्गर्भत्वमेरिरे' यावरची टीप पाहा.

त्रीणि प॒दा वि च॑क्रमे॒ विष्णु॑र्गो॒पा अदा॑भ्यः ।
अतो॒ धर्मा॑णि धा॒रय॑न् ॥ १८ ॥
त्रीणि॑ । प॒दा । वि । च॒क्र॒मे॒ । विष्णुः॑ । गो॒पाः । अदा॑भ्यः ।
अतः॑ । धर्मा॑णि । धा॒रय॑न् ॥ १८ ॥
विष्णोः॒ कर्मा॑णि पश्यत॒ यतो॑ व्र॒तानि॑ पस्प॒शे ।
इन्द्र॑स्य॒ युज्यः॒ सखा॑ ॥ १९ ॥
विष्णोः॑ । कर्मा॑णि । प॒श्य॒त॒ । यतः॑ । व्र॒तानि॑ । प॒स्प॒शे ।
इन्द्र॑स्य । युज्यः॑ । सखा॑ ॥ १९ ॥

भाषायाम्.

१८. अदम्भनीयः पालको विष्णुस्त्रीणि पदानि विचक्रमे । [पदविक्रमणं कुर्वंश्च] अत (=त्रयाणां पदानां स्थले) धर्मान्धारयति ॥

१९. विष्णुः यतः [स्थानाद्] [युष्माकं] व्रतानि (=कर्माणि) पश्यति [तत्र] तस्य कर्माणि [यूय] पश्यत । [स हि] इन्द्रस्य युज्य. (=प्रियतम) सखा [भवति] ॥

१८. [सर्वांचा] अप्रतारणीय रक्षिता विष्णु तीन पावलें चालतो, आणि [जेथें जेथें त्याचीं पावलें पडतात] तेथें तेथें तो धर्माचें संरक्षण करीत असतो.

१९. [हे मित्रांनो], ज्या ठिकाणाहून विष्णु [तुमचीं] कामें पाहतो तेथें त्याचे पराक्रम [तुम्ही] पाहा. तो इंद्राचा जीवलग मित्र [होय].

18. Vishnu the undeceivable protector, traverses three steps, preserving the sacred laws whereever he goes.

19. See the deeds of Vishnu [therefrom] whence he observes [your] works. He [is] the intimate friend of Indra.

१८. सूर्यरूपी देव विष्णु सर्वांचे रक्षण करितो म्हणून १६ व्या ऋचेच्या टिपेंत सांगितलेंच आहे. ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर अशी त्रिमूर्ति मागाहून पुराणादिकांत प्रसिद्ध झाली त्यांतून विष्णूचें काम रक्षण करणें हें होय अशी जी रचना आहे तिचें बीज या मंत्रांत 'गोपाः' या शब्दांत आहे. ऋग्वेदांत इतर ठिकाणींहि विष्णूच्या रक्षकपणाविषयीं सांगितलें आहे.

'अप्रतारणीय रक्षिता' म्हणजे जो विष्णु अशा प्रकारचा रक्षण करणारा आहे कीं, त्याला कोणी ठकूं शकत नाहीं. बिनचूक राखणारा, ज्याणें केलेलें रक्षण निर्धोक होय

'जेथें जेथें त्याचीं पावलें पडतात तेथें तेथें'=' अतः ' अक्षरशः अर्थ 'तेथें,' म्हणजे 'त्रीणि पदा विचक्रमे' याच्या अधिकरणस्थळीं.

'धर्माचें संरक्षण करीत असतो.' म्हणजे सूर्य उगवतो म्हणून सर्व कांहीं व्यापार चालतात. तो नसेल तर व्यापार म्हणजे कांहींच कर्मे, क्रिया, कामें वगैरे चालणार नाहींत व मग धर्म चालणार नाहींत. 'धर्माचें संरक्षण करीत असतो' असें जें येथें (व अन्य स्थळींहि वेदांत) सांगितलें आहे तें लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे. कारण जेव्हां धर्माचा ऱ्हास राक्षसादिकांच्या दुष्टपणामुळें होतो तेव्हां तेव्हां विष्णु अवताराने वगैरे धर्माचें पुनरुज्जीवन करून धर्मसंस्थापना करितो अशा ज्या प्रसिद्ध कथा पुराणांतरीं वगैरे आढळतात त्यांचें मूळ यांत आहे.

१९. या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, विष्णु (म्हणजे सूर्य हाच कोणी एक देव) मनुष्यांनी केलेलीं कृत्यें—यज्ञादि, पापपुण्यादि,—आकाशांतून चालत असतां पाहतो. आणि तो जेथून पाहतो तेथें म्हणजे आकाशांत सूर्य काय काय पराक्रम करीत असतो ते म्हणजे तीन पावलांनीं सकल भुवनांचें आक्रमण करणें, सकलांचें रक्षण करणें इत्यादि पराक्रम तुम्ही पाहा.

'तो इंद्राचा जीवलग मित्र [होय]'= 'इंद्रस्य युज्यः सखा.' म्हणजे तो इंद्राबरोबर सोमरस प्यावयास उपासकाकडे-

तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः ।
दिवीव चक्षुराततम् ॥ २० ॥

तत् । विष्णोः । परमम् । पदम् । सदा । पश्यन्ति । सूरयः ।
दिविऽइव । चक्षुः । आऽततम् ॥ २० ॥

तद्विप्रासो विपन्यवो जागृवांसः समिन्धते ।
विष्णोर्यत्परमं पदम् ॥ २१ ॥ ७ ॥

तत् । विप्रासः । विपन्यवः । जागृऽवांसः । सम् । इन्धते ।
विष्णोः । यत् । परमम् । पदम् ॥ २१ ॥ ७ ॥

भावार्थाम्.

२० तद् विष्णो परमम् (=उच्चैस्तमम्) पद (=पादप्रक्षेप) दिवि आतत (=विस्तृत) चक्षुरिव सूरय सदा पश्यन्ति ॥

२१ विष्णो परमम् (=उच्चैस्तम) पदम् [इति] यद् [वदन्ति] तद् विपन्यव (=स्तुतिकृत) जागरूका विप्रा (=मेधावन) समिन्धते (=अग्निरूपेण समिद्ध कुर्वन्ति) ॥

स जातो आणि वृत्राला मारण्याच्या कामी इंद्रास फार मदत करितो वर १६ व्या मंत्रावरील टिपतील विष्णुसूक्ताचा सारांश पाहा 'इंद्राचा जीवलग मित्र' हे शब्द मोठ्या महत्वाचे आहेत कारण की, पुराणांतरा इतहासांत व काव्यांत वगैरे कोणी असुरानं पृथ्वीचा देवाचा वगैरे छळ मांडला म्हणजे इंद्र विष्णुकडेस सल्ला विचारण्यास जात असतो त्या कथेचे हे बीज आहे.

२०. विष्णूचें [जें] अति उंच पाऊल तें, आकाशांत लावून ठेविलेल्या मोठ्या डोळ्याप्रमाणें, विद्वज्जनाच्या नित्य दृष्टीस पडत असतें.

२१. विष्णूचें अति उच्च पाऊल ज्याला म्हणतात तें [देवगुण]गायक [आणि] जागरूक विद्वज्जन प्रदीप्त करीत असतात.

20. That highest step of Vishnu the learned always see like a broad eye fixed in heaven.

21. That which is the highest step of Vishnu the pious [and] watchful singers kindle.

२०. मन्त्राचें तात्पर्य असें आहे कीं. 'विष्णूचें अति उच्च पाऊल कशाला म्हणावें? तर त्याला उत्तर हें कीं, नित्य सूर्य मध्याह्नीं आकाशाच्या शिखरावर चढतो त्यालाच बुधजन विष्णूचें 'परमं पदम्' (अत्युच्च पाऊल) असें म्हणतात तो जो मध्याह्नींचा आकाशशिखरावर असलेला सूर्य तो, जणु काय इंद्राचा अथवा वरुणाचा डोळा आकाशांत पसरून ठेविल्याप्रमाणें दिसतो.' ऋ. १.११५.१, १.१३६.२ पाहा. 'लावून ठेविलेल्या मोठ्या' हा अर्थ 'आततम्' यापासून गम्यमान आहे

२१. मंत्राचें तात्पर्य असें दिसतें कीं, विष्णूचें अति उच्च पाऊल म्हणजे मध्याह्नींचा आकाशशिखरावर चढलेला जो सूर्य त्याला देवभजन व देवयजन करणारे गायक लोक प्रदीप्त करितात. म्हणजे अग्नीला प्रदीप्त करितात. मध्याह्नींचा जो प्रखरतेजस्क सूर्य तद्रूपी अग्नीस पेटवितात. म्हणजे यज्ञ करणारे लोक यज्ञासाठीं अग्नि म्हणून जो पेटवितात तो मध्याह्नींचा प्रखरतेजस्क सूर्यच 'अथवा तद्रूपी विष्णूचें अति उच्च पाऊलच होय असें समजावयाचें असा भावार्थ आहे.

'जागरूक' = 'जागृवांसः' म्हणजे योग्यकालीं देवयजन करण्याविषयी तत्पर.

सूक्तम् २३.

कण्वपुत्रो मेधातिथिर्ऋषि । देवता-१ वायु । २-३ इन्द्रवायू । ४-६ मित्रावरुणौ । ७-९ इन्द्रो मरुत्वान् । १०-१२ विश्वे देवा । १३-१५ पूषा । १६ २३ आप । २३-२४ अग्नि । छन्द -१-१८ गायत्री । १९ पुरउष्णिक् । २० अनुष्टुप् । २१ प्रतिष्ठा । २२-२४ अनुष्टुप् ॥

तीव्राः सोमास आ गह्याशीर्वन्तः सुता इमे ।
वायो तान्प्रस्थितान्पिब ॥ १ ॥

तीव्राः । सोमासः । आ । गहि । आशीःऽवन्तः । सुताः । इमे ।
वायो इति । तान् । प्रऽस्थितान् । पिब ॥ १ ॥

उभा देवा दिविस्पृशेन्द्रवायू हवामहे ।
अस्य सोमस्य पीतये ॥ २ ॥

उभा । देवा । दिविऽस्पृशा । इन्द्रवायू इति । हवामहे ।
अस्य । सोमस्य । पीतये ॥ २ ॥

भाषायाम्.

१ [अमी] सोमास्तीक्ष्णा [सन्ति] । [तस्माद्] [हे वायो] [त्वम्] आगच्छ । इमे सुता (=अभिषुता सोमा) आशीर्वन्त (=पक्वदुग्धमिश्रिता) [सन्ति] । हे वायो तान् [एतान्प्रभृतान्] पिब ॥

२ उभौ दिविस्पृशौ (=द्युलोकस्पृशौ) देवाविन्द्रवायू अस्य सोमस्य पानाय [वय] हवामहे (=आह्वयाम) ॥

सूक्त २३.

ऋषि, पूर्ववत्. वृत्त, गायत्री; पण १९ चें पुरउष्णिक्, २० चें अनुष्टुप्, २१ चें प्रतिष्ठा आणि २२-२४ चे अनुष्टुप्. देवता— १ वायु, २-३ इंद्रवायु, ४-६ मित्रावरुण, ७-९ मरुद्युक्त इंद्र, १०-१२ विश्वे देव, १३-१५ पूषा, १६-२३ आपो देवी, २३-२४ अग्नि.

१. [हे] सोमरस तीक्ष्ण [आहेत], [तर हे वायू] तूं येथें ये; हे सोमरस दुग्धमिश्रित [आहेत] [तर] हे वायू, हे अर्पण केलेले [सोमरस तूं] पी.

२. आकाशस्पर्शी [जे] दोघे देव इंद्रवायू त्यांस हा सोम पिण्याकरितां [आम्ही] बोलावितों.

Hymn 23.

To *Vâyu* (1), *Indra* and *Vâyu* (2-3), *Mitrâvaruṇau* (4-6), *Indra accompanied by the Maruts* (7-9), the *Vis've-Devas* (10-12), *Pûshâ* (13-15), *Âpas i. e.* the *Waters* (16-23), and *Agni* (23-24). Metre—*Gâyatri*, but the *Pura-ushnik* in 19, *Anushṭup* in 20, *Pratishṭhâ* in 21 and *Anushṭup* again in 22-24. Author as before.

1. [These] Somas [are] sharp, come hither, [Vâyu], these extracted juices [are] mixed with boiled milk. Drink them Vâyu, [as they are] offered [to thee.]

2. We invoke the two gods Indra and Vâyu that reach the sky, in order that they may drink this Soma.

---

१. हा मंत्र महत्त्वाचा आहे. कारण कीं, यावरून सोम कसा असला म्हणजे आणि त्यांत काय काय घातलें म्हणजे तो देवांस प्रिय होईल असें आमचे पूर्वज आर्यजन समजत ते दिसून येतें. प्रथमतः ऋषि म्हणतो कीं, हे सोमरस तीक्ष्ण आहेत, म्हणजे आंबट अथवा तुरट आहेत, केवळ गुळचट नाहींत. पण नुस्ते तीक्ष्णच नाहींत, तर त्यांत ऊन दूध मिसळलें आहे. यावरून दूध ऊन करून सोमरसांत घालीत असें दिसतें.

ह्या दोन गुणांनीं युक्त असे हे सोमरस आहेत, यास्तव हे वायू, तूं ये आणि हे तूं पी, असें तात्पर्य.

२. 'आकाशस्पर्शी,'='दिविस्पृशा.' म्हणजे जे इतके मोठे आहेत अथवा ज्यांचें गमन इतकें आहे कीं, ते आकाशापर्यंत जाऊन पोंहचतात. सूक्त २२ ऋचा २ आणि त्याजवरील टीप पाहा — 'हा सोम' म्हणजे हा जो आम्ही अर्पण केला आहे तो — 'आम्ही बोलावितों' मंत्रकर्ता ऋषि एकटाच आहे तरी अनेकवचनी प्रयोग असण्याचें कारण सूक्त १४ मंत्र २ यावरील टिपेंत १००व्या पृष्ठावर पाहा.

इन्द्रवायू मनोजुवा विप्रा हवन्त ऊतये ।
सहस्राक्षा धियस्पती ॥ ३ ॥

इन्द्रवायू इति । मनःऽजुवा । विप्राः । हवन्ते । ऊतये ।
सहस्रऽअक्षा । धियः । पती इति ॥ ३ ॥

मित्रं वयं हवामहे वरुणं सोमपीतये ।
जज्ञाना पूतदक्षसा ॥ ४ ॥

मित्रम् । वयम् । हवामहे । वरुणम् । सोमऽपीतये ।
जज्ञाना । पूतऽदक्षसा ॥ ४ ॥

ऋतेन यावृतावृधावृतस्य ज्योतिषस्पती ।
ता मित्रावरुणा हुवे ॥ ५ ॥ ८ ॥

ऋतेन । यौ । ऋतऽवृधौ । ऋतस्य । ज्योतिषः । पती इति ।
ता । मित्रावरुणा । हुवे ॥ ५ ॥ ८ ॥

वरुणः प्राविता भुवन्मित्रो विश्वाभिरूतिभिः ।
करतां नः सुराधसः ॥ ६ ॥

वरुणः । प्रऽअविता । भुवत् । मित्रः । विश्वाभिः । ऊतिऽभिः ।
करताम् । नः । सुऽराधसः ॥ ६ ॥

भाषायाम्.

३ मनोजवौ सहस्राक्षौ धियस्पती (=देवयजनबुद्धेः पती) इन्द्रवायू ऊतये विप्रा (=मेधाविनः) आह्वयन्ति ॥

४ वयं मित्रं वरुणं [चेत्येतौ] जातमात्रौ पूतदक्षौ (=पवित्रमनस्कौ) सोमपानाय आह्वयाम ॥

५ यौ ऋतेन (=सत्यधर्माचरणेन) ऋतावृधौ (=ऋतेन सत्येन वर्धमानौ=लब्धहर्षौ) ऋतस्य ज्योतिषः (=सत्यस्य प्रकाशस्य) पती [स्तः] तौ मित्रावरुणौ [अहम्] आह्वयामि ॥

६ वरुणो मित्रश् [च] विश्वाभिरूतिभिः (=रक्षणैः) प्राविता (=रक्षिता) भवतु । [तावुभौ] अस्मान् सुराधसः (=प्रभूतधनवतः) कुरुताम् ॥

३. [जे] मनाप्रमाणें चपळ, [आणि] ज्यांस हजार डोळे आहेत [आणि] भजनबुद्धीचे प्रभु [असे जे] इंद्रवायू त्यांस विद्वज्जन [आपल्या] संरक्षणासाठीं बोलावितात.

४. जन्मतः पवित्र मनाचे जे मित्र [आणि] वरुण त्यांस आम्ही सोम प्यावयास बोलावितों.

५. सत्याचरणानें प्रसन्न होणारे [आणि] सत्य प्रकाशाचे स्वामी जे ते मित्रावरुण त्यांस [मीं] बोलावितों.

६. वरुण [आणि] मित्र सकल संरक्षणांसहित [येऊन] [आमचे] संरक्षिते होवोत. ते आम्हांस चांगले संपत्तिमान करोत.

3. The pious singers invoke for protection India and Vâyu who are as quick as the mind, who have a thousand eyes [and] who are the lords of prayer.

4. We invoke Mitra [and] Varuna born pure of mind, that they may drink [our] Soma.

5. I invoke that Mitra [and] that Varuna who are pleased with the practice of truth, [and] who are the lords of the true light.

6. May Varuna [and] Mitra become [our] protectors with all [their] protections; may they make us possessors of great riches.

---

३. या मंत्रांत इंद्रवायूस लाविलेलीं विशेषणें लक्ष्यांत ठेवण्याजोगीं आहेत. 'ते मनाप्रमाणें चपळ' आहेत म्हणजे त्यांस उपासकाजवळ येण्यास वेळ लागत नाहीं, मनाप्रमाणे धांवून येतात. तसेच त्यांस सहस्र नेत्र आहेत, म्हणजे ते सर्वत्र पाहूं शकतात. आणि ते भजनबुद्धीचे प्रभु होत; म्हणजे देवभजनाची जी बुद्धि मनुष्यामध्यें उत्पन्न होते तिचे प्रेरक तेच होत. आणि सर्व भक्ति त्यांसच अर्पण करण्यास योग्य होय.

४. 'जन्मतः पवित्र मनाचे.'='जज्ञाना पूतदक्षसा.' म्हणजे जे जन्मले तेच पवित्रमनाचे असे म्हणजे, इतरांप्रमाणे जन्मानंतर विद्याभ्यासानें अथवा सत्संगानें वगैरे ज्यांचें मन पवित्र झालेलें आहे असे नव्हेत. यांत 'जज्ञाना पूतदक्षसा' हे शब्द महत्वाचे आहेत. मर्त्यजनाविषयीं जसें जन्ममरणादि बोलतात तसेंच इंद्रवायूविषयीं ऋषि येथें बोलत आहे.

५. 'सत्याचरणानें प्रसन्न होणारे' ='ऋतेन ऋतावृधौ' यांत 'ऋतेन' हें पद पुनरुक्त (अगत्य नाहीं असें) आहे. तथापि असे प्रयोग साधारण भाषेमध्यें जसे पुनरुक्त आढळतात तसेच वेदांतही पुनरुक्त येतात उदाहरण 'प्रसूना प्रसूनात.', इ०. सत्याचरणानें प्रसन्न

मरुत्वन्तं हवामह इन्द्रमा सोमपीतये ।
सजूर्गणेन तृम्पतु ॥ ७ ॥
मरुत्वन्तम् । हवामहे । इन्द्रम् । आ । सोमऽपीतये ।
सऽजूः । गणेन । तृम्पतु ॥ ७ ॥
इन्द्रज्येष्ठा मरुद्गणा देवासः पूषरातयः ।
विश्वे मम श्रुता हवम् ॥ ८ ॥
इन्द्रऽज्येष्ठाः । मरुत्ऽगणाः । देवासः । पूषऽरातयः ।
विश्वे । मम । श्रुत । हवम् ॥ ८ ॥
हत वृत्रं सुदानव इन्द्रेण सहसा युजा ।
मा नो दुःशंस ईशत ॥ ९ ॥
हत । वृत्रम् । सुऽदानवः । इन्द्रेण । सहसा । युजा ।
मा । नः । दुःऽशंसः । ईशत ॥ ९ ॥

भाषायाम्.

७. मरुत्वन्तमिन्द्रं सोमपानाय आह्वयामः । [स] [मरुतां] गणेन सजूः (=युक्त सन्) तृम्पतु ॥

८. हे इन्द्रज्येष्ठाः पूषरातयः (=पूषोदाराः) विश्वे मरुद्गणा देवाः, मम हवम् (=आह्वानं) शृणुत ॥

९. हे सुदानवः (=शोभनदानयुक्ताः) [मरुतः] इन्द्रेण युजा (=मित्रेण) [सह] वृत्रं (=शत्रुं) सहसा (=बलेन) हत (=नाशयत) । दुःशंसः (=दुःशब्दयुक्तः) अस्मान् मा ईशात (= प्रभवतु) ॥.

होणारे म्हणजे आर्यधर्मरूपी जें सत्य त्याच्या आचरणानें संतुष्ट होणारे.

'सत्यप्रकाशाचे स्वामी'='ऋतस्य ज्योतिषः पती.' यांत ऋतं ज्योतिः म्हणजे काय ?

६. 'सकळ संरक्षणांसहित,'='विश्वाभिरूतिभिः' म्हणजे संरक्षण करण्याचे जे जे त्याचे अनेक प्रकार आहेत त्यांसहित. उदाहरणार्थ, अन्न देऊन, सुस्थळ देऊन, संकटातून पार पाडून इत्यादि.

'ते आम्हांस चांगले संपत्तिमान करोत.' देवांपाशी मागावयाचा मुख्य प्रसाद आर्यजनांचा हाच असे हे पूर्वी आम्हीं सांगितलेंच आहे.

७ मरुद्युक्त इंद्रास सोम पिण्यासाठीं [आम्ही] इकडे बोलावितों. तो [मरुताच्या] गणासहित तृप्त पावो.

८. ज्यांजमध्यें इंद्र श्रेष्ठ आहे [आणि] ज्यात पूषा [उत्कृष्ट] दाता आहे असे अहो देव मरुद्गण हो, [तुम्ही] सर्वजण माझी [ही] हाक ऐका.

९. हे महा उदार देवांनो, तुमचा मित्र जो इंद्र त्याच्या साहाय्यानें पराक्रम करून [आमच्या] शत्रूला मारा. दुष्टाचा अधिकार आम्हांवर न चाले असें करा.

7. We invoke hither Indra with his Maruts to drink the Soma. May he be gratified together with that host [of his friends].

8 Ye divine hosts of Maruts, with Indra at your head [and] among whom Púshâ is [most] liberal, hear all ye this my call.

9. O liberal gods, do ye, aided by your friend Indra, slay our enemy with your might. May not the wicked govern us.

---

७. 'मरुद्युक्त इंद्रास'='मरुत्वन्तम् इन्द्रम्' म्हणजे ज्याजबरोबर मरुद्गण असतो त्या इंद्राला-'[मरुताच्या] गणासहित,' 'सजूः गणेन.' 'सजू' हें विशेषण होय-'तृप्त पावो' म्हणजे येऊन सोम पिओ आणि सोम पिऊन तृप्त पावो.

८ 'ज्यांजमध्ये इंद्र श्रेष्ठ आहे'='इन्द्रज्येष्ठाः.' म्हणजे ज्यांचा श्रेष्ठ इंद्र आहे, इंद्र ज्यांचा नायक अथवा प्रभु होय असे.-'ज्यात पूषा [उत्कृष्ट] दाता आहे असे'='पूषरातयः' म्हणजे ज्यांपैकी पूषा हा दाता आहे. 'पूषा' कोण आहे याविषयीं सूक्त १४ मंत्र ३ याजवरील टीप १०२ व्या पृष्ठावर पाहा. पूषदेव म्हणजे सूर्य देवाचीच एक विभूति होय असें समजावयाचें.

या मंत्रांत इतकें लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे की, मरुद्गण हे अनेकवचनी आहे आणि पूर्वींच्या मंत्रांत एकवचनी आहे त्यांत इंद्र आणि पूषा हे देव आणि तसेच इतर देव आहेत या कारणास्तव अनेकवचन असावें असें वाटतें.

'[तुम्ही] सर्वजण माझी [ही] हाक ऐका'='विश्वे मम श्रुता हवम्' यांत मंत्रवक्त्याची भक्ति आणि देवांविषयी श्रद्धा केवढी आहे ती पाहा.

९. 'महा उदार देवांनो'='सुदानवः.' शब्दशः अर्थ 'ज्यांचें दान चांगलें आहे ते', म्हणजे मोठे दानशाली. हें संबोधन मरुद्गणांस आहे असें सायणाचार्य म्हणतात. आणि अनुक्रमणिकेवरून पाहतां तसेंच आहे असें दिसतें.

विश्वान्देवान्हवामहे मरुतः सोमपीतये ।
उग्रा हि पृश्निमातरः ॥ १० ॥ ९ ॥

विश्वान् । देवान् । हवामहे । मरुतः । सोमऽपीतये ।
उग्राः । हि । पृश्निऽमातरः ॥ १० ॥ ९ ॥

जयतामिव तन्यतुर्मरुतामेति धृष्णुया ।
यच्छुभं याथना नरः ॥ ११ ॥

जयताम्ऽइव । तन्यतुः । मरुताम् । एति । धृष्णुऽया ।
यत् । शुभम् । याथन । नरः ॥ ११ ॥

हस्कारादिद्युतस्पर्यतो जाता अवन्तु नः ।
मरुतो मृळयन्तु नः ॥ १२ ॥

हस्कारात् । विऽद्युतः । परि । अतः । जाताः । अवन्तु । नः ।
मरुतः । मृळयन्तु । नः ॥ १२ ॥

भाषायाम्.

१० [वय] विश्वान् मरुतो देवान् सोमपानाय आह्वयाम. । [ते] पृश्निमातर उग्रा (=ओजस्विनो) हि ॥

११ हे नर (=शूरा) मरुतो यदा [यूय] शुभ (=यज्ञ) याथ [तदा] युष्माक तन्यतु (=शब्दो) जयतो [तन्यतु] इव धृष्णुया (=बलवत्तया) एति ॥

१२ हस्कारात् (=हसनकृतो) विद्युतो (=विशेषेण दीप्यमानाद्) अत [अन्तरिक्षलोकात्] जाता [मरुत] अस्मानवन्तु । मरुत अस्मभ्य मृळयन्तु (=अस्मान्सुखयन्तु) ॥

ज्याजोगी आहे साधारण शत्रूस मारणे आणि दुष्ट लोकांचा अधिकार आपणावर न चालू देणे या कामी देवांचें साहाय्य असेल तर तसें घडून येईल अशी भावना आमच्या आर्य पूर्वजांची या मंत्रावरून उघड दिसून येते.

१०. सकल मरुद्देवांस [आम्ही] सोम पिण्यासाठीं बोलावितो. कारण कीं, [ते] पृश्नीचे पुत्र शक्तिमंत [आहेत].

10. We invoke all the Marut gods to drink our Soma. For they, the sons of Pris'ni, are mighty.

११. हे शूर मरुतांनो, तुम्ही जेव्हां यज्ञाला जातां तेव्हां तुमची गर्जना जय मिळालेल्या वीरांच्या [गर्जने]सारिखी आवेशानें निघत असते.

11. When, brave Maruts, you go to the sacrifice, your shout proceeds loudly as [that] of conquerors

१२. हें जें हास्यमुख [आणि] देदीप्यमान [अंतरिक्ष] त्यापासून उत्पन्न झालेले [मरुत्] आम्हांस रक्षोत, मरुत् आम्हांवर कृपा करोत.

12. May the [Maruts] born from that laughing [and] resplendent [region] protect us, may the Maruts favour us.

१०. 'पृथीचे पुत्र'='पृश्निमातर',' म्हणजे मरुत् देव. 'पृश्नि' हे मरुतांच्या आईचें नांव. या शब्दाचा मूळ अर्थ 'चित्रविचित्र रंगाची' असा आहे. त्यावरून चित्रविचित्र रंगाची गाय, चित्रविचित्र रंगाची अशी मेघरूपी गाय. मरुतांची आई म्हणजे बहुत करून चित्रविचित्र रंगाचा ढग असाच अर्थ समजावयाचा आहे.

११. आम्हीं या मंत्राचें भाषांतर सायणाचार्यांच्या भाष्यास अनुसरून केलें आहे. त्याचा भावार्थ असा आहे कीं, जेव्हां मरुत् उपासकाच्या यज्ञास जावयास निघतात तेव्हां त्यांची गर्जना जशी काय युद्धांत जय मिळालेल्या योद्ध्याप्रमाणेच गंभीर ऐकूं येते.

परंतु 'यज्ञास' हा अर्थ ज्याचा केला आहे तो शब्द 'शुभम्' हा आहे. आणि त्याचा तसा अर्थ होईल अशी खात्री सांगवत नाहीं. 'शुभम्' अथवा 'शुभे' हे रूप पुष्कळ ठिकाणीं आलेलें आहे आणि त्याचा प्रयोग तुमर्थ अव्ययासारिखा होतो असें दिसतें. आणि त्याचा अर्थ, 'शोभविण्यास', 'अलंकृत करण्यास' 'अलंकार घालण्यास' असा व्हावा असें दिसते. परंतु प्रस्तुत स्थळीं तसा अर्थ नीट बसत नाहीं म्हणून आम्ही सायणाचार्यांस अनुसरलों आहों.

'आवेशानें'='धृष्णुया.' 'धृष्णुया' हें क्रियाविशेषणाच्या अर्थाचें तृतीयान्त अव्यय आहे.

१२. 'हास्यमुख······पासून'= 'हस्कारात्.' हें विशेषण आहे आणि 'त्या अंतरिक्षापासून' हा अर्थ 'अतः' या अव्ययांतून आम्हीं भाष्यास अनुसरून घेतला आहे. तसा गम्यमान दिसतो असें आम्हांस वाटतें.

'उत्पन्न झालेले'='जाताः'. अक्षरशः

आ पूषञ्चित्रबर्हिषमाघृणे धरुणं दिवः ।

आजा नष्टं यथा पशुम् ॥ १३ ॥

आ । पूषन् । चित्रऽबर्हिषम् । आघृणे । धरुणम् । दिवः ।

आ । अज । नष्टम् । यथा । पशुम् ॥ १३ ॥

पूषा राजानमाघृणिरपगूळ्हं गुहा हितम् ।

अविन्दच्चित्रबर्हिषम् ॥ १४ ॥

पूषा । राजानम् । आघृणिः । अपऽगूळ्हम् । गुहा । हितम् ।

अविन्दत् । चित्रऽबर्हिषम् ॥ १४ ॥

उतो स मह्यमिन्दुभिः षड्युक्ताँ अनुसेषिधत् ।

गोभिर्यवं न चर्कृषत् ॥ १५ ॥ १० ॥

उतो इति । सः । मह्यम् । इन्दुऽभिः । षट् । युक्तान् । अनुऽसेसिधत् ।

गोभिः । यवम् । न । चर्कृषत् ॥ १५ ॥ १० ॥

भाषायाम्.

१३ हे आघृणे (=देदीप्यमान) पूषन् दिवो धरुण (=धारक) चित्रबर्हिष नष्टं पशु यथा इह आज (=आनय) ॥

१४ आघृणि पूषा गुहायां [नि]हितमपगूढ (=निह्नुत) राजानं चित्रबर्हिषमविन्दत् ॥

१५ अपि च स मह्यम् इन्दुभि (=सोमैः) युक्तान्षड् [ऋतून्] गोभि (=बलीवर्दैः) यवं (=यवक्षेत्रं) यथा पुनः पुनः कृषति [तथा] अनुसेषिधत् (=पुनः पुनः आनयन्) [वर्तते] ॥

अर्थ जन्मलेला असा आहे हे विशेष महत्त्वाचे आहे कारण त्यावरून असे दिसून येते की, मरुत् हे देव आहेत तथापि ते अनादि नव्हेत, जन्मलेले आहेत.

१३. हे जाज्वल्य पूषा, आकाशाते धारण करणारा जो विचित्रपक्ष [सोम] त्याला चुकार जनावराप्रमाणें इकडे हाकून आण.

१४. जाज्वल्य पूषा गुहेमध्यें लपवून ठेविलेल्या विचित्रपक्ष राजा [सोमा]ला शोधून काढिता झाला.

१५ आणि तो मजसाठीं [सोम]बिंदूनीं युक्त असा सहा [ऋतूस], बैलांनी शेत नागरल्याप्रमाणें, नित्यशः आणीत असतो.

13. Resplendent Pûshan, drive hither [Soma] of variegated feathers, the supporter of the sky, as [one drives] back a stray animal

14 The resplendent Pûshâ found out the variegated-feathered king [Soma] [though] concealed in the cave

15 And he always brings me the six [seasons] accompanied by Soma-drops, as a man ploughs a field with bullocks.

---

१३. 'जाज्वल्य पूषा.' पूषा हा जो देव आहे त्याविषयी वर ८ व्या मंत्रावरील टीप पाहा.

'[सोम]'='चित्रबर्हिषम्.' भाष्यास अनुसरून अर्थ केला आहे, पण सोम म्हणजे या ठिकाणी घ्यावयाचा जो सोम तो घ्यावयाचा की चंद्र घ्यावयाचा तें निश्चयानें सांगवत नाहीं, आणि कोणताहि अर्थ घेतला तरी 'सोमास' चुकार गुराप्रमाणें पूषा देव कसा आणणार तेंहि सांगवत नाहीं. आणि 'सोम' (कोणत्याहि अर्थी घेतला तरी) आकाशातें धारण करणारा कसा तेंहि सांगतां येत नाहीं. चित्रबर्हिः याचा पदशः अर्थ विचित्रदर्भांनीं युक्त असा सायणाचार्य करितात.

'इकडे हाकून आण'= आ अज'. या शब्दांचा आम्हीं घेतल्याप्रमाणें अर्थ प्रयोगान्तरावरून यावरे स्पष्ट असता सायणाचार्य 'हे गमनशीला.' असा अर्थ करून 'आ हर' (=हारून आण) असे क्रियापद की अध्याहृत घेतात कळत नाहीं

१४. 'गुहेमध्ये लपवून ठेविलेल्यास' ='गुहा हितम् अपगूढम्' सायणाचार्य म्हणतात का, गुहेसारिखा दुर्गम जो द्युलोक तेथे असलेला सोम असा अर्थ घ्यावयाचा. सोम पृश्नीवर पूषा देवाने आणिला असा त्यांचा भावार्थ.

१५ हा मंत्र फार संदिग्ध आहे आणि त्याचा भावार्थ मंत्रातील शब्दांवरून तर समजत नाहीं. आम्हीं भाषांतर केवळ सायणाचार्यांस अनुसरून केले आहे व याशिवाय मंत्राचा अर्थ स्पष्ट करण्याकरितां म्हणून तें कांहींच सांगत नाहींत. 'ऋतूस' हें अध्याहृत पद आम्हीं सायणांप्रमाणे घेतलें आहे, पण अशा प्रकारचा अध्याहार करावा लागतो म्हणजे अर्थ समजत नाहीं असें कबूल करणेंच होय असें म्हटलें पाहिजे. येथील बिकट कठिण पद आहेत त्यांतील हा एक होय.

अम्बयो यन्त्यध्वभिर्जामयो अध्वरीयताम् ।
पृञ्चतीर्मधुना पयः ॥ १६ ॥

अम्बयः । यन्ति । अध्वऽभिः । जामयः । अध्वरिऽयताम् ।
पृञ्चतीः । मधुना । पयः ॥ १६ ॥

अमूर्या उप सूर्ये याभिर्वा सूर्यः सह ।
ता नो हिन्वन्त्वध्वरम् ॥ १७ ॥

अमूः । याः । उप । सूर्ये । याभिः । वा । सूर्यः । सह ।
ताः । नः । हिन्वन्तु । अध्वरम् ॥ १७ ॥

अपो देवीरुप ह्वये यत्र गावः पिबन्ति नः ।
सिन्धुभ्यः कर्त्वं हविः ॥ १८ ॥

अपः । देवीः । उप । ह्वये । यत्र । गावः । पिबन्ति । नः ।
सिन्धुऽभ्यः । कर्त्वम् । हविः ॥ १८ ॥

भाषायाम्.

१६. अध्वरीयताम् (=अध्वरेण देवयजनं कर्तुमिच्छतां) जामयः (=प्रिया) अम्बयो (=मातरः) मधुना [स्वकीयं] पयः पृञ्चत्यो (=मिश्रयन्त्यः) अध्वभिर्यन्ति ॥

१७. या अमूः (=एताः) सूर्येण सह याभिः सह-सूर्यो वा [अस्ति] ता आपोऽस्माकमध्वरं हिन्वन्तु (=साधयन्तु) ॥

१८. यासु [अप्सु] अस्माकं गावः पिबन्ति ता अपो देवीः [अहम्] आह्वयामि । [ताभ्यः] सिन्धुभ्यः हविः कर्तव्यम् [अस्ति हि] ॥

तेरा, चवदा आणि पधरा हे मंत्र सोमाविषयीं नसतां मेघाविषयीं असतील असें दिसेव समजतें. 'आकाशाचें धारण करणाऱ्या' आणि 'विचित्रपक्ष' मेघास '(राजा' असल्याकडे 'आणणे' यांत चांगला अर्थ आहे. तसाच 'विचित्रपक्ष राजा [मेघा]ला' गुहेंतून पूषा 'शोधून काढिता झाला' यांतहि अर्थ योग्य दिसतो.

१६. यज्ञेच्छू जनांच्या प्रिय माता [अशा ह्या आपो देवी] माधुर्यानें [आपलें] पय मिश्र करीत करीत मार्गानें जात आहेत.

16. The [sacred waters], dear mothers of the sacrificers, are going by the way, mixing their milk with sweetness.

१७. ह्या ज्या [आपो देवी] सूर्याजवळ [असतात] अथवा ज्यांजवळ सूर्य [असतो] त्या आमच्या यज्ञास साहाय्य करोत.

17. Those [goddesses of the sacred waters] who [are] near the sun or to whom the sun [is] near—may they promote our sacrifice.

१८. [मी] आपो देवींस येथें बोलावितों, कारण कीं, आमचीं गुरें त्यांजवळ पीत असतात. [त्या] नद्यास हवि देणें योग्य [होय].

18. I *invoke hither the* goddesses, [the sacred] waters, at which our cows drink. A sacrifice deserves to be offered to these rivers.

---

१६. ह्या मंत्र 'आपो देवीं' विषयीं आहे. 'आपो देवी' म्हणजे उदकें जीं त्याच कोणी देवी त्यास यज्ञकर्त्यांच्या प्रिय माता म्हणणें हें योग्यच आहे. कारण जसें मातेचें दूध जीवनोपायभूत आहे, तसें नद्यांचें उदक जीवनोपायभूत आहे. आधुनिक आर्यांची जशी नदीच्या वगैरे पाण्यावर भक्ति आहे (म्हणूनच ते नद्यांस पवित्र मानितात) तशीच प्राचीन आर्यजनांची प्रीतिपुरःसर भक्ति उदकांवर असे. म्हणूनच उदकें ह्या देवता होत असें ते मानीत.

१७ 'ज्या...सूर्याजवळ ...अथवा ज्यांजवळ सूर्य'. म्हणजे येथें मेघोदकें जीं त्याच कोणी देवी असें समजावयाचें. आणि मेघोदकें तर सूर्याजवळ म्हणजे आकाशांत असतात म्हणून सांगावयास नकोच.

१८. या मंत्रांत जे 'कारण कीं आमचीं गुरें त्यांजवळ पीत असतात'= 'यत्र गावः पिबन्ति नः,' असे शब्द आहेत त्यांवरून 'आपो देवी' म्हणजे केवळ उदकें, दुसरें कांहीं नाहीं हें स्पष्ट होतें ह्या ठिकाणीं नद्या ज्या तद्रूपी 'आपो देवी' समजावयाच्या. वर १७ ह्या मंत्रांत सांगितलेल्या 'आपो देवी' म्हणजे मेघोदकें जी तद्रूपी समजावयाच्या असें दिसतें.

अप्स्व१॑न्तर॒मृत॑म॒प्सु भे॑ष॒जम॒पामु॒त प्रश॑स्तये ।

दे॑वा॒ भव॑त वा॒जिनः॑ ॥ १९ ॥

अ॒प्ऽसु । अ॒न्तः । अ॒मृत॑म् । अ॒प्ऽसु । भे॒ष॒जम् । अ॒पाम् । उ॒त । प्रऽश॑स्तये ।

देवाः॑ । भव॑त । वा॒जिनः॑ ॥ १९ ॥

°अ॒प्सु मे॒ सोमो॑ अब्रवीद॒न्तर्विश्वा॑नि भेष॒जा ।

अ॒ग्निं च॑ वि॒श्वश॑म्भुव॒माप॑श्च वि॒श्वभे॑षजीः ॥ २० ॥ ११ ॥

अ॒प्ऽसु । मे॒ । सोमः॑ । अ॒ब्र॒वी॒त् । अ॒न्तः । विश्वा॑नि । भे॒ष॒जा ।

अ॒ग्निम् । च॒ । वि॒श्वऽश॑म्भुवम् । आपः॑ । च॒ । वि॒श्वऽभे॑षजीः ॥ २० ॥ ११ ॥

आपः॑ पृणी॒त भे॑ष॒जं वरू॑थं त॒न्वे॒३॑ मम॑ ।

ज्योक्च॒ सूर्यं॑ दृ॒शे ॥ २१ ॥

आपः॑ । पृ॒णी॒त । भे॒ष॒जम् । वरू॑थम् । त॒न्वे॑ । मम॑ ।

ज्योक् । च॒ । सूर्य॑म् । दृ॒शे ॥ २१ ॥

भाषायाम्.

१९. अपामन्तः अमृतम् अपामन्तः भेषज [भवति] । हे देवा (=दिव्या ऋत्विजः) अपां प्रशस्तये (=कीर्तये) वाजिनो (=बलवन्तो) भवत ॥

२० अपामन्तर्विश्वानि भेषजानि विश्वशम्भू (=विशेषां सुखकर.) अग्निश् [चास्तीति] आपश्च विश्वभेषजवत्यः [सन्तीति] सोमो ममाब्रवीत ॥

२१. हे आप. मम शरीराय वरूथ (=रक्षककवचभूत) भेषज पृणीत (=अर्पयत) । ज्योक् (=चिरं) दर्शनाय च सूर्यम् [अर्पयत] ॥

° या मंत्रापासून पुढील तीन ऋचा संध्यावंदनकर्मांत मार्जनास घेतात.

१९. आपो देवींच्या अंगीं अमृत [आणि] आपो देवींच्या अंगीं औषध [आहे]. आणि हे देव हो, आपो देवींची स्तुती करण्यासाठीं [तुम्ही] शक्तिमान् व्हा.

19. [There is] ambrosia in the waters, [there is] medicine in the waters. Be, ye gods, powerful in order to glorify the waters.

२०. मला सोमानें सांगितलें आहे [कीं], आपो देवींच्या अंगीं सकल औषधें [आहेत], आणि सर्वांचें कल्याण करणारा अग्नि [त्यांत आहे असे] आणि आपो देवी सकलौषधसंपन्न [आहेत असे सांगितलें आहे]

20. Soma has revealed to me that in the waters are all medicaments and Agni the benefactor of all, [and that] the waters are possessed of all medicines.

२१. हे आपो देवी हो, माझ्या शरीराचें संरक्षण करणारें असें औषध मला द्या आणि सूर्य फार दिवस माझ्या दृष्टीस पडे असें करा.

21. Waters, grant unto me a medicament that shall be an armour to my body and [grant] the sun that I may behold it long.

---

१९. 'देव.' येथे 'देव' म्हणजे ऋत्विज असा अर्थ आहे असें सायणाचार्य म्हणतात. आणि 'शक्तिमान् व्हा' म्हणजे 'वेगवत व्हा,' 'लौकर प्रशंसा करा' असा अर्थ आहे म्हणून म्हणतात.

२०. 'मला सोमानें सांगितलें आहे' म्हणजे काय? सोमापासून उत्पन्न झालेल्या हर्षांत मी असतांना मला समजलें कीं, उदकांत सकल औषधें आणि सकल जनांचा हितकर्ता अग्नि आहे, असें उत्तर आहेसें वाटतें.

उदकांत औषधें आणि अग्नि आहे असे उल्लेख अनेक ठिकाणीं येत जातील. त्याचा अर्थ असा कीं, उदकानें वनस्पति, वृक्ष इ. वाढतात आणि वनस्पति व वृक्ष यांशिवाय औषधें व अग्नि नाहीं हे सांगावयास नकोच.

२१. भावार्थ असा आहे कीं, 'ज्या औषधाच्या योगेंकरून माझ्या आंगावर कवच घातल्याप्रमाणें माझें संरक्षण होईल अशा रीतीचें औषध मला द्या, आणि मी फार दिवस जगेन असें करा.'

'सूर्य फार दिवस माझ्या दृष्टीस पडे असें करा'=' [दृशेत] ज्योक् च सूर्यं दृशे.' पदशः, 'सूर्य मला द्या की मी त्याला फार दिवस पाहीन' असा अर्थ.

इदमापः प्र वहत यत्किं च दुरितं मयि ।
यद्वाहमभिदुद्रोह यद्वा शेप उतानृतम् ॥ २२ ॥
इदम् । आपः । प्र । वहत । यत् । किम् । च । दुःऽइतम् । मयि ।
यत् । वा । अहम् । अभिऽदुद्रोह । यत् । वा । शेपे । उत । अनृतम्
॥ २२ ॥

आपो अद्यान्वचारिषं रसेन समगस्महि ।
पयस्वानग्न आ गहि तं मा सं सृज वर्चसा ॥ २३ ॥
आपः । अद्य । अनु । अचारिषम् । रसेन । सम् । अगस्महि ।
पयस्वान् । अग्ने । आ । गहि । तम् । मा । सम् । सृज । वर्चसा ॥ २३ ॥

सं माग्ने वर्चसा सृज सं प्रजया समायुषा ।
विद्युर्मे अस्य देवा इन्द्रो विद्यात्सह ऋषिभिः ॥ २४ ॥
॥ १२ ॥ ५ ॥
सम् । मा । अग्ने । वर्चसा । सृज । सम् । प्रऽजया । सम् । आयुषा ।
विद्युः । मे । अस्य । देवाः । इन्द्रः । विद्यात् । सह । ऋषिऽभिः ॥
॥ २४ ॥ १२ ॥ ५ ॥

भाषापाठः.

२२ हे आपः यत्किं च मयि दुरितम् [अस्ति] यत् [किं च] वा [अहम्] अभिदुद्रोह (=द्रोहरूपं पापं कृतवानस्मि) यत् (=किं च) वा [अहं] शेपे अनृतं वा [बभाषे] [तत्सकलं] [यूयं] प्रवहत ॥

२३ हे आपः [अहम्] अद्य [युष्मान्] अन्वचारिषम् (=अनुचरितवानस्मि) । रसेन (=उदकरसेन) [वयं] सङ्गताः स्म । हे अग्ने [त्वं] पयसा सह आगच्छ । आगत्य च मां वर्चसा (=तेजसा) संसृज (=संयोजय) ॥

२४ हे अग्ने, मां वर्चसा संसृज (=संयोजय) । प्रजया सं[सृज] । आयुषा सं[सृज] । अपि च देवा मां विदुः । ऋषिभिः सह इन्द्रो विद्यात् ॥

10252

२२. हे आपो देवी हो, जें कांहीं पातक माझ्या अंगीं [असेल] अथवा जे मी [दुसऱ्याचें] वाईट केलें आहे, अथवा जे मी शाप दिले आहेत आणि [जें] खोटें [बोललों असेन] तें [तुम्ही] सर्व वाहून न्या.

२३. हे आपो देवी हो, आज मीं तुमचा शोध केला [आणि] आम्ही उदकसाराप्रत पावलों. हे अग्नी, तूं आज उदकरस घेऊन ये आणि मग मला तेजानें युक्त कर.

२४. हे अग्नी, मला तेज दे, मला संतती दे, मला आयुष्य दे. आणि मग ऋषींसहित मला देव जाणोत, आणि इंद्र जाणो.

22. Waters, whatever sin there is in me, whatever ill-will I may have borne [to others], whatever imprecations I may have uttered and whatever falsehoods [I may have told], wash it away all [from me].

23. Waters, I sought [you] to-day, [and] we have obtained the juice. Come, Agni, with the milk [of the waters] and then fill me with splendor.

24. Agni, confer upon me splendor, confer progeny, confer life. And then may the gods know me, may Indra know me among the poets.

---

२२. या मंत्रांत जी आपो देवींची प्रार्थना केली आहे ती उदकास अनुलक्षून करण्यायोगी आहे, मात्र सकल पातकें उदकाच्या योगें करून नाहीशीं होतील असा भावार्थ नाहीं. परंतु अशा प्रकारच्या समजुतीचें बीज या मंत्रात आहे यांत संशय नाहीं.

२३. सायणाचार्य ही ऋचा अवभृथाच्या वेळीं (यज्ञाच्या शेवटीं जें यज्ञकर्त्यानें स्नान करावयाचें त्यावेळीं) म्हणावयाची अशा समजुतीनें असें तात्पर्य सांगतात कीं, "मी आज अवभृथासाठीं पाण्यांत शिरलों; शिरून "जलाचें जें सार तें आम्ही पावलों. "हे अग्नी, उदकांत जें साररूप दुग्ध "आहे त्यासहित तूं आज ये. आणि "अवभृथस्नान न्हालेला जो मी त्या "मला तेज दे"

२४. 'ऋषीसहित मला देव जाणोत' सायणाचार्य, "ऋषिगणांसहित देव मला जाणोत" असा अर्थ करितात. पण 'मला ऋषींबरोबर' जाणो, म्हणजे मला 'ऋषीप्रमाणें गणो,' 'मी ऋषि होईं असें करो,' 'इतरांस ऋषी केले तसा मलाहि करो' असा अर्थ चांगला संभवतो.

सूक्तम् २४.

अजीगर्तपुत्र शुन शेप ऋषि (कृत्रिमो वैश्वामित्रो देवरात)॥
देवता–१ प्रजापति । २ अग्नि । ३-५ सविता । ५ भगो वा । ६ १५
वरुण ॥ छन्द –१ २ ६-१५ त्रिष्टुप् । ३-५ गायत्री ॥

कस्य॑ नू॒नं क॑त॒मस्या॒मृता॑नां॒ मना॑महे॒ चारु॑ दे॒वस्य॒ नाम॑ ।
को नो॑ म॒ह्या अदि॑तये॒ पुन॑र्दात्पि॒तरं॑ च दृ॒शेयं॑ मा॒तरं॑ च ॥ १ ॥

कस्य॑ । नू॒नम् । क॒त॒मस्य॑ । अ॒मृता॑नाम् । मना॑महे । चारु॑ । दे॒वस्य॑ । नाम॑ ।
कः । नः॒ । म॒ह्यै । अदि॑तये । पुन॒रिति॑ । दा॒त् । पि॒तर॑म् । च॒ । दृ॒शेय॑म् । मा॒तर॑म् । च॒ ॥ १ ॥

भाषायाम्.

१ नूनम् (=अधुना) कस्य [नाम], अमृतानाम् (=अमराणां) [देवानां] [मध्ये] कस्य देवस्य चारु (=प्रियं) नाम मनामहे (=ध्यायाम)। को नो महत्यै अदितये (=पृथिव्यै) पुनर्ददात् [येन] [अह] पितरं च मातरं च पुनः पश्येयम् ॥

सूक्त २४.

ऋषि, अजीगर्ताचा मुलगा शुनःशेप, ज्याला विश्वामित्रानें दत्तक घेऊन देवरात असें नाव दिलें होतें. देवता—१ ल्या ऋचेची प्रजापति असें समजण्याची चाल पडली आहे, २ रीची अग्नि, ३-५ चो सविता पण ५ वीचो सविता अथवा भग, ६-१५ ची वरुण वृत्त—१, २, ६-१५ त्रिष्टुप्, ३-५ गायत्री.

१. आतां कोणाचें नाव,—अमरांतून कोणत्या देवाचें प्रियकर नाव आम्ही मनांत आणूं ? आम्हास पुनः मोठ्या पृथ्वीच्या स्वाधीन कोण करील कीं जेणेंकरून मी [माझ्या] बापाला आणि आईला [पुनः] पाहीन?

Hymn 24.

To *Varuna*; but *Prajápati* is conventionally regarded as the deity of 1, *Agni* is the deity of 2, and *Savitá* of 3-5, but of 5 *Savitá* or *Bhaga*. By *S'unas's'epa* the son of *Ajígarta*, otherwise called *Devaráta* the adopted son of *Vis'vámitra*. Metre of 1, 2, 6-15 *Trishṭup*; of 3-5 *Gáyatrí*

1. Whose name, of which of the immortal gods should we contemplate the dear name? Who will deliver us back to the vast Earth that I may see both my father and mother?

१. या सूक्ताचा कर्ता अजीगर्तपुत्र शुनःशेप होय. अजीगर्ताची कथा ऐतरेय ब्राह्मणांत, सांख्यायन सूत्रांत आणि दुसऱ्या ग्रंथांत दिली आहे, ती संक्षेपानें सांगतों:—वेधसाचा मुलगा हरिश्चंद्र म्हणून राजा होता. त्याला शंभर बायका होत्या तरी त्याला मुलगा होत नव्हता. त्याच्या घरीं पर्वत आणि नारद हे मुनी राहत असत त्यानें नारदाला विचारिलें कीं, पुत्रापासून काय लाभ आहे? नारदानें उत्तर दिलें कीं, "पुत्रमुख पाहिल्यानें बाप ऋणमुक्त होतो, आणि अमर होतो; पृथ्वी, अग्नि आणि उदकें यांपासून जे उपभोग होतात त्यांपेक्षां पुत्रोत्पत्तीपासून अधिक उपभोग मिळतात; पुत्रलाभापासून तमाचा नाश होतो; पुत्र ही एक अज्ञानें भरलेली नौकाच होय; गृहस्थाश्रमाद आश्रमांत काय अर्थ आहे? तप करण्यांत काय अर्थ आहे? मुलगा हाच स्वर्ग. यास्तव ब्राह्मणांनीं पुत्राची इच्छा करावी. अन्नापासून प्राण, वस्त्रापासून रक्षण, सुवर्णापासून सौंदर्य, आणि गुरांपासून संपत्ति होते, स्त्री म्हणजे एक मित्र होय, कन्या मात्र म्हणजे क्लेश होतात. परंतु पुत्र म्हणजे केवळ अत्युच्च आकाशांतील ज्योतीच होय; नवरा आपल्या बायकोच्या पोटीं पुत्ररूपानें दुसऱ्या [illegible] पुनः जन्मतो,

आपल्या बायकोच्या पोटीं पुत्ररूपानें नवरा जन्मतो (जायते) म्हणून तिला "जाया" असें म्हणतात; देव आणि ऋषी हे तिच्या अंगीं मोठें तेज भरितात, देवांनीं मनुष्यांस सांगितलें आहे कीं, तुमच्या बायकोच्या पोटींच तुम्ही जन्म पावाल अपुत्रकाला स्वर्ग नाहीं ही गोष्ट पशूंहि जाणतात, आणि त्यांजमध्यें पुत्राचा संबंध मातेशीं आणि भावाचा संबंध बहिणीशीं होत असतो; ज्यांस पुत्रलाभ होऊन दुःख नसते त्यांस कीर्ति प्राप्त होते, ही गोष्ट पशुपक्ष्यांसहि ठाऊक आहे म्हणूनच ते मातेशीं सुद्धां संबंध करितात" याप्रमाणे नारदानीं सांगितल्यावर हरिश्चंद्र म्हणाला, तर मग मला पुत्रप्राप्तीचा मार्ग सांग. नारद म्हणाला, तूं राजा वरुणाकडे जा, आणि मला पुत्र दे म्हणजे तो मी तुला बळी देईन असें सांग. हरिश्चंद्रानें त्याप्रमाणें केल्यावर वरुणानें तें मान्य केलें. मग हरिश्चंद्रास पुत्र झाला त्याचें नांव रोहित. मग वरुण म्हणाला तुला आतां पुत्र झाला आहे तो मला बळी दे. हरिश्चंद्र म्हणाला पशु दहा दिवसांचा झाल्यावर यज्ञास योग्य होतो हा माझा पुत्र दहा दिवसांचा होऊं दे म्हणजे याला बळी देईन. वरुण म्हणाला बरें आहे. तो दहा दिवसांचा झाला. नंतर त्याला बळी दे असें वरुणानें सांगितलें. हरिश्चंद्र म्हणाला पशूस दांत आले म्हणजे ते यज्ञयोग्य होतात. याला दांत येऊं दे म्हणजे याला बळी देईन. रोहितास दांत आल्यावर वरुणानें मागणें केलें. तेव्हां हरिश्चंद्र म्हणाला पशूचे दांत पडले म्हणजे तो यज्ञयोग्य होतो, याचे दांत पडूं दे म्हणजे मी याला बळी देईन. दांत पडल्यावर वरुणानें मागणें केल्यावरून हरिश्चंद्र म्हणाला पशूस पुनः दांत आले म्हणजे तो यज्ञयोग्य होतो, याला पुनः दांत येऊं दे म्हणजे याला बळी देईन. दुसरे दांत आल्यावर पुनः वरुणानें मागणें केल्यावरून हरिश्चंद्र म्हणाला क्षत्रियाचा मुलगा कवच धारण करण्यास योग्य झाला म्हणजे तो बलियोग्य होतो, त्याप्रमाणें माझा मुलगा झाल्यावर बळी देईन. रोहित कवचधर झाल्यावर वरुणानें आतां मुलगा मला बळी दे असे सांगितल्यावरून हरिश्चंद्र बोलला, बरें आहे. असें म्हणून त्याणें रोहितास आपणापाशीं बोलावून सांगितलें कीं, 'तूं या वरुणाच्या योगानें मला प्राप्त झाला आहेस, म्हणून तुला मी याच्या प्रीत्यर्थ बळी देतों. रोहित म्हणाला "नको देऊं", आणि धनुष्य घेऊन अरण्यांत पळून गेला, आणि एक वर्षपर्यंत तसाच फिरत होता. इकडे वरुणानें हरिश्चंद्रास धरिलें, त्यामुळें त्याला उदरव्याधि झाली. हें ऐकून रोहित अरण्यांतून गांवीं आला. त्याला इंद्र मनुष्याचें रूप घेऊन भेटला, आणि म्हणाला अरे रोहिता, जो मनुष्य फिरत नसतो त्याला सुख नाहीं, असें आम्हीं ऐकिलें आहे; जो मनुष्य फिरत नाहीं तो पापी होय, आणि जो फिरतो त्याचा सखा इंद्र होय, यास्तव तूं फिरावयास जा. हें ब्राह्मणवचन आहे असें समजून रोहित पुन एकवर्षपर्यंत तसाच अरण्यांत फिरत राहिला, आणि मग गांवीं आला. तेव्हां इंद्र मनुष्यरूपानें त्यास पुनः भेटला आणि म्हणाला, जो फिरतो त्याचे पाप प्रफुल्लित वृक्षशाखांप्रमाणें असतात, आणि तो फळांचा रसताहीच उप-

भोक्ता होतो, आणि त्याचीं सर्व पातकें चालतां चालतां मार्गांतच नष्ट होतात; तर तू चल आणि फिरत राहा. त्याप्रमाणे रोहित अरण्यांत तिसरें वर्ष संपेपर्यंत फिरला, आणि मग गांवीं आल्यावर त्यास इंद्र पूर्वीप्रमाणे मनुष्यवेषानें भेटून म्हणाला, जो मनुष्य बसून राहतो त्याचें भाग्य बसतें, जो उठतो त्याचें उठतें, जो निजतो त्याचें निजतें, आणि जो चालत असतो त्याचें भाग्य चालतें; तर तू जा आणि चालत राहा, त्याप्रमाणे चवथें वर्ष अरण्यवासांत घालवून रोहित पुन: गांवीं आल्यावर पुन: इंद्र मनुष्यरूपानें त्याला भेटून म्हणाला, जो मनुष्य निजतो तो कलि होय, जो जागृत असतो तो द्वापर होय, जो उठतो तो त्रेतायुगाप्रमाणे होय, परंतु जो चालत राहतो तो कृतयुगाप्रमाणें होय, तर तू चालत राहा. त्याअन्वयें पांचवें वर्ष रोहितानें अरण्यांत घालवून घरीं आल्यावर पुनः मनुष्यरूप घेऊन इंद्र त्यास भेटला आणि म्हणाला, जो फिरतो त्यास मध मिळतो, आणि जो फिरतो त्यास गोड अंजीर मिळतात; पाहा की सूर्य नित्य फिरतो आणि थकत नाहीं व सुखी असतो, तर तू फिरावयास जा. त्याप्रमाणें तो अरण्यांत जाऊन आणखी एक वर्षभर फिरला, आणि पूर्वीप्रमाणेंच इंद्रानें आणखी कांहीं उपदेश केल्यावरून सातवें वर्ष फिरता फिरतां त्याणें भुकेनें मरत होता असा सुयवसाचा पुत्र अजीगर्त या नांवाचा एक ऋषि पाहिला. त्याला शुनःपुच्छ, शुनःशेप, आणि शुनोलांगूल, असे तिघे पुत्र होते रोहित म्हणाला हे ऋषी, मी तुला शंभर गाई देतों, या तिघां पुत्रांतून एक पुत्र मला दे म्हणजे मी त्याच्या योगानें आपली मोकळीक करून घेईन. ऋषि वडील पुत्रास आलिंगन देऊन म्हणाला हा मिळणार नाहीं; त्याप्रमाणेच कनिष्ठ पुत्राला आईनें आलिंगन देऊन हा मिळणार नाहीं असें म्हटलें नंतर मधला जो शुनःशेप त्याला देण्याविषयीं आईबापांनीं ठरविलें त्याप्रमाणे रोहितानें शंभर गाई देऊन शुनःशेप विकत घेतला, आणि त्यास घेऊन अरण्यांतून गांवीं गेला. आणि बापाजवळ जाऊन म्हणाला, हा पुरुष देऊन मी आपली मोकळीक करणार हरिश्चंद्र वरुणापाशीं जाऊन म्हणाला हा पुरुष मी तुला बळी देतों. वरुणानें क्षत्रियापेक्षां ब्राह्मण बळी चांगला असें म्हणून तें बोलणें मान्य केलें, आणि राजसूय यज्ञ करावयास सांगितलें. मग शुनःशेपास बळी द्यावयास यज्ञभूमीकडे नेलें

या प्रसंगीं हरिश्चंद्राचा होता विश्वामित्र ऋषि असे, अध्वर्यु जमदग्नि होता, ब्रह्मा वसिष्ठ होता, आणि उद्गाता अयास्य ऋषि होता शुनःशेपास तयार करून आणिल्यावर त्याला यूपाला बांधण्यास कोणी कबूल होईना, तेव्हां शुनःशेपाचा बाप अजीगर्त म्हणाला जर तुम्ही मला आणखी शंभर गाई द्याल, तर मीच याला बांधीन. त्याला आणखी शंभर गाई दिल्या. त्यावरून त्यानें शुनःशेपास यूपाला बांधिलें, पुढें त्याला मारण्याची वेळ आली तेव्हां मारण्यास कोणी पुढें होईना. पुन: अजीगर्त म्हणाला, आणखी शंभर गाई मला द्याल तर मीच याला मारीन त्याप्रमाणें त्यांनीं त्यास आणखी शंभर गाई दिल्या. तो तरवार तयार करून

आपल्या मुलास मारावयास आला तेव्हां शुन शेपास आतां आपणास खरोखरच मारितात असें वाटलें, आणि त्याणें सर्व देवामध्यें प्रथम देव जो प्रजापति त्याचा धांवा (कस्य नून इ० हा पाहिला मंत्र म्हणून) केला प्रजापतीनें त्याला सांगितलें, अग्नि हा देवांतून अगदीं जवळचा देव आहे, त्याचा तूं धांवा कर. त्याणें अग्नीचा धांवा (अग्नेर्वयं प्रथमस्य इ० हा द्वितीय मंत्र म्हणून) केल्यावरून अग्नि म्हणाला, सर्वाचा उत्पन्नकर्ता सविता देव आहे, त्याचा तूं धांवा कर सवित्याचा धांवा (मंत्र तिसरा अभि त्वा देव इ०) केल्यावरून सविता म्हणाला, तुला वरूणासाठीं बांधिलें आहे, त्याचा धांवा कर त्यावरून वरूणाचा धांवा केला वरूण म्हणाला, अग्नि हे देवांचें मुख होय, आणि तो फार दयाळु आहे त्याची स्तुती कर म्हणजे आम्ही तुला मोकळा करूं त्याप्रमाणें अग्नीचा धांवा केल्यावर अग्नि म्हणाला विश्वेदेवांचा धांवा कर म्हणजे आम्ही तुला सोडूं विश्वेदेवांचा धांवा केल्यावर विश्वेदेव म्हणाले, इंद्र हा सर्वांत मोठा, बलिष्ठ आणि दयाळु आहे, त्याची स्तुती करशील तर तुला सोडूं त्याणें इंद्राची स्तुती केली नंतर इंद्र प्रसन्न झाला, आणि त्याणें त्याला सुवर्णाचा एक रथ आपल्या मनांत दिला, त्याबद्दल शुन शेपानें त्याचे आभार एक ऋचा रचून मानिले इंद्र म्हणाला तूं अश्वींची स्तुती कर म्हणजे तुला सोडूं अश्वींची स्तुती केल्यावर अश्वी म्हणाले, तूं उषेची स्तुती कर म्हणजे तुला सोडूं त्यावरून त्यानें उषेची स्तुती केली नंतर त्याचे पाश हळूहळू तुटूं लागले. आणि प्रत्येक ऋचेबरोबर हरिश्चंद्राचें उदराहि लहान लहान होत गेलें. शेवटची ऋचा म्हटल्याबरोबर शुन शेप अगदीं मोकळा झाला, आणि हरिश्चंद्रहि बरा झाला.

नंतर त्या दिवसाचा यज्ञ शुन शेपाच्या हातानें विश्वामित्रादि ऋषींना करविला, आणि विश्वामित्रानें शुन शेपास आपल्या मांडीवर बसवून दत्तक घेतलें अजीगर्त आपला मुलगा आपणास परत मिळावा म्हणून पुष्कळ प्रयत्न करूं लागला, व त्यानें शुन शेपालाहि पुष्कळ सांगितलें कीं तूं आपलें कुळ सोडून दुसऱ्या कुळांत जाऊं नकोस. परंतु शुन शेपानें सांगितलें कीं, तूं हातांत तलवार घेऊन आपल्याच मुलाला मारण्यास आलास हें शूद्रानेंहि करण्यास अयोग्य असें कृत्य केलेंस त्यापेक्षां मी येत नाहीं. विश्वामित्र म्हणाला या शुन शेपाला देवांनीं मरणापासून सोडवून मला दिलें आहे त्यापेक्षां हा देवरात (देवांनीं दिलेला) माझा दत्त पुत्र झाला; आतां हा परत मिळणार नाहीं

या कथेविषयीं आम्हांस प्रथमतः असें सांगावयाचें आहे कीं, प्रस्तुत सूक्त समजेनासें झालें तेव्हां ही कथा ऐतरेय ब्राह्मणांत वगैरे मागाहून पुष्कळ दिवसांनीं रचिली गेली अशी शंका वाटते तथापि इतकें खरें आहे कीं या सूक्ताचे आरंभीचे जे मंत्र आहेत ते आणि कितीएक नंतरचेहि शुन शेपाच्या संकटासारिख्या संकटांत असलेल्या कोणा तरी मनुष्याविषयीं आहेत आणि त्यावरूनच शुन शेपाची कथा उत्पन्न झाली असावी असें म्हणण्यास कारण दिसतें

परंतु ही सर्व कथा घडलेल्या गोष्टीचा अनुवाद असो, अथवा घडले-

त्या लहानशा एकाद्या गोष्टीच्या बीजावरून केलेला कल्पनाविस्तार असो; इतकें खरें आहे कीं, तीत फार प्राचीनकाळीं चालू होत्या अशा कित्येक चमत्कारिक गोष्टींचा उल्लेख आहे तो लक्ष्यांत ठेवण्याजोगा आहे. पहिली ही कीं, प्राचीनकाळीं वैदिक युगांत (कृतयुगांत) पुरुषमेध करण्याची म्हणजे मनुष्यास बळी देण्याची भयंकर चाल होती, कीं जिचें नांव घेतलें असतां आधुनिक आर्यजनांतून अगदीं जंगली लोकांच्याहि आंगावर शाहारे उठतील. दुसरी ही कीं, सर्व युगांत उत्तम युग जें मानितात, त्या युगांत ऋषिजन शें दोनशें गाई घेऊन आपल्या पोटचीं मुलें बळी देण्याकरितां जो विकत मागेल त्यास विकीत होते इतकेंच नव्हे, पण आतांच्या वेळचे अति नीच मानिलेले खाटिक सुद्धां जें काम कधींहि करणार नाहींत तें आपल्याच मुलास आपल्या हातानें तलवार घेऊन मारावयाचें काम थोडक्यास मोलासाठीं करण्यास तयार होते. तिसरी ही कीं, ब्राह्मणकुळांतील मुलगा क्षत्रिय कुळांत (विश्वामित्र क्षत्रियकुळांतील होता) दत्तक घेतला जाण्यास कांहीं एक हरकत नव्हती.

चवथी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी अशी आहे कीं, यज्ञांत जे बळी देत त्यास पुन. जीवत करण्याची शक्ति आणि चाल पुरातन काळच्या लोकांत होती म्हणून जशी प्राणी मारून हत्या करण्याची चाल होती तशीच मारलेल्या प्राण्यास फिरून जीव आणण्याचीहि शक्ति असे असें सांप्रतकाळीं मानितात; परंतु त्याला कांहीं आधार आहे असें दिसत नाहीं. कारण कीं, जर असता तर शुनःशेपास मारल्यानंतर आपण पुन जीवत होईन या भरवशावर तो उगीच राहिला असता. अथवा हरिश्चंद्राचा मुलगा रोहित यास मारला असता तरी काय अडचण होती? तो पुन. जीवत झाला असता. तो सहा सात वर्षेपर्यंत पळून कां जात असे? शिवाय जर पुन. जीवत करितां आलें असतें, तर मला मारिलें तरी हे वरुणा मला पुनः जीवत कर असें शुन.शेपानें म्हटलें नसतें काय?

पहिल्या ऋचेचा भावार्थ असा आहे कीं, मी संकटांत पडलों आहें, तर आतां मी कोणत्या देवाचा धांवा करूं कीं जेणेंकरून माझी मुक्ति होईल, आणि माझीं आईबापें माझ्या पुनः दृष्टीस पडतील. या मन्त्रांत "आम्ही" आणि "आम्हांस" हीं जीं अनेकवचनें आहेत तीं केवळ वृत्तसुखार्थ आहेत. वस्तुतः बोलणाऱ्याच्या मनांत 'कोणत्या देवाचें प्रियकर नांव मी मनांत आणूं? मला पुनः मोठ्या पृथ्वीच्या स्वाधीन कोण करील?' असेंच आहे. ही गोष्ट 'मी माझ्या बापाला आणि आईला पुनः पाहीन' असे जें शेवटीं एकवचन आहे त्यावरूनहि उघड होते.—'पुनः मोठ्या पृथ्वीच्या स्वाधीन कोण करील?' असें समजावयाचें कीं बोलणारा मोठ्या संकटांत आहे, आणि मृत्यूच्या मुखीं गेला आहे, तेणेंकरून हा भूलोक जसा कांहीं त्याला सुटलाच आहे. त्या या भूलोकाच्या स्वाधीन त्यास केला म्हणजे तो सहजच संकटांतून सुटला असें समजावयाचें

या मन्त्रांतील प्रश्नाची कोमलता आणि शब्दांची सरणी फार सुंदर आहे. आणि अनेक देवांतून कोणत्या देवाचें प्रिय नांव घेतल्यानें आपली सोडवणूक होईल हे जरी प्रश्न विचारण्यास हाऊ-

अ॒ग्नेर्व॒यं प्र॑थ॒मस्या॒मृता॑नां॒ मना॑महे॒ चारु॑ दे॒वस्य॒ नाम॑ ।
स नो॑ म॒ह्या अदि॑तये॒ पुन॑र्दात्पि॒तरं॑ च दृ॒शेयं॑ मा॒तरं॑ च॥२॥

अ॒ग्नेः । व॒यम् । प्र॒थ॒मस्य॑ । अ॒मृता॑नाम् । मना॑महे । चारु॑ । दे॒वस्य॑ । नाम॑ ।
सः । नः॒ । म॒ह्यै । अदि॑तये । पुन॒रिति॑ । दा॒त् । पि॒तर॑म् । च॒ । दृ॒शेय॑म् ।
मा॒तर॑म् । च॒ ॥ २ ॥

अ॒भि त्वा॑ देव सवित॒रीशा॑नं॒ वार्या॑णाम् ।
सदा॑वन्भा॒गमी॑महे ॥ ३ ॥

अ॒भि । त्वा॒ । दे॒व॒ । स॒वि॒तः॒ । ईशा॑नम् । वार्या॑णाम् ।
सदा॑ । अ॒व॒न् । भा॒गम् । ई॒म॒हे॒ ॥ ३ ॥

भाषायाम् .

२. अमृतानां (=मरणरहितानां) [देवानां] [मध्ये] प्रथमो योऽग्निर्देवस्तस्य चारु (=प्रियं) नाम मनामहे (=ध्यायाम)। स मां महत्यै अदितये (=पृथिव्यै) पुनर्दास्यति [येन] [अहं] पितरं च मातरं च पुनः पश्येयम् ॥

३ हे देव सवितः हे सदा अवन् (=रक्षक) वार्याणां (=श्रेष्ठानां धनानाम्) ईश त्वा अभि (=त्वां प्रति) [वयं] भाग्यमीमहे (=याचामहे) ॥

क नसल्यासारिखें दिसतें, तथापि कोणी तरी एकादा देव आपणास सोडवील आणि आपल्या आईबापांचें मुख आपणास पुन दाखवील अशी त्याची खातरी दिसून येते आणि देवाच्या नावाविषयींहि त्याचें प्रेम उघड दिसून येतें.

या मंत्राची देवता प्रजापति असें मानण्याची चाल पडली आहे त्याचें खरोखर कारण असें की, यांत 'कस्य' हा शब्द आहे आणि त्याचा अर्थ 'कचा' असा (त्या चालीस अनुसरून) करीत असतात, 'क' म्हणजे प्रजापति असें म्हणतात. परंतु 'क' शब्दाचा अर्थ प्रजापति असा आहे ही समजूत मागाहून पडली, अतिप्राचीन काळीं नव्हती. आणि इतकें तरी खरें कीं, या मंत्रांत 'प्रजापतीचा' (?) संबंध कांहीं नाहीं. ह्या मंत्राचा अर्थ केल्याने व याचा आणि पुढील मंत्राचा संबंध काय आहे त्याचा विचार केल्याने एकदम दिसून येईल.

वर जी ऐतरेय ब्राह्मणांतून शुनःशेपाविषयीं कथा सांगितली आहे तींत शुनःशेपानें आपली सुटका होण्याविषयीं प्रथम प्रजापतीची प्रार्थना केली असें जें सांगितलें आहे तें 'क' म्हणजे प्रजापति आणि तीच या पहिल्या मंत्राची देवता आहे या समजुतीनें होय परंतु 'कस्य' म्हणजे 'प्रजापतीचा' असा अर्थ होत नाहीं, व ध्यायपाचाहि (?) नाहीं, तेव्हां या ब्राह्मणकथेची मातबरी किती आहे तें सांगावयास नको. ब्राह्मणांत ज्या कथा असतात त्या बहुतकरून अशाच तऱ्हेच्या असतात.

२. देवामध्ये पहिला असा जो अग्नि त्याचें प्रियकर नाव आम्ही मनात आणूं; तो आम्हास पुनः मोठ्या पृथ्वीच्या स्वाधीन करील, कीं जेणेंकरून [पुनः] मी माझ्या बापास आणि आईस पाहीन.

2 Of *Agni*, the first among the gods, we will contemplate the dear name He will deliver us back to the vast earth that I may see both my father and mother

३. हे देवा सवित्या, हे नित्य रक्षण करणाऱ्या, उत्तम धनाचा स्वामी जो तूं त्या तुजजवळ आम्ही भाग्य मागतों.

3 Divine [and] ever protecting Savitâ, from thee, the lord of all that is desirable, we ask for wealth,

---

२. पहिल्या मन्त्रांत जो प्रश्न विचारिला कीं कोणत्या देवाचा धांवा केला असतां आपली सुटका होईल, त्याचें उत्तर प्रश्न विचारणारा आपणच या मन्त्रांत देतो, आणि म्हणतो आपण अग्नीचा धांवा केरू म्हणजे तो आम्हास सोडवील —'देवांमध्ये 'पहिला. .त्याचें' ='प्रथमस्य अमृतानाम्' ही केवळ प्रशंसा आहे असें नाहीं अग्नीस सकल देवांमध्यें मोठा असे म्हटल्यास नवल नाहीं कारण कीं ''वरुणासारिखेहि मोठे देव यशस्वी होतात ते अग्नीच्याच योगानें होतात''=त्वया हि अग्ने वरुणो धृतव्रतो मित्र शाशद्रे अर्यमा सुदानव. १ १४१.९, इत्यादि अग्नीच्या श्रेष्ठत्वाविषयीं मन्त्र वेदांत आहेत.

प्रजापतीनें अग्नीची स्तुती करावयास सांगितल्यावरून शुनःशेपानें ही ऋचा अग्निविषयीं म्हटली असें (ऐतरेय ब्राह्मणांत सांगितल्याप्रमाणें) म्हणण्यास कांहींच सूचक नाहीं इतकेंच नव्हे, पण तसें कांहीच न घडतां पहिल्या मन्त्रांत बोलणारानें जो प्रश्न विचारला त्याचें आपणच या मन्त्रांत उत्तर दिलें आहे असें स्पष्ट दिसून येतें, तें खरें न मानिलें तर या सुंदर मन्त्राचें सर्व सौंदर्य, माधुर्य आणि प्रसाद हीं सर्व व्यर्थ जातील असें दिसतें.

३. या मन्त्रांत जो 'आम्ही.... मागतों' असा अनेकवचनी प्रयोग केला आहे तो 'मी......मागतों' या एकवचनार्थी असेल यांत संशय नाहीं. धृत्तुसासाठीं सुद्धां असे प्रयोग पुष्कळ ठिकाणीं येत असतात परंतु अग्नीनें सवित्याची स्तुती करावयास सांगितली त्यावरून या तिसऱ्या मन्त्रांत सांगितलेली स्तुति शुनःशेपानें केली असें (ऐतरेय ब्राह्मणांत सांगितल्याप्रमाणें), समजण्यास त्या कथेशिवाय दुसरा कांहींच आधार नाहीं

'उत्तम धनाचा स्वामी'='ईशानं वार्याणाम्,' अक्षरशः अर्थ 'वांछनीय वस्तूंचा प्रभु' म्हणजे ज्या ज्या म्हणून वस्तूची वांछा करण्यास योग्य आहे त्या सर्वांचा प्रभु, म्हणजे त्या त्या देणारा. दुसऱ्या एका मन्त्रांत सविता देव

यश्चिद्धि त इत्था भगः शशमानः पुरा निदः ।
अद्वेषो हस्तयोर्दधे ॥ ४ ॥

यः । चित् । हि । ते । इत्था । भगः । शशमानः । पुरा । निदः ।
अद्वेषः । हस्तयो । दधे ॥ ४ ॥

भाषायाम्.

४ यत् किंचित् हि पर प्रशस्त द्वेषरहित भाग्य पुरा निदः (=निन्दकानां बाधा न स्यादिति) तव हस्तयोर्दधे (=धृत) [तत् वयम् ईमहे] ॥

पृथ्वीपासून, उदकापासून आणि द्युलोकापासून वांछनीय संपत्ती आम्हांस पाठवितो अशा अर्थानें प्रार्थना आहे (अस्मभ्य तद्दिवो अद्भ्यः पृथिव्यास्त्वया दत्त काम्य राध आ गात् । २ ३८ ११) सविता देव सर्व सुवर्णमय आहे आणि तो संपत्ती देतो असे पुष्कळ ठिकाणीं वेदांत आले आहे

या मंत्रांत 'भाग्य मागतों' म्हणून म्हटलें आहे, ते कोणते भाग्य हें पुढच्या मंत्रांत सांगितले आहे तो मंत्र व त्यावरील टीप पाहा.

४. निंदकांनीं निंदा करूं नये म्हणून जें जें, उत्तम रीतीनें वाखाणिलेलें भाग्य तूं सदय होऊन [आपल्या उपासकांसाठीं] हातांत धरितोस [तें तें आम्ही मागतों].

4. [We ask for] whatever wealth, which is so much praised, and is filled with kindness, is held in thy hands [by thee] [for thy worshipper] against [the attacks of] the slanderer.

४. हा मंत्र कठिण आहे. आणि आम्ही होईल तितके श्रम करून भाषांतर केलें आहे. तें अर्थ समजावा म्हणून बरेंच विस्तरानें करावें लागलें आहे, तथापि असें म्हटलें पाहिजेच कीं, झालें आहे त्यापेक्षां चांगल्याची अपेक्षा आहे. वरील मंत्रांत भाग्य मागतों म्हणून सांगितलें, तें भाग्य कोणतें त्याचा खुलासा या चवथ्या मंत्रांत सांगितला आहे असें दिसतें. उपासक म्हणतो कीं, ज्या देवां दिलेल्या भाग्याची कविजन फार प्रशंसा करितात, आणि तुझ्या उपासकांची निंदा त्यांच्या निंदकांनीं करूं नये म्हणून तूं आपल्या हातांत धरितोस (म्हणजे जें देण्यास तूं नेहमीं तयार असतोस), आणि ज्यामध्यें तुझी दया भरलेली असते तें भाग्य आम्ही मागतों भावार्थ असा आहे कीं, तुम्ही सवित्याची सेवा कशाला करितां, तो तुम्हांस काय देणार आहे? असें सवित्या देवाच्या उपासकांची निंदा करणारे लोक म्हणतात; तर आपली सेवा व्यर्थ होत नाहीं असें निंदकांस दाखविण्याकरितां सविता देव आपल्या हातांत भाग्य घेऊन देण्यास तयार असतो, आणि तें इतकें चांगलें असतें कीं, कविजन त्याची स्तुती करीत असतात आणि त्यांत सवित्याची दया परिपूर्ण भरलेली असते.

'निंदकांनीं निंदा करूं नये म्हणून' ='पुरा निदः'. म्हणजे पदशः अर्थ 'निंदकाविरुद्ध' असा आहे. 'पुरा' हें शब्दयोगी अव्यय असून पंचम्यंत शब्दापूर्वी येत असतें. त्याचा प्रसिद्ध अर्थ जरी 'पूर्वी' असा आहे तथापि पर्यवसितार्थ 'विरुद्ध' असाहि होतो उदाहरणार्थः—पवस्व सोम देववीतये वृषा इन्द्रस्य हार्दि सोमधानम् आ विश। पुरा नो बाधाद् दुरिता अति पारय इ० ऋ. ९.७०.९. शिवाय ऋ. ४.३.१ हेंहि स्थल पाहा.—'उत्तम रीतीनें वाखाणिलेलें'= 'इत्था शशमानः'. या शब्दांचा अर्थ 'इतकें वाखाणिलेलें' असा आहे. 'इतके' म्हणजे लोकांत प्रसिद्ध आहे अशा रीतीनें, अर्थात् 'फार'—'सदय होऊन' हा अर्थ 'अद्वेषः' यामधून घेतला आहे. अद्वेषः हें 'भगः' असा जो भाग्य या अर्थी शब्द आहे त्याचें विशेषण आहे. त्याचा अर्थ 'ज्यांत द्वेष नाहीं', म्हणजे 'ज्यांत कृपा आहे' असें तात्पर्य.

या मंत्रांत जे 'यश्चिद्धि' असे शब्द आहेत त्यांचा अर्थ 'जरी तो' असा अथवा अशा जवळ जवळ असेल असें वाटतें. कारण कीं 'यच्चिद्धि' याचा अर्थ नेहमीं 'जरी' असा होतो. खालीं सूक्त २९ मंत्र १ आणि सूक्त २८ मंत्र ५ पाहा. आणि आम्हीं केलेल्या अर्थापेक्षां चांगल्या अर्थाची अपेक्षा आहे म्हणून सांगितलें आहे, तो अर्थ कोणी शोधून काढण्याचा प्रयत्न करील तर त्याण या गोष्टीचा विचार करण्यासारिखा आहे.

भर्गभक्तस्य ते वयमुदशेम तवावसा ।
मूर्धानं राय आरभे ॥ ५ ॥ १३ ॥
भर्गऽभक्तस्य । ते । वयम् । उत् । अशेम । तव । अवसा ।
मूर्धानम् । रायः । आऽरभे ॥ ५ ॥ १३ ॥
नहि ते क्षत्रं न सहो न मन्युं वयश्चनामी पतयन्त आपुः ।
नेमा आपो अनिमिषं चरन्तीर्न ये वातस्य प्रमिनन्त्यभ्वम् ॥ ६ ॥
नहि । ते । क्षत्रम् । न । सहः । न । मन्युम् । वयः । चन । अमी
, इति । पतयन्त । आपुः ।
न । इमाः । आपः । अनिऽमिषम् । चरन्तीः । न । ये । वातस्य । प्रऽमि-
नन्ति । अभ्वम् ॥ ६ ॥

भाषायाम्.

५ तव अवसा (=रक्षणेन) [हे सवितः] भर्गभक्तस्य (=धनयुक्तस्य) तव [अवसा] वयं रायः (=सम्पत्तेः) मूर्धानम् (=अग्रम्) उदशेम (=प्राप्नुयाम) [यथा तं मूर्धानम्] आरभामहे (=गृहीत्वा तिष्ठेम) [तथा] ॥

६ तव क्षत्रं (=बलं) हि अमी पतयन्तः (=अन्तरिक्षे गच्छन्तः) वयोऽपि (=पक्षिणोऽपि) न आपुः (=न प्राप्ताः) । [तव] सहः (=पराक्रमणं) न [आपुः] । [तव] मन्युं (=क्रोधं) न [आपुः] [तव] अनिमिषं (=सर्वदा) चरन्त्यः इमा आपः न [आपुः] । वातस्य अभ्वं (=वेगं) ये प्रमिनन्ति (=अतिक्रमन्ति) [ते अश्वादयोऽपि] न [आपुः] ॥

५ [हे सवित्या] धनयुक्त, जो तू त्या तुझ्या आश्रयानें आम्हास संपत्तीचें शिखर प्राप्त होओ, कीं जेणेकरून तें आम्ही धरून राहू

६ कारण कीं, हे [आकाशात पाहिजे तिकडे] उडणारे पक्षीहि तुझ्या शक्तीप्रत पावत नाहींत, बळाप्रत पावत नाहींत, क्रोधाप्रत पावत नाहींत; हीं सतत चालणारीं उदकें देखील पावत नाहींत; वायूचें सामर्थ्य नाहींसें करणारे जे ते देखील पावत नाहींत.

5 [O Savitā,] may we under the protection of thee, who art rich in wealth, obtain the best of prosperity that we may seize it

6 For not even these birds that fly attain to thy power, nor to thy valour, nor to thy rage, nor have these waters, that flow without interruption, nor they that overcome the strength of the wind

---

५ मन्त्राचा भावार्थ असा आहे कीं, सवित्याचा आश्रय मिळावा आणि तेणेकरून बोलणारास उत्कृष्ट संपत्तीची प्राप्ति होऊन ती त्याच्या हातीं राहावी असें व्हावे

'धनयुक्त जो तू त्या तुझ्या'= भगभक्तस्य ते' हा अर्थ सायणाचार्यांप्रमाण आम्हीं केला आहे परंतु 'देवांनी दिलेली जी तिचें' असा अर्थ करून 'राय' याचें विशेषण घेतां येईल — का जेणेकरून ते आम्ही धरून राहू' हा अर्थ 'आरभे' या तुमर्थ अव्ययापासून काढिला आहे

या मन्त्राचा अर्थ असाहि समजेल का, 'संपत्तियुक्त जो तू त्या तुझे [अंकित असे] आम्ही तुझ्या कृपेनें आरंभींच दौलतीच्या शिखरास पोहचूं असें कर'

या पांचव्या मन्त्राची देवता सविता आहे अथवा भग आहे म्हणून सूक्तारंभा सांगितलें आहे आतां या मंत्रांत सवि-त्याचें देवतात्व स्पष्ट आहे पण 'भग' देव याची देवता कशी होते असा प्रश्न निघतो त्याचें उत्तर इतकेच कीं, या पांचव्या मंत्रांत भग हा शब्द भगभक्तस्य या समासांत आला आहे पण या स्थळीं भग शब्दाचा अर्थ भगदेव असा होत नाहीं भाग्य असा होतो केवळ शब्दसाम्यावरून भग देवता मानण्याचा संप्रदाय आजपर्यंत पडला आहे

६ अनुक्रमणिकेंत या ऋचेची देवता वरुण असे सांगितलें आहे, आणि त्याप्रमाणें आम्हीं सूक्तारंभा दर्शविलेंच आहे व ऐतरेय ब्राह्मणांत सांगितल्या प्रमाणें सायणाचार्यहि म्हणतात कीं, या ऋचेपासून पुढें उरलेलें [illegible] सगळें सूक्त व याच्या पुढचें (पंचविसावें) सूक्त उत्तम [illegible] शेष। [illegible] स्तुती [illegible] यास्तव ही ऋचा व उरलेलें [illegible] सूक्त वरुणदेवतेविषयींच आहे परंतु [illegible] (सविता) देवादि-

अबुध्ने राजा वरुणो वनस्योर्ध्वं स्तूपं ददते पूतदक्षः ।
नीचीनाः स्थुरुपरि बुध्न एषामस्मे अन्तर्निहिताः केतवः स्युः ॥
॥ ७ ॥

अबुध्ने । राजा । वरुणः । वनस्य । ऊर्ध्वम् । स्तूपम् । ददते । पूतऽदक्षः ।
नीचीनाः । स्थुः । उपरि । बुध्नः । एषाम् । अस्मे इति । अन्तः । निऽहिताः । केतवः । स्युरिति स्युः ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. पूतदक्षः (=पवित्रबलो) राजा वरुणः वनस्य (=वनरूपिणो मेघमण्डलस्य) ऊर्ध्वं स्तूपं (=शेखरं) अबुध्ने (=मूलादृतेपि) ददते (=धारयति)। एते केतवः (=किरणाः) नीचैर्मुखाः (=अधोमुखाः) [अ]स्थुः (=तिष्ठन्ति) तेषां केतूनां बुध्नः (=मूलम्) उपरि (=ऊर्ध्वमुखं) [तिष्ठति]। एते केतवः अस्मासु अन्तः निहिताः स्युः (=तान् अस्माकं मध्ये निधापय) ॥

षयीं आहे त्याविषयींच हा सहावा मंत्र आहे असें म्हणण्यास कांहीं अडचण दिसत नाहीं. किंबहुना अर्थसंदर्भाव- रून हे दोन्ही मंत्र एकाच देवाविषयीं आहेत असें दिसतें, आणि या सहाव्या मंत्रांत जें काय सांगितलें आहे तें असें वरुणास लागेल असें म्हणता येईल त्याप्रमाणेंच सवित्यास लागेल.

'हे उडणारे पक्षी.' सायणाचार्य हे पक्षी म्हणजे श्येनादिपक्षीच समजतात, आकाशांतून फिरणारे नक्षत्ररूपी अथवा वायुरूपी पक्षी समजत नाहींत. उदका- विषयीं सांगितलें आहे त्यापेक्षां साहच- र्यसंबंधावरून सायणाचार्यांचा अर्थ युक्त दिसतो खरा.

'वायूचें सामर्थ्य नाहींसें करणारे जे' —'ये वातस्य प्रमिनन्ति अभ्वम्' हे कोणी अश्वादि जे चपल पशु ते असावे असें दिसतें.

मंत्राचें तात्पर्य असें दिसतें कीं, 'च- पल पक्षी, चपल उदकें आणि चपल अश्वादिक पशु हेहि तुझ्या गतीची, बलाची, पराक्रमाची आणि क्रोधाची ब- रोबरी करूं शकत नाहींत.'

आताच्या काळीं एकाद्या लहानसान देवाविषयीं जरी आम्ही प्रशंसा करूं लागलों तरी 'हे अमुक देवा, सर्व पाख- रें, सर्व उदकें आणि जनावरें तुझ्या बळाची आणि क्रोधाची बरोबरी करूं शकत नाहींत,' असें आपण बहुतकरून म्हणणार नाहीं. पण अशा प्रकारच्या स्तुतीपेक्षां अधिक साधी स्तुती आतां आम्हांस करितां येणार नाहीं आणि या साधेपणांत एक प्रकारचें सौंदर्य आहे यांत संशय नाहीं.

७. ज्याचें बल पवित्र होय, तो राजा वरुण मेघमंडलाचा घुमट बुडाशिवायच अंतराळीं धारण करितो. हे किरण अधोमुख आहेत [आणि] ह्यांचें बुड वर आहे; ते आम्हामध्ये स्थापिले जाओत.

7. King Varuna, of sacred might, holds up the dome of the forest (=cloud-region?) without a bottom. These rays stand head downwards, their bottom being upwards; may they be fixed in us

---

७. या मन्त्राचा शब्दार्थ फार कठिण आहे असें नाहीं, पण तात्पर्य काय आहे ते समजणें कठिण आहे. परंतु जें समजतें तें असें दिसतें की, 'हें जें अंतरिक्षरूपी अरण्य आहे तें बुडाशिवायच वरुण अंतराळीं धारण करितो; आणि सूर्यकिरणरूपी जीं हीं झाडें दिसतात त्यांचीं डोकीं म्हणजे अग्रे खालीं असून त्यांचीं बुडें वर आहेत हाहि प्रताप वरुणाचाच आहे. तर हे जे किरण ते आम्हांवर राहोत.' बुडाशिवाय अंतरिक्ष वरचेवर धारण केलें आहे, आणि सूर्यकिरणांची बुडें वर करून शेवटें खालीं करून ते भूमीवर जिकडे तिकडे पसरले हे वरुणाचे दोन पराक्रम वाखाणण्याचे या मंत्रकर्त्यांच्या मनांत आहे.

परंतु 'वनस्य' म्हणजे अक्षरशः अर्थ 'वनाचा' असा असतां अंतरिक्षरूपी वनाचा असा अर्थ करावा लागतो, आणि 'हे किरण' म्हणजे 'सूर्याचे हे किरण' असें विवक्षित आहे तरी 'सूर्याचे' असें दर्शविण्यास शब्द नाहीं परंतु सूर्याचे न घ्यावे तर दुसरे संभवत नाहींत - 'ते आम्हांमध्ये स्थापिले जाओत' ह्याचा भावार्थ आम्ही सूर्यकिरणांशिवाय राहू असें न होओ असा असावा.

शुनःशेपासारिख्या संकटस्थ मनुष्यानें वरुणासारिख्या मोठ्या देवाचा धांवा करितेवेळीं हा मंत्र म्हणावा असें या मंत्रांत कांहीं दिसत नाहीं त्यानें आपल्या संकटाच्या प्रसंगीं हा मंत्र म्हटला असेल कीं नाहीं याविषयीं संशय घेण्यास बरीच जागा आहे असें आम्हांस वाटतें व असेंच या सूक्तांतील कित्येक ऋचांविषयीं म्हणणें भाग आहे. संकटाच्या वेळीं न म्हणावयाचीं जीं सूक्तें अनेक आहेत त्यांतील मंत्राप्रमाणेंच हा व दुसरे मंत्र या सूक्तांत आहेत

उरुं हि राजा वरुणश्चकार सूर्याय पन्थामन्वेतवा उं ।
अपदे पादा प्रतिधातवेऽकरुतापवक्ता हृदयाविधश्चित् ॥ ८॥

उरुम् । हि । राजा । वरुणः । चकार । सूर्याय । पन्थाम् । अनु । एतवै ।
उम् इति ।
अपदे । पादा । प्रतिऽधातवे । अकः । उत । अपऽवक्ता । हृदयऽविधः ।
चित् ॥ ८ ॥

भाषायाम्

८ राजा वरुणो हि सूर्याय अन्वयनार्थम् उरु (=विस्तीर्णं) पन्थानं चकार । अपि च पादरहिताय [सूर्याय] पादौ अकार्षीत् । अपि च [स] हृदयविधश्चित् (=हृदयभेदिनः शत्रूनपि) अपवक्ता (=शासिता) [अस्ति] ॥

८. कां कीं राजा वरुण सूर्याला गमन करण्यासाठीं रुंद रस्ता करून देता झाला, [आणि] पादहीन सूर्याला चालण्यास पाय देता झाला, आणि तो हृदयभेदी [शत्रू]पासूनहि रक्षण करणारा होय.

8. For king Varuṇa made the broad path for Sûrya (*the sun*) to go along, he gave feet to the footless [Sûrya] to go on; and he is a defender from that [foe] even that breaks the heart.

---

८. या मंत्राचा भावार्थ सोपा आहे. तो हा कीं, आकाशांतून ज्या मार्गानें सूर्य जातो तो रुंद मार्ग सूर्यासाठीं वरुणानें करून दिला, आणि त्या मार्गानें जाण्यास सूर्यास पाय नव्हते ते त्याला वरुणानेंच दिले; आणि आम्हांस न कळत जर आमचा शत्रु आमचें हृदय फोडून टाकील तर तशा शत्रूपासून अथवा रोगापासून आमचा बचावहि वरुणच करीत असतो.

ह्या तीन गोष्टींतून पहिल्या दोन गोष्टींचा विचार करून पाहू लागलें तर अर्वाचीन काळीं वरुणाविषयीं जी कल्पना आहे की, तो केवळ समुद्राची आणि इतर उदकांची देवता होय लिङ्गा आणि वेदांत वरुणाविषयीं सांगितलें आहे त्याला बरेंच अंतर आहे वेदांत वरुण देवता मोठ्या महत्त्वाची आहे; आणि तो आकाश निर्माण करितो आणि सूर्यास पाय देऊन त्यास चालवितो हा त्याचा मोठा पराक्रम वर्णिला आहे. व त्यास 'राजा' असेंहि म्हटलें आहे तो पापपुण्याचा पाहणारा आहे, आणि गुप्तपणें नाश करूं इच्छिणाऱ्या शत्रूपासून अथवा रोगापासून सुद्धा सरक्षण करणारा होय.

'हृदयभेदी [शत्रू]पासूनहि रक्षण करणारा'='अपवक्ता हृदयाविधश्चित्.' याचा अर्थ 'हृदयभेदी [रोग]पासूनहि रक्षण करणारा' असाहि होऊं शकेल. वरुण रोगापासून मुक्त करितो आणि तो मोठा वैद्य आहे याविषयीं पुढचा मंत्र पाहा

शतं ते राजन्भिषजः सहस्रमुर्वी गभीरा सुमतिष्टे अस्तु ।
बाधस्व दूरे निर्ऋतिं पराचैः कृतं चिदेनः प्र मुमुग्ध्यस्मत् ॥९॥

शतम् । ते । राजन् । भिषजः । सहस्रम् । उर्वी । गभीरा । सुऽमतिः ।
ते । अस्तु ।
बाधस्व । दूरे । निःऽर्ऋतिम् । पराचैः । कृतम् । चित् । एनः । प्र ।
मुमुग्धि । अस्मत् ॥ ९ ॥

भाषार्थम्.

९. हे राजन् [वरुण] तुभ्य शत सहस्रं [वापि] भिषज (=भेषजानि) [सन्तु] । तुभ्यम् उर्वी (=दीर्घा) गभीरा सुमतिः (=सुप्रसाद) [अस्मदर्थम्] अस्तु । [त्व] निर्ऋतिं (=पाप्मान) दूरे बाधस्व (=परागमय) । कृत चित् (=अस्माभि कृतमपि) एन. (=पापम्) अस्मत् प्रमुमुग्धि (=प्रमोचय) ॥

९. हे राजा [वरुणा], [आम्हांसाठीं] तुझ्या जवळ शेकडो [आणि] हजारो औषधें [असोत], [आम्हाविषयीं] तुझी कृपा मोठी [आणि] गंभीर असो; निर्ऋतीस जवळ येऊं न देतां दूर हटीव; [आणि] [आमच्या हातून पाप] घडलें जरी असेल तरी तें आम्हांपासून दूर काढून टाक.

9 O king [Varuna] [may there be] with thee a hundred, [nay] a thousand medicines [for us]; may thy kindness be great [and] unfathomed, chase away Nirriti far off [from us]; [and] snatch away from us sin that has even been committed.

९ भावार्थ—'आम्हांस कोणताहि रोग झाला तरी तो बरा करण्यासाठीं तुजजवळ हजारो औषधें असोत; आम्हांवर तुझी कृपा असो, आणि ती मोठी आणि अगाध असो; आम्हीं पातकें करावीं म्हणून आम्हांस शिकविण्यास पापदेवता निर्ऋति या नांवाची आम्हांजवळ येत असेल तर तिला दूर हाकून दे, आणि जीं पातकें आमच्या हातून घडलेलीं असतील तीं आम्हांपासून काढून टाक.'

हा मंत्र चमत्कारिक व महत्त्वाचा आहे. यांत वरुणदेवतेचीं कामें आणि त्या देवाचे अधिकार व त्याच्या शक्ती सांगितल्या आहेत. रोग झाल्यास ते बरे करणें हें वरुणाचें काम; वरुणाची कृपा होईल तर ती मोठ्या जलाशयाप्रमाणें विस्तीर्ण आणि अगाध असते; पाप करण्याविषयीं वासना उत्पन्न करण्यास निर्ऋति येईल तर तिला हाकून देण्याची शक्ति त्याला आहे; आणि जें पाप मनुष्याच्या हातून घडून गेलें असेल त्याची क्षमा करण्याचा अधिकार त्याचा आहे

'निर्ऋति' हें येथें विशेषनाम आहे. या शब्दाचा साधारण अर्थ नाश असा होतो; त्यावरून नाश जिच्या प्रेरणेनें होतो अशी पापरूपी एक देवता; जिजपासून आपली मुक्ति व्हावी असें ऋषिजन वेदांत पुष्कळ ठिकाणीं म्हणत असतात त्यावरून अर्वाचीन संस्कृतांत निर्ऋति म्हणजे राक्षस असा अर्थ होऊं लागला. व 'निर्ऋति' या वाईट देवता अथवा पिशाचें ज्या दिशेस राहतात असें समजूं लागले त्या दिशेचें नांव त्यावरूनच 'नैर्ऋत्य' दिशा असें पडलें.

'पाप घडलें असेल तरी तें आम्हांपासून दूर काढून टाक' अशी प्रार्थना वरुणाची करण्याचें तात्पर्य असें आहे कीं, पाप घडलें म्हणजे वरुण तें पाहतो आणि त्याबद्दल शिक्षा करितो अशी वैदिक काळीं समजूत असल्याविषयीं नेदांवरून समजूत येते अर्वाचीन काळीं पापपुण्याचा न्याय करून शिक्षा अथवा स्वर्गसुख देण्याचें काम यमाकडे आलें आहे तें अति प्राचीन काळीं वरुणाकडेस होतें. यम म्हणून जी देवता आपण मानितों तिचा अति प्राचीनकाळच्या वेदभागांत उल्लेख नाहीं

अमी य ऋक्षा निहितास उच्चा नक्तं ददृश्रे कुह चिद्दिवेयुः ।
अदब्धानि वरुणस्य व्रतानि विचाकशच्चन्द्रमा नक्तमेति ॥
॥१०॥१४॥

अमी इति । ये । ऋक्षाः । निऽहितासः । उच्चा । नक्तम् । ददृश्रे । कुह । चित् । दिवा । ईयुः ।
अदब्धानि । वरुणस्य । व्रतानि । विऽचाकशत् । चन्द्रमाः । नक्तम् एति ॥ १० ॥ १४ ॥

भाषार्थम्

१० अमी ये ऋक्षा (=सप्तर्षयो नाम नक्षत्राणि) उच्चै निहिता नक्त (=रात्रौ) दृश्यन्ते [ते] दिवा (=दिवसे) क्वापि गच्छन्ति। विचाकशत् (=देदीप्यमानश्) चन्द्रमा नक्तं (=रात्रौ) एति (=आयाति)। [तस्माद्] वरुणस्य व्रतानि (=शासनानि) अदब्धानि (=अप्रतिहतानि) [वर्तन्ते] ॥

१०. हे जे ऋक्ष उच्चस्थलीं स्थापिलेले रात्रीच्या वेळीं दिसत असतात ते दिवसा कोठें तरी जात असतात. वरुणाचे नियम कोणी मोडीत नाहीं; देदीप्यमान चंद्रमा रात्रीं येत असतो.

10. These Bears (the *Ursa-Major and Ursa Minor*) which are visible at night placed high above, disappear somewhere during the day. The ordinances of Varuna are inviolate; in all her effulgence the moon comes at night.

१०. मंत्राचा भावार्थ.–'हे जे रात्रीच्या वेळीं आकाशांत उंच ठिकाणीं सप्तर्षि नांवाचे तारे आमच्या दृष्टीस पडतात ते दिवसाला कोठें तरी जात असतात. कारण कीं, दिवसाला ते दृष्टीस पडत नाहींत. तसाच दिवसाला दृष्टीस पडत नसतो अत एव दिवसास कोठें तरी जात असेल, अथवा दृष्टीस पडलाच तरी निस्तेज असा दृष्टीस पडतो, तो चंद्रमा रात्रीच्या वेळीं नियमित काळीं बिनचूक येत असतो आणि ह्या ज्या गोष्टी घडून येतात त्या वरुणाच्या हुकुमावरून घडून येत असतात यास्तव वरुणाचे नियम अथवा हुकूम कोणी मोडीत नाहीं असें म्हटलें पाहिजे '

'ऋक्ष' या शब्दाचा मूळअर्थ फाडून टाकणारा; त्यावरून अस्वल असा अर्थ होतो, याचे उदाहरण, 'मीढुष्मतीव पृथिवी पराहता मदन्त्येत्यस्मदा। ऋक्षो न वो मरुतः शिमीवाँ अमो दुध्रो गौरिव भीमयुः ' ऋ. ५.५६ ३. त्यावरून ज्याला आधुनिक भाषेमध्ये सप्तर्षि असें अथवा मराठींत खाटलेंबाजलें असें नांव पडलें आहे, ते सात तारे नंतर 'ऋक्ष' हें साधारण कोणत्याहि नक्षत्राचें नांव पडलें आहे, आणि त्यावरूनच नक्षराज म्हणजे नक्षत्रपति असें चंद्राचें नांव पडलें आहे.

हा मंत्र मोठ्याच महत्त्वाचा आहे. कारण कीं, 'ऋक्षा' हें जे 'सप्तर्षीस' नांव येथें आहे या गोष्टीवरून असें सिद्ध होतें कीं, या नक्षत्राचें हें नांव ग्रीक आणि रोमन लोकांनीं आम्हांकडून घेतलें असेल एक, अथवा ज्या वेळा आर्य लोकांच्या ग्रीक आणि रोमन ह्या शाखा पौर्व आर्य लोकांस (हिंदूस) सोडून पश्चिमेकडेस गेल्या त्यापूर्वींच या नक्षत्रास 'ऋक्षा' हें नांव आर्यलोकांनीं दिलें होतें; आणि तें पौर्व आर्य पूर्वकडेस (हिंदुस्तानाकडेस) आले तेव्हां त्यांनीं इकडे आणिलें आणि पाश्चिम आर्य म्ह. ग्रीक व रोमन पश्चिमेकडेस (युरोपांत) गेले तेव्हां ते पश्चिमेकडे घेऊन गेले. नाहीं तर या प्रसिद्ध नक्षत्रास संस्कृतांत (ऋक्ष), ग्रीक भाषेंत (आर्क्टिक्यन) आणि लाटिन भाषेंत (अर्सा) एकच नांव असण्याचें कारण काय असावें? आम्हीं हें नांव पाश्चिम आर्य लोकांकडून घेतलें हें तर अगदीं म्हणतां येणार नाहीं, कारण ऋग्वेदासारिख्या पुरातन संस्कृत ग्रंथांत तें आढळतें. आणि जर अति पुरातन ग्रीक अथवा रोमन ग्रंथांत तें सांपडत नसेल तर आमच्याकडून ग्रीक लोकांनीं आणि ग्रीक लोकांकडून नंतर रोमन

तत्त्वा यामि ब्रह्मणा वन्दमानस्तदा शास्ते यजमानो हविर्भिः ।
अहेळमानो वरुणेह बोध्युरुशंस मा न आयुः प्र मोषीः ॥ ११ ॥

तत् । त्वा । यामि । ब्रह्मणा । वन्दमानः । तत् । आ । शास्ते । यजमानः । हविःऽभिः ।
अहेळमानः । वरुण । इह । बोधि । उरुऽशंस । मा । नः । आयुः । प्र । मोषीः ॥ ११ ॥

तदिन्नक्तं तद्दिवा मह्यमाहुस्तदयं केतो हृद आ वि चष्टे ।
शुनःशेपो यमह्वद्गृभीतः सो अस्मान्राजा वरुणो मुमोक्तु ॥ १२ ॥

तत् । इत् । नक्तम् । तत् । दिवा । मह्यम् । आहुः । तत् । अयम् । केतः । हृदः । आ । वि । चष्टे ।
शुनःऽशेपः । यम् । अह्वत् । गृभीतः । सः । अस्मान् । राजा । वरुणः । मुमोक्तु ॥ १२ ॥

भाषाप्रायम्.

११. [हे वरुण] [अहं] ब्रह्मणा (=स्तोत्रेण) त्वा वन्दमान. [ए]तद् यामि (=याचे), यजमानो[ऽपि] हविर्भि. [ए]तद् आशास्ते (=याचते), [यद्:] हे उरुशंस (=बहुस्तुत) वरुण [त्व] अहेळमान (=अक्रुध्यन्) इह (=अस्मिन् विषये) बोधि (=बुध्यस्व=अस्मान् शृणु)। अस्माकम् आयु मा प्रमोषीः (=मा चोरय) ॥

१२. [ए]तदेव नक्तम् [अपि च] [ए]तदेव मह्य दिवसे [जना] आहु: [अपि च] हृदयस्य अय केत (=वाञ्छा) [ए]तद् आविचष्टे (=आह) [यद्] गृहीत [सन्] शुन शेप य [वरुण] अह्वत् (=आह्वयत्) स वरुणो राजा अस्मान्मुमोक्तु (=मोचयेत्) ॥

लोकोनीं ते घेतलें असें म्हणणें भाग पडेल आणि आम्हीं राशिचक्राचें ज्योतिष सर्व ग्रीक लोकांकडून घेतलें असें जें डिलीएव्हाचें म्हणणें आहे त्याच्या समर्थनार्थ हें नाव असें सिद्ध करील कीं, जर हिंदूंनीं ग्रीक लोकांपासून थोडीशा अशोचींच बाबी ज्योतिषाचे कांहीं विषय घेतले तर ग्रीक लोकांनींहि त्यापूर्वीच हिंदूंपासून कित्येक ज्योतिषाच्या गोष्टी घेतल्या होत्या.

इतकी महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं 'देदीप्यमान चंद्रमा रात्रीं येत असतो' असें म्हटलें आहे त्यापेक्षां ही ऋचा रचिली गेली तेव्हां हिंदुलोक हिंदुस्थानासारिख्या उष्ण प्रदेशांत रहात होते. कारण जर मध्य एशियासारिख्या अति थंड प्रदेशांत रहाते तर इंग्लंडादि देशांत असतो तसा चंद्रमा फिकट आणि निस्तेज असता, आणि त्याला 'देदीप्यमान' असें आर्यलोकांनीं म्हटलें नसतें असें आम्हांस वाटतें.

११. मी वंदन करून तुजजवळ स्तोत्रानें हेंच याचितों, यज्ञ करणारा[हि] हवींच्या योगानें हेंच मागतो, [कीं] हे वरुणा, तूं अव्हेर न करितां या इकडेस कृपादृष्टी कर, [आणि] हे बहुस्तुता [वरुणा], आमचें आयुष्य हरण करूं नको.

11 This is what I with adoration ask of thee through my hymn, [and] this is what the sacrificer seeks by his oblations,—[viz.] Varuna, look down hither without anger and, O thou praised by many, do not deprive us of our life.

१२ मला रात्रीं हेंच [आणि] दिवसा[हि] हेंच सांगतात, [आणि] [माझ्या]हृदयांतील ही इच्छा [सुद्धां] हेंच सांगते, [कीं] शुनःशेपाला धरिलें तेव्हां त्यानें ज्याला हाक मारिली तो राजा वरुण आम्हांस मुक्त करो.

12. This is what they have told me at night, this in the day time, this is what the desire of [my] heart perceives.—[viz.] may that king Varuna, whom S'unas's'epa invoked [when] seized, liberate us.

११. भावार्थ असा आहे कीं, 'मी हा नमस्कार करून आणि हें स्तोत्र गाऊन जें मागतों आहे आणि यज्ञ करणारा जें मागतो तें हें कीं, हे अनेकांनीं स्तविलेल्या वरुणा, तू इकडे कृपावलोकन कर आणि आमचा (म्हणजे माझा) जीव घेऊं नको'

'स्तोत्रानें'='ब्रह्मणा' हा 'ब्रह्म' शब्द मोठ्या योग्यतेचा आहे. ब्रह्मशब्दाचा जो अगदीं मूळचा अर्थ आहे तो या ठिकाणीं आला आहे तो हा कीं, 'स्तोत्र', 'प्रार्थना,' 'स्तुति'. आणि ती जो करी त्याचें नांव 'ब्राह्मण', मग तो कोणी असो 'ब्राह्मण' याचा अर्थ अमुक एक जातीचा मनुष्य असा आरंभीं होत नव्हता

हा मंत्र हविर्दानाच्या वेळा म्हटला होता असें म्हणण्यापेक्षां सामान्य एकादा यज्ञाच्या प्रसंगीं म्हटला असावा असें चांगलें समजतें कारण मंत्र बोलणारा आपण आणि यज्ञ करणारा (यजमान) यांजमध्यें विरोध दर्शवून आपण वदन करून प्रार्थना करीत आहे आणि यजमान हवींच्या आहुती देत आहे असें दाखवून दोघांचेंहि मागणें एकच आहे कीं, वरुणानें कृपावलोकन करून दोघांच्याहि आयुष्याचें रक्षण करावें, असें म्हणतो आहे असें दिसतें.

आयुष्य रक्षणें अथवा लयास नेणें हे हल्लीं आपण यमाच्या स्वाधीन आहे असें समजतों, पण तें काम प्राचीन काळीं वरुणाकडेस होतें असें या मंत्रावरून दिसून येईल.

'बहुस्तुत' म्हणजे पुष्कळ लोक ज्याची स्तुती करीत असतात तो हे विशे-

शुनःशेपो ह्यह्वद्गृभीतस्त्रिष्वादित्यं द्रुपदेषु बद्धः ।
अवैनं राजा वरुणः ससृज्याद्विद्वाँ अदब्धो वि मुमोक्तु पाशान् ॥ १३ ॥

शुनःशेपः । हि । अह्वत् । गृभीतः । त्रिषु । आदित्यम् । द्रुऽपदेषु । बद्धः । अव । एनम् । राजा । वरुणः । ससृज्यात् । विद्वान् । अदब्धः । वि । मुमोक्तु । पाशान् ॥ १३ ॥

भाष्यायाम्.

१३. शुन शेपो हि गृहीत [सन्] त्रिषु द्रुपदेषु (=त्रिषु यूपपदेषु) बद्धश् [च सन्] आदित्य (=अदिते पुत्र) [वरुणम्] [एव] अह्वत् (=आह्वयत्) [यथा] विद्वान् अदब्ध. (=केनापि अप्रतारित.) राजा वरुण एन [शुन शेप] अवसृजेत् पाशाश्[च] विमोचयेत् ॥

पण इद्रास आणि इतर कितीएक देवांस लाविलेलें वेदांत आढळतें.

१२ मंत्रवक्त्याचा भावार्थ असा आहे की, 'मला रात्रंदिवस लोक असे सांगत आले आहेत आणि माझी मनोदेवताहि असे सांगते की, शुन शेपानें ज्या वरुणाचा धांवा केला त्याचा धांवा जर आम्हीं केला तर शुन शेपाची केली तशी आमचीहि तो मुक्ती करील'

'शुन शेपाला धरिलें तेव्हां त्यानें ज्याला हाक मारिली तो राजा वरुण आम्हांस मुक्त करो', यावरून हा मंत्र शुन शेपानें केलेला अथवा म्हटलेला नसावा आणि जर म्हटलाच असेल तर त्याला यूपाला बांधिला आणि मारावयास काढिला तेव्हां तरी निदान म्हटलेला नसेल, पुढें एकाद्या प्रसंगी म्हटला असेल सायणाचार्य तर ऐतरेय ब्राह्मणांतील कथेस अनुलक्षून हा मंत्र शुन शेपानें यूपबधाच्या संकटाच्या वेळींच म्हटला असें म्हणतात आणि त्याप्रमाणें अर्थ करून 'आम्हांस मुक्त करो' म्हणजे मला शुन शेपाला मुक्त करो असाच अर्थ करितात परंतु अर्थ तसा करण्यास ऐतरेय ब्राह्मणांतील वगैरे शुन शेपाच्या कथेसेरीज दुसरा आधार कांहीं नाहीं आणि या सूक्तावरून ती कथा उत्पन्न झाली असेल असें म्हणण्यास बरीच कारणें व इतर सूक्तांचीं उदाहरणें आहेत

१३. कारण कीं जेव्हां शुनःशेपाला धरून तीन खांबांजवळ बांधिला, तेव्हा त्याणे [या] आदित्याचा धांवा केला, [कीं] 'राजा वरुण, जो [सर्व] जाणतो [आणि] ज्याला कोणीहि टकवू शकत नाहीं, तो या [जना]ला सोडवो [आणि] पाश सोडून टाको'.

13 For S'unas's'epa [when] seized [and] tied at the three posts invoked [this] Âditya, [that] king Varuna, who knows [all] [and] whom none can deceive, might liberate him, [and] loosen his bonds

---

१३. मन्त्रवक्त्याचा भावार्थ—'जेव्हां शुनःशेपाला धरून खांबास बांधिलें तेव्हां त्या शुनःशेपानें वरुणाचा असा धांवा केला कीं 'हे राजा वरुणा, तूं सर्व जाणतोस, आणि तुला कोणीहि ठकवू शकत नाहीं. तूं मला सोडीव आणि तूं माझे पाश सोडून टाक'. असा ह्या वरुणाचा प्रताप आहे वास्तव तो आम्हांसहि तारो.' आमच्या मतें हा मन्त्र शुनःशेपास धरून यूपाला बांधिला तेव्हां म्हटलेला नव्हे, तर दुसऱ्या प्रसंगी शुनःशेपानें अथवा दुसऱ्याच कोणी मनुष्यानें म्हटलेला आहे, आणि शुनःशेपास वरुणानें कसा रक्षिला त्याचा दाखला या मन्त्रांत दिला आहे.

'तीन खांबांजवळ'=त्रिषु द्रुपदेषु' हे तीन खांब कोणते? 'द्रुपद' या पदाची व्युत्पत्ती सायणाचार्य 'द्रो'=काष्ठाचें, 'पदम्'=स्थल, अशी करितात परंतु तीन कोणतीं स्थलें ते ते सांगत नाहींत कसेंहि असो द्रुपद म्हणून जें देशाचें नांव आहे, आणि ज्यावरून द्रौपदी हें पांडवांच्या नायकीचें नांव पडलें तें याच शब्दावरून झालें आहे. पण त्याचा संबंध या स्थलाशीं काय आहे तें समजत नाहीं—'[या] आदित्याचा' म्हणजे वरुणाचा. वरुण हा एक आदित्यांपैकीं आदित्य आहे याविषयीं पूर्वीं १४ व्या सूक्तांतील ३ ऱ्या मन्त्रावर पृष्ठ १०२ येथें उजवीकडे 'आदित्य' शब्दावरची टीप पाहा. तेथें सांगितलेंच आहे कीं, "केव्हां केव्हां एकट्या वरुणासच आदित्य असें म्हटलें आहे'

°अवं ते हेळो वरुण नमोभिरवं यज्ञेभिरीमहे हविर्भिः ।
क्षयन्नस्मभ्यमसुर प्रचेता राजन्नेनांसि शिश्रथः कृतानि ॥ १४ ॥

अवं । ते । हेळः । वरुण । नमःऽभिः । अवं । यज्ञेभिः । ईमहे । हविःऽभिः ।
क्षयन् । अस्मभ्यम् । असुर । प्रचेत इति प्रऽचेतः । राजन् । एनांसि ।
शिश्रथः । कृतानि ॥ १४ ॥

भाषायाम्

१४ हे वरुण, [वय] तव हेळ (=क्रोध) नमोभि (=नमस्कारै) अवेमहे (=अपगच्छत्विति याचामहे)। [तथा] यज्ञै अवेमहे हविर्भिश्[च] अवेमहे। हे असुर (=देव), हे प्रचेत, हे राजन्, [त्व] क्षयन् (=प्रभवन् सन्) [अस्माभि] कृतानि एनांसि (=पापानि) अस्मभ्य शिश्रथ (=शिथिलीकुरु=मोचय) ॥

° हा मत्र उपाकर्मांत स्नानविधींत गृहीत आहे परतु याचा सबध त्याशीं किती आहे त्याचा विचार केला तर या स्मार्तविनियोगाविषयीं फार सांगावयास नको असें दिसून येईल

१४. हे वरुणा, तुझी अवकृपा न व्हावी म्हणून आम्ही नमस्कारांनीं प्रार्थितों, यजनेंकरून प्रार्थितों, [आणि] हवींच्या योगानें प्रार्थितों. हे देवा, हे बुद्धिमंता राजा [वरुणा], [आम्हीं] केलेल्या पापांची [आम्हांपासून] सुटका करून त्यांची आम्हांला क्षमा कर.

14. We propitiate thy anger, Varuna, by adorations, propitiate by sacrifices, [and] by oblations. Forgive us, O God, O wise king, the sins committed [by us] and slacken their bonds.

---

१४. ह्या मंत्राचे तात्पर्य असे आहे कीं, 'हे वरुणा, तुझा क्रोध आम्हांवर न व्हावा म्हणून आम्ही तुला नमस्कार करितों, तुजप्रीत्यर्थ यज्ञ करितों, आणि तुला हवि देतों; तर हे बुद्धिमंता राजा वरुणा, आम्हीं केलेली पातकें आम्हास माफ कर आणि त्या पातकांचे जे पाश आम्हांस बांधीत आहेत ते, तूं शुनःशेपाचे पाश सोडविलेस तसे, सोडून सैल कर.' आमच्या मतें हाहि मंत्र शुनःशेपास यूपाला बांधिला त्या संकटाच्या वेळीं शुनःशेपानें म्हटलेला नव्हे, तर दुसऱ्यानेंच अन्य प्रसंगीं म्हटला असेल. आणि यांत शुनःशेपाचा दाखला द्यावा असें मंत्रवक्त्याच्या मनांत विवक्षित असेल असें दिसतें.

यांत एक शब्द मोठा चमत्कारिक आहे. तो 'असुर' हा होय. याचेंच आम्हीं 'देवा' असें भाषांतर केलें आहे. साधारण संस्कृतांत 'असुर' शब्दाचा अर्थ देव असा होत नाहीं, तर देवांचे जे शत्रु दैत्य ते असा होतो. विद्वज्जनांस ठाऊक आहे कीं, पारसिकांच्या धर्मांत हिंदूंच्या देवांस देव असें म्हणतात; परंतु त्यांच्या भाषेंत देव शब्दाचा अर्थ भूत, दैत्य असा होतो. आणि ते आपल्या स्वताहाच्या देवास असुर (अहुर) असें म्हणतात. यावरून, आम्ही वेदांआलीकडील संस्कृतांत आमचे देव खेरीज करून जे इतर देव त्यांस असुर असें म्हणतों आणि आमच्या देवांस ते देव (=दैत्य) म्हणतात असें झालें. दुसरी 'असुर' शब्दाविषयीं अशी चमत्कारिक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे कीं, ऋग्वेदांत आणि इतर वेदांत 'सुर' शब्द मुळींच येत नाहीं. तो मागाहून 'असुर' शब्दापासून उत्पन्न झाला असें म्हटलें पाहिजे. तो येणेंप्रमाणें.–प्रथम 'असुर' असें सर्व देवांस आपण म्हणत होतों. नंतर तो शब्द दुसऱ्या लोकांच्या (पारसिकादिकांच्या) देवांस अथवा वाईट देवांस म्हणजे दैत्यादिकांस तुच्छार्थी लावूं लागलों, आणि त्याहून जे भिन्न म्हणजे आमचे (चांगले) देव त्यांस नांव पाहिजे तें 'असुर' यापासूनच आम्हीं काढिलें. असुर याची खरी व्युत्पत्ती अस् धातूपासून असलेली क्षणभर विसरून 'असुर' शब्दांत जो 'अ' आहे तो 'न' या अर्थी आहे असें गैर समजून 'सुर' शब्द निर्माण केला आणि 'असुर' म्हणजे वाईट देव नव्हेत ते

उदुत्तमं वरुण पाशमस्मदवाधमं वि मध्यमं श्रथाय ।
अथा वयमादित्य व्रते तवानागसो अदितये स्याम ॥ १५ ॥ १५ ॥

उत् । उत्ऽतमम् । वरुण । पाशम् । अस्मत् । अव । अधमम् । वि ।
मध्यमम् । श्रथय ।
अथ । वयम् । आदित्य । व्रते । तव । अनागसः । अदितये ।
स्याम ॥ १५ ॥ १५ ॥

भाषायाम्.

१५ हे वरुण, उत्तमम् (=उपरि वर्तमान) पाशम् अस्मद् उच्छ्रथय । अधमम् (=अधो वर्तमान) पाशम् अवश्रथय । मध्यम (=मध्ये वर्तमान) पाश विश्रथय । अथ (=तदनन्तर) हे आदित्य [वरुण], वयम् अनागस (=निष्पापा सन्त) तव व्रते (=शासने) अदितये (=अखण्डितत्वाय=उन्नतये) स्याम ॥

'सुर' असें समजून 'सुर' हे नांव आम्हा आपल्या देवांस लाविलें याप्रमाणेंच दुसरा उदाहरणें – अदिति' शब्दावरून दिति' आणि तिचे पुत्र 'दैत्य' हे आपण निर्माण केले, तसाच 'विधवा' शब्दापासून (हा शब्द वि धवा असा झाला आहे असें गैर समजून) 'धव' म्हणजे नवरा आम्हीं निर्माण केला आहे, आणि त्यानंतर मा धव, रमा धव, उमा धव हे प्रचारांत आले आणि तिसरें उदाहरण हे का, 'नादार' नव्हे तो दार' म्हणजे पैसा भरण्यास समर्थ असा शब्द नुकाच उत्पन्न होऊन आमच्या कोर्टांत प्रचारांत येत चालला आहे

वेदांत वरुणास राजा की म्हणतात याचे कारण या भेवावरून समजून येईल कारण जसा प्रजांना केलेला अपराध राजा माफ करितो तशीं मनुष्यांना केलेला पातक वरुणराजास क्षमा करण्याविषयी या ऋचेंत त्याची प्रार्थना केली आहे

'पापाची [आम्हांपासून] सुटका करून त्याची आम्हांला क्षमा कर'= 'क्षयन् अस्मभ्य. एनांसि शिश्रथ' शब्दशः अर्थ 'आम्हांस माफ करून पापाची [आम्हांपासून] सुटका कर' 'पापाची सुटका कर' यांत पापरूपी पाश जे आम्हांस बांधीत आहेत ते आमचे अंगापासून सोडीव असें विवक्षित आहे 'क्षयन्' याचा अक्षरशः अर्थ '[पातकांवर तू आपला] हुकूम करणारा होत्साता'

१५ हे वरुणा, आम्हांपासून वरचा पाश वर [सैल कर], खालचा खालीं [सैल कर], [आणि] मधला [मधें] सैल कर, कीं जेणेंकरून हे आदित्या, आम्ही निष्पाप होऊन तुझ्या सेवेंत राहूं आणि उन्नतीप्रत पावूं.

15. Loosen up, Varuna, the upper bond from us, loosen down the lower bond, and loosen the middle bond, that we may then, Âditya, be free from sin and be in thy ordinance and prosper.

१५. बोलणाऱ्याचा अभिप्राय असा आहे कीं, आपणास तीन बंधांनीं बांधिलें आहे त्यांतून वरचा बंध, हे वरुणा, वर सोडून टाक, मधला मधें आणि खालचा खालीं सोडून टाक. म्हणजे मग आम्ही निष्पाप होऊन तुझ्या हुकुमांत, म्हणजे पाप न करावें, चांगलें करून देवयजन करावें इत्यादि आज्ञेत, राहूं आणि भरभराटीस पावूं.

'आदित्य' म्हणजे येथें वरुणच समजावयाचा. वर १३ व्या मंत्रावरील टीप पाहा.

'तुझ्या सेवेंत राहूं'=तव व्रते स्याम.' व्रत म्हणजे आज्ञा, हुकूम, घालून दिलेला नियम, कीं मनुष्यांनीं नित्य वरुणाची सेवा करावी हें एक 'व्रत', पातक करूं नये हें एक 'व्रत'. सूर्यचंद्रांनीं नियमित काळीं आकाशांत गमन करावें हें एक वरुणाचें 'व्रत'. पाऊस जमिनीवर पडावा व समृद्धि व्हावी हें इंद्राचें 'व्रत'. हा जो व्रत शब्दाचा अर्थ आहे त्यापासून त्या शब्दाचा आलीकडे प्रचारांत असलेला अर्थ वेगळा आहे हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. 'सत्यनारायणाचें व्रत' या अर्थी 'व्रत' शब्दाचा प्रयोग वैदिक युगांत होत नसे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. वेदांत जो 'व्रत' शब्दाचा हुकूम असा अर्थ होतो म्हणून सांगितलें तें पुढच्या सूक्तांतील पहिल्या मंत्रांत केलेल्या त्याच शब्दाच्या प्रयोगावरून स्पष्ट दिसून येईल.

सूक्तम् २५.

अजीगर्तिपुत्रः शुनःशेप ऋषि । वरुणो देवता । गायत्री च्छन्द ॥

°यच्चिद्धि ते विशो यथा प्र देव वरुण व्रतम् ।
मिनीमसि द्यविद्यवि ॥ १ ॥

यत् । चित् । हि । ते । विशः । यथा । प्र । देव । वरुण । व्रतम् ।
मिनीमसि । द्यविऽद्यवि ॥ १ ॥

मा नो वधाय हत्नवे जिहीळानस्य रीरधः ।
मा हृणानस्य मन्यवे ॥ २ ॥

मा । नः । वधाय । हत्नवे । जिहीळानस्य । रीरधः ।
मा । हृणानस्य । मन्यवे ॥ २ ॥

भाषार्थम्.

१. हे वरुण देव, यच्चिद्धि (=यद्यपि) [वयम्] [अन्या] विशो यथा (=जना इव) तव व्रतम् (=शासन) द्यविद्यवि (=दिनेदिने) प्रमिणीमः (=भञ्ज्मः),

२ [तथापि] जिहीळानस्य (=क्रुद्धस्य) [तव] हत्नवे (=घातकाय) वधाय (=शस्त्राय) न (=अस्मान्) मा रीरध. (=देहि) । हृणानस्य (=क्रुद्धस्य) [तव] मन्यवे (=क्रोधाय) [नो] मा [रीरधः] ॥

° या मन्त्रापासून पुढील दहा ऋचांची योजना सायसंध्येत वरुणोपस्थान म्हणून केली आहे.

सूक्त २५.

ऋषि–पूर्ववत्. वृत्त–गायत्री. देवता–वरुण.

१. हे देवा वरुणा, जरी [इतर] लोकाप्रमाणे [आम्ही] तुझा हुकूम दररोज मोडीत असतों,

२. [तरीहि] रागावून तूं आम्हास [आपल्या] घातक [आणि] मारक शस्त्राच्या स्वाधीन करूं नकोस; तूं क्रोधायमान होऊन [आम्हास] [आपल्या] क्रोधाच्या [स्वाधीन करूं] नकोस.

HYMN 25.

To *Varuna* By *S'unas's'epa* the author of the previous hymn. Metre *Gâyatri.*

1. Though like [other] people, divine Varuna, we daily break thy ordinance,

2. [nevertheless] do not deliver us to thy deadly [and] dangerous weapon in wrath, do not [deliver us] to thy rage in anger.

१. पूर्वीच्या सूक्तारंभीं जी शुनःशेपाची कथा ऐतरेय ब्राह्मणांतून दिली आहे तींत सांगितल्याप्रमाणें तर हें सूक्तहि यूपास बांधल्या वेळींच शुनःशेपानें म्हटलेलें आहे. पण प्रत्येक मंत्राचा विचार करून पाहूं लागलें तर या मंत्रांत त्या प्रसंगास अनुलक्षून कांहींच भाषण नाहीं. किंबहुना इतर प्रसंगींच हे रचिले असावे असें दिसून येतें.

वरुण हा मनुष्यांनीं केलेल्या पापांबद्दल शासन करणारा देव आहे असें पूर्वीं सांगितलें आहे तें लक्ष्यांत ठेविलें तर या मंत्राचा अर्थ चांगला समजतो, व त्यांतील रूप फार सुंदर आहे असें दिसून येतें. मंत्रकर्ता म्हणतो, 'आम्ही कितीं झालों तरी मर्त्य आहों, यास्तव प्रत्यहीं कांहीं ना कांहीं तरी पाप आमच्या हातून होत असतें यास्तव तूं कृपा करून क्षमा केली पाहिजे.'

२. आमच्या हातून पाप तर होतच असतें, आणि वास्तविक म्हटलें तर आम्ही तुझ्या शासनास पात्र होतोच. तथापि हे वरुणा, आम्हाला क्षमा कर, आम्हांवर रागावूं नको, आणि आम्हांस आपल्या भयंकर आणि घातक शस्त्रानें मारूं नको, असें मंत्रकार या मंत्रांत म्हणतो. शासन करणारा जो राजा वरुणदेव त्याची ही उत्तम प्रार्थना आहे यांत संशय नाहीं.

'घातकशस्त्राच्या'. 'वध' शब्दाचा अर्थ सायणाचार्य 'मरण' असाच करितात, पण येथें घातक अथवा मारणारें शस्त्र असा अर्थ अधिक सयुक्तिक दिसतो तो आम्हीं केला आहे. त्याला आधार सायणोक्तीच आहे. [illegible] पूर्वी सूक्त ५ मंत्र १० यावर [illegible] टीप पृष्ठ ३६ [illegible] येथें [illegible] [illegible] 'वध' म्हणजे केवळ [illegible] असा अर्थ नाहीं [illegible] घातक शस्त्र असाहि अर्थ होतो.

वि मृळीकार्य ते मनो रथीरश्वं न संदितम् ।
गीर्भिर्वरुण सीमहि ॥ ३ ॥

वि । मृळीकार्य । ते । मनः । रथीः । अश्वम् । न । सम्ऽदितम् ।
गीःऽभिः । वरुण । सीमहि ॥ ३ ॥

परा हि मे विमन्यवः पतन्ति वस्यइष्टये ।
वयो न वसतीरुप ॥ ४ ॥

परा । हि । मे । विऽमन्यवः । पतन्ति । वस्यःऽइष्टये ।
वयः । न । वसतीः । उप ॥ ४ ॥

कदा क्षत्रश्रियं नरमा वरुणं करामहे ।
मृळीकायोरुचक्षसम् ॥ ५ ॥ १६ ॥

कदा । क्षत्रऽश्रियम् । नरम् । आ । वरुणम् । करामहे ।
मृळीकार्य । उरुऽचक्षसम् ॥ ५ ॥ १६ ॥

भाषायाम्.

३. हे वरुण, [वय] मृळीकाय (=तव प्रसादाय) तव मनः, [कश्चिद्] रथी. संदित (=बद्धम्) अश्वमिव, गीर्भि (=स्तोत्रै.) विसीमहि (=विमोचयाम) ॥

४. मे (=मम) विमन्यवो (=वाञ्छा) हि, वयः (=पक्षिणः) उपवसतीर्न (=निवासस्थानानि प्रति इव), वस्यइष्टये (=वसीयसः उत्तमस्य धनस्य प्राप्तये) परापतन्ति (=उत्पतन्ति) ॥

५. क्षत्रश्रिय (=बलधारिण) नर (=शूरम्) उरुचक्षसं (=दीर्घदर्शिन) वरुण मृळीकाय (=अस्मद्विषयप्रसादाय) कदा आकरामहे (=आह्वयामहे) ॥

३. [तुझी] कृपा व्हावी म्हणून आम्ही, हे वरुणा, [एकादा] गाडीवान बांधिलेल्या घोड्यास [मोकळा करितो] तसें [आमच्या] स्तवनांनीं तुझे मन मोकळें करीत आहों.

४. कारण कीं, जसे पक्षी [आपल्या] निवासस्थानाकडेस [धावतात] तशा माझ्या वासना उत्कृष्ट धनाच्या प्राप्तीकडेस धावतात.

५. बलधारी [आणि] दूरदर्शी [जो] शूर वरुण [त्याणें आम्हावर] प्रसन्न व्हावें म्हणून त्याला आम्हीं केव्हा येथें बोलवावें?

3. As a charioteer [unties] [his] horse that is tied, we, Varuna, for [thy] favour untie thy mind with [our] prayers.

4. For like birds [that *fly towards their*] *homes my desires fly forth towards* the attainment of the highest wealth.

5. When should we call hither the mighty, the brave [and] the far-seeing Varuna, that he may be favourable?

३. या मंत्राचें तात्पर्य असें आहे कीं, 'जसा एकादा गाडीवान आपल्या रथाच्या अथवा गाडीच्या घोड्यास मोकळा करितो आणि तो घोडा खुष होतो तसें, हे वरुणा, तुझें मन जें आम्हांविषयीं रागानें बांधिल्यासारिखें झालें आहे तें आम्ही स्तोत्रे म्हणून मोकळें करीत आहों, तर तू आम्हांवर कृपा कर.'

सायणाचार्य 'विसीमहि' या क्रियापदाचा 'विशेषें करून बांधितों' असा अर्थ करून "हे वरुणा, आमच्या सु-
"खासाठीं तुझें मन स्तुतीनीं बांधितों
"म्हणजे प्रसन्न करितों दृष्टांत. जसा
"एकादा रथी दुरून आल्यामुळें थक-
"लेल्या घोड्यास बांधितो म्हणजे गवत
"वगैरे घालून खुष करितो तद्वत्."
असा अर्थ करितात. पण 'विसीमहि' क्रियापदाचा अर्थ आम्ही केल्याप्रमाणें होतो. त्याला प्रयोगान्तराचें पुष्कळ दाखले आहेत.

या मन्त्रांत यूपास बांधिलेल्या शुनःशेपानें म्हणण्याजोगें कांहीं दिसत नाहीं हें उघड आहे. आणि असेंच पुढच्या मंत्राविषयींहि म्हटलें पाहिजे तो मंत्र पाहा.

४. या मंत्रांतील जी उपमा आहे ती चमत्कारिक आहे इतकें सांगण्यापलीकडे या मंत्रांत विशेष कांहीं दिसत नाहीं. आलीकडचे कवी अशी उपमा बहुत करून देणार नाहींत. पण या उपमेंत एक प्रकारची मोठीच स्पष्टयोग्यता आहे असें आम्हांस वाटतें.

५. 'त्याला आम्हीं केव्हा बोलवावें?' ='कदा आकरामहे' म्हणजे आम्हीं त्याला येथें केव्हां बोलाविलें असतां

तदित्समानमाशाते वेनन्ता न प्र युच्छतः ।
धृतव्रताय दाशुषे ॥ ६ ॥

तत् । इत् । समानम् । आशाते इति । वेनन्ता । न । प्र । युच्छतः ।
धृतऽव्रताय । दाशुषे ॥ ६ ॥

वेदा यो वीनां पदमन्तरिक्षेण पतताम् ।
वेद नावः समुद्रियः ॥ ७ ॥

वेद । यः । वीनाम् । पदम् । अन्तरिक्षेण । पतताम् ।
वेद । नावः । समुद्रियः ॥ ७ ॥

भाषायाम्.

६ वेनन्तौ (=कामयमानौ) [मित्रावरुणौ] धृतव्रताय दाशुषे (=अनुष्ठितशासनाय हविर्दत्तवते यजमानाय) तदेव समानम् (=एकमेव साधारण) [हवि] आशाते (=प्राप्नुत)। [तौ] न प्रयुच्छत (=अनवहितौ न भवत) ॥

७ यो [वरुण] अन्तरिक्षेण पतताम् (=उत्पतता) वीनां (=पक्षिणां) पद (=पदवीं) वेद (=जानाति)। [य] समुद्रियो नाव (=समुद्रगा समुद्रे गच्छन्त्या नौकाया) [पद] वेद (=जानाति),

---

तो प्रसन्न होईल असा प्रश्न पुसण्याचा भावार्थ दिसतो -'दूरदर्शी'='उरुचक्षसम्' वरुण देव असा आहे का, तो मनुष्यांना चोरून केलेलेंहि पातक दुरून पाहतो त्याचा अंकरावा मंत्र पाहा

मनुष्याचा खरेखोटेपणा तो पाहात असतो असें ऋ ७ ४९ ३ यांत (यासां राजा वरुणो याति मध्ये सत्यानृते अवपश्य॒ [जानानाम्]) सांगितलें आहे

६. [मित्रावरुणांची] आज्ञा पाळणारा जो हविर्दाता उपासक त्याच्या प्रीत्यर्थ [मित्रावरुण हे] उभयताहि प्रसन्न होऊन एकच [हवि] ग्रहण करितात, [आणि] अव्हेर करीत नाहीत;

७. ज्या [वरुणा]ला अंतरिक्षांतून उडत असणाऱ्या पक्ष्यांचा मार्ग ठाऊक असतो, [आणि] ज्या [वरुणा]ला समुद्रावरच्या तारवांचा [मार्ग] ठाऊक असतो;

6 They (Mitrâ-Varunau) both lovingly receive one and the same [offering] out of consideration for the sacrificer who observes the sacred law, [and] are not indifferent [to him]

7. [He] who knows the way of the birds that fly in the firmament, [and] knows [the way] of the ship that is on the sea;

---

६. या मंत्राचा भावार्थ असा आहे की, 'मित्रावरूणांचे नियम उपासक पाळितो यासाठीं त्यानें मित्र आणि वरूण यांस वेगळं वेगळें हविर्दान न केलें तरी त्यावर कृपा करून एकच हवि दोघे मिळून स्वीकारून घेतात दोघांस मिळून एकच हवि दिलें म्हणून त्या उपासकाचा ते अव्हेर करीत नाहींत.'

'आज्ञा पाळणारा जो हविर्दाता'= 'धृतव्रत ' धृतव्रत या शब्दाचा अर्थ वेदांत फारकरून 'ज्याची आज्ञा अथवा हुकूम किंवा कायदा लोक मानितात तो' (वरूण, इंद्र इत्यादि कोणी तरी देव) असा होतो परंतु त्या शब्दाचा अर्थ केव्हां केव्हां 'जो आज्ञा अथवा हुकूम मानितो तो' (उपासक) असाहि होतो, त्याचें हें या मंत्रांत उदाहरण आहे.

७ हा मंत्र फार चमत्कारिक आणि ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. भावार्थ असा आहे की, 'आकाशांतल्या पक्ष्यांनीं कोणत्या रस्त्यानें जावें आणि समुद्रावर तारवांनीं कोणत्या रस्त्यानें जावें हें वरूणास समजतें;' इतरांस आकाशांतील पक्ष्यांचा आणि समुद्रावर तारवांचा मार्ग समजत नाहीं, पण वरूणास समजतो. म्हणजे वरूणास समजतें की, अमुक ठिकाणीं पक्ष्यांचा आणि अमुक ठिकाणीं जहाजांचा मार्ग आहे अमुक रस्त्यानें पक्ष्यानें आकाशांत आणि जहाजानें समुद्रावर चालावें म्हणजे त्यांस संकट येणार नाहीं, अशी प्रेरणा तो करितो.

'समुद्रावरच्या तारवांचा'='नाव समुद्रिय ' यांत 'नाव ' आणि 'समुद्रिय.' हे दोन्ही शब्द षष्ठीच्या अनेकवचनी आहेत असें आम्ही समजतों सायणाचार्य नाव इतकीच षष्ठी समजून 'समुद्रिय.' हें वरूणाची जो 'य ' शब्द त्यास विशेषण करितात, आणि 'जलें गच्छन्त्या ' (=पाण्यांतून जाणाऱ्या) इतके अर्थ त्यांतून घेतात परंतु 'समुद्रिय ' हा 'समुद्री' या रीतीनें विशेषणाची षष्ठी आहे.

वेद॑ मा॒सो धृ॒तव्र॑तो॒ द्वाद॑श प्र॒जाव॑तः ।
वेदा॒ य उ॑प॒जाय॑ते ॥ ८ ॥

वेद॑ । मा॒सः । धृ॒तऽव्र॑तः । द्वाद॑श । प्र॒जाऽव॑तः ।
वेद॑ । यः । उ॒प॒ऽजाय॑ते ॥ ८ ॥

वेद॒ वात॑स्य वर्त॒निमु॒रोर्ऋ॒ष्वस्य॑ बृह॒तः ।
वेदा॒ ये अ॒ध्यास॑ते ॥ ९ ॥

वेद॑ । वात॑स्य । व॒र्त॒निम् । उ॒रोः । ऋ॒ष्वस्य॑ । बृ॒ह॒तः ।
वेद॑ । ये । अ॒धि॒ऽआस॑ते ॥ ९ ॥

भाषायाम्.

८. [यो] धृतव्रतः (=स्थापितशासनो) [वरुण] प्रजावतः (=तेषु तेषु जातप्राणियुक्तान्) द्वादश मासान् वेद, यश्[च मासः] उपजायते (=अधिकत्वेन उत्पद्यते) [तं यो] वेद (=जानाति);

९. [यो वरुणः] उरोः (=विस्तीर्णस्य) ऋष्वस्य (=उच्चतरस्य) बृहतः (=महतः) वातस्य वर्तनिं (=मार्गं) वेद (=जानाति) । [तं वर्तनिं] ये [मरुत,?] अध्यासते [तान् यो] वेद (=जानाति);

या मन्त्रांत समुद्रावरील तारवाचा मार्ग वरुण जाणतो असें जें सांगितलें आहे त्यांत वरुणाविषयीं पुराणादिक ग्रंथांत वरुण हा समुद्रदेवता आहे आणि तो समुद्रांत राहतो, तो तारवें बुडवितो अथवा बचावितो वगैरे याविषयीं ज्या कथा आल्या आहेत त्यांचे बीज आहे हें ध्यानांत ठेवावें.

'ज्या वरुणास' टाळक आहे असें या मन्त्रांत सांगितलें त्याचा संबंध खालीं १२ व्या ऋचेंत स्पष्ट झाला आहे.

८. [जो] धृतव्रत वरुण बारा महिने आणि त्यांत उत्पन्न होणारे प्राणी जाणतो [आणि] जो [वरुण] [त्या बारा महिन्यां]-जवळ उत्पन्न होणाऱ्या [अधिक महिन्या]ला जाणतो;

९. [जो वरुण] विस्तीर्ण, उंच, [आणि] मोठ्या वायूचा मार्ग जाणतो, [आणि] जो [त्या मार्गा]वर बसणारे जे [मरुत्] त्यास जाणतो ;

8. [he who] knows the twelve months with the life born in them, [and] who knows [the intercalary month] that arises by the side of [the twelve];

9. [he who] knows the road of the broad, high [and] vast wind, [and] knows [those Maruts] who ride on [it];

---

८ मंत्राचा भावार्थ असा आहे की, 'वरुण जसा पक्ष्यांचे मार्ग आणि तारूंचे मार्ग जाणतो, तसाच बारा महिने कसे होतात आणि बारा महिन्यांच्या जवळ तेरावा अधिक मास कसा येतो तेंहि जाणतो'.

हाहि मंत्र फारच मौल्यवान आणि ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. कारण की, सर्व पृथ्वीवर सुधारणुकेविषयी नामांकित असे जे रोमन लोक, त्यांजमध्ये ख्रिस्ती शकाच्या पूर्वी साडेचार शतकें पर्यंत वर्षाचे महिने दहाच होते, आणि अधिक मास घालून चांद्रमानाचा आणि सौर मानाचा मेळ घालावा हे ज्ञान युरोपीयन लोकांमध्ये ख्रिस्ती शकाच्या पूर्वी पांच शतकें पर्यंत नव्हतें परंतु हा मंत्र जेव्हां रचिला तेव्हां आम्हांमध्ये वर्षाचे महिने बारा मानीत इतकेंच नव्हे, पण अधिक मास घालून कालव्यवस्था करण्याची युक्ति या मंत्राच्या रचनेपूर्वी पुष्कळच दिवस ठाऊक होती असें समजलें पाहिजे. कारण तेरावा महिना घालण्याची युक्ति स्थापित होऊन जर पुष्कळ वर्षे झालीं नसतीं तर त्यांत कांहीं तरी विशेष चमत्कार आहे, व तें दैविक कृत्य आहे, आणि ते वरुण जाणतो असा आ[श्चर्य]-प्रदर्शक आणि वरुणमहत्त्वप्रदर्शक उद्गार या मंत्राच्या कर्त्यानें काढिला नसता. यावरून आमच्या आर्य लोकांचे ज्ञान किती पुरातन आहे तें दिसून येते. या मंत्रांत 'अधिक मास' असे शब्द जरी नाहींत तरी त्याच्या उत्पत्तीविषयी जे शब्द आहेत त्यावरून अधिक मासच विवक्षित आहे असें दिसतें. शिवाय सायणाचार्यहि तोच अर्थ समजतात आणि इतर (पाश्चिमात्य) विद्वानहि तोच समजतात असें दिसते. तेव्हां अधिक मासाविषयींच उल्लेख आहे यांत संशय दिसत नाहीं.

'धृतव्रत' म्हणजे ज्याचे नियम लोक पाळीत असतात तो.

९. या मंत्रांत वरुण वातप्रदेश म्हणजे वायु कोणत्या मार्गाने कसें गमन करितो ते जाणतो असें सांगण्याचा

नि षसाद धृतव्रतो वरुणः पस्त्या३स्वा ।
साम्राज्याय सुक्रतुः ॥ १० ॥ १७ ॥
नि । ससाद । धृतऽव्रत । वरुण । पस्त्यासु । आ ।
साम्ऽराज्याय । सुऽक्रतु ॥ १० ॥ १७ ॥
अतो विश्वान्यद्भुता चिकित्वाँ अभि पश्यति ।
कृतानि या च कर्त्वा ॥ ११ ॥
अत । विश्वानि । अद्भुता । चिकित्वान् । अभि । पश्यति ।
कृतानि । या । च । कर्त्वा ॥ ११ ॥

भाषायाम्.

१० [यो] धृतव्रत (=स्थापितशासन) सुक्रतु (=सुप्रज्ञो) वरुण साम्राज्याय (=साम्राज्य कर्तुं) पस्त्यासु आ (=स्वगृहे) निषसाद (=निषीदति),

११ [यश्च वरुण] चिकित्वान् (=विद्वान्) [सन] अद्भुतानि (=परोक्षाणि) विश्वानि (=सर्वाणि) [यानि] कृतानि [कर्माणि] यानि च कर्त्वानि (=कर्तव्यानि) [कर्माणि] [तानि] अत (=पस्त्याभ्य =स्वगृहात्) अभिपश्यति,

---

अभिप्राय आहे

परंतु वर बसणारे जे' ते कोण हे मन्त्रातील शब्दांवरून समजत नाही सायणाचार्य वर बसणारे' म्हणजे मार्गावर बसणारे असा अर्थ न करितां 'वर (म्हणजे आकाशांत?) बसणारे' इतकाच अर्थ करून देव असे म्हणतात पण कोणते देव तेंहि सांगत नाहींत सामान्य देव असा त्यांचा भावार्थ दिसतो

१०. [जो] बुद्धिमान् वरुण आपले अधिकार [सर्वत्र] बसवून सर्वांवर राज्य करण्यासाठीं [आपल्या] घरीं बसला आहे;

११. [आणि जो वरुण] त्याला नकळत केलेलीं आणि करावयाचीं जीं तीं सर्व कर्में तेथून जाणतो आणि पाहतो;

10. the wise Varuna [who] having established his laws has sat down in [his] home to rule [his] empire,

11 [who] from thence knows and observes all deeds that are done, and that are intended to be done, in his absence,

---

१०. या मन्त्रांत वरुणाचें सार्वभौमत्व वर्णिलें आहे. त्याणें आपले कायदे जिकडे तिकडे बसवून, म्हणजे अमुक रस्त्यानें पक्ष्यांनीं उडावें, अमुक मार्गानें समुद्रावर तारवांनीं जावें, वायूनें अमुक रस्त्यानें अमुक वेळीं वाहावें, अमुक महिन्यांत अमुक व्हावें इत्यादि नियम स्थापित करून आपल्या घरीं खुशाल बसला आहे, आणि तेथून सर्व भुवनांचा सार्वभौम राजा होत्साता राज्य करीत आहे.

हें वरुणाचें महत्त्व ध्यानांत ठेवावें, कारण कीं, तें मागाहून आर्यलोक विसरले, आणि तें मोठेपण त्यांनीं दुसऱ्या देवास अथवा देवांस देऊन वरुणास समुद्रावेंच आधिपत्य देऊन निमूट बसविलें, हें आतां आपणास ठाऊक आहेच.

११ या मन्त्रांतहि वरुणाचा महिमा वर्णिला आहे वरच्या मंत्रांत वरुण आपल्या घरीं बसला आहे असें सांगितलें या मन्त्रांत तो त्या घरांतून काय करितो तें सांगितलें आहे तें हें कीं, तो आपल्या घरच्या घरींच बसून मनुष्ये त्याला नकळत म्हणून जीं कर्में करितात तीं पाहतो, आणि जीं वाईट बरीं कर्में करावयाचीं म्हणून मनुष्यें आपल्या मनांत आणितात तीं तो जाणतो

ही वरुणाची शक्ति मागाहून वरुणाकडून गेली असें दिसतें, कारण कीं असें वर्णन पुराणादिक ग्रंथांत बहुतकरून यम आणि यमाचे जे चित्रगुप्तादि दिवाण त्यांजविषयीं येत असतें.

'त्याला नकळत केलेलीं'='अकृता.' 'अकृत' म्हणजे 'परोक्ष आहे तें', 'आपल्या समक्ष नव्हे तें', 'अदृश्य'. अर्थात् 'वरुणानें पाहू अथवा जाणू नये अशा समजुतीनें केलेलीं असा पर्यवसानीं अर्थ समजावयाचा अकृत म्हणजे अदृश्य याविषयीं "अनस्त्र दृशौ जा एनान्यांनि परोकृतीं अर्ग एौ" (ऋ ४ २ १२) हें स्पष्ट आणि ऋ १ १७०.१ इहि पाहा.

स नो विश्वाहा सुक्रतुरादित्यः सुपथा करत् ।
प्र ण आयूंषि तारिषत् ॥ १२ ॥

स । नः । विश्वाहा । सुऽक्रतुः । आदित्यः । सुऽपथा । करत् ।
प्र । नः । आयूंषि । तारिषत् ॥ १२ ॥

बिभ्रद्द्रापिं हिरण्ययं वरुणो वस्त निर्णिजम् ।
परि स्पशो नि षेदिरे ॥ १३ ॥

बिभ्रत् । द्रापिम् । हिरण्ययम् । वरुणः । वस्त । निःऽनिजम् ।
परि । स्पशः । नि । सेदिरे ॥ १३ ॥

न यं दिप्सन्ति दिप्सवो न द्रुह्वाणो जनानाम् ।
न देवमभिमातयः ॥ १४ ॥

न । यम् । दिप्सन्ति । दिप्सवः । न । द्रुह्वाणः । जनानाम् ।
न । देवम् । अभिऽमातयः ॥ १४ ॥

भाषायाम्.

१२ स सुक्रतु (=सुप्रज्ञ) आदित्य (=अदितेः पुत्रो) [वरुणो] विश्वाहा (=नित्यम्) अस्मभ्यं सुपथानि (=सुगमानि) करोतु । अस्माकम् आयूंषि प्रतारिषत् (=प्रतारयतु=दीर्घांकरोतु) ॥

१३ हिरण्मयं द्रापिं (=कवचं) बिभ्रद् धारयन् वरुणो [हिरण्मयं] निर्णिजम् (=अलंकारं) वस्त (=परिधत्ते) । [तस्य] स्पशः (=प्रेष्याः) परितो निषेदिरे (=आसमन्तान्निषीदन्ति) ॥

१४ यं [वरुणं] दिप्सवो (=हिंसितुमिच्छन्तो वैरिणो) न दिप्सन्ति (=हिंसितुं नेच्छन्ति) । जनानां (=मनुष्याणां) द्रुह्वाणो (=द्रोहिणो) [यं] न [दिप्सन्ति] । [यं] देवं [वरुणम्] अभिमातयः (=साहसकारिणो) न [दिप्सन्ति] ॥

१२. तो बुद्धिमान् आदित्य (वरुण) सदैव आम्हास सर्व सुगम करो, [तो] आमचीं आयुष्यें वाढवो;

१३. वरुण सोन्याचें कवच धारण करून [सोन्याचे] अलकार घालीत असतो. [त्याचे] जासूद त्याच्या सभोंवताली बसतात;

१४. ज्या देवा [वरुणा]चें वाईट करण्याची इच्छा वैरी करीत नाहींत, [आणि] मनुष्यद्रोहीं-[हि] [इच्छा करीत] नाहींत [आणि] घालेकरी[हि] करीत नाहींत;

12 may that Âditya (Varuṇa) make [all] things easily accessible to us; may he prolong our lives.

13. Varuṇa puts on a golden mail and wears golden [ornaments] [His] messengers sit round him.

14. And those that are desirous of doing harm do not wish to harm this god, nor do the haters of men, nor do the assassins.

१२. सातव्या ऋचेपासून 'जो,' 'जो' असा जो संबंध आला तो या मंत्रांत पुरा झाला म्हणजे चार मंत्रांत वरुणाविषयीं स्तुती करून या पांचव्या मंत्रांत त्या वरुणापाशीं जें काय मागावयाचें तें मागतो; त्यांतून 'आम्हांस सर्व सुगम करो' या मोघम शब्दांत काय असेल ते असो, पण 'तो आमचीं आयुष्यें वाढवो' यांत एवढ्या मोठ्या देवाजवळ जितकें मागावयाचें तितकें मागितलें नाहीं असें म्हटलें पाहिजे आलीकडचे संतोबा आणि म्हसोबा यांचे भगत सुद्धां त्या आपल्या देवांकडेस मोक्षादि मोठमोठे वर मागतात. असो, आमचे आर्य पूर्वज वरुणाच्या सार्वभौमत्वाच्या वेळीं कोणत्या स्थितींत होते तें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

१३ वरुण हा आपल्या घरीं बसतो आणि तेथून मनुष्यांनीं केलेलीं बरीं वाईट सर्व केलेलीं कृत्यें पाहतो अंसें पूर्वीं सांगितलें आहे. आतां त्याचे अलंकार, कपडे वगैरे कसे असतात, आणि त्याच्या दरबारास कोण कोण असतात तें या मंत्रांत सांगितलें आहे.

'अलकार'='निर्णिजम्' या स्थलीं सायणाचार्य 'निर्णिज्' शब्दाचा अर्थ पुष्ट असा विशेषणार्थी करून 'शरीर' इतकें पद अध्याहृत घेऊन त्याजकडेस त्याचा संबंध लावितात. आम्हीं केलेल्या अर्थांत प्रयोगांतराचे आधार पुष्कळ आहेत.

'जासूद'='स्पश'. स्पश म्हणजे जो चाकर बातमी आणण्या नेण्याकरितां कामीं लावितात तो, हेर सायणाचार्य या स्थलीं 'किरण' असा विनाकारण अर्थ करितात, पण ऋ १. ३३ ८ यांत त्यांनींच 'अनुचर'=चाकर असा अर्थ केला आहे तो पाहा. दुसरेहि प्रयोग पुष्कळ आहेत.

१४. सातव्या पासून दहाव्या म-

उत यो मानुषेष्वा यशश्चक्रे असाम्या ।
अस्माकमुदरेष्वा ॥ १५ ॥ १८ ॥

उत । यः । मानुषेषु । आ । यशः । चक्रे । असामि । आ ।
अस्माकम् । उदरेषु । आ ॥ १५ ॥ १८ ॥

परा मे यन्ति धीतयो गावो न गव्यूतीरनु ।
इच्छन्तीरुरुचक्षसम् ॥ १६ ॥

परा । मे । यन्ति । धीतयः । गावः । न । गव्यूतीः । अनु ।
इच्छन्तीः । उरुऽचक्षसम् ॥ १६ ॥

सं नु वोचावहै पुनर्यतो मे मध्वाभृतम् ।
होतेव क्षदसे प्रियम् ॥ १७ ॥

सम् । नु । वोचावहै । पुनः । यतः । मे । मधु । आऽभृतम् ।
होताऽइव । क्षदसे । प्रियम् ॥ १७ ॥

भाषायाम्.

१५ उत (=अपि च) यो [वरुणो] मानुषेषु आ (=मनुष्येषु) असामि (=संपूर्णं) यशः (=अन्नं ?) चक्रे (=स्थापयामास), [तथा] अस्माकमुदरेषु [चक्रे=स्थापयामास] ॥

१६ उरुचक्षसं (=विस्तीर्णदर्शिनं) [वरुणम्] इच्छन्त्यो मे धीतयो (=बुद्धयो), गावो गव्यूतीरनु (=यवसस्थानानि प्रति) इव, परायन्ति (=मत् वरुणं प्रति प्रगच्छन्ति) ॥

१७ नु (=अधुना) [आवां] यतः [स्थानात्] मे मधु (=मधुरं पेयम्) आभृतम् (=आनीतं) [तत्र] पुनः संवोचावहै (=संवदावहै)। [त्वं] होतेव प्रियं [मधु] क्षदसे (=अश्नासि) ॥

ज्ञात जे वरुणाविषयी गुण आणि पराक्रम सांगितले त्याशिवाय या आणि पुढच्या मंत्रांत मिळून आणखी कांहीं अधिक सांगितले आहेत. मंत्राचा भावार्थ स्पष्टच आहे. मानवी राजास ज्यांपासून उपद्रव होतो अशा शत्रूंपासून आणि दैन्यापासून आणि मारेकऱ्यांपासून वरुणास कांहींच उपद्रव होत नाहीं, म्हणून हा वरुण राजा इतर राजांहून फार भिन्न आहे असें तात्पर्य आहे.

१५. आणि जो [वरुण] मनुष्यांमध्यें [आणि विशेषेंकरून] आमच्या उदरामध्यें विपुलपणें अन्न घालिता झाला आहे.

१६. गाई कुरणांकडेस [धांवतात] तसे माझे विचार दीर्घदर्शी वरुणाची इच्छा करूं त्याजकडेस धांव घेत आहेत.

१७. आतां जेथून मला मधुर [अन्न] आणिलें आहे तेथें आपण दोघेहि पुनः संभाषण करूं. तूं होत्याप्रमाणें आपलें प्रिय [अन्न] खातोस.

15. And he has put food plentifully in men [and especially] in our stomachs.

16. My thoughts rush forth earnestly towards the farseeing [Varuṇa] like as the cows towards their pasture-lands.

17. Now let us again converse [there] from whence my sweet offering has been brought up; thou eatest thy agreeable [offering] like a Hotá.

---

१५. ही ऋचा स्पष्टार्थ आहे, आणि वरुणानें मनुष्यांवर आणि या मंत्राच्या कर्त्यांवर केलेले उपकार स्मरावे इतकाच हिचा उद्देश आहे. तथापि एका शब्दाच्या अर्थाविषयीं आम्हांस फार संशय आहे. 'यशः' म्हणजे 'अन्न' असा अर्थ आम्हीं सायणास अनुसरून केला आहे, पण तसा त्याचा अर्थ होतो कीं काय याविषयीं फार संशय आहे. सायणांनीं तरी 'उदरेषु' हें पद मंत्रांत आहे, त्यापेक्षा उदरांत घालावयाचें तें अन्नच अशी कल्पना करून 'अन्न' असा अर्थ केला असावा असें भासतें. तथापि या ठिकाणीं नीट बसे असा दुसरा अर्थ आमच्यानें सुचवत नाहीं, यास्तव आम्ही सायणासच अनुसरलों आहों.

१६. या मंत्रांत उपासकाचें मन किती भाविक आहे पाहा. त्याचे विचार मोठ्या औत्सुक्यानें वरुणाकडेस धांव घेत आहेत, जशा काय त्या गाईच होत आणि गोठ्यांतून सोडल्याबरोबर कुरणाकडेस धांवून जाताहेत.

'कुरणाकडेस' = 'गव्यूतीः अनु.' सायणाचार्य येथें गोठ्याकडेस असा अर्थ करितात, पण आम्हीं केलेला अधिक सयुक्तिक दिसतो. "जहि शत्रुमन्तिके दूरके च य उर्वी गव्यूतिमभयं च नः कृधि" (ऋ.९. ७८.५) यांत आणि ९. ८५. ८ यांतील "अर्थ शूर्पेमुर्वी गव्यूतिम्" यांत व दुसऱ्या कित्येक मंत्रांत तोच अर्थ स्पष्ट दिसतो.

'दीर्घदर्शी.' म्हणजे एका ठिकाणीं बसूनहि पुष्कळ दूरपर्यंत ज्याची दृष्टि पोहोंचत असते तो.

१७. या मंत्राचा भावार्थ समजत नाहीं. आम्हीं केवळ शब्दार्थ केला आहे. मंत्रकर्ता कोणाशीं बोलत आहे तेंहि कळत नाहीं. सायणाचार्य जो याचा अर्थ करितात त्यावरून तरी विशेष

दर्शं नु विश्वदर्शतं दर्शं रथमधि क्षमि ।
एता जुषत मे गिरः ॥ १८ ॥

दर्शम् । नु । विश्वऽदर्शतम् । दर्शम् । रथम् । अधि । क्षमि ।
एताः । जुषत । मे । गिरः ॥ १८ ॥

इमं मे वरुण श्रुधी हवमद्या च मृळय ।
त्वामवस्युरा चके ॥ १९ ॥

इमम् । मे । वरुण । श्रुधि । हवम् । अद्य । च । मृळय ।
त्वाम् । अवस्युः । आ । चके ॥ १९ ॥

त्वं विश्वस्य मेधिर दिवश्च ग्मश्च राजसि ।
स यामनि प्रति श्रुधि ॥ २० ॥

त्वम् । विश्वस्य । मेधिर । दिवः । च । ग्मः । च । राजसि ।
सः । यामनि । प्रति । श्रुधि ॥ २० ॥

भाषायाम्

१८ [अहं] नु (=अधुना) विश्वदर्शतं (=सर्वैर्दर्शनीयं=कमनीयं) [वरुणम्] [अ]-दर्शम् (=अपश्यम्) । अधि क्षाम (=पृथिव्यां) रथम् [अ]दर्शम् (=अपश्यम्) । एता मे गिर [स वरुण] [अ]जुषत (=सिषेवे) ॥

१९ हे वरुण, [त्वम्] इदं मे हवम् (=आह्वानं) शृणु । अद्य च [त्वं] [मह्य] मृळय (=प्रसन्नो भव) । [अहं हि] अवस्युः (=रक्षणेच्छुः) [सन्] त्वामाचके (=त्वां स्तौमि) ॥

२० हे मेधिर (=मेधाविन्), त्वं विश्वस्य दिवश्च (=द्युलोकस्य च) ग्मश्च (=पृथिव्याश्च) राजसि (=राजा असि) । स [त्वं] यामनि (=उपासनायां) प्रतिशृणु (=प्रसन्नो भव) ॥

तृप्ति होणे असें नाहीं' ते म्हणतात — "ज्यापेक्षां मी जगावें म्हणून मधुर हवि "अग्नि केलें आहे त्यापेक्षां होमकर्त्या. "प्रमाणें तूं (वरुण) हि प्रिय अन्न "सातोस आणि रथां (म्हणजे वरुणा-"नें) हवि दिल्यानन्तर पेतल्यानंतर "तृप्त झालेला तूं आणि सुटलेला मी "असे मिळून मित्रासारखें वागू." परंतु हें भाष्य केवळ हें सूक्त शुनःशेपाला यूपास बांधिला त्या वेळेस त्याणें म्हटलें असें समजून केलें आहे आम्हांस या दोनी गोष्टींविषयीं संशय आहे

ऋग्वेदांत असे कितीएक बरेच मंत्र मधें मधें आहेत कीं, त्यांचा अर्थ समजत नाहीं, त्यांपैकींच हा एक आहे असें समजणें कारण अवश्य दिसतें.

१८. आतां विश्वदर्शनीय [वरुणा]स [हा] मी पाहिला, [हा] [त्याचा] रथ पृथ्वीवर मला दिसत आहे. त्याणें ह्या माझ्या प्रार्थना स्वीकारून घेतल्या.

१९. हे वरुणा, ही माझी हाक ऐक आणि आज [मजवर] कृपा कर [तुझ्या] अभयाची इच्छा धरून मी तुला [ही] हाक मारिली आहे.

२०. हे बुद्धिमान् [वरुणा], तूं सकलांचा [राजा होस], [तूं] द्युलोकाचा [राजा होस], [तूं] पृथ्वीचा [राजा होस]. वास्तव तूं [या] उपासनाप्रसगीं [आम्हास] प्रसन्न हो.

18. Now I see [Varuna] that deserves to be seen by all, [now] I see [his] chariot on earth. These my prayers he has accepted.

19. Varuna, hear this my call and favour [me] today. Desirous of [thy] protection, I have invoked thee.

20. Thou art, wise [Varuna], the king of all, king of Heaven, king of Earth. Be thou, therefore, favourable in [this our] service.

---

१८ उपासक म्हणतो की, वर ज्या वरुणाच्या मी स्तुती केल्या त्या त्यानें स्वीकारून घेतल्या" आणि तो रथांत बसून येत आहे, आणि तो आणि त्याचा रथ हे माझ्या दृष्टीस पडत आहेत. वरुण खरोखर जरी उपासकाच्या प्रत्यक्ष दृष्टीस पडला नाहीं (कारण पडला असता तर पुढच्या म्हणजे एकुणिसाव्या मन्त्रांत माझी ही हाक ऐक अशी प्रार्थना फिरून केली नसती), तथापि त्या उपासकाची भक्ति आणि वरुणावर भरवसा हे अति उत्तम होते यांत संशय नाहीं. दृष्टीस पडला म्हणजे अंतर्दृष्टीस गोचर झाला असें समजावें. अशा प्रकारें उत्तम भक्तीचे आलाप आधुनिक तुकारामादिकांच्या कवितेंतहि पुष्कळ सांपडतात.

१९. या मन्त्रावरून दिसून येईल कीं, पूर्वींच्या मन्त्रांत जे "वरुणास मी पाहिलें, हा त्याचा रथ पृथ्वीवर मला दिसत आहे" म्हणून म्हटलें तें प्रत्यक्ष दर्शन नव्हे.

२०. हा मन्त्र फार सुंदर आहे. यांत वरुणाचा मोठेपणा किती नम्रभावानें मंत्रवक्ता वर्णीत आहे तें ध्यानांत ठेवावें. ज्या वरुणाच्या प्रसादाची इच्छा मंत्रवक्ता करितो तो साधारण एखाद्या जेजुरीसारिख्या लहानशा गांवांतील देव आहे असें नाहीं, तर तो सकळ द्युलोकाचा आणि सकल पृथ्वीचा राजा आणि सकळ भुवनांचा राजा होय. आणि उपासक उद्धट आणि गर्विष्ठ कर्मठ ब्राह्मण नाहीं, तर लीन आणि अनन्यभावें व आपल्या देवाला शरण जाऊन आपली हाक ऐक अशी नम्रतापूर्व साधी प्रार्थना करणार एक सेवक होय.

उदुत्तमं मुमुग्धि नो वि पाशं मध्यमं चृत ।
अवाधमानि जीवसे ॥ २१ ॥ १९ ॥

उत् । उत्ऽतमम् । मुमुग्धि । नः । वि । पाशम् । मध्यमम् । चृत ।
अव । अधमानि । जीवसे ॥ २१ ॥ १९ ॥

भाषायाम्.

२१ [हे वरुण] जीवसे (=अस्माकं जीवनार्थं=वयं जीवेमेत्यर्थः) [त्वम्] उत्तमम् (=ऊर्ध्वतम) नः (=अस्माकं) पाशम् उत् मुमुग्धि (=ऊर्ध्वमेव मोचय), मध्यम [पाशं] विचृत (=वियोजय), अधमानि (=अधः स्थितान् पाशान्) अव (=अध एव) [विचृत] ॥

ब्राह्मणाचा शब्द असला तर पुरे, देवांचे दगड होतील आणि दगडांचे देव होतील अशी शक्ति भूदेवांस वैदिक युगांत आली नव्हती त्या वेळचे उपासक विचारें आम्हांसारिखेच गरीब आणि निर्बळ मानव पण अधिक भाविक अधिक प्रामाणिक आणि अधिक भजनोत्सुक होते

सूक्तम् २६.

अजीगर्तपुत्र शुनःशेप ऋषि । अग्निर्देवता । गायत्री छन्दः ॥

वसिष्वा हि मियेध्य वस्त्राण्यूर्जां पते ।
सेमं नो अध्वरं यज ॥ १ ॥

वसिष्व । हि । मियेध्य । वस्त्राणि । ऊर्जाम् । पते ।
सः । इमम् । नः । अध्वरम् । यज ॥ १ ॥

भाषायाम्.

१ हे मियेध्य (=यज्ञयोग्य) हे ऊर्जां पते (=बलानां पते) [अग्ने], त्वं हि वस्त्राणि वसिष्व (=परिधत्स्व) । सः [त्वम्] (=अनन्तर च त्वम्) इमं नः अध्वरं यज (=अस्मदर्थमनुतिष्ठ) ॥

२१. [हे वरुणा], आम्हीं जगावे म्हणून आमचा वरील पाश वरच सोडीव, मधला मधें तोड, [आणि] खालचे [पाश] खालीं [तोड].

21. O Varuna, loosen up our upper [bond], break off the middle bond [and] break off the lower [bonds], that we may live.

---

२१ हा मंत्र सुद्धां वाचून वैदिककाळच्या उपासकांच्या साधेपणाविषयीं एक प्रकारचा आनंद वाटतो ते समजत की, जो वरुण देव त्यास नकळत केलेलीं सर्व कर्में पाहणारा, आणि ज्याचें राज्य सर्व द्युलोक आणि सर्व पृथ्वी यांजवर चालतें, आणि जो पापपुण्याचा हिशोब पाहणारा, तो आम्हीं पापी मनुष्यांनीं केलेल्या पातकाचे पाश आमच्या शरीराच्या शिरोभागीं, मध्यभागीं, आणि अधोभागीं बांधीत असतो आणि ते पाश जोपर्यंत तुटले नाहीत तोंपर्यंत खरोखर जीवन नाहीं यास्तव मन्त्रयक्ता वरुणास ते पाश तोडण्याविषयीं विनती करितो.

पूर्वीच्या ऋषीस आपल्या मंत्रसामर्थ्यानें आणि आपल्या तपोबळानें पाहिजे ते करण्याची शक्ति होती हा जो त्यांजवर आम्ही आरोप करितो, त्याविषयीं असल्या एकाद्या साध्या सूक्ताचे कर्ते ऋषी जर पुन जीवंत होऊन आमचा आरोप ऐकतील तर ते काय म्हणतील बरें?

सूक्त.-२६.

ऋषि आणि वृत्त–पूर्ववत्.

देवता–अग्नि.

१ हे यजनीय अन्नपती, तू वस्त्रें आंगावर घे, आणि नंतर हा आमचा यज्ञ संपाद.

HYMN 26.

To *Agni* Author and Metre as before.

1 *Put on thy clothes, venerable lord of nourishments, and do thou then perform this our sacrifice*

---

१. ह्या सूक्ताचाहि कर्ता शुनःशेप आहे ऐतरेय ब्राह्मणांतून जी आम्हीं कथा पूर्वी उतरून घेतली आहे तिला अनुसरून सायणाचार्य म्हणतात कीं, वरुणाची स्तुती करून संपल्यावर, त्या देवानें शुनःशेपास अग्नीची स्तुती करावयास सांगितली; त्यावरून हे सूक्त आणि पुढचें सूक्त अशीं दोन रचून त्याणें अग्नीची स्तुति केली.

परंतु वस्तुत तसें कांहीं दिसत नाहीं असा आमचा अभिप्राय आम्हीं पूर्वी दिलाच आहे. त्याचें प्रमाण या पहिल्याच मंत्रांत आहे कारण जर यूपास बांधिलेल्या शुनःशेपानें आपली सुटका

नि नो होता वरेण्यः सदा यविष्ठ मन्मभिः ।
अग्ने दिवित्मता वचः ॥ २ ॥

नि । नः । होता । वरेण्यः । सदा । यविष्ठ । मन्मऽभिः ।
अग्ने । दिवित्मता । वचः ॥ २ ॥

आ हि ष्मा सूनवे पितापिर्यजत्यापये ।
सखा सख्ये वरेण्यः ॥ ३ ॥

आ । हि । स्म । सूनवे । पिता । आपिः । यजति । आपये ।
सखा । सख्ये । वरेण्यः ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. हे सदा यविष्ठ (=नित्यतरुणतम) अग्ने, [अस्माकं] मन्मभिः (=ध्यानैः) दिवित्मता (=दिव्येन) वचसा (=वाण्या) [च] [स्तूयमानः सन्] [त्वम्] अस्माकं वरेण्यः (=श्रेष्ठो) होता [भूत्वा] [नो यज्ञमनुष्ठातुं] नि[षीद] ॥

३. वरेण्य. [अग्नि]र्हि सूनवे पिता [इव], आपि. (=बन्धु) आपये (=बन्धवे) [इव], सखा सख्ये [इव], [निजोपासकाय] आयजति स्म (=यज्ञं निष्पादयत्येव तद्द्वारा च अभीष्टं प्रापयत्येव) ॥

होण्यासाठीं हे सूक्त म्हटलें असतें तर अग्नीला 'हा आमचा यज्ञ संपाद' अशी प्रार्थना केली नसती, आणि शुनःशेपानें आपल्या संकटास अनुलक्षून कांहीं तरी म्हटलें असतें. हे सूक्त दुसऱ्याच प्रसंगासाठीं रचिलेलें आहे असें आम्हांस वाटतें.

या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'हे अग्नी, आमचा मानवी होता जसा वस्त्रें वगैरे घालून तयार होऊन बसतो आणि यज्ञ संपादितो, तसा तूं वस्त्रें घालून हा आमचा यज्ञ संपाद.' होता वगैरे ऋत्विज यज्ञसंपादनाच्या वेळीं वस्त्रादिक घालून बसत असें या मंत्रावरून अनुमान काढिलें पाहिजे असें आम्हांस वाटतें.

'अन्नपती'=ऊर्जां पते.' हें अग्नीचें संबोधन. 'ऊर्जां पति' म्हणजे 'बळाचा प्रभु' असाहि अर्थ निघूं शकेल. सायणाचार्य 'अन्नाचा पालक' असें म्हणतात.

२. हे सदा परमतरुण अग्नी, [आमच्या] मननाच्या आणि दिव्य स्तवनाच्या योगानें [तूं] आमचा श्रेष्ठ होता हो आणि बैस

३. कारण कीं, हा श्रेष्ठ [होता अग्नि] पुत्रासाठीं [जसा] पिता, सोइऱ्यासाठीं [जसा] सोइरा, मित्रासाठीं [जसा] मित्र, [तसा] [उपासकासाठीं] यज्ञ करितो.

2. O ever youthful Agni, sit thou down our excellent Hotâ (invoker) by means of [our] meditations and divine prayer.

3. For the excellent [Hotâ Agni] sacrifices [in behalf of his worshipper] [as] a father in behalf of his son, a relation in behalf of a relation, a friend in behalf of his friend.

---

२. मागील मंत्रांत कपडे करून हा आमचा यज्ञ तूं संपाद अशी प्रार्थना केली तीच या मंत्रांत पुनः करून म्हणतो कीं, आमचा तूं श्रेष्ठ होता होऊन यज्ञसंपादन कर; आणि तूं तसें करावेंस म्हणून ही प्रार्थना आणि हें स्तवन तुला अनुलक्षून केलें आहे.

'परम तरुण' हें विशेषण पूर्वी आलें आहे, आणि त्याविषयीं त्या ठिकाणीं खुलासा केला आहे.

३. वरच्या दोन मंत्रांत अग्नीनें येऊन यज्ञ संपादावा असें प्रार्थिलें, त्याचें कारण या मंत्रांत दिलें आहे. तें असें कीं, जसा एखादा बाप आपल्या मुलाकरितां यज्ञ करितो, किंवा एखादा सगा आपल्या सग्याकरितां यज्ञ करितो, अथवा एखादा मित्र आपल्या मित्राकरितां यज्ञ करितो तसा हा अग्नि उपासकाकरितां यज्ञ करून देवांस प्रसन्न करून देतो.

या कथेवरून असें अनुमान काढतां येईल असें वाटतें कीं, यज्ञसंपादनासाठीं जो होता प्राचीन लोक योजीत तो विद्वान, अनुकूल आणि देवांस प्रसन्न करून देण्याविषयीं ज्याची ख्याति आहे असा मानिलेला मनुष्य लावीत. कदाचित् मुलाकरितां बाप होता होई, एका सग्याकरितां दुसरा सगा आणि मित्राकरितां मित्र होता होई असेंहि दिसते.

या मंत्रांत 'जसा' 'तसा' या ऐवजीं उपमादर्शक अव्यय नाहीं आहे, तथापि उपमा विवक्षित आहे असें आम्हांस वाटतें. त्याच समजुतीनें आम्हीं अर्थ केला आहे. सायणाचार्य 'आयजति' याचा अर्थ येथें दुसऱ्या कोणाकरितां तरी यज्ञ करणें असा न करितां 'देणें' असा अर्थ करितात. परंतु यस्मै त्वमायजसे स साधयत्यनर्वा (ऋ. १.९४.२) यांत त्यांनींच आम्हीं येथें केल्याप्रमाणें अर्थ केला आहे तो पाहा. आयजन् याचा अर्थ 'मिळवून देणें' असा होतो खरा ("अग्ने महि द्रविणमायजस्व" ऋ. ३. १. २२ हें आणि "स आयजस्व नृवतीरनु क्षा स्पार्हा इषः" ऋ. १०. २.६ हें यांची उदाहरणें पाहा), परंतु तसें केल्यास अर्थ लागत असून तो प्रकार समर्पक नाहीं, म्हणून आम्हीं 'दुसऱ्याकरितां यज्ञ करणें', असा प्रयोगानुसार लक्ष्य देऊन अर्थ केला आहे.

आ नो॑ ब॒र्ही रि॒शाद॑सो॒ वरु॑णो मि॒त्रो अ॑र्य॒मा ।
सीद॑न्तु॒ मनु॑षो यथा ॥ ४ ॥

आ । नः॒ । ब॒र्हिः । रि॒शाद॑सः । वरु॑णः । मि॒त्रः । अ॒र्य॒मा ।
सीद॑न्तु । मनु॑षः । य॒था ॥ ४ ॥

पूर्व्य॑ होत॒रस्य॑ नो॒ मन्द॑स्व स॒ख्यस्य॑ च ।
इ॒मा उ॒ षु श्रु॑धी॒ गिरः॑ ॥ ५ ॥ २० ॥

पूर्व्य॑ । होत॒रिति॑ । अ॒स्य । नः॒ । मन्द॑स्व । स॒ख्यस्य॑ । च॒ ।
इ॒माः । ऊ॒म् इति॑ । सु । श्रु॒धि॒ । गिरः॑ ॥ ५ ॥ २० ॥

भाषायाम्.

४ नः (=अस्माकम्) आ बर्हिः (=दर्भासनोपरि) रिशादसः (=शत्रुघातका) वरुण मित्र अर्यमा [इत्येते], मनुष्या इव, [प्रत्यक्षं] [नि]षीदन्तु ॥

५. हे पूर्व्य (=पुरातन) होतः [अग्ने], अस्य नो [यज्ञस्य] [अस्य न.] सख्यस्य च (=प्रेम्णश्च) मन्दस्व (=हर्षं प्राप्नुहि=अनेन नो यज्ञेन प्रेम्णा च हृष्टो भव)। इमाश्च [नो] गिरः (=स्तुतीः) सु (=सम्यक्) शृणु ॥

४ दुष्टास खाऊन टाकणारे वरुण, मित्र, [आणि] अर्यमा [येऊन] मनुष्याप्रमाणें आमच्या दर्भांवर बसोत.

4 May Varuna, Mitra, [and] Aryamâ, destroyers of the wicked, [come and] sit on our *kus'a*-seat.

५. हे पुरातन होत्या [अग्नी], *आमच्या ह्या [यज्ञानें] आणि मित्रत्वा-*नें [तू] आनंद पाव आणि [आमच्या] ह्या स्तुती मन देऊन ऐक.

5 O ancient Hotâ, [Agni], be [thou] delighted *with this our [sacrifice]* and [our] friendship and hear well these [our] prayers

---

४. मन्त्रवक्ता अग्नीला होत्याचें काम पतकरण्याची विनंती करून ज्या देवास यज्ञ करावयाचा त्यास बोलावितो आणि वरुण, मित्र आणि अर्यमा हे येओत आणि हें जें आम्हीं त्यांस बसावयाला कुशासन घातलें आहे त्याजवर प्रत्यक्ष मनुष्यांप्रमाणें बसोत, असा या मन्त्राचा भावार्थ आहे.

'दर्भांवर बसोत.' देवांस बसावयास दर्भासन कां घालीत याविषयीं सूक्त १३ मंत्र ५ यावर ९४ च्या पृष्ठावर टीप पाहा —'अर्यमा' हा एक वैदिक देव आहे. आदित्य म्हणून जे देव पूर्वी सांगितले आहेत (सूक्त १४ मंत्र ३ यावर 'आदित्य' याविषयीं टीप, पृष्ठ १०२, पाहा) त्यांपैकीं अर्यमा हा एक होय. आणि जेव्हां जेव्हां वेदांत या अर्यमाविषयीं उल्लेख येतो तेव्हां तेव्हां तो मित्र आणि वरुण यांच्याशीं येत असतो केव्हां केव्हां भग आणि बृहस्पति यांजबरोबरहि त्याचें आव्हान होत असतें —'मनुष्यांप्रमाणें बसोत' म्हणजे जसा एकादा मानवी अतिथि येऊन बसावयास घातलेल्या आसनावर बसतो तसे हे आमच्या आसनावर प्रत्यक्ष बसोत.

प्रत्यक्ष मनुष्यांप्रमाणे बसण्याची प्रार्थना मंत्रवक्ता करितो यावरून दर्भासनावर नित्य देव येऊन प्रत्यक्ष बसतच होते अशी जी समजूत आहे तिला या मन्त्रावरून अडचण येते.

५. भावार्थ —'हे अग्नी आम्ही जो हा यज्ञ करीत आहों तो आणि आम्ही जी तुझी आमच्या मित्राप्रमाणे विनवणी करीत आहों आणि तुझ्याशीं मित्रभाव दाखवीत आहों, तो तू मान्य करून घे आणि आमची प्रार्थना ऐक' मित्रत्वाला मूळांत 'सख्य' असा शब्द आहे. मनुष्यांचा जो देवाविषयीं प्रेमभाव अथवा देवांचा मनुष्याविषयीं प्रेमभाव त्याला वैदिक भाषेंत 'सख्य' असें म्हणतात याविषयीं उदाहरणें, ऋ. १. १५ ५ "तवेदु सख्यमस्तृतम्"; "देवानां सख्यमुप सेदिमा वयम्" ऋ १. ८९ २; "अनु व्रातासस्तव सख्यमीयु" ऋ. १. १६३. ८; "यद्वा नु अश्विना हुवे सुदंससा ... कृता ययो' अस्ति प्र नः सख्य देवेषु अध्यापम्" ऋ ८. १०. २; 'पाहि मे सख्याय इमस्य पाहि अन्धस." ऋ ८. १३ २१; "न स अग्ने तव ऊतिभि सुवीराभिस्तरते वाजभर्मभिः

यच्चिद्धि शश्वता तना देवंदेवं यजामहे ।
त्वे इद्धूयते हविः ॥ ६ ॥

यत् । चित् । हि । शश्वता । तना । देवम्ऽदेवम् । यजामहे ।
त्वे इति । इत् । हूयते । हविः ॥ ६ ॥

प्रियो नो अस्तु विश्पतिर्होता मन्द्रो वरेण्यः ।
प्रियाः स्वग्नयो वयम् ॥ ७ ॥

प्रियः । नः । अस्तु । विश्पतिः । होता । मन्द्रः । वरेण्यः ।
प्रियाः । सुऽअग्नयः । वयम् ॥ ७ ॥

स्वग्नयो हि वार्यं देवासो दधिरे च नः ।
स्वग्नयो मनामहे ॥ ८ ॥

सुऽअग्नयः । हि । वार्यम् । देवासः । दधिरे । च । नः ।
सुऽअग्नयः । मनामहे ॥ ८ ॥

भाषायाम्.

६ [हे अग्ने], यच्चिद्धि (=यद्यपि) [वयं] शश्वता तना (=अप्रतिहतेन सातत्येन=नित्यमेव) देवदेव (=नानाविधान्देवान्) यजामहे [तदपि] हविः त्वे इत् (=त्वय्येव) [एकस्मिन्] हूयते (=अर्प्यते) ॥

७ मन्द्रः (=प्रसन्नो) वरेण्यः (=श्रेष्ठो) विश्पतिः (=विशां पति=राजा) होता [अग्नि] नः (=अस्माकं] प्रियोऽस्तु । स्वग्नयः (=प्रसन्नोऽग्निर्येषां ते) वयम् [अपि] [अग्नेः] प्रियाः [अस्याम] ॥

८ स्वग्नयः (=प्रसन्नाग्नियुक्ता) देवा हि वार्यं (=वाञ्छनीयं धनं) नः (=अस्मभ्यं) दधिरे च (=ददति खलु)। [अतो हेतो.] स्वग्नयः (=प्रसन्नाग्नियुक्ता) [सन्तो] [वय] मनामहे (=स्तुमहे) ॥

यस्य त्व सख्यमावर." ऋ. ८. १९. ३०; "अग्ने सख्य वृणीमहे" ऋ. ८ ४४. २०; "न मे इन्द्रेण सख्यम्" ऋ. १ १८. ८ इत्यादि अनेक आहेत.

अग्नीला 'पुरातन होता' असें या मन्त्रांत म्हटले आहे तिकडे लक्ष्य पुरवावें. तो फार दिवसांपासून होतृत्वाचें कामच जणु काय करीत आहे असें ऋषीचें हृद्गत.

६. जरी [आम्ही] नित्य नित्य निरनिराळ्या देवास भजतों [तरी-हि], [हे अग्ने] हवि [अर्पण करणें ते] तुझ्याचठायीं अर्पण होत असतें.

6 Although we always sacrifice to different gods, the oblation, [Agni], is offered in thee alone.

७ मनुष्यांचा प्रभु, श्रेष्ठ [अ-ग्नि] आनंदी होता [जो अग्नी तो] आम्हास प्रिय होओ; [आणि अ-ग्नीची आम्हांवर कृपा करून घेऊन आम्ही त्याला प्रिय [होऊं].

7. May [Agni], the lord of men [and] the amiable [and] excellent Hotâ be dear to us; [and] may we, having obtained his love, be dear to Agni.

८. कारण कीं, चांगल्या अ-ग्नीच्या योगानें देव आम्हास इष्ट [धन] देत असतात. [तर आम्ही] चांगल्या अग्नीच्या साहाय्यानें प्रार्थना करूं.

8 For through benign Agni the gods have conferred choice wealth on us. Let us [therefore] pray through benign Agni.

---

६. भावार्थ असा की, 'जरी आम्ही निरनिराळ्या देवांच्या उद्देशानें नित्य यज्ञ करीत असतों तरी हवि टाकावया-चें तें तुझ्याच अंगावर टाकितों, वास्तव इतर देवांसाठीं म्हणून जरी आम्ही सेवा केली तथापि ती तुझीच सेवा होते'. यावरून यज्ञहवि अग्निशिवाय अ-र्पण होत नसे हें स्पष्ट झालें.

'जरी'='यच्चिद्धि.'—'नित्य नित्य'= 'शश्वता तना.' यांत 'शश्वता' हें विशे-षण आणि 'तना' हें नाम. दोन्हीहि तृतीया. 'तन्' म्हणजे मालिका, सरणी आणि 'शश्वता तना' याचा अर्थ 'अव-लिहत सरणीनें' अर्थ 'एकामागून एक.' 'नित्य नित्य'.

७ हा मंत्र फार सुंदर आहे. याचा साधाच पण सुंदर भावार्थ असा आहे की, 'सकळ जनांचा प्रभु आणि मनु-ष्यांचा यज्ञ सिद्धीस नेणारा आणि आ-नंददायक असा जो अग्नि, तो आम्हास प्रिय होओ, म्हणजे आम्हास तो प्रीति-पात्र होओ; आणि त्याची कृपा संपादन करून घेऊन आम्हीहि त्यास प्रिय होऊं' यांत इतकें दिसतें कीं, [अग्नि]-देवाची प्रीति आणि मनुष्यांची [अग्नि]-देवाविषयीं प्रीति यांचा अन्योन्याश्रय जणुं आहे. अग्नीवर आमची प्रेमभावना राहो ही सुंदर प्रार्थना या मंत्रांत जशी आहे तशीच अग्नीची प्रीति आम्हांवर होओ हीहि रचीत आहे.

'अग्नीनीं आम्हांवर कृपा करून घे-ऊन'='स्वाय.'='सु-आपः'. अक्षरशः अर्थ सु म्हणजे चांगला, माया करणारा आणि आहे ज्यांत, अथवा ज्यावर

अथा न उभयेषाममृत मर्त्यानाम् ।
मिथः सन्तु प्रशस्तयः ॥ ९ ॥
अथ । नः । उभयेषाम् । अमृत । मर्त्यानाम् ।
मिथः । सन्तु । प्रऽशस्तयः ॥ ९ ॥
विश्वेभिरग्ने अग्निभिरिमं यज्ञमिदं वचः ।
चनो धाः सहसो यहो ॥ १० ॥ २१ ॥
विश्वेभिः । अग्ने । अग्निऽभिः । इमम् । यज्ञम् । इदम् । वचः ।
चनः । धाः । सहसः । यहो इति ॥ १० ॥ २१ ॥

भाषायाम्.

९. अथ (=अनन्तरं) हे अमर्त्य [अग्ने], [अमर्त्यस्य तव च] मर्त्यानां नः (=अस्माकं) [च] [इति] उभयेषां मिथ. (=परस्परं) प्रशस्तयः (=प्रशंसारूपा वाचः) सन्तु ॥

१०. हे सहसो यहो (=शक्तेः पुत्र) अग्ने, विश्वैरग्निभिः इमं [नो] यज्ञम् इद [च] [नो] वचः चनो धाः (=प्रेम्णा स्वीकुरु) ॥

अग्नि कृपा करणारा आहे असे, आम्हां = 'मनुष्यांचा प्रभु'='विश्पतिः,' 'राजा' हें अग्नीचें विशेषण पुष्कळ ठिकाणीं येतें.

८. मन्त्रवक्त्याचा अभिप्राय असा आहे कीं, 'देव आम्हांस जी संपत्ती देतात ती कृपाळू अग्नीच्या योगानें देत असतात, यास्तव आम्हीहि या कृपाळू अग्नीच्याच द्वारें देवांची प्रार्थना करूं', म्हणजे हा यज्ञ करण्यासाठीं अग्नीला होतृत्व स्वीकारण्यास पूर्वी प्रार्थना केली आहे, आणि अग्नीला हवी अर्पण करितों म्हणून वगैरे पूर्वीच्या कितीएक मंत्रांत सांगितलें त्याचें जें कारण तें विशेषकरून येथें सांगितलें आहे. कृपाळू अग्नीच्या योगें देवांचा प्रसाद आम्हांवर होतो त्या अर्थी या कृपाळू अग्नीच्याच द्वारें आम्ही देवांची आराधना करूं असा भावार्थ आहे.

या मंत्रांत 'चांगल्या' हें भाषांतर आम्ही 'सु' याचें अक्षरशः केलें आहे, पण त्याचा भावार्थ 'कृपाळू' असा आहे. तोच अर्थ आम्ही पूर्वीच्याहि मन्त्रांत घेतला आहे.

हा मंत्रवक्ता आसपास असलेल्या मनुष्यांस म्हणत आहे, अग्नीस म्हणत नाहीं असें समजलें पाहिजे.

'प्रार्थना करूं'='मनामहे'. "इष स्तुतो मनामहे देवस्तुतो मनामहे" ऋ. ५ ५०.५, "वि यद्वाचं कीस्तासो भरन्ते शंसन्ति केचिन्निविदो मनानाः" १० ऋ. ६. ६७. १०, हीं स्थळें पाहा.

९. आणि आतां हे अमर [अग्नी], [तुझ्या आणि] आम्हा मर्त्यांच्या मिळून उभयतांच्या प्रशंसारूप गोष्टी परस्पर होओत.

9. And now immortal [Agni], may there be mutually between [thee and] us mortals an interchange of praises.

१०. हे अग्नी, हे बलपुत्रा, सकल अग्नींसह हा [आमचा] यज्ञ [आणि] हें स्तोत्र [तूं] प्रसन्न होऊन मान्य करून घे.

10. With all Agnis accept, Agni, thou son of might, with pleasure this sacrifice [and] this hymn.

---

९. हा मंत्र थोडासा कठिण आहे. आम्हीं केलेल्या भाषांतराचा भावार्थः—'हे अग्नी, आतां तूं ये आणि आमच्या यज्ञास मान्य करून तूं आम्हांस शाबासकी दे, आणि आम्हांवर तूं कृपा केल्याविषयीं आम्ही तुझी प्रशंसा करूं.' हा अर्थ आम्हीं शब्दशः (होईल तितका) केला आहे. सायणाचार्यहि असाच भावार्थ समजून भाष्य करितात. परंतु अग्नीनें यावें आणि भजकाबरोबर संभाषण करावें अशी प्रार्थना थोडीशी चमत्कारिक दिसते. अशीं दुसरीं उदाहरणें सांपडल्यावर वर दिलेल्या अर्थावर विशेष भरंवसा बसेल.

हा मंत्र आणि या पूर्वीचेहि या सूक्तांतील मंत्र शुनःशेपानें महा संकटाच्या वेळीं म्हणजे त्याला यूपाला बांधिला होता त्यावेळीं रचले असें म्हणणें मंत्राच्या अर्थावरून पाहिलें असता किती निराधार दिसते हें सांगावयास नकोच.

१०. 'बलपुत्रा'='सहसो यहो.' 'सहसो यहुः' आणि 'सहस· सूनुः' हीं अग्नीचीं विशेषणें वेदांत पुष्कळ ठिकाणीं येतात. त्याचा अर्थ 'बळाचा- अथवा शक्तीचा पुत्र.' असें म्हणण्याचें कारण घर्षण करून अग्नीला उत्पन्न करीत आणि घर्षण करण्याला शक्ती लागे वास्तव 'बलपुत्र' होय असें सांगतात— 'सकल अग्नींसह.' जो अग्नी पेटवून यज्ञ केला त्याशिवाय जितके अग्नी असतील तितक्यांसहित असा भावार्थ दिसतो. अग्नींत हवि टाकावयाचें, मग उपासकाच्या घरीं जो अग्नि आहे त्यांतच टाकावें, दुसऱ्या मनुष्याच्या घरीं आहे त्या अग्नींत अथवा त्याच्याच घरीं दुसरे ठिकाणीं असलेल्या अग्नींत कां टाकूं नये अशी शंका आल्यामुळे 'सकल अग्नींसह' असें म्हटल्यासारिखें दिसतें.—'प्रसन्न होऊन मान्य करून घे'='चनो धाः.' 'चनो धा' हे संयोगी क्रियापद आहे आणि याचा अर्थ 'प्रसन्नतेनें मान्य करून अथवा स्वीकारून घेणें' असा होत असतो. याविषयीं पूर्वी सूक्त ३ मंत्र ६ यावर १८ व्या पृष्ठावर दिलेली टीप पाहा.

हें सूक्त जर शुनःशेपानें आपल्या संकटकाळीं करून म्हटलें असतें तर 'हा आमचा यज्ञ मान्य करून घे' असें या मंत्रांत म्हटलें नसतें, कारण यूपास बांधिलेला शुनःशेप यज्ञ कसा करूं शकेल? आणि मला या संकटांपासून सोडीव असें या मंत्रांत शेवटीं म्हटलें असतें तसें कांहींच म्हटलेलें नाहीं.

सूक्तम् २७.

अजीगर्तपुत्रः शुनःशेप ऋषिः। देवता-१-१२ अग्नि। १३ विश्वे देवाः।
छन्द-१-१२ गायत्री। १३ त्रिष्टुप्॥

अश्वं न त्वा वारवन्तं वन्दध्या अग्निं नमोभिः।
सम्राजन्तमध्वराणाम्॥ १॥
अश्वम्। न। त्वा। वारऽवन्तम्। वन्दध्यै। अग्निम्। नमःऽभिः।
सम्ऽराजन्तम्। अध्वराणाम्॥ १॥

स घा नः सूनुः शवसा पृथुप्रगामा सुशेवः।
मीढ्वाँ अस्माकं बभूयात्॥ २॥
सः। घ। नः। सूनुः। शवसा। पृथुऽप्रगामा। सुऽशेवः।
मीढ्वान्। अस्माकम्। बभूयात्॥ २॥

भाषायाम्.

१ अध्वराणां सम्राजन्त (=सम्राज) त्वामग्निं, वारवन्त (=शोभनपुच्छयुक्तम् अश्वम्) इव, नमोभिर्वन्दध्यै (=वन्दितु प्रवृत्ताः स्मः)॥

२ स घ (=स एव) शवस. सूनुः (=शक्तेः पुत्रः) पृथुप्रगामा (=विस्तीर्णप्रगमन) [अग्नि.] न (=अस्मभ्य) सुशेव (=सुसुखो) [भविष्यति] । [स एव] अस्माक मीढ्वान् (=दाता) भविष्यति॥

सूक्त २७.

ऋषि—पूर्ववत्. देवता— अग्नि; पण १-३ची विश्वेदेव ही देवता. वृत्त—गायत्री, परंतु १३ व्या ऋचेचें वृत्त त्रिष्टुभ्.

१. घोड्याच्या पुच्छाप्रमाणें ज्याचें पुच्छ लांब होय, [आणि जो] सकल यज्ञांचा एकटा राजा [त्या] तुला अग्नीला [आम्ही] नमस्कारांनीं भजण्यास [आलों आहों].

२. तो दूर फिरणारा [अग्नि] [आपल्या] बळाच्या योगानें आमचा उत्तम सुख देणारा [आणि] द्रव्य देणारा पुत्रच [जणु] होओ.

Hymn 27.

To *Agni* (but verses 1-3 are addressed to the *Vis've Devas*). Metre *Gáyatri* (but that of verse 13 is *Trishṭubh*) Author as before.

1. [We have come] to worship with [our] adorations thee, Agni, [who art] like a horse with a long tail [and] who art the sole king of sacrifices.

2. May the long-walking [Agni] with his power be to us [as] a son giving us the highest comfort [and] procuring wealth [for us].

---

१. गेल्या सूक्ताच्या आरंभीं सांगितलेंच आहे कीं, ऐतरेय ब्राह्मणांत सांगितल्याप्रमाणें पाहू गेलें असतां हेंहि सूक्त पूर्वोक्त संकटाच्या वेळीं म्हटलें. परंतु पुनः आम्हांस सांगणें भाग आहे कीं, तसें समजण्यास कारण नाहीं इतकेंच नव्हे, पण हें सूक्त दुसऱ्याच एकाद्या साधारण प्रसंगीं इतर अनेक सूक्तांप्रमाणें रचलेलें दिसतें. अशा समजुतीनें याचू लागलों तरच अर्थ चांगला समजेल.

'घोड्याच्या पुच्छाप्रमाणें ज्याचें पुच्छ लांब होय.' घोडा जसा आपल्या पुच्छानें माशा हाकून लावितो तसा अग्नि उपासकाच्या शत्रूंस हाकून लावितो म्हणून अशी उपमा दिली आहे असें सायणाचार्य म्हणतात!—'भजण्यासाठीं [आलों आहों]'='वन्दध्यै' आम्हीं सायणाप्रमाणें अर्थ केला आहे. ते 'प्रवृत्त झालों आहों' हे अध्याहृत घेतात. हा अध्याहार थोड्या ओढाताणीचा खरा, पण दुसरा उपाय दिसत नाहीं.

२. 'दूर फिरणारा'='पृथुप्रगामा.' या विशेषणाचा उद्देश काय असेल तें कळत नाहीं.—'बळाच्या योगानें'='शवसा'. सायणाचार्य 'शवसा सूनु.' हीं पदें एकत्र घेऊन त्याचा अर्थ 'शवसः सूनु.' असें असल्याप्रमाणें करितात, आणि 'शवसा' ही व्यत्ययानें 'शवस' या षष्ठीबद्दल तृतीया आहे असा निर्वाह करितात, पण तसें करण्याचें कारण दिसत नाहीं.

स नो॑ दूरा॒च्चासाच्च॒ नि मर्त्या॑दघा॒योः ।
पा॒हि सद॒मिद्वि॒श्वायुः॑ ॥ ३ ॥

सः । नः॒ । दू॒रात् । च॒ । आ॒सात् । च॒ । नि । मर्त्या॑त् । अ॒घ॒ऽयोः ।
पा॒हि । सद॑म् । इत् । वि॒श्वऽआ॑युः ॥ ३ ॥

इ॒मम् ऊ॒ षु त्वम॒स्माकं॑ स॒निं गा॑य॒त्रं नव्यां॑सम् ।
अग्ने॑ दे॒वेषु॒ प्र वो॑चः ॥ ४ ॥

इ॒मम् । ऊ॒म् इति॑ । सु । त्वम् । अ॒स्माक॑म् । स॒निम् । गा॒य॒त्रम् । नव्यां॑सम् ।
अग्ने॑ । दे॒वेषु॑ । प्र । वो॒चः॒ ॥ ४ ॥

भाषायाम्.

३. [हे अग्ने], विश्वायुः (=विशेषा मित्रो विश्वव्यापी वा) स [त्वं] नः (=अस्मान्) दूराच्च (=दूरवर्तिनश्च) अघायोः (=अघमपकृतिं कर्तुमिच्छतो) मर्त्यात् आसाच्च (=समीपवर्तिनश्च) [अघायोः] [मर्त्यात्] सदमित् (=सदैव) निपाहि (=नितरां रक्ष) ॥

४. हे अग्ने, त्वम् इमम् (=इममपि) अस्माकं सनिं (=हविर्दानं) नव्यांसं (=नवीयांसम्, अतिशयेन नूतनं) गायत्रं (=स्तोत्रं) [च] देवेषु सु प्रवोचः (=सम्यक् प्रवग्धि=प्रब्रूहि=इदं हविः एष गायत्रश्च समीचीनोस्तीति देवान्प्रति सम्यक् कथय) ॥

३. तर [हे अग्नी], सर्वव्यापी [तू] दूरच्या आणि तसाच जवळच्याहि दुष्ट मर्त्यापासून आम्हांस सदैव रक्ष.

४. हे अग्नी, हें आमचें हवि [आणि] [हें आमचें] गायत्रीच्छंदानें केलेलें अगदी नूतन स्तोत्र तूं उत्तम रीतीनें देवाप्रत प्रविष्ट कर.

3. Do [thou], therefore, [Agni], [who art] omnipresent, ever protect us from the wicked mortal distant and [the wicked mortal] near.

4. Recommend, O Agni, this our offering [and] [this our] newest hymn in the *gâyatrî* metre to the gods.

---

३. या मन्त्रांत अग्नीची केलेली प्रार्थना ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. अग्नि म्हणजे केवळ विस्तवच असा अर्थ नेहमी नसे. केव्हां केव्हां त्यापेक्षां अधिक अर्थ अग्नि या नामांत असे. जसे विठ्ठलभक्त अथवा खंडोबाभक्त विठोबाला अथवा खंडोबाला केव्हां केव्हां पाषाणाची मूर्ती या संबधानें आणि केव्हां केव्हां अधिक अर्थ समजून पाचारितात, तसे आर्यलोकहि अग्नी वगैरे देवांविषयीं करीत असें हे जसें उदाहरण आहे तशीं दुसरींहि पुष्कळ आहेत. तीं पुढे येत जातील.

'तर...तूं'=स [त्वम्]'.

४. या मन्त्रांत असा भावार्थ आहे कीं, 'भक्तिपूर्वकपणे अर्पण केलेलें जें हवि तें आणि अगदी नूतन रचिलेलें जें गायत्रीवृत्तांतील सूक्त तें अग्नीनें कृपा करून देवांपाशीं निवेदन करावें, म्हणजे देवांपाशीं त्याणें जाऊन त्यांची शिफारस करावी म्हणजे ते ते हवि आणि स्तोत्र ग्रहण करितील.' देवांनीं आपणावर दया करावी म्हणून किती नम्रतापूर्वक प्रार्थना होत आहे ती ध्यानांत ठेवावी.

'आमचें गायत्रीच्छंदानें केलेलें अगदी नूतन स्तोत्र'='अस्माकं नव्यांसं गायत्रं.' म्हणजे हें स्तोत्र जुनें म्हणत आहों असें नाहीं. आतांचें आतां नुकेंच रचून म्हणत आहों तें. नुकें नवीन रचिलेलें स्तोत्र असलें म्हणजे तें देवांस जुन्या स्तोत्रापेक्षां अधिक ग्राह्य आणि प्रिय होत असे अशाविषयीं पुष्कळ ठिकाणीं उदाहरणें आलीं आहेत, आणि या पूर्वीहि त्याविषयीं सांगितलें आहे. या मन्त्रावरून हें सूक्त अनादि असें कसें म्हणवेल?

५. तीन प्रकारची जी संपत्ति म्हणजे सुखाचे प्रकार त्यांचा भाग भक्त अग्नीपाशीं मागत आहे. सायणाचार्य म्हणतात कीं, अगदी वरची सुखें म्हणजे द्युलोकांत असलेलीं, मधली म्हणजे अंतरिक्षांत असलेलीं, आणि खालची संपत्ति म्हणजे पृथ्वीवर असलेली होय.

या मन्त्रांतील दुसऱ्या चरणांत जो 'वाजेषु' शब्द आहे तो आणि तिसऱ्यांत असलेला 'वस्व' हे एक अर्थी येथें योजिले आहेत. केवळ वृत्तपूरणार्थ दोन शब्द घातले आहेत. वस्तुतः एकच विवक्षित दिसतो.

आ नो भज परमेष्वा वाजेषु मध्यमेषु ।
शिक्षा वस्वो अन्तमस्य ॥ ५ ॥ २२ ॥

आ । नः । भज । परमेषु । आ । वाजेषु । मध्यमेषु ।
शिक्ष । वस्वः । अन्तमस्य ॥ ५ ॥ २२ ॥

विभक्तासि चित्रभानो सिन्धोरूर्मा उपाक आ ।
सद्यो दाशुषे क्षरसि ॥ ६ ॥

विऽभक्ता । असि । चित्रभानो इति चित्रऽभानो । सिन्धोः । ऊर्मौ ।
उपाके । आ ।
सद्यः । दाशुषे । क्षरसि ॥ ६ ॥

यमग्ने पृत्सु मर्त्यमवा वाजेषु यं जुनाः ।
स यन्ता शश्वतीरिषः ॥ ७ ॥

यम् । अग्ने । पृत्ऽसु । मर्त्यम् । अवाः । वाजेषु । यम् । जुनाः ।
सः । यन्ता । शश्वतीः । इषः ॥ ७ ॥

भाषायाम्.

५. हे अग्ने, [त्व] नः (=अस्मभ्यं) परमेषु (=उत्कृष्टतमेषु) वाजेषु (=द्युलोकवर्तिनीषु संपत्सु) आभज (=भागमर्पय), मध्यमेषु (=अन्तरिक्षवर्तिषु) [वाजेषु] [आभज=भागमर्पय], अन्तमस्य (=अन्तिकतमस्य भूलोकसम्बन्धिनो वस्व (=वसुनः=संपद) [भागं] शिक्ष (=अर्पय, देहि) ॥

६. हे चित्रभानो (=सुन्दरतेजोयुक्त) [अग्ने], [त्व हि] सिन्धो. (=प्रभूतरस सोमस्य) ऊर्मौ उपाके (=ऊर्मे समीपे, धारायाः समीपम्) [उपासकाय] विभक्ता असि (=धनानां दाता भवसि), [त्वं] दाशुषे (=हविर्दत्तवते उपासकाय) सद्यः क्षरसि (=तदानीमेव अभीष्टस्य वृष्टिं करोषि) ॥

७. हे अग्ने, यं मर्त्यं [त्वं] पृत्सु (=संग्रामेषु) अवाः (=अवसि=रक्षसि), यं [मर्त्यं] [च] [त्वं] वाजेषु (=युद्धेषु) [अ]जुनाः (=प्रेरयसि=रक्षसि) स [मर्त्यः] शाश्वती. इषः .(=नित्यानि अन्नानि) यन्ता (=नियन्ता=नियमेन नियच्छति=प्राप्स्यति=शीघ्रं प्रतिभविष्यति) ॥

५. [हे अग्नी], अगदी वरच्या [सुखा]तून आम्हास भाग दे, मधल्या सुखातून [भाग आम्हास दे]; [आणि] खालच्या संपत्ती-चा [हि] [भाग आम्हास] दे.

5. Give us, [Agni], a share in the highest [enjoyments], [a share] in the middle enjoyments, give a share in the lower wealth.

६. हे चित्रभानू [अग्नी], [तूं] सिंधूच्या लाटेजवळच [संपत्तीचें] देणारा होस. [तू] उपासकाकरिता एकाएकीं वर्षतोस.

6. O [Agni] of delightful splendor, [thou] art a giver [of riches] in the vicinity of the stream of the Sindhu. For [thy] sacrificer [thou] rainest immediately.

७ हे अग्नी, ज्या मर्त्याला [तूं] युद्धात सभाळितोस [आणि] समरांगणांत ज्याला साहाय्य करितोस तो शाश्वत संपत्तींचा धनी होतो •

7. That mortal whom, Agni, [thou] helpest in battles [and] directest in fights becomes the master of perpetual wealth.

---

६. हा मंत्र कठिण आहे. शब्द उघड आहेत तरी एकंदर अर्थ गूढ आहे. भावार्थ नीट समजत नाहीं. 'सिंधूची लाट' (=सिन्धोरूर्मि) म्हणजे सोमरसाचा जो प्रवाह यज्ञांत असतो तो असें दिसतें. आणि त्या सिंधूच्या लाटेजवळ संपत्तीचा दाता आहेस म्हणजे तुला सोमादि हव्यद्रव्यें अर्पण केल्याबरोबर तू प्रसन्न होतोस आणि वर्षू लागतोस. वर्षू लागतोस म्हणजे सायणाचार्य इच्छितात जें असेल त्याचा जणुं काय पाऊस पाडितोस असें म्हणतात तसें असूं शकेल.

सिंधुशब्दाचा अर्थ येथें सूचविल्याप्रमाणे होतो याविषयीं "समुद्रेण सिन्धव यादमानाः इन्द्राय सोमं सुषुत भरन्त. अंशु दुहन्ति हस्तिनः भरित्रैः मध्वः पुनन्ति धारया पवित्रैः." ऋ. ३. ३६. ७, हें आणि "महान्तं त्वा महीः अनु आप अर्षन्ति सिन्धवः यद्गोभिः वासयिष्यसे" ९.२.४ हीं आणि दुसरीं स्थळें आहेत.

'चित्रभानु' म्हणजे ज्याची प्रभा सुंदर आहे तो. हें अग्नीचें विशेषण पुष्कळ ठिकाणीं येत असतें आणि विशेषनामाप्रमाणेंच झालें आहे.

७. 'साहाय्य करितोस', 'जुना', अक्षरशः अर्थ 'प्रेरितोस', म्हणजे ज्याचें साहाय्य करितोस असें म्हटल्यास कदाचित् चालेल.

नकिरस्य सहन्त्य पर्येता कयस्य चित् ।
वाजो अस्ति श्रवाय्यः ॥ ८ ॥

नकिः । अस्य । सहन्त्य । परिऽएता । कयस्य । चित् ।
वाजः । अस्ति । श्रवाय्यः ॥ ८ ॥

स वाजं विश्वचर्षणिरर्वद्भिरस्तु तरुता ।
विप्रेभिरस्तु सनिता ॥ ९ ॥

सः । वाजम् । विश्वऽचर्षणिः । अर्वत्ऽभिः । अस्तु । तरुता ।
विप्रेभिः । अस्तु । सनिता ॥ ९ ॥

जराबोध तद्विविड्ढि विशेविशे यज्ञियाय ।
स्तोमं रुद्राय दृशीकम् ॥ १० ॥ २३ ॥

जराऽबोध । तत् । विविड्ढि । विशेऽविशे । यज्ञियाय ।
स्तोमम् । रुद्राय । दृशीकम् ॥ १० ॥ २३ ॥

भाषायाम्.

८. हे सहन्त्य (=शत्रूणामभिभवनशील) [अग्ने], अस्य कयस्यचित् (=पूर्वोक्तस्य त्वद्भक्तस्य कस्यापि) [मर्त्यस्य] नकिः पर्येता [अस्ति] (=कोपि पर्येता आक्रमिता नास्ति)। [तस्य] वाजो (=बल) [हि] श्रवाय्यः (=प्रख्यात) [अस्ति] ॥

९. स विश्वचर्षणि. (=सर्वमित्रो विश्वव्यापी वा) [अग्नि.] [अस्मदर्थे] अर्वद्भिः (=अस्माकमश्वै) वाज (=सङ्ग्रामं) तरुता (=विजेता) अस्तु, विप्रै. (=अस्माकं कविभि =स्तोत्रकृद्भिः) सनिता (=अभीष्टस्य दाता) अस्तु ॥

१०. तत् (=अत कारणात्) हे जराबोध (=स्तुत्या अग्नि बोधयन्) [कवे], [त्वं] विशेविशे (=सर्वस्मि गृहाण=सर्वेषु गृहेषु) यज्ञियाय (=यज्ञार्हाय) रुद्राय (=महते) [अग्नये] दृशीक (=दर्शनीय=समीचीनं) स्तोम (=स्तोत्रं) विविड्ढि (=व्याप्नुहि=कुरु) ॥

८. हे पराक्रमी [अग्नी], असल्या कोणत्याहि [मनुष्या]चा कोणीहि पाडाव करणारा नाहीं; [कारण कीं] [त्याचें] बळ प्रसिद्ध असतें.

९. तर तो विश्वव्यापी [अग्नि] [आमच्या] घोड्यानीं संग्राम जिंकणारा होओ, [आणि] [आमच्या] कवींच्या योगेंकरून [द्रव्याचा] दाता होओ.

१०. तर हे स्तवनानें [अग्नी-ला] जागृत करणाऱ्या [कवी], [तूं] घरोघर यज्ञयोग्य [आणि] महान् [अग्नी]साठीं सुंदर स्तोत्र रचीत जा.

8. Mighty [Agni], [there exists] no conqueror of any such [man] [For his] power is well-known.

9. May he, therefore, the omnipresent [Agni], be the winner of the battle through [our] horses [and] the giver [of wealth] through [our] poets.

10. Do thou therefore, O [singer], who wakest [Agni from his sleep] compose in every house a beautiful hymn to the adorable [and] great [Agni].

---

८. पूर्वीच्या मन्त्रांत जें सांगितलें कीं, अग्नीचें साहाय्य युद्धांत ज्या मर्त्याला असतें तो संपत्तीचा धनी होतो, त्या तसल्या कोणत्याहि मनुष्याला जिंकणाराहि कोणी नसतो असें या मन्त्रांत सांगतो. आणि जिंकणारा कोणी नसतो त्याचें कारण असें कीं, तो मनुष्य अग्नीच्या आश्रयाखालचा आहे अशा प्रख्यातीपासून त्याला बळ येतें. म्हणजे अग्नी जी प्रख्याति तेंच त्याचें बळ असा भावार्थ समजावयाचा

९. या मन्त्राचा भावार्थ असा आहे कीं, 'अग्नीच्या साहाय्यानें आमच्या घोड्यांस लढाईंत यश येओ, आणि अग्नि आमच्या ऋत्विजांनीं केलेली स्तुती मान्य करून घेओ, आणि प्रसन्न होऊन आम्हांस धन देओ'

१० हा मन्त्र कांहींसा दुर्बोध आहे दुर्बोधत्व दोन गोष्टींविषयीं आहे. १ ह्या मंत्रांत कोण कोणाला बोलतो आहे? २ मन्त्र कोणाविषयीं आहे? आम्ही यास्कास अनुसरून पहिल्या प्रश्नाविषयीं असें समजतों कीं, ह्या मन्त्राचा जो वक्ता तो कवीस (म्हणजे दुसऱ्या कवीस अथवा आपणच जो कवि त्याला) बोलत आहे. दुसऱ्या प्रश्नाविषयीं सायणाचार्यांस अनुसरून आम्ही म्हणतों कीं, हा मन्त्र अग्नीविषयीं आहे.

'घरोघर'='विशेविशे.' अक्षरशः अर्थ 'प्रत्येक यजमानासाठीं' अथवा 'प्रत्येक घरासाठीं'='दर घराला'='घरोघर' ऋ. १०. ४० १ यांत 'प्रातर्यावानं विभ्व विशेविशे वस्तोर्वस्तो वहमानं धिया शमि" या मन्त्रांतील 'विशेविशे' याचा अर्थ सायणाचार्यांनीच 'सर्व मनुष्यांमध्ये'='सर्व मनुष्यांच्या घरीं', (="सर्वेषु मनुष्येषु") असा केला आहे तो पाहा.

'महान् [अग्नी]साठीं'='रुद्राय

स नो॑ म॒हाँ अ॑निमा॒नो धू॒मके॑तुः पुरुश्च॒न्द्रः ।
धि॒ये वाजा॑य हिन्वतु ॥ ११ ॥

सः । नः॒ । म॒हान् । अ॒नि॒ऽमा॒नः । धू॒मऽके॑तुः । पु॒रु॒ऽच॒न्द्रः ।
धि॒ये । वाजा॑य । हि॒न्व॒तु ॥ ११ ॥

स रे॒वाँ इ॑व वि॒श्पति॒र्दैव्यः॑ के॒तुः शृ॑णोतु नः ।
उ॒क्थैर॒ग्निर्बृ॒हद्भा॑नुः ॥ १२ ॥

सः । रे॒वान्ऽइ॑व । वि॒श्पतिः॑ । दैव्यः॑ । के॒तुः । शृ॒णो॒तु॒ । नः॒ ।
उ॒क्थैः । अ॒ग्निः । बृ॒हत्ऽभा॑नुः ॥ १२ ॥

भाषायाम्.

११. स महान् अनिमानो (=निमानवर्जितः=अपरिच्छिन्नो) धूमकेतुः (=धूमेन ज्ञाप्यमानः) पुरुश्चन्द्रः (=बहुदीप्तिः) [अग्निः] धिये (=स्तुतये=स्तुतिकर्तुं) वाजाय [च] (=अन्नादिसंपदे=अन्नादिसंपदम् अयाप्तुं च) हिन्वतु (=हिनोतु=प्रीत्या प्रेरयतु) ॥

१२. स दैव्यः केतु (=देवानां दूतो) बृहद्भानुः (=प्रौढप्रकाशः) अग्निः, रेवान् (=धनवान्) विश्पतिः (=विशां पति=राजा) इव, उक्थैः (=अस्माकं स्तोत्रैः=अस्मत्स्तोत्रद्वारा) नः (=अस्मान्) शृणोतु ॥

[अग्ने].' 'रुद्र' शब्दाचा अर्थ आम्हीं येथें केला आहे त्याहून कांहीं भिन्न असला तर असेल. पण तें या स्थळीं अग्नीचें विशेषण आहे यांत संशय नाहीं. या मंत्रावरील भाष्यांत सायणाचार्यहि तें अग्नीचेंच विशेषण करितात. शिवाय ऋ. ३.२.५. "अग्निं सुम्नाय दधिरे पुरो जनाः...यतस्रुचः सुरुचं विश्वदेव्यं रुद्रम्..." यांत 'रुद्र' हें अग्नीचें विशेषण असून त्याचा अर्थ 'दुःखें पळविणारा' असा (तशी शब्दव्युत्पत्ती करून) सायणाचार्य करितात. शिवाय ऋ. ८.७२. ३ यांतहि 'रुद्र' हें अग्नीचें विशेषण आहे (येथें सायणाचार्य ऋ. ३.२.५. यांत सांगितलेला व दुसरा एक असे दोन अर्थ करून त्यांतून एक घ्यावा असें दर्शवितात).

'रचीत जा'='विविड्ढि.' याचा अर्थ आम्ही अन्यत्र आढळलेल्या सायणोक्तीलाच अनुसरून केला आहे. हें 'विष्' धातूचें रूप आहे. "अस्मै वय यत् चवान तत् विविष्म इन्द्राय" (ऋ ६.२३.५)='इंद्र जें जें वांछितो तें तें आम्ही करितों' यांत 'विविष्मः' याचा अर्थ सायणाचार्य 'कुर्म'='करितो' असा करितात. शिवाय "यो भूयिष्ठं नासत्याभ्यां विवेष चनिष्ठम्" (ऋ ५.७७.४) यांतहि सायणाचार्य 'विवेष' या 'विष्' धातूच्या रूपाचा अर्थ 'करणें', 'रचणें,' असा करितात.

या मंत्राचा अर्थ सायणाचार्यांनीं केला आहे तो असाः—

"प्रार्थना ऐकून घेणाऱ्या हे अग्नि, प्रत्येक यजमानासाठीं यज्ञसिद्धीकरितां तूं यज्ञांत प्रवेश कर. [यजमान] [तुज] रुद्र [अग्नी]साठीं सुंदर स्तोत्र [गात आहे]"

११. तर तो मोठा, अपरिमित, धूम्रकेतु, [आणि] विशालतेजस्क [अग्नि] स्तोत्र [करण्या]विषयीं [आणि] अन्न [मिळविण्या]विषयीं आम्हांस प्रेरणा करो.

११. May, therefore, he, the great, the infinite, the smoke-bannered [Agni] of vast splendor inspire us to prayer [and] food.

१२. तर तो देवांचा दूत, [तो] विशालतेजस्क अग्नि, [आमच्या] स्तोत्रांच्या योगेंकरून, संपत्तिमान् राजाप्रमाणें, आमचें म्हणणें ऐको.

12. May, therefore, he the divine messenger, Agni, of vast splendor hear us through [our] hymns, like a wealthy king.

११. 'अपरिमित'='अनिमानः', म्हणजे ज्याला इयत्ता अथवा माप नाहीं, जो किती मोठा आहे त्याचें माप करितां येत नाहीं तो—'धूम्रकेतु' म्हणजे धूर हीच पताका आहे ज्याची तो हें विशेषण अग्नीस यथायोग्य लाविलें आहे यांत संशय नाहीं—'विशालतेजस्क' हेंहि विशेषण अग्नीस यथायोग्य लाविलेंलें आहे—'स्तोत्र [करण्या]विषयीं [आणि] अन्न [मिळविण्या]विषयीं'='धिये वाजाय.' या शब्दांचा अर्थ आम्हांस 'बुद्धी आणि अन्न' देओ असाहि होऊं शकेल आणि तसा केल्यास बरा दिसेल.

१२. या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'आम्ही हीं जीं स्तोत्रें म्हणत आहों तीं ऐकून अग्नि प्रसन्न होओ आणि आमची प्रार्थना ऐको.'—देवांचा दूत'='दैव्यः केतुः.' म्हणजे देवांचा प्रसाद मनुष्यांकडेस आणणारा, आणि देवांस दिलेलें हवि देवांप्रत पोहचविणारा. अग्नीला जसा मनुष्यांचा पुरोहित (वकील) असें म्हणत तसाच देवांचा दूत असेंहि म्हणत. मनुष्यांनीं केलेली प्रार्थना आणि अर्पण केलेलें हवि देवांप्रत प्रविष्ट करून देवांचा प्रसाद मनुष्यांवर करून देणें हें अग्नीचें मुख्य काम होय. 'देवांचा दूत' हा अर्थ येथे भाष्यकार सायणाचार्य यांसहि संमत आहे—'आमचें म्हणणें ऐको'='नः शृणोतु' अक्षरशः भाषांतर 'आम्हांस ऐको.' 'आमची प्रार्थना ऐको' असा भावार्थ

नमो॑ मह॒द्भ्यो नमो॑ अर्भ॒केभ्यो॒ नमो॒ युव॑भ्यो॒ नम॑ आशि॒नेभ्यः॑ ।
यजा॑म दे॒वान्यदि॑ श॒क्रवा॑म॒ मा ज्याय॑सः॒ शंस॒मा वृ॑क्षि देवाः॥
॥ १३ ॥ २४ ॥

नमः॑ । म॒हत्ऽभ्यः॑ । नमः॑ । अ॒र्भ॒केभ्यः॑ । नमः॑ । युव॑ऽभ्यः । नमः॑ ।
आ॒शि॒नेभ्यः॑ ।
यजा॑म । दे॒वान् । यदि॑ । श॒क्रवा॑म । मा । ज्याय॑सः । शंस॑म् । आ ।
वृ॒क्षि॒ । दे॒वाः॒ ॥ १३ ॥ २४ ॥

भाषायाम्.

१३. महद्भ्यो [देवेभ्यो] नमः (=नमस्कारः) [अस्तु], अर्भकेभ्यः (=क्षुद्रेभ्यो) [देवेभ्यो] नमः, युवभ्यः (=तरुणेभ्यो) [देवेभ्यो] नम, आशिनेभ्यो (=वृद्धेभ्यो) [देवेभ्यो] नम । यदि (=यस्मात्कारणाद्) [वय] शक्रवाम (=शक्ताः स्म.) [तस्माद्] देवान्यजाम (=यजामहे=भजामहे) । हे देवाः, [अहं] ज्यायसः (=कस्यापि ज्येष्ठस्य) [देवस्य] शंस (=स्तुतिं) मा आवृक्षि (=विच्छिन्न मा कार्षं=मा विलुप्येयम्) ॥

१३. मोठ्या [देवां]स नमस्कार [असो], लहान [देवां]स नमस्कार [असो], तरुण [देवां]स नमस्कार [असो], म्हाताऱ्या [देवां]स नमस्कार [असो]. ज्यापेक्षां आम्हांस शक्ति आहे [त्यापेक्षां] [आम्ही] देवांस भजूया. [आणि] हे देवांनो, [कोणत्याहि] [एकाद्या] जुन्या [देवा]च्या स्तुतीचा अतिक्रम मजकडून होऊं देऊं नका.

13. Adoration to the great [gods] adoration to the small [gods], adoration to the young [gods], adoration to the old [gods] Let us worship the gods since we can [do so] May I not, O gods, pass over the praise of [any] elderly [god].

---

१३. हें भाषांतर सायणाचार्यांच्या भाष्यास अनुसरून केलें आहे, आणि *आम्हांस भाष्यकाराचा हा अर्थ* युक्त दिसतो. मात्र ते 'यदि' या अव्ययाचा अर्थ 'जेव्हां' असा करितात. अनेक देवांविषयीं पुरातन आर्ष स्तुती करूं लागले म्हणजे, सर्व कांहीं लहान मोठे, जुने, नवे जे असतील त्या सर्व देवांचा समावेश ज्यांत होईल अशी प्रार्थना करीत, आणि कोणत्याहि देवास आपण वगळलें असें दिसूं नये याविषयीं ते फार काळजी घेत. त्याचें उदाहरण या मंत्रांत आहे. पूर्वींहि असें उदाहरण एक आलें आहे. सूक्त १४ मंत्र ८ याजवरची टीप १०७ व्या पृष्ठावर पाहा.

सायणाचार्य मात्र असें सांगतात कीं, 'अग्नीनें शुनःशेपाला विश्वेदेवांची स्तुती करावयास सांगितल्यामुळें (२४ व्या सूक्ताच्या आरंभीं दिलेली टीप पाहा) शुनःशेपानें ही ऋचा म्हणून विश्वेदेवांची स्तुति केली'. पण तसें समजलें पाहिजे असें नाहीं, असें ऋचेच्या शब्दांकडे आणि अर्थाकडे पाहिलें तर त्यांत पूर्वबद्ध शुनःशेपाच्या स्थितीस अनुलक्षून म्हटल्यासारिखी ही ऋचा असावी हें सूक्त दिसत नाहीं.

या मंत्रावरून इतकें दिसून येतें कीं, सगळेच देव एकसारिखे नव्हते त्यांत लक्ष्यांत ठेवण्याजोगें इतकें आहे कीं, कितीएक जुने आणि कितीएक नवे असे होते. म्हणजे कितीएकांची भक्ती फार दिवसांपासून लोक करित आले होते आणि कितीएक नुकेच प्रसिद्धीस येत होते असा भावार्थ दिसतो.

सूक्तम् २८.

अजीगर्तपुत्रः शुनःशेप ऋषिः। देवता–१-४ इन्द्रः। ५-६ उलूखलम्। ७-८ उलूखलमुसले। ९ हरिश्चन्द्रः अधिषवणचर्म वा सोमो वा। छन्दः–
१-६ अनुष्टुप्। ७-९ गायत्री॥

यत्र ग्रावा पृथुबुध्न ऊर्ध्वो भवति सोतवे।
उलूखलसुतानामवेद्विन्द्र जल्गुलः॥ १॥

यत्र। ग्रावा। पृथुऽबुध्नः। ऊर्ध्वः। भवति। सोतवे।
उलूखलऽसुतानाम्। अव। इत्। ऊं इति। इन्द्र। जल्गुलः॥ १॥

भाषायाम्.

१. हे इन्द्र, यत्र पृथुबुध्नः (=स्थूलमूलो) ग्रावा (=पाषाणः) सोतवे (=सोतुं सोमाभिषवं कर्तुम्) ऊर्ध्वः (=उन्नतः=सिद्धो) भवति [तत्र] उलूखल-सुतानाम् (=उलूखले अभिषुतानां) [सोमानां=सोमान्] अवेत् उ (=अवैव=तं सोमास्तवोदरे सत्वरं यथा गच्छेयुस्तथा) जल्गुलः (=भक्षय=पिब)॥

सूक्त २८.

ऋषि–पूर्ववत्. देवता–१-४ इंद्र, ५ ६ उखळ, ७-८ उखळमुसळें म्हणजे उखळ आणि मुसळ, आणि ९ हरिश्चंद्र, अधिषवणचर्म (म्हणजे वेलाच्या चामड्यावर सोम काढीत तें चामडें) अथवा सोम. वृत्त–१-६ अनुष्टुभ्, आणि ७-९ गायत्री.

१. हे इंद्रा, जेथें मोठ्या बुडाचा पाषाण सोमरस काढण्याकरितां उंच उभा राहतो [तेथें] उखळाच्या योगानें काढिलेले सोमरस पिऊन टाक.

HYMN 28.

To 1-4 *Indra*, 5-6 to *Ulûkhalam* (*i. e.* Mortar), 7-8 to *Ulûkhala-Musalau* (*i. e.* Mortar and Pounder), 9 to *Haris'chandra, Adhishavaṇacharma* (the cow-hide used in pressing the juice) or to *Soma*. By the author of the previous hymn. Metre *Anushṭup* but in 7-9 the *Gâyatri*.

1. Where, Indra, the wide-bottomed stone stands high that the juice may be expressed, quaff down the Somas expressed in the Mortar.

---

१. हा मंत्र चमत्कारिक आहे. यांत इंद्रास जेथें सोम सिद्ध करितात तेथें येऊन तो सोम पिण्याची प्रार्थना आहे. उखळांत सोमवल्ली घालून (कुटून?) सोम काढिले आहेत ते पी असें हट.

'हें सर्व सूक्तच मोठ्या महत्त्वाचें आहे असें आम्हांस वाटतें. कारण कीं, प्राचीन काळीं सोमरस कसा काढीत त्याविषयीं या सूक्तावरून कांहीं माहिती आपणास मिळते असें वाटतें. ती अशी– सोम कुटावयास ग्रावा म्हणून एक फत्तर असे. तो बहुतकरून वरवंट्यासारिखा अथवा बत्त्यासारिखा असावा. त्याचें नांव ग्रावा. त्याणें सोम कुटून, पाटून अथवा रगडून सोमरस काढीत असत आणि तो सोमरस उखळांत काढीत असें दिसतें (मंत्र १). 'अधिषवण्य' या नांवाचे दोन दगड (अथवा फळ्या?) असत, पण त्यांचें काम काय करीत तें स्पष्ट सांगवत नाहीं, मात्र त्यांस एकाला टाकून काढीत (मंत्र २). सोम पाटावर बायका वांटीत अथवा रवीनें दहीं घुसळल्याप्रमाणें घुसळीत, त्यामुळें त्यांचे हात मागें पुढें होत (मंत्र ३, ४). सर्व परोपरी सोम उखळांत काढीत (मंत्र ५). ज्या उखळांत सोमरस काढीत तें लांकडाचें केलेलें असे (मंत्र ६). उखळ आणि मुसळ यांच्या योगें सोम कुटून वगैरे तयार होऊं लागला म्हणजे घोडा घांटें चावीत असल्याप्रमाणें आवाज होत असे, आणि उखळ आणि मुसळ यांच्या योगानें सोम तयार होई म्हणून लोकांची त्यांजवर फार प्रीति बसलेली असे (मंत्र ७). सोमरस काढण्याला उखळमुसळें लागत आणि तीं लांकडाचीं केलेलीं असत, आणि सोमरस गोड असे, आणि उखळमुसळें उंच असत (मंत्र ८). सोम काढल्यावर पवित्र म्हणून जें गाळणें असे त्यांत तो पाटीत आणि दोन पाषाण भरीत आणि बैलाच्या अथवा गाईच्या चामड्यावर ठेवीत, आणि नंतर देवास

अर्पण करीत (मंत्र ९).

अतां ह्या गोष्टी आपणास या सूक्तावरून समजतात. पण अलीकडेस जे यज्ञ होतात त्यांत सोमरस म्हणून जो तयार होतो तो वेगळ्याच रीतीनें तयार करितात. त्यांत माव्याचा उपयोग तर असतो, पण त्याचा उपयोग खलांतील खल्याप्रमाणें करितात. आणि उखळ मुळीच लागत नाहीं तो मुसळीत नाहींत व वाटीतहि नाहींत. त्यांत रवी नसते आणि दोन्यांचेंहि कारण नाहीं, व मुसळहि लागत नसतें व त्यांत गाईचें अथवा बैलाचें चामडें अशुद्ध मानितात आणि त्या ऐवजी कृष्णाजिन म्हणजे काळविटाचें चामडें घेतात आणि त्याजवर कुटतात

हल्लीं कसा सोमरस काढितात त्याविषयीं खालील टीप एका विद्वान् श्रोत्रियानें (कीं जे महाराष्ट्रांत होत असलेल्या सर्व यज्ञांत असतातच त्यांनीं) दिलेली आहे.

"प्रथम ब्राह्मणापासून सोमवल्ली यज्ञशाळेच्या बाहेर विकत घेऊन ती यज्ञशाळेंत न्यावी. नंतर आप्यायनादि (म्हणजे सुकू नये म्हणून त्याजवर पाणी शिंपडण्याचे वगैरे) सत्कार झाल्यानंतर ती सोमवल्ली अधिषवणफलावर आंथरलेल्या कृष्णाजिनावर ठेवावी. अधिषवणफळ म्हणजे ज्यांवर सोम कुटावयाचा अशा दोन फळ्या. त्या ३६ अंगुळ्या लांब व १८ अंगुळ्या रुंद प्रत्येकीं असाव्या, म्हणजे दोन्ही मिळून जवळ जवळ आंथरल्यावर समचौरस प्रत्येक बाजू ३६ अंगुळ्या होते त्याजवर कृष्णाजिन म्हणजे काळविटाचें चामडें आंथरावें त्यावर वल्ली ठेविल्यानंतर ग्रावे म्हणजे दगडी च्यार वर्से असतात त्यांचा वरील भाग बारीक आणि खालील जाडा असतो. त्यांनीं ती वल्ली कुटावी. कुटतांना थोडें पाणी मंत्र म्हणून घालावें लागतें, मग आधवनीय या नांवाचें एक मातीचें किंवा धातूचें अनुकूळ असेल तसें भांडें घेऊन त्यांत कुटलेली सोमवल्ली घालावी. आणि पाणी पुष्कळ ओतावें; आणि कुसकरून पाण्यांत मिश्रित करावी. मग सोमवल्लीचा रस पाण्यांत चांगला मिसळल्यानंतर चोंथा पिळून बाहेर काढावा. त्याला ऋजीष असें म्हणतात. मग अधिषवणावर रगाऱ्याच्या घडवंचीसारिखी एक घडवंची गाळण्याकरितां ठेवून तिचेवर दशापवित्र या नांवाचें गाळणें म्हणजे गाळण्याचें वस्त्र बांधावें. आणि त्यांत पाण्यांत मिसळलेला सोम आधवनीयांतून घेऊन ओतावा पवित्राला खालच्या अंगीं लहानसें भोंक पाडून त्यांत लोकरीचा दोरा ओंवून तो हुणूनवरून बारीक धार पडे अशी दशा करावी, म्हणजे वरील सोम दशेवरून बारीक धारेनें खालीं गळतो. तो पात्रांत घ्यावा पात्रें ग्रह, चमस इत्यादि नांवांचीं आहेत मग तो सोम घेऊन वेगवेगळ्या देवतांच्या प्रीत्यर्थ अग्नीमध्यें होमून मग सदोमंडपांत होम करणाऱ्यांनीं, व वषट्कार म्हणणाऱ्यांनी, उद्गात्यांनीं, यजमान, ब्रह्मा, सदस्य इतर्यांनीं अनुक्रमें भक्षण करावा

"हा सोम म्हणजे रानशेर ज्याला म्हणतात तें झाड होय तें पुण्याच्या नजीक चतुःशृंगीच्या डोंगरावर पुष्कळ आहे. त्याला कांटे नसतात. पानेंहि नसतात सुमारें चार हात उंच झाड काड्या काड्यांचें असतें काड्या हाताच्या बोटाच्या सुमारें मोठ्या असतात.

रंग हिरवा असतो झाड तोडून आणि- तांना सगळे आणितात रस किंचित् तुरट असतो. प्याल्यावर अमल वगैरे कांहींच येत नाहीं. प्यावयास मधुर किंवा रुचिकर अथवा पिण्याविषयीं प्रीतिकर लागत नाहीं हे सोमाचें झाड मूळ झाडाचा प्रतिनिधि आहे मूळ सोमाचें झाड नव्हे असें शास्त्रात आहे व समजतात या झाडाला खरोखर पूतिक असें पुंल्लिंगी नांव संस्कृतांत आहे मूळ सोम न मिळेल तर हे पूतिक घ्यावे असें श्रौतसूत्रांतून आहे त्यावरून हे घेत असतात.

"या सोमरसांत दूध, दहीं, सुवर्णरज, तूप देवताभेदानें घालून मग अर्पण करण्याचा विधि आणि चाल आहे"

सोमवल्ली न मिळेल तर 'पूतिक' अथवा 'फाल्गुन' या नांवांच्या वनस्पतींचा उपयोग करावा असें "अलाभिगमे पूतिकान् फाल्गुनानि" (आश्वलायनश्रौतसूत्र ६. ८ ५) या सूत्रांत सांगितलें आहे.

पण आम्हांस असाहि संशय आहे कीं, सोमाचें झाड मिळत नाहीं म्हणून पूतिकाचा रस काढून देवांस अर्पण करावा असें सूत्रांत जें सांगितलें तें पूतिक झाड आणि चतुःशृंगीच्या डोंगरावरील रानशेर हीं एकच म्हणून कशावरून? पूतिक नांव नाहींसें होऊन रानशेर कसें पडलें? आणि पूतिकाविषयीं लिहिणारा शास्त्रकार कधीं व कोठें झाला? वर उतरून घेतलेल्या सूत्रावरील वृत्तिकार गार्ग्य नारायण म्हणतो कीं, "फाल्गुन (आणि पूतिक?) या वनस्पती अप्रसिद्ध म्हणजे बहुत करून कोणास ठाऊक नाहींत अशा आहेत, वास्तव त्या ज्यांस ठाऊक असतील त्यांस विचारून त्यांविषयीं माहिती करून घ्यावी" तेव्हां रानशेर आणि पूतिक किंवा फाल्गुन हे एकच याविषयींची माहिती आलीकडच्या आमच्या यजमानांस आणि ऋत्विजांस कोणाकडून मिळाली? ह्या गोष्टींचा विचार केल्यावर आणि सोमरस म्हणून जो अर्पण करितात त्याला माधुर्यादि आणि मादादि प्राचीन सोमाचे गुण कांहींच नसल्यामुळे आम्हांस अशी शंका येते कीं, तूर्त जे यज्ञ होत असतात त्यांत सोमाविषयां देवांची वंचना होते, आणि गोड, मोठा अंमल आणणारा, परम सुवासिक आणि दिसण्यांत सुंदर असा सोम प्यावयास न मिळतां, त्या ऐवजीं ओंगळ एका रानटी झाडाचा, अमलहि न आणणारा, आनंदहि न करणारा आणि पिण्याविषयीं अत्यंत कटाळा आणणारा ओंगळ रस त्यांस अर्पण केला जातो तर पाऊस पडावा त्या ऐवजी अवर्षण पडतें, पुत्र न होतां बायकोच उलटी मरून जाते, आणि संकट दूर न होतां असलेला हातांतला अधिकारच नाहांसा होतो अथवा फांशीचीच शिक्षा होते यांत काय नवल?

यत्र द्वाविंव जघनांधिषवण्यां कृता ।
उलूखलसुतानामवेद्विन्द्र जल्गुलः ॥ २ ॥
यत्रं । द्वौऽइंव । जघनां । अधिऽसवन्यां । कृता ।
उलूखलऽसुतानाम् । अवं । इत् । ऊम् इति । इन्द्र । जल्गुलः ॥ २ ॥
यत्र नार्यपच्यवमुपच्यवं च शिक्षते ।
उलूखलसुतानामवेद्विन्द्र जल्गुलः ॥ ३ ॥
यत्रं । नारी । अपऽच्यवम् । उपऽच्यवम् । च । शिक्षते ।
उलूखलऽसुतानाम् । अवं । इत् । ऊम् इति । इन्द्र । जल्गुलः ॥ ३ ॥
यत्र मन्थां विबध्नते रश्मीन्यमितवा इव ।
उलूखलसुतानामवेद्विन्द्र जल्गुलः ॥ ४ ॥
यत्रं । मन्थाम् । विऽबध्नतें । रश्मीन् । यमितवैऽइंव ।
उलूखलऽसुतानाम् । अवं । इत् । ऊम् इति । इन्द्र । जल्गुलः ॥ ४ ॥

भाषायाम्.

२. हे इन्द्र, यत्र द्वौ जघनौ (=जघनप्रदेशौ) इव [द्वौ] अधिषवण्यौ (=सोमाभिषवफलकस्य द्वौ भागौ) कृतौ (=स्थापितौ) [वर्तेते] [तत्र] उलूखलसुतानाम् (=उलूखले अभिषुतानां) [सोमानां=सोमान्] अवेत् उ (=अवेव=ते सोमास्तवोदरे सत्वरं यथा गच्छेयुस्तथा) जल्गुलः (=भक्षय=पिब) ॥

३. हे इन्द्र, यत्र नारी (=मन्थनकर्त्री स्त्री) [सोममन्थने] अपच्यवं (=मन्थनरज्जोः अपाकर्षण=स्वस्मात् अपचोदनम्, अपनयनम्) उपच्यव (=मन्थनरज्जोः उपाकर्षण=स्वसमीपम् उपाकर्षणम्, उपानयन) च शिक्षते (=शिक्षणार्थमिव पुन पुनः करोति) [तत्र] उलूखलसुतानाम् (=उलूखले अभिषुतानां) [सोमानां=सोमान्] अवेत् उ (=अवेव=ते सोमास्तवोदरे सत्वर यथा गच्छेयुस्तथा) जल्गुल. (=भक्षय= पिब) ॥

४. यत्र मन्थां (=मन्थान), [अश्वं] यमितवै (=यन्तु=नियन्तु) रश्मीन् (प्रग्रहान्) इव [उपासका] [रश्मिभि.=रज्जुभि.] विबध्नते (=विबध्नन्ति) तत्र उलूखलसुतानाम् (=उलूखले अभिषुतानां) [सोमानां=सोमान्] अवेत् उ (=अवेव =ते सोमास्तवोदरे सत्वर यथा गच्छेयुस्तथा) जल्गुल. (=भक्षय=पिब) ॥

२. जेथें सोमरस काढण्याचे दोन्ही अधिषवण्य दोन जघनांप्रमाणें [एकावर एक लावून] ठेविलेले आहेत [तेथें], हे इंद्रा, उखळाच्या योगानें काढिलेले सोमरस पिऊन टाक.

३. जेथें नारी पुढें लोटण्यास आणि मागें ओढण्यास शिकते [तेथें], हे इंद्रा, उखळाच्या योगानें काढिलेले सोमरस पिऊन टाक.

४. जेथें [घोड्यास] आवरण्याला लगाम [बांधावा] तशी दोरी रवीला बांधितात [तेथें], हे इंद्रा, उखळाच्या योगानें काढिलेले सोमरस पिऊन टाक.

2. Where, Indra, the two halves of the Soma-press are placed close together like the two loins, quaff down the Somas expressed in the Mortar.

3. Where, Indra, the woman learns to push and to pull, quaff down the Somas expressed in the Mortar.

4. Where, Indra, [they] tie strings to the churning-staff as the reins [to the horse] to restrain [him], quaff down the Somas expressed in the Mortar.

---

२. 'सोमरस काढण्याचे दोनी अधिषवण्य.' 'अधिषवण्य' याचें सायणाचार्य 'अधिषवणफलक' शब्दानें भाष्य करितात. म्हणजे ज्यांवर चामडें घालून त्या चामड्यावर सोम कुटावयाचा त्या दोन फळ्या असा सायणाचार्यांचा भावार्थ दिसतो. आम्हीं भाषांतर केलें आहे तें अधिषवण्य म्हणजे सोम काढण्याचा जो खरक (किंवा पाटावरवंटा) त्याचा खालचा (स्त्रीभाग) आणि वरचा (पुंभाग) असे जे दोन भाग ते होत असें समजून केलें आहे. तें साम्यधर्मी- ज्या वेळीं स्त्रीपुरुषांचे दोनी जघन एकमेकाला लागतात तसे जवळ जवळ चिकटून लावून एकावर एक ठेवणारे असा या मंत्राचा भावार्थ आहे. मग तूर्त होत असलेल्या यज्ञांत अधिषवण्य म्हणून दोन फळ्यार असतात (वरील [illegible] टीप पाहा) तशा पुरातन म्हणजे वैदिक युगांत नसतील आता अधिषवण म्हणजे (अधिषवण्य आदीकडे म्हणत नाहींत) फळ्या असें समजतात आणि त्यांजवरच सोम कुटतात, उखळांत कुटीत नाहींत. पुरातन काळीं उखळांत कुटीत असें या सूक्तावरून स्पष्ट दिसून येतें.

३. सायणाचार्यः—"जेथें म्हणजे ज्या कर्मांच्या ठायीं नारी म्हणजे पत्नी अपच्यव म्हणजे यज्ञशाळेंतून बाहेर जाणें आणि उपच्यव म्हणजे यज्ञशाळेंत येणें हें शिकते तेथें" इ०. परंतु सोमरस काढीत असतांना यजमानपत्नीनें शाळेबाहेर जाणें आणि पुनः आंत येणें अता विशेष विधि नाहीं. आम्हीं अर्थ इन्द्रः केला आहे, त्याचा भावार्थ आम्हांस असा वाटतो की, सोम [illegible] यज्ञकर्त्यांना [illegible] दोरीनें [illegible] म्हणजे जो उपच्यव आणि [illegible]

यच्चिद्धि त्वं गृहेगृह उलूखलक युज्यसे ।
इह द्युमत्तमं वद जयतामिव दुन्दुभिः ॥ ५ ॥ २५ ॥
यत् । चित् । हि । त्वम् । गृहेऽगृहे । उलूखलक । युज्यसे ।
इह । द्युमत्ऽतमम् । वद । जयताम्ऽइव । दुन्दुभिः ॥ ५ ॥ २५ ॥
उत स्म ते वनस्पते वातो वि वात्यग्रमित् ।
अथो इन्द्राय पातवे सुनु सोममुलूखल ॥ ६ ॥
उत । स्म । ते । वनस्पते । वातः । वि । वाति । अग्रम् । इत् ।
अथो इति । इन्द्राय । पातवे । सुनु । सोमम् । उलूखल ॥ ६ ॥

भाषायाम्.

५. हे उलूखलक, यच्चिद्धि (=यद्यपि) त्वं गृहेगृहे युज्यसे (=सोमाभिषवकर्मणि प्रयुज्यसे) [तथापि] [त्व], जयतां (=युद्धे मामजयातां) दुन्दुभिरिव, इह द्युमत्तमम् (=अतिशयेन गम्भीरं यथा स्यात्तथा) वद (=गर्जनां कुरु) ॥

६. उत (=अपि च) हे वनस्पते (=वनस्पतेः काष्ठस्य विकार उलूखल), ते (=तव) अग्रमित् (=मूर्धोपरि एव) वातो वियाति (=वात्वा गच्छति)। अथो (=अतः कारणात्) हे उलूखल, इन्द्राय पातवे (=पातुम्=इन्द्रपानाय) सोम सुनु (=सोमाभिषवं कुरु) ॥

सोडून जाऊं दिली म्हणजे तो अपच्यव जेथें नारी म्हणजे यजमानाची बायको गाडग्यांत दहीं घुसळल्यामुळे हात मागें पुढें करीत असते तशी सोम घुसळतांना हात मागें पुढे करिते असें तात्पर्य. सोम आता मथीत नसले तरी पुरातनकाळी मंथीत असें पुढच्या ऋचेवरून स्पष्ट होते असें आम्हांस वाटतें. अथवा नारी सोम पाट्यावर वाटल्याप्रमाणे वांटी, त्यामुळें तिचे हात वरवटाबरोबर मागें पुढें होत असत, आणि हे जें मागे पुढे होणे त्यालाच उपच्यव आणि अपच्यव म्हणावें. आणि शेवटीं या 'उपच्यव' आणि 'अपच्यव' शब्दांच्या अर्थाविषयीं असें सांगावयाचे आहे कीं, पूर्वीच्या (म्हणजे दुसऱ्या) मंत्रांत जी दोन जघनांची (सुरतसमयीं स्त्रीपुरुषांचे शरीरमध्यभाग एकत्र होतात त्यांची) उपमा दिली आहे त्या उपमेचा संबंध घेऊन 'उपच्यव' आणि 'अपच्यव' यांचा अर्थ सुरताच्या अनुरोधानें कितीएक विद्वान लावितात तोहि चांगला संभवतो असे म्हटले पाहिजे.

४. या मंत्राचा भावार्थ असा कीं, 'जेथें दह्याचें मथन केल्याप्रमाणे सोमाचें मंथन रवीला दोरी बांधून करितात तेथें इंद्रानें सोमरस प्यावा.' आतां जे यज्ञ करितात त्यांत सोममथन होत नसते. (सोम कसा करितात त्याविषयीं वर पहिल्या मंत्रावर टीप दिली आहे ती पाहा). पण आताच्या प्रचारास लागू नाहींत अशा जशा कितीएक गोष्टी या सूक्तांत (उखळांत सोम कुटणें इत्यादिक) आहेत, तशीच सोम घुसळणें ही असून पुरातनकाळीं प्रचारांत होती असे दिसतें.

५. हे वा उखळा, जरी तुला घरोघर कामीं लावितात [तरीहि] [तूं] विजयी वीरांच्या नगाऱ्याप्रमाणें येथें फार मोठा आवाज कर.

६. आणि हे वनस्पती, तुझ्या डोकीवरूनच वारा वाहात आहे, तर हे उखळा, इंद्राला पिण्याकरितां [तूं] सोमरस काढ.

5. Although, O Mortar, thou art employed in every house, do [thou] make a most roaring noise, like the drum of conquerors.

6. And, lord of the forest, the wind is blowing away over thy head; therefore, Mortar, press out the Soma for Indra to drink.

---

५. मन्त्रवक्त्याचा भावार्थ असा आहे कीं, 'उखळाला घरोघरीं जरी सोम काढण्याच्या कामीं लावीत असल्यामुळें ते थकत असेल, तरी त्याणें येथें मोठा गंभीर नाद करावा, म्हणजे तो ऐकून इंद्र येऊन सोम पिईल, आणि प्रसन्न होईल. गंभीर नाद करावा तो जिंकणाऱ्या वीरांच्या दुदुभीप्रमाणें गंभीर असावा.'—'तुला घरोघर कामीं लावितात,' 'गृहेगृहे युज्यसे.' म्हणजे सर्व उपासक सोम काढण्याच्या कामीं आपआपल्या घरीं उखळ वापरतात. ही गोष्ट आपण ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, आलीकडे जसा यज्ञ म्हणजे बहुत करून कोणी करीतच नाहीं, आणि जरी केलाच तरी पांच चार वर्षांनीं मोठ्या खर्चानें एकदां होतो तसे यज्ञ पूर्वी होत नसत. प्रत्येक दिवसीं प्रत्येक घरीं एक वेळ, दोन वेळ, तीन वेळ सुद्धां यज्ञ होत असे. आणि त्याला वेळ आणि खर्चेंहि फार लागत नसे. जशी आपण तूर्त पूजा करितों अथवा संध्या करितों तसा यज्ञ नित्य होत होता. आणि 'यज्ञ' शब्दाचा अर्थ तरी प्रथम पूजा असाच होता. या पूजेच्या वेळेस देवाची मूर्ति मात्र नसे. आणि फुलें, अक्षता, नैवेद्य वगैरे आधुनिक षोडशोपचारांचीहि गरज नव्हती. यज्ञ म्हणजे देवाची अथवा देवांची प्रार्थना करून, आणि केव्हां केव्हां नवीन स्तोत्रें रचून, त्याच वेळीं सोमरस काढून तो व मनुष्यांनीं नित्य खावयाचे पदार्थ (मग ते मांसाचे अथवा धान्याचे असोत) असे देवतेस अर्पण करीत. त्यामुळें सोम काढण्यास उखळ घरोघर कामीं लाविलें जाई असा भावार्थ आहे.

६. या मंत्रांत वनस्पति म्हणजे उखळच समजलें पाहिजे. हें सोम काढावयाचें उखळ लाकडानें असे असें यावरून दिसतें. 'वनस्पति' या शब्दाचा अर्थ वेदांत 'मोठा वृक्ष' असा होतो, तूर्त वेल, वल्ली, असा होत असतो तसा होत नाहीं. उखळ मोठ्याशा वृक्षाचें केलें असल्यामुळें त्या उखळासच वृक्ष असें संबोधन केलें आहे.

'तुझ्या डोकीवरूनच वारा वाहात आहे'=ते....वातो विवाति अग्रमित्.' सायणाचार्यांच्या म्हणण्याप्रमाणें, मुसळाचे डोकें त्यावेळे पडत असल्यामुळें वारा सुटतो तो वारा येथें समजावयाचा.

आयजी वाजसातमा ता ह्यु१च्चा विजर्भृतः ।

हरी इवान्धांसि बप्सता ॥ ७ ॥

आयजी इत्याऽयजी । वाजऽसातमा । ता । हि । उच्चा । विऽजर्भृतः ।

हरी इवेति हरीऽइव । अन्धांसि । बप्सता ॥ ७ ॥

ता नो अद्य वनस्पती ऋष्वावृष्वेभिः सोतृभिः ।

इन्द्राय मधुमत्सुतम् ॥ ८ ॥

ता । नः । अद्य । वनस्पती इति । ऋष्वौ । ऋष्वेभिः । सोतृऽभिः ।

इन्द्राय । मधुऽमत् । सुतम् ॥ ८ ॥

भाषायाम्.

७. ते आयजी (=यज्ञद्वारा सपदं प्रापयती) वाजसातमे (=अतिशयेन अन्नप्रदे) [उलूखलमुसले] हि, अन्धांसि (=चणकादीनि खाद्यानि यवसकाण्डानि वा) बप्सती (=भक्षयन्ती) हरी (=इन्द्रस्य अश्वौ) इव, उच्चैः [शब्दयुक्त] [सोमकाण्डानि] विजर्भृत. (=भक्षयत) ॥

८ हे वनस्पती (=हे वनस्पतेः काष्ठस्य विकारौ) [उलूखलमुसले], तौ ऋष्वौ (=श्रेष्ठौ) [युवाम्] अद्य नः (=अस्माकम्) ऋष्वैः (=श्रेष्ठैः) सोतृभिः (=सोमाभिषवं कुर्वद्भिर्ऋत्विग्भिः) [सह] इन्द्राय मधुमत् (=मधुरं सोमरूपि) [पेयं] सुनुतम् (=अभिषवेण प्रतिपादयतम्) ॥

परंतु यारा वाहतो आहे याचा संबंध उखळानें सोम कां काढावा या गोष्टीकडे कसा असेल तो असो. आलीकडे यज्ञ होतात त्यांत उखळाचा, उपयोग सोम तयार करण्याच्या कामीं होत नसतो, यास्तव आलीकडच्या प्रचारावरून या मंत्राचा अर्थ बसविण्यास मार्ग नाहीं. परंतु कदाचित् सायणे लिहिल्याप्रमाणें तात्पर्य असेल काय ?

'तू अरण्यांत वृक्षरूपानें असतांना वावटळीचा उपद्रव तुला होत होता, आतां तुझें उखळ केलें तेव्हां तू लहान झाल्यास म्हणून वारा तुझ्या डोकीच्या वरच्यावरच वाहतो, आणि तुला त्यापासून कांहीं उपद्रव होत नाहीं. याबद्दल तूं इंद्राचे उपकार मान आणि त्यासाठीं सोमरस काढ.'

७. कारण कीं धनप्राप्ती करून देणारीं [आणि] अतिशयें करून अन्न मिळवून देणारीं तीं [उखळमुसळें] घाटे चावणाऱ्या घोड्यांप्रमाणें [सोमवल्लीचे तुकडे] झपाट्यानें खातात.

7. For these two [the Mortar and the Pounder], procurers of wealth through the sacrifice, [and] excellent givers of food, loudly consume [the Soma-plant] like two horses chewing [their] fodder.

८. तर हे वनस्पतींनो, श्रेष्ठ जे [तुम्हीं] ते आज आमच्या सोम काढणाऱ्या श्रेष्ठ [ऋत्विजां]बरोबर इंद्राकरितां मधुर [सोमरस] काढा.

8. Do ye, therefore, lords of the forest, [who are] high, extract with our high Soma-pressers the sweet Soma for Indra.

---

७. या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, '[इंद्राचे?] दोन घोडे जसे खडाखड घाटे चावून टाकितात तशीं उखळमुसळें सोमरसाचे तुकडे चावून टाकितात, म्हणजे सोमाचे तुकडे आंत घातले आणि सोमरस काढूं लागले म्हणजे घाटे खाणाऱ्या घोड्यांप्रमाणें आवाज होतो.'

'धन प्राप्ती करून देणारीं [आणि], अतिशयेंकरून अन्न मिळवून देणारीं'= *'आयजी वाजसातमा.'* हीं दोनीं विशेषणें बहुतकरून देवांस लावण्याची चाल आहे, पण येथें उखळमुसळें ह्या देवता झाल्या म्हणून त्यांसाहि देवांस लावावयाचीं विशेषणें लाविलीं असें समजलें पाहिजे. परंतु उखळमुसळांच्या योगानें सोम तयार होतो, आणि त्या सोमानें देव तृप्त झाल्यावर ते धन, अन्न इत्यादि देतात, म्हणून उखळमुसळांस धन आणि अन्न मिळवून देणारीं असें म्हटलें असा अर्थ केला तरी चालेल.

८. ह्या मंत्रांत तरी वनस्पती म्हणजे उखळमुसळेंच समजावयाचीं. कारण कीं, तीं दोनीहि लांकडाचीं केलेलीं असतात — सोम काढणाऱ्या ...[ऋत्विजां]बरोबर ....मधुर सोमरस काढा' म्हणजे जे सोमरस काढणारे तेच ऋत्विज, आणि ते उखळमुसळांच्या योगानें सोमरस काढीत; त्यापेक्षां उखळमुसळांनीं ऋत्विजांबरोबर सोमरस काढल्याप्रमाणें झालेंच.

सोमरसाविषयीं पुरातन आर्यजनांची इतकी सप्रेम भक्ति असे कीं, त्यांनीं सोम काढावयाचीं जीं लांकडी उखळमुसळें त्यांस सुद्धां देव करून टाकिलें.

उच्छिष्टं चम्वोर्भर सोमं पवित्र आ सृज ।
नि धेहि गोरधि त्वचि ॥ ९ ॥ २६ ॥

उत् । शिष्टम् । चम्वोः । भर । सोमम् । पवित्रे । आ । सृज ।
नि । धेहि । गोः । अधि । त्वचि ॥ ९ ॥ २६ ॥

भाषायाम्.

९ शिष्ट [सोमरस] चम्वोः (=चमसयोः=सोमपात्रयोः) उद्भर (=स्थापय) । सोमं (=सोमरस) पवित्रे आ (=दशापवित्रे) सृज (=आसृज=आवर्जय) । [त्वं च सोम] गोः अधि त्वचि (=आनडुहे चर्मणि) निधेहि (=स्थापय) ॥

९. राहिलेला सोम दोनी पा-त्रांत भर, तो गाळण्यांत ओत, [आणि] बैलाच्या चामड्यावर ठेव.

9 Fill the remaining Soma in the two jars, pour it on the sieve and put [it] on the cow-hide.

९. सोमवल्लीचा कचरा उखळांतून काढून टाकिल्यानंतर जो रस राहतो तो दोन चमसांत भरावयाचा, पण तो चमसांत भरण्यापूर्वी बकऱ्याच्या लोंकरीचा एक 'पवित्र' या नांवाचा कपडा अथवा चाळण किंवा गाळणें असे त्यावर गाळण्याकरितां ओतावयाचा; तो त्या पवित्रांतून गळून चमसांत गेला म्हणजे चमस बैलाच्या चामड्यावर ठेवावयाचे असा अर्थ दिसतो.

यज्ञा आतां स्त्रिया दळतांना गीत गातात तसें हें सूक्त सोम तयार करून काढितांना म्हणावयाचें आहे असें स्पष्ट दिसतें.

सोम सिद्ध झाल्यावर ठेवावयाचा तो देवास अर्पण करण्यासाठीं बैलाच्या कातड्यावर ठेवीत असत. कारण कीं बैलाच्या कातड्याची अद्यापि अप्रतिष्ठा झाली नव्हती, आणि त्याची पवित्रता गेली नव्हती आणि ज्याला स्पर्श झाला असतां आतां सर्व सोवळें व्यर्थ होतें आणि पवित्र होण्यासाठीं स्नान करावें लागतें, त्या बैली चामड्याची योग्यता आश्वलायनाच्या वेळेपर्यंत गेली नव्हती. कारण कीं आश्वलायनगृह्यसूत्र विवाहप्रकरण यांत असें सांगितलें आहे कीं, लग्न झाल्यानंतर वरात नवऱ्याच्या घरीं आल्यावर नवरी-स्त्रियेकडून (आम्ही जाणून बुजून 'स्त्रियेकडून' म्हणतों, 'नवरीमुलीकडून' म्हणत नाहीं, कारण त्यावेळीं आठ आणि दहा वर्षांच्या अर्भकांचे विवाह होत नव्हते, उपवर स्त्रियांचेच होत असत, याविषयीं तेंच गृह्यसूत्र पाहा) नवऱ्यानें होम करावा आणि त्या होमांत हवि देतांना तिला अग्नीजवळ बैलाच्या चामड्यावर बसवावी, तें चामडें केसांसकट आणि सबंध असावें, त्याचें डोकें वगैरे काढून टाकिलेलें नसावें व शीर अमुक पाय अमुक हे भाग स्पष्ट असावे, व केस वर स्पष्ट दिसत असें आंथरावें इत्यादिः—

"विवाहाग्निमुपसमाधाय पश्चादस्यानडुहं "चर्मास्तीर्य प्राग्ग्रीवमुत्तरलोम तस्मिन्नु-"पविष्टायां समन्वारब्धायाम्" आश्वलायनगृह्यसूत्र अध्याय १ खंड ८.

सूक्तम् २९.

अजीगर्तपुत्र शुनःशेप ऋषि । इन्द्रो देवता । पङ्क्तिश्छन्द ॥

यच्चिद्धि सत्य सोमपा अनाशस्ता इव स्मसि ।

आ तू न इन्द्र शंसय गोष्वश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ ॥ १ ॥

यत् । चित् । हि । सत्य । सोमऽपाः । अनाशस्ताःऽइव । स्मसि ।

आ । तु । नः । इन्द्र । शंसय । गोषु । अश्वेषु । शुभ्रिषु । सहस्रेषु ।

तुविऽमघ ॥ १ ॥

शिप्रिन् वाजानां पते शचीवस्तव दंसना ।

आ तू न इन्द्र शंसय गोष्वश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ ॥ २ ॥

शिप्रिन् । वाजानाम् । पते । शचीऽवः । तव । दंसना ।

आ । तु । नः । इन्द्र । शंसय । गोषु । अश्वेषु । शुभ्रिषु । सहस्रेषु ।

तुविऽमघ ॥ २ ॥

भाषायाम्.

१ हे सत्य सोमपा (=सोमस्य पातः) [इन्द्र], यच्चिद्धि (=यद्यपि) [वयम्] अनाशस्ता इव (=अप्रशस्ता इव=अप्रसिद्धा इव) स्म., तु (=तथापि) हे तुविमघ (=प्रभूतधनवन्) इन्द्र, न (=अस्मान्) शुभ्रिषु (=शोभनेषु) सहस्रेषु (=सहस्रसंख्याकेषु) गोषु अश्वेषु [च] [विषयेषु] (=एतानस्मभ्य दत्त्वा) आशंसय (=प्रख्यापय) ॥

२ हे शिप्रिन् (=शोभनहनुयुक्त=सुवदन), हे वाजाना पते (=सम्पदां प्रभो), हे शचीव (=शचीयुक्त=पराक्रमकर्मयुक्त), हे तुविमघ (=प्रभूतधनवन्) इन्द्र, [इय] तव दंसना (=दंसनया=पराक्रमकर्मणा) न (=अस्मान्) शुभ्रिषु (=शोभनेषु) सहस्रेषु (=सहस्रसंख्याकेषु) गोषु अश्वेषु [च] [विषयेषु] (=एतान् अस्मभ्य दत्त्वा) आशंसय (=प्रख्यापय) ॥

सूक्त २९.

ऋषि–पूर्ववत्. देवता–इन्द्र. वृत्त–पंक्ति.

१. हे खऱ्या [आणि] सोम पिणाऱ्या [इंद्रा], [आम्ही] जरी अप्रसिद्ध [असल्या]प्रमाणें आहों, तथापि हे विपुलसंपत्तिमान् इंद्रा, [तूं] हजारो उत्तम गाई [आणि] घोडे [आम्हांस देऊन] त्यांविषयीं आम्हांस प्रख्यात कर.

२. हे सुवदना, हे ऋद्धिसिद्धींच्या नायका, हे पराक्रमी [इंद्रा], तुझ्या प्रतापा[च्या योगा]नें [तूं] हजारो उत्तम गाई [आणि] घोडे [आम्हांस देऊन] त्यांविषयीं आम्हांस प्रख्यात कर.

HYMN 29.

To *Indra*. By the same author as that of the last hymn. Metre *Pankti*.

1. O true and Soma-drinking [Indra], although [we]are as[it were] obscure, cause us to be renowned, Indra of plentiful wealth, about thousands of excellent cows [and] horses [by giving these unto us].

2. O handsome-faced lord of riches, O lord of exploits, by thy power cause us to be renowned, Indra of plentiful wealth, about thousands of excellent cows and horses [by giving these unto us].

---

१. पूर्वी सांगितलेल्या (२४ व्या सूक्ताचा आरंभ पाहा) शुनःशेपकथेस अनुलक्षून भाष्यकार म्हणतात कीं, "विश्वेदेवांनीं (२७ व्या सूक्ताच्या शेवटीं) शुनःशेपास सांगितलें कीं, आम्हा सकळ देवांत इंद्र मोठा आहे, यास्तव तूं त्याची स्तुती कर, त्यावरून शुनःशेपानें इंद्राची प्रार्थना आपली सुटका होण्यासाठीं केली, ती या (२९ व्या) सूक्तांत जे मंत्र आहेत ते आणि पुढच्या (३० व्या) सूक्तांतील पहिले पंधरा मंत्र इतके मिळून केली; ते हें २९ वें सूक्त आहे." परंतु त्या दुःखद स्थितीस अनुलक्षून जशीं पूर्वीचीं सूक्तें रचिलेलीं असावीं तसें हें (२९ वें) हे रचिलेलें असावें असें आम्हांस वाटतें. हें म्हणणें सगळें सूक्त वाचून पाहिल्यावर समजेल.

या पहिल्या मंत्रांत प्रार्थना इतकीच आहे कीं, 'जरी आम्ही गरीब असल्यामुळें आमची कीर्ति कोठें पसरलेली नाहीं आहे, तरी तू आम्हांस हजारो गुरें ढोरें आणि घोडे दे म्हणजे आम्ही श्रीमंत आहों अशी आमची कीर्ति जिकडे तिकडे पसरेल.'

ज्याचा आशीर्वाद रंकास मिळाला तर तो राजा होतो आणि ज्याचा शाप राजास झाला तर त्याचा रंक होईल, असे हे पुरातन ऋषी होते म्हणून आमचे पुरोहित आम्हां सर्वांस सांगत असतात तसे जर खरोखर ते असते, तर आपणांसच गुरें ढोरें, खावयास अन्न, आणि घोडे मिळोत अशी प्रार्थना

नि ष्वा॑पया मिथू॒दृशा॑ स॒स्ताम॑बु॒ध्यमा॑ने ।
आ तू न॑ इन्द्र शंसय॒ गोष्वश्वे॑षु शु॒भ्रिषु॑ स॒हस्रे॑षु तुवीमघ ॥ ३ ॥
नि । स्वा॒प॒य॒ । मि॒थु॒ऽदृशा॑ । स॒स्ताम् । अबु॑ध्यमाने॒ इति॑ ।
आ । तु । नः॒ । इ॒न्द्र॒ । शं॒स॒य॒ । गोषु॑ । अश्वे॑षु । शु॒भ्रिषु॑ । स॒हस्रे॑षु ।
तु॒वि॒ऽम॒घ॒ ॥ ३ ॥
स॒सन्तु॒ त्या अरा॑तयो॒ बोध॑न्तु शूर रा॒तयः॑ ।
आ तू न॑ इन्द्र शंसय॒ गोष्वश्वे॑षु शु॒भ्रिषु॑ स॒हस्रे॑षु तुवीमघ ॥ ४ ॥
स॒सन्तु॑ । त्याः । अरा॑तयः । बोध॑न्तु । शू॒र॒ । रा॒तयः॑ ।
आ । तु । नः॒ । इ॒न्द्र॒ । शं॒स॒य॒ । गोषु॑ । अश्वे॑षु । शु॒भ्रिषु॑ । स॒हस्रे॑षु ।
तु॒वि॒ऽम॒घ॒ ॥ ४ ॥

भाषायाम्.

३. [हे इन्द्र], मिथूदृशी (=परस्पर सगतत्वेन दृश्यमाने) [यमदूत्यौ ?] निष्वापय (=नितरां सुप्ते कुरु) । [ते] अबुध्यमाने [सत्यौ] सस्ता (=निद्रां प्राप्नुताम्) । तु (=तथापि) हे तुविमघ (=प्रभूतधनवन्) इन्द्र, [त्व] नः (=अस्मान्) शुभ्रिषु (=शोभनेषु) सहस्रेषु (=सहस्रसख्याकेषु) गोषु अश्वेषु [च] [विषयेषु] (=एतानस्मभ्यं दत्त्वा) आशसय (=प्रख्यापय) ॥

४ हे शूर [इन्द्र], त्याः (=तास्ता प्रसिद्धा.) अरातयः (=शत्रवः) ससन्तु (=निद्रां कुर्वन्तु), रातय (=बन्धवो) बोधन्तु (=बुध्यन्तां=जागृता सन्तु) । तु (=तथापि) हे तुविमघ (=प्रभूतधनवन्) इन्द्र, [त्व] नः (=अस्मान्) शुभ्रिषु (=शोभनेषु) सहस्रेषु (=सहस्रसख्याकेषु) गोषु अश्वेषु [च] [विषयेषु] (=एतान् अस्मभ्य दत्त्वा) आशासय (=प्रख्यापय) ॥

उखळा मुसळासारिख्या क्षुल्लक देवताकडेस त्यांनीं का केली असती बरे?

२. 'काद्यासिद्धींच्या नायका'='वाजानां पते.' 'वाज' म्हणजे अन्न, शक्ति, प्रताप इ०—'हे पराक्रमी'='शचीव'. 'शची' म्हणजे पराक्रम, पराक्रमाचें कांहीं तरी कृत्य. इंद्र हा आपल्या उपासकांसाठीं वगैरे पराक्रम करितो म्हणून त्यास शचीवान् अथवा शचीपति असें वेदांत प्रथम म्हणत उदाहरण —"उत त्या तुर्वशा यदू अस्नातारा शचीपति इन्द्रो विद्वानपारयत्" ऋ ४ ३० १७; "इन्द्र कुत्सो वृत्रहणं शचीपतिं काटे निबाळ्हः ऋषिरह्वत्" १. १०६ ६ इत्यादि अनेक प्रयोग आहेत. परतु मागाहून 'शचीपति' या शब्दाचा खरा अर्थ काय आहे तो विसरून 'शचींचा म्हणजे पराक्रमांचा प्रभु' असे न करिता 'शचीचा नवरा' असें समजू लागले. नतर 'शची' ही कोण असा सहजच प्रश्न निघाला. तेव्हां शची म्हणून इंद्राची बायको होती, तिचा विवाह इंद्राशीं झाला आणि त्याला मग जयत पुत्र झाला इत्यादिक कथा उत्पन्न होऊन पुराणांतरीं अंतर्गत झाल्या.

३. अन्योन्यदर्शी [त्या] दोघी [बाया]स निजीव, [त्या] निजू दे, [आणि] त्यास जागृत होऊं देऊं नको हे विपुलसपत्तिमान् इंद्रा, हजारो उत्तम गाई [आण] घोडे [हे आम्हास देऊन] त्या विषयीं आम्हास प्रख्यात कर

४. ते शत्रू निजोत, [आणि] हे शूर [इंद्रा], मित्र जागोत हे विपुलसपत्तिमान् इंद्रा, हजारो उत्तम गाई [आणि] घोडे [हे आम्हास देऊन] त्याविषयीं आम्हास प्रख्यात कर.

3 Send to sleep the two females that see each other, let them sleep, and not be wakeful Cause us to be renowned Indra of plentiful wealth, about thousands of excellent cows [and] horses [by giving these unto us]

4 May the foes sleep, [and] brave [Indra], may the friends be wakeful Cause us to be renowned, Indra of plentiful wealth, about thousands of excellent cows [and] horses [by giving these unto us]

---

३ या मंत्रांत अन्योन्यदर्शी दोघी बाया म्हणजे कोण याविषयीं सायणाचार्य कांहीं सांगत नाहींत मात्र त्या यमाच्या दूती होत इतकेंच म्हणतात

४ शत्रूंचा नाश होओ आणि मित्रांचा जय होओ असें या मंत्राचें तात्पर्य आहे 'राति' म्हणजे अक्षरशः 'जो देतो तो'= दाता,' आणि 'अराति' म्हणजे 'जो देत नाहीं तो'= कृपण' या मंत्रांत ते शत्रू' असें आहे ते' कोण? देवांस हवि 'न देणारे' म्हणजे आर्य नव्हेत ते अनार्य लोक, जे आर्यधर्मप्रमाण न चालणारे, दस्यु म्हणजे भिल, खोंड वगैरे, असें दिसते आणि या म्हणण्यास पुढच्या मंत्रावरून बळकटी येते

समिन्द्र गर्दभं मृण नुवन्तं पापयामुया ।
आ तू न इन्द्र शंसय गोष्वश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ ॥ ५ ॥
सम् । इन्द्र । गर्दभम् । मृण । नुवन्तम् । पापया । अमुया ।
आ । तु । नः । इन्द्र । शंसय । गोषु । अश्वेषु । शुभ्रिषु । सहस्रेषु ।
तुविऽमघ ॥ ५ ॥
पताति कुण्डृणाच्या दूरं वातो वनादधि ।
आ तू न इन्द्र शंसय गोष्वश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ ॥ ६ ॥
पताति । कुण्डृणाच्या । दूरम् । वातः । वनात् । अधि ।
आ । तु । नः । इन्द्र । शंसय । गोषु । अश्वेषु । शुभ्रिषु । सहस्रेषु ।
तुविऽमघ ॥ ६ ॥

भाषार्थम्.

५. हे इन्द्र, अमुया पापया (=एवं निकृष्टेन प्रकारेण=अतिनिकृष्टेन प्रकारेण) [त्वा] नुवन्तं (=स्तुवन्तं) गर्दभं (=गर्दभसमानं मनुष्यं) संमृण (=सम्यक् मारय)। तु (=तथापि) हे तुविमघ (=प्रभूतधनवन्) इन्द्र, [त्वं] नः (=अस्मान्) शुभ्रिषु (=शोभनेषु) सहस्रिषु (=सहस्रसंख्याकेषु) गोषु अश्वेषु [च] [विषयेषु] (एतानस्मभ्य दत्त्वा) आशंसय (=प्रख्यापय) ॥

६. [हे इन्द्र], वात, कुण्डृणाच्या (=कुटिलगत्या) वनादधि (=अरण्यदेशादप्यधिकं) दूरं पततु। तु (=तथापि) हे तुविमघ (=प्रभूतधनवन्), इन्द्र, [त्वं] नः (=अस्मान्) शुभ्रिषु (=शोभनेषु) सहस्रिषु (=सहस्रसंख्याकेषु) गोषु अश्वेषु [च] [विषयेषु] (=एतानस्मभ्य दत्त्वा) आशंसय (=प्रख्यापय) ॥

५. हे इंद्रा, इतक्या वाईट रीतीनें स्तवन करणाऱ्या गाढवास मारून टाक. हे विपुलसंपत्तिमान् इंद्रा, हजारो उत्तम गाई [आणि] घोडे [हे आम्हांस देऊन] त्यांविषयीं आम्हांस प्रख्यात कर.

६. [हे इंद्रा], वादळ वाकडें वांकडें जाऊन दूर पळो आणि अरण्यापलीकडे जाओ. हे विपुलसंपत्तिमान् इंद्रा, हजारो उत्तम गाई [आणि] घोडे [हे आम्हांस देऊन] त्याविषयीं आम्हांस प्रख्यात कर.

5. Indra, strike down the ass that praises [thee] so badly. Cause us to be renowned, Indra of plentiful wealth, about thousands of excellent cows [and] horses [by giving these unto us].

6. Indra, may the whirlwind fly far away crookedly beyond the forest Cause us to be renowned, Indra of plentiful wealth, about thousands of excellent cows [and] horses [by giving these unto us].

---

५. ह्या मंत्रांत 'इंद्राची स्तुती न करितां निंदा करणारा अनार्य मनुष्य गाढव होय त्याला मारून टाक' अशी मंत्रवक्त्याची प्रार्थना आहे.

'इतक्या वाईट रीतीनें'='पापया अमुया' म्हणजे फार वाईट रीतीनें असें तात्पर्य आहेसें वाटतें. 'पापया' आणि 'अमुया' हीं दोन्हीं क्रियाविशेषणें होत. 'अमुया' म्हणजे 'अशा प्रकारें', 'असें', 'याप्रमाणें.' "मा मातरममुया पत्तवे क." ऋ. ४. १८. १, "नद न भिन्नममुया शयानम्" १. ३२. ८. आणि 'अस्' किंवा 'भू' या धातूच्या संयोगीं 'अमुया' म्हणजे 'नाहींसें होणें,' 'व्यर्थ जाणें,' 'तोंड काळें करणें'; जसें, "आ देवास्त्वमुया भवन्तु" अथर्ववेद ५ २२. १, "मामुया भूवम्" शतपथ ब्रा. १. ६. ३. १७, "यथेद नामुयासत्" ७ ४. ५., "यद्दैतस्मो योनिमतिरिच्यतेमुया तद्भवति" ६. ३. ३. २६; १. ७. २. १३. १४; ३. ८. २. २८.

'पापया' हेंहि क्रियाविशेषण असून 'वाईट रीतीनें' अशा अर्थाचें आहे. जसें—"विजानिर्यत्र ब्राह्मणो रात्रिं वसति पापया" अ. ५. १७. ८; "यत्रेरिम पापया" ७. ६५. २.

'पापयामुया' म्हणजे 'इतक्या वाईट रीतीनें किंवा प्रकारानें' या अर्थी क्रियाविशेषण असल्याविषयीं उदाहरणें.–ऋ. १०. ८५. ३० "चरन्तं पापयामुया"; "अथ किं पापयामुया पुच्छे विभर्ष्यर्भकम्" अ. ७. ५६. ६.

६. 'वादळ अथवा वावटळ जी वांकडी वांकडी चालत आमच्या ओंगावर येते ती तशीच वांकडी वांकडी जाऊन, पळून जाओ, आणि अरण्याच्या पलीकडे नाहींशी होओ' असा भावार्थ आहे.

आमच्या ओंगावर वावटळ येऊं नये

सर्वं परिक्रोशं जहि जम्भया कृकदाश्वम् ।
आ तू न इन्द्र शंसय गोष्वश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ ॥ ७॥

॥ २७ ॥

सर्वम् । परिऽक्रोशम् । जहि । जम्भय । कृकदाश्वम् ।
आ । तु । नः । इन्द्र । शंसय । गोषु । अश्वेषु । शुभ्रिषु । सहस्रेषु ।
तुविऽमघ ॥ ७ ॥ २७ ॥

भाषायाम्.

७ [हे इन्द्र], सर्वं परिक्रोशम् (=अस्मद्विषये आक्रोशकर्तारं सर्वं पुरुषं) जहि (=मारय), [सर्वं] कृकदाश्वम् (=अस्मद्विषये हिंसाप्रद शत्रु) जम्भय (=मारय) । तु (=तथापि) हे तुविमघ (=प्रभूतधनवन्) इन्द्र, [त्वं] नः (=अस्मान्) शुभ्रिषु (=शोभनेषु) गोषु अश्वेषु [च] [विषयेषु] (=एतानस्मभ्य दत्त्वा) आशंसय (=प्रख्यापय) ॥

अशाविषयीं इंद्राची प्रार्थना ऋषीनें केली हें योग्यच होय कारण इंद्र हा वादळे आणणे, अथवा नाहींशी करणें, पाऊस आणणे अथवा नाहींसा करणें या-विषयींचा अधिकारी देवच आहे म्हणू-न अनाथ मनुष्यानें त्या इंद्रदेयाची प्रार्थना करणे ह जसें युक्त आहे तसें सुंदरहि आहे. पण असा प्रश्न निघतो की, नुसती वावटळ आंगावर येऊं नये इतक्याचसाठीं ज्यास इंद्राची मोठी वि-नवणी करावी लागे, त्या पुरातन ऋषींनी तप केलें म्हणजे इंद्रास भीति पडे आणि त्यांच्या आशीर्वादानें सूर्य उगवेल आणि शापानें जळून जाईल अशी शक्ति त्यांस होती या कथेचा काय परिणाम?

---

७. [आम्हांस] शिव्या देणारा [जो जो म्हणून असेल त्या त्या] प्रत्येकास मारून टाक, [आणि] [आमचें] वाईट करणाऱ्या प्रत्येक दुष्टाचा नाश कर. हे विपुलसंपत्तिमान् इंद्रा, हजारो उत्तम गाई [आणि] घोडे [हे आम्हांस देऊन] त्यांविषयीं आम्हांस प्रख्यात कर.

7. Strike dead every reviler [and] destroy the wicked demon. Cause us to be renowned, Indra of plentiful wealth, about thousands of excellent cows [and] horses [by giving these unto us].

७. या ऋचेंत दोन गोष्टींविषयीं मागणें आहे. १–जो शिव्या देतो म्हणजे आम्हांविषयीं वाईट बोलतो त्यास मारून टाक, आणि २–जो आम्हांविषयीं वाईट करितो त्याला मारून टाक. अनाथ मनुष्यांनीं या जगांतील साधुद्वेष्ट्यांपासून आपलें वाईट होऊं नये म्हणून इंद्रापाशीं प्रार्थना करणें हें उत्तम आहे, मग असें मागण्यापेक्षां मला शिवी देणाऱ्या आणि माझें वाईट करणाऱ्या शत्रूला क्षमा करण्याची इच्छा आणि शक्ती मला दे असें मागितलें असतें तर बरें झालें असतें हा मार्ग उत्तम आहे तरी एक वेगळा आहे. परंतु पुनः आमच्यानें विचारल्याशिवाय राहवत नाहीं (कारण ह्या ब्रह्मतापाच्या कथा आम्ही घडोघडीं ऐकितों) कीं जर या तपोराशी ऋषींला केवळ शापद्वारानें पाहिजे त्याला मारण्याची आणि पाहिजे त्याला तारण्याची शक्ति सहज होती, तर शिवी देणाऱ्यापासूनहि त्यांस आपला बचाव आपल्याच्यानेंच कां करवत नसे?

आतां हें सूक्त संपलें. विचार करून पाहतां यूपबद्ध स्थितींत हें शुनःशेपानें म्हटलें असेल असें वाटत नाहीं हें पुनः सांगावयास नकोच.

सूक्तम् ३०.

अजीगर्तपुत्रः शुनःशेप ऋषिः। देवता–१–१६ इन्द्रः। १७–१९ अश्विनौ। २०–२२ उषाः। छन्दः–१–१०, १२–१५, १७–२२ गायत्री। ११ पादनिचृद्गायत्री। १६ त्रिष्टुप्॥

आ व इन्द्रं क्रिविं यथा वाजयन्तः शतक्रतुम्।
मंहिष्ठं सिञ्च इन्दुभिः॥ १॥

आ। वः। इन्द्रम्। क्रिविम्। यथा। वाजऽयन्तः। शतऽक्रतुम्।
मंहिष्ठम्। सिञ्चे। इन्दुऽभिः॥ १॥

शतं वा यः शुचीनां सहस्रं वा समाशिराम्।
एदु निम्नं न रीयते॥ २॥

शतम्। वा। यः। शुचीनाम्। सहस्रम्। वा। समऽआशिराम्।
आ। इत्। ऊम् इति। निम्नम्। न। रीयते॥ २॥

भाषायाम्.

१. वाजयन्तः (=अन्नादिसंपदमिच्छन्तो) [वयं] वः (=युष्माकं) शतक्रतुं (=शतप्रज्ञं) मंहिष्ठम् (=अतिशयेन प्रवृद्धम्) इन्द्रं, क्रिविं यथा (=कूपमिव), इन्दुभिः (=सोमैः) आसिञ्चे (=पूरयामि=पूरयामः)॥

२. य [इन्द्रः] शुचीनां (=शुद्धानाम्=अमिश्रितानां) [सोमानां] शतं [प्रति] वा समाशिरां (=भक्षणाख्यद्रव्येण मिश्रितानां) [सोमानां] सहस्रं [प्रति] वा, निम्नं न (=निम्नप्रदेशम् आप इव), आ इत् उ रीयते (=आगच्छत्येव=धावत्येव)॥

सूक्त ३०.

ऋषि—पूर्ववत्. देवता—१-१६ इंद्र, १७-१९ अश्वी, २०-२२ उषा वृत्त—गायत्री, परंतु ११ ची पादनिचृत् गायत्री, आणि १६ ची त्रिष्टुभ्

१. संपत्तीची इच्छा करणारे [असे आम्ही] शतप्रज्ञ [आणि] परम मोठा [जो] तुमचा इंद्र [त्या]स, कूपा[ला भरिल्या] प्रमाणे, सोमरसानीं भरितों;

२. जो [इंद्र] शतशः शुद्ध [सोमरसा]कडे अथवा सहस्रशः दुग्धमिश्रित [सोमरसा]कडे, खोलगटात [पाणी] [धावल्या]प्रमाणे धावत असतो

HYMN 30

To *Indra* (1 16), *the As'vins* (two gods mounted on horseback) (17-19), *Ushas* (Dawn) (20 22) Author as before Metre—*Gâyatri*, but of 11 the *Pâdanichrit Gayatri*, and of 16 the *Trishtup*

1 Desirous of wealth [we] fill with Soma juices your mightiest Indra of hundred wisdoms, like a well,

2 who runs to a hundred pure [Somas] or to a thousand [Somas] mixed with milk, as [water runs] to a low place

---

१ ऐतरेय ब्राह्मणास अनुसरून सायणाचार्य म्हणतात का, हेंहि सूक्त यूपबद्ध शुन शेपानेंच रचून म्हटलें परंतु तसें नसावें याविषयीं आमचा आमचाच पूर्वीच्या सूक्ताच्या संबधानं आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे त्याप्रमाणेंच या सूक्ताविषयीहि आहे सूक्त तर शुन शेपकृत असेलच, पण शुन शेपाला जे महासंकट प्राप्त झालें होतें असे म्हणतात त्या प्रसंगीं संकटनिवृत्तीसाठी रचिलें असा संभव नाहीं त्याचा कारणें आम्हा पूर्वी सांगितली आहेत

या पहिल्या ऋचेंत अर्थाविषयीं थोडीशी अडचण आहे ती ही कीं, 'धन नीची इच्छा करणारे', (वाजयन्त)हें अनेकवचनी असून 'भरितों' या अर्थी 'आसिञ्चे' हे जे क्रियापद आहे तें एकवचनी आहे परंतु अशा प्रकारचे लिंगव्यत्यय वेदांत आढळतात वस्तुत 'वाजयन् [अहम्] आसिञ्चे' (='धनाची इच्छा करणारा असा जो मी तो भरितों') असाच एकवचनी प्रयोग विवक्षित आहे

'तुमचा इंद्र तुमचा म्हणजे मंत्रवक्त्याच्या जवळ जे कोण असतील आणि इंद्राविषयीं मनात्स्वपापाशी मोठी श्रद्धा धरीत असतील त्यांचा 'ज्याविषयीं तुम्ही इतकी प्रशंसा करिता तो इंद्र' असा भावार्थ

'कूपा[स भरिल्या]प्रमाणें सोमरसानीं भरितो,' म्हणजे इंद्राच्या उदरांत इतका सोम घालितों का, तो जणु काय एक

सं यन्मदाय शुष्मिणं एना ह्यस्योदरे ।
समुद्रो न व्यचो दधे ॥ ३ ॥

सम् । यत् । मदाय । शुष्मिणे । एना । हि । अस्य । उदरे ।
समुद्रः । न । व्यचः । दधे ॥ ३ ॥

भाषार्थम्

३ यत् [सोमानां शतं वा सहस्रं वा] शुष्मिणे मदाय (=शुष्मिणमिन्द्र मादयितु), समुद्रो न (=यथा) [व्यचो = विस्तृतत्वं] [सधत्ते], एना हि (=तथैव) अस्य [इन्द्रस्य] उदरे व्यच सदधे (=विस्तृतत्वं प्राप्नोति) ॥

कूप बनून जाईल इद्राला पुष्कळ सोम अर्पण करितों' असे तात्पर्य

२ मत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'इद्राला सोम फार आवडत असतो, आणि जरी एकच वेळीं शेंकडो अथवा हजारो ठिकाणीं उपासक लोक सोम अर्पण करीत असले, मग तो नुस्ता असो अथवा दध मिसळून विशेष रुचकर केलेला असो, तथापि त्या सर्व ठिकाणीं तो तो सोम पिण्यासाठा इद्र इतक्या उत्सुकतेनें आणि त्वरेनें धांवत जात असतो कीं, तो जणु काय खोल प्रदेशाकडे वाहत जाणारा उदकप्रवाहच होय'

पूर्वोक्त मत्रांत इद्रास पुष्कळ सोम अर्पण करितों असें जें सांगितलें त्याचा हेतु या मत्रांत आहे असे समजावें सोम पिण्याविषयीं इद्र फार उत्सुक आहे वास्तव मी त्यास पुष्कळ सोम पाजितो असें दोन्ही मत्रांचे तात्पर्य

३. जे [शेकडो आणि हजारो सोमरस] प्रचंड [इद्रा]ला माद उत्पन्न करण्याकरिता, समुद्र जसा [पसरतो], तसे त्याच्या उदरात पसरतात.

3 which [hundreds and thousands of Somas] spread themselves in his stomach in such manner as the sea, that the mighty [Indra] may be intoxicated.

---

३. मत्राचे तात्पर्य असे आहे कीं, 'इद्र जे अनेक ठिकाणचे विपुल सोम पितो, ते त्याच्या पोटांत समुद्राप्रमाणें पसरतात, आणि मग महाबळी इद्रास माद प्राप्त होतो'.

* इद्र जो सोम पितो तो फार असतो असें विवक्षित असतें तेव्हां त्याला समुद्राची उपमा वेदांत पुष्कळ ठिकाणीं दिलेली आढळते

* 'प्रचंड [इद्रा]ला माद उत्पन्न करण्याकरितां'=मदाय शुष्मिणे' अक्षरश अर्थ, 'प्रचंड [इद्रा]ला मादाकरितां,' म्हणजे इद्राला माद यावा म्हणून यासारिखे दुसरे प्रयोग वेदांत पुष्कळ येतात जसें —"स्वादिष्ठया मदिष्ठया पवस्व सोम धारया। इन्द्राय पातवे सुत ", यांत 'इन्द्राय पातवे' हा अकर्मणि प्रयोग वरच्या सारिखाच आहे 'स्तोम उक्थ च शस्या । इन्द्राय सोमपीतये" ऋ १ ८ १० इत्यादि उदाहरणें आहेत

'समुद्र जसा पसरतो'=समुद्रो न व्यच सदृधे' हा अर्थ सायणाचार्यास अनुसरूनच आम्हीं केला आहे पण 'व्यच सदृधे' म्हणजे व्याप्ती धारण करितो'='पसरतो' असें म्हणण्यापेक्षां 'व्याप्ती आकुंचित करून धारितो'='जमा होतो', 'एकत्र होतो' 'पुष्कळ असून थोडक्या स्थळांत मावतो' असा अर्थ शब्दांवरून चांगला समवतो

'तसें'=एना (ह' 'एना' हें येथ तृतीयान्त क्रियाविशेषण यामकारें करून' अशा अर्थी आहे

अयमु ते समतसि कपोत इव गर्भधिम् ।
वचस्तच्चिन्न ओहसे ॥ ४ ॥

अयम् । ऊम् इति । ते । सम् । अतसि । कपोतःऽइव । गर्भऽधिम् ।
वचः । तत् । चित् । नः । ओहसे ॥ ४ ॥

भाषार्थम्.

४. [हे इन्द्र], अयमपि [अस्माभिरर्प्यमाणः] [सोम] ते (=तव) [अस्ति]। [त्], कपोतो गर्भधिं (=कपोतीम्) इव, [त्वं] समतसि (=सगच्छसे)। तच्चित् (=तदेव) नो वचः [त्वम्] ओहसे (=प्रन्यसे=जानीषि)॥ ४

४. [हे इंद्रा,] हाहि [सोमरस] तुझा [आहे]; कपोत [पक्षी] [आपल्या] मादीजवळ [विहार करितो] तसा [तूं ह्या सोमाजवळ] विहार करितोस, [आणि] तेव्हांच [तूं] आमचें वचन ऐकितोस.

4. [And] this [Soma] too,[Indra], is thine. Thou revellest with it as [does] the pigeon with [his] mate. Then [and then] only dost thou mind our prayer.

४. वरच्या दोन तीन मंत्रांत इंद्र अनेक ठिकाणीं लोकांनीं अर्पिलेला सर्व सोम पितो असें सांगितलें. या मंत्रांत मंत्रवक्ता म्हणतो कीं, 'आम्ही जो हा येथें अर्पण करीत आहों हाहि सोम तुझाच आहे त्याजवर तुझी इतकी प्रीति आहे कीं, जसा एकादा पारवा आपल्या मादीला मिळून मोठ्या आनंदानें रमतो तसा या सोमाशीं तूं रमतोस. आणि तसा आनंद तुला झाला म्हणजेच आमच्या प्रार्थनेकडे तूं लक्ष्य देतोस. म्हणूनच हा तुला आम्ही अर्पण करीत आहों.'

या मंत्रावरून ऋषीच्या मतें सोमावर इंद्राचें प्रेम किती आहे आणि तो अर्पण केल्याशिवाय इंद्रास आनंद होत नाहीं आणि तसा आनंद झाल्यावरच इंद्र प्रसन्न होत असतो या गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. वेदांत सोमाचें माहात्म्य जसें आहे तसें फारकरून दुसऱ्या कशाचेंच नाहीं.

कपोताची म्हणजे पारव्याची जी उपमा येथें दिली आहे ती फार सुंदर आहे यांत संशय नाहीं. कारण कीं, पारवा कामातुर असला म्हणजे मादीजवळ कसा नाचतो ते सर्वांस ठाऊक आहेच. कुमारसंभवांत कालिदासानेंहि त्या स्थितींत असलेल्या पारव्याविषयीं फार सुंदर वर्णन केलें आहे, ते असें.—

तथाविधेऽनङ्गरसप्रसङ्गे
मुखारविन्दे मधुपः प्रियायाः ।
सम्भोगवेश्म प्रविशन्तमन्त-
र्ददर्श पारावतमेकमीशः ॥ १ ॥
सुकान्तकान्तामणितानुकारं
कूजन्तमाघूर्णितरक्तनेत्रम् ।
प्रस्फारितोन्नम्रविनम्रकण्ठं
मुहुर्मुहुर्न्यञ्चितचारुपुच्छम् ॥ २ ॥
विशुद्धमुग्धं पक्षतियुग्ममीष-
द्दधानमामन्दगतिं मदेन ।
शुभ्रांशुवर्णं जटिलाग्रपाद-
मितस्ततो मण्डलकैश्चरन्तम् ॥ ३ ॥
सर्ग ९

'मादीजवळ'='गर्भधिम्.' हा अर्थ आम्हीं सायणास अनुसरून दिला आहे. पण 'गर्भधि' म्हणजे 'घरटें' असाहि अर्थ संभवतो. आणि तसा अर्थ केला तरी उपमेला अडचण येईल असें दिसत नाहीं. कारण कपोताचा विहार बहुतकरून त्याच्या घरट्याजवळ होत असतो.

स्तोत्रं राधानां पते गिर्वाहो वीर यस्य ते ।
विभूतिरस्तु सूनृता ॥ ५ ॥ २८ ॥

स्तोत्रम् । राधानाम् । पते । गिर्वाहः । वीर । यस्य । ते ।
विऽभूतिः । अस्तु । सूनृता ॥ ५ ॥ २८ ॥

ऊर्ध्वस्तिष्ठा न ऊतयेऽस्मिन्वाजे शतक्रतो ।
समन्येषु ब्रवावहै ॥ ६ ॥

ऊर्ध्वः । तिष्ठ । नः । ऊतये । अस्मिन् । वाजे । शतक्रतो इति शतऽक्रतो ।
सम् । अन्येषु । ब्रवावहै ॥ ६ ॥

भाषायाम्.

५ हे राधानां पते (=धनानां स्वामिन्), हे गिर्वाहः (=स्तुतिहव्य), हे वीर [इन्द्र], यस्य ते (=तव) [अस्मत्कृत] स्तोत्रं [विभूतिः=प्रभूतम् अस्ति] [तस्य तव] सूनृता (=प्रसादो) विभूतिः (=प्रभूता) अस्तु ॥

६ हे शतक्रतो (=शतप्रज्ञ) [इन्द्र], [त्वं] नः (=अस्माकम्) ऊतये (=संरक्षणाय) अस्मिन् वाजे (=संग्रामे) ऊर्ध्वस्तिष्ठ (=उत्तिष्ठ=सिद्ध पर्याप्तो भव), [येन] [आवाम्] अन्येषु [वाजेषु] संब्रवावहै (=परस्पर संभाषण करवावहै) ॥

५. हे संपत्तींच्या प्रभू, हे स्तवनपूजिता, हे वीरा [इंद्रा], ज्यापेक्षां तुला अर्पण केलेलें स्तोत्र [सुंदर असतें] त्यापेक्षा [तूं] प्रसाद [देशील तोहि] सुंदर असो.

६. हे शतप्रज्ञ [इंद्रा], या संग्रामात आमच्या संरक्षणासाठीं [तूं] उभा राहा, [कीं जेणेंकरून] आम्ही उभयता दुसऱ्या [संग्रामां]च्या प्रसंगीं परस्पर संभाषण करूं.

5. O [Indra], lord of riches, O god whose offering consists of prayers, O hero, in as much as thy praise [is glorious], may [thy] gift be glorious.

6. Stand up, O [Indra] of hundred wisdoms, to protect us in this battle, [so that] we may both converse together in others.

---

५. या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'हे इंद्रा, तुझी स्तुती आम्ही करितों ती जशी सुंदर आणि विपुल असते तशी तूं आम्हास देणगी देशील तीहि सुंदर आणि विपुल असो.'

'स्तवनपूजिता'='गिर्वाहः'=गीः वाहः यस्य. 'वाहः' म्हणजे पूजा अथवा हव्य जें देवास अर्पण करावयाचें तें, आणि 'गीः' म्हणजे स्तुति, स्तवन. वाहः म्हणजे हव्य याविषयीं उदाहरणें, "शंसावाध्वर्यो प्रति मे गृणीहि इन्द्राय वाहः कृणवाव जुष्टम्" ऋ. ३. ५३. ३; "इन्द्र ..ते ...कदाहो अर्वागुप मा मनीषा आ त्वा शक्यामुपमं राधो अन्नैः" ऋ. १०. २९. ३. सायणाचार्य 'वाणींनी वाहून नेलेला' असा अर्थ करितात. पण त्याचें हृद्य समजत नाहीं.

'तुला अर्पण केलेलें स्तोत्र'='ते स्तोमम्.' अक्षरशः अर्थ 'तुझें स्तोत्र' असा आहे, म्हणजे तुला जें आम्ही स्तवून अर्पण करितों तें.

'सुंदर'. हा अर्थ आम्हीं 'विभूति' याचा केला आहे 'विभूति' हें आरंभीं नाम होतें तरी ऋग्वेदांत त्याचा विशेषणार्थी प्रयोग आढळतो. जसें—"रयिर्विभूतिरीयते वचस्या"='भव्य संपत्ती मागितली आहे.' (ऋ. ६.२१.१.) "महान्ता मह्ना विभ्वो विभूतयो दूरेदृशो ये (=मरुतः)" ऋ. १. १६६. ११. "महामनूनं तवसं विभूतिं मत्सरासो जर्हृषन्त प्रसाहम्" (=इन्द्रम्) ऋ. ६. १७. ४.

'प्रसाद'='सूनृता.' सूनृता याचा मूळ अर्थ 'मधुर आणि अंतःकरणापासून बोललेलें वचन.' अर्थात् 'वर'. म्हणजे तशा वचनावरून अथवा तें बोलून कांहीं तरी देणगी द्यावयाची ती. सूनृता म्हणजे प्रसाद या अर्थाविषयीं प्रयोगांतरांचे दाखले वेदांत अनेक आहेत.

६. हा मंत्र जरी सोपा आहे तरी त्याच्या शेवटच्या चरणाचा भावार्थ स्पष्ट समजत नाहीं 'हे इन्द्रा, तूं या संग्रामांत म्हणजे युद्धांत आम्हांस रक्षण्यास तयार हो, कीं जेणेंकरून दुसऱ्या युद्धाच्या प्रसंगीं तूं आणि मी परस्पर संवाद करूं' असें म्हणावयाचें तर ठीक. पण

योगेयोगे तवस्तरं वाजेवाजे हवामहे ।
सखाय इन्द्रमूतये ॥ ७ ॥
योगेऽयोगे । तवःऽतरम् । वाजेऽवाजे । हवामहे ।
सखायः । इन्द्रम् । ऊतये ॥ ७ ॥
आ घा गमद्यदि श्रवत्सहस्रिणीभिरूतिभिः ।
वाजेभिरुप नो हवम् ८ ॥
आ । घ । गमत् । यदि । श्रवत् । सहस्रिणीभिः । ऊतिऽभिः ।
वाजेभिः । उप । नः । हवम् ॥ ८ ॥

भाषायाम्.

७. योगेयोगे (=तत्तत्कर्मणि) वाजेवाजे (=तस्मिंस्तस्मिन्संग्रामे) [च] तवस्तरम् (=अतिशयेन बलिनम्) इन्द्रम् ऊतये (=संरक्षणार्थं) [तस्य] सखायो [वय] हवामहे (=आह्वयामहे) ॥

८ यदि (=यदैव) [इन्द्रः] [अस्माकमाह्वान] श्रवत् (=शृणुयात्=श्रोष्यति) [तदैव] सहस्रिणीभिः (=सहस्रसंख्याकाभि) ऊतिभि (=साहाय्यसाधनै.) वाजै (=धनैश्च) [च] [सह] नो हवमुप (=आह्वानसमीपम्) आगमत् घ (=आगमिष्यत्येव) ॥

तू आणि मी परस्पर संवाद करूं म्हणजे काय? आणि या युद्धांत मंत्रवक्त्याचें संरक्षण इंद्रानें केलें तर दुसऱ्या युद्धांत संवाद करण्यांत काय विशेष आहे? परंतु असा भावार्थ दिसतो कीं, 'या प्रसंगीं जर तू आम्हांस रक्षिलें नाहींस तर आम्ही मरून जाऊं आणि दुसऱ्या युद्धांत 'हे इंद्रा, आम्हांस वांचीव' असा धावा तुझा कोणी करणार नाहीं आणि 'हां आलों, भिऊं नका' असें आश्वासन देण्यास तुला जागा राहणार नाहीं '

या सूक्ताचा वक्ता शुनःशेप हा ब्रह्मर्षि म्हणजे ब्राह्मणकुलांतील ऋषि होता तरी 'आमच्या या युद्धांत तू आमचें रक्षण कर' अशी इंद्राची स्तुती तो करितो ही लक्ष्यांत ठेवावी कारण ब्राह्मण दोन गोष्टीचा निर्णय होतो. एक ही कीं, पूर्वीचे ऋषि आपल्या तपोबळानें पाहिजे ते करूं शकत अशी जी आळीकडील समजूत आहे, ती निराधार आहे, नाहीं तर या ऋषीस इंद्राची स्तुति दीन होऊन करावी लागली नसती दुसरी गोष्ट ही कीं, ब्राह्मणांनीं केवळ स्नानसंध्या जपतप करून राहावें आणि क्षत्रियांनीं लढावें असे जे धर्म आलीकडे लावून दिले आहेत असें म्हणतात त्याला वेदांत कांहीं आधार नाहीं, असता तर या सूक्ताच्या कर्त्यांचें रक्षण 'युद्धांत' करावें अशी इंद्राची प्रार्थना करावी लागली नसती पुढचा मंत्रहि पाहा. त्यावरून पूर्वी ब्राह्मण लढत आणि निर्बळ मनुष्यांप्रमाणें दुसऱ्यांनीं (क्षत्रियांनीं) आमचा बचाव करावा असें म्हणून राहत नसत हे स्पष्ट होईल.

७. प्रत्येक कार्मी, प्रत्येक संग्रामीं महापराक्रमी इंद्रास [त्याचे] सखे [आम्ही] [आमच्या] संरक्षणासाटीं बोलावितों

८ [तो] जेव्हा ऐकेल तेव्हा एकदम हजारो पाठबळ घेऊन [आणि] लुटा घेऊन [तो] आमच्या हाकेसरशीं येईल.

7. In every work, in every battle we [his] friends invoke the very mighty Indra for [our] protection

8 As soon as he shall hear he will come to our call with thousands of helps and booties

---

७ मंत्रवक्त्याचें म्हणणें असें आहे कीं, 'कोणतेंहि साधारण काम आम्ही हातांत घेतलें, अथवा कोणतीहि लढाई मारावयास गेलों, तरी महापराक्रमी जो इंद्र त्याला साहाय्यासाठीं आम्ही बोलावीत असतों' हें जें आमच्या पूर्वजांचें सर्व लहानमोठ्या प्रसंगीं देवावरच अवलंबन, पूर्वीचे ब्राह्मण युद्ध करीत, देवावर पूर्ण भरवसा राखीत आणि आम्ही सर्वज्ञ व सर्वशक्तिमान आणि पृथ्वीवरचे देवच आहों अशी खोटी व हानिकारक आणि अश्लाघ्य विकत्थना आजीकडे करूं लागले तशी करीत नसत या सर्व गोष्टींचा विचार करण्याजोगा आहे यांत संशय नाहीं

८ हा मंत्र किती सुंदर आणि प्रेमळ आहे पाहा प्रत्येक लहान मोठ्या कामांत आणि युद्धप्रसंगांत आम्ही इंद्राचा धांवा करितों इतकें देवावलंबन दर्शवून ऋषि उगीच बसत नाहीं पण आम्ही इंद्राचा धांवा करितांच तो हजारो मदती घेऊन आम्ही हाक मारीत असू तेथें येईल आणि लढाईंत आम्हांस यश मिळवून देऊन लढाईच्या अंतीं ज्या लुटी मिळावयाच्या त्या आम्हांस प्राप्त करून देईल असा भरवसा पूर्ण आहे असें या मंत्रांत ऋषि सांगतो या साध्या, उघड, प्रेमभरित, भाविक आणि दृढभक्तिक श्रुतीपेक्षां सुंदर ते काय म्हणावें ?

'एकदम' हा अर्थ 'आ घ गमत्' या शब्दांपासून आणि मंत्रांतील त्यांच्या स्थलापासून गम्यमान आहे

अनु प्रत्नस्यौकसो हुवे तुविप्रतिं नरम् ।
यं ते पूर्वं पिता हुवे ॥ ९ ॥

अनु । प्रत्नस्य । ओकसः । हुवे । तुविऽप्रतिम् । नरम् ।
यम् । ते । पूर्वम् । पिता । हुवे ॥ ९ ॥

तं त्वा वयं विश्ववारा शास्महे पुरुहूत ।
सखे वसो जरितृभ्यः ॥ १० ॥ २९ ॥

तम् । त्वा । वयम् । विश्वऽवार । आ । शास्महे । पुरुऽहूत ।
सखे । वसो इति । जरितृऽभ्यः ॥ १० ॥ २९ ॥

भाषायाम्.

९ [हे इन्द्र], [अस्माकं] प्रत्नस्य (=पुरातनस्य) ओकस (=कुलस्य) तुविप्रातं नरं (=बहून् शत्रून् प्रति गन्तारं योद्धारं वीरं) [त्वां] यं [मम] पिता पूर्वं हुवे (=जुहाव) [ते] ते (=त्वाम्) [अहमपि अधुना] अनुहुवे (=पितरमनु आह्वयामि) ॥

१० तं त्वा हे विश्ववार (=सकलधनयुक्त) [इन्द्र] हे पुरुहूत (=बहुभिराहूत), हे जरितृणां (=स्तोतॄणां) वसो (=प्रिय) सखे [इन्द्र], वयम् आशास्महे (=प्रार्थयामहे) ॥

९. [हे इंद्रा], [आमच्या ह्या] पुरातन घराण्याच्या अनेक शत्रूशीं लढणारा [जो] वीर [तू] [आणि] ज्या तुझा धावा पूर्वीं माझा बाप करीत असे त्या तुझा धावा आता मी करितो.

९. I too invoke thee, [Indra], who art the champion that didst fight many enemies of [our] ancient family, [and] whom [my] father used to invoke before

१०. तर हे सर्वसंपत्तियुक्त [इंद्रा], हे पुरुहूता, हे स्तोत्यांच्या प्रियसख्या, आम्ही तुला प्रार्थीत आहों

10. We, therefore, implore thee, [Indra], O source of all good things, O thou invoked by many, O dear friend of the poets

९. मन्त्रवक्त्याचा भावार्थ असा आहे कीं, 'आमच्या ह्या पुरातन घराण्याच्या अनेक शत्रूंचा पाडाव शूर इंद्रानें वेळोवेळीं केला आहे, व माझा बापहि प्रत्येक संकटाच्या वेळीं इंद्रास हाक मारीत असे वास्तव जसे माझे वाडवडील आणि माझा बाप हे हाक मारीत, तसाच मीहि आजच्या प्रसंगीं हाक मारीत आहें. तर इंद्रानें येऊन मला साहाय्य करावें' म्हणजे 'इंद्र हा आमच्या कुळाचा फार दिवसांपासून साहाय्यकर्ता मित्र आहे. वास्तव तो आम्हास या प्रसंगीं सोडणार नाहीं' हा आजचा प्रसंग म्हणजे कोणता त्याविषयीं अशी कल्पना करावयाची कीं, काहीं तरी मोठें संकट किंवा लढाईचा प्रसंग आला आहे, आणि त्याच्या संबधानें ऋषि बोलत आहे

या मंत्रांत जो 'ते' शब्द आहे त्याचा साधारणतः 'तुजकरितां' किंवा 'तुला' असा चतुर्थीचा किंवा षष्ठीचा अर्थ होतो. पण या ठिकाणीं आम्हीं सायणास अनुसरून 'तुला' असा द्वितीयेचा अर्थ केला आहे पण त्याविषयीं आम्हांस थोडासा संशय आहे सायणाप्रमाणें 'ते' ही द्वितीया न घेतली तर खालीं लिहिल्याप्रमाणे अर्थ संभवतो — '[हे यजमाना,] [तुझ्या ह्या] पुरातन घराण्याच्या अनेक शत्रूशीं लढणारा [जो] वीर [इंद्र], [आणि] ज्या [इंद्रा]चा धावा पूर्वीं तुझा बाप करीत असे त्या [इंद्रा]चा धावा आतां [तुजकरितां] मी करितो.' परंतु असा अर्थ केला तर मन्त्रवक्ता काय दुसऱ्या एकाद्या यजमानासाठीं हे सूक्त रचून म्हणतो आहे असें समजलें पाहिजे. परंतु पुढच्या मंत्रांत आरंभीं जे "तं त्वा वयम्......आशास्महे" असे शब्द इंद्राविषयीं आहेत त्यावरून प्रस्तुत मंत्रांतील "यं ते" हे दोन्ही शब्द "ज्या तुझा" या अर्थीं इंद्राविषयींच समजले पाहिजेत असें आम्हांस वाटतें.

१० 'तर......आम्ही तुला प्रार्थीत आहों'= 'तं त्वा वयमाशास्महे.' म्हणजे ज्याविषयीं पूर्वीच्या मंत्रांत सांगितलें त्या तुला इंद्राला; तू आमच्या कुळाचा जुना मित्र आहेस म्हणून

'सर्वसंपत्तियुक्त'='रेक्णस्' वार

अस्माकं शिप्रिणीनां सोमपाः सोमपाव्राम् ।
सखे वज्रिन् त्सखीनाम् ॥ ११ ॥

अस्माकम् । शिप्रिणीनाम् । सोमऽपाः । सोमऽपाव्राम् ।
सखे । वज्रिन् । सखीनाम् ॥ ११ ॥

तथा तदस्तु सोमपाः सखे वज्रिन् तथा कृणु ।
यथा त उश्मसीष्टये ॥ १२ ॥

तथा । तत् । अस्तु । सोमऽपाः । सखे । वज्रिन् । तथा । कृणु ।
यथा । ते । उश्मसि । इष्टये ॥ १२ ॥

रेवतीर्नः सधमाद इन्द्रे सन्तु तुविवाजाः ।
क्षुमन्तो याभिर्मदेम ॥ १३ ॥

रेवतीः । नः । सधऽमादे । इन्द्रे । सन्तु । तुविऽवाजाः ।
क्षुऽमन्तः । याभिः । मदेम ॥ १३ ॥

भाषायाम्.

११. हे सोमपा. (=सोमस्य पातः), हे वज्रिन् (=वज्रधर) सखे [इन्द्र], [तव] सखीनां (=सखिवत्प्रियाणां) सोमपाव्रां (=सोमस्य पातॄणाम्) अस्माकं शिप्रिणीनां (=दीर्घहनूयुक्तानां गवां) [सनूहस्त्वत्प्रसादादस्तु] ॥

१२. हे सोमपाः (=सोमस्य पातः) हे सखे वज्रिन्, [यत् किंचित्] यथा [करणाय] ते इष्टये (=त्वां प्रेरयितुं) [वयम्] उश्मसि (=उश्मः=इच्छामः) तत् तथा अस्तु (=भवतु), [तत्] [त्वं] तथा कुरु ॥

१३ इन्द्रे सधमादे (=अस्माभि सह सोमं पीत्वा मदयुक्ते) [सति], नः (अस्मभ्य) तुविवाजाः (=प्रभूतान्नयुक्ता) रेवती. (=रेवत्य.=सपद) सन्तु । याभिः [रेवतीभि.] क्षुमन्तः (=अन्नयुक्ताः) [वय] मदेम (=हर्षयुक्ता भवेम) ॥

म्हणजे अन्नादिक 'धन'. ऋ १. १२८

६. याजवरील सायणभाष्य पाहा.

'पुरुहूत' म्हणजे ज्याला पुष्कळ जण बोलावतात.

'स्तोत्यांच्या प्रियसख्या'='सखे वसो जरितृभ्यः'. म्हणजे जे स्तोते अथवा उपासक इंद्राची स्तुती म्हणजे स्तवनादिकेंकरून भक्ती करितात त्यांचा तो प्रियसखा होय, म्हणजे त्यांच्यावर तो प्रिय मित्राप्रमाणे वागतो.

११. हे सोमपान करणाऱ्या, हे सख्या, हे वज्रधरा, सोमपान करणारे जे [तुझे] सखे आम्ही, त्या आम्हास सुंदर [गाई प्राप्त होओत]

११. हे सोमपान करणाऱ्या सख्या, हे वज्रधरा, जें करण्याविषयीं तुला उत्तेजन देण्यास आम्ही इच्छितों तें त्याप्रमाणें होओ, तें त्याप्रमाणें कर.

१३. इंद्र [हा] [आम्हां]सह पिऊन हर्ष पावल्यावर विपुल अन्नानें युक्त [अशा] संपत्ती आम्हास प्राप्त होओत, [कीं] जिहींकरून अन्नानें युक्त होत्साते [आम्ही] हर्ष पावूं.

11. O Soma-drinking friend, wielder of the thunder-bolt, [may there come plenty] of fair cows to us thy Soma-drinking friends!

12. May that come to pass, O Soma-drinking friend, wielder of the thunder-bolt, [and] cause thou it to pass in such manner as we wish to induce thee to do

13 When Indra has drank and become happy with [us], may we have [from him] riches with plenty of food, whereby delighting in [our] food we may rejoice.

---

११. या मंत्राचा अर्थ आम्हीं सायणाचार्यास अनुसरून केला आहे. परंतु 'गाई प्राप्त होओत' हे शब्द मूळांत नसतां अध्याहृत घ्यावे लागतात, आणि अशा प्रकारचे शब्द अध्याहृत घेणें म्हणजे कांहीं तरी निर्वाह करणें.

'सुंदर' याबद्दल 'शिप्रिणीनाम्' असे आहे त्याचा अर्थ कित्तिएक विद्वानांचे मतें 'शिप्रवताम्' असा आहे आणि तो पुल्लिंगी शब्द होय. तसें समजलें तर मग मंत्राचा अर्थ चांगला बसतो, तो असाः—

"शोभायमान सोमपान करणारे आणि तुझे सखे जे आम्ही, त्या आमच्या हे सोमपान करणाऱ्या सख्या वाग्धरा!" याचा संबंध खालच्या ऋचेशीं घ्यावयाचा.

या मंत्रांत 'सोमपाव्नाम्' हा शब्द महत्वाचा आहे. कां कीं अर्वाचीन काळीं सोम तयार करून देवांस मात्र अर्पण करीत, आर्यजन आपण पीत नव्हते असें कोणी म्हणेल तर त्याच्या विरुद्ध याचा दाखला देतां येईल.

१२. मंत्राचा भावार्थ असा कीं, 'हे इंद्रा, जी गोष्ट ज्या रीतीनें घडून आणण्याविषयीं तुझी प्रार्थना आम्ही करितों, ती गोष्ट तशी घडून येओ, आणि ती तूं तशी घडवून आण' यांतील प्रार्थना किती मनःपूर्वक आणि भाविक आहे पाहा. जर प्राचीन काळास झालेले सूर्यचंद्रांस पाळविण्याची आणि आशीर्वादानें रावाचा रंक आणि रंकाचा राजा करण्याची शक्ति असती, तर ते देवाची अशी नम्र प्रार्थना करतेना

आ घ त्वावान् त्मनाप्तस्तोतृभ्यो धृष्णवियानः ।
ऋणोरक्षं न चक्र्योः ॥ १४ ॥
आ। घ। त्वाऽवान्। त्मना। आप्तः। स्तोतृऽभ्यः। धृष्णो इति। इयानः।
ऋणोः। अक्षम्। न। चक्र्योः ॥ १४ ॥
आ यद्दुवः शतक्रतवा कामं जरितॄणाम् ।
ऋणोरक्षं न शचीभिः ॥ १५ ॥ ३० ॥
आ। यत्। दुवः। शतक्रतो इति शतऽक्रतो। आ। कामम्। जरितॄणाम्।
ऋणोः। अक्षम्। न। शचीभिः ॥ १५ ॥ ३० ॥

भाषायाम्.

१४ हे धृष्णो (=धार्ष्ट्ययुक्त) [इन्द्र], त्वावान् (=त्वत्सदृश) स्तोतृभ्य आप्त (=हितकारी) [देव], इयान (=अस्माभिर्याच्यमान सन्), चक्र्यो (=चक्रयोरुपरि) अक्षम् [अधिष्ठाय] इव, त्मना (=स्वयमेव) आ घ ऋणोति (=त्वरितमागच्छति) ॥

१५ हे शतक्रतो (=शतयज्ञ) [इन्द्र], यत् (=यदा) [त्व] जरितॄणां (=स्तोतॄणां) दुव (=परिचर्याम्) आ[ऋणोषि] (=आगच्छसि) [अपि च जरितॄणां] कामम् आ[ऋणोषि], [तदा] [त्वम्] अक्ष न (=चक्रयो अक्षमिव =चक्रयोरुपरि अक्षम् अधिष्ठायेव, शचीभि (=बलेन=त्वरितम्) [आ] ऋणो (=आगच्छसि) ॥

१३ भावार्थ—'इंद्र हा आम्हाबरोबर सोम पिऊन तृप्त झाला म्हणजे आम्हास अन्नादि संपत्ती देवो, आणि त्या त्याने आम्हास दिल्या म्हणजे आम्ही सधन आणि खाऊन पिऊन चांगले आहों अशी आमची सख्याति होईल, व तेणें करून आम्हास आनंद होईल'

'इंद्र हा आम्हासह सोम पिऊन हर्ष पावल्यावर' या इन्द्राविषयीं विशेष टीका करणें अवश्य नाही कारण की, आम्ही साक्षात देवास नैवेद्य दाखविला म्हणजे तो खाऊन देव तृप्त होतात असें कोणि सर्व मानिता तथापि नैवेद्य असतो तेथेच राहतो तर याप्रमाणे प्राचीन आर्यांचा सोम इंद्र पीत असे असें समजावयाचे विशेष इतकेच समजावयाचे की, आम्ही नैवेद्य दाखवितांना देवाबरोबर खात नाहीं, मागाहून भक्षण करितो आणि आपले पूर्वज जसा सोम अर्पण करीत तसा अर्पण करितांनाच आपणहि पीत होते तेणेकरून इंद्राला 'सधमाद' असें या मंत्रांत म्हटलें आहे

इंद्रादि देव सोम पिऊन तृप्त झाल्यावर भक्तास संपत्ती देतात, आणि त्यास युद्धांत मदत करितात इत्यादि पूर्वी सांगतलेंच आहे

१४ हे धैर्यवंता [इंद्रा], प्रार्थना होताच तुजसारिखा स्तोत्यास दयाळु [असलेला] देव, दोन चाकाच्या आखा[वर बसून आल्या] प्रमाणें आपणच त्वरित येत असतो.

१५. हे शतप्रज्ञ [इंद्रा], [तूं] जेव्हा स्तोत्याची पूजा [आणि] मनकामना याजकाकडेस [येत असतोस] [तेव्हा] [तूं] आखा[वर बसून आल्या]प्रमाणें झपाट्यानें येत असतोस

14. O brave [Indra], a [god] like thee, kind to the singers, [being] implored immediately [comes] of his own accord as [if] he rode an axle on a pair of wheels

15 When, O [India] of hundred wisdoms, [thou] comest to the worship [and] comest to the desire of the singers, [thou] comest [us] eagerly as [if] thou rodest an axle

१४ भावार्थ—'हे इंद्रा, तू आणि तुजसारिखे दुसरे देव आम्हासारिख्या स्तोत्रकर्त्यावर इतकी माया करितो का, आम्ही तुमचा प्रार्थना केल्याबरोबर तुम्ही एकदम आम्हाजवळ येत असतां त्याला दृष्टांत; दोन चाकांवर नुसता आखच घातला आणि त्याजवर गाडीचा साटा वगैरे ओझें न घालतां त्याजवर बसल्यावर जसा धावतो तद्वत्'

असा भावार्थ आम्हास दिसतो, त्याप्रमाणें आम्ही भाषांतर केलें आहे आणि तें बहुतकरून सायणभाष्यास धरूनच आहे 'आ ऋणो' या क्रियापदाचा मात्र ते निराळा भिन्न अर्थ करितात

आपणच एकदम येत असतो'= 'आ घ. त्मना. . ऋणो' आ ऋणो' हें क्रियापद तृतीयपुरुषी असावें, पण त्याचा जो 'त्वावान्' (=तुजसारिखा') हा कर्ता आहे त्यांत द्वितीयपुरुषाचा अर्थ असल्यामुळें आणि तुजसारिखा देव येतो' यांत 'तू येतोस' असें विवक्षित असल्यामुळें तें द्वितीयपुरुषी आहे तथापि यांतील जी उपमा आहे ती चमत्कारिक दिसते यांत संशय नाही.

१५ या मंत्राचा भावार्थ—'हे इंद्रा, तू जेव्हां तुझ्या उपासकांना तुला अर्पण केलेली पूजा ग्रहण करण्यास आणि त्यांच्या वांछा काय आहेत त्या पाहून पुरत्या करण्यास येत असतोस तेव्हां तू दोन चाकांच्या आखावर बसून 'आल्याप्रमाणें मोठ्या झपाट्यानें येत असतोस'

या मंत्रांत आणि पूर्वीच्या मंत्रांतहि जें 'आ ऋणो' असें क्रियापद आहे त्याचे दोन अर्थ होतात एक येणे' आणि दुसरा कशावर तरी (गाडीवर, रथावर इ०) बसून येणे' यांपैकीं दुसरा अर्थ प्रत्येक मंत्राच्या उत्तरार्धांत इष्ट आहे आणि पहिला पूर्वार्धांतील वर्णनांत इष्ट आहे हे लक्षांत ठेवलें तर मग या मंत्राचा अर्थ चांगला बसतो

शश्वदिन्द्रः पोप्रुथद्भिर्जिगाय नानदद्भिः शाश्वसद्भिर्धनानि ।
स नो हिरण्यरथं दंसनावान्त्स नः सनिता सनये स नोऽदात्
॥ १६ ॥

शश्वत् । इन्द्रः । पोप्रुथत्ऽभिः । जिगाय । नानदत्ऽभिः । शाश्वसत्ऽभिः ।
धनानि ।
सः । नः । हिरण्यऽरथम् । दंसनाऽवान् । सः । नः । सनिता । सनये ।
सः । नः । अदात् ॥ १६ ॥

भाषायाम्.

१६ शश्वत् (=सदा) इन्द्र. पोप्रुथद्भि (=अतिशयेन ओष्ठशब्द कुर्वद्भि) नानदद्भि (=पुन पुन हेषाशब्द कुर्वद्भि) शाश्वसद्भि (=भृश श्वसद्भि) [अश्वै·] [वैरिसबन्धीनि] धनानि जिगाय। स दंसनावान् (=कर्मवान्=पराक्रमशाली) [इन्द्र] न (=अस्मभ्य) हिरण्यस्य रथ (=हिरण्येन कृत हिरण्येन पूर्ण वा रथम्) [अदात्], स सनिता (=दाता) न (=अस्मभ्य) [हिरण्यरथ] सनये (=सनेरर्थं=दानार्थम्) [अदात्], स न (=अस्मभ्य) [हिरण्यरथम्] अदात् ॥

'दंस' याचा अर्थ आम्हीं 'पूजा' असा केला आहे. 'दुवस्यति' हे क्रियापद पूजनार्थी आहे उदाहरण, 'अग्निंहि देवाँ अमृतो दुवस्यति' (ऋ ३ ३ १.) याजवरील सायणाचार्यांचे भाष्य पाहा

'शपाटन्नानि'='शचीभि' अक्षरश अर्थ आपल्या 'सर्व शक्तिनिशीं'='आपले सर्व बळ खर्च करून' अर्थात् 'जोरानं', वेगानं.' 'शपाटन्नानि' 'शचीभि' याचा प्रयोग येथें क्रियाविशेषणार्थी आहे (शनै, नीचै, उच्चै या तृतीया अनेकवचनी असता क्रियाविशेषण होतात याची आठवण ह्रोईलच)

१६. इद्रानें अतिशय फुरफुरणाऱ्या, हेकाकणाऱ्या [आणि] मोठ्यानें श्वासोच्छ्वास टाकणाऱ्या घोड्याच्या योगानें सर्वदा लुटी जिंकून आणिल्या आहेत. त्या महापराक्रमी [इद्रा]नें आम्हास सोन्याचा रथ [दिला आहे], त्या दात्यानें आम्हास [सोन्याचा रथ] दान [दिला आहे], त्याणें आम्हास [सोन्याचा रथ] दिला आहे

16 Indra has always, with snorting, neighing [and] panting [horses], won us booties He the performer of valorous deeds [has given us] a golden chariot, he the bounteous [has given] us [a golden chariot] as a present, he has given us [a golden chariot].

---

१६ या मत्राचा भावार्थ असा आहे का, 'इद्र हा लढाईत आमच्या बाजूस राहून आमचें साहाय्य करितो आणि या पूर्वी आम्ही जेव्हां जेव्हां लढाईस गेलों, तेव्हां तेव्हां त्यानें आमच्या शत्रूचें धन आम्हास लुटीदाखल मिळवून दिला आहेत. आणि तो आमचें साहाय्य करितो तेव्हां घोड्यांच्या योगानें करितो, आणि ते घोडे लढाईत धांवतांना मोठ्यानें फुरफुरतात, मोठ्यानें हेकाकतात आणि मोठ्यानें श्वासोच्छ्वास टाकितात एका प्रसगीं तर महापराक्रमी आणि दानशाली इद्रानें आम्हास सोन्यानें भरलेला एक रथ शत्रूच्या लष्करांतून मिळवून दिला असा हा इद्र आहे'

यांत इतकी गोष्ट गृहीत धरली आहे असें म्हटलें पाहिजे का, बोलणाऱ्यास पुष्कळ प्रसगीं शत्रूवर जय मिळून त्याची लूट मिळाली होती, आणि एकदां तर सोन्यानें भरलेला (अथवा सोन्याच्या मुलाम्याचा केलेला?) रथच लुटीत मिळाला ते सर्व इद्राच्या पराक्रमानें झालें असें मत्रकर्त्याचें मत

यांत जे घोडे सांगितले ते मत्रवक्ता जो योद्धा त्याच्याच पक्षाचे असे समजावें एक (आणि तसें समजलें तर त्या घोड्यांच्या अंगांत जें इतकें तेज, इतका आवेश आणि वेग आणि शौर्य आलें आणि तेणेकरून त्यास जय मिळाला तो इद्राचा पराक्रम असा भावार्थ); अथवा ते इद्राचे घोडे असें समजावें (आणि तसें समजला तर जय आला तेव्हां तशा प्रकारचे घोडे इद्राचे आले होते अशी मत्रवक्ता कल्पना करीत आहे असें म्हटलें पाहिजे)

हें प्रस्तुतचेंहि सूक्त शुनःशेपकृत असल्यामुळें ऐतरेय ब्राह्मणकथेस अनुसरून सायणाचार्य म्हणतात कीं, या मत्रांत जो हिरण्यरथ सांगितला तो इद्राची प्रार्थना केल्यावर इद्रानें पूर्वींच शुनःशेपास दिला म्हणून पूर्वी (पृष्ठ २०७ डावा समास खालून ९ वी ओळ पाहा) सांगितलें आहे तोच हा रथ परतु प्रश्न असा आहे कीं, प्राण वांचावा म्हणून प्रार्थना करीत असणाऱ्या शुनःशेपास

आश्विनावश्वावत्येषा यातं शवीरया ।
गोमद्दस्रा हिरण्यवत् ॥ १७ ॥

आ । आश्विनौ । अश्वऽवत्या । इषा । यातम् । शवीरया ।
गोऽमत् । दस्रा । हिरण्यऽवत् ॥ १७ ॥

समानयोजनो हि वां रथो दस्रावमर्त्यः ।
समुद्रे अश्विनेयते ॥ १८ ॥

समानऽयोजन. । हि । वाम् । रथः । दस्रौ । अमर्त्यः ।
समुद्रे । आश्विना । ईयते ॥ १८ ॥

न्यघ्न्यस्य मूर्धनि चक्रं रथस्य येमथुः ।
परि द्यामन्यदीयते ॥ १९ ॥

नि । अघ्न्यस्य । मूर्धनि । चक्रम् । रथस्य । येमथु ।
परि । द्याम् । अन्यत् । ईयते ॥ १९ ॥

भाषायाम्.

१७ हे दस्रौ (=दसनावन्तौ=पराक्रमवन्तौ) अश्विनौ, [युवाम्] अश्ववत्या शवीरया (=बलवत्या) इषा (=अन्नादिकसम्पदा) [सह] गोमत् (=गोभिर्युक्तं यथा स्यात्तथा) हिरण्यवत् (=हिरण्येन युक्त यथा स्यात्तथा) आयातम् (=आगच्छतम्) ॥

१८ हे दस्रौ (=शौर्यवन्तौ) अश्विनौ वां (=युवयो) समानयोजन (=साधारणाश्व=सामान्याश्वयुग्म) अमर्त्यो रथ समुद्रे (=अन्तरिक्षे) ईयते (=गच्छति) हि ॥

१९ [हे अश्विनौ], [युवां] रथस्य [एक] चक्रम् अघ्न्यस्य (=मेघरूपिणो गो) मूर्धनि नियेमथु (=नियमितवन्तौ=स्थापयथ) । अन्यत् [चक्र] द्यां परायने (=द्युलोक पर्यन्त) ॥

हिरण्यरथ इंद्रा । वगैरा दिली रूप सांगतो । कोठें तारान भागने का काय?
परंतु या रथाचा, या मंत्राचा, अथवा या मंत्रे सूक्ताचा त्या शुराशी | याच्या कथेचा कांहीच संबध नाहीं, आणि तसच समजूत आम्हीं भाषांतर केलं आहे

१७. हे अश्वी हो, हे पराक्रमी [देव] हो, [तुम्ही] अश्वांनी परिपूर्ण [अशा] दृढ संपत्तीसह गाई [आणि] सुवर्ण बरोबर घेऊन या.

17. O As'vins, performers of valorous deeds, come ye both with powerful wealth rich in horses, with cows [and] with gold.

१८. कां कीं हे पराक्रमी अश्वी हो, तुमचा दोघांचा मिळून एकच जोडीचा अमर्त्य रथ अंतरिक्षांतून चालतो.

18. For brave As'vins, your immortal chariot drawn by a common team [of horses] goes on the firmament.

१९. [तुम्ही आपल्या] रथाचें [एक] चाक मेघाच्या शिरावर ठेवितां [आणि] दुसरें द्युलोकाच्या सभोंवालों फिरत.

19. Ye place [one] wheel of [your] chariot on the summit of the cloud, the other goes round the heaven.

---

१७. ऐतरेयब्राह्मणकथेस अनुसरून सायणाचार्य म्हणतात:—"इंद्राने शुनः-"शेपास अश्वींची स्तुती करावयास सां-"गितली, त्यावरून हा आणि पुढचे "दोन अशा तीन मंत्रांनी अश्वींची "स्तुती शुनःशेपाने केली ती ही." पण असा संबंध समजण्याची आवश्यकता नाहीं हे पुनः सांगावयास नकोच.

या मंत्रांत 'गोमत्' आणि 'हिरण्यवत्' ही 'आयातम्' या क्रियेचीं विशेषणाव्यये आहेत.

१८. वरील मंत्रांत अश्वींस संपत्ती वगैरे घेऊन येण्याविषयीं सांगितलें. या मंत्रांत येण्याला अडचण कांहीं नाहीं असें म्हणतो. 'आकाशांतून तुमचा रथ चालतो त्यापेक्षां तुम्ही या' असा भावार्थ. दोघां अश्वींची मिळून एकच जोडी त्यांच्या रथास जोडलेली असते.

या मंत्रांत 'अंतरिक्ष' हा उ शब्दाचा केला आहे. तो सायणाचार्यांस व अनेक प्रयोगांतरांस अनुसरून केला आहे. 'समुद्र' म्हणजे पाण्याचा संचय ज्यांत आहे असा प्रदेश. अंतरिक्षांत मेघरूपानें पाणी संचित असल्यामुळें त्यासहि समुद्र असें वेदांत म्हटलें आहे.

१९. या मंत्रांत अश्वींच्या रथाचें महत्त्व वर्णिलें आहे असें दिसतें. तो रथ इतका मोठा आहे कीं, त्याचें एक चाक मेघमंडलावर आणि दुसरें द्युलोकावर असें राहून तो चालत असतो.

यांत 'अघ्न्य' याचा अर्थ आम्हीं 'मेघाचा' असा केला आहे. सायणाचार्य 'पर्वताचा' असा करितात. 'अघ्न्य' शब्दाचा मूळ अर्थ बैल असा आहे. लक्षणेनें मेघ अथवा पर्वत असा घ्यावयाचा आहे. हे शब्द मेघाचे व पर्वताचे संस्कृतांत होतात असें पूर्वी गतलेच आहे.

कस्ते उषः कधप्रिये भुजे मर्तो अमर्त्ये ।
कं नक्षसे विभावरि ॥ २० ॥

कः । ते । उषः । कधऽप्रिये । भुजे । मर्तः । अमर्त्ये ।
कम् । नक्षसे । विभाऽवरि ॥ २० ॥

भाषायाम्.

२० हे कधप्रिये (=स्तुतिप्रिये) उष, हे अमर्त्ये, को मर्तो ते भुजे (=तव भोगाय) [योग्योऽस्ति]? हे विभावरि (=प्रभावति), [त्वं] कं नक्षसे (=गच्छसि)॥

२०. हे स्तुतिप्रिय उषे, हे अमर्त्य [देवी], कोणता मर्त्य तुझ्या भोगास योग्य आहे? हे प्रकाशवती, तूं कोणाजवळ जात असतेस?

20. What mortal, O immortal Ushas fond of praise, is fit for thy enjoyment? Fair one, to whom dost thou go?

२०. ऐतरेयब्राह्मणास अनुसरून सायणाचार्य म्हणतात की, अश्वींनी शुनःशेपास उषेची स्तुती करावयास सांगितल्यावरून (पृष्ठ २०७ डावा समास, खालून ५ पासून ३ ओळी पाहा) हा आणि पुढचे दोन असे तीन मंत्र म्हणून शुनःशेपानें जी उषेची स्तुती केली तीच ही. आणि, हा मंत्र म्हटल्याबरोबर शुनःशेपाचे पाश सुटूं लागले, आणि तिसरा (त्वं त्येभिः ६० २२वा खालीं पाहा) मंत्र म्हणताच शुनःशेप अगदीं मोकळा झाला आणि हरिश्चंद्राचें उदर नीट झालें.

परंतु ह्या कथेशीं ह्या तीनहि मंत्रांचा कांहीं संबंध नाहीं. इतर ठिकाणीं उषेवर जसे मंत्र आणि जशीं सूक्तें आहेत तसेच हे तीन मंत्र आहेत, असें समजून वाचकांनीं हा भाग वाचला पाहिजे.

या तीन मंत्रांची देवता उषा आहे. उषा ही एक वेदांत महत्त्वाची देवी आहे. तिजविषयीं वेदांत कितीएक फार सुंदर मंत्र आणि सूक्तें आहेत. वास्तव ती कोण आहे व तिजविषयीं वेदांत काय काय सांगितलें आहे त्याचें थोडेसें दिग्दर्शन खालीं लिहिल्याप्रमाणें करणें अवश्य आहे:—

उषा ह्या शब्दाचा मूळ अर्थ 'प्रकाशणारी' त्यावरून प्रकाशणारी अशी प्रभातकाळची वेळ. तिला देवी मानून वेदांत तिजविषयीं कितीएक फार सुंदर सूक्तें रचिलेलीं आहेत. उषा ही द्युची (आकाशाची) कन्या होय असें वर्णिलें आहे. तिला भगाची (सूर्यदेवतेची) बहीण असें म्हटलें आहे. तिला रात्रीचीहि बहीण म्हणतात. म्हणूनच रात्र आणि उषा ह्या दोन्ही बहिणींस 'नक्तोषा' 'उषानक्त' इत्यादि नांवांनीं एकत्र जोडिलें आहे. सूर्यास उषेचा जार असें म्हटलें आहे. तरुण स्त्रीच्या मागून जसा एकादा तरुण पुरुष जातो तसा उषेच्या मागून सूर्य चालतो असें वर्णिलें आहे. उषा ही देवांचा डोळा (सूर्य) घेऊन येत असते, आणि पांढऱ्या घोड्यास (सूर्यास) घेऊन येत असते. तिला जगाची स्वामिनी आणि सूर्याची स्त्री असें म्हटलें आहे. एका ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, उषेपासून सूर्य, यज्ञ, आणि अग्नि हे निर्माण झाले. अग्नीला उषःकाळीं यज्ञकर्मासाठीं पेटवितात म्हणून अग्नीलाहि उषेचा जार असें म्हटलें आहे, आणि तो उषेच्या पूर्वीं अथवा उषेबरोबर येत असतो असें सांगितलें आहे. एका ठिकाणीं उषा येऊं लागली म्हणजे तिला भेटण्याकरितां अग्नि सामोरा जातो असें सांगितलें आहे. कोठकोठें अश्वी हे उषेबरोबर असतात असें सांगितलें आहे. ती त्यांची मैत्रीण होय असेंहि सांगितलें आहे.

उषा देदीप्यमान रथांत बसून येते असें वर्णिलें आहे ती पूर्वेकडून येते कोठकोठें ती सुंदर रथावर बसून येते असें वर्णन आहे ती लाल घोडे आरक्त रथास जोडिते असें सांगितलें आ-

वयं हि ते अमन्मह्यान्तादा पराकात् ।
अश्वे न चित्रे अरुषि ॥ २१ ॥

वयम् । हि । ते । अमन्महि । आ । अन्तात् । आ । पराकात् ।
अश्वे । न । चित्रे । अरुषि ॥ २१ ॥

त्वं त्येभिरा गहि वाजेभिर्दुहितर्दिवः ।
अस्मे रयिं नि धारय ॥ २२ ॥ ३१ ॥ ६ ॥

त्वम् । त्येभिः । आ । गहि । वाजेभिः । दुहितः । दिवः ।
अस्मे इति । रयिम् । नि । धारय ॥ २२ ॥ ३१ ॥ ६ ॥

भाषायाम्.

२१ वय हि, हे अश्वे न (=अश्वावत्) चित्रे (=सुन्दरि) अरुषि (=अरुण-वर्णे) [उष], आ अन्तात् (=समीपात्) आ पराकात् (=दूरात्) [च] ते (=तव) अमन्महि (=मनन कुर्महे) ॥

२२ [सा] त्वं हे दिवो दुहित [उष], त्ये. (=तैस्तै =सकलै) वाजे (=अन्नादि पुष्कलै) [सह] आगच्छ । [अपि च] अस्मे (=अस्मासु) रयिं (=सपद) निधारय (=नितरां स्थापय) ॥

हे एकाद्या सुदर तरुण स्त्रीस तिची आई वस्त्र आणि अलकार घालून सजविते त्यासारिखी, अथवा एकाद्या पुष्कळ अलकार घालून सजलेल्या गणिकेप्रमाण, सुदर वस्त्रे नेसून वगैरे एकादी तरुण स्त्री नवऱ्याजवळ येते त्याप्रमाण, एकादी स्त्री न्हाऊनधुऊन स्वच्छ होऊन न्हाणातून बाहेर निघते तिजप्रमाणे, उषा हासत हासत आणि आपल्या सौंदर्याच्या मदाने आपली छाती लोकापुढे उघडी करीत करीत चालते. ती अंधकारास हाकून लाविते आणि सर्व वस्तुमात्र दृष्टीस पडे असें करिते ती सकल प्राण्यांचा जीव होय, ती प्रत्येक घरी येते, आणि एकादी गृहपत्नी घरातील सर्व माणसांस उठविते तशी ती जगातील सकळ जनांस उठविते, आणि आपापल्या कामाला पाठविते उषेनें धार्मिक आणि भाविक लोकांस जागृत करावें पण अधार्मिक अनार्यांस मेल्याप्रमाणें निजू द्यावें अशी प्रार्थना वेदांत आढळते उषा नित्य जन्मते यास्तव ती तरुणच राहते. तरी ती पुरातन आहे

• इत्यादि उषेविषयी सांगितलें आहे. उषेवरचीं सूक्तें जशीं सुदर आहेत तशीं वेदांत दुसरीं सूक्तें सुदर नाहींत तिजविषयी पुढे मत्र आणि सूक्तें येत जातील तसतसें तिचें स्वरूप सर्व ध्यानात येईल

२१. कारण कीं, हे घोडी-प्रमाणे सुंदरे [आणि] लाल उषे, आम्ही जवळून [आणि] दुरून तुझें ध्यान करीत असतों.

21. For we contemplate thee from near [and] from far, thou, [Ushas], beautiful [and] ruddy like a mare.

२२. [तर] हे आकाशकन्यके [उषे], तू सकल विपुलतासह ये [आणि] आमचेठायीं संपत्ती स्थापन कर.

22. Come, therefore, with all plenties, thou daughter of Heaven, [and] make wealth permanent among us.

---

२१. या मंत्रांत उषेस ऋषि म्हणतो कीं, 'तू दूर असतांना, म्हणजे तुझा उगवण्यास वेळ असला तरी तेव्हां, आणि तू जवळ असलीस तरी म्हणजे तू उगवत आहेस अथवा उगवली असलीस तरी, आम्ही तुझें ध्यान करीत असतों'

या मंत्रांत 'अश्वे न चित्रे' ह्या शब्दरचनेकडे लक्ष्य द्यावें. 'अश्वे' हें 'अश्वा' (=घोडी) या शब्दाचें संबोधन आहे. वस्तुत घोडीला संबोधन करावयाचें नाहीं पण 'अश्वा न चित्रा अरुषी' अशी जी उषा तिचें संबोधन करावयाचें आहे. वास्तव 'चित्रे' आणि 'अरुषि' हीं संबोधनें झालीं त्याच्या आकर्षणानें 'अश्वा' हाहि शब्द संबोधनांत ओढला गेला असे प्रयोग वेदांत दुसऱ्या विभक्तीच्या संबंधानेंहि पुष्कळ येत जातील.

२२ 'तुझें ध्यान आम्ही करितों म्हणून सांगितलें (पूर्वील मंत्रावरची टीप पाहा), त्यापेक्षां हे शुकन्यके उषे, तू सकल धनधान्य घेऊन ये आणि आमच्या घरीं संपत्ती स्थापन कर' असा भावार्थ

या मंत्राविषयीं इतकेंच सांगावयाचें कीं, शुनःशेपानें हा म्हणतांच त्याचा राहिलेला शेवटचा पाश तुटला, आणि हरिश्चंद्र अगदीं बरा झाला, असें ऐतरेयब्राह्मणांत सांगितलें आहे. पण शुनःशेपानें संकटाच्या वेळीं हा मंत्र म्हटला नसावा आणि सदरहू कथेशीं या मंत्राचा कांहींच संबंध नसावा असें आम्ही सांगत आलोंच आहों. २४ व्या सूक्तापासून तों ३० व्या सूक्तापावेतों कर्ता शुनःशेप आहे या सात सूक्तांविषयीं विचार करितां चोविसाव्या सूक्ताचे पहिले दोन मंत्र आणि पुढें दुसरे एकदोन इतके मंत्र खेरीज करून या सर्व सात सूक्तांत संकटाच्या वेळीं रचिले असावे अथवा म्हटले असावे असे मंत्रच नाहींत. तशांत शुनःशेपास जें संकट प्राप्त झालें होतें असें ऐतरेयब्राह्मणकथेंत सांगितलें आहे, तशा भयंकर प्रसंगीं तर म्हणण्याजोगे अथवा म्हटले असतील असे मंत्र यांत मुळींच नाहींत. तेव्हां चोविसाव्या सूक्ताच्या आरंभीं जे पहिले दोन मंत्र आहेत ते कांहीं तरी संकटास अनुलक्षून आहेत असें वाटल्यावरून, आणि तें कोणतें संकट हें ठाऊक नसल्यामुळें आणि शुनःशेप या सात सूक्तांचा कर्ता असल्यामुळें, शुनःशेपास यूपास बांधिलें इत्यादि सगळा

सूक्तम् ३१.

हिरण्यस्तूप आङ्गिरस ऋषि । अग्निर्देवता । १-७, ९-१५, १७ इत्येतासु जगती च्छन्द । ८,१६,१८ इत्येतासु त्रिष्टुप् ॥

त्वमग्ने प्रथमो अङ्गिरा ऋषिर्देवो देवानामभवः शिवः सखा ।
तव व्रते कवयो विद्मनापसोऽजायन्त मरुतो भ्राजदृष्टयः ॥ १ ॥

त्वम् । अग्ने । प्रथमः । अङ्गिराः । ऋषिः । देवः । देवानाम् । अभवः ।
शिवः । सखा ।
तव । व्रते । कवयः । विद्मनाऽअपसः । अजायन्त । मरुतः । भ्राजत्ऽ
ऋष्टय ॥ १ ॥

भाषायाम्.

१ हे अग्ने, त्व प्रथमोङ्गिरा ऋषि. (=अङ्गिरसामृषीणामादिपुरुष.) [अभव], देवाना [च] [प्रथमो] देव शिव. (=कल्याण) सखा [च] अभव । तव व्रते (=तव शासने) [हि] कवयो (=मेधाविनो) विद्मनापस (=ज्ञानेन कर्मकर्तार=कुशला) भ्राजदृष्टय (=दीप्यमानायुधा) मरुत अजायन्त ॥

कथाविस्तर ब्राह्मणांत वगैरे रचिला गेला असें अनुमान होतें वास्तव या कथेवरून या सूक्तसप्तकाचा खुलासा को- हेंच न होतां चोविसाव्या सूक्ताच्या आरंभींच्या दोन मन्त्रांवरून या कथेचाच उलटा खुलासा होतो, इतकें तात्पर्य.

सूक्त ३१.

ऋषि—अंगिरस कुळांतील हिरण्यस्तूप या नावाचा कोणी एक पुरुष. देवता—अग्नि. वृत्त—जगती, पण ८, १६ आणि १८ या मंत्राचें त्रिष्टुप्.

१ हे अग्नी, तू अंगिराचा मूळपुरुष ऋषि [होस]; तूं देवांचा [मूळ] देव [आणि] प्रियसखा होस, [का कीं] तुझ्या आश्रयाखालीं मेधावी, कुशल, [आणि] तेजःपुंजायुधी मरुत् [देव] जन्मले.

Hymn 31.

To *Agni*. By *Hiranyastúpa* of the family of the *Angirases*, Metre—*Jagati*, except in 8, 16 and 18, where it is *Trishtup*.

1. Thou, Agni, wast the first poet Angiras, the [first] god of the gods, a kind friend [to them]. For under thy protection were born the wise, the skilful [and] the bright-weaponed Maruts.

---

१. या सूक्तापासून पुढचीं पांच सूक्तें अंगिरस कुळांतील कोणी एक हिरण्यस्तूप या नावाच्या ऋषानें केलेलीं आहेत.

या पहिल्या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'हे अग्नी, माझे पूर्वज जे अंगिरस त्यांचा म्हणजे आमच्या कुळाचा तू आदिपुरुष आहेस; आणि केवळ आमचाच आदिपुरुष आहेस असें नाहीं, पण सकळ देवांचाहि तू आदिदेव आहेस, आणि त्यांचा प्रियमित्र आहेस कारण कीं, सर्वांत पुरातन जे मरुद्देव तेहि तुझ्या आश्रयाखालीं जन्मले आहेत.'

या सूक्ताचा कर्ता अंगिरस कुळांतील असल्यामुळें तो अग्नीला आपल्या वंशाचा आदिपुरुष आहेस असें म्हणतो. आतां अंगिरस कुळाचा आदिपुरुष कसा होईल अशी शंका निघाल्यास, हरिश्चंद्र, दशरथ इत्यादि लक्षावधी क्षत्रियांच्या वंशाचा आदिपुरुष सूर्य कसा? आणि पुरूरवा इत्यादिक क्षत्रियांच्या वंशाचा मूळपुरुष सोम म्हणजे चंद्र कसा झाला? हेंच त्याचें उत्तर आहे असें वाटतें. अंगिरस हे अग्नीचे उपासक पिढीनपिढी असल्यामुळें त्यांजवर त्याचें अति प्रेम बसून, त्यास त्यांणीं आपल्या कुळाचा मूळपुरुष केला यांत कांहीं नवल दिसत नाहीं.

अग्नीस देवांचा देव आणि प्रियसखा असें म्हटलें यांतहि आश्चर्य नाहीं, कारण कीं, इतर बहुत ठिकाणा अग्नि हा फार पुरातन देव आणि तो देवांचा सखा होय, आणि त्यास हवीं पोंहचवून त्यांस तो संतुष्ट करितो असें सांगितलें आहे. ऋग्वेद १. ६९. १ यांत अग्नीला देवांचा बाप असें म्हटलें आहे ("भुवो देवानां पिता पुत्रः सन्") ऋ १०

त्वम॑ग्ने प्रथ॒मो अङ्गि॑रस्तमः क॒विर्दे॒वानां॒ परि॑ भूषसि व्र॒तम् ।
वि॒भुर्विश्व॑स्मै॒ भुव॑नाय॒ मेधि॑रो द्विमा॒ता श॒युः क॑ति॒धा चि॑दा॒यवे॑ ॥ २ ॥

त्वम् । अ॒ग्ने॒ । प्र॒थ॒मः । अङ्गि॑रःऽतमः । क॒विः । दे॒वाना॑म् । परि॑ । भू॒ष॒सि॒ । व्र॒तम् ।
वि॒ऽभुः । विश्व॑स्मै । भुव॑नाय । मेधि॑रः । द्वि॒ऽमा॒ता । श॒युः । क॒ति॒धा । चि॒त् । आ॒यवे॑ ॥ २ ॥

भाषायाम्.

२ हे अग्ने, त्वं प्रथमः अङ्गिरस्तमः कविः [सन्] (=अङ्गिरसामृषीणामादितमः पुरुषः सन्) देवानां व्रतं (=देवानां प्रीत्यर्थं कर्तव्यं यज्ञयागादि कर्म) परिभूषसि (=अलंकरोषि=अस्मदादिद्वारा कारयसि) । विभुः (=बलवान्) मेधिरो (=मेधावी) द्विमाता (=द्वयोर्मात्रोररण्योः पुत्रः) [त्वं] विश्वस्मै भुवनाय (=सर्वस्मै भूताय) [विश्वस्मै] आयवे (=सर्वस्मै मनुष्याय) [च] कतिधाचित् (=सर्वत्र) शयुः (=शयानो=गुप्तो) [वर्तते] ॥

११० ११ आणि १० १५० ४ यांत अग्नीस देवांचा गरु अथवा पुरोहित असे म्हटलं आहे (सत्रो जातो व्यमिमीत यज्ञम् अग्निर्देवानामभवत्पुरोगाः ॥ अग्निर्देवो देवानामभवत्पुरोहितः) त्यास सर्व देवांचा राजा असें म्हटलं आहे (सम्राजो असुरस्य इ० ऋ ७ ६ १) त्याणे मित्रदेवास उत्पन्न केलें असें ऋ १० ८ ४ (जनयन् मित्रं तन्वे स्वायै) यांत सांगितलं आहे सकळ देव भिऊन त्याला शरण जातात (विश्वे देवास अनमस्यन् भियाना त्वामग्ने ऋ ६.९ ७) अग्नीला वरुण, मित्र आणि मरुत् आणि ३३३९ देव भजतात (त्रीणि शता त्री सहस्राणि अग्निं त्रिंशच्च देवा नव चासपर्यन् ऋ ३ ९ ९, मित्रश्च तुभ्यं वरुणः सहस्वो अग्ने विश्वे मरुतः सुम्नमर्चन् ऋ ३ १४ ४)

तेज पुंजायुधी' म्हणजे लखलखीत आयुधें ज्याचे हातांत असतात ते मरुतांच्या हातांत असलीं आयुधें (अथवा भाले) असतात म्हणून पुष्कळ ठिकाणीं वर्णन आहे

२. हे अग्नी, तूं अंगिरांचा अगदी मूळपुरुष ऋषि [आहेस] [आणि] देवप्रीत्यर्थ [आम्हांकडून] [यज्ञयागादि] कर्म करवितोस. शक्तिमान् [आणि] प्रज्ञावान् [असा जो] दोन आईंचा पुत्र तूं [तो] सकल प्राणी [आणि] [सकल] मनुष्ये यांच्या हितासाठीं सर्वत्र गुप्त [राहतोस].

2. Thou, Agni, [art] the very first poet Angiras, [and] conductest the work [in honour] of the gods Mighty [and] wise thou the son of two mothers [liest] dormant everywhere for all creatures [and] for [all] men.

२. या मंत्रांतील सारांश असा आहे कीं, 'हे अग्नी, आमच्या ह्या अंगिरस वंशांत जे आजपर्यंत ऋषि (कवि) झाले, त्यांतून अगदी प्रथम आदिपुरुष आणि प्रथम कवि तूं आहेस; आणि तू आमच्या वगैरे हस्तें देवांसाठीं यज्ञादि कर्मे करवितोस आणि सकळ भूतें आणि सकळ मनुष्यें यांच्या हितासाठीं तू सर्वत्र म्हणजे काष्ठ, उदकें, पाषाण, प्राणिशरीरें इत्यादिकीं अंतर्हित अथवा गुप्तपणानें राहतोस'.

"[आम्हांकडून] [यज्ञयागादि] कर्म करवितोस.' अक्षरशः अर्थ 'कर्म करितोस,' 'कर्म सिद्ध करितोस', म्हणजे 'आम्ही करावे अशी आम्हास प्रेरणा करितोस'.

'दोन आईंचा पुत्र' हें अग्नीचे विशेषण पुष्कळ ठिकाणीं येतें. दोन 'अरणी' म्हणून जीं घर्षणानें विस्तव पाडण्याचीं उपकरणें असतात त्यांपासून अग्नि म्हणजे विस्तव उत्पन्न होतो म्हणून त्यास 'दोन आईंचा पुत्र' (द्विमाता) असें म्हणतात.

त्वमग्ने प्रथमो मातरिश्वन आविर्भव सुक्रतुया विवस्वते ।
अरेजेतां रोदसी होतृवूर्येऽसघ्नोर्भारमयजो महो वसो ॥ ३ ॥

त्वम् । अग्ने । प्रथम । मातरिश्वने । आविः । भव । सुक्रतुऽया । विवस्वते ।
अरेजेताम् । रोदसी इति । होतृऽवूर्ये । असघ्नोः । भारम् । अयजः । महः ।
वसो इति ॥ ३ ॥

भाषायाम्.

३ हे अग्ने, त्वं सुक्रतुया (=शोभनकर्मेच्छया=यज्ञादिकर्म भूयादिति हेतो) विवस्वते (=विवस्वन्नाम्न कस्यचित् हिताय) प्रथम मातरिश्वने (=मातरिश्वन्नाम्ने कस्मैचिद्विपश्चितो दूताय) आविः (=प्रकटो) भव (?) (=भव=अभव)। होतृवूर्ये (=होतृवरणे=होतृकर्मणि त्वयि वृते, नियोजिते सति) रोदसी (=द्यावापृथिव्यौ अरेजेताम् (=अकम्पेताम्)। [त्वं पुनः] भारं (=रेजमानयो रोदस्योर्भारम्) असघ्नोः (=ऊढवानसि)। [अपि च] हे वसो (=हे दयालो) [अग्ने], [त्वं] महो (=महतो) [देवान्] अयजः ॥

३. हे अग्नी, तूं शुभकर्मासाठीं प्रथम विवस्वताकरितां मातरिश्याच्या दृष्टीस पडलास. होत्याचें कामीं तुझी योजना केली तेव्हां पृथ्वी आणि आकाश थरथरां कांपलीं, [त्यांचा] भार तूं सहन केलास, [आणि] हे कृपाळू [अग्नी], मोठे [जे देव] त्यांप्रीत्यर्थ तूं यज्ञ करिता झालास.

3. Thou, Agni, first becamest manifest to Mâtaris'vâ for [the sake of] Vivasvân that auspicious works (sacrifices) might be performed. Earth and Heaven trembled at [thy] appointment as Hotâ (invoker); [but] thou didst sustain the weight [of them], [and], good [Agni], thou didst sacrifice to the great [gods].

३ या मंत्राचा भावार्थ सांगितला पाहिजे. तो असा –'हे अग्नी, तूं पूर्वी पृथ्वीवर नव्हतास, तेव्हां यज्ञादिक सुकर्में होत नव्हतीं, तीं घडावी म्हणून विवस्वान् या नांवाच्या कोणी एक देवानें मातरिश्वा या नांवाचा दैविक महापुरुष आपला दूत करून तुझ्या शोधार्थ पाठविला; त्याच्या दृष्टीस तूं प्रथम पडलास, आणि त्याणें तुला पृथ्वीवर आणिलें. त्यानंतर तुला मनुष्यांनीं होता नेमिला, तेव्हां आकाश आणि पृथ्वी हीं थरथरां कांपूं लागलीं (कां?); तथापि तूं त्यांस पडूं दिलें नाहींस, त्यांचा भार सहन करून त्यांस आपआपल्या स्थळीं राखिलेंस, आणि हे गुणवान् अग्नी, मग तूं होत्याचें काम चालवून महान् जे देव त्यांस पोंहचाया म्हणून यज्ञ करिता झालास.'

वेदांत मातरिश्वा, विवस्वान् आणि अग्नि यांविषयीं जें सांगितलें आहे त्यावरून असें दिसून येतें कीं, अग्नि पूर्वी पृथ्वीवर नव्हता, अथवा नाहींसा झाला होता तेव्हां विवस्वताचा जो दूत मातरिश्वा त्याणें अग्नीला आकाशांतून शोधून काढिला आणि पृथ्वीवर आणून भृगु म्हणून जे ऋषि होते त्यांच्या स्वाधीन केला "आ दूतो अग्निम् अभरद् विवस्वतो वैश्वानरं मातरिश्वा परावतः," 'विवस्वताचा दूत मातरिश्वा याणें वैश्वानर जो अग्नि त्यास दूरून आणिलें' ऋ. ६. ८. ४. आणि ऋ १.६०.१, यांत वहि..."भरद् भृगवे मातरिश्वा,"= 'मातरिश्वानें भृगूसाठीं अग्नि आणिला' ऋ १. ९३ ६ यांतहि असेंच आहे, "आ अन्य दिवो मातरिश्वा जभार"= 'एका अग्नीस (म्हणजे पृथ्वीवर आहे त्यास) मातरिश्वानें द्युलोकाहून आणिलें.' "आ य दधे मातरिश्वा दिवि क्षयम्" (ऋ. ३ २.१३)='स्वर्गामधें राहणाऱ्या ज्या अग्नीस मातरिश्वानें धरिलें' तसेंच ऋ. ३ ५ १०. यांत, 'यदी भृगुभ्यः परि मातरिश्वा गुहा सन्तं हव्यवाहं समीधे,"–'जेव्हां गुहेमधें लपून राहिलेल्या अग्नीस मातरिश्वानें आणून भृगूसाठीं पेटविलें', असें आहे.

आतां मातरिश्वा हा कोण? आणि विवस्वन् कोण? यास्क आणि सायणाचार्य मातरिश्वा म्हणजे वायु असें म्हण.

त्वम॑ग्ने मन॑वे॒ द्याम॑वाशयः पु॒रू॒रव॑से सु॒कृते॑ सु॒कृत्त॑रः।
श्वा॒त्रेण॒ यत्पि॒त्रोर्मुच्य॑से॒ पर्या त्वा॒ पूर्व॑मनय॒न्नाप॑रं॒ पुनः॑ ॥ ४ ॥

त्वम् । अ॒ग्ने॒ । मन॑वे । द्याम् । अ॒वा॒श॒यः॒ । पु॒रू॒रव॑से । सु॒ऽकृते॑ । सु॒कृत्ऽत॑रः ।
श्वा॒त्रेण॑ । यत् । पि॒त्रोः । मुच्य॑से । परि॑ । आ । त्वा॒ । पूर्व॑म् । अ॒न॒य॒न् । आ । अप॑रम् । पु॒नरिति॑ ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. हे अग्ने, त्वं मनवे, (=मनोः मनुष्यजातेरादिपुरुषस्य अनुग्रहार्थं) द्याम् अवाशयः (=अगर्जय.) । [त्वं] सुकृते (=सुकर्म कुर्वते) पुरूरवसे (=एतन्नामकाय राज्ञे) सुकृत्तरः [अभवः] । यत् (=यदा) [त्वं] [तव] पित्रोः (=द्यावापृथिव्योः, अरण्योर्वा) श्वात्रेण (=क्षिप्रमथनेन=संघर्षणेन) परिमुच्यसे (=निर्गतवानासि) [तदा] [ऋत्विगादयः] त्वां पूर्वं (=वेदेः पूर्वदेशम्) आनयन् (=आहवनीयत्वेन स्थापितवन्तः) । पुनः (=पश्चाद्) अपरं (=पश्चिमदेशम्) आ-[नयन्] (=गार्हपत्यरूपेण स्थापितवन्त) ॥

तात, आणि विवस्वत् म्हणजे सूर्य. परंतु मातरिश्वा म्हणजे वायु असा अर्थ अर्वाचीन संस्कृतांत होतो, तरी वेदांत त्याचा अर्थ तसा होत नसेल असे वर उतरून घेतलेल्या वाक्यावरून दिसून येतें, व मातरिश्वा हा कोणी दैविक पुरुष असावा असें दिसतें. आणि विवस्वान् हाहि कोणी तसाच असावा. कदाचित् सूर्य असेल.

पृथ्वी आणि आकाश कांपूं लागलीं म्हणून सांगितलें, हा कंप अग्नि आकाशामध्यें प्रगट झाला (म्हणजे विद्युद्रूपानें दृष्टीस पडला) तेव्हांचा आहे असें चांगलें कळतें.

४. हे अग्नी, तूं मनूसाठीं आकाशाकडून गर्जना करविता झालास, तूं सुकृत्यकारी पुरूरव्यासाठीं विशेष सुकृत्यकारी [झालास]. तूं [आपल्या] आईबापांच्या घर्षणापासून जेव्हां बाहेर पडलास [तेव्हां] [उपासक] तुला प्रथम पूर्वेकडेस आणिते झाले [आणि] पुनः पश्चिमेकडेस आणिते झाले.

4. Thou, Agni, didst cause the heaven to thunder for Manu, [thou becamest] more beneficent to the beneficent Purûravas. When thou wast emitted by the friction of [thy] parents, they brought thee to the east [and then] brought thee again to the west.

४. या मंत्राचा भावार्थ असा दिसतो कीं, 'वीज पडण्याच्या वेळीं जी आकाशांत गर्जना होते ती प्रथम मनुष्यांचा आदिपुरुष जो मनु या नांवाचा पुरुष त्याच्या हितासाठीं अग्नीनें करविली. पुरूरवा या नांवाच्या पुण्यकृत्य करणाऱ्या राजासाठीं अग्नीनें प्रसन्न होऊन त्याला लाभ होईं असें वरविलें. आणि आकाश आणि पृथ्वी यांच्या संघर्षणानें जेव्हां प्रथम अग्नीची उत्पत्ति झाली तेव्हां मनुष्यांनीं तो घेतला आणि प्रथम त्यास यज्ञशाळेंत पूर्वेकडे स्थापन करून मग पश्चिमेकडे स्थापिला.'

जसा मुसलमान आणि खिस्ती व यहुदी लोक सर्व मनुष्यजातीचा आदिपुरुष 'आदम' या नांवाचा पुरुष होता असें मानितात, तसा मनुष्यजातीचा आदिपुरुष 'मनु' (अथवा 'मनुस्') म्हणून आपले प्राचीन आर्य पूर्वज मानीत असल्याचे उल्लेख वेदांत वारंवार येतात त्यापासून 'मानव' आणि 'मनुष्य' (=मनूच्या वंशांत झालेला) हे आपले दोन शब्द उत्पन्न झाले आहेत. (याच सूक्ताचा १७ वा मंत्र पाहा)

आतां 'पुरूरवा' हा या ठिकाणीं कोण? उर्वशीचा नवरा जो राजा मागाहून पुराणादिकांत व नाटकांत प्रसिद्ध आहे आणि ज्याविषयीं वेदांतहि कथा सांगितली आहे तोच, किंवा दुसरा कोण समजला पाहिजे? कित्येक विद्वान 'मनु' म्हणजे 'मनुष्य' आणि 'पुरुरवस्' म्हणजे 'विशेष घोष करणारा' असा अर्थ करितात. तसा घेतला तर पहिल्या अर्धाचें भाषांतर, 'हे अग्नी, स्तुतीचा वगैरे फार घोष करणारे आणि चांगलीं कृत्यें करणारे जे कोणीहि मनुष्य असतील, त्यांला फार चांगले प्रसाद देणारा जो तूं तो आकाशास गर्जविता झालास' असें करतां येईल. परंतु 'विशेष घोष करणारा' अशा अर्थी 'पुरुरवस्' शब्दाचा प्रयोग केलेलीं दुसरीं वाक्यें जोपर्यंत सांपडत नाहींत तोंपर्यंत 'पुरूरवस्' हे प्रसिद्ध राजाचें विशेषनाम समजणें आणि सायणास अनुसरणें हेच चांगलें

या मंत्रांतील 'श्वात्र' शब्द कठिण आहे. याची व्युत्पत्ति सायणाचार्यांनीं सांगितलेली नाहीं तथापि त्यांनीं सांगितलेलाच अर्थ आम्हीं घेतला आहे.

त्वम॑ग्ने वृ॒ष॒भः पु॑ष्टि॒वर्ध॑न॒ उद्य॑तस्रुचे भवसि श्र॒वाय्यः॑ ।
य आहु॑तिं॒ परि॒ वेदा॒ वष॑ट्कृति॒मेका॑यु॒रग्रे॒ विश॑
आ॒वि॒वास॑ति ॥५॥३२॥

त्वम् । अ॒ग्ने॒ । वृ॒ष॒भः । पु॒ष्टि॒ऽवर्ध॑नः । उद्य॑तऽस्रुचे । भ॒व॒सि॒ । श्र॒वाय्यः॑ ।
यः । आऽहु॑तिम् । परि॑ । वेद॑ । वष॑ट्ऽकृतिम् । एक॑ऽआयुः । अग्रे॑ ।
विशः॑ । आ॒ऽवि॒वास॑ति ॥ ५ ॥ ३२ ॥

भाषायाम्.

५. हे अग्ने, वृषभो (=बली) त्वम् उद्यतस्रुचे (=हविर्दानाय प्रधृतस्रुचे=प्रसृतस्रुचे=पुरःसृतस्रुचे) [उपासकाय] श्रवाय्यः (=कीर्तनीय) पुष्टिवर्धनः (=संपद्वर्धको) भवसि । यः [उपासकः] आहुतिम् (=आह्वन) वषट्कृतिं (=वषट्शब्दस्य उच्चारणं) [च] परिवेद (=सम्यक् जानाति) [सः] एकायु. (=एकोपि मनुष्य सन्) अग्रे (=सर्वेषामप्यग्रे=सर्वेभ्योपि प्रथम) विश. (=अनेकजनान्) आविवासति (=प्रीणयित्वा स्वायत्तान् करोति) ॥

प्रयोगांतरास अनुलक्षून कितीएक जण येथें 'शक्तीनें' असा अर्थ समजतात.

'आईबापाच्या.' अग्नि हा द्यावापृथ्वीचा मुलगा होय असें वेदांत सांगितलें आहे. (ऋ. ३. २. २; ३. २५ १ इ० पाहा). विजेच्या महाभयंकर रूपानें जो अग्नि उत्पन्न होतो तो द्यावापृथ्वींच्या संघर्षणानें होतो म्हणणें हें साहजिक आहे.

अग्नीला पृथ्वीवर आणिल्या नंतर पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे उपासक आणिते झाले याचा अर्थ सायणाचार्य वेदीच्या पूर्वभागीं आहवनीयरूपानें आणि पश्चिमभागीं गार्हपत्यरूपानें स्थापिते झाले असा सांगतात. तसाच दिसतो यांत संशय नाहीं. आहवनीय आणि गार्हपत्य असे दोन प्रकारचे अग्नि यज्ञाला लागत असतात.

५. हे अग्नी, शक्तिमान् [असा जो] तूं [तो] पळी-पुढें-करणाऱ्या [उपासका]चा प्रख्यात हितकर्ता होतोस. [आणि] जो [उपासक] आहुती देणें [आणि] वषट्कार करणें [हे] उत्तम रीतीनें जाणतो [तो] [स्वतः] एकटा मनुष्य [असला तरी] [अनेक] लोकांस सर्वांगोदर आपलेसे करून घेतो.

5. Thou, Agni, [who art] mighty becomest the renowned giver of prosperity to him who stretches forth the [sacrificial] ladle [to thee]. [He] who fully knows [how] to sacrifice [and] to say *vashat*, best [of all] gains [to himself] [though a] single man, [the good wishes of] [many] men.

---

५. ह्या मंत्राचें पूर्वार्ध उघड आहे आणि त्याचें तात्पर्य 'तुला जो हवि अर्पण करतो त्या उपासकाचा तूं लाभ करून देतोस अशी तुझी प्रख्याति आहे,' असें आहे. तृतीय चरणहि उघडच दिसतो, परंतु चवथ्या चरणाविषयीं अडचण आहे. त्याचा यथाशक्ति आम्हीं अर्थ केला आहे. मुख्य अडचण ही की, 'आपलेसे करून घेतो' ह्याबद्दल '*आविवासति*' असा पाठ आहे. सायणाचार्य आपल्या भाष्यांत 'आविवाससि' असा पाठ समजून अर्थ करितात आणि तें क्रियापद अग्नीकडे लावितात. तर 'आविवाससि' असा पाठ की, 'आविवासति' असा खरा ही एक अडचण; आणि कोणताहि पाठ घेतला तरी हे क्रियापद सर्वानुदात्त कां नाहीं? ही अडचण दुसरी मोठी आहे. 'यः' हे अग्नीचे सर्वनाम आहे असे समजून त्याचा संबंध 'आविवासति' (आविवाससि ?) या क्रियापदाकडे घेतला तर अडचण कदाचित् दूर होईल. पण मग 'परिवेद' हेंहि क्रियापद 'य' शब्दाशी घ्यावे लागेल, आणि से तर द्वितीयपुरुषी नाहीं. तेव्हां तसेंहि करितां येत नाहीं. तर अध्ययनादृष्टफलासाठीं संप्रदायाच्या संबंधानें कोणताहि पाठ इष्ट असला तरी अर्थलाभासाठीं 'आविवासति' हाच पाठ मानून '*आविवासति*' असे न वाचतां '*आविवासति*' असें सर्वानुदात्त वाचावें आणि 'य.' म्हणजे 'य उपासकः' असें समजून आम्हीं केल्याप्रमाणें निर्वाह करावा असें आम्हांस वाटतें.

'आविवासति'चा जो आपलेसे करून घेतो म्हणजे प्रसन्न करून घेतो असा आम्हीं अर्थ केला आहे त्याला प्रमाण ऋ. १. ८४ ९ हा मंत्र (आणि कदाचित् त्यावरील सायणाचार्यांचें भाष्यहि) पाहा. शिवाय ऋ. ६. ६०. ११; ७. २० ६; २. ११. १६; २ ३३. ६. इत्यादि स्थळें पाहा.

'जो....वषट्कार करणें हे उत्तम रीतीनें जाणतो.' वषट् हा एक उद्गार आहे. त्याचा उच्चार होत्यानें करावयाचा आणि तो केल्याबरोबर अध्वर्यूनें होमांत हवि टाकावे असें आहे. तर 'वषट्' असें मोठ्यानें म्हणणें यांत काय विशेष कुशलता आहे, कीं जेणे-

त्वम॑ग्ने वृजि॒नव॑र्तनिं॒ नरं॒ सक्म॑न् पिपर्षि वि॒दथे॑ विचर्षणे ।
यः शूर॑साता॒ परि॑तक्म्ये॒ धने॑ द॒भ्रेभि॑श्चि॒त्सम॑ृता॒ हंसि॒ भूय॑सः ॥ ६ ॥

त्वम् । अ॒ग्ने॒ । वृ॒जि॒नऽव॑र्तनिम् । नर॑म् । सक्म॑न् । पि॒प॒र्षि॒ । वि॒दथे॑ ।
विऽच॒र्ष॒णे॒ ।
यः । शूर॑ऽसाता । परि॑ऽतक्म्ये । धने॑ । द॒भ्रेभि॑ः । चि॒त् । सम्ऽऋ॑ता ।
हंसि॑ । भूय॑सः ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. हे विचर्षणे (=विशिष्टज्ञानयुक्त) अग्ने, त्वं वृजिनवर्तनिम् (=अऋजुमार्ग=ज्ञानरहित) नरं (=वीरं) सक्मनि (=संकीर्णे स्थले), विदथे (=युद्धे) [च] पिपर्षि (=रक्षसि) । यस्[त्वं] शूरसातौ (=संग्रामे), परितक्म्ये धने (=सकटे समराङ्गणे), समृतौ (=समरे) [च] दभ्रेभिश्चित् (=अल्पैरपि) भूयसः (=प्रभूतान्) हंसि (=मारयसि) ॥

करून अग्नि फार प्रसन्न होतो! परंतु 'जो आहुती देणे हें उत्तम रीतीनें जाणतो' ('य आहुतिं परिवेद') म्हणजे 'जो अध्वर्यूचें काम चांगलें जाणतो'; आणि 'जो वषट्कार करणें हें उत्तम रीतीनें जाणतो' ('य. परिवेद वषट्कृतिं') म्हणजे 'जो होत्याचें काम चांगलें जाणतो' असा भावार्थ असेल.

उत्तरार्धाचें तात्पर्य असें दिसतें कीं, 'जो यजमान वषट्कार म्हणून, आहुती देऊन, अग्नीस तृप्त कसें करावें हें जाणतो, तो स्वतः एकटा असला तरी अनेक मनुष्यांचा नायक होतो'

परंतु खरा पाठ 'आविवासति' आहे किंवा 'आविवासति' आहे, आणि 'आविवासति' असाच असेल तर 'आविवासति' असा आहे किंवा 'आविवासति' असा सर्वानुदात्त आहे या दोन्हीही अडचणी निवारण्याचा एकच कांहीसा सोपा मार्ग आम्हांस शक्य दिसतो. तो हा. 'यः आहुतिं परि वेद वषट्कृतिम् एकायुः अग्रे विश आ विवासति' अशी पदें वाचून 'यो [यजमानः] आहुतिं वषट्कृतिं [च] परिवेद (=पूर्णत्वेन जानाति) [यश्च] एकायुः (=एकः आयुर्यस्य सः=एकम् अग्निमेव पूजयन्) अग्रे विशः (=स्वगृहस्य पुरोभागे) आविवासति (=अग्निं परिचरति) [तस्मै] उशनायुषे त्वं पुष्टिवर्धनो भवसि' असा अन्वय करून, 'ज्याला आहुती देण्याचे

६. हे सर्वदर्शी अग्नी, तूं अजाणत्या वीरास गर्दीत [आणि] युद्धांत रक्षितोस; आणि तूं समरांगणांत, आणीबाणीच्या संग्रामांत [आणि] युद्धात लहानसान [मनुष्यां]च्याहि हातून मोठ्या [शत्रूं]स मारितोस.

6. Thou, all-seeing Agni, protectest the ignorant soldier in the throng [and] in the fight; and in a battle, in a decisive action, [and] in an encounter thou killest the many even by [means of] the few.

आणि वषट् असें म्हणण्याचें ज्ञान असतें असा जो उपासक तुला हवि देण्यासाठीं पत्नी पुढें करतो, त्याचा हे अग्नी, तूं हितकर्ता होतोस' अशा अर्थाचें भाषांतर करावें. परंतु 'आविवासासि' असाच पाठ असल्याविषयीं या प्रांतांतील वैदिकांचा संप्रदाय आहे; आणि 'एकायुः' याचा जो 'एकट्या अग्नीस भजणारा' असा अर्थ करणें त्याविषयीं (ऋ. १. ५६. २ आणि १. १४७.

१. यांत 'आयु' शब्दाचा अर्थ अग्नि असा होतो असें दिसतें तरी) आम्हास संशय आहे 'आविवासति' अथवा 'आविवाससि' याच्या पाठनिश्चयाविषयीं अथवा स्वरनिश्चयाविषयीं सायणाचार्य कांहींच (छापलेल्या पुस्तकांत तर) लिहीत नाहींत. ते "एकायुर्मुख्या-न्नस्त्वमग्ने(?) प्रथम त यजमान विशस्तदनुकूला: प्रजा आविवासति। सर्वत्र प्रकाशयसि" इतकेंच लिहितात.

६ या मन्त्रांत म्हणण्यासारिखें कठिण कांहीं नाहीं. पूर्वार्धांत जो 'विदथे' शब्द आहे त्याचा आम्हीं 'युद्धांत' असा अर्थ केला आहे, आणि तो या स्थलीं उचित आहे, असें इतर शब्दांच्या साहचर्यसंबधानें सहज दिसून येईल. सायणाचार्य येथें 'विदथे' म्हणजे 'यज्ञांत' असें भाष्य करितात; परन्तु आम्हीं केलेल्या अर्थाला प्रमाण ऋ. ७. १८. १3 याजवरील सायणाचें भाष्य हेंच होय. शिवाय ७.९३.५ हा मन्त्र पाहा.

या मंत्रावरून आमचे पूर्वज आर्यजन लढण्याविषयीं आणि लढाईंत इष्टदेवतांचा धांवा करण्याविषयीं कसे आतुर असत हे दिसून येतें. अर्वाचीन ब्राह्मणांसारिखे आपण स्वस्थ बसणे हा आपला धर्म, युद्ध करणे हा क्षत्रियांचा धर्म, आणि भिक्षा मागणे हा विद्वान् ब्राह्मणांचा धर्म असें समजत नसत.

देवाचें साहाय्य मिळेल तर यःकश्चित् लहानसान मनुष्य मोठ्याहि शत्रूस मारून टाकील हा आमच्या प्राचीन पूर्वजांचा जो पूर्ण भरवसा या मन्त्राच्या उत्तरार्धांत दिसून येतो, तो सांप्रतकाळीं आमच्या अंगीं आहे काय?

त्वं तम॑ग्ने अमृत॒त्व उ॑त्त॒मे मर्तं॑ दधासि॒ श्रव॑से दि॒वेदि॑वे ।
यस्ता॑तृषा॒ण उ॒भया॑य॒ जन्म॑ने॒ मयः॑ कृ॒णोषि॒ प्रय॒ आ च॑ सू॒रये॑ ॥ ७ ॥

त्वम् । तम् । अ॒ग्ने॒ । अ॒मृ॒त॒ऽत्वे । उ॒त्ऽत॒मे । मर्त॑म् । द॒धा॒सि॒ । श्रव॑से ।
दि॒वेऽदि॑वे ।
यः । त॒तृ॒षा॒णः । उ॒भया॑य । जन्म॑ने । मयः॑ । कृ॒णोषि॑ । प्रयः॑ । आ । च॒ ।
सू॒रये॑ ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. हे अग्ने, यः [सूरिर्मर्त्यः] उभयाय जन्मने (=उभाभ्यां जन्मभ्यां=देवानां पितॄणां चेति जातिद्वयाय) तातृषाणः (=अतिशयेन तृष्णायुक्तः=अतिशयेन परिचर्योत्सुकः) [अस्ति], तं मर्त्यं [सूरिं] त्वं श्रवसे (=कीर्तये, कीर्तिर्भूयादिति हेतो) दिवेदिवे (=दिनेदिने=नित्यम्) उत्तमे अमृतत्वे (=उत्कृष्टे मरणरहिते पदे) दधासि (=धारयासि), [तस्मै] च [मर्त्याय] सूरये (=यजमानाय) मयः (=आनन्द) प्रयः (=सुखं) [च] आकरोषि (=करोषि, ददासि) ॥

७. हे अग्नी, जो मर्त्य उभय जनां[चा सेवा करण्या]विषयीं आतुर [असतो] त्याला तूं नित्य उत्तम अमरत्वा[च्या स्थितीं]त ठेवितोस आणि त्याची कीर्ति करवितोस, आणि [त्या] भाविक [मर्त्या]ला तूं आनंद [आणि] सुख प्राप्त करून देतोस.

7. Thou, Agni, always keepest that mortal in the highest immortality so that he becomes renowned, who is highly thirsty to serve both the races [the Gods and the Manes.], and thou givest to that pious [mortal] joy [and] happiness.

७. या मंत्राचें तात्पर्य असें आहे कीं, 'हे अग्नी, जो मर्त्य यजमान देवाप्रीत्यर्थ आणि पितरप्रीत्यर्थ हवि देण्याविषयीं परम उत्सुक असतो, म्हणजे मोठ्या उत्सुकतेनें त्यांच्या साठीं हवि देतो, त्याला तूं उत्तम अमरत्व देऊन त्याची कीर्ति सर्वत्र पसरे असें करितोस, आणि त्याला आनंद आणि सुख होई असें करितोस.'

या मंत्राविषयीं इतके सांगणें जरूर दिसतें कीं, प्राचीन काळीं अमरत्व कशास म्हणत आणि आम्ही कशास अमरत्व म्हणतों त्यांत भेद दिसतो. कारण एक तर मंत्रवक्ता म्हणतो 'दररोज अमरत्वांत ठेवितोस.' यावरून 'दररोज' अमरत्वामध्यें न ठेविता कोणाला तरी दुसऱ्या रीतीनें, म्हणजे अमुक एक (दोनशें तीनशें वर्षांच्या) मुदतीपर्यंत, अमर करितां येईल अशी कल्पना दिसते. त्यावरून आमचा जो अमरत्वाविषयीं 'कधींहि न मरणारा तो अमर' असा विचार आहे तो प्राचीन काळीं नव्हता असें दिसतें. दुसरी गोष्ट अशी कीं, 'उत्तम अमरत्वांत' ठेवितोस असेंहि आहे, त्यावरून अमरत्वाचे निरनिराळे प्रकार मंत्रवक्त्याचे मनांत असावे असें दिसतें; जसें कोणी दोनशें वर्षें अमर, कोणी तीनशें, कोणी पांचशें इ०. अथवा मरण्यापूर्वींच जी उत्तम आरोग्यस्थिति, तेंच उत्तम अमरत्व येथे मंत्रवक्त्याच्या मनांत विवक्षित असेल असें चांगले संभवतें. कारण मग 'नित्य', 'दररोज' (='दिवे दिवे') हें पद चांगलें बसतें.

'उभय जनां[चा सेवा करण्या]विषयीं'= 'उभयाय जन्मने'. सायणाचार्य येथे 'उभय जन' म्हणजे 'द्विपद आणि चतुष्पद' असें भाष्य करून 'द्विपद आणि चतुष्पद पशूंचा लाभ व्हावा अशी ज्यास मोठी उत्सुकता असते' असा अर्थ करितात. पण येथें तो अर्थ इष्ट नाहीं. आम्हीं केलेल्या अर्थास प्रमाण आहे याविषयीं क. ७ ५. १, क. २. २४ १० आणि २. ६. ७ या मंत्रांवरील सायणाचार्यांचें भाष्य होय.

'आणि त्याची कीर्ति करवितोस'= 'श्रवसे.' या चतुर्थ्यन्त नामाचा हा अर्थ थोडासा विस्तरानें करावा लागला आहे. अक्षरशः अर्थ 'कीर्तीसाठीं' असा असून त्याचा संबंध 'ठेवितोस' या क्रियापदाशीं आहे.

त्वं नो अग्ने सनये धनानां यशसं कारुं कृणुहि स्तवानः ।
ऋध्याम कर्मापसा नवेन देवैर्द्यावापृथिवी प्रावतं नः ॥ ८ ॥

त्वम् । नः । अग्ने । सनये । धनानाम् । यशसम् । कारुम् । कृणुहि । स्तवानः ।
ऋध्याम । कर्म । अपसा । नवेन । देवैः । द्यावापृथिवी इति । प्र । अवतम् । नः ॥ ८ ॥

त्वं नो अग्ने पित्रोरुपस्थ आ देवो देवेष्वनवद्य जागृविः ।
तनूकृद्बोधि प्रमतिश्च कारवे त्वं कल्याण वसु विश्वमोपिषे ॥ ९ ॥

त्वम् । नः । अग्ने । पित्रोः । उपऽस्थे । आ । देवः । देवेषु । अनवद्य । जागृविः ।
तनूऽकृत् । बोधि । प्रऽमतिः । च । कारवे । त्वम् । कल्याण । वसु । विश्वम् । आ । ऊपिषे ॥ ९ ॥

भाषायाम्.

८. हे अग्ने, स्तवानः (=स्तुत सन्) त्व न (=अस्मभ्य) धनाना सनये (=धनानां दानाय, इदमेव धनाना दानमिति कृत्वा) यशस (=यशोयुक्त) कारु (=कविं, कविगुणयुक्तं पुत्रं) कुरु (=देहि), [येन] नवेन अपसा (=तेन कुशलेन पुत्रेण) [वय] कर्म (=देवयजनादिकर्म) ऋध्याम (=वर्धयाम, निष्पादयाम)। [अपि च] हे द्यावापृथिव्यौ, [युवा] न (=अस्मान्) देवै. (=अन्यैर्देवै. सह) प्रावत (=रक्षतम्) ॥

९. हे अनवद्य (=दोषरहित) अग्ने, पित्रो. (=तव पित्रोर्द्यावापृथिव्योः) उपस्थे (=उदरे, द्यावापृथिव्योर्मध्यस्थाने) जागृविः (=जागरूक =दीप्यमानेन विद्युतो रूपेण वर्तमान सन्) देवेषु देव. (=देवाधिदेव) त्व न. (=अस्माकं) तनूकृत् (=शरीराणां रक्षिता) बोधि (=भव), [अस्माक] कारवे (=कवये) च प्रमति (=अनुग्रहकर्ता) [बोधि]। हे कल्याण [अग्ने], त्वम् [एव] विश्वं वसु (=यत् किंचित्सद् वस्तु) ओपिषे (=आवपसि तवोपासकार्थं प्रसारयसि, ददासि) ॥

८ हे अग्नी, हो तुझी [आम्ही] स्तुति केली आहे यास्तव तू आम्हास धनाच्या ऐवजीं कीर्तिमान् [असा] देवगुणगायक [पुत्र] दे म्हणजे [आम्ही] [तसल्या] नव्या कवीच्या योगानें [आमचें] [यज्ञ]कर्म सिद्धीस नेऊं [आणि] हे द्यावापृथिवींनो, [तुम्ही] [इतर] देवांसह आम्हास सभाळा.

8 Mayest thou, Agni being glorified [by us], give us in place of a present of riches a renowned son that shall sing of the gods, so that we may perform [our] [holy] deeds through the new poet And do ye, Heaven and Earth, protect us with the [other] gods

९ हे पवित्र अग्नी, देवांमध्यें देव [आणि] [आपल्या] आई बापाच्या उदरात जागृत राहणारा [जो] तू [तो] आमच्या जाता चे रक्षणकर्ता हो, आणि [आमच्या] कवीचें कल्याण करणारा [हो] हे कल्याणदायक अग्नी, सर्व [काहीं जें] वर [म्हणून आहे तें] तू देत असतोस.

9 Mayest thou, stainless Agni, who art the god among the gods [and] watchful in the [united] womb of [thy] parents (the heaven and the earth), be a protector to ourselves and a patron to [our] poet. Thou [it is that] givest all that is good

८ या मंत्राचा भावार्थ उघडच आहे तो हा की 'अग्नीची स्तुती मंत्रवक्त्यानं केली आहे त्यापेक्षा त्यानं प्रसन्न व्हावें, परंतु मंत्रवक्त्यास धनें न देतां त्या ऐवजीं कवि असा पुत्र द्यावा, आणि मग तो अग्नीचे गुण गाऊन आपल्या बापाचें यज्ञकर्म संपादील' यावरून दिसून येईल कीं, प्राचीनशाळा यज्ञ करीत तेव्हां जुनेच मंत्र म्हणून करीत असें नाहीं नवे मंत्र म्हणून आणि नवे रचून ते म्हणून करीत असत

'देवगुणगायक [पुत्र]'–'कारुम्' 'कारु' शब्दाचा अक्षरशः अर्थ 'कारु' असा आहे वाक्यांतील अर्थसंदर्भावरून जो अर्थ दिसला आणि जो भाष्यकारांनी केला तोच आम्हीं येथ केला आहे परंतु 'कारु' म्हणजे 'कवि' इतकाच नुसता अर्थ केला तरी चालेल, आणि मग 'कीर्तिमान् कवि धनाच्या द्रव्याऐवजीं दे' असा अर्थ केल्यास विशेष अडचण दिसत नाहीं

९ भावार्थ –'हे अग्नी सकल देवांमध्यें देव म्हणजे सर्व देवांपेक्षा देदीप्यमान आणि आपल्या आईबापांच्या उदरांत जागृत राहणारा म्हणजे विजेच्या रूपानें आकाशांत प्रकाशणारा असा जो

त्वम॑ग्ने प्रम॑तिस्त्वं पि॒तासि॑ न॒स्त्वं व॑य॒स्कृत्तव॑ जा॒मयो॑ व॒यम् ।
सं त्वा॒ राय॑: श॒तिन॒: सं स॑ह॒स्रिण॑: सु॒वीरं॑ यन्ति व्रत॒पाम॑दाभ्य ॥ १० ॥ ३३ ॥

त्वम् । अ॒ग्ने॒ । प्रऽम॑तिः । त्वम् । पि॒ता । अ॒सि॒ । न॒: । त्वम् । व॒यः॒ऽकृत् । तव॑ । जा॒मय॑: । व॒यम् ।
सम् । त्वा॒ । राय॑: । श॒तिन॑: । सम् । स॒ह॒स्रिण॑: । सु॒ऽवीर॑म् । य॒न्ति॒ । व्र॒त॒ऽपाम् । अ॒दा॒भ्य॒ ॥ १० ॥ ३३ ॥

भाषायाम्.

१०. हे अग्ने, त्वम् [अस्माकं] प्रमतिः (=अनुग्रहकर्ता), त्वं नः (=अस्माकं) पिता असि । त्वम् [अस्माकं] वयस्कृत् (=पोषणादिना आयुर्वर्धयिता) [असि] । वयं तव जामयः (=सबन्धिनः) [स्मः] । हे अदाभ्य (=अहिंसनीय, अप्रतारणीय) [अग्ने], त्वां [प्रति] शतिनो रायः (=शतसंख्याकाः संपदः) सं[यन्ति], [त्वां] सुवीरं व्रतपाम् (=अतिशयेन शूर यज्ञादिकर्मणो रक्षक प्रति) सहस्रिणो [रायः] (=सहस्रसंख्याकाः संपदः) संयन्ति (=संगच्छन्ते) ॥

तू, तो आम्हां स्वताहाचें संरक्षण करणारा हो, आणि आमचा जो हा कवि आमच्याकरितां स्तोत्रें रचून आम्हांस देत आहे अथवा आमच्याकरितां स्तोत्रें म्हणत आहे, त्याच्यावर तू प्रसन्न हो. कारण सर्व काहीं या जगांत चांगलें म्हणून जें आहे तें तूंच देत असतोस, दुसरा कोणी देत नाहीं.'

'आईबापांच्या उदरांत जागृत राहणारा'='पित्रोरुपस्थे जागृविः'. वर 'द्यु' म्हणजे आकाश तो बाप, आणि खालीं 'पृथ्वी' ती माता; यांचा जो मध्यभाग तें अग्नीच्या आईबापांचे उदर (गर्भाशय) असें म्हणणें या अलङ्कारांत मोठें सौंदर्य आहे यांत संशय नाहीं. बापापृथ्व्यांस अग्नीचीं आईबापें या ठिकाणीं म्हटलीं आहेत यांविषयीं पर चवथा मंत्र व त्यावरची टीप पाहा..

या मन्त्रावरून असें समजावयाचें कीं, अग्नीचें (अथवा दुसऱ्या कोणत्याहि देवाचें) भजन (म्हणजे यज्ञ) करून सेवा करणारे जे असत त्या सर्वांस स्वताहा कविता करतां येत नसे, म्हणून ते पूर्वी तिसऱ्या कोणी तरी रचिलेली कविता म्हणजे मंत्र म्हणण्यासाठीं अथवा नवीन रचून प्रसंगाच्या वेळीं म्हणण्यासाठीं एकाद्या कवीची योजना करीत. त्याला 'कारु', 'विप्र', 'ब्राह्मण', 'ऋषि', 'कवि,' 'होता', 'स्तोता' अशी संज्ञा असे. आणि जे यज्ञ अथवा उपासना करीत त्यास 'यजमान', सुतवान्', 'दाश्वान्', 'सुन्वन्', 'सूरि' इत्यादि संज्ञा असत. म्हणूनच या मंत्रांत 'आम्हांस म्हणजे उपासकांस आणि आमच्या कवीस म्हणजे स्तोत्रें रचणारास अशा उभयतांसाहि प्रसन्न हो' अशा अर्थाची प्रार्थना आहे

१०. हे अग्नी, तूं [आमची] काळजी घेणारा, तूं आमचा पिता होस, तूं [आमचा] वाढविणारा [आहेस], आम्ही तुझे सगे [आहों]. हे अप्रतिहत [अग्नी], शुभकर्मांचा भंग न होऊं देणारा [जो] महाशूर तूं [त्या तुज]जवळ शतशः संपत्ती वाहत येतात, [त्या तुजजवळ] सहस्रशः संपत्ती वाहत येतात.

10. Thou, Agni, [art] [our] patron, thou art our father, thou [our] nourisher; we [are] thy kinsmen. To thee, uninjurable [Agni], riches flow by hundreds, to [thee] who art most valorous and the supporter of [the] ordinances, [riches] flow by thousands.

---

१०. या मंत्रांत कांहीं कठिण नाहीं. अग्नीवर उपासकांची भक्ति कशी आहे आणि त्याजवर ते किती भरंवसा राखीत ते मात्र ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

'आपली आज्ञा सर्वत्र चालविणारा'= 'व्रतपाम्.' म्हणजे यज्ञादिकांनी देवांचें यजनपूजन लोकांकडून करविणारा, लोक तीं न सोडीत असें करणारा, मनुष्यें आपापलीं कर्तव्यकर्में करीत असें करणारा, सत्कर्मांचा नाश न होऊं देणारा. 'व्रतपा' हें विशेषण अग्नीस बरेच स्थळीं ऋग्वेदांत लाविलेलें आढळतें. उदाहरणार्थ, "स जायमानः परमे व्योमनि व्रतान्यग्निर्व्रतपा अरक्षत" (ऋ. ६. ८. २) ='तो कर्मांचा रक्षक अग्नि उंच आकाशांत उपजतांच कर्मांचें रक्षण करिता झाला;' "त्वमग्ने व्रतपा असि देव आ मर्त्येष्वा"='हे अग्नी, तूं देवांमध्यें आणि मनुष्यांमध्यें कर्मसंरक्षक आहेस', (ऋ. ८. ११. १), म्हणजे कोणी मनुष्य आपआपलें कर्तव्यकर्म न सोडी असें करणारा. परंतु 'व्रतपा' म्हणजे 'आपलें शासन अथवा हुकूम लोकांकडून मानविणारा अथवा चालविणारा' असाहि अर्थ प्रस्तुत मंत्रांत आणि उतरून घेतलेल्या मंत्रांत चांगला संभवतो.

'अप्रतिहत [अग्नी]'='अदाभ्य.' म्हणजे ज्याचें वाईट करण्याविषयीं, ज्याला ठकविण्याविषयीं अथवा ज्याला उपद्रव करण्याविषयीं कोणी शक्तिमान् नाहीं असा.

त्वाम॑ग्ने प्रथ॒मम॒ायुम॒ायवे॑ दे॒वा अ॑कृण्व॒न्नहु॑षस्य वि॒श्पति॑म् ।
इळा॑मकृण्व॒न्मनु॑षस्य॒ शास॑नीं पि॒तुर्यत्पु॒त्रो मम॑कस्य॒ जाय॑ते ॥ ११ ॥

त्वाम् । अ॒ग्ने॒ । प्र॒थ॒मम् । आ॒युम् । आ॒यवे॑ । दे॒वाः । अ॒कृ॒ण्व॒न् । नहु॑षस्य ।
वि॒श्पति॑म् ।
इळा॑म् । अ॒कृ॒ण्व॒न् । मनु॑षस्य । शास॑नीम् । पि॒तुः । यत् । पु॒त्रः ।
मम॑कस्य । जाय॑ते ॥ ११ ॥

भाषायाम्.

११ हे अग्ने, यद् (=यदा) ममकस्य (=मदीयस्य) पितु (=अङ्गिरस) पुत्रो जायते [स्म] (=त्व पुत्र अजायथा), [तदा] देवा त्वाम् आयवे (=मनुष्याय, मनुष्येभ्य, मनुष्यार्थम्) आयु (=मनुष्यरूपिण) नहुषस्य (=मनुष्यस्य, मनुष्याणां) प्रथम विश्पतिं (=राजानम्) अकुर्वन्, इळाम् (=एतन्नामकां देवां [च] मनुषस्य (=मनुष्यस्य=मनुष्याणां) शासनीं (=धर्मोपदेशकर्त्रीम्) अकुर्वन् ॥

११ हे अग्नी, जेव्हा माझ्या बापाला [तू] पुत्र झाला[स] तेव्हा तुला देवानीं माणसासाठीं माणसाचा मनुष्यरूपी पहिला राजा केला, [आणि] इळेला माणसाची धर्मोपदेशकर्त्री केली.

11 Thee, Agni, the gods made the first human king of men for human beings, [and] they made Ilâ teacher of men, when [thou] was[t] born a son to my father.

---

११ या मंत्राचा भावार्थ असा दिसतो कीं, 'हे अग्नी, तू माझ्या बापास (म्हणजे अंगिरा या नांवाच्या ऋषीस) पुत्र जन्मलास, तेव्हां तुला देवानीं मनुष्यांचा राजा केला, आणि तू जो राजा झालास तोच या पृथ्वीवर मनुष्यांचा पहिला राजा होय आणि तू मनुष्यरूपी राजा झालास, तुझ्या साधारण नेहमीच्या रूपानें झाला नाहींस, आणि तुला जेव्हां तुझ्या जन्मकाळीं मनुष्यांचा राजा केला, तेव्हां इळादेवीस मनुष्यांची धर्मोपदेशकर्त्री केली'

तथापि हा मंत्र कठिण आहे असें म्हणणें भाग आहे यांत 'नहुषस्य' हें पद आणि 'पितुर्यत् पुत्रो ममकस्य जायते' हा चवथा चरण हे कठिण आहेत यांपैकीं 'नहुषस्य' याचा अर्थ प्रयोगान्तरास अनुसरून आणि सदरहू चवथ्या पादाचा सायणाचार्यास अनुसरून आम्हीं केला आहे 'इळा देवी' म्हणजे यज्ञांत जें हवि अर्पण करावयाचें तद्रूपी देवता अथवा हवीच्या बरोबर स्तुति होत असते त्या 'स्तुतीची' देवता. इळादेवी ही अग्नीची माता होय असें कोठकोठे सांगितलें आहे, आणि तो संबंध प्रस्तुत मंत्रांतहि विवक्षित दिसतो ऋ ३ २९ ३ यांत 'इळायास्पुत्रो वयुनेऽजनिष्ट' असें अग्नीविषयीं लिहिलें आहे

परंतु 'माझ्या बापाला पुत्र झाला' याचा अर्थ माझ्या बापाला म्हणजे मी जो कवि हिरण्यस्तूप त्याचा बाप म्हणजे अंगिरा त्याचा पुत्र अग्नि झाला, असा अर्थ करावा लागतो वास्तव हिरण्यस्तूपाच्या बापाला अग्नि हा पुत्र झाला असें इतर ठिकाणीं कोठें जोंपर्यंत आढळत नाहीं, तोंपर्यंत आम्हीं (सायणाचार्यास अनुसरूनच) केलेला अर्थ केवळ निरुपायासाठीं ग्रहण करावयाचा आहे

एकंदरींत हा मंत्र कठिण आहे असें म्हटलं पाहिजे

त्वं नो अग्ने तव देव पायुभिर्मघोनो रक्ष तन्वश्च वन्द्य ।
त्राता तोकस्य तनये गवामस्यनिमेषं रक्षमाणस्तव व्रते ॥ १२ ॥

त्वम् । नः । अग्ने । तव । देव । पायुऽभिः । मघोनः । रक्ष । तन्वः । च । वन्द्य ।
त्राता । तोकस्य । तनये । गवाम् । असि । अनिऽमेषम् । रक्षमाणः । तव । व्रते ॥ १२ ॥

त्वमग्ने यज्यवे पायुरन्तरोऽनिषङ्गाय चतुरक्ष इध्यसे ।
यो रातहव्योऽवृकाय धायसे कीरेश्चिन्मन्त्रं मनसा वनोषि तम् ॥ १३ ॥

त्वम् । अग्ने । यज्यवे । पायुः । अन्तरः । अनिषङ्गाय । चतुःऽअक्षः । इध्यसे ।
यः । रातऽहव्यः । अवृकाय । धायसे । कीरेः । चित् । मन्त्रम् । मनसा । वनोषि । तम् ॥ १३ ॥

भाषायाम्.

१२ हे वन्द्य देव अग्ने, त्वं तव पायुभिः (=रक्षणैः) नः (=अस्माकं) मघोनः (=हविर्दत्तवतो यजमानान्) तन्वः (=तनूः=अस्मान्) च रक्ष । [त्वं हि] तोकस्य (=अपत्यानां), तनये (=तनयानाम्=अपत्यानां यानि अपत्यानि तेषां), गवां (=पशूनां) [च] अनिमिषं (=सदैव) त्राता असि तव व्रते (=कर्मणि=आज्ञानुष्ठाने) [तवोपासकान्] रक्षमाणः (=रक्षितासि) ॥

१३ हे अग्ने, त्वम् अनिषङ्गाय (=इषुधिहीनाय=रक्षणरहिताय) यज्यवे (=यजमानाय, यजमानं रक्षितुम्) अन्तरः (=प्रियः समीपतरो वा) चतुरक्षः (=चतुर्नेत्रः) पायुः (=रक्षकः) [इति कृत्वा] इध्यसे (=समिध्यसे=दीप्यसे) । यः [कीरिः=स्तोता] अवृकाय (=अनुपद्रवकारिणे=हितकारिणे) धायसे (=पोषकाय) [तुभ्यं] रातहव्यः (=हव्यं दत्तवान्) [भवति], तं कीरेश्चित् मन्त्रं (=तस्यैव कीरेः स्तोतुर्मन्त्रं स्तोत्रं) [त्वं] मनसा (=त्वदीयेन चित्तेन=प्रीत्या) वनोषि (=संभजसि) ॥

१२. हे वंद्य देवा अग्नी, तूं हवि देणाऱ्या आमच्या यजमानांस आणि स्वतः आम्हांस आपल्या रक्षणांनीं रक्ष. [कां कीं] तूं आमच्या मुलांचा, नातवांचा, [आणि] गुरां[ढोरां]चा रक्षणकर्ता आहेस, आणि तूं [उपासकांस] त्वा घालून दिलेल्या मार्गांत सदैव टेवीत असतोस.

12. Do thou, worshipful *god Agni, protect* our sacrificers and our own selves. [For] thou art the saviour of our children, grand-children and cattle, and ever keepest [thy worshippers] in thy ordinances.

१३. हे अग्नी, तूं रक्षणहीन उपासका[च्या हिता]साठीं प्रिय [आणि] च्यार डोळ्याचा रक्षणकर्ता [म्हणून] पेटविला जातोस. तुला हितकारकाला [आणि] पोषणकर्त्याला जो स्तोता हवि अर्पण करितो त्याचेंच स्तोत्र तुला मनापासून आवडतें.

13. Thou, Agni, art kindled [as] a dear [and] four-eyed protector for the defenceless sacrificer. He who has given an oblation to [thee] the unharmful supporter—of that praiser *only thou heartily lovest* the prayer.

१२. या मंत्रांत मंत्रवक्त्याचा भावार्थ असा आहे की, 'हे अग्नी, हें स्तोत्र रचून म्हणणारे जे आम्ही कवि (=म्हणजे जो मी कवि) त्याचे जे यजमान त्यांस तूं आपल्या रक्षण करण्याच्या अनेक प्रकारांनीं रक्ष, आणि आमचें स्वताहाचेंहि तसेंच रक्षण कर. आणि रक्षण करण्यास तुला कठिण नाहीं. कारण कीं, तूं मुलांबाळांचें नातवांपणत्वांचें आणि आमच्या गुरांढोरांचें रक्षण करून आम्हांस त्वां घालून दिलेल्या सन्मार्गी नित्य रक्षण करीतच असतोस.'

या मंत्रांत 'तनये' हा शब्द जरा कठिण आहे त्याचा अर्थ तर आम्हीं वर सायणास अनुसरून लिहिल्याप्रमाणेंच आहे. परंतु 'तनये' ही सप्तमी विभक्ती कां असावी इतका प्रश्न आहे. आम्हांस वाटतें कीं 'तोकस्य' आणि 'गवाम्' या षष्ठी विभक्तींच्या मध्ये 'तनये' हें पद आहे आणि त्याचा संबंध 'त्राता' याशीं घेतला पाहिजे यास्तव वृत्तसुखार्थ 'तनयस्य' या अर्थी सप्तमी घातली आहे.

'तन्वः' (=तनूः) या शब्दाचा अर्थ या मंत्रांत 'आम्हां स्वताहा' असा केला आहे. 'तनु' म्हणजे 'जो बोलतो तो स्वताहा' अशा अर्थी पुष्कळ प्रयोग वेदामध्यें येतात ऋ. २. १७. २ हा

त्वमग्न उरुशंसाय वाघते स्पार्हं यद्रेक्णः परमं वनोषि तत् ।
आध्रस्य चित्प्रमतिरुच्यसे पिता प्र पाकं शास्सि प्र दिशो विदुष्टर. ॥ १४ ॥

त्वम् । अग्ने । उरुऽशंसाय । वाघते । स्पार्हम् । यत् । रेक्णः । परमम् । वनोषि । तत् ।
आध्रस्य । चित् । प्रऽमतिः । उच्यसे । पिता । प्र । पाकम् । शास्सि । प्र । दिशः । विदुःऽतरः ॥ १४ ॥

भाषायाम्

१४ हे अग्ने, उरुशंसाय (=प्रभूतस्तोत्राय=भूय स्तोत्र कुर्वते) वाघते (=यजमानाय) यद् रेक्णो (=धन) स्पार्हम् (=इष्टम्) [अस्ति] तत् परमम् (=उत्तम) [रेक्ण] त्व [तस्मै] वनोषि (=ददासि) । [त्वम्] आध्रस्य चित् (=दुर्बलस्यापि) प्रमति पिता (=प्रकृष्टबुद्धियुक्त पिता) उच्यसे । विदुष्टर (=अतिशयेन विद्वान्) [त्व] पाकम् (=अज्ञ) दिश (=मार्गान्) प्रशास्सि, [त्व] प्र- [शास्सि] (=शिक्षयसि) ॥

मत्र आणि त्यावरील सायणभाष्य पाहा त्याप्रमाणेंच ३ १ १ हा पाहा

१३ तात्पर्य—'जो उपासक असा असेल कीं त्याचें रक्षण करणारा कोणी नाहीं, त्याचें रक्षण करण्याकरितां तुला पेटवितात, आणि तू त्याचा प्रिय रक्षक होऊन च्यारी बाजूंनीं रक्षण करितोस त कोणाचें वाईट करीत नसतोस आणि सर्वांचे पोषण करीत असतोस आणि तुला जो स्तोता हाव अर्पण करितो त्याचच स्तोत्र तुला मनापासून आवडतें '

रक्षणस्य'.हा अर्थ आम्हीं अनिषङ्ग' या शब्दाचा केला आहे 'निषङ्ग म्हणजे भत्ता', ज्यांत बाण भरून ठेवतात तो त्यावरून 'अनिषङ्ग' म्हणजे ज्याजवळ 'भत्ता' किंवा त्यासारिखीं दुसरा आपलें सरक्षण करण्याचा साधनें नाहात तो निषङ्गी' म्हणजे ज्यास भत्ते आहेत ते (उदाहरणार्थ ऋ ३ ३० १५, ५.५७ २ हे मत्र आणि त्याजवरील सायणभाष्य पाहा) असे असता सायणाचार्य येथे राक्षसांना ज्यास घेरलेलें नाहीं अशा यज्ञाकरितां' असा क्लिष्ट अर्थ कां करितात समजत नाहीं

१४. हे अग्नी, पुष्कळ स्तुति करणाऱ्या हविर्दात्याला जी [जो] उत्कृष्ट वस्तु इष्ट [असते], तीं [ती] तूं [त्याला] देत असतोस. तुला दीनाचाहि पालन करणारा पिता असें म्हणतात. महा विद्वान् तूं पामरालाहि मार्ग दाखवितोस.

14. Thou, Agni, givest that highest good to the much-praying sacrificer that [is] desired [by him]. Thou art called the supporting father of even the poor. Thou the greatest sage teachest the ignorant the ways.

---

१४. हा मंत्र स्पष्टच आहे. परंतु एक दोन शब्दांविषयीं थोडेसें येथें लिहिलें पाहिजे. 'पुष्कळ स्तुति करणाऱ्या' हा अर्थ आम्हीं 'उरुशंसाय' या विशेषणाचा केला आहे. सायणाचार्य 'ज्याची (यजमानाची) पुष्कळांनीं स्तुति करावी' असा कर्मणि अर्थ करितात. आमचा अर्थ विशेष सरळ आणि सयुक्तिक आहे इतकेंच नव्हे पण त्याला सायणोक्तींचेंहि प्रमाण आहे; "शं यत् स्तोतृभ्य आपये भवात्युरुशंसाय सवितर्जरित्रे" (ऋ. २. ३८. ११) यावरील त्यांचें भाष्य पाहा.

'देत असतोस'='वनोषि.' या अर्थास ऋ. ७. १५. ४; ६. १६.२८ (अग्निर्नो वनते रयिम्); १. १६२. २२ (क्षत्रं नो अश्वो वनतां हविष्मान्) इत्यादि अनेक प्रमाणे आहेत.

त्वम॑ग्ने प्रय॑तदक्षिणं नरं॒ वर्मे॑व स्यूतं॒ परि॑ पासि विश्वतः॑ ।
स्वा॒दुक्षद्मा॒ यो व॑स॒तौ स्यो॑न॒कृज्जी॑वया॒जं यज॑ते॒ सोप॒मा
दि॒वः ॥ १५ ॥ ३४ ॥

त्वम् । अ॒ग्ने॒ । प्रय॑तऽदक्षिणम् । नर॑म् । वर्म॑ऽइव । स्यू॒तम् । परि॑ । पा॒सि॒ ।
वि॒श्वतः॑ ।

स्वा॒दुऽक्ष॑द्मा । यः । व॒स॒तौ । स्यो॒न॒ऽकृत् । जी॒व॒ऽया॒जम् । यज॑ते । सः ।
उ॒प॒ऽमा । दि॒वः ॥ १५ ॥ ३४ ॥

भाषायाम्.

१५. हे अग्ने, प्रयतदक्षिणं (=येन दक्षिणा दत्तारित तं) नरं (=मनुष्य), स्यूतम् (=अङ्गोपरि परिहित सूच्यादिना दृढीकृत च) वर्म इव (=कवचं यथा) [परिपाति] [तद्वत्] त्वं विश्वतः (=सर्वत.) परिपासि (=सम्यक्पालयसि) । यो [नर] स्वादुक्षद्मा (=स्वाद्वन्न.) [सन्] वसतौ (=स्वगृहे) [अतिथिभ्यः] स्योनकृत् (=सुखासनदानादिना सुखकारको) [भवति], जीवयाजं (=जीवानिष्पाद्य यत्त) यजते (=अनुतिष्ठति) [च], स दिव उपमा (=द्युलोकस्य समीपतरो) [भवति] ॥

१५. हे अग्नी, जो मनुष्य दक्षिणा देतो त्याला, अंगावर घातलेलें कवच [रक्षण करितें], तसा तू चहूंकडून रक्षितोस. जो [कोण] मिष्ट पक्वान्नानीं [आपल्या] घरीं [अतिथींस] संतुष्ट करितो [आणि] जीवंत प्राणी बळी देतो तो दिव्य लोकाच्या अतिसंनिध [राहतो].

15. Thou, Agni, protectest from all sides, like an armour that is sewed on, the man that has given largesses [in the sacrifice]. He who has in [his] house sweet dainties [and] is hospitable [and] offers a sacrifice with a live animal, [goes] nearest to the heaven

१५. हा मंत्र कठिण आहे असें नाहीं. पण त्यांत सांगितलेल्या गोष्टी ध्यानांत ठेवण्याजोग्या आहेत. मंत्रकर्ता म्हणतो, 'जो मनुष्य यज्ञांत स्तोत्यांस दक्षिणा म्हणजे देणगी देतो तो अग्नीला इतका प्रिय होतो कीं, अग्नि त्याचें चहूंकडून संरक्षण करितो; आणि जो मनुष्य आपल्या घरीं गोडगोड पक्वान्नें करून आणि आसन वगैरे चांगले देऊन अतिथींस संतोष करितो आणि जीवंत प्राणी मारून त्याचें मांस अग्नीस वगैरे अर्पण करितो तो स्वर्गाचे अगदी जवळ जातो.'

यावरून जे स्तोते म्हणजे विद्वान् कवि यज्ञ करण्याचे कामीं लावीत त्यांस दक्षिणा म्हणजे मोल देऊन लावण्याची चाल प्राचीन आहे असें दिसतें आणि मिष्ट भोजन देऊन वगैरे अतिथीची संभावना करणें हे फार स्तुत्य आहे असेंहि फार प्राचीन काळापासून आमचे पूर्वज समजत आले आहेत. तिसरी गोष्ट म्हणजे जीवंत प्राणी मारून बळी देण्याविषयाची तिजविषयीं व त्याविषयीं काय काय विचार आपल्या मनांत येतात तें उघडच आहे, त्यासंबंधी विशेष लिहावयास नको.

'दिव्य लोकाच्या अति संनिध [राहतो]'='दिव उपमा'. 'उपमा' हें येथें क्रियाविशेषण होय. या अर्थाला प्रमाणभूत एक प्रयोग ऋ. ८.६९.१३ या मंत्रांत आहे. दुसरे प्रयोग आढळत नाहीत. पण 'उपमा' म्हणजे सांनिध्य. आणि 'उपमा' ही 'उपमया' अथवा 'उपमायाम्' या अर्थी तृतीया अथवा सप्तमी वेदांत संभवते.

इमामग्ने शरणिं मीमृषो न इममध्वानं यमगाम दूरात् ।
आपिः पिता प्रमतिः सोम्यानां भृमिरस्यृषिकृन्मर्त्यानाम्
॥ १६ ॥

इमाम् । अग्ने । शरणिम् । मीमृषः । नः । इमम् । अध्वानम् । यम् ।
अगाम । दूरात् ।
आपिः । पिता । प्रऽमतिः । सोम्यानाम् । भृमिः । असि । ऋषिऽकृत् ।
मर्त्यानाम् ॥ १६ ॥

भाषायाम्.

१६. हे अग्ने, [वयं] यमिममध्वानं दूराद् अगाम (=यदिमं मार्गं दूराद् गतवन्तः=यद् मार्गं परित्यज्य एव दूराद्गतवन्तः सन्मार्गं त्यक्त्वा एवम् असन्मार्गेण गतवन्तः) इमां (=तां मार्गापगमनरूपां) नः (=अस्माकं) शरणिम् (=अपराधम्) [अ]मीमृषः (=मर्षय=क्षमस्व) । [त्वं हि] सोम्यानां (=सोमसमर्पयतां) मर्त्यानाम् आपिः (=बान्धवः), पिता, प्रमतिः (=प्रकृष्टमतियुक्तो नाथः), भृमिः (=भरणस्य पोषणस्य कर्ता) ऋषिकृत् (=ऋषित्वदाता) [च] असि ॥

१६. हे अग्नी, [आम्ही] मार्ग सोडून जे असे चाललो तो हा आमचा अपराध तूं क्षमा कर. [कारण कीं,] [तू] सोमपान करणाऱ्या मर्त्यांचा बाधव, पिता [आणि] नाथ आहेस [आणि] त्याचा पोषणकर्ता [असून] त्यास ऋषि करणारा [आहेस].

16. Agni, pardon us this our sin that we have thus gone astray from the road [For] [thou] art the friend, the father, the supporter, the nourisher [and] the inspirer of the mortals that offer the Soma [to thee]

१६ 'मार्ग सोडून जे असे चाललों तो हा आमचा अपराध'='इमम् अध्वान यम् अगाम दूरात्' अक्षरशः अर्थ, 'जो हा मार्ग आम्ही दुरून चाललो आहों' म्हणजे, 'मार्ग सोडून असे आडमार्गानें जे आम्ही चाललों,' तो हा आमचा अपराध इ०. मार्ग म्हणजे आपले कर्तव्य कर्म सोडून आम्ही जे अशा प्रकारें भलभलतेंच करितों तो अपराध 'अशा प्रकारें' म्हणजे ज्या प्रसगात अनुलक्षून मंत्रवक्ता बोलत असेल त्यात जे आड-मार्गाचें वर्तन झाले असेल त्या रीतीनें; 'आम्हीं हें जें काहीं पातक केलें असेल त्याची क्षमा कर'.

अग्नि क्षमा करील यांत मत्रयक्त्याला सशय नाहीं कारण बाप आपल्या मुलाचे अपराध क्षमा कीत असतो आणि अग्नि हा या मत्रवक्त्यासारिखे जे सोम अर्पण करणारे मर्त्य आहेत त्यांचा बाप, बांधव, काळजी घेणारा, आणि पोषण करणारा आहे, आणि तो त्यास ऋषि करितो, म्हणजे कवि करितो, मंत्र रचण्याची शक्ति त्यास देतो

या मत्रांत 'पोषणकर्ता' हा अर्थ आम्हीं 'भृमि' या शब्दाचा केला आहे. 'भृमि' हा शब्द वेदांत पुष्कळ ठिकाणीं येत नाहीं आम्हीं याचा अर्थ 'भृ'='भरणें', 'पोसणे' या धातूपासून 'पोषणकर्ता' असा केला आहे (जसा 'कृ' अथवा 'चृ'='चलन करणे' यापासून 'कृमि'—'क्रिमि' यापेक्षा, 'कृमि' हें रूप शुद्ध दिसतें—हा शब्द निघाला आहे तसा 'भृ' पासून 'भृमि') ऋ ४. ३२. २ यांत "भृमिश्चिद् असि तूतुजि", असे इंद्राला म्हटलें आहे, आणि ऋ. ७ ५६. २० यांत "इमे रध्र चिन्मरुतो जुनन्ति भृमिं चिद्यथा वसवो जुषन्त" असे मरुतांविषयीं म्हटले आहे, या दोनी स्थळीं प्रस्तुत मत्रांत आम्हीं केलेला अर्थ जुळत नाहीं असें दिसत नाहीं सायणाचार्य व इतर कितीएक विद्वान् या सर्वस्थळीं 'भ्रम्' यापासून व्युत्पत्ती करून 'फिरणारा,' भटकणारा', 'चपल' अथवा 'गरीब' इत्यादि अर्थ करितात पण हे अर्थ ऋ ३. ६२ १ यांत, आणि २ ३४ १ यांत हा शब्द आला आहे त्यांत जुळतो तो तेथें घ्यावा आणि आम्हा केलेला येथें घ्यावा असे आम्हांस वाटतें हीं जी वर पांच स्थळें सांगितलीं इतक्यांतच 'भृमि' शब्द आला आहे. दुसरीं अजून उपलब्ध नाहींत

मनुष्वद॑ग्ने अङ्गिरस्वद॑ङ्गिरो ययातिवत्सद॑ने पूर्ववच्छुचे ।
अच्छ याह्या वहा दैव्यं जनमा साद॑य बर्हिषि यक्षि च
प्रियम् ॥ १७ ॥

मनुष्वत् । अग्ने । अङ्गिरस्वत् । अङ्गिरः । ययातिऽवत् । सद॑ने । पूर्वऽवत् ।
शुचे ।
अच्छ । याहि । आ । वह । दैव्य॑म् । जन॑म् । आ । सादय । बर्हिषि ।
यक्षि । च । प्रियम् ॥ १७ ॥

भाषायाम्.

१७ हे अग्ने, हे अङ्गिरः, हे शुचे (=पवित्र) [अग्ने], [त्वं] मनुष्वत (=मनुषो नाम मनुष्याणामादिपुरुषस्य सदने यथा आया तद्वत्), अङ्गिरस्वत (=अङ्गिरसामृषीणां सदने यथा आया तद्वत्), ययातिवत् (=ययातिनामकस्य कस्यचित् प्रख्यातस्य राज्ञः सदने यथा आया तद्वत्), पूर्ववत् (=अस्माकं ये पूर्वे पूर्वपुरुषास्तेषां सदने यथा आया तद्वत्) [च] [अस्माकं] सदने अच्छयाहि (=आयाहि)। दैव्यं जनं (=देवजातिं=सकलान्देवान्) आवह (=आनय)। [तान्] आ बर्हिषि (=एतद्दर्भास्तरणोपरि) [नि]षादय (=उपवेशय)। प्रियं [हवि] यक्षि च (=यजे =यजनं कृत्वा अर्पय च) ॥

'ऋषि करणारा [आहेस]'='ऋषिकृत्' उपासकाची जी कोणी इष्ट देवता असेल ती त्याला ऋषि (अथवा कवि) करू शकते आणि तिने त्यास कवि करावे अशी प्रार्थना पूर्वी एकदा आली आहे सूक्त १० मंत्र ११ यावरील टीप ७३ च्या पृष्ठावर पाहा. त्यांतील प्रार्थना इंद्रास केली आहे. प्रस्तुतचें वर्णन अग्निविषयीं आहे. ऋ ३ ४३ ५ यांतल्या मंत्राचा कर्ता इंद्रास म्हणतो, "कुविन्मा गोपां करसे जनस्य कुविद् राजानं मघवन् ऋजीषिन् । कुविन्म ऋषिं पपिवांसं सुतस्य" इ०=हे मघवन्, तू मला लोकांवर अधिकारी करशील काय? मला राजा करशील काय? सोम पिणारा असा ऋषि मला करशील काय?' इ०.

यावरून एक गोष्ट अशी उघड होते कीं, 'ऋषित्व' तपोबळानें येत होतें आणि ऋषींची शक्ति व अधिकार आणि योग्यता ही देवांपेक्षांहि अधिक होती, अशी जी पुराणादिकांवरून आमची समजूत झाली आहे ती निराधार समजली पाहिजे वरें कोणी व कश्चित् भक्त आपणास ऋषि करण्याविषयी वेदांत प्रार्थना करीत असतो असेंहि समजू नये. कारण कीं, आम्हांस आलीकडे जे ऋषींमध्ये प्रमुख ऋषि ऐकून

१७. हे अग्नी, हे अंगिरा, हे पवित्र [अग्नी], [तू] मनूच्या [घरीं येत होतास] तसा, अंगिराच्या [घरीं येत होतास] तसा, ययातीच्या [घरीं येत होतास] तसा, [आणि] [आमच्या] पूर्वजांच्या [घरीं येत होतास] तसा [आज] [आमच्या] घरीं ये, [आणि] सगळ्या देवांस आण, [आणि] त्यांस [या आमच्या] दर्भासनीं बसीव [आणि] [त्यांला] प्रिय [हवि] अर्पण कर.

17. O Agni, O Angiras, O pure [one], come [thou] to [our] house as [thou camest] to [the house of] Manu, as [thou camest] to [the house of] Angiras, as [thou camest] to [the house of] Yayâti, as [thou camest] to [the house of our] ancestors; bring hither [and] seat all the gods, on the *kus'a*-[grass] [and] offer [to them] the oblation they love

ठाऊक आहेत त्यांत 'वसिष्ठ' हा श्रेष्ठ आहे; पण तोहि मूळचा 'ऋषि' नव्हता आणि त्याला मागाहून वरुणानें ऋषि केला असें तोच आपल्या तोंडानें ऋ. ७ ८८ ४ या (वसिष्ठकृत) मंत्रांत सांगतो. "वसिष्ठं ह वरुणो नाव्याधादृषिं चकार"='वरुणानें वसिष्ठाला (म्हणजे मला मंत्रकर्त्याला) आपल्या नावेंत बसविलें आणि मला ऋषि केलें.' या पेक्षाहि चांगलें दुसरें प्रमाण, 'ब्राह्मण' म्हणजे केवळ ब्राह्मणाचा मुलगा अथवा 'ऋषि' म्हणजे ऋषीचा मुलगा नव्हे, आणि ब्राह्मणाच्या कुळांत जन्म घेतल्यानें ब्राह्मण होत नाहीं आणि ऋषीच्या कुळांत जन्म घेतल्यानें ऋषि होत नाहीं याविषयीं ऋ १० १२५ ५ यांत आहे तें असें.—या मंत्रांत आकाशवाणी ('वागाम्भृणी') म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराची वाचा बोलते आहे, आणि ती म्हणते कीं, "अहम् एव स्वयम् इद वदामि जुष्ट देवेभि उत मानुषेभि। यं कामये त तम् उग्र कृणोमि त ब्रह्माण तम् ऋषिं त सुमेधाम्॥"='हें माझें स्वताहाचें वचन आहे, [आणि] तें देवांस आणि मनुष्यांस समत आहे, [कीं] जो मला आवडतो त्याला [मी] बलवान् करितों, जो मला आवडतो त्याला [मी] ब्राह्मण करितों, [जो मला आवडतो] त्याला [मी] ऋषि [करितों] [आणि जो मला आवडतो] त्याला [मी] बुद्धिमान् [करितों].'

१७ 'हे अंगिरा' अग्नीस अंगिरा असें नांव असल्याविषयीं पूर्वीं (ऋ. १. १.६ यावरची टीप पृष्ठ ४) सांगितलेंच आहे. या ठिकाणीं इतकेंच अधिक सांगावयाचें आहे कीं, या सूक्ताचा कर्ता जो हिरण्यस्तूप ऋषि तो अंगिरस् कुळांतलि होता आणि त्यानें या सूक्ताच्या पहिल्या मंत्रांत अग्नीस

एतेनाग्ने ब्रह्मणा वावृधस्व शक्ती वा यत्ते चकृमा विदा वा।
उत प्र णेष्यभि वस्यो अस्मान्त्सं नः सृज सुमत्या वाजवत्या
॥ १८ ॥ ३५ ॥

एतेन । अग्ने । ब्रह्मणा । ववृधस्व । शक्ती । वा । यत् । ते । चकृम । विदा । वा ।
उत । प्र । नेषि । अभि । वस्यः । अस्मान् । सम् । नः । सृज । सुऽमत्या । वाजऽवत्या ॥ १८ ॥ ३५ ॥

भाषायाम्.

१८. हे अग्ने, यद् एतद् ब्रह्म (=स्तोत्र) शक्त्या वा (=अस्मदीयकवित्वशक्त्या=यथाशक्ति) विदा वा (=ज्ञानेन=यथाज्ञान) [वयं] ते (=तुभ्य=त्वदर्थं) चकृम (=कृतवन्तः स्मः), तेन [त्वम्] [अ]वीवृधः (=प्रसन्नो भाव्यस्व)। उत (=अपि च) अस्मान् अभि वसीयः (=उत्तमं श्रेयः प्रति) प्रणय। नः (=अस्मान्) वाजवत्या (=अन्नादिसंपन्नुक्तया) सुमत्या (=अस्मद्विषयया तव सुप्रसन्नबुद्ध्या) संसृज (=संयोजय)॥

अंगिरस कुळाचा आदिपुरुष असें म्हटलें आहे तें व त्यावरील टीप पाहा.

'मनूच्या' '[घरीं येत होतास] तसा' ='मनुष्वत्'. 'मनु' (अथवा 'मनुस्') हें मनुष्याचा आदिपुरुष मनु त्याचें नांव होय याविषयीं पूर्वी (चवथ्या मंत्रावरील टीपेंत) सांगितलेंच आहे. मंत्रकर्ता असें समजत आहे की, जसा आपण आपल्या घरीं अग्नीला प्रदीप्त करून होमहवन करीत आहे तसाच मनुष्य जातीचा आदिपुरुष मनुहि करीत होता. आम्ही जें (होम, हवन, बळि इत्यादि) करितों तेंच आमचे पुरातन वाडवडील करीत असत असें मानण्याविषयींचीं उदाहरणें दुसऱ्या लोकांच्या धर्मग्रंथांतहि आढळतात हें सांगायपास नकोच.

'अंगिराच्या घरीं' इ० या ठिकाणीं अंगिरा म्हणजे अंगिरस् कुळाचा जो कोण खरोखर आदिपुरुष होऊन गेला असेल, आणि ज्याच्या वरून त्या कुळास नांव पडलें, तो असावा असें दिसतें. (या सूक्ताच्या पाहिल्या मंत्रांत अग्नीस अंगिरस् कुळाचा आदिपुरुष म्हटलें आहे ती केवळ प्रशंसा होय.)

'ययातीच्या घरीं' इ०. हा 'ययाति' म्हणजे मागाहून भारतातील वगैरे ज्याविषयीं कथा प्रख्यात झाल्या आहेत, तोच प्रसिद्ध राजा समजला पाहिजे. परंतु या राजाविषयीं वेदांत फार सांगितलेलें नाहीं. ऋग्वेदांत तर हें नांव दोनदाच (ऋ १०. ६३. १) आलें आहे. आणि त्यांत इतकेंच आढळतें की, तो नहुषराजाचा पुत्र होय, आणि तो यज्ञयाग करीत असे इतकी प्रसिद्धि आहे. संहितोत्तर वैदिक ग्रंथांत त्याचि-

१८. हे अग्नी, हे जे [आम्हीं] [आमच्या] शक्तीप्रमाणें अथवा ज्ञानाप्रमाणे तुझे स्तोत्र केलें आहे ते ऐकरून [तू] प्रसन्न हो. आणि [तू] आम्हास उत्तम कल्याणाप्रत ने, [आणि] जिजपासून सपत्तीचा लाभ होईल अशी [तुझी] कृपा आम्हावर कर.

18 With this hymn, Agni, which we have made [as we could] for thee by [our] ability or [our] knowledge, allow thyself to be pleased. And lead us forth towards the highest good Show us thy favour, the source of prosperity.

षयीं लिहिलेलें आढळतेंच.

'मनुष्वत्', 'अङ्गिरस्वत्' आणि 'ययातिवत्' आणि 'पूर्ववत्' या पदांचा अक्षरशः अर्थ 'मनूप्रमाणे' 'अंगिरसाप्रमाणें' 'ययातीप्रमाणे' आणि 'पूर्वजाप्रमाणे', म्हणजे 'मनु आला तसा' 'अंगिरस् आला तसा' 'ययाति आला तसा' आणि 'पूर्वज आले तद्वत्' असा (कर्तरि) साधारण संस्कृतांत व्हावयाचा, परतु वेदांत आम्हीं येथें केल्याप्रमाणेहि होतो याविषयीं आधार.—ऋ १. ४६.१३ 'मनुष्वत् शंभू आगतम्'='हे कल्याणकारक [अश्वी] हो, तुम्ही मनूच्या घरीं आलां तसे येथे या' ऋ १, १०५. १३ "स न सत्तो मनुष्वदादेवान्यक्षि"='वास्तव तू येथें बसून मनूच्या घरीं देवांस यजन केलेंस तसें कर'. (या ठिकाणीं 'मनुष्याप्रमाणें' असाहि अर्थ संभवेल खरा) ऋ ४. ३७ ३. "जुह्वे मनुष्वत्...सोमम्"=मनूनें सोम अर्पण केला तसा मी करीत आहे' ऋ १ ४५ ३ "प्रियमेधवत् अत्रिवत् जातवेदः विरूपवत् । अङ्गिरस्वत् महिव्रत प्रस्कण्वस्य श्रुधि हवम्"='हे अग्नी, तूं प्रियमेधाची, अत्रीची, विरूपाची आणि अंगिराची हाक ऐकिलीस तशी मज प्रस्कण्वाची ऐक'. शिवाय ऋ ६. ४९. ११, ८. ४० १२ हेहि मंत्र पाहा.

'[त्याला] प्रिय [हवि] अर्पण कर'='यक्षि च प्रियम्' यांतील 'प्रियम' हे दैव्यं जन' याचें विशेषण घेतले तरी चालेल तसें केल्यास, 'प्रिय [असे जे] सकळ देव, त्यास आण [आणि] त्यांस [या आमच्या] दर्भांवर बसीव [आणि] त्यांजला [हवि] अर्पण कर' असें भाषांतर करावें

---

१८ हें एकतिसावें सूक्त येथें संपलें. आणि सूक्ताचा असावा तसा उपसहार या मंत्रांत आहे. एकदरींत हा मंत्र फार सुंदर आहे यांत संशय नाहीं. एक तर, यांत 'ब्रह्म' शब्दाचा मूळ अर्थ (स्तोत्र हा) पूर्वी (सूक्त ३ मंत्र ५ पृष्ठ १६ येथें) सांगितला आहे तो यांत आला आहे आणि ब्राह्मणाचें म्हणजे ब्राह्मणजातीचें आदिकारण 'ब्रह्म' (स्तोत्र) कसें तें या मंत्रांत योजिलेल्या ब्रह्मशब्दावरून दिसून येते दुसरें असें कीं, सूक्तका 'हे अनादि आणि अनंत वेदांतील सूक्त आम्हीं म्हटलें आहे तें ऐकरून तू प्रसन्न हो' असें म्हणत नाहीं, तर नम्र,

सूक्त ३२.

हिरण्यस्तूप आङ्गिरस ऋषि । इन्द्रो देवता । त्रिष्टुप् छन्द. ॥

इन्द्रस्य॒ नु वी॒र्या॑णि॒ प्र वो॑चं॒ यानि॑ च॒कार॑ प्रथ॒मानि॑ व॒ज्री ।
अह॒न्नहि॒मन्व॒पस्त॑तर्द॒ प्र व॒क्षणा॑ अभिन॒त्पर्व॑तानाम् ॥ १ ॥

इन्द्र॑स्य । नु । वी॒र्या॑णि । प्र । वो॒च॒म् । यानि॑ । च॒कार॑ । प्र॒थ॒मानि॑ । व॒ज्री । अह॑न् । अहि॑म् । अनु॑ । अ॒पः । त॒त॒र्द॒ । प्र । व॒क्षणाः॑ । अ॒भि॒न॒त् । पर्व॑तानाम् ॥ १ ॥

भाषायाम्.

१. नु (=इदानीम्) [अहम्] इन्द्रस्य वीर्याणि (=पराक्रमयुक्तानि कर्माणि) प्र[अ]वोचम् (=प्रब्रवाणि), यानि [वीर्याणि] वज्री [इन्द्र] प्रथमानि चकार (=प्रथम चकार) । [स हि] अहिं (=मेघ=वृत्रम्) अहन् (=हतवान्), [स] अप अनुततर्द (=तदन्तरं मोचितवान्=भूमौ पातितवान्) [स च] पर्वतानां (=मेघानां) वक्षणा. (=ऊधांसि=मेघोदकात्मकदुग्धस्य आशयान्) प्राभिनत् (=भिन्नवान्) ॥

दीन, अनाथ, शक्तिहीन, आणि अज्ञानी आम्ही मर्त्यांतून जसा एकादा भाविक पुरुष आलीकडे म्हणेल तसेंच हे अग्नी, यथाशक्ति आणि यथाज्ञान हे स्तोत्र तुजसाठीं रचिलें आहे' असें म्हणतो तिसरें असें कीं, उत्तरोत्तर आपली उन्नति व्हावी म्हणून आणि अग्नीची आपणावर कृपा व्हावी म्हणून कवि मोठ्या भाविकपणाने आणि नम्रपणानें प्रार्थीत आहे

हा व अशा प्रकारचे दुसरे वेदमन्त्र आम्हास सुदर व प्रिय कां व केव्हा लागतात? याचें उत्तर इतकेंच कीं, शक्तिमान् आणि ज्ञानमय देवापुढें शक्तिहीन् आणि अज्ञानी मनुष्य सर्वकाळीं, सर्वयुगीं, आणि सर्वस्थळीं एकसारिखाच असतो, त्याचा स्वभाव देशावरून किंवा युगावरून बदलत नाहीं असे या मंत्रांपासून दिसून येतें म्हणून ते फार सुदर आणि प्रिय लागतात; आणि तसे जें दिसून येतें ते आम्ह सोडून आपण कबूल केले तरच ते सुदर आणि प्रिय लागतील आम्ही जसे अल्पशक्तिमान्, अल्पज्ञानी, अल्पायुषी, आणि अनाथ आहो तसेच हिरण्यस्तूपादि जे महान् ऋषि तेहि होते

'कृपा'='सुमति' सायणाचार्य या स्थळीं 'सुमति' शब्दाचा अग्नीची कृपा अथवा अनुग्रह असा आम्ही केलेला अर्थ न करितां 'यज्ञ करावा अशी जी मन्त्रवक्त्याची सुबुद्धि ती' असा करितात; पण ऋ २ ३४ १५ यांतील "अर्वाची सा मरुत या या ऊति. ओ षु वाश्रा इव सुमति जिगातु" या अर्धर्चावरील त्यांचेंच भाष्य पाहा इतरहि अनेक प्रयोग आम्हास प्रमाणभूत असे आहेत

सूक्त ३२.

ऋषि—वरील सूक्ताचा जो हिरण्यस्तूप ऋषि तोच; देवता—इंद्र. वृत्त—त्रिष्टुप्.

१. प्रथम वज्रधारी [इंद्रा]नें जे पराक्रम केले [ते] इंद्राचे [पराक्रम] मी आतां वर्णितों. [तो] अहीस मारिता झाला; [आणि] [तो] उदकें मुक्त करिता झाला, [आणि] [तो] मेघांच्या कासी फोडिता झाला.

Hymn. 32.

To *Indra*. By *Hiranyastûpa*, author of the previous hymn. Metre—*Trishtubh*.

1. I will now sing forth the victories of Indra which the wielder of the thunderbolt achieved first: he slew the Serpent; he sent down the waters; he broke open the udders of the rain clouds.

---

१. हें सूक्त पूर्वीच्या सूक्ताच्या कर्त्यांचेंच आहे. आणि तें इंद्राविषयीं आहे. ऋग्वेदांत इंद्राविषयीं जीं कितीएक सुंदर सूक्तें आहेत त्यांपैकीं हें एक आहे.

सूक्तकर्ता सूक्ताला कसा आरंभ करितो तो पाहा. जसा आलीकडील एकादा कवि आपल्या कथेच्या नायकाचें वर्णन करण्यास आरंभ करील तसाच या सूक्ताचा कर्ता 'हिरण्यस्तूप' करीत आहे, आणि इंद्राचे पराक्रम आपण वर्णन करितो अशी प्रतिज्ञा करीत आहे.

पहिल्या मंत्रांत इंद्राचे तीन पराक्रम वर्णिले आहेत. परंतु तीन्ही मिळून एकच रूपकावर अवलंबून आहेत. तें रूपक हें कीं, मेघोदकरूपी गाईंस मेघरूपी जो वृत्र अवरोधून टाकितो आणि त्यांस भूमीवर यांहूं देत नाहीं आणि वरच्यावर आकाशांत कोंडून ठेवितो त्याजबरोबर इंद्रानें युद्ध करून त्याला मारिलें. (४६ व्या पृष्ठावरची टीप पाहा.) त्याच वृत्राचें नांव या मंत्रांत 'अहि' म्हणजे सर्प असें आहे. मेघरूपी वृत्राला सर्प असें त्याच्या आकृतीवरून म्हणण्याचा प्रचार पडला असावा. वृत्रास 'अहि' अथवा सर्प म्हणण्याचा प्रचार असल्याविषयीं वेदांत पुष्कळ उदाहरणें आहेत. तर त्या वृत्रास इंद्रानें मारिलें, हा त्याचा एक पराक्रम. त्याला मारून त्याणें कोंडून ठेविलेलीं मेघोदकें भूमीवर पाडिलीं, हा दुसरा पराक्रम. आणि तीं मेघोदकें खालीं पाडण्याच्या पूर्वीं ढग ह्याच कोणी ज्या गाई त्यांच्या कासी फोडिल्या, हा तिसरा पराक्रम. वृष्टि न होऊं देणारी जी कोणी एक कल्पिलेली शक्ति तिच्याशीं लढून म्हणजे मेघगर्जना व विद्युत्प्रादुर्भाव करून मेघ फोडून जमिनीवर पावसाचें पाणी पाडिलें इतकेंच तात्पर्य.

या मंत्रांत 'वक्षणा' हा एक शब्द कठिण आहे. हा सगळ्या ऋग्वेदांत ११ ठिकाणीं आला आहे, तीं सर्व स्थळें तपासून पाहतां एक स्थळ (६.७२.४)

अहन्नहिं पर्वते शिश्रियाणं त्वष्टास्मै वज्रं स्वर्यं ततक्ष ।
वाश्रा इव धेनवः स्यन्दमाना अञ्जः समुद्रमव जग्मुरापः ॥ २ ॥

अहन् । अहिम् । पर्वते । शिश्रियाणम् । त्वष्टा । अस्मै । वज्रम् । स्वर्यम् । ततक्ष ।

वाश्राःऽइव । धेनवः । स्यन्दमानाः । अञ्जः । समुद्रम् । अव । जग्मुः । आपः ॥ २ ॥

भाषायाम्.

२ [स] पर्वते (=मेघे) शिश्रियाण (=कृताश्रयम्) अहिं (=वृत्रम्) अहन् (=हतवान्) । [तस्मिन् प्रसङ्गे] अस्मै [इन्द्राय] त्वष्टा स्वर्यं (=शब्दयुक्त=गर्जत्) वज्र ततक्ष (=निर्ममे) । [अनन्तर], वाश्रा (=वत्सान्प्रति हम्भारवोपेता) धेनव [सहसा वत्सगृह गच्छन्ति] तद्वत्, स्यन्दमाना (=प्रस्रवणयुक्ता) आप समुद्रमञ्ज (=समुद्र प्रति शीघ्रम्) अवजग्मु ॥

खेरीज करून सायणाचार्य निघटूस व यास्कास अनुसरून सर्व ठिकाणी नदी असा अर्थ करितात, परंतु या शब्दाचा अर्थ तसा बसत नाहीं बहुतकरून कास (गाईची वगैरे), उदर (मातेचें वगैरे की ज्यांतून जन्म होतो) हा अर्थ संभवतो, आणि नीट बसतो हा शब्द नित्य बहुवचनान्त आढळतो सायणाचार्यांनींहि ६ ७२ ४ या मंत्रांत कास असा अर्थ केला आहे तोच आम्हा येथ घेतला आहे "गर्भं माता सुधित वक्षणासु बिभर्ति' १० २७ १६; "सा व प्रजां जनयद्वक्षणाभ्य" अ० १४ २.१४; "आते ददे वक्षणाभ्य आतेऽहं हृदयाद्ददे" ७.११४.

२. [तो] पर्वताचा आश्रय करून राहणाऱ्या अहीस मारिता झाला; [तेव्हां] त्या [इंद्रा]साठीं त्वष्टा [देव] गर्जणारें वज्र निर्माण करून देता झाला. मग उदकें खालीं गळून हंबरणाऱ्या गाईप्रमाणें समुद्राकडेस त्वरेनें वाहून गेलीं.

2. He slew the Serpent who had taken shelter in the mountain. [On that occasion] Tvashṭâ fashioned for him the rumbling thunderbolt. Like milk-cows lowing [for their calves] the waters trickled down and quickly flowed to the sea.

---

२. वरच्या मंत्रांत जें सांगितलें तेंच या मंत्रांत आहे. विशेष इतकेंच कीं, इंद्रानें वृत्राशीं (=पाण्याला अवरोधून ठेवणाऱ्या मेघरूपी शत्रूशीं) युद्ध केलें तेव्हां त्वष्टा म्हणून जो देवांचा विश्वकर्मा म्हणजे सुतार (सूक्त १३, मंत्र१० यावरील टीप ९८ व्या पृष्ठावर पाहा) त्याणें इंद्राला वज्र करून दिलें. (तेथपासून वज्र इंद्राच्या हातीं आलें पूर्वीं नव्हतें) मग इंद्र अहीशीं लढून त्याणें उदकें मोकळीं केलीं, म्हणजे पर्जन्यवृष्टी केली. तेव्हां जशा गाई आपल्या वासरांची आठवण करून हंबरडा फोडीत गोठ्याकडे धांवतात आणि त्यांस पान्हा फुटून त्यांच्या कांसेंतून दूध वाहूं लागतें तशीं उदकें आकाशांतून खालीं गळलीं आणि एकत्र होऊन नदीरूपानें मोठ्या झपाट्यानें समुद्राकडेस वाहून गेलीं. हा इंद्राचा विशेष पराक्रम या मंत्रांत वर्णिला आहे.

मेघोदकांस हंबरणाऱ्या गाईची जी उपमा दिली आहे त्यांत आर्यलोकांची प्राचीनकाळीं राहण्याची साधी रीति दिसून येते. व त्यांच्या वाणींत अनन्वित उपमादिक अलंकारांचें आधुनिक लोकांच्या कवितेंत असतें तसें अवडंबर मुळींच नाहीं.

'पर्वताचा आश्रय.' पर्वत म्हणजे येथें मेघच समजावयाचा. मेघाची म्हणजे ढगाची आकृति पर्वतासारिखी असते म्हणून संस्कृतांत जे पर्वतवाचक शब्द तेच मेघवाचक असतात; आणि याच गोष्टीमुळें, इंद्रानें पर्वताचे पक्ष छेदिले वगैरे पुराणांतरींच्या प्रसिद्ध कथांचें बीज वेदांत आहे, तें पुढें प्रसंग येईल तेव्हां आम्ही उघड करून सांगूं.

वृषायमाणोऽवृणीत सोमं त्रिकद्रुकेष्वपिबत्सुतस्य ।
आ सायकं मघवादत्त वज्रमहन्नेनं प्रथमजामहीनाम् ॥ ३ ॥

वृषऽयमाणः । अवृणीत । सोमम् । त्रिऽकद्रुकेषु । अपिबत् । सुतस्य ।
आ । सायकम् । मघऽवा । अदत्त । वज्रम् । अहन् । एनम् । प्रथमऽजाम् ।
अहीनाम् ॥ ३ ॥

यदिन्द्राहन्प्रथमजामहीनामान्मायिनाममिनाः प्रोत मायाः ।
आत्सूर्यं जनयन्द्यामुषासं तादीत्ना शत्रुं न किला विवित्से
॥ ४ ॥

यत् । इन्द्र । अहन् । प्रथमऽजाम् । अहीनाम् । आत् । मायिनाम् ।
अमिनाः । प्र । उत । मायाः ।
आत् । सूर्यम् । जनयन् । द्याम् । उषसम् । तादीत्ना । शत्रुम् । न ।
किल । विवित्से ॥ ४ ॥

भाषायाम्

३ वृषायमाण (=वृष इवाचरन्=बलवान्) [इन्द्र] सोमम् अवृणीत (=वाञ्छितवान्) । [वाञ्छित्वा च] [स] त्रिकद्रुकेषु (=ज्योतिर्गौरायुरित्येतन्नामकेषु उत्सवदिवसेषु) सुतस्य (=अभिषुतस्य सोमस्य अंशम्=अभिषुत सोम) [यथायाच्छम्] अपिबत् । [पीत्वा च] मघवा (=धनवानिन्द्र) सायकं (=मारक) वज्रम् आदत्त । [आदाय च] अहीनां (=शत्रुरूपाणां सर्पाणां) प्रथमजां (=प्रथमोत्पन्न=ज्येष्ठम्) एनं (=जलावरोधक मेघरूप सर्पम्) अहन् ॥

४ हे इन्द्र, यद् (=यदा) [त्वम्] [अहीनां] प्रथमजां (=ज्येष्ठम्) [आहन्] अहन् आत् (=तस्मात् कालात्=अनन्तर) [त्व] मायिनामुत (=मायोपेतानामितरेषां शत्रूणामपि) मायाः अमिनाः (=प्रकर्षेण अनाशय) । आत् (=तदनन्तर) [त्वं] सूर्यं द्यामुषसं [च] जनयन् (=यदा जनयन्नासी) तादीत्ना (=तदानीं) शत्रुं न किल (=नैव) विवित्से (=नाविविदिषे=अविन्द) ॥

३. बलवान् [इंद्रा]स सोमाची वांछा झाली, [तेव्हां] [तो] त्रिकद्रुकांच्या वेळीं सोम पीता झाला. [आणि मग] [तो] मघवा घातक वज्र [हातांत] घेता झाला, [आणि] [सकल] अहींमध्यें वडील [जो] हा अहि त्याला मारिता झाला.

3. The mighty [Indra] desired Soma; He drank of the extracted juice in the *Trikadruka* [festivals]. [Indra] the lord of riches then took up the deadly *thunderbolt* [and] killed this [Serpent], the eldest of Serpents.

४. हे इंद्रा, प्रथम [सकल] अहींमध्यें वडील [अही]स [तूं] मारिता झालास आणि त्यानंतर [तूं] मायावींच्या माया भंगून टाकिता झालास. नंतर [तूं] सूर्यातें, द्युलोकातें [आणि] उषेतें उत्पन्न करूं लागलास तेव्हां तुला कोणी शत्रु भेटलाच नाहीं.

4. Indra, after [thou] hadst slain the eldest of the Serpents, [thou] didst destroy the machinations of the machinators There-after [when] creating the Sun, the Heaven [and] Ushas (the Dawn) [thou] didst not then meet with an enemy indeed.

---

३. या मंत्राचा भावार्थ:—'बलवान् इंद्रास पूर्वीं सोम पिण्याची वांछा झाली; तेव्हां त्रिकद्रुक म्हणून जो एक तीन दिवसांचा सण येतो, त्या सणांत लोकांनीं सोम तयार करून इंद्रास पाजला. तो सोम पिऊन इंद्रास बळ आलें, आणि त्याणें आपलें भयंकर वज्र हातांत घेतलें आणि तेणेंकरून सकल शत्रूंत ज्येष्ठ असा जो हा मेघोदकाचा अवरोधक वृत्ररूपी सर्प त्याला मारून टाकिला.'

या मंत्रांत 'त्रिकद्रुक' हा शब्द कठिण आहे. बाकी सर्व मंत्र उघड आहे. 'त्रिकद्रुक' शब्द नित्य अनेकवचनीच वेदांत येतो. आणि सायणाचार्य सर्वत्र "ज्योति, गौ, आणि आयु या नांवाचे जे तीन याग म्हणजे यज्ञ करण्याचे प्रसंग अथवा दिवस त्या दिवसांत" असा अर्थ करितात (ऋ. २. ११. १७; २. १५ १; २ २२. १; ८. १३. १८; ८. ९२. २१ हीं स्थळें पाहा. या सर्व स्थळीं इंद्र त्रिकद्रुकांत सोम प्याला असें सांगितलें आहे.) आम्हांसहि फारकरून तसेंच वाटतें. 'त्रिकद्रुक' म्हणजे तीन दिवसपर्यंत चालणारा एखादा वार्षिक सण असावा, आणि त्या प्रसंगीं इंद्रास सोम अर्पण करण्याची कांहीं विशेष चाल असावी. आणि ती चाल कां पडली त्याचें कारण दाखविण्याकरितां मागाहून लोकांनीं असें समजाविलें असेल कीं, इंद्रानें जो वृत्राला मारिला तो त्रिकद्रुक सणांत सोम पिऊन मारिला. त्रिकद्रुक हें नांव कदाच.

अहन्वृत्रं वृत्रतरं व्यंसमिन्द्रो वज्रेण महता वधेन ।
स्कन्धांसीव कुलिशेना विवृक्णाहिः शयत उपपृक्पृथिव्याः
॥ ५ ॥ ३६ ॥

अहन् । वृत्रम् । वृत्रऽतरम् । विऽअंसम् । इन्द्रः । वज्रेण । महता । वधेन ।
स्कन्धांसिऽइव । कुलिशेन । विऽवृक्णा । अहिः । शयते । उपऽपृक् ।
पृथिव्याः ॥ ५ ॥ ३६ ॥

भाषायाम्.

५ इन्द्रः वृत्रतरम् (=अतिशयेन वृत्रलक्षणयुक्तं=शत्रुलक्षणयुक्तम्) [अहिं] कुलिशेन (=कुठारेण) स्कन्धांसि (=वृक्षस्कन्धान्) विवृक्णानि (=छिन्नानि) [कुर्वन्ति] तद्वत् व्यंस (=विगतांसं=छिन्नबाहुर्यथा भवति तथा=विगतांस कृत्वा) महता वधेन (=मारकेण) वज्रेण अहन् (=हतवान्) । [अनन्तरम्] अहिः पृथिव्या उपपृक् (=भूमे समीप) शेते (=शिश्ये) ॥

रून पडलें तें निश्चयानें सांगवत नाहीं. कितीएक विद्वान् 'कद्रू' म्हणजे सोमपात्र असा (ऋ ८ ४५, २६ यांत 'कद्रुव' म्हणजे 'सोमपात्रांतून' असें–सायणाचार्यांविरुद्ध–समजून) अर्थ करितात, आणि प्रस्तुत मन्त्रांत व इतर मन्त्रांतहि 'त्रिकद्रुकेषु' याचा 'तीन सोमपात्रांतून' असा अर्थ समजतात. परतु आम्हांस वाटतें सायणाचार्यांचें भाष्य अशा प्रसंगी विशेष प्रमाणीभूत मानावें.

४ या मन्त्रांत इतकेंच सांगावयाचें मंत्रकर्त्यांच्या मनांत आहे कीं, 'हे इंद्रा, तू प्रथम या मोठ्या अहीस म्हणजे मेघोदकाचा अवरोध करणाऱ्या वृत्राला मारिलेस, आणि नंतर जे लहान लहान दुसरे शत्रू म्हणजे सूर्याला उगवू न देणारे अंधकाररूपी वगैरे शत्रू त्यांस मारून टाकिलेस आणि नंतर तू सूर्याला, द्युला (म्हणजे तेज पुंज असंख्य तारे ज्यांत आहेत अशा आकाशाला) आणि उषेला म्हणजे प्रभातरूपी जी देवी (पूर्वी ३० व्या सूक्ताच्या २० व्या मन्त्रांत सांगितली) तिला निर्माण केलेस, तेव्हां तुला प्रतिबंध करणारा शत्रु कोणीहि नाहींसारिखाच झाला.'

पाऊस पडत नाहीं त्याचें कारण मेघोदकास अवरोधून धरणारा कोणी वृत्र म्हणून आहे त्याला इंद्रानें मारिलें (व अजून प्रत्येक पावसाळ्याच्या आरंभीं मारितो) म्हणून पाऊस पडतो, असें जसें आमचे पूर्वज आर्य समजत, त्याप्रमाणेंच सूर्याचे किरण अंधारामुळें दिसत नाहीत तेंहि तशाच एका दुसऱ्या शत्रूच्या कृत्यामुळें होत असें ते मानीत आणि त्या शत्रूस इंद्रानें मारून टाकिलें म्हणून सूर्य चंद्रादि व उषा या उगवतात अशी त्यांची समजूत होती असें वेदवाणीवरून दिसून येतें.

५. इंद्र मोठ्या [आणि] मारक वज्राने [इतर] शत्रूपेक्षा मोठा शत्रु [जो] [अहि] त्याला मारून त्याचे बाहू, कुठारीनें [वृक्षाच्या] डाहळ्या तोडिल्याप्रमाणे, तोडून टाकिता झाला. [वेव्हां] [तो] अहि भूमीवर पडला.

5 Indra slew the enemy more hostile than other enemies, with his great [and] deadly thunderbolt, and deprived him of his arms like as [one would] cut the branches of a tree with an axe The Serpent [then] lay prostrate on the earth

५ वरच्या मंत्रांत अहीस इंद्रानें मारिलें म्हणून सांगितलें. मारण्याचा प्रकार या मंत्रांत सांगतो तो हा कीं, 'अहीस मारून त्याचे हस्त छेदून टाकिले, कीं, कुऱ्हाडीनें जशा एकाद्या झाडाचे खांदेच तोडावे; मग अहि हस्तरहित होतांच जमिनीवर पडला आणि त्याच्यानें उठवेनासें झालें '

या मंत्रांत विशेष कांहीं सांगण्याजोगें नाहीं 'त्याचे बाहू तोडून टाकिता झाला' हा अर्थ आम्हीं सायणाचार्यांस अनुसरून 'व्यंस' या क्रियाविशेषणापासून काढिला आहे 'व्यंस' हें इतर बहुतेक ठिकाणी ऋग्वेदांत एक असुराचें नांव आहे असें दिसतें, आणि त्यास इंद्रानें मारिलें असें वर्णन येत असतें. (ऋ ४. १८ ९ यांत सायणाचार्य सुद्धां 'व्यंस' या नांवाचा असुर असा अर्थ करितात, आणि २ १४.५ यांत विशेषनाम खचित आहे यांत संशय नाहीं) परंतु सायणाचार्य कित्येक ठिकाणीं आणि तसेच या प्रस्तुत स्थळींहि 'व्यंस' याचा अर्थ आम्हीं येथें केल्याप्रमाणें करितात या ठिकाणी तो युक्त दिसतो म्हणून आम्ही घेतला आहे.

अयोद्धेव दुर्मद आ हि जुह्वे महावीरं तुविबाधमृजीषम् ।
नातारीदस्य समृतिं वधानां सं रुजानाः पिपिष इन्द्रशत्रुः ॥ ६ ॥

अयोद्धाऽइव । दुःऽमदः । आ । हि । जुह्वे । महाऽवीरम् । तुविऽबाधम् ।
ऋजीषम् ।

न । अतारीत् । अस्य । सम्ऽऋतिम् । वधानाम् । सम् । रुजानाः
पिपिषे । इन्द्रऽशत्रु ॥ ६ ॥

अपादहस्तो अपृतन्यदिन्द्रमास्य वज्रमधि सानौ जघान ।
वृष्णो वध्रिः प्रतिमानं बुभूषन्पुरुत्रा वृत्रो अशयद्व्यस्तः ॥ ७ ॥

अपात् । अहस्त । अपृतन्यत् । इन्द्रम् । आ । अस्य । वज्रम् । अधि ।
सानौ । जघान ।

वृष्णः । वध्रिः । प्रतिऽमानम् । बुभूषन् । पुरुऽत्रा । वृत्रः । अशयत् ।
विऽअस्त ॥ ७ ॥

भाषायाम्.

६ [स वृत्रं] अयोद्धेव दुर्मद (=निःशत्रुरिव सगर्व) महावीर तुविबाध (=बहूनां हन्तारम्) ऋजीषम् (=अनिवार्यम्) [इन्द्रम्] आजुह्वे हि (=युद्धार्थमाह्वयद्धि)। अस्य (=इन्द्रस्य) वधानाम् (=अभिघातानां) समृतिं (=सगमं) [पुन] नातारीत् (=न सोढवान्) [अपि तु] इन्द्रशत्रु (=आत्मानम् इन्द्रशत्रु मन्यमान) [स] रुजाना (=नदी ?) सपिपिषे (=संपिष्टवान् इन्द्रस्य अभिघातात् नदीनामुपरि पतित) ॥

७ अपात् (=छिन्नपाद) अहस्त (=छिन्नहस्त) [स] इन्द्रमपृतन्यत् (=अयुध्यत्)। अस्य (=तस्य) अधि सानौ (=स्कन्धोपरि=स्कन्धे) इन्द्रो वज्र जघान। वृष्ण (=वीर्यवत पुरुषस्य) प्रतिमान (=सादृश्य) बुभूषन् वध्रि (=छिन्नमुष्क=नपुंसक) [इव इन्द्रस्य प्रतिमानं बुभूषन्] वृत्रो व्यस्त (=विविध क्षिप्त) [सन्] पुरुत्रा (=बहुषु स्थलेषु) अशयत् (=शिश्ये=भूमौ निपत्य पतितोऽस्ति) ॥

६. कारण कीं [जसा एकादा मनुष्य] निःशत्रु असल्यामुळें [मदाध होतो] तसा मदाध [झालेला] [अहि] महावीर [आणि] बहु[शत्रु]घातक [आणि] अनिवार्य इंद्रास युद्धाला बोलाविता झाला. [परंतु] [तो] इंद्राचा शत्रु इंद्राच्या घावाचा मार सहन करूं शकला नाहीं [आणि] [इंद्राने खालीं] पाडलेल्या [नद्यां]वर पडून आपटला.

6. For proud as [though he was] peerless he challenged the mighty hero [Indra] the killer of many [and] the impetuous [But] he did not survive the encounter of his blows: the enemy of Indra was dashed against the rivers [below].

७. [मग तो] पादहीन [आणि] हस्तहीन [झाला तरी] इंद्राशीं लढला, [तेव्हां] इंद्र त्याच्या मानेवर वज्रप्रहार करिता झाला. वीर्यवताची बरोबरी नपुंसक करूं इच्छितो तशी [इंद्राची बरोबरी करण्याची इच्छा केल्यामुळें] वृत्र अनेक ठिकाणीं फेकला जाऊन जमीनदोस्त झाला.

7. Footless [and] armless he [still] fought Indra. On his neck [Indra] struck the thunderbolt. Desirous *of rivalling* [the manly Indra], [though] [himself] unmanly, Vṛitra, thrown in *different directions lay* [low on the ground].

६. 'इंद्रापेक्षा अहि फार कमी बलवान असतां अहीनें इंद्रास लढाईस उभा राहा असें हटकलें; तेव्हां युद्धास आरंभ झाला आणि इंद्रानें अहीवर म्हणजे वृत्रावर घाव मारिले, परंतु ते अहीस सहन करतां आले नाहींत, आणि तो खालीं पडला आणि इंद्रानें जीं उदकें खालीं पाडलीं होतीं व नद्यांनीं समुद्राकडे वाहविलीं होतीं त्यांवर तो आपटला,' असा भावार्थ आहे

'इंद्राचा शत्रु'='इन्द्रशत्रु' स्वरावरून पाहतां 'इन्द्रशत्रु' हा येथें बहुव्रीहि आहे आणि याचा अर्थ 'इंद्र आहे शत्रु ज्याचा' असा होतो, तथापि पर्यवसानीं 'इंद्राचा शत्रु' असाच होतो.

'पाडलेल्या [नद्यां]वर'=रुजानाः. नद्यांवर हा अर्थ येथें आम्हीं सायणाचार्यास अनुसरून केला आहे. शब्द कठिण आहे यांत संशय नाहीं.

७ या मंत्रांत पूर्वार्ध मराष्ट्यानं

नदं न भिन्नममुया शयानं मनो रुहाणा अति यन्त्यापः ।
याश्चिद्वृत्रो महिना पर्यतिष्ठत्तासामहिः पत्सुतःशीर्बभूव ॥ ८ ॥

नदम् । न । भिन्नम् । अमुया । शयानम् । मनः । रुहाणाः । अति । यन्ति । आपः ।
याः । चित् । वृत्रः । महिना । परिऽअतिष्ठत् । तासाम् । अहिः । पत्सुतःऽशीः । बभूव ॥ ८ ॥

भाषायाम्

८ भिन्न (=छिन्न) नद (=वृषणम्=उक्षाणम्) इव (=हतश्छिन्नहस्तपादो दिर्बलीवर्दः शेते पतति तद्वत्) अमुया (=अनेन प्रकारेण) शयान (=पतित) [वृत्रम्] आपो (=जलानि) अतियन्ति (=अतिक्रम्य गच्छन्ति) । [अपि च] या [अप] अहिर्वृत्रो महिना (=महिम्ना=स्वबलेन) पर्यतिष्ठत् (=जीवन् सन् पर्यवेष्टयत्) तासां चित् (=तासामेव) [स] पत्सुत शी. (=पादस्याधःशयानो) बभूव ॥

अर्थाचें स्फुटीकरण आहे. बाकी विशेष सांगण्याजोगें कांहीं नाहीं इतकें मात्र ध्यानांत ठेवण्याजोगें दिसतें कीं या लढाईचें वर्णन दोन मानव लढतील आणि त्या लढाईचें कोणी वर्णन करील तसेंच केलेलें आहे आलीकडील (म्हणजे पुराणादिक) मधील इंद्रादिकांचें युद्ध तर राहू द्या, पण यःकश्चित् माणसाचें युद्ध सांगावयाचें असलें तरी, वायव्यास्त्र टाकिलें तेव्हां सर्व बाणवर्षण नाहींसें झालें, मग ब्रह्मास्त्र, मग सर्पास्त्र, मग गारुडास्त्र, मग अमुक अस्त्र, मग तमुक अस्त्र टाकिलें, अशा विलक्षण विस्मयकारक कथा असतात तशा या इंद्रवृत्रांच्या युद्धांत नाहींत यावरून प्राचीन आर्यलोकांचा साधेपणा आणि त्यांच्या कल्पनेचा निर्मळपणा किती आहे तो दिसून येईल खोटे अलंकार घालून भलतीच शोभा विकत आणण्यापेक्षां साहजिक आणि स्वाभाविक शोभा चांगली दिसते म्हणून सांगावयास पाहिजे असें नाहीं

८. याप्रमाणें कापलेल्या बैलासारिखा पडलेला [जो वृत्र] त्याजवरून मनो[रथ] पूर्ण झालेलीं उदकें वाहूं लागलीं, [आणि] ज्या [उदकां]स [तो] वृत्र अहि [आपल्या] बळानें आसमंतात् वेष्टून राहिला होता त्यांच्याच पायांजवळ [तो] पडून राहिला.

8. Over him thus lying low like a slaughtered bull, the Waters went, satisfied as to their wishes. Serpent Vritra was laid low at the feet of those very [Waters] which he had hemmed in with his might.

---

८. या मंत्राचा अर्थ स्पष्ट आहे. 'इंद्रानें मारण्याच्या पूर्वी वृत्र उदकांस वेष्टून त्यांस अवरोध करून राहिला होता, तेव्हां उदकें फार त्रासून गेलीं होतीं आणि या बंधनांतून आपली केव्हां सुटका होईल असें म्हणत होतीं. इंद्रानें त्यास मारतांच तो मारून हातपाय कापून जमिनीवर पाडलेल्या एकाद्या बैलाप्रमाणें जमिनीवर पडला. तेव्हां तींच उदकें पूर्णमनोरथ होऊन त्याच्या आंगावरून म्हणजे डोकीवर पाय देऊन वाहून गेलीं, आणि तो त्यांच्या पायांखालीं पडून राहिला,' असा भावार्थ आहे.

या ऋचेंत एकच शब्द कठिण आहे, तो 'नद.' हा शब्द वेदांत फार येत नसतो. साधारण संस्कृतांत याचा अर्थ मोठी नदी (सिंधूसारिखा) असा होतो तोच अर्थ सायणाचार्य येथेंहि घेतात. आणि 'नद न भिन्न' याचा अर्थ 'बहुत ठिकाणीं ज्याचे तट पाण्यानें फुटले आहेत असा नदीसारिखा' असा करितात. परंतु तो अर्थ येथें नीट बसत नाहीं. आणि जेथें जेथें 'नद' शब्द वेदांत आढळतो (ऋग्वेदांत साहा ठिकाणीं आला आहे) ते सर्व मंत्र पाहतां 'वृषा' (=सेचनसमर्थ बैल, म्हणजे खसी न केलेला बैल= पोळ अथवा कामी पुरुष) असा अर्थ दिसतो. जसा—"नदं व ओदतीनां नद यो युवतीनां पतिं व. अघ्न्यानां धेनूनाम् इषुध्यसि" ऋ ८. ६९. २ यांत 'नद' म्हणजे पति या शब्दासारिखाच अर्थ करणें योग्य आहे तथापि 'नद' शब्द या स्थळीं संदिग्धार्थ आहे यांत संशय नाहीं.

सायणाचार्यांप्रमाणें अर्थ केल्यास 'ज्याचे कांठ पावसाचें पाणी पुष्कळ आल्यामुळें पाण्यानें भरून जातात अशा नद्यावरून जशा नद्या कांठांवरून वाहत असतात तशीं पृथ्वीवर पडून राहिलेल्या वृत्रावरून मनोरथ पूर्ण झालेलीं उदकें वाहून गेलीं' असें भाषांतर करावें.

नीचावया अभवद्वृत्रपुत्रेन्द्रो अस्या अव वधर्जभार ।
उत्तरा सूरधरः पुत्र आसीद्दानुः शये सहवत्सा न धेनुः ॥ ९ ॥

नीचाऽवयाः । अभवत् । वृत्रऽपुत्रा । इन्द्रः । अस्याः । अव । वधः । जभार ।
उत्ऽतरा । सूः । अधरः । पुत्रः । आसीत् । दानुः । शये । सहऽवत्सा । न । धेनुः ॥ ९ ॥

अतिष्ठन्तीनामनिवेशनानां काष्ठानां मध्ये निहितं शरीरम् ।
वृत्रस्य निण्यं वि चरन्त्यापो दीर्घं तम आशयदिन्द्रशत्रुः ॥ १० ॥ ३७ ॥

अतिष्ठन्तीनाम् । अनिऽवेशनानाम् । काष्ठानाम् । मध्ये । निऽहितम् । शरीरम् ।
वृत्रस्य । निण्यम् । वि । चरन्ति । आपः । दीर्घम् । तमः । आ । अशयत् । इन्द्रऽशत्रुः ॥ १० ॥ ३७ ॥

भाषायाम्.

९ वृत्रपुत्रा (=वृत्रः पुत्रो यस्याः सा=वृत्रमाता) [वृत्रं रक्षितुं] नीचावयाः (=न्यगानीतम् आकाशात् अध आनीतं वय. भुजादवयवरूपा शक्ति. यया सा तथा) बभूव । तस्याः (=तस्या उपरि) इन्द्रो वध. (=वज्रम्) अवजभार (=प्रहृतवान्) । [तदानीं] सू. (=माता) उत्तरा (=पुत्रस्योपरि) पुत्रश्[च] अधरः (=मातुरध) आसीत् (=बभूव) । [सा] दानुः (=राक्षसी) सहवत्सा धेनुरिव शेते (=मृत्वा पतिता) ॥

१०. [अस्य] शरीरम् अतिष्ठन्तीनां (=सततमेव प्रवहन्तीनाम्) अनिवेशनानाम् (=अनुपविशन्तीनां=सततं गच्छन्तीनां) काष्ठानाम् (=उदकमार्गाणाम्=उदकप्रवाहाणां) मध्ये निहितं (=स्थितम्) [अस्ति] । [अस्य] वृत्रस्य निण्यम् (=अन्तर्हितं स्थानम्) आपो विचरन्ति (=बन्धनमुक्ताः सत्य. स्वबन्धनस्य गोपनस्य च स्थानमतिक्रम्य गच्छन्ति) । [स] इन्द्रशत्रु दीर्घं तमः (=प्रकाशरहितानन्तकालपर्यन्तम्) आशयत् (=अशेत=मृत. पतित.) ॥

९. [मग] वृत्राची आई [वृत्राला वाचविण्याकरितां] [आपल्या सर्व] शक्तीनिशीं [वृत्रा]वर पडली. इंद्र [आपलें] वज्र तिजवर मारिता झाला. [तेव्हां] वर आई [आणि] पुत्र खालीं झाला, [आणि] वासरासहित गाय जशी [पडते] तशी राक्षसी मरून पडली.

9. Vritra's mother intervened with [all her] power. Indra struck [his] thunderbolt upon her. The mother lay on [the son], the son underneath [the mother]. The demoness lay dead like a cow with her calf.

१०. न थांबणारे [आणि] न बसणारे [जे] [उदकाचे] प्रवाह त्याजमध्यें वृत्राचे शरीर पडलें. उदकें वृत्राच्या गुप्त स्थानांतून मोकळीं [होऊन] वाहूं लागलीं. [आणि] [तो] इंद्राचा शत्रु अखंड अंधकारात पडून राहिला.

10. *In the midst of the* [river]-courses, unceasing [and] restless, his body was laid. The Waters flowed free from Vritra's place of concealment. Indra's enemy lay [dead] *through endless darkness.*

---

९ 'वृत्र पडल्यावर त्याला वाचविण्याकरितां त्याच्या आईनें मधें पडून त्याच्या आंगावर घालून घेतलें तेव्हां इंद्रानें तिजवरहि आपलें वज्र मारिलें तेव्हां ती तेथल्या तेथेंच मेली, आणि गाईचें वासरूं खालीं आणि त्याजवर गाय पडते तशी ही राक्षसी आपल्या मुलावर मरून पडली,' असें तात्पर्य.

या मंत्रात 'नीचावया' हा शब्द किंचित् कठिण आहे त्याचा अर्थ आम्हीं सायणाचार्यांप्रमाणें केला आहे. या शब्दाच्या अर्थाविषयीं थोडा संशय तर खराच पण आहे त्यांत हा अर्थ बरा दिसतो. दुसरे कितीएक विद्वान् 'नि शक्ति' असा अर्थ करून 'वृत्राची आई निर्बल झाली' असें समजतात. 'वयस्' शब्दाचा अर्थ शक्ति असा होतो. सायणाचार्यांनीं घेतलेला बाहु असा होतो किंवा नाहीं याविषयीं संशय आहे इतकीच अडचण

१० तात्पर्य—'वृत्र मरून पडला आणि त्याजवरून उदकाचे प्रवाह वाहूं लागले तेव्हां तो त्या प्रवाहाच्या मधें सांपडला त्याणें जीं उदकें गुहेंत वगैरे दपून ठेविलीं होतीं तीं त्या गुहेंतून निघून मुक्त होऊन त्या गुहेवरून वाहूं

दासपत्नीरहिगोपा अतिष्ठन्निरुद्धा आपः पणिनेव गावः ।
अपां बिलमपिहितं यदासीद्वृत्रं जघन्वाँ अप तद्ववार ॥ ११ ॥

दासऽपत्नीः । अहिऽगोपाः । अतिष्ठन् । निऽरुद्धाः । आपः । पणिनाऽइव । गावः ।
अपाम् । बिलम् । अपिऽहितम् । यत् । आसीत् । वृत्रम् । जघन्वान् । अप । तत् । ववार ॥ ११ ॥

भाषायाम्.

११. दासपत्न्यः (=दासो वृत्रासुरः पतिर्यासां ताः=वृत्रजिता) अहिगोपाः (=अहिर्वृत्रो गोपा गोप्ता यासां ताः =वृत्रगुप्ता) आपः, पणिना (=चोरेण अनार्येण) [निरुद्धा] गाव इव, निरुद्धा अतिष्ठन् । [तदनन्तरम्] अपां यद् बिलं (=प्रवहणद्वारं) [वृत्रेण] अपिहितं (=पिहितम्) आसीत्, तद् [इन्द्रो] वृत्रं जघ्निवान् (=हतवान्=हत्वा) अपववार (=अपवृतमकरोत्) ॥

छागलीं. वृत्र उदकप्रवाहाच्या खालीं मरून पडल्यामुळें तो दीर्घ अंधकारांत म्हणजे अनंतकाळपर्यंत अंधारांत तसाच मरून पडला.'

'गुप्तस्थान'='निण्यम्' सायणाचार्य या स्थळीं निण्य हें विशेषण समजून 'ज्याचें नांव सुद्धां कोणास ठाऊक नाहीं असें' ('शरीर') असें भाष्य करितात. यास्कांहि निरुक्तांत तसाच (निर्णाम) अर्थ करितात असें दिसतें. परंतु "तव त्ये सोम पवमान निण्ये विश्वे देवास्त्रय एकादशासः" (ऋ. ९. ९२. ४) यांत 'निण्य' याचा अर्थ 'अंतर्हित स्थान' म्हणजे 'गुप्त स्थळ' असा सायणाचार्यच करितात, तो आम्हीं येथें घेतला आहे.

११. [त्या] सर्पाकृती [वृत्र]-राक्षसानें [आपल्या] स्वाधीन करून घेतलेलीं [आणि] लपवून ठेविलेलीं उदकें, चोरानें [कोंडून ठेविलेल्या] गाईंप्रमाणें, कोंडून राहिलीं होतीं. उदकाचें द्वार जें बंद होतें तें इंद्रानें वृत्राला मारून उघडलें.

11. The Waters, conquered [and] watched over by the Serpent-Demon, had stood confined like cows [confined] by a robber. The gate of the water that had stood closed, Indra threw open after having slain Vritra.

---

११. पूर्वी जे मंत्र गेले त्यांत सांगितलेलीच गोष्ट पुनः स्पष्ट करून व रूपांतरानें येथें सांगतो. 'जसा एकादा अनार्य चोर (कोळी, घोंड, महार, भिल्ल इत्यादि आर्यव्यतिरिक्त जातींपैकीं मनुष्य) गाई चोरून नेऊन गुहेंत कोंडून ठेवितो तशीं वृत्रानें ('अहि' व 'दास' हीं वृत्राचींच नांवें होत) हरण करून आपल्या स्वाधीन करून घेतलेलीं आणि लपवून ठेविलेलीं उदकें त्याच्या गुहेंत कोंडून राहिलीं होतीं. आणि त्या गुहेचें द्वार वृत्रानें झांकून ठेविलें होतें. तें इंद्रानें वृत्रास मारल्यावर उघडें केलें, तेव्हां उदकें बाहेर वाहिलीं' असा भावार्थ.

'चोरानें' ='पणिना.' सायणाचार्य 'पणिनामक राक्षसानें' असा अर्थ करितात.

या ऋचेंत 'दासपत्नी' हा जो शब्द आहे त्यावरून आमच्या 'पत्नी' शब्दाची व्युत्पत्ति स्पष्ट होते पत्नी=पतिनी=पति आहे जिला ती=लग्न झालेली स्त्री, सधवा.

अश्व्यो वारो अभवस्तदिन्द्र सृके यत्त्वा प्रत्यहन्देव एकः ।
अजयो गा अजयः शूर सोममवासृजः सर्तवे सप्त सिन्धून् ॥ १२ ॥

अश्व्यः । वारः । अभवः । तत् । इन्द्र । सृके । यत् । त्वा । प्रतिऽअहन् । देवः । एकः ।
अजयः । गाः । अजयः । शूर । सोमम् । अव । असृजः । सर्तवे । सप्त । सिन्धून् ॥ १२ ॥

भाषायाम्.

१२. हे इन्द्र यद् (=यदा) एको देवः (=असहायो दीप्यमानो) [वृत्रः] त्वां सृके (=वज्रे) प्रत्यहन् (=प्रतिप्रहृतवान्) तदा [त्वम्] अश्व्यः (=अश्वसम्बन्धी) वारो (=वालः) अभवः [तव शत्रुश्च मक्षिकावदभवत्] । [तदा] [त्वं] गा अजयः (=वृत्रेण अपहृता मेघोदकात्मिका गाः प्रतिजितवान्), [अपि च] हे शूर, [त्वं] सोममजय, [अपि च] सर्तवे (=सर्तुं=प्रवाहरूपेण गन्तुं) सप्त सिन्धून् (=गङ्गायमुनादिनदीः) अवासृजः (=आवर्जितवान्=वृत्रकृतं प्रवाहनिरोधं निराकृतवानसि) ॥

१२. हे इंद्रा, जेव्हां तुझ्या वज्रावर [त्या] एकट्या देदीप्यमान [शत्रू]नें उलटून मारिलें तेंव्हां [तू] अश्वपुच्छ झालास. [तेव्हां] [तू] गाई जिंकिता झालास, [तेव्हा] हे शूरा, [तू] सोम जिंकिता झालास [आणि] सप्त सिंधूंनीं वाहावे म्हणून त्यास खालीं सोडून देता झालास.

12 [Thou] didst become, India, [as] the tail of a horse [and thy enemy became as a fly] when [he] [thy] unaided heavenly [enemy] struck thee in return on [thy] thunderbolt. [Then] didst thou conquer [back] the cows, [and] brave one, [didst conquer] the Soma, and didst pour down the seven streams that they might flow

१२ 'इंद्राच्या वज्रावर मारण्यासाठीं जेव्हां वृत्रानें उलट प्रहार केला तेव्हां इंद्र जणु काय अश्वपुच्छ झाला आणि वृत्राचा प्रहार आणि वृत्र ह्या माशा झाल्या वृत्र तरी सामान्य नव्हता; तो एकटा होता तरी देदीप्यमान शाक्त्यास आहे असा शत्रु होता त्यामुळे त्यानें इंद्रावर प्रतिप्रहार केला परंतु त्याचाहि इंद्रानें नाश करून त्याण हरण केलेल्या उदकरूपी गाई पुन. जिंकून घेतल्या, सोम जिंकून घेतला, आणि सप्तनद्या जेणेकरून वाहू लागल्या असे उदकप्रवाह आकाशांतून खाली पाडले,' असे या मंत्राचें तात्पर्य आहे

या स्थळीं वृत्राला 'देव' असे म्हटले आहे, त्याचा अर्थ सायणाचार्यांस अनुसरून आम्ही 'देदीप्यमान' असा केला आहे. तथापि 'देव' या शब्देकरून बहुतकरून 'सुर' असा अर्थ घ्यावयाचा असतो, असे असता ते नांव वृत्राला दिले आहे हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे या मंत्रांत जो 'देव' शब्दाचा प्रयोग केला आहे त्यावरून बऱ्या दुर्वासहि देव आणि वृत्रादि वाईट देवांसहि देव म्हणण्याची चाल वैदिक युगांत होती असे दिसते

'सोम जिंकिता झालास' 'सोम' हा 'पर्जन्या'पासून उत्पन्न होतो म्हणून पर्जन्य त्याचा बाप असे (ऋ ९. ८२ ३) "पर्जन्य पिता महिषस्य पर्णिनो" यांत सांगितलें आहे, आणि वृत्रास मारून पर्जन्याचें उदक भूमीवर पडे असे इंद्रानें केलें म्हणून इंद्र 'सोम जिंकिता झाला' असे या मंत्रांत म्हटले आहे असे दिसते

'सप्त सिंधू' 'सिंधु' म्हणजे नदी. या ठिकाणीं 'सप्त सिंधु' म्हणजे सात नद्या कोणत्या हे निश्चयानें सांगवेल असे वाटत नाहीं. सायणाचार्य "इमं मे गङ्गे यमुने" इत्यादि (ऋ १०. ७५. ५) मंत्रांत दिलेल्या गङ्गा, यमुना, सरस्वती, शुतुद्री, परुष्णी, असिक्नी आणि वितस्ता या सात नद्या समजतात. पण सिंधुप्रांत किंवा त्या दक्षिणोत्तर नद्या त्या सात नद्या बहुधा असाव्या असा संभव आहे.

नास्मै विद्युन्न तन्यतुः सिषेध न यां मिहमकिरद्ध्रादुनिं च।
इन्द्रश्च यद्युयुधाते अहिश्चोतापरीभ्यो मघवा वि जिग्ये ॥ १३ ॥

न। अस्मै। विऽद्युत्। न। तन्यतुः। सिसेध। न। याम्। मिहम्। अकिरत्। ह्रादुनिम्। च।
इन्द्रः। च। यत्। युयुधाते इति। अहिः। च। उत। अपरीभ्यः। मघऽवा। वि। जिग्ये ॥ १३ ॥

भाषायाम्.

१३. अस्मै (=इन्द्राय=इन्द्रनाशार्थं) विद्युद् (=वृत्रेण कृतो विद्युत्प्रहारः) न सिषेध (=सिद्ध न भाष), न तन्यतुः (=गर्जनम्) [अपि] [सिषेध], यां मिह (=वृष्टि) [यां] च ह्रादुनिम् (=अशनिम्) [इन्द्रमभि] अकिरत् (=विक्षिप्तवान्) [सापि] न [सिषेध]। इन्द्रश्च अहिश्च [इत्युभौ] यद् (=यस्मिन्काले) युयुधाते [तदा] उत (=अपि च) अपरीभ्यः (=तस्मादनन्तरं सर्वकालेपि) मघवैव विजिग्ये (=विजयी बभूव) [न तु वृत्र.]॥

१३. वीज [आणि] गर्जना [वृत्रानें] याजवर [टाकिल्या पण] त्यापासून काहीं झालें नाहीं त्याणें जी वृष्टि आणि अशनिपात केला त्यापासूनहि काहीं झाल नाहीं. जेव्हां इद्र आणि अहि [वृत्र] हे दोघे लढले त्यावेळीं आणि त्यानतरहि सर्वकाळपर्यंत इद्रच जयी झाला.

13 Neither [the] lightning nor the thunder [of Vritra] availed against him (Indra), nor the shower nor the thunderbolt which [Vritra] threw Both when Indra and the Serpent fought and ever afterwards Indra alone was victorious

---

१३. 'इंद्राच्या आंगावर वृत्रानें वीज सोडली, त्याला भिवविण्याकरिता गर्जना केली, त्याच्या आंगावर वृष्टि केली आणि आपलं वज्रहि त्याच्या आंगावर मारिलं, पण त्यापासून इंद्रासें काहींच झाल नाहीं; आणि युद्ध झालें तेव्हां इद्रास जय मिळाला आणि युद्ध सपून गेल्यावर तरी मागाहूनहि सर्वकाळ इद्रच जयी होऊन राहिला' असा भावार्थ

'याजवर'='अस्मै' म्हणजे 'इंद्रावर' 'अस्मै' हे येथ आम्हा इद्रास लावितों तें सायणाचार्यास अनुसरून लाविता आम्हांस वाटतें की, या चतुर्थीचा या ठिकाणा प्रयोग थोडासा चमत्कारिक आहे तरी ती इद्रास जी सायणानी लाविली ती बरोबर आहे

या मत्रावरून असें दिसतें की, भिवविणें, गर्जना करणें वृष्टि करणें, वज्रप्रहार करणें हीं जशा इंद्राचीं युद्धसाधनें होत, तशीच इद्राचा शत्रु जो वृत्र त्याचींहि तींच आहेत मात्र इद्राची शक्ति वृत्रापेक्षां फार मोठी आहे

'त्यापासून काहीं झाल नाहीं'='न सिषेध' अक्षरश अर्थ 'सिद्धीस गेली नाहीं', 'फलद्रूप झाली नाहीं.' "यस्मादृते न सिध्यति यज्ञो विपश्चितश्चन" (ऋ १. १८ ७, पूर्वी पृष्ठ १४१, १४२ पाहा) यांत आणि "कृत पुरुषकारैध सोपि दैवेन सिध्यति" या सभाषितांत जो सिध् धातूचा अर्थ आहे तोच प्रस्तुत मत्रात आहे

'त्यानतरहि सर्वकाळपर्यंत'='अपरीभ्य ' 'अपरी' हा स्त्रीलिंगी बहुवचनी शब्द फारकरून सप्तम्यन्त येतो त्याचा अर्थ 'भविष्यकाळीं,' 'पुढें,' असा होतो (ऋ १ ११३. ११; १०. ११७ ३ हे मत्र पाहा) सायणाचार्य ' [वृत्राच्या] दुसऱ्या [माया]शत्रू इद्र जय पावला" असें भाष्य करितात

अहेर्यातारं कमपश्य इन्द्र हृदि यत्ते जघ्नुषो भीरगच्छत्।
नव च यन्नवतिं च स्रवन्तीः श्येनो न भीतो अतरो रजांसि
॥ १४ ॥

अहेः । यातारम् । कम् । अपश्यः । इन्द्र । हृदि । यत् । ते । जघ्नुषः ।
भीः । अगच्छत् ।
नव । च । यत् । नवतिम् । च । स्रवन्तीः । श्येनः । न । भीतः ।
अतरः । रजांसि ॥ १४ ॥

इन्द्रो यातोऽवसितस्य राजा शमस्य च शृङ्गिणो वज्रबाहुः ।
सेदु राजा क्षयति चर्षणीनामरान्न नेमिः परि ता बभूव
॥ १५ ॥ ३८ ॥ २ ॥

इन्द्रः । यातः । अवऽसितस्य । राजा । शमस्य । च । शृङ्गिणः ।
वज्रऽबाहुः ।
सः । इत् । ऊम् इति । राजा । क्षयति । चर्षणीनाम् । अरान् ।
न । नेमिः । परि । ता । बभूव ॥ १५ ॥ ३८ ॥ २ ॥

भाषायाम्.

१४ हे इन्द्र, यद् (=यदा) [अहि] जघ्नुष (=हतवतस्) ते (=तव) हृदि भी (=भयम्) अगच्छत् (=प्राविशत्), यत् [च] [त्व], श्येन इव भीत [सन्], नव च नवति च स्रवन्ती (=नदी) रजांसि [च] (=अन्तरिक्षप्रदेशांश्च) अतर (=तीर्णवानसि), [तत्=तदा] [त्वम्] अहे (=वृत्रस्य=वृत्रहिंसार्थं) क यातारं (=निर्यातयितारम्) अपश्य ? [कमपि न] ॥

१५ वज्रबाहुरिन्द्रो यात (=जङ्गमस्य), अवसितस्य (=स्थावरस्य), शमस्य च (=शान्तस्य=अश्वगर्दभादेश्च), शृङ्गिण (=शृङ्गोपेतस्य) [प्राणिनश्च] राजा [बभूव] । स इत् उ (=अपि च स एव) चर्षणीनां (=मनुष्याणां) राजा [भूत्वा] क्षयति (=प्रभवति) । [स] ता (=तानि) [एतानि सर्वाणि], अरान् नेमिरिव, परिबभूव (=सर्वत परिवेष्ट्यन रक्षति) ॥

१४. हे इंद्रा, [वृत्राला] मारिल्यावर तुझ्या हृदयांत जें भय शिरलें तो वृत्र[मरणा]चा सूड उगविणारा [तू] कोण पाहिलास? कीं, जो [तू] भिऊन, ससाण्यासारिखा, नव्याण्णव नद्या [आणि] सकल अंतरिक्षप्रदेश ओलांडून गेलास!

१५ [मग] वज्रबाहु इंद्र जगमाचा, स्थावराचा, शांत [प्राण्या]चा आणि शिंगें असलेल्या [प्राण्या]चा राजा [झाला] आणि तोच मनुष्यावर राजा [होऊन] राज्य चालवूं लागला असास [वेष्टून असणाऱ्या नेमी]प्रमाणें तोच ह्या [सर्वांस] वेष्टून रक्षण करितो

14 What pursuer [in behalf] of the Serpent didst [thou] see Indra, that after thou hadst killed [him] fear entered thy breast [and] that frightened thou fledst like a falcon over the nine and ninety streams [and] the aerial regions?

15 Indra the bearer of the thunderbolt on his shoulder [then] [became] king of the moveable of the immoveable, and of the harmless [and] of the horned [creatures] And he alone reigns [as] king over men [He] surrounds [all] these with protection even as [does] the felly [surround] the spokes

१४ 'वृत्राला मारिल्यावर इंद्र भिऊन गेला आणि श्येनपक्ष्याप्रमाणें भाबरून नव्याण्णव नद्या आणि आकाशप्रदेश यांच्या पार पळून गेला तर इतका ज्यापेक्षां इंद्र भ्याला त्यापेक्षां वृत्राचा सूड उगविणारा कोणी तरी आपला पाठलाग करील असे इंद्राला वाटलें तर असा कोण पाठलाग करणारा दृष्टीस पडला?' असें इंद्राला या मंत्रांत ऋषि विचारीत आहे

'वृत्र[मरणा]चा सूड उगविणारा'= 'अहेर्यातारम्' अक्षरशः अर्थ अहीचा मारणारा.' 'अहीचा हल्लेकरी' 'अहे' ही षष्ठी चतुर्थ्यर्थी आहे असें समजून आम्हां भाषांतर केलें आहे सायणाचार्य ही षष्ठी कर्मणि समजून 'अहीस मारणारा' असा अर्थ करून तदनुरोधानें बाकी मंत्राचें भाष्य करितात

'नव्याण्णव नद्या' ह्या कोणत्या? वृत्रास मारिल्यानंतर ज्या अनेक नद्या वाहूं लागल्या त्यांच्या पार इंद्र पळून गेला असें समजावें का काय? यावर षष्ठ्या सायणाचार्य कांहीं सांगत नाहींत 'नव्याण्णव' या शब्दापासून अमुक नद्या विवक्षित मानिल्या तर त्या कोणत्या त समजत नाहीं, अपरिमितार्थी म्हणजे अमुक विशेष नद्या असें न मानिल तर अपरिमितार्थी नव्याण्णव ही संख्या थोडीशी चमत्कारिक दिसते यांत संशय नाहीं 'रजांसि' (=अंतरिक्ष प्रदेश)

सूक्तम् ३३

आङ्गिरसो हिरण्यस्तूप ऋषिः । इन्द्रो देवता । त्रिष्टुप् छन्दः ॥

एतायामोप गव्यन्त इन्द्रमस्माकं सु प्रमतिं वावृधाति ।

अनामृणः कुविदादस्य रायो गवां केतं परमावर्जते नः ॥ १ ॥

आ । इत । अयाम । उप । गव्यन्तः । इन्द्रम् । अस्माकम् । सु । प्रऽमतिम् ।

ववृधाति ।

अनामृणः । कुवित् । आत् । अस्य । रायः । गवाम् । केतम् । परम् ।

आऽवर्जते । नः ॥ १ ॥

भाषायाम्.

१. [हे जना.] एत (=आगच्छत), गव्यन्तो (=गा आत्मन इच्छन्तो) [वयम्] इन्द्रम् उपायाम (=प्राप्नुयाम) । स अस्माकम् (=अस्मद्विषयां) प्रमतिम् (=स्वस्य अनुग्रहबुद्धिं) सु (=सुष्ठु=अतीव) वावृधाति (=वर्धयेत्) । आत् (=तर्हि) अनामृणः (=अहिंसको=हितकर्ता) [स] नो गवाम् अस्य रायः (=गोसंबन्धिसंपद =गोरूपसंपद्विषयम् अस्माकम् इम) केत (=संकेत=संकल्प=कामम्) आवर्जते (=प्रापयेत्=साधयेत्) कुवित् (=कि) [नवा] ? [प्रापयेदेव] ॥

ह्याच्या पलीकडेहि गेला असें सांगितलें त्यापेक्षां, या ज्या नद्या सांगितल्या त्या आकाशांतील उदकरूपी अथवा मेघोदकधाराऱूपी नद्याच समजतात असें दिसतें.

श्येन अथवा ससाणा हा मोठा वेगवान् पक्षी आहे यांविषयीं पुढच्या सूक्ताचा दुसरा मन्त्र पाहा.

१५. ह्या मन्त्रांत सूक्ताचा उपसंहार आहे 'वर सांगितल्याप्रमाणें वृत्राचा नाश करून इंद्र सकळांचा एकटा राजा होऊन बसला आणि गाडीचे पुढें आणि धांव जशी आपल्यास वेढून रक्षिते तसा तो या सर्वांस आपल्यास रक्षितो.' असा अभिप्राय.

'राज्य चालवूं लागला'='क्षयति.' 'क्षि' ह्या धातूचे दोन अर्थ होतात, एक 'वास करणें' आणि दुसरा 'कशाचा तरी राजा किंवा प्रभु असणें, कशावर तरी मालकी अथवा राज्य चालविणें.' सायणाचार्य येथें पहिला अर्थ घेतात, आम्हीं दुसरा घेतला आहे त्याला सायणांचीच आधार आहे. "त्वम् अस्य क्षयसि यद् ह विश्वम्" (ऋ ४.५.११) यांजवरील आणि "क्षयन्तौ राय· यजतस्य भूरे" (ऋ ७.९३२) यांजवरील त्यांचेंच भाष्य पाहा.

सूक्त ३३.

ऋषि—अंगिरस कुळांतील हिरण्यस्तूप या नांवाचा एक मनुष्य (पूर्वीच्या सूक्ताचा जो कर्ता तोच). देवता—इंद्र. वृत्त—त्रिष्टुप्.

१. [जन हो] या, गुरें मिळावीं अशी आम्हास इच्छा आहे त्यापेक्षा आम्ही इंद्राजवळ जाऊं. तो आम्हावर मोठा अनुग्रह करील. तर कल्याणकारक इंद्र ह्या गोसंपत्तीविषयीं आमची मोठी मनकामना पूर्ण करील कीं [नाहीं]?

HYMN 33.

To Indra. By the author of the preceding hymn. Metre—*Trishtup.*

1. Come, let us, desirous of cows, approach Indra. He may greatly increase his benevolence towards us. Will then the benign [Indra] [or will he not] grant our great desire of this wealth of cows?

---

१. येथून पहिल्या अष्टकाच्या तिसऱ्या अध्यायास आरंभ होतो. सायणाचार्यांनी आपल्या भाष्यांत सर्वानुक्रमणिकेंतून जो उतारा घेतला आहे त्यावरून आणि "गोसवविवधौ पशुकाम" ('गोसव म्हणजे गोमेध अथवा ज्यांत गोमांसहवि अर्पण करावयाचें तो यज्ञ आणि विवध म्हणून जो एकप्रकारचा याग हे दोनी याग ज्याला गुरें मिळावीं अशी इच्छा असेल त्याणें करावे' ९. ८. १२) या आश्वलायनश्रौतसूत्रावरून असें समजतें कीं, हे तेहतीसावें सूक्त "गोसवविवध" म्हणून जे याग करीत त्यांत म्हणत असत. परंतु हे रचणाऱ्यानें तशा प्रसंगीं म्हणावें म्हणून रचलेलें नाहीं. मागाहून त्याचा विनियोग तसा झाला हे लक्ष्यांत ठेवून याचा अर्थ करावा.

आम्हीं या पहिल्या मंत्राचा भावार्थ असा समजतों कीं, 'आम्हांस गुरें ढोरें होवेत जी सपनि [illegible] इच्छा आहे, त्यापेक्षां हे मित्र हो, या आपण जाऊं आणि इंद्राकडेस ती मागून घेऊं. इंद्र असा आहे कीं, आम्हांविषयीं त्याची जी अनुग्रहबुद्धि म्हणजे आमचें बरें करण्याची बुद्धि (प्रमति) ती तो पाहिजे तितकी वाढवू शकेल, म्हणजे आम्हां पाहिजे तें मागितलें तरी तो देईल. तर मग दुसरी संपत्ति आम्हास नको, गाई पुष्कळ मिळाव्या ही जी आमची मोठी मनकामना ती तो कल्याणकारी इंद्र पूर्ण करणार नाहीं काय?' आमच्या समजुतीप्रमाणें हे स्तोत्र ऋषि आपल्या मित्रांस किंवा आसपास असलेल्या माणसांस म्हणतो आहे.

या ऋचेंत 'युविन्' हें पद किंचित कठिण आहे. 'कविन्' हे केवळ प्रश्नदर्शक अव्यय आहे. याचा दुसरा कांहीं अर्थ होत नाहीं. या पदद्वयाचा अन्वयाबरोबर एक शब्दाची अपेक्षा या मंत्राच्या अर्थास आहे. परंतु मराठी [illegible]

उपेदहं धनदामप्रतीतं जुष्टां न श्येनो वसतिं पतामि ।
इन्द्रं नमस्यन्नुपमेभिरर्कैर्यः स्तोतृभ्यो हव्यो अस्ति यामन् ॥ २ ॥
उप । इत् । अहम् । धनऽदाम् । अप्रतिऽइतम् । जुष्टाम् । न । श्येनः ।
वसतिम् । पतामि ।
इन्द्रम् । नमस्यन् । उपऽमेभिः । अर्कैः । यः । स्तोतृऽभ्यः । हव्यः ।
अस्ति । यामन् ॥ २ ॥

भाषायाम्.

२. अहं धनदां (=धनस्य दातारम्) अप्रतीतम् (=अप्रतिगत=केनापि अप्रतिहतम्) [इन्द्रम्] इत् (=इन्द्रमेव), श्येनः (=एतन्नामको वेगवान्पक्षी) वसतिं (=नीडम्) इव, उपपतामि (=अत्यादरेण धावामि), उपमैः (=उत्तमैः) अर्कैः (=स्तोत्रैः) इन्द्रं नमस्यन् [तम् उपपतामि] । यः [इन्द्रः] स्तोतृभिर्यामनि (=युद्धे) हव्यः (=आह्वानयोग्यः) अस्ति ॥

आपण 'तो आपणास रुपये देईल की' म्हणजे 'तो आपणास रुपये देईलच' असे म्हणून 'की' या प्रश्नदर्शक अव्ययाचा प्रयोग करितों तसा 'कुवित्' याचा येथे प्रयोग असेल. सायणाचार्यहि तसाच घेतात असे दिसते.

'मनकामना'='केतम्.' "मम देवास. अनु केतम् आयन्" (ऋ. ४. २६. २.) याजवर सायणाचार्य सुद्धा 'केनम्' म्हणजे 'संकल्प' असा अर्थ करितात, तो पाहा. शिवाय, "त ते देवासः अनु केतम् आयन्" (ऋ. १०. ६. ७.) यांतहि तोच अर्थ इष्ट दिसतो.

२. ससाणा [आपल्या] प्रिय घरट्याकडेस [धांव घेतो] तसा मी धन देणाऱ्या [आणि] अखंडितशौर्यवान् [इंद्रा]कडेसच धाव घेतों,–[मी] उत्तम स्तोत्रांनीं इंद्राला नमन करीत करीत [त्याजकडेसच] [धाव घेतों]; ज्या [इंद्रा]चा धांवा स्तोत्यांनीं युद्धांत करण्यास योग्य आहे.

2. To Indra alone [who is] giver of wealth, [and who is] irresistible I fly as [does] the falcon to [his] beloved home,—fly to Indra, adoring him with excellent hymns: for he deserves to be invoked in battle by [his] worshippers.

---

२. मंत्रकर्त्याचा भावार्थ.– 'इंद्र धन देणारा म्हणजे लढाईत लूट मिळवून देणारा, आणि अखंडितशौर्यवान् म्हणजे त्याच्या समोर कोणी लढण्यास येण्याविषयी शक्तिमान् नाहीं असा आहे, म्हणूनच आम्हांसारिखे जे स्तोते अथवा कवि त्यांनीं लढाईत त्यास हाक मारण्यास योग्य आहे, म्हणजे कांहीं जड भारी पडलें तर पाठबळासाठीं त्याचा धांवा करण्यास योग्य होय. वास्तव ससाणा जसा मोठ्या वेगानें आपल्या नेहमी राहण्याच्या घरट्याजवळ मोठ्या प्रीतीनें धांव घेतो तसा मी उत्तम उत्तम स्तोत्रें म्हणून इंद्राजवळ धांव घेत आहे'.

'प्रिय'=‘जुष्टम्' 'जुष्ट' म्हणजे अक्षरशः 'सेवित' त्यावरून, जें सेवित असतें तें प्रिय म्हणजे त्याजवर प्रीति बसलेली असते, वास्तव 'प्रीत', 'प्रिय' असा अर्थ होतो ऋ. १. ४४. ४. यांत सायणांनींच 'प्रीत' असा अर्थ केला आहे तो पाहा. प्रयोगान्तरें पुष्कळ आहेत.

'ससाणा....[धांव घेतो] तसा.' श्येन म्हणजे ससाणा पक्षी हा फार चपळ असल्याविषयीं पूर्वील सूक्ताचा १४ वा मंत्र यांत उपमा दिली आहे ती पाहा.

लढाईत जय मिळवून देणारा आणि अप्रतिम शूर इंद्र आहे म्हणून मी त्याची प्रार्थना करितों असें हिरण्यस्तूप ऋषि म्हणतो हे ध्यानांत ठेवावें युद्धांत शौर्य दाखविणें आणि जय मिळविणें या गोष्टीला आमचे पूर्वज प्राचीन आर्यजन ब्राह्मण होते तरी किती चाहाते होते तें पाहा.

नि सर्वसेन इषुधीँरसक्त समर्यो गा अंजति यस्य वष्टिं ।
चोष्कूयमाण इन्द्र भूरिं वामं मा पणिर्भूरस्मदधिं प्रवृद्ध
॥ ३ ॥

नि । सर्वऽसेनः । इषुऽधीन् । असक्त । सम् । अर्यः । गाः । अजति ।
यस्यं । वष्टिं ।
चोष्कूयमाणः । इन्द्र । भूरिं । वामम् । मा । पणिः । भूः । अस्मत् ।
अधिं । प्रऽवृद्ध ॥ ३ ॥

वधीर्हि दस्युं धनिनं घनेनँ एकश्चरन्नुपशाकेभिरिन्द्र ।
धनोरधिं विषुणक्ते व्यांयन्नयंज्वानः सनकाः प्रेतिमीयुः
॥ ४ ॥

वधीः । हि । दस्युम् । धनिनम् । घनेन । एकः । चरन् । उपऽशाकेभिः ।
इन्द्र ।
धनोः । अधिं । विषुणक् । ते । वि । आयन् । अयज्वानः । सनकाः ।
प्रऽइतिम् । ईयुः ॥ ४ ॥

भाषायाम्.

३ [इन्द्र] सर्वसेन (=सकलसैनाया एकोधिपतिर्) [भूत्वा] इषुधीन् न्यषक्त (=निषज्जयात=निषक्तेषुधि समामाय सिद्धो भवति)। अर्य (=पालयिता) [इन्द्र] यम् [उपासक] वष्टि (=कामयते) [तं प्रति] [तस्य शत्रो] गाः समजति (=समानयति)।—हे प्रवृद्ध (=प्रकृष्ट) इन्द्र, [जनेभ्यो] भूरि (=प्रभूत) वाम (=धन) चोष्कूयमाण (=प्रयच्छन्) [त्वम्] अस्मद् अधि (=अस्मासु=अस्माक विषये) पणि (=व्यवहारी=दानविमुखो) मा भू ॥

४ हे इन्द्र, [त्व] हि उपशाके (=शक्तिमद्भिस्तव सहायै=मरुद्भि) [सह] चरन् [अपि] धनिन (=बहुधनोपेत) दस्यु (=वृत्रम्=असुर) घनेन (=वज्रेण) एक [अ]वधी (=हतवानसि)। [अनन्तर] ते (=प्रसिद्धा) अयज्वानो (=यज्ञविरोधिन=देवयजनमकुर्वन्त) सनका (=एतन्नामका वृत्रस्य अनुचरा) विषुणक् (=सर्वत) [तत्र] धनोरधि (=धनुष उपरि) व्यायन् (=आगच्छन्) [आगत्य च] प्रेति (=मरणम्) ईयु (=प्रापु.) ॥

३. [इंद्र] सकळ सैन्याचा [एकटा] नायक [होऊन तो] [आपल्या] [पाठी]वर बाणभाता चढवून सिद्ध होत असतो. जो [उपासक] त्याला आवडतो [त्याजवळ] [तो] प्रीतीनें [शत्रूच्या] गाई हाकून आणितो.—हे महान् इंद्रा, [तूं] विपुलसंपत्तीचा दाता आहेस यास्तव आम्हाविषयीं [च] कृपण होऊं नकोस.

3 Leader of the whole army [Indra] ties the quivers [to his shoulder], [and] full of kindness he drives to whomsoever he loves the cows [of the enemy]—O Indra, [being] the giver of plentiful wealth, do not, great [Indra], be a miser in respect of us.

४. कारण कीं, हे इंद्रा, [तूं] [आपल्या] शक्तिमान साहाय्यकर्त्यां [मरुतां]सह चाल करून जाऊन धनसंपन्न वृत्राला वज्रानें एकटा [च] मारिता झालास. [मग] ते वृत्राचे] सनक[नावाचे] यज्ञहीन [अनुचर] चहूंकडून [तुझ्या] धनुष्यावर येऊन पडले [आणि] मरण पावले.

4. For, Indra, [though] going forth with [thy] powerful allies (the Maruts) thou didst alone slay the rich demon with [thy] thunderbolt Those unsacrificing Sanakas [then] fell upon [thy] bow from all sides [and] met with [their] death

३. या मंत्राचेंहि तात्पर्य युद्धसंबंधीच आहे. तें असें कीं, 'हे इंद्रा, ज्या उपासकावर तुझी प्रीति असते त्याच्या सर्व सेनेचा तू एकटा नायक होतोस आणि बाणभाते पाठीला बांधून त्या उपासकाच्या पक्षानें युद्धास सिद्ध होत असतोस, आणि त्याच्या शत्रूच्या गाई हाकून आणून त्याला देतोस आणि हे महान् इंद्रा, तूं लोकांस पुष्कळ धन देतोस, यास्तव आम्हांसहि दे. आम्हाविषयींच कृपण होऊं नकोस.'

'विपुल संपत्तीचा दाता आहेस यास्तव'= चोष्कूयमाण भूरि वामं' परंतु 'चोष्कूयमाण' हे रूप 'स्कू' धातूपासून आहे. "इन्द्र चोष्कूयसे वसु" (ऋ ८. ६४१), आणि "चोष्कूयते विशः इन्द्रः मनुष्यान्" (ऋ. ६. ४७ १६) या मंत्रावरून पाहतां 'विपुल संपत्तीचा धनी आहेस' असा अर्थ चांगला समजतो. पण आम्ही सायणास अनुसरलों आहों.

४. या मंत्राचें भाषांतर आम्हीं

परां चिच्छीर्षा ववृजुस्त इन्द्रायज्वानो यज्वभिः स्पर्धमानाः ।
प्र यद्दिवो हरिवः स्थातरुग्र निरव्रताँ अधमो रोदस्योः
॥ ५ ॥ १ ॥

परां । चित् । शीर्षा । ववृजुः । ते । इन्द्र । अयज्वान॰ । यज्वऽभि ।
स्पर्धमाना॰ ।
प्र । यत् । दिव । हरिऽव । स्थात । उग्र । नि । अव्रतान् । अधम॰ ।
रोदस्यो ॥ ५ ॥ १ ॥

भाषायाम्.

५ हे हरिव (=हरिवन्=हरिनामाश्वयुक्त) हे स्थात (=स्थाणो), हे उग्र (=शूर), यद् (=यदा) त्वम् अव्रतान् (=व्रतरहितान्=धर्मरहितान्) [तान् वृत्रानुचरान्] दिव (=अन्तरिक्षात्) रोदस्यो (=द्यावापृथिव्यो) [सकाशात्] [च] निष्प्राधम (=धमन कृत्वा नि शेषेण भस्तवानसि) [तदा] हे इन्द्र, यज्वभि (=यागानुष्ठातृभि [सह] स्पर्धमाना (=द्वेष कुर्वाणास्) ते अयज्वान (=यागरहिता) [वृत्रानुचरा] शीर्षाणि परैव ववृजु (=स्वमूर्धं पराङ्मुखानेव कृत्वा जग्मु) ॥

सायणाचार्यांप्रमाण केल आहे अर्थ स्पष्ट आणि सुबोध आहे पण 'वृत्राला . मारिता झालास' याबद्दल मळांत द स्यूला. मारिता झालास' असें आहे 'दस्यु,' शब्दाचा 'वृत्र' हा अर्थ सायणांनीं केला आहे वस्तुत 'दस्यु' म्हण जे अमुक एक विशेष असुर (जसा 'वृत्र') असा न होता, सामान्य कोण ताहि असर असा होता त्व शतानि अव शम्बरस्य पुर जघन्थ अप्रतीनि दस्यो" (ऋ ६ ३१ ४) यांत शम्बर' या नांवाच्या असुराला दस्यु असें नांव दिले आहे नि शुष्णे इन्द्र धर्णास वज्र जघन्थ दस्यवि" (ऋ ८ ६ १४) यांत शुष्ण' नांवाच्या असराला 'दस्यु' म्हटलें आहे ' स्वप्नेन आभ उप्य चुमुरि धुनिं च जघन्थ" (ऋ २ १५ ९) यांत चुमुरि' आणि 'धुनि' या दोन असुरांस 'दस्यु' असें म्हटले आहे यावरून 'दस्यु' हें विशेषनाम नव्हे, असुर या अर्था अपरपर्याय आहे. हा 'दस्यु' शब्दाचा एक अर्थ दुसरा अर्थ 'अनार्य ' म्हणजे आर्य लोकांच्या आसपास जे कोळी, खोंड, भिल इत्यादि देवांस यज्ञादिक-करून न भजणारे लोक त्यांस 'दस्यु' असें म्हणत त्यांचा देवावर भरवसा नसे म्हणून त्यांस अश्रद्ध' असं म्हटले-ल आढळतें ('नि अक्रतून् मृधिन मृध्रवाच पणीन् अश्रद्धान् अवृधान् अयज्ञान्। प्र प्र तान् दस्यून अग्नि विवाय' ऋ ७ ६ ३) त्यांस 'अव्रत' म्हणजे देवांची सेवा न करणारे असे म्हटलेल आढळतें ('तूर्वन्त दस्युम् आयव व्रतै सीक्षन्त अव्रतम्" ऋ ६ १४ ३) आमचे पूर्वज आर्य लोक आणि हे 'दस्यु' यांजमध्य धर्मा-च्या व कर्माच्या संबधानें वगैरे विरोध

*

५. हे हर्यश्वा, हे स्थाणू, हे महाबलवान् इंद्रा, [तूं] जेव्हां [त्या] धर्महीन [वृत्रानुचरां]ला आकाश, स्वर्ग [आणि] पृथ्वी यांतून फुंकून बाहेर काढून टाकिलेस, तेव्हां भक्तांचा द्वेष करणारे ते अभक्त तोंडें फिरवून नाहींसेच झाले.

5. Away went, with their faces turned back, the infidels who strove with the believers, when, O possessor of the bay horses, O firm [and] mighty Indra, [thou] blewest the unbelievers away from the sky, from heaven [and] earth.

दाखविलेला वेदांत आढळतो. (ऋ. १. ११७. २१ पाहा). "अहं शुष्णस्य श्नथिता वधो यमं न यः ररे आर्यं नाम दस्यवे" (ऋ. १०. ४९. ३) यांत इंद्र - म्हणतो कीं, 'दस्यूला मी आर्य हे नांव दिलें नाहीं'. "स जातुभर्मा श्रद्धान: ओज: पुर: विभिन्दन् अचरत् वि दासीः। विद्वान् वज्रिन् दस्यवे हेतिमस्य आर्यं सहः वर्धय द्युम्नम् इन्द्र" ऋ. १. १०३. ३ यांत 'प्रजांचें पालन करणारा तो [इंद्र] आपल्या प्रतापावर अवलंबून राहून दस्यूंचीं नगरें फोडून टाकिता झाला आणि त्यांजवरून चालला.—हे वज्रधरा, [मर्मस्थल] जाणणारा असा तूं दस्यूच्या अंगावर हत्यार टाक, [आणि] हे इंद्रा, आर्य लोकांचें बळ व यश हीं वाढीव,' असा विरोध दाखविला आहे. दस्यूंस जिंकून आर्य लोकांच्या अमलाखालीं आणण्याविषयीं देवांनीं साहाय्य करावें म्हणून देवाची प्रार्थना आमच्या आर्य पूर्वजांनी केलेली आढळते. (ऋ. १. ५३. ४; ९. ४१. २; ५. ७. १० हे मंत्र पाहा). हा जो दस्यूचा दुसरा अर्थ त्यापासून आलीकडचा 'चोर' हा अर्थ निघाला आहे. कारण कीं कोळी, भिल, खोंड वगैरे अनार्य जातीचे लोक आतां जसे चोरीचा धंदा करितात तसेच पूर्वी करीत होते.

आमचा जो 'दास' म्हणजे गुलाम या अर्थाचा शब्द आहे तो दस्युशब्दाचाच संबंधी आहे. हे जे अनार्य लोक होते त्यांस आर्य लोकांनीं जिंकून आपले गुलाम (म्हणजे शूद्र) केले त्यापासून 'दास' म्हणजे गुलाम असा अर्थ होऊं लागला. 'दास' म्हणजे प्रथम गुलाम असा अर्थ. होत नसे, दस्यु अथवा दस्यूचें असा होई याविषयीं प्रमाण वर उतरून घेतलेल्या (१. १०३. ३) मंत्रावरून स्पष्ट दिसून येतें. हे दस्यु जेव्हां आर्य लोकांच्या अमलाखालीं येऊन त्यांचे गुलाम झाले त्यापासून 'दास' म्हणजे गुलाम असा अर्थ होऊं लागला.

प्रस्तुत मंत्रांत 'दस्य' म्हणजे 'वृत्रासुर असा अर्थ सायणांनीं केला आहे त्यास विशेष अडचण दिसत नाहीं.

'एकट्या[च] मारिता झालास.' सायणाचार्य म्हणतात इंद्राचे साहाय्यकारी मरुत् त्यांजबरोबर वृत्राला मारण्याच्या वेळीं गेले तरी ते भाऊनउभे मात्र राहिले, आणि एकट्या इंद्रानेंच वृत्रवध केला.

'सनक[नांवाचे]....[अनुचर]' हाहि अर्थ सायणास अनुसरूनच केला आहे. पण 'सनक' म्हणजे 'जुने,' 'पुराण' असा शब्दशः अर्थ होतो.

अयुयुत्सन्ननवद्यस्य सेनामयातयन्त क्षितयो नवग्वाः ।
वृषायुधो न वध्रयो निरष्टाः प्रवद्भिरिन्द्राच्चितयन्त
आयन् ॥ ६ ॥

अयुयुत्सन् । अनवद्यस्य । सेनाम् । अयातयन्त । क्षितयः । नवऽग्वाः ।
वृषऽयुधः । न । वध्रयः । निःऽअष्टाः । प्रवत्ऽभिः । इन्द्रात् ।
चितयन्तः । आयन् ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. ते [अयज्वानः] अनवद्यस्य (=दोषरहितस्य=पवित्रस्य) [इन्द्रस्य] सेनाम् अयुयुत्सन् (=योद्धुमैच्छन्) । नवग्वा. क्षितयः (=नवग्वनामानः अङ्गिर.-प्रभृतयः केचिन्नव जनाः) [इन्द्रम्] अयातयन्त (=इन्द्रो युद्धाय यथा यतेत तथा अकुर्वन्=प्रोत्साहितवन्त) । [अनन्तर], वृषयुधः (=वृषेण सेचनसमर्थेन पुंस्त्वयुक्तेन पुरुषेण सह, युद्धं कुर्वन्तो) वध्रयो (=नपुंसका) इव, ते निरष्टा. (=निरस्ता=निराकृताः) [सन्त] चितयन्तः (=आत्मानं ज्ञापयन्त=स्वशक्तिहीनत्वं दर्शयन्तः) प्रवद्भि. (=पलायितुं सुशकैर्मार्गैः) इन्द्राद् आयन् (=परेयुः) ॥

५. इद्राने वृत्राचे अनुचर स्वर्ग, आकाश आणि पृथ्वी यांतून कसे हाकून लाविले तें या मन्त्रांत सांगितले आहे.

'हर्यश्व' म्हणजे 'हरी' या नांवाचे दोन पिंगट घोडे आहेत ज्याला तो हे इद्राचे विशेषण अनेक ठिकाणीं येत असतें त्यामुळें तें त्याच्या नांवांपैकीच एक नांव बनून गेलें आहे.

'स्थाणु' म्हणजे लढाईंत खांबासारिखा स्थिर, अचल. हेंहि इद्राचेंच विशेषण आहे.

'आकाश, स्वर्ग [आणि] पृथ्वी यांतून'='दिव. रोदस्योः' दिव ही पंचमी आहेच. पण 'रोदस्यो.' षष्ठी किंवा सप्तमी संभवते पंचमी नाहीं, आणि पंचमी तर इष्ट आहे, सायणाचार्य 'सकाशात्' इतकें अध्याहृत घेऊन पंचमीचा अर्थ आणितात. निर्वाहासाठीं आम्हीं तेंच घेऊन भाषांतर केलें आहे.

'तोंड फिरवून नाहींसेच झाले'='पराचित् शीर्षा ववृजु.'. अक्षरशः अर्थ, 'डोकीं मागेंच फिरविते झाले.' म्हणजे 'तोंडें काळीं करून पळून गेले' असें म्हटल्यास चालेल.

वृत्राला मारण्याला कांहीं तरी श्रम पडले, पण वृत्राचे जे अनुचर म्हणजे त्याचे अनुयायी त्यांस नाहींसे करण्यास इद्राला कांहींच श्रम पडले नाहींत, एक फुंक मारतांच ते स्वर्ग, आकाश आणि पृथ्वी यांतून कापसाप्रमाणे उडून जाऊन नाहींसारिखेच झाले असें तात्पर्य.

६. [त्या धर्महीन वृत्रानुचराला] पवित्र [इंद्रा]च्या सेनेशीं युद्ध करण्याची इच्छा झाली. [त्याबरोबर] नवग्व जनांनीं [इंद्राला युद्धाविषयीं] प्रोत्साहन केलें. [मग] पुरुषत्वयुक्त मनुष्याशीं लढणारे नपुंसक जसे [पराभव पावतात] तसे [ते] [अनुचर] पराभव पावून [आपलें] वलहीनत्व दाखवीत दाखवीत इंद्रापासून दूर पळून गेले.

6. They (the unbelievers) desired to fight with the army of holy Indra. The Navagva people urged [Indra to give them fight]. Like eunuchs fighting with a hero they (the unbelievers) were dispersed, [and] exposing their backs away they went from Indra.

या मंत्राचा अर्थ आम्हीं सायणाचार्यांप्रमाणेच केला आहे. आणि तो खरा आहे याविषयीं आम्हांस संशय नाहीं. तथापि 'अधम.' ('फुकून टाकिता झालास') याच्याशीं 'यत्' (='जेव्हां') या संबंधी सर्वनामशब्दाचा संयोग आहे त्यापेक्षां हें क्रियापद सर्वानुदात्त नसावें, अधमः (संहितेत निरंष्ठुतों अधमो रोदस्योः) असें असावें, परंतु तसें कां नाहीं तें समजत नाहीं. सायणाचार्य याविषयीं कांहींच सांगत नाहींत. तेव्हां मूळचा खरा पाठ "प्र यद्दिवो.. निरंष्ठुता अधमो रोदस्योः." असा अथवा "प्र यद्दिवो....निरंष्ठुतों अधमो रोदस्योः." असा असावा काय? पूर्वीचा असेल तर भाषांतर खालीं लिहिल्याप्रमाणें करावें लागेल—'हे इंद्रा, मर्कांचा द्वेष करणारे ते अभक्त तोंड फिरविते झाले. तेव्हां हे हर्यश्वा, हे स्थाणू, हे महाबलवान् [इंद्रा] [तूं] [त्या] धर्महीन [वृत्रानुचरा]ला आकाश, स्वर्ग आणि पृथ्वी यांतून फुंकून बाहेर काढून टाकिलेस.' आणि हा अर्थ चांगला दिसतो, कारण कीं, तोंड फिरवितांच तूं त्यांस फुंकून टाकिलेस असें म्हणणें हें नीट जुळतें.

६. वृत्राचे धर्महीन अनुयायी इंद्रानें एका फुंकेशीं त्रिभुवनांतून नाहींसे केले असें वर सांगितलें. तें कसें तें या मंत्रांत सांगतो.

'नवग्व जनांनीं.' नवग्व हे कोण? आणि त्यांस नवग्व संज्ञा कां पडली? सायणाचार्य म्हणतात कीं, "अंगिरस गोत्राचे म्हणजे आंगिरसकुलोत्पन्न ऋषि पुष्कळ दिवस चालणारा असा यज्ञ आरंभून बसले होते त्यांतून नवजणांला नव महिन्यांनीं इष्टलाभ झाला म्हणून ते जे आंगिरस कुलोत्पन्न नव ऋषि त्यांस नवग्व म्हणतात." गोत्र म्हणण्याचें कारण कांहीं नरी असो, पण नवग्व म्हणून कोणी नवजण व्यक्तिविशेष अथवा समुदायविशेष होते यांत

great care, and, so far as I can see it is intelligible without the original I feel sure that your work well deserves the patronage of Government.

Yours truly,

F KIELHORN

Mr ——— s *Vedârthayatna* is a very valuable contribution to Vedic philology It appears to be based on the most trustworthy materials and shows as might be expected from a scholar like Mr ——, very careful and conscientious work

It possesses a very great importance for India as it is the first attempt to interpret to the Indian public at large the most ancient and the most important work of the Brahminical religion I trust that eventually the *Vedârthayatna* will find a place in all public libraries of India

G BUHLER

5th September 1876

The *Vedârthayatna* "gives the text a Marâthî version "and an English translation * * * * * The "attempt when completed will prove useful in India in giving "to the people an opportunity of reading the most ancient "monument of Aryan thought, which most of them can never "expect to study in the original" *The Friend of India*

"In order to show the correctness of reasoning in assigning to particular words and phrases a meaning different "from that given by Sâyana the translator should show the "grounds on which he proceeds And this the present trans "lator has done * * * The present translation (both in "Marâthî and English) is scholarly and accurate throughout "though we might differ with the translator in the interpretation of single words or passages For the better understanding of the Veda the Pada text and its rendering into

७. हे इंद्रा, [वृत्राचे] हे [अनुचर] रडत असताना आणि हासत असताना तू त्याजबरोबर लढून त्यास अंतरिक्षाच्या पलीकडेस हाकून देता झालास. [तू] असुर[वृत्रा]ला जाळून स्वर्गातून खाली ढकलून देता झालास, [आणि] [तुला] सोम अर्पण करणारा [आणि] स्तवणारा [जो भक्त] त्याचें स्तोत्र [तू] राखून उंच ठिकाणीं [स्वर्गांत] ठेविता झालास

7. Indra, thou didst fight these [infidels] as they cried and laughed off the other end of the firmament. Down didst [thou] burn [and hurl] the demon from heaven—high [in heaven] didst [thou] protect [and place] the prayer of him who pressed the Soma [for thee] [and] sang [thy glories]

---

७. या मंत्राचें तात्पर्य आम्ही असें समजतो का, 'हे इंद्रा, असुराचे जे अनुयायी ते कितीएक रडत होते आणि कितीएक हासत होते (का ?), त्याजबरोबर तू लढून लढून त्यास अंतरिक्षाच्या' बाहेर हाकून दिलेंस; आणि असुराला तू जाळून द्युलोकांतून खालीं पाडून टाकिलेंस आणि तुझे जे भक्त त्यांची भक्ति विघ्नरहित करून त्यास द्युलोकांत उच्च ठिकाणा जागा दिलीस'

'तू त्याजबरोबर लढून त्यास अंतरिक्षाच्या पलीकडेस हाकून देता झालास'='एतान् रजस पारे अयोधय' अक्षरशः अर्थ 'त्यांना अंतरिक्षाच्या पैलतीरीं लढविता झालास'

या मंत्राचा भाषांतर अर्थ स्पष्ट समजण्यासाठीं आम्हीं किंचित् अक्षर सोडून केलें आहे याच्या उत्तरार्धांत 'अंत' आणि 'उच्च' हे शब्द आहेत ते परस्परविरोधी आहेत त्यामुळें, आणि 'दस्यु' आणि 'सुन्वन् स्तुवन्' यांच्यामध्यें विरोध आहे म्हणून, आणि 'अदह' आणि 'आव.' हे परस्पर विरोधी आहेत म्हणून, अभक्तास जाळून द्युलोकांतून खालीं टाकून दिला आणि भक्ताला रक्षून द्युलोकांत उच्च ठिकाणीं स्थापित केला असा भावार्थ आम्ही समजतो तो बरोबर आहे असें आम्हांस वाटतें.

'असुर[वृत्रा]ला जाळून स्वर्गातून खालीं ढकलून देता झालास'='दस्यु दिव आ अवादह' अक्षरशः 'असुराला स्वर्गातून खालीं जाळिलास' त्याप्रमाणेच 'तुला सोम अर्पण करणारा [आणि] स्तवणारा [जो भक्त] त्याचें स्तोत्र [तू] राखून उच्च ठिकाणीं [स्वर्गांत] ठेविता झालास' या ऐवजीं मुळांत जे 'उच्चा प्र सुन्वत स्तुवत शंसम् आव' असे शब्द आहेत त्याचा अक्षरशः अर्थ 'सोम काढणाराचें [आणि] स्तवणाराचें उच्च स्तोत्र

चक्राणासः परीणहं पृथिव्या हिरण्येन मणिना शुम्भमानाः ।
न हिन्वानासस्तितिरुस्त इन्द्रं परि स्पशो अदधात्सूर्येण
॥ ८ ॥

चक्राणासः । परिऽनहम् । पृथिव्याः । हिरण्येन । मणिना । शुम्भमानाः ।
न । हिन्वानासः । तितिरुः । ते । इन्द्रम् । परि । स्पशः । अदधात् ।
सूर्येण ॥ ८ ॥

भाषायाम्.

८ हिरण्येन (=सुवर्णमयेन) मणिना (=अलङ्कारेण=अलङ्कारै) शुम्भमाना (=शोभमानास्) ते [वृत्रस्य स्पशः= प्रेष्या] पृथिव्या परीणह (=परिधिं= सर्वतो व्याप्तिं) चक्राणा (=पुन पुन परिगच्छन्त) [अपि च] हिन्वाना (=वेगेन द्रवन्त) [अपि] इन्द्र न तितिरु (=न तेरु =जेतु न समर्था अभूवन्)। [इन्द्र] [तान्] स्पश सूर्येण (=सूर्यप्रकाशेन) पर्यदधात् (=परिहितवान्) ॥

ठिकाणीं राखिता झालास' असा आहे तथापि भक्ताचें भजन निर्विघ्न करून त्याला स्वर्गीं ठेविता झालास असें तात्पर्य स्पष्ट दिसते.

८. सुवर्णमय अलंकारांनीं शोभायमान [असे] ते [वृत्राचे] हेर पृथ्वीच्या परिघासभोंवालों फिरता फिरता[हि] [आणि] आवेशानें धांवत असता[हि] इंद्राला जिंकावयास समर्थ झाले नाहींत. [मग] [तो] [त्या] हेरांस सूर्य[प्रकाशा]च्या योगा]नें आच्छादिता झाला.

8. [Though] [they] the spies [of the Demon], adorned with golden ornaments went round and round the circumference of the earth, [and] ran fast, [they] could not vanquish Indra. He covered[and dazzled] them with [the light of] the sun.

८. 'असुराचे जासूद आंगावर सोन्याचे अलंकार मिरवीत मिरवीत इंद्राच्या हातीं न सांपडावें म्हणून आणि इंद्राला थकवावें म्हणून पृथ्वीच्या सभोंतालीं पुन: पुनः फिरूं लागले आणि मोठ्या त्वरेनें धांवूं लागले, पण इंद्रानें त्यांस सोडलें नाहीं आणि इंद्रच जय पावला, ते जय पावले नाहींत. ते दूर पळून गेल्यामुळे दिसेनातसे झाले तेव्हां इंद्रानें सूर्यप्रकाश त्यांच्या आंगावर टाकून त्यांचा नाश केला' असा या मंत्राचा भावार्थ दिसतो.

हे वृत्राचे अनुचर अथवा जासूद म्हणजे कोण? याविषयीं सायणाचार्य कांहींच सांगत नाहींत. चक्रासभोंतालीं फिरल्याप्रमाणें पृथ्वीसभोंतालीं फिरत होते; त्यापेक्षां अंधकाररूपी राक्षस तर नसतील? कारण सूर्यप्रकाश त्यांच्या आंगावर टाकतांच त्यांचा नाश होतो, तेव्हां ते दुसरे कोण असणार? उदकांचा अवरोध करणारा जो, तो वृत्र असुर; मग त्याचे अनुचर म्हणजे सूर्याचा प्रकाश न होऊं देणारे जे अंधकाररूपी राक्षस ते असतील असें म्हणण्यांत विशेष ओढाताण नाहीं. आणि रात्रीच्या वेळीं यज्ञयागादि धर्मक्रिया होत नसल्यामुळे त्यांस धर्मरहित, भक्तद्वेष्टे, इत्यादि विशेषणेंहि शोभतात. आणि म्हणूनच त्यांस निशाचर असें नांव पडलें आहे असें आम्हांस वाटतें.

'आवेशानें धांवत असता[हि]'= 'हिन्वानाः'. 'या मंत्रांत' पृथिव्याः परीणहं चक्राणासः' असे शब्द आहेत यावरून ज्यावेळीं हें सूक्त रचिलें त्यावेळीं पृथ्वीची आकृति सपाट नाहीं, पण वर्तुळ आहे असें ज्ञान आपल्या आर्य पूर्वजांस होतें असें स्पष्ट दिसून येतें. ती मागाहून पिंपळाच्या पानासारिखी कशी आणि केव्हां झाली आणि तिजवर दुधाचा, दह्याचा, मधूचा इत्यादि सप्त सागर कोठून व केव्हां आले असतील याचा शोध लावणें आमच्या आधुनिक आर्यबंधूंस किती अवश्य आहे पाहा.

'सुवर्णमय अलंकारांनीं शोभायमान'. म्हणजे "गळ्यांत, हातावर वगैरे जे अलंकार घालावयाचे त्यांहीं करून" असे सायणाचार्य म्हणतात. जासुदाच्या हातांत आणि पायांत तोडे असण्याची अजून चाल आहे.

परि यदिन्द्र रोदसी उभे अबुभोजीर्महिना विश्वतः सीम् ।
अमन्यमानाँ अभि मन्यमानैर्निर्ब्रह्मभिरधमो दस्युमिन्द्र ॥ ९ ॥

परि । यत् । इन्द्र । रोदसी इति । उभे इति । अबुभोजीः । महिना । विश्वतः । सीम् ।
अमन्यमानान् । अभि । मन्यमानैः । निः । ब्रह्मऽभिः । अधमः । दस्युम् । इन्द्र ॥ ९ ॥

न ये दिवः पृथिव्या अन्तमापुर्न मायाभिर्धनदां पर्यभूवन् ।
युजं वज्रं वृषभश्चक्र इन्द्रो निर्ज्योतिषा तमसो गा अदुक्षत् ॥ १० ॥ २ ॥

न । ये । दिवः । पृथिव्याः । अन्तम् । आपुः । न । मायाभिः । धनऽदाम् । परिऽअभूवन् ।
युजम् । वज्रम् । वृषभः । चक्रे । इन्द्रः । निः । ज्योतिषा । तमसः । गाः । अधुक्षत् ॥ १० ॥ २ ॥

भाषायाम्.

९ हे इन्द्र, यद् (=यदा) [त्वं] [तव] महिना (=महिम्ना) उभे रोदसी (=द्युलोकभूलोकौ समकाले) विश्वत सीं (=सर्वत एव) पर्यबुभोजी (=अभितस्ते आत्मान भुभवासि=ते परिवेष्टितवानसि) [तदा] [त्व] [त्वा] मन्यमानै (=स्तुवद्भि) ब्रह्माभि (=स्तोस्तृभि) [करणेन], अमन्यमानान् (=त्वामस्तुवत) [वृत्रानुचरान्] अभि[अधम] (=हतवानसि), दस्युम् (=असुर) [च], हे इन्द्र, निरधम (=धमनेन नि सार्य नाशितवानसि) ॥

१० ये (=अपि च ते) [सदस्यव. अमन्यमाना] दिवो (=द्युलोकस्य) पृथिव्या [वा] अन्त (=पर्यन्तं=सनिधि) न आपु (=न प्राप्ता) मायाभि (=निर्जैर्मायाकर्मभि) धनदां (=धनस्य दातारम्) [इन्द्र] न पर्यभूवन् (=न पर्यवेष्टयन्) । वृषभो (=वीर्यवान्) इन्द्रो वज्र युजं (=मित्र=सहाय=स्वहस्तयुक्त) चक्रे, ज्योतिषा (=तेजसा) [च] तमसः (=अन्धकाराद्) गा निरधुक्षत् (=निर्दुदोह) (=अन्धकारच्छन्न मेघ भित्त्वा जल पृष्टवान्) ॥

९. हे इंद्रा, जेव्हां [तू] [आपल्या] महिम्यानें पृथ्वी [आणि] द्यू [हे] उभय [लोक] सर्वहि बाजूनीं वेढून टाकिता झालास, [तेव्हा] हे इंद्रा, [तुला] भजणाऱ्या स्तोत्या[च्या योगा]नें, [तुला न भजणाऱ्या [जना]स [तू] मारून टाकिता झालास, [आणि] असुरास फुकून बाहेर टाकिता झालास;

9 When, Indra, [thou] didst surround with [thy] greatness heaven and earth simultaneously on all sides whatsoever, [then] by [means of] [thy] worshipping singers [thou] slewest, Indra, the unworshippers [and] blewest the Demon away.

१०. आणि [त्यानंतर] ते द्युलोकाच्या [अथवा] पृथ्वीच्या जवळ आले नाहींत [आणि] [आपल्या] कपटानीं धनदात्या इंद्रालाहि वेढून राहिले नाहींत. वीर्यवान् इंद्र आपल्या बरोबर वज्र घेता झाला [आणि] प्रकाशानें गाईंस अंधकारातून [मुक्त करून] [त्यांचे] दोहन करिता झाला.

10 And never did they [again] approach the outskirts of heaven [or] earth, nor surround the wealth-giver (Indra) with [their] schemes Manly Indra took the thunderbolt [for his] ally [and] with light milked the cows out of darkness.

९. मंत्राचे तात्पर्य.—'हे इंद्रा, अभक्त असे जे असुरानुचर त्यांस आणि त्यांचा प्रभु जो असुर त्यास मारून टाकण्याच्या प्रसंगी तू सरळ भूलोक आणि द्युलोक यांस आपल्या महिम्यानें (मोठेपणानें) सर्व बाजूंनी वेढून टाकिलेस आणि मग तुझी स्तुतीनें वगैरे भक्ति करणारे जे स्तोते (भक्त) त्यांच्या योगानें म्हणजे त्यांची स्तुति ऐकून तुझा [illegible] ह्या अभक्त असुरांस तूं फुंकून मारून टाकिलेस आणि त्यांचा जो प्रभु असुर त्यास फुंकून बाहेर हाकून दिलेस.'

'[तुला] भजणाऱ्या स्तोत्यां[च्या योगा]नें'='मन्दमानैः ब्रह्मभिः.' या पदाचा अर्थ येथें सायणाचार्य निरनिराळा करितात. 'ब्रह्म' म्हणजे 'स्तोता' असें न करितां 'स्तोत्र' असें म्हणतात. आम्हीं केलेला अर्थात अन्वय स्पष्ट असलेल्या शब्दांनीचाच आधार

अनु स्वधामक्षरन्नापो अस्यावर्धत मध्य आ नाव्यानाम् ।
सध्रीचीनेन मनसा तमिन्द्र ओजिष्ठेन हन्मनाहन्नभि
द्यून् ॥ ११ ॥

अनु । स्वधाम् । अक्षरन् । आपः । अस्य । अवर्धत । मध्ये । आ । नाव्यानाम् ।
सध्रीचीनेन । मनसा । तम् । इन्द्र । ओजिष्ठेन । हन्मना । अहन् । अभि । द्यून् ॥ ११ ॥

भाषायाम्.

११ [तदा] आप अस्य (=इन्द्रस्य) अनु स्वधां (=काममनु=मन कामनामनुसृत्य) अक्षरन् (=अवहन्) । नाव्यानां (=नावा तरणयोग्यानां=बह्वीनाम्=अगाधानां) [तासाम् अपां] मध्ये आ (=मध्ये) [वृत्र अमृत सन्] अवर्धत (=वृद्धं प्राप) । [तदनन्तरम्] इन्द्र सध्रीचीनेन मनसा (=सगतेन मनसा=समस्तेन बुद्धचातुर्येण) ओजिष्ठेन (=अतिबलयुक्तेन) हन्मना (=वज्रेण) अभि द्यून (=केषुचिद्दिवसेषु) त (=वृत्रम्) अहन् ॥

आहे 'मन्यमान' म्हणजे स्तवणारा' अथवा 'भजणारा' अशाविषयी ऋ ५ ४ १०, ५ ६ १ आणि ५ ९ १ हे मंत्र आणि सायणाचे भाष्य पाहा ब्रह्म' शब्दाविषयी ऋ १ २ ५ या मंत्रावर 'प्रार्थना' शब्दावरची टीप पाहा

मारून टाकिता झालास'= अभि [अधम] यांत 'अधम' हे क्रियापद चवथ्या चरणांतून अपाकर्षण करून घ्यावे 'अभ्यधम' याचा अर्थ आम्हा केल्याप्रमाणे होतो याविषयी 'आभ दस्यु बकुरेण धमन्ता उरू ज्योति चक्रथु आर्याय" (ऋ १ ११७ २१) या मंत्रावरील सायणभाष्य पाहा

१० नवव्या मंत्रांत भक्तिहीन वृत्रानुचरांचा नाश केला असें सांगितल्यांविषयी या मंत्रात असें सांगतो की, ते पुन पृथ्वी अथवा द्युलोक यांच्या जवळहि आले नाहीत, मग इंद्र नि सपत्न होऊन मेघरूपी अंधकारमंडल प्रकाशानें फोडून गाईंस पिळता झाला तेव्हा त्यांचें दूध खालीं पडलें—म्हणजे मेघ फोडून पावसाची वृष्टि करिता झाला, असा या मंत्राचा भावार्थ आहे

सायणाचार्य या मंत्राचा पूर्वार्ध किंचित् निराळे लावितात ते 'ये' शब्दाचा संबंध पूर्वमंत्रगत अमन्यमान' शब्दाकडे न घेता जलविशेष' असें पद अध्याहृत घेऊन त्याच्याशीं घेतात आणि धनदा' म्हणजे पृथ्वी असें भाष्य करितात परंतु दोनी मंत्रांचा संदर्भ पाहिला तर आम्हीं दिलेला अर्थ सयुक्तिक

११. [मग] त्या [इंद्रा]चे इच्छेप्रमाणें उदकें वाहिलीं [आणि] त्यातून [जरी] नौका जाण्याजोग्या होत्या [तरी] त्याच्या मध्यें [तो वृत्र] [न मरता] वृद्धिंगत झाला. [मग] त्याला इंद्र [आपल्या] सगळ्या बुद्धिचातुर्यानें [आणि] अत्यंत प्रबळ वज्रानें कितीएक दिवसांनीं मारिता झाला

11. According to his (Indra's) wish the waters flowed [But the Demon] grew [strong] in the midst of them [though so deep as to be] navigable Indra with his collected wisdom [and] with his most mighty thunderbolt slew him in the course of time

दिसतो आणि त्याला अडचण कोठेंच दिसत नाहीं.

'आपल्या बरोबर वज्र घेता झाला' ='युज वज्र चक्रे'. अक्षरशः अर्थ 'वज्राला मित्र करिता झाला', म्हणजे दुसरे कोणी सहाय बरोबर घेतले नाहींत, एक वज्र मात्र बरोबर घेतलें, वज्रसख होऊन उदकरूपी गाईंची मुक्ती करावयास गेला

या मंत्रांत 'गाई' म्हणजे 'सूर्यकिरण' असाहि अर्थ संभवतो सूर्यकिरणरूपी गाई अंधकारांत झांकल्या होत्या त्याजवर प्रकाश पाडून इंद्रानें त्या मोकळ्या केल्या, म्हणजे अंधकार नष्ट करून सूर्याचा उदय होई असें केलें कारण का, हींहि रूपक वेदांत पुष्कळ ठिकाणीं आढळतें म्हणूनच 'गो' शब्दाचा अर्थ संस्कृतांत 'गाई' असा होऊन शिवाय 'उदक' असा जसा होतो, तसाच किरण असाहि होत असतो हे कोश पाठ करणाऱ्यास ठाऊक असेलच

तथापि पुढच्या मंत्रावर नजर देऊन आम्हीं सायणसंमतच अर्थ 'गा' याचा 'उदकरूपी गाई' असा केला आहे

११ भावार्थ—'वर सांगितल्याप्रमाणं मेघमंडळ फोडून इंद्रानें जेव्हां उदकांची वृष्टि केली तेव्हां तीं उदकें त्याच्या इच्छेप्रमाणं जमिनीवर वाहूं लागलीं पण तीं उदकें जरी त्यांवरून नावा जाईल इतकीं खोल होतीं तरी वृत्र त्यांत बुडून मेला नाहीं इतकेंच नाहीं, परंतु त्यांच्या मध्यें राहून तो उलटा वाढत गेला तेव्हां इंद्रानं आपलें सर्व चातुर्य खर्चून आपल्या परम प्रबळ वज्रानें किती एक दिवसांत त्याला मारून टाकिलें'

'त्याचे इच्छेप्रमाणें'=अस्य स्वधाम् अनु' अक्षरशः, 'त्याचे इच्छेला अनसरून' असा अर्थ 'स्वधा' याचा अर्थ सायणाचार्य येथ 'अन्न' असा करितात आणि नित्य जरी त्याचा तोच अर्थ आहे केव्हां केव्हां 'बल', 'उदक' असाहि करितात 'अन्न' हा अर्थ 'स्वधा' शब्दाचा वेदांत पुढें पुढें होतो खरा, पण 'अनु स्वधाम्' म्हणजे बहुत करून 'आपल्या परिपाटीप्रमाणं' 'आपल्या चालीप्रमाणं,' 'इच्छेप्रमाण' असा अर्थ होत असतो

न्यांविध्यदिलीविशस्य दृह्ळा वि शृङ्गिणमभिनच्छुष्णमिन्द्रः ।
यावत्तरो मघवन्यावदोजो वज्रेण शत्रुमवधीः पृतन्युम् ॥ १२ ॥
नि । अविध्यत् । इलीविशस्य । दृह्ळा । वि । शृङ्गिणम् । अभिनत् । शुष्णम् । इन्द्रः ।
यावत् । तरः । मघऽवन् । यावत् । ओजः । वज्रेण । शत्रुम् । अवधीः । पृतन्युम् ॥ १२ ॥
अभि सिध्मो अजिगादस्य शत्रून्वि तिग्मेन वृषभेणा पुरोऽभेत् ।
सं वज्रेणासृजद्वृत्रमिन्द्रः प्र स्वां मतिमतिरच्छाशदानः ॥ १३ ॥
अभि । सिध्मः । अजिगात् । अस्य । शत्रून् । वि । तिग्मेन । वृषभेण । पुरः । अभेत् ।
सम् । वज्रेण । असृजत् । वृत्रम् । इन्द्रः । प्र । स्वाम् । मतिम् । अतिरत् । शाशदानः ॥ १३ ॥

भाषायाम्.

१२ [इन्द्र] इलीविशस्य (=एतन्नामकस्य असुरस्य) दृह्ळा (=दृढा=दृढानि=दुर्गाणि) न्यविध्यत् (=विद्ध्वा निपातितवान्), इन्द्र शृङ्गिण शुष्णम् (=एतन्नामकम् असुर) व्यभिनत् (=विविध ताडितवान्) । हे मघवन् (=धनयुक्तेन्द्र), [तव] यावत् तरो (=यावान्वेग) [अस्ति] यावद् ओज (=बलम्) [अस्ति] [तावता सर्वेण] [त्व] पृतन्यु (=योद्धुमिच्छन्त) शत्रुम् (=इलीविश शुष्ण च) वज्रेण अवधी (=हतवानसि) ॥

१३ सिध्मो (=जयसाधको) [वज्र] अस्य (=इन्द्रस्य) शत्रून् अभ्याजिगात् (=तान्प्रति गतवान्) । [इन्द्र] तिग्मेन (=तीक्ष्णेन) वृषभेण (=वीर्यवता=प्रबलेन) [वज्रेण] [तेषां] पुरो (=नगराणि) व्यभेत् (=व्यभैत्सीत्=विविधं भिन्नवान्) । इन्द्र वृत्र वज्रेण समसृजन् (=संयोजितवान्), [अपि च] शाशदान (=विजयानन्देन स्वान्तो गच्छन्=विजयोद्भवम् आनन्द प्रकटयन्) स्वां मति (=स्व काम=वृत्रहननेच्छा) प्रातिरत् (=प्रावर्धयत्=अपूरयत्) ॥

'सगळ्या बुद्धिचातुर्याने'='सध्रीचीनेन मनसा' अक्षरशः 'सगत बुद्धिचातुर्याने', म्हणजे 'सगळे 'बुद्धिचातुर्य वृत्रहननाकडे लावून', 'सगळे शहाणपण तिकडेस लावून' ऋ ४ २४ ६ "सध्रीचीनेन मनसा अविवेनन् तम् इत् सखाय कृणुते समत्सु" या मंत्रातहि प्रस्तुत प्रयोगाचे जवळजवळच अर्थ आहे. आणि सायणाचार्यहि त्याच धोरणाने भाष्य करितात.

१२. [इंद्र] इलीबिशाचे दुर्ग फोडून खालीं पाडिता झाला, शिंगें असलेल्या शुष्णास इंद्र तोडून टाकिता झाला. हे मघवन्, [तुला] जेवढें अवसान [होतें] [आणि] जेवढें बळ [होतें] [तितकें सर्व खर्च करून] [तूं] [त्या] लढखोर शत्रूला वज्रानें मारिता झालास.

12. [Indra] broke down the fortresses of Ilibis'a, Indra split asunder the horned S'ushna.—Whatever energy, O Maghavan, whatever might [thou hadst], [thou] slewest [with it] [thy] bellicose enemy by [means of thy] thunderbolt.

१३. साधक वज्र त्या [इंद्रा]-च्या शत्रूंचे आगावर] धावलें. तीक्ष्ण [आणि] वीर्यसंपन्न [वज्राच्या योगा]नें इंद्र [त्यांचीं] नगरें विच्छेदून टाकिता झाला. इंद्रानें वृत्राची वज्राशीं गांठ पाडून दिली [आणि.] जयानंद प्रगट करून आपली मनकामना पूर्ण करिता झाला.

13. The unerring thunderbolt attacked his enemies. With the shar [and] manly [thunderbolt] he shattered [their] towns. Indra encountered Vritra with the thunderbolt, [and] triumphantly accomplished his own desire

---

१२. 'इलीबिश' हें विशेषनाम आहे. जसे 'शुष्ण' हे एका असुराचें नांव तसेंच 'इलीबिश.' सायणाचार्य शब्दव्युत्पत्तीच्या योगानें 'जमिनीच्या बिळांत निजणारा' असा अर्थ करून वृत्राचें विशेषण करितात. तसेंच 'शुष्ण' म्हणजे 'जगताला शोषून टाकणारा' असा अर्थ करून हेंहि वृत्राचेंच विशेषण करितात आणि मंत्राच्या शेवटीं 'शत्रूला' म्हणजेहि 'वृत्राला' असें म्हणतात. आम्हीं 'इलीबिश' आणि 'शुष्ण' हीं विशेषनामें घेऊन 'शत्रूला' म्हणजे 'इलीबिशाला' आणि 'शुष्णाला' असें समजून भाषांतर केलें आहे.

'शिंगें असलेला'='शृंगिणम्' सायणाचार्य म्हणतात कीं, 'गाई, म्हैसी वगैरेंच्या शिंगांसारखीं आयुधें ज्याला होतीं तो' आमचा अर्थ अक्षरशः आहे.

१३. दहाव्या मंत्रांत सांगितलें आहे कीं, इंद्र केवळ एक वज्र आपल्या बरोबर घेऊन वृत्राला मारण्यास गेला. त्याच्या स्वभावानुरूप या मंत्रांत म्हणतो कीं ते वज्र इंद्रानें सोडताच त्याच्या शत्रूच्या [illegible] [illegible] आणि

आवः कुत्समिन्द्र यस्मिञ्चाकन्प्रावो युध्यन्तं वृषभं दशद्युम्।

शफच्युतो रेणुर्नक्षत द्यामुच्छ्वैत्रेयो नृषाह्याय तस्थौ ॥ १४ ॥

आवः । कुत्सम् । इन्द्र । यस्मिन् । चाकन् । प्र । आवः । युध्यन्तम् । वृषभम् । दशऽद्युम् ।

शफऽच्युत । रेणु । नक्षत । द्याम् । उत् । श्वैत्रेय । नृऽसह्याय । तस्थौ ॥ १४ ॥

भाषायाम्.

१४ हे इन्द्र, यस्मिन् [कुत्से] [त्वम्] [अ]चाकन् (=प्रसन्नोऽभव) [त] कुत्स [त्वम्] आव (=रक्षितवानसि) । [त्व] वृषभ (=वीर्यवन्त=शूर) युध्यन्त (=युद्ध कुर्वन्त) दशद्युम् (=एतन्नामक कंचित्पुरुष) प्राव (=परक्षितवानसि) । श्वैत्रेय (=श्वित्राख्याया पुत्रो) [यदा] [त्वद्रक्षणयुक्त सन्] नृषह्याय (=संग्रामाय) उत्तस्थौ (=प्रतस्थौ) [तदा] शफच्युतो रेणु (=तस्य वाजिनां खुरैरुद्धूत रज) द्या नक्षत (=द्याम् अनक्षत=द्युलोक प्राप्तवान्) ॥

प्रबळ जें वज्र तेणकरून इंद्र शत्रूचीं नगरें फोडून विध्वसिता झाला इंद्र स्वतः हा वृत्राबरोबर न लढतां त्याणें वृत्राची आणि वज्राची गांठ घालून दिली, आणि त्याच्या योगानें वृत्राचा नाश करवून विजयापासून होणारा आनंद प्रगट करीत करीत आपली [वृत्राला मारण्याविषयीं-ची] मनकामना पूर्ण करिता झाला '

'सत्यक'=क्रियेप ' म्हणजे ज्या कार्याला त्याची योजना करावयाची तें सिद्ध करणार •

'नगर विच्छेदून टाकिता झाला'='पुरो विअभेत्' हा नगर म्हणजे काय? वृत्रादि असुर जसे रूपकसिद्ध शत्रु होत तशीच त्यांचीं नगरें हीं रूपकसिद्ध नगरें आहेत आकाशांत जे मेघ निराळे दिसतात ते आकार नगराकारासारखे अथवा किल्ल्यासारखे भासत असतात तीं नगरें इंद्र फोडिता असें या वृत्रनगररूपकाचें बीज आहे हा नगरें इंद्रानें फोडिलीं अथवा विदारिलीं म्हणून त्यास 'पुरंदर' (=नगर फोडणारा) असें नांव पडलें आहे

'जयानंद प्रगट करून आपली मनकामना पूर्ण करिता झाला'='प्र स्तो मतिम् अतिरत् शाशदान' या चतुर्थचरणाचा सायणाचार्य अर्थ करितात तो असा—"[वृत्राला] मारून आपली मति [म्हणजे] आपली हितयुक्त बुद्धि विशेष वाढविता झाला "

या पादांत 'मति', 'अतिरत्' हे क्रियापद, आणि 'शाशदान' हें विशेषण इतके तिन्ही शब्द कांहींसे कठिण आहेत आम्हीं 'मति' शब्दाचा अर्थ 'मनकामना' असा केला आहे त्यास आधार सायणोक्त आहे. (ऋ २ २८ १ "'नूनराने [illegible] मतिः "सा-

१४. हे इंद्रा, [तूं] कुत्साला रक्षिता झालास; कारण कीं [तूं] त्याजवर लोभ करीत होतास. वीर्यवान् दशद्यु युद्ध करीत असतां त्याला [तूं] रक्षिता झालास. श्वित्रेचा पुत्र [तुझ्या साहाय्यानें] युद्धास निघाला [तेव्हां] [त्याच्या] घोड्याच्या खुरांनीं उडविलेली धूळ द्युलोकापर्यंत पोंहचली.

14. [Thou] didst, Indra, protect Kutsa whom [thou] lovedst. [Thou] didst help the brave Das'adyu [when] fighting The dust raised by [the horses] hoofs reached the heavens [when] [under thy] leadership] the son of S'vitrá proceeded to the battle.

वरील सायणभाष्य पाहा. शिवाय ऋ. १०. १११. १ हाहि मंत्र पाहा.) 'प्रातिरत्' म्हणजे 'पुरविता आला', 'पूर्ण करिता झाला' अशाविषयींहि सायणोक्तीचा आधार आहे. (ऋ. ३. ४०. ३. "इन्द्र प्र णो धितावानं यज्ञं विश्वेभिर्देवेभि. | तिर: स्तवान विश्पते" या मन्त्रावरील भाष्य पाहा. शिवाय ऋ. ८. १०१. ८ हाहि मंत्र पाहा) 'शाशदानः' या शब्दाविषयीं आमचा आधार ऋ. १. १२४. ६ या मन्त्रावरील आणि ऋ. १. १२३. १० या मंत्रावरील भाष्यांत जें सायणाचार्य त्या शब्दाविषयीं लिहितात तितकाच आहे.

या दोन्ही मंत्रांत 'तन्वा शाशदाना' असें उषेचें विशेषण आलें आहे, त्याचा अर्थ यास्कास अनुसरून सायणाचार्य, 'आपल्या शरीराच्या योगानें स्पष्टता पावणारी' असा करितात; म्हणजे आपलें शरीर प्रगटपणें दाखविणारी, शरीरसौंदर्यापासून झालेला आनंद प्रगट करणारी असा अर्थ. 'शद्'= 'शातने' या धातूपासून 'शाशदानः' हें रूप आलें नसावें, 'शद्' 'प्रकटीकरणें' अशा अर्थाचा दुसरा एकादा धातु असावा असें वाटतें. 'विशद'=निर्मळ (म्हणजे प्रगट दिसत असतें तें, हाहि शब्द त्यापासूनच असावा.

१४. 'कुत्स' 'दशद्यु' आणि 'श्वित्रा' हीं विशेषनामें आहेत. 'कुत्स' नांवाच्या मनुष्याला इंद्रानें रक्षिल्याविषयीं वेदांत पुष्कळ ठिकाणीं आलें आहे. मंत्राचें तात्पर्य असें कीं, 'कुत्सावर तूं प्रसन्न होतास त्यामुळें त्याचें तूं संरक्षण केलेंस; दशद्यु या नांवाचा रणशूर मनुष्य लढत असतां त्याचें त्वां संरक्षण केलें. श्वित्रेचा पुत्र युद्धाला निघाला तेव्हां तुझी मदत त्याला मिळाली, त्यामुळें त्याचें सैन्य आणि त्या सैन्याचा वेग इतका वाढला कीं, घोड्यांच्या पायांनीं धूळ वर उडाली ती स्वर्गापर्यंत पोंहचली.'

'कारण कीं तू त्याजवर लोभ करीत होतास'='परस्मिन् चाकन्'. अक्षरशः

आवः शर्मं वृषभं तुग्र्यासु क्षेत्रजेषे मघवञ्छ्वित्र्यं गाम्।
ज्योक्चिदत्र तस्थिवांसो अक्रञ्छत्रूयतामधरा वेदनाकः
॥ १५ ॥ ३ ॥

आवः। शर्मम्। वृषभम्। तुग्र्यासु। क्षेत्रऽजेषे। मघऽवन्। श्वित्र्यम्। गाम्।
ज्योक्। चित्। अत्र। तस्थिऽवांसः। अक्रन्। शत्रुऽयताम्। अधरा।
वेदना। अकः। इत्यकः ॥ १५ ॥ ३ ॥

भाषायाम्.

१५. हे मघवन् (=धनवन्निन्द्र), [त्वं] तुग्र्यासु गाम् (?=अप्सु कृताभयं!) शर्म (=शान्त) वृषभ (=वीर्यवन्त=शूरं) [पूर्वोक्तं] श्वित्र्य (=श्वित्रायाः पुत्र) क्षेत्रजेषे (=क्षेत्रार्थं यद्युद्ध तस्मिन्) आव (=रक्षितवानसि)। अत्र (=तस्मिन्युद्धे) [शत्रूयन्त =शात्रव] ज्योक्चित् (=चिरकालमेव) तस्थिवांस (=अवस्थिता सन्त) अक्रन् (=शत्रुत्वम् अकुर्वन्=युयुधु)। [त्व पुन] [तेषां] शत्रूयता (=शत्रूणां) वेदनानि (=धनानि) अधराणि अक (=जितवानसि)॥

अर्थ 'ज्याजवर तू लोभ करीत होतास'. 'चाकन्' हे द्वितीयपुरुषी प्रथमवचनी क्रियापद आहे. ('कन्' कान्ती या धातूपासून). पण येथे सायणाचार्य 'चाकन्' हे विनाकारण कृदत समजतात तथापि "वह कुत्सम् इन्द्र यस्मिन् चाकन् स्यूमन्यू" ऋ. १. १७४. ५. आणि "उरुष्येषु इत् नु शूर येषु चाकन्" ऋ २. ११. ३ या दोनी मंत्रावरच्या भाष्यांत त्यांनीच 'चाकन्' हे द्वितीयपुरुषी एकवचनी क्रियापद समजून अर्थ केला आहे. याच 'कन्' धातूपासून 'कन्या' शब्द निघाला आहे.

'वीर्यवान् दशद्यु युद्ध करीत असतां त्याला [तू] रक्षिता झालास'='प्रावः युध्यन्तं वृषभं दशद्युम्'. 'दशद्यु' हा लढत असतां त्याला इंद्रानें साहाय्य केल्याविषयीं दुसऱ्याहि एका मंत्रांत आले आहे ("त्वं रथं प्र भरो योधम् ऋष्वम् आवः युध्यन्त वृषभं दशद्युम्" ऋ. ६. २६. ४)

'श्वित्रेचा पुत्र' या श्वित्रेच्या पुत्राविषयीं कथा वगैरे कांहीं असल्याप्रमाणें दिसत नाहीं. व त्याचें नांव काय तेंहि ठाऊक नाहीं. सायणाचार्य 'श्वित्रा' या नांवाच्या कोणा पुरुषाला मिळून पाण्यांत बुडून राहिला होता त्याला इंद्राचें साहाय्य मिळतांच

१५. हे मघवन्, शांत [आणि] वीर्यवान् श्वित्र्य उदकांत गेलेला त्यास [तू] क्षेत्राविषयींच्या [युद्धां]त सरक्षिता झालास. त्या [युद्धां]त शत्रु फार वेळ उभे राहून लढले. [परंतु] [तूं] त्यांचीं धनें जिंकून हरण करिता झालास.

15. Thou didst, Maghavan, protect in the fight-for-land S'vitrâ's brave [but] peaceful son who had taken shelter in the waters The enemies there stood long indeed [and] fought. [But] thou didst win their possessions.

तो शत्रूबरोबर लढण्याकरितां पाण्यांतून वर आला असें जाणवितात. या श्वैत्रेयाविषयीं पुढच्या मंत्रांतहि उच्चार आला आहे तो पाहा.

सायणाचार्य म्हणतात, या मंत्रांत 'कुत्स' सांगितला तो कौत्स गोत्राचा जो मूळपुरुष कुत्सऋषि तोच होय. आम्हांलाहि तसेंच दिसतें. विशेष सांगावयाचें इतकेंच कीं, तो ऋषि होता म्हणून केवळ यजनयाजनादिक षट्कर्में करून ब्रह्मवर्चस्वाचाच वाणा मिरवीत नसे, तर युद्धाहि करीत असे (या मंत्रांत जें कुत्सरक्षण सांगितलें तें युद्धप्रसंगींच होय याविषयीं ऋ. १. ५१. ६ इ. अनेक प्रमाणें आहेत)

---

१५. भावार्थः—'हे इन्द्रा, जमिनीविषयीं जी लढाई श्वित्र्य आपल्या शत्रूंशीं करीत होता तींत तूं त्याला मदत केलीस त्या लढाईंत शत्रु फार वेळ लढले तरी तूं शेवटीं जय पावलास आणि श्वित्र्याच्या शत्रूंची मालमिळकत तुला लूट मिळाली ती तूं जिंकून हरण करिता झालास'.

असा भावार्थ दिसतो, तथापि हा मंत्र कठिण आहे. 'श्वित्र्य' म्हणजे वरील मंत्रांत जो श्वैत्रेय सांगितला आहे तो आणि हा एकच. परंतु येथें दिल्या अर्थांत 'तुग्र्यासु' आणि 'गाम्' हे शब्द फार संदिग्ध आहेत. त्यांचा 'उदकांत गेलेला' हा अर्थ आम्हीं सायणास अनुसरून केला आहे, पण त्याविषयीं आम्हांस संशय आहे. 'गाम्' ही 'गो' शब्दाची एकवचनी द्वितीया आहे. 'गो' याचा अर्थ 'बैल' असाहि होतो तेव्हां 'श्वित्र्य गो' म्हणजे 'श्वित्रेचा पाडस'='श्वित्रेचा पुत्र' असा अर्थ नाहीं होणार? 'तुग्र्यासु' म्हणजे 'तुग्र नांवाच्या मनुष्याची जी संतति तिजमध्यें' असें असेल, म्हणजे जमिनीविषयीं लढाई झाली ती तुग्र लोकांमध्यें झाली असें समजतां येईल. अजून तरी लोकांत बहुत करून गांव असे असतात कीं, त्यांतील सगळे लोक 'पवार' (=परमारवंशीय) तर पवार, 'गायकवाड' तर सगळे गायकवाड, 'दळवी' तर सगळे दळवीच तर अशा गांवास झालेली लढाई 'पवारांत' अथवा 'दळव्यांत' किंवा 'गायकवाडांत' झाली असें म्हणतां येईल.

सूक्तम् ३४.

आङ्गिरसो हिरण्यस्तूप ऋषि. । अश्विनौ देवता । छन्द –१-८. १०, ११ जगती, ९ १२ त्रिष्टुप् ॥

त्रिश्चिन्नो अद्या भवतं नवेदसा विभुर्वां याम उत रातिरश्विना ।
युवोर्हि यन्त्रं हिम्येव वाससोऽभ्यायंसेन्या भवतं मनीषिभिः ॥ १ ॥

त्रि । चित् । नः । अद्य । भवतम् । नवेदसा । विऽभुः । वाम् । यामः । उत । रातिः । अश्विना ।
युवोः । हि । यन्त्रम् । हिम्याऽइव । वाससः । अभिऽआयंसेन्या । भवतम् । मनीषिऽभिः ॥ १ ॥

भाषायाम्.

१ हे नवेदसौ (=सर्वज्ञानिनौ) [अश्विनौ] [युवाम्] अद्य [दिने] त्रिश्चित् (=त्रिवारमपि) नो भवतम् (=अस्माकमेव स्यातम्) । हे अश्विनौ, वां (=युवयो) यामो (=रथ) विभु (=व्यापी=विस्तीर्ण) उत (=अपि च) राति (=दानशील =दातव्यवस्तुभिरुपेतो) [भवति हि] । युवयोर्हि यन्त्र (=सबन्ध =उपासकै सह यत्सख्य तत्), हिम्या (=हिमवत्या रात्रौ) वाससो (=वस्त्रस्य) [यन्त्र=सबन्ध] इव, [सुखकारक भवति] । [अत कारणाद्] [युवा] मनीषिभि (=मेधाविभि = अस्मादृग्भि स्तोतृभि) अभ्यायंसेन्यौ (=नियन्तव्यौ=अनुग्रहवशात्तदधीनौ) भवतम् ॥

'फार वेळ....लढले' 'अक्रन्'याचा अर्थ लढले' हा येथें आम्हीं सायणाप्रमाणें केला आहे, पण आम्हास संशय आहे किती एक विद्वान 'क्रन्द्' धातूचे रूप समजून 'फार वेळ....गर्जते झाले' असा अर्थ सुचवितात (क्रन्द' धातूपासून 'अक्रन्' असें रूप होतें याविषयीं ऋ ५. ५९. १ "प्र व स्पट् अक्रन् सुवित्ताय दावने" यावरील सायणभाष्य पाहा, परंतु तेथें 'अक्रन्' हे एकवचनी आहे)

'धनें जिंकून हरण करिता झालास' ='अधरा वेदना अक' 'वेदनम्' म्हणजे 'धन,' 'मिळकत' 'अधर कृ' म्हणजे अक्षरश अर्थ खालीं करणें', 'खालीं घालणे,' 'जिंकणे,' जिंकून घेणे उदाहरणार्थ, 'असुन्वन्त....जहि .... आरभ्यम् अस्य वेदन दाढि" (ऋ १. १७६ ४) 'अभक्तास मारून टाक ....आणि त्याचें धन आम्हास दे,' या ठिकाणी सायणाचार्यच वेदनम्' म्हणजे 'धन' असा अर्थ करितात वेदन' हा शब्द ऋग्वेदात पाच ठिकाणी आला आहे. १ ३३ १५, १ १७६. ४.

सूक्त ३४.

ऋषि–अंगिरस् कुळांतील हिरण्यस्तूप (पूर्वीच्या सूक्तांचा जो तोच) देवता–अश्वी. वृत्त–जगती, पण ९ आणि १२ या मंत्राचें वृत्त त्रिष्टुभ् होय

१ हे [सर्व]ज्ञानी अश्वी हो, आज [तुम्ही] तीनदा आमचेच व्हा तुमचा रथ विस्तीर्ण आणि देण ग्यानीं भरलेला [आहे] आणि तुमचा संबंध थंड रात्रीच्या वेळीं वस्त्रासारिखा [सुखकारक] होय. [तर हे अश्वीनो], [तुम्ही] भक्तास सुलभ व्हा

Hymn 34

To the As'vins By *Hiranyastûpa* of the family of the *Angirases* Metre—*Jagati*, but that of verses 9 and 12 is the *Trishtup*

1 Three times, [ye] [omni]scient [As'vins], be ye only ours this day. Your chariot As'vins, is extensive and filled with gifts And your connection is [blissful] as [that] of a garment on a chilly night As'vins be [ye there-fore] accessible to the pious

---

४ ३० १३, ७ ३२ ७; १०. ३४ ४) पण हा प्रस्तुतचा मंत्र खेरीज करून त्या सर्व ठिकाणी सायणाचार्य 'धन' असा योग्य अर्थ करितात तो पाहा 'अधर कृ' याविषयीं १ १०१ ५ हा मंत्र पाहा सायणाचार्य, 'अधरा वेदना अक' याचा शत्रूस 'फार वाईट दु:ख दिलंस" असा अर्थ करितात या मंत्रांत आलीकडे सीमेबद्दल अथवा एकाद्या गांवांतील एखाद्या शेताबद्दल दोन गांवांतील लोक जसे लढून मरतात तशीच लढाई सांगितली आहे त्याजकडेस लक्ष्य द्यावं. अशा प्रकारचे तंटे काठेवाडांत ल्हानसान राजे आणि त्यांचे भाऊबंद (भायाद) यांजमध्यें अजून होत असतात, आणि सरवे होण्यापूर्वी इमजा मुलखांनाहि होत होते.

---

१ हें सूक्त अश्वी म्हणून जे दोन देवांचें जोडा वेदांत प्रसिद्ध आहे आणि ज्यांस मागाहून आश्वनीकुमार' असें पुराणें व इतिहास आणि महाकाव्यांत वगैरे म्हणू लागले त्यांविषयी आहे सूक्त ३ मंत्र १ पृष्ठ १८ यावरील अश्वी शब्दावरील टीप पाहा

भावार्थ –'सकाळीं, मध्याह्नीं, आणि सायंकाळीं अशा तीन वेळीं मनुष्य तुम्हांस हवि अर्पण करितात, तें घेण्याकरितां आज तुम्ही आमच्याच घरीं या, दुसऱ्या उपासकाच्या घरीं जाऊं नका कां कीं तुमचा रथ मोठा आणि धनानें भरलेला असतो त्यांत

त्रयः पवयो मधुवाहने रथे सोमस्य वेनामनु विश्व इद्विदुः ।
त्रयः स्कम्भासः स्कभितास आरभे त्रिर्नक्तं याथस्त्रिर्वश्विना दिवा ॥ २ ॥

त्रयः । पवयः । मधुऽवाहने । रथे । सोमस्य । वेनाम् । अनु । विश्वे । इत् । विदुः ।
त्रयः । स्कम्भासः । स्कभितासः । आऽरभे । त्रिः । नक्तम् । याथः । त्रिः । ऊम् इति । अश्विना । दिवा ॥ २ ॥

भाषायाम्.

२. [हे अश्विनौ], [युवयोः] मधुवाहने (=मधुवाहके) रथे त्रयः पवयः (=त्रीणि चक्राणि) [सन्ति]। [युवयोः] सोमस्य [विषये] वेनां (=कामनां) विश्वे इत् (=सर्वेपि) अनुविदुः (=जानन्ति)। आरभे (=आरब्धुम्=अवलम्बितुं=पतनभीतिनिवृत्त्यर्थं धारयितुं) [रथे] त्रयः स्कम्भाः (=स्तम्भाः) स्कम्भिताः(=स्थापिताः) [सन्ति]। [युवां] नक्तं (=रात्रौ) त्रिर्याथः (=रथ उपविश्य त्रिवारं गच्छथः) उ (=उत=अपि च) हे अश्विनौ, दिवा त्रिर्[याथ] (=त्रिवारं गच्छथः) ॥

धनें भरून आम्हाकडेसच या. तुमचा संबंध उपासकाला झाला तर थंड रात्रीच्या वेळीं पांघरूण अंगावर घेतलें असतां होतें तसें सुख होतें. वास्तव आम्हासारिखे जे भक्त त्यांच्या स्वाधीन तुम्ही व्हा'.

'देणग्यांनीं भरलेला'='राति.'. सायणाचार्य 'राति' म्हणजे 'देणगी' असा येथें अर्थ करून 'विस्तीर्ण आहे' असें म्हणतात. परंतु 'राति' हे 'दानशाली' या अर्थी विशेषणहि होत असतें. (ऋ. १. २९. ४ यावरील त्याचेंच भाष्य पाहा).

'तुमचा संबंध थंड रात्रीच्या वेळीं वस्त्रासारिखा [सुखकारक] होय'='युवोर्यन्तं हिम्येव वाससः'. सायणाचार्य "तुमचा परस्पर संबंध दिवस रात्रीच्या संबधासारिखा न तुटणारा आहे" असें भाष्य करितात. परंतु 'वासस्' याचा अर्थ निर्विवाद प्रयोगान्तरावरून 'दिवस' असा सिद्ध होईल काय?

२ [हे अश्वी हो], [तुमच्या] मधुवाही रथास तीन चाके [आहेत] सोमरसाविषयीं [तुमची] तृष्णा सर्वहि [लोक] जाणतात. धरण्यासाठीं [तुमच्या रथाला] तीन खाब लाविलेले [असतात]. [आणि] हे अश्वी हो, [तुम्ही] तीनदा रात्रीचे आणि तीनदा दिवसाचे [त्या रथात बसून] फिरत असता

2. Three [are] the wheels of [your] honey-bearing chariot—all know [your] thirst for Soma Three [are] the posts fixed [in the chariot] to catch hold of Thrice [you] drive by night and, Asvins, thrice by day

२ या मन्त्रांत अश्वींच्या रथाविषयी कांहीं चमत्कारिक गोष्टी सांगितलेल्या आहेत – 'त्याला तीन चाके आहेत, तो झपाट्याने चालू लागला म्हणजे आंत बसणारे पडू नयेत म्हणून धरण्यासाठीं त्यांत तीन खांब रोविलेले आहेत आणि या अशा रथांत बसून तीनदा रात्रीला आणि तीनदा दिवसाला अश्वी सोम पिण्यासाठीं जात असतात' 'तीनदा आमचे व्हा' असें पहिल्या मन्त्रांत ज सांगितले त्यांतील 'तीनदा' याजवरून 'त्रिवार' 'त्रिवार' ही कल्पना या आणि पुढच्या मन्त्रांत सूक्त संपे पर्यंत चालत राहिली आहे हे ध्यानांत ठेवावे अश्वांचा रथ सगळा सोन्याचा केलेला आहे असे ऋग्वेदांत वर्णन येते तो रथ ऋभु म्हणून जे देवांचे कारागीर त्यांनी करून दिला असेहि सांगितल आहे अश्वावरची पुढे सूक्त येतील त्यांत त्यांच्या रथाविषयीं बरेच वर्णन येत जाईल

'मधुवाही रथ' म्हणजे ज्यांत मध भरलेला असतो ऋ ८ २६ ६ यांत अश्वींस 'मधुवर्णा' म्ह 'मधाच्या वर्णाचे' असे विशेषण दिलें आहे सूक्त २२ मन्त्र ३ यांत अश्वींच्या चाबकास 'मधुयुक्त' अथवा मधून भरलेला असे म्हटल आहे. त पाहा पुढच्या मन्त्रांतहि अश्वींस मधान यज्ञ सेचण्याविषयीं प्रार्थना आहे ती पाहा

'सोमरसाविषयीं [तुमची] तृष्णा सर्वहि [लोक] जाणतात = सोमस्य वे नाम् अनु विश्वे इत् विदु याचा अर्थ सायणाचार्य, सोमाची म्हणजे चद्राची वेना म्हणजे सुदर जी भार्या तिजशीं तुम्ही विवाह केला तेव्हां तुम्ही आपल्या रथांत गोड गोड पदार्थ भरून घेऊन गेलां त सकल देव जाणतात" असा अर्थ ऋ १० ८५ ९ यास अनुलक्षून करितात

समाने अहन्त्रिरवद्यगोहना त्रिरद्य यज्ञं मधुना मिमिक्षतम् ।
त्रिर्वाजवतीरिषो अश्विना युवं दोषा अस्मभ्यमुषसश्च
पिन्वतम् ॥ ३ ॥

समाने । अहन् । त्रिः । अवद्यऽगोहना । त्रिः । अद्य । यज्ञम् । मधुना । मिमिक्षतम् ।
त्रिः । वाजऽवतीः । इषः । अश्विना । युवम् । दोषाः । अस्मभ्यम् । उषसः । च । पिन्वतम् ॥ ३ ॥

त्रिर्वर्तिर्यातं त्रिरनुव्रते जने त्रिः सुप्राव्ये त्रेधेव शिक्षतम् ।
त्रिर्नान्द्यं वहतमश्विना युवं त्रिः पृक्षो अस्मे अक्षरेव
पिन्वतम् ॥ ४ ॥

त्रि । वर्तिः । यातम् । त्रिः । अनुऽव्रते । जने । त्रिः । सुप्रऽअव्ये । त्रेधाऽइव । शिक्षतम् ।
त्रिः । नान्द्यम् । वहतम् । अश्विना । युवम् । त्रिः । पृक्षः । अस्मे इति । अक्षराऽइव । पिन्वतम् ॥ ४ ॥

भाषायाम्.

३. हे अवद्यगोहनौ (=दोषाणां संवरणकारिणौ) [अश्विनौ], [युवां] समाने अहनि (=एकस्मिन्नेव दिने) त्रि, अद्य [एव] त्रि, [नो] यज्ञं मिमिक्षत (=सिञ्चतम्)। हे अश्विनौ, दोषा उषसश्च (=रात्रीर्दिवसांश्च=रात्रिषु दिवसेषु नैरन्तर्येण) त्रि. (=त्रिवारं) वाजवतीरिषः (=भरणयुक्तान्यन्नानि) युवाम् अस्मभ्य पिन्वतं (=सिञ्चत=प्रयच्छतम्)॥

४. [हे अश्विनौ], [युवां] त्रि. (=त्रिवारं) वर्तिः (=मार्गं) यात (=गच्छतम्), त्रि अनुव्रते (=युवयोरनुकूलव्यापारयुक्ते=अनुष्ठितारो अस्मादृशि) [जने], त्रि सुप्राव्ये (=सुष्ठु प्रकर्षेण भवद्भ्यां रक्षणीये अस्मादृशि) [जने], त्रेधा (=त्रिभिः प्रकारैः) [शिक्षयन्ति] इव (=यथा), [युवां] शिक्षत (=शिक्षयतम्=उपदिशतम्)। हे अश्विनौ, युवां त्रि नान्द्यं (=नान्दीम्=आनन्दं) वहत (युवाभ्यां सह आगतम्), अस्मे (=अस्मासु=अस्मभ्यं) त्रि अक्षराणि (=कर्तर्गतानि जलानि) इव [त्रिवारं] पृक्ष (=अन्नानि) पिन्व। (=पूरयत=दत्तम्)॥

३ हे दोषगोपन करणारे [अश्वी] हो, [तुम्ही] एकाच दिवशीं तीनदा, [तुम्ही] आजच्या दिवशीं तीनदा [आमच्या] यज्ञास मधूने भिजवा. हे अश्वी हो, तुम्ही पुष्टिकारक अन्न प्रत्येक रात्रीं आणि प्रत्येक दिवशीं तीनदा आम्हास देत जा

3 Thrice on the same day, [ye] forgivers of faults thrice this day sprinkle [our] sacrifice with sweet honey Thrice may ye, Asvins give us nourishing foods every night and every day

४ [हे अश्वी हो], [तुम्ही] तीनदा मार्गक्रमण करा, तीनदा आज्ञाधारक जनाला [आणि] तीनदा सुरक्षणीय [जनाला], तीन प्रकारानीं [शिकविण्या]प्रमाण शिकवा हे अश्वी हो, तीनदा तुम्ही आनंद घेऊन या, उदकाप्रमाण [विपुलतेनें] तीनदा [आम्हास] तुम्ही] अन्न द्या.

4 Thrice may ye drive your course, thrice may ye teach us [if] in three ways the obedient man, thrice [the man] who deserves to be well protected Thrice As vins may ye bring joy, thrice may ye give us food [as plentifully] as the unceasing streams of waters

३ भावार्थ – हे अश्वी हो, एकाच दिवशीं आणि ते आजच आमचा यज्ञ तीनदा तुम्ही मधानें भिजवा म्हणजे मध घालून त्याला माधुर्य आणा, आणि दररोज आणि दर रात्रीला पुष्टिकारक अन्न तुम्ही तीनदा आम्हास देत जा' म्हणजे, तुम्हांस तीनदा येण्याविषयी पहिल्या मंत्रांत सांगितलें, तर त्या तीनदा येऊन आमचा यज्ञ तुम्ही मधानें भिजवा आणि दररोज आणि दर रात्रीस तीनदा आमच्या घरास येऊन आम्हास पुष्टिकारक अन्न द्या।

'दोषगोपन करणारे' म्हणजे भक्तांचे दोष बाहेर न पडूं देणारे दोषांची क्षमा करणारे पण या विशेषणाचा प्रयोजन नीट समजत नाही।

'मधुना भिजवा'– 'मधुना मिमिक्षतम्' म्हणजे यज्ञावर मध शिंपडा वा जेणे करून हवि गोड होऊन देवास विशेष मान्य होईल

४ दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे की तुम्ही तीनदा रात्रीचे आणि तीनदा दिवसाचे [त्या रात्र मधून] फिरत असतां' इत्यादि आतां त्याच विचारानें अनुवाद या मंत्रांत करित म्हणता येतें हे अश्वी हो तुम्ही तीनदा मार्गक्रमण करा आणि आम्हां कडे येऊन जे तुम्ही आज्ञा पाळणार

त्रिर्नो र॒यिं व॑हतमश्विना यु॒वं त्रिर्दे॒वता॑ता त्रिरु॒ताव॑तं॒ धियः॑ ।
त्रिः सौ॑भग॒त्वं त्रिरु॒त श्रवां॑सि नस्त्रि॒ष्ठं वां॒ सूरे॑ दुहि॒ता रु॑हद्रथ॑म् ॥ ५ ॥

त्रिः । नः॒ । र॒यिम् । व॒ह॒त॒म् । अ॒श्वि॒ना॒ । यु॒वम् । त्रिः । दे॒वऽता॑ता । त्रिः । उ॒त । अ॒व॒त॒म् । धियः॑ ।
त्रिः । सौ॒भ॒ग॒ऽत्वम् । त्रिः । उ॒त । श्रवां॑सि । नः॒ । त्रि॒ऽस्थम् । वा॒म् । सूरे॑ । दु॒हि॒ता । आ । रु॒ह॒त् । रथ॑म् ॥ ५ ॥

भाषायाम्.

५ हे आश्विनौ, युवां नः (=अस्मभ्य) त्रिः (=त्रिवार) रयिं (=धन) वहतम (=आवहत=प्रापयतम्)। [युवां] देवताता (=देवतातौ=देवयजनकर्मणि) त्रिः [अवत=प्रसन्नौ भवतम्]। उत (=अपि च) त्रिस् (=त्रिवार) धियः (=अस्माक स्तुती) अवत (=प्रतिगृह्णीत=शृणुतम्)। [युवां] नः (=अस्मभ्य) त्रिः सौभगत्वं (=सौभाग्य) त्रिरुत (=त्रिश्च) श्रवांसि (=अन्नादिसंपदो) [दत्तम्]। वां (=युवयोस्) त्रिष्ठं (=त्रिषु चक्रेषु स्थितं) रथं सूरे दुहिता (=सूर्यदुहिता=सूर्यस्य दुहिता=सूर्या नाम सूर्यकन्या) आरुहत् (=आरूढवती) ॥

आणि तुम्हीं रक्षण करावें अशी प्रार्थना करणारे लोक त्यांस तीन प्रकारांनीं तीनदा शिकवा तीनहि वेळ तुम्ही आपल्या बरोबर आनंद घेऊन या, आणि तीनहि वेळ आम्हांस अन्ने द्या, आणि तीं इतकीं विपुल असावीं कीं पाण्याच्या प्रवाहाप्रमाणे तीं वाहात राहतील'

'मार्ग=वर्तिं' 'वर्ति' हा शब्द ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं आला आहे आणि एक स्थळ खेरीज करून तो सर्व ठिकाणीं अश्वांच्या रथाचा जो मार्ग त्याला लाविलेला आहे सायणाचार्य बहुतकरून 'घर' असा अर्थ करितात (प्रस्तुत स्थळीं तरी ते 'वर्ति यातम्' याचा 'आमच्या घरीं या' असाच अर्थ सांगतात) परंतु केव्हां केव्हां मार्ग असाहि करितात (ऋ २ ४१. ७, ७ ६९ ५, आणि ८ ३५ ७ यांजवरील भाष्य पाहा) तो आम्हांस या ठिकाणीं योग्य वाटल्यावरून घेतला आहे

'तीन प्रकार' कोणते, आणि 'शिकवा' त काय शिकवावयाचें, ह्याचा खुलासा मन्त्रावरून होत नाहीं

'आनंद'=नान्दम्' 'नान्दम्' ही 'नान्दी' शब्दाची ('नान्दीम्' या ऐवजी) द्वितीया आहे नाटकाच्या आरंभीं जी 'नांदी' म्हणून येत असते तिचा मूळ अर्थ 'आनंद' होय हे या मन्त्रावरून स्पष्ट होतें

५ हे अश्वी हो, तीनदा आम्हास तुम्ही संपत्ति वाहून आणा, तीनदा [तुम्ही] देवभजनाच्या वेळीं [आम्हावर प्रसन्न व्हा] आणि तीनदा [आमच्या] प्रार्थना ग्रहण करून घ्या. तीनदा [तुम्ही] आम्हास भाग्य [द्या] आणि तीनदा अन्नसपत्ती [द्या]. तुमच्या तीनचाकी रथावर सूर्याची कन्या चढून वसली.

5 Thrice, As'vins, may ye bring wealth unto us, thrice [may ye be pleased] in [our] divine service, and thrice may [ye] accept [our] prayers Thrice [may ye give] us prosperity and thrice affluence Your three-wheeled car the daughter of the sun ascended.,

५. 'सपत्ति वाहून आणा'='रयि वहतम्' यांत 'वहतम्' याचा अक्षरश अर्थ 'वाहून न्या', 'वाहा' इतका आहे. परतु 'न' (आम्हास) हें पद आहे त्यावरून 'वाहून आणा' असा अर्थ होतो 'आ' उपसर्ग नसला तरी 'वह' धातूचा अर्थ बोलणाऱ्याशीं सांनिध्य दाखविणारे जे ('न' इत्यादिक) शब्द त्यांच्यासाहचर्यानें 'आणणे' असाहि होत असतो तें लक्ष्यात ठेवावें 'देवभजनाच्या वेळीं'=देवताती' अक्षरश 'देवकर्मात'; देवप्रीत्यर्थ जें आम्ही यज्ञादि कर्म करितो त्यांत.

'आम्हावर प्रसन्न व्हा'='[अवतम्]'. हे 'अवतम्' क्रियापद 'अवत धिय' असें जे पुढें आहे त्यांतील 'अवत' यापासून अपाकर्षेण करून घेतलें पाहिजे. ऋषीच्या मनांत प्रथम 'देवताती न' अवतम्' ('देवकर्मांत आम्हावर प्रसन्न व्हा, आम्हास रक्षा') असे म्हणावयाचें होतें, पण इतक्यांत वृत्तानुरोधामुळें थोडे विचार फिरला आणि पुढें 'त्रिरुतायतं धिय' असें म्हटलें असें समजलें पाहिजे

'सूर्याची कन्या चढून बसली'. सूर्याची तरूण कन्या 'सूर्या' म्हणून होती (तिला 'उर्जानी' असेंहि नांव १. ११९ २ यांत आहे). तिनें दोघांहि अश्वीस वरिलें आणि दोघांची बायको झाली असे वेदांत पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे आणि ती त्यांजबरोबर त्यांच्या रथांत बसून फिरते असेंहि वर्णन इतर ठिकाणीं आढळतें (युवो रथ दुहिता सूर्यस्य सह श्रिया नासत्या अवृणीत १ ११७ १३; आ वां रथं युवति. तिष्ठत् अत्र जुष्ट्वी नरा दुहिता सूर्यस्य १ ११८ ५; आ यत् वां सूर्या रथ तिष्ठत् ५. ७३ ५)

अश्वीचा रथ 'सूर्या' ही रथांत बसली ही गोष्ट या मंत्रांत कशाला सांगितली असें पुसल्यास, इतकेंच उत्तर आहे कीं, अश्वीविषयीं कोणतीहि गोष्ट 'त्रिवार', 'त्रिपट', 'तीन', यांच्यासंबंधाची असेल ती या सूक्तांत सांगितली आहे 'तीनदा......सपत्ती वाहून आणा', 'तीनदा......प्रसन्न व्हा', 'तीनदा....प्रार्थना ग्रहण करून घ्या' 'तीनदा....भाग्य द्या', 'तीनदा अन्न-

त्रिर्नो अश्विना दिव्यानि भेषजा त्रिः पार्थिवानि त्रिरु दत्तमद्भ्यः।
ओमानं शंयोर्ममकाय सूनवे त्रिधातु शर्म वहतं शुभस्पती
॥ ६ ॥ ४ ॥

त्रिः। नः। अश्विना। दिव्यानि। भेषजा। त्रिः। पार्थिवानि। त्रिः।
ऊम् इति। दत्तम्। अत्ऽभ्यः।
ओमानम्। शम्ऽयोः। ममकाय। सूनवे। त्रिऽधातु। शर्म। वहतम्।
शुभः। पती इति ॥ ६ ॥ ४ ॥

भाषायाम्.

६ हे अश्विनौ, [युवां] नः (=अस्मभ्य) त्रिर्दिव्यानि (=द्युलोकवर्तीनि), त्रि पार्थिवानि (=पृथिव्यामुत्पन्नानि) त्रिरु (=त्रिश्च) अद्भ्य (=मेघोदकप्रदेशेभ्य (=अन्तरिक्षप्रदेशाद्) [यानि तानि] भेषजानि दत्तम्। शंयो (=शयुनामकस्य= शयवे अर्पितम्) ओमान (=सुखम्) [अपि च] हे शुभस्पती (=कल्याणाधिपती) [अश्विनौ] त्रिधातु (=त्रिगुणित) शर्म (=सुख) ममकाय (=मदीयाय) सूनवे [आ]वहतम् (=आनयतम्) ॥

सर्पनि या' हीं जशी त्रिवारावृत्ति दर्शक आहेत, तशीच तुमची 'सूर्या' ज्या रथात तुमच्या बरोबर लग्न होतांच बसली तोहि रथ 'तीन' चाकांचा होता, असें म्हणण्याचा भावार्थ आहे

'सूर्याची कन्या'='सूरे दुहिता' आम्ही केलेल्या अर्थाविषयी तर शंका नाहींच तो सायणाचार्यांप्रमाणे केला आहे पण 'सूरस्य' (अथवा, 'सूर्य' यापासून घेतलें तर सूर्यस्य') असें षष्ठीचें रूप पाहिजे त्याऐवजी सप्तमी कां? सायणाचार्य "विभक्ति-व्यत्यय" आहे (म्हणजे षष्ठीबद्दल सप्तमी आहे) इतकें सांगण्यापेक्षा ज्यास्ती कांहीं लिहीत नाहात सूचना—सूर्यदुहिता' असें प्रथम समस्त पद असून मग संप्रसारण होऊन सूर -इ-अ असें झाल्यानंतर सूर्+अ+इ=सूरे' असें झालें असेल काय?

६ हे अश्वी हो, [तुम्ही] तीनदा आम्हास द्युलोकातील, तीनदा पृथ्वीवरील आणि तीनदा अंतरिक्षातील औषधें द्या. शयूला [जो] प्रसाद [दिला] तो, आणि हे कल्याणाचे अधिपती हो, [जें] तिप्पट कल्याण [तें] माझ्या पुत्राकरितां घेऊन या

6 Thrice, As'vins, may [ye] give unto us medicaments of heaven, thrice [those] of the earth and thrice [those] of the sky. Carry [hither] for my son the favour [shown] to S'amyu [and], Lords of bliss, the three-fold blessing.

६. वेदांत तीन लोक अथवा प्रदेश सांगितले आहेत. पृथ्वी हा अगदी खालचा म्हणजे ज्याजवर आपण राहतो तो एक; दुसरा अंतरिक्ष, म्हणजे वातावरण अथवा आकाश, ज्यांत पाणी, ढग वगैरे असतात तो; आणि अंतरिक्षावर जो परम उच्च प्रदेश, आणि ज्यांत सूर्यचंद्रादि तारे आणि नक्षत्रे आहेत तो तिसरा. या तृतीयप्रदेशास 'द्यु' अथवा द्युलोक किंवा आलीकडील संस्कृतांत स्वर्ग असें म्हणतात मागाहून त्रैलोक्य अथवा त्रिलोकी किंवा त्रिभुवन असें ज्याला म्हणतात त्याचे बीज याच वैदिक समजुतीमध्यें आहे. अर्वाचीन काळी स्वर्ग, मृत्यु, पाताळ, अथवा स्वर्ग, पृथिवी आणि पाताळ असे तीन लोक समजतात पण वैदिक युगांतील मनुष्यास या पाताळाविषयी कांहीं ठाऊक नव्हते, पाताळ शब्द वेदांत येत नाही व पाताळांतील शेषाद कोठे आढळत नाही

वर जे द्यु, अंतरिक्ष आणि पृथ्वी असे तीन लोक सांगितले त्या तिहांतून तीनतीनदा औषधे आणावी आणा, आणि 'शयु' म्हणून कोणी मनुष्य ... म्हणतात तो बृहस्पतीचा पुत्र) होता, त्याला जो प्रसाद आणि जे तिप्पट सुख दिले तें मंत्रकर्त्याच्या मुलाला आणून द्यावें असा मंत्राचा भावार्थ आहे

'अश्वी' हे रोग्यास बरे करितात असें पूर्वी (१४ व्या पृष्ठावरील अश्वीविषयी टीपेंत) सांगितले आहे. तें या मंत्रावरून स्पष्ट होईल. वेदोत्तर ग्रंथांत म्हणजे पुराणे, इतिहास, काव्यें इत्यादिकांत अश्विनीकुमार (म्हणजे अश्विदेवच) हे देवांचे वैद्य होत असें सांगितले आहे; त्या कथेचे बीज या मंत्रांत आहे वेदांत अश्वी हे वैद्य आहेत असें आढळतें खरें पण देवांस रोग होतात आणि त्यांस औषधाची जरूर लागते आणि अश्वी हे औषध देऊन देवांस बरे करितात असे अनुचित भाव्स्ड वेदांच्या वेळीं रचलेलें नव्हते अश्वी हे मनुष्यास औषधें देऊन बरे करितात इतकेंच त्या वेळचे लोक समजत

'अंतरिक्षांतील'='अद्भ्य'. अक्षरशः अर्थ 'पाण्यापासून [झालेल्या]' असा आहे परंतु पाणी म्हणजे अंतरिक्षांत जा मेघोदक ढगांच्या रूपानें असतात त्यांस म्हणतात. त्यावरून ता मेघो

त्रिर्नो अश्विना यजता दिवेदिवे परि त्रिधातु पृथिवीमशायतम् ।
तिस्रो नासत्या रथ्या परावत आत्मेव वातः स्वसराणि
गच्छतम् ॥ ७ ॥

त्रिः । नः । अश्विना । यजता । दिवेऽदिवे । परि । त्रिऽधातु । पृथिवीम् ।
अशायतम् ।
तिस्रः । नासत्या । रथ्या । पराऽवतः । आत्माऽइव । वातः । स्वसरा-
णि । गच्छतम् ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. हे अश्विनो, नः (=अस्मभ्यम् =अस्माभिः) दिवेदिवे (=प्रतिदिनं) त्रिः (=त्रिवारं) यजतौ (=यष्टव्यौ) [युवां] पृथिवीं त्रिधातु (=त्रिगुणं यथा स्यात्तथा) पर्यशायतं (=परितः शयनम् अकुरुतं, नित्यमेव कुरुथः) । हे रथ्यौ (=रथस्वामिनौ) नासत्यौ (=सत्यौ) [अश्विनौ], आत्मा वातः (=प्राणवायुः) स्वसराणि (=शरीररूपाणि स्वगृहाणि) [गच्छति =व्याप्नोति] तद्वत्, [युवां] तिस्रः परावतः (=त्रीन् दूरस्थितान् लोकान्) गच्छतं (=व्याप्नुतम्) ॥

दकें अभ्ररूपानें जेथें असतात तो अंतरिक्षप्रदेश. हाच अर्थ सायणांनीं केला आहे.

'शंयु' हा कोण होता तें ठाऊक नाहीं. सायणाचार्य तो बृहस्पतिपुत्र म्हणून जें म्हणतात तें एका ब्राह्मणांतून घेतलें आहे.

'तिप्पट'='त्रिधातु'. सायणाचार्य "वात, पित्त, आणि श्लेष्मा या तीन धातूंचें शमन करणारें" सुख (शर्म) असा अर्थ करितात. पण वैदिकयुगांत वैद्यकाचा हा धातुभेद केलेला असेल असें वाटत नाहीं. आम्हीं केलेल्या अर्थास ऋ. ६. ६१. १२. यावरील सायणभाष्याचाच आधार आहे. तेथें सरस्वतीस 'सप्तधातुः' असें म्हटलें आहे; त्याचा अर्थ ते "सप्त अवयव जीचे", म्हणजे सात तुकडे मिळून झालेली असें भाष्य करितात. तसेंच 'त्रिधातु' म्हणजे 'त्रिगुणित'='तिप्पट'. हे तीन प्रकार अथवा अवयव कोणते तें सांगवत नाहीं. कदाचित् द्युलोकांतील, अंतरिक्षांतील आणि पृथ्वीवरील जें कल्याण तें तिप्पट कल्याण असें असेल (ऋ. १. २७. ५ यावरील आमची टीप पाहा).

७ हे अश्वी हो, ज्याकरिता आम्हीं प्रतिदिनीं तीनदा यज्ञ करावा असे तुम्ही पृथ्वीला तीनदुडती वळसा घालून राहत असता हे रथगामी नासत्य हो, प्राणवायु जसा शरीरात [फिरतो] तसे [तुम्ही] त्रैलोक्यामध्ये फिरा

7 Ye O As'vins, who deserve to be sacrificed to by us thrice every day trebly surround the earth. The three distant worlds, O truthful charioteers may ye pervade us [does] the vital breath its habitations.

७ भावार्थ – प्रतिदिना आम्ही तुमची तीनदा पूजा करावी असे तुम्ही आहां आणि तुम्ही पृथ्वीच्या सभावताली सापाप्रमाणे (प्रतिदिनी) वळसा घालून राहतां तर हे रथांत बसून जाणारे सत्यरूप अश्वीहो, जसा प्राण वायु (म्हणजे जीवरूपी जो वायु तो) शरीरांत खेळतो तसे तुम्ही त्रैलोक्यांत खेळत राहा'

'तीनदुडती'=त्रिधातु' त्रिधातु' हे क्रियाविशेषण आहे

'रथगामी' म्हणजे 'रथांत बसून जाणारे' अश्वी हे रथांत बसून जात असतात म्हणून पूर्वीच सांगितलं आहे

'त्रैलोक्यामध्ये फिरा'='तिस्र परावत गच्छतम्' 'परावत्' म्हणजे दूरचा प्रदेश 'परावत' हा शब्द 'दूरच्या प्रदेशाहून', 'दूरून' या अर्थी पुष्कळ ठिकाणी येतो तिस्र परावत '(='तीन दूरचे प्रदेश') हे शब्द ऋ ८ ५ ८, ८ ३२ २२ आणि प्रस्तुतचा मंत्र अशा तीन ठिकाणी आले आहेत प्रस्तुतच्या मंत्रांत तर 'परावत' या शब्दाच सायणाचार्य (खालील मंत्रांत तर) भाष्य करीतच नाहीत परंतु तीनहि स्थळं पाहून पाहिलं तर 'तिस्र परावत' म्हणजे 'तीन दूरचे प्रदेश' असा अर्थ सिद्ध होतो असे दिसते हे त्रिलोक कोणते ते निश्चयाने सांगवत नाही, परंतु पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्यु हे असतील

त्रिरश्विना सिन्धुभिः सप्तमातृभिस्त्रय आहावास्त्रेधा हविष्कृतम् ।
तिस्रः पृथिवीरुपरि प्रवा दिवो नाकं रक्षेथे द्युभिरक्तुभिर्हितम्
॥ ८ ॥

त्रि । अश्विना । सिन्धुऽभिः । सप्तमातृऽभिः । त्रयः । आऽहावाः । त्रेधा ।
हविः । कृतम् ।
तिस्रः । पृथिवीः । उपरि । प्रवा । दिवः । नाकम् । रक्षेथे इति । द्युऽभिः ।
अक्तुऽभिः । हितम् ॥ ८ ॥

भाषायाम्.

८ हे अश्विनौ, [युवयोः कृते] त्रय आहावा (=द्रोणकलशा) सप्तमातृभिः (=सप्तसंख्याका मातर उत्पादयित्र्यो येषां ते) सिन्धुभिः (=स्यन्दनस्वभावैः सोमैः) त्रि (=त्रिवारम्) [आपूरिता भवन्ति] [अपि च] त्रेधा (=त्रिभिः प्रकारैः) हविः कृतं (=सिद्धं क्रियते)। तिस्रः पृथिवीरुपरि (=पृथिव्यन्तरिक्षद्युलोकरूपिणो भवनत्रयस्योपरि) प्रवा (=प्रवौ=प्रवन्तौ=गच्छन्तौ) [युवां] दिवो नाकं (=द्युलोकस्य उच्छ्रितम प्रदेश=शिखर) द्युभिरक्तुभिः (=अहर्निशं) हितं रक्षेथे (=स्थापितं रक्षथ = स्थिरं यथा तिष्ठेत्तथा रक्षथ) ॥

८. हे अश्वी हो, [तुम्हांसाठीं] सप्तमातृक सोमानीं तीन कलश तीनदा भरले [जातात] [आणि] तीन प्रकारें करून [सोम]हवि सिद्ध केलें [जातें]. तीन पृथिवींवर गमन करणारे [जे] तुम्ही [ते] द्युलोकाचें शिखर प्रतिदिनीं [आणि] प्रतिरात्रीं संरक्षण करून अचल स्थितींत ठेवीत असतां.

8 Thrice, As'vins, [are] the three jars [filled] with the seven-mothered streams [for you] [and] in three ways is the oblation prepared. Passing above the three worlds ye keep steady the vault of heaven [all] days [and] nights

८ 'त्रिवार' 'त्रिवार' ही आवृत्ति या मंत्रांतहि आहेच. 'हे अश्वीदेव हो, सात ज्याच्या आया अशा सोमांनीं तीन कलश तुम्हांसाठीं तीनदा भरून तयार केले जातात. तीनदा तुम्हांसाठीं हवि तयार केलें जातें. आणि पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्युलोक या तीनहि लोकांच्यावर गमन करणारे जे तुम्ही ते रात्रंदिवस द्युलोकाच्या माथ्याचें संरक्षण करून तें स्थिर राही असें करीत असतां', असा भावार्थ आहे.

सोमाच्या सात आया कोणत्या? सायणाचार्य "इमं मे गङ्गे यमुने" इत्यादि (ऋ १०. ७५ ५) 'सात नद्यांपासून उत्पन्न झालेलीं' असा 'सप्तमातृ' याचा अर्थ करून 'सिन्धु' म्हणजे 'उदकें' असें समजतात, आणि 'सात नद्यांपासून उत्पन्न झालेल्या उदकांनीं' असा अर्थ करितात

'प्रतिदिनीं आणि प्रतिरात्रीं संरक्षण करून अचलस्थितींत ठेवीत असतां'='रक्षेथे द्युभिरक्तुभिर्हितम्'. अक्षरशः अर्थ, 'स्थापिलेला [असा] रात्रंदिवस रक्षीत असतां'; म्ह. अशा रीतीनें रक्षीत असतां कीं, तो तेथून पडत नाहीं, तर स्थिर राहतो. सायणाचार्य 'रात्रंदिवस' याचा संबंध 'स्थापिलेला' याच्याशीं घेतात, 'रक्षीत असतां' याच्याशीं घेत नाहीत.

'द्युलोकाचें शिखर'='दिवो नाकम्'. हा जो आम्ही अर्थ करितों त्यास ऋ. ९. ७३. ४ या मंत्राचा आणि त्यावरील सायणभाष्याचा आधार आहे प्रस्तुत स्थळीं सायणाचार्य 'दिवो नाकम्' या शब्दाचा 'द्युलोकसंबंधी जो सूर्य त्याला' असा अर्थ सांगतात परंतु येथें 'दिवो नाक' म्हणजे 'नाक'च असा अर्थ समजावयाचा; आणि 'द्युलोकाचें शिखर' म्हणजे 'द्युलोकाचा माथा' किंवा 'स्वर्ग' असेंच समजलें पाहिजे.

या मंत्रांत जो 'नाक' शब्द आला आहे त्याचा अर्थ अलीकडील संस्कृतांत स्वर्ग असा होतो, तसाच वेदांतहि होतो; परंतु हा स्वर्ग म्हणजे द्युलोकासारिखा एक उच्च प्रदेश आहे असा

क्व१ त्री चक्रा त्रिवृतो रथस्य क्व१ त्रयो वन्धुरो ये सनीळाः।
कदा योगो वाजिनो रासभस्य येन यज्ञं नासत्योपयाथः ॥ ९ ॥

क्वं । त्री । चक्रा । त्रिऽवृतः । रथस्य । क्वं । त्रयः । वन्धुरः । ये ।
सऽनीळाः ।
कदा । योगः । वाजिनः । रासभस्य । येन । यज्ञम् । नासत्या ।
उपऽयाथः ॥ ९ ॥

भाषायाम्.

९ हे नासत्यौ, येन [रथेन] [युवां] यज्ञम् उपयाथ (=आगुथः) [तस्य] [युवयो] त्रिवृत. (=त्रिकोणस्य) रथस्य त्रीणि चक्राणि क्व [सन्ति], [तस्य रथस्य] ये वन्धुर (=उपाश्रयाणि काष्ठानि) सनीळाः (=आसनोपेता) [वर्तन्ते] [ते] क्व [सन्ति], वाजिन (=बलवतो) रासभस्य (=गर्दभस्य) योग (=तस्मिन्नर्थे नियोजन) कदा [भविष्यति] ?

समज दिसून येतो आणि ज्यात तारे वगैरे आहेत, तो प्रदेश 'नाक' होय; एकाद्या देवाच्या उच्चीविषयीं अथवा मोठेपणाविषयी सांगावयाचे झाले म्हणजे तो 'नाकाप्रत' पोंहचतो असें वर्णन (७ ५८ १) आढळते 'नाक' उच होय (७ ८६. १), तो उच आणि विस्तीर्ण होय, तो अंतराळीं आहे आणि विष्णूनें त्याला वरचेवर धारण केला आहे (७ ९९. २) 'साध्य' या नांवाचे देव तेथ असतात (१. १६४ ५०; १०. ९० १६), तो विस्तीर्ण होय आणि त्याला इंद्रानें आपल्या पराक्रमानें अंतराळीं धारण केला आहे (१०. ११३. ४) जो मर्त्य यज्ञादिक करितो तो 'नाकाच्या' पाठीवर जाऊन देवांमध्यें बसतो (१. १२५. ५) आणि दिवोदास या नांवाचा राजा होऊन गेला तो 'नाकाच्या' पाठीवर जाऊन उभा राहिला (८. १०३ २). सोम हा पक्ष्याप्रमाणें 'नाकांत' म्हणजे द्युलोकांत भ्रमण करितो (१० १२३ ६); इत्यादि या 'नाका'विषयीं ऋग्वेदांत सांगितलें आहे यावरून आपल्या आर्य पूर्वजांची अशी श्रद्धा उघड दिसून येते की, द्युलोकाचा जो अत्यंत उच्च प्रदेश तो 'नाक' अथवा स्वर्ग होय; आणि देव तेथ वास करितात; आणि जे मर्त्य सुकृत्यें करतील ते तेथें जातील; व स्वर्ग अतिउच्च आणि विस्तीर्ण आहे. परंतु स्वर्गांत ऐरावत म्हणून इंद्राचा बसावयाचा हत्ती आहे, अथवा नंदनवन म्हणून बाग आहे अथवा तेथें अप्सरा गायन करितात इत्यादिक ज्या पुराणांतील गोष्टी त्या ऋग्वेदांत नाहींत

९. हे सत्यवान् [अश्वी] हो, [तुम्ही] ज्या [रथा]त [बसून] यज्ञाप्रत येत असता [त्या] [तुमच्या] त्रिकोणी रथाचीं तीन चाकें कोठें? [त्याचा] तीन लाकडांचा जो बैठकीसकट साठा .[तो] कोठें? [त्या तुमच्या रथाला] [तुम्ही आपला] बळवान गाढव केव्हां जोडाल.

9. Where [are] the three wheels of the triangular car, where the three beams with seats [on them], [and] when will you harness [your] powerful donkey [to that car], with which, O truthful As'vins, [ye] go to the sacrifice ?

---

९. या मंत्रांत जे तीन प्रश्न आहेत त्यांचें तात्पर्य इतकेंच कीं, 'तुम्ही ज्या रथानें आपल्या उपासकांच्या यज्ञाप्रत जात असतां तो तयार करून त्यांत बसून तुम्ही आमच्या ह्या आजच्या यज्ञाप्रत लवकर कां येत नाहीं?'

'त्रिकोणी' हा अर्थ सायणाचार्यांसच अनुसरून केला आहे. ते म्हणतात कीं, आंस आणि आंसापासून जी. दोन लाकडें असतात आणि पुढच्या बाजूस जाऊन मिळतात तीं अशीं तीन मिळून अश्वींचा रथ होतो म्हणून तो त्रिकोणी होय अजून तरी एक बैलाचे, एक घोड्याचे अथवा एक खेचराचे फार चपळ जे तांगे अथवा एक्के असतात ते अशाच प्रकारचे असतात, हें आमच्या वाचकांस सांगावयास नकोच.

'तीन चाकें'. अश्वींच्या रथास तीन चाकें असल्याविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे.

'बळवान गाढव'. अश्वींच्या रथास एकच गाढव जोडलेला असतो असें वेदांत कोठकोठें आढळतें (१. ११६. २; ८. ८५. ७). घोडे जोडलेले असतात असेंहि इतर ठिकाणीं सांगितलें आहे. पुराणांतरीं जसा सारजेचा मोर, गणपतीचा उंदीर, विष्णूचा गरुड, शिवाचा नंदी तसा वेदांत अश्वींचा गाढव आहे.

'[त्याचा] तीन लाकडांचा जो बैठकीसकट साठा [तो] कोठें?'=क्व त्रयो वन्धुरो ये सनीळाः'. आंस अथवा आंसावरचें आडवें समांतर लाकूड एक आणि त्यापासून पुढें जाणारीं दोन लाकडें मिळून तीन. आणि त्याजवरच बसणार्‍यांसाठीं बैठक आहे, असा अर्थ.

आतां अशा प्रकारच्या रथाचें तिसरें चाक कोठें असेल तें स्पष्ट सांगवत नाहीं.

आ नासत्या गच्छतं हूयते हविर्मध्वः पिबतं मधुपेभिरासभिः ।
युवोर्हि पूर्वं सवितोषसो रथमृताय चित्रं घृतवन्तमिष्यति ॥ १० ॥

आ । नासत्या । गच्छतम् । हूयते । हविः । मध्वः । पिबतम् । मधुऽपेभिः । आसऽभिः ।
युवोः । हि । पूर्वम् । सविता । उषसः । रथम् । ऋताय । चित्रम् । घृतऽवन्तम् । इष्यति ॥ १० ॥

आ नासत्या त्रिभिरेकादशैरिह देवेभिर्यातं मधुपेयमश्विना ।
प्रायुस्तारिष्टं नी रपांसि मृक्षतं सेधतं द्वेषो भवतं सचाभुवा ॥ ११ ॥

आ । नासत्या । त्रिऽभिः । एकादशैः । इह । देवेभिः । यातम् । मधुऽपेयम् । अश्विना ।
प्र । आयुः । तारिष्टम् । निः । रपांसि । मृक्षतम् । सेधतम् । द्वेषः । भवतम् । सचाऽभुवा ॥ ११ ॥

भाषायाम्.

१० हे नासत्यौ, [युवाम्] आगच्छतम, [युवाभ्याम्] [इद] हवि हूयते (=अस्माभिर्दीयते), [युवां] मध्वः (=मधुर सोमरस पिबद्धि) [युवयो] आसभि (=आस्यै) मध्व (=मधुन =मधुरस्य सोमरसस्य) [भाग] पिबतम् । सविता हि युवयोश्चित्र (=रमणीय) घृतवन्त (=घृतवन्तमेव सान्द्र) [च] रथम् उषस पूर्वम् (=उष कालात्प्रथममेव) ऋताय (=अस्मदादीना यज्ञार्थम्) इष्यति (=प्रेरयात=प्रेषयति) ॥

११ हे नासत्यौ अश्विनौ, [युवां] त्रिभिरेकादशै (=त्रयस्त्रिंशद्भि) देवै मधुपेयं (=मधुरस्य सोमरसस्य पान) [प्रति] इह आयातम् । [युवाम्] [अस्माकम्] आयु प्रतारिष्ट (=प्रतारिष्ट=प्रवर्धयतम्), [अस्माक] रपांसि (=पापानि =व्याधीन्) निर्मृक्षत (=अस्मत्तो निर्मर्जयतम्), [अस्माक] द्वेष (=द्विष =द्वेषकर्तृन्) सेधत (=प्रतिषेधतम्), [अस्माक] सचाभुवौ (=साहाय्यार्थम् अस्माभि सहावस्थितौ) भवतम् ॥

१०. हे सत्यवान् [अश्वी] हो, [तुम्ही] उभयतां या; [हें] हवि [तुम्हाला] अर्पण केलें आहे; [आपल्या] मधुर सोमरस पिणाऱ्या तोंडानीं [हा आमचा] मधुर सोमरस [तुम्ही] प्या. कारण कीं उषेच्या पूर्वी तुमच्यां तेजःपुंज [आणि] गुळगुळीत रथाला सविता यज्ञासाठीं पाठवीत असतो.

10. Come, [ye] truthful [As'vins], the oblation is offered [unto you], drink [therefore] of the sweet Soma with [your] mouths that sip the sweet Soma. For before [the time of] Dawn Savitâ sends forth to the sacrifice your chariot resplendent [and] smooth.

११. हे सत्यवान् अश्वी हो, तिप्पट अकरा देवासकट [तुम्ही] येथें मधुर सोमरस पिण्याकरितां या; [तुम्ही] [आमचें] आयुष्य वाढवा, [आमचे] व्याधी नाहींसे करा, [आमच्या] द्वेष्ट्यांचें निवारण करा, [आणि] [आमचे] पाठराखे व्हा.

11. Come hither, ye Truthful As'vins, with the thrice eleven gods to drink the sweet Soma. Prolong [our] lives, wipe off [our] diseases, ward off [our] enemies, [and] be our champions.

---

१०. पूर्वील मंत्रांत अश्वी लौकर कां येत नाहींत अशा भावार्थानें प्रश्न पुसले या मंत्रांत पुनः प्रार्थना करितो, कीं, 'हे अश्वी, तुम्ही लवकर या, आणि हे जे हवि तुम्हांसाठीं तयार करून आम्ही अर्पण करीत आहों तें सोमरसरूपी मधुर हवि आपल्या सोमरस पिण्याची संवय असणाऱ्या तोंडांनीं तुम्ही प्या' तुम्हांस लवकर येऊन पिण्याविषयीं प्रार्थना करितो यांत नवल नाहीं. कारण कीं उषःकालापूर्वीच तुमचा तेजस्वी आणि गुळगुळीत रथ सविता यज्ञाप्रत पाठवीत असतो' असा भावार्थ.

'गुळगुळीत'='घृतवन्तम्'. अक्षरशः, 'ज्याला तूप [लाविलें] आहे'. म्हणजे, त्याजवर जणुं काय तूपच लाविलें आहे असा हाताला नरम लागणारा, आणि डोळ्याला साफ दिसणारा सायणाचार्य म्हणतात कीं, चाकें चांगलीं चालावीं म्हणून आंसाच्या शेवटास तूप लाविलें असतें म्हणून 'घृतवन्त' असें म्हटलें आहे

'सविता पाठवीत असतो'='सविता प्रेर्यति' अर्थात् त्यास सविता फक्त पाठवितो अथवा देतो व यावा सरो-सर भावार्थ काय आहे तें ज्यां लागत नाहीं त्यां सर्व दूर दिसे

आ नो अश्विना त्रिवृता रथेनार्वाञ्चं रयिं वहतं सुवीरम् ।
शृण्वन्ता वामवसे जोहवीमि वृधे च नो भवतं वाजसातौ
॥ १२ ॥५॥

आ । नः । अश्विना । त्रिऽवृता । रथेन । अर्वाञ्चम् । रयिम् । वहतम् । सुऽवीरम् ।
शृण्वन्ता । वाम् । अवसे । जोहवीमि । वृधे । च । नः । भवतम् । वाजऽसातौ ॥ १२ ॥ ५ ॥

भावार्थम्.

१२ हे अश्विनौ, [युवां] त्रिवृता (=त्रिकोणेन) रथेन सुवीरं (=पुत्रभृत्यादिभि शोभनैवीरोपेतं) रायं (=सपद) नः (=अस्मभ्यम्=अस्मदर्थम्) अर्वाञ्चम् (=अर्वाक्=अस्मदाभिमुख्येन) आवहतम् (=आनयतम्। [अहं] शृण्वन्तौ (=अस्मदीयस्तुतिं शृण्वन्तौ) वाम् अवसे (=अस्मद्रक्षणाय) जोहवीमि (=पुनः पुनः आह्वयामि)। [युवां] च वाजसातौ (=सग्रामे) नः (=अस्माकं) वृधे (=वृध्यै=वर्धनाय=जयाय) भवतम् ॥

का, सूर्याअगोदर उषा (अथवा प्रभात) उगवत असते आणि उषेच्या अगोदरहि अश्वी उगवतात आणि रथांत बसून यज्ञाप्रत येत असतात

११ या मंत्राचा भावार्थ स्पष्ट आहे इतकेच सांगणे अवश्य दिसते की, दीन मनुष्यांनी परम शक्तिमान् देवापाशी जशी प्रार्थना करावी तशीच यांत प्रेमभावाने केलेली दृष्टीस पडते

'तिष्पट अकरा देवासकट'='त्रिभि एकादशी देवै' म्हणजे तेहतीस देवांसहित' सायणाचार्य म्हणतात. तेहतीस देव म्हणजे 'ये देवासो दिवि एकादश'' १० (१ । १ ११) मंत्रांत जे अकरा देव स्वर्गांत, अकरा पृथ्वीवर आणि अकरा अंतरिक्षांत असतात म्हणून सांगितले आहे ते तेहतीस देव समजावयाचे ऋ १ ४५ २('ता-तोहिदश्व गिर्वण त्रयस्त्रिंशतम आवह'') यांतहि तेहतीसच देव सांगतले आहेत तैत्तिरीय संहिता १ ४ १० १ यांतहि पृथ्वीवर ११ अतरिक्षांत ११, आणि स्वर्गांत ११ असे तेहतीस देव सांगितले आहेत (ये देवासो दिवि एकादश स्थ पृथिव्याम् अधि एकादश स्थ। अप्सुक्षितो• • एकादश स्थ ते देवा स• ••) ऋ ३ ६ ९ यांतहि तेहतीसच देव सांगितले आहेत (पत्नीवतस् त्रिंशत त्रीश्च देवान् आवह' याप्रमाण दुसऱ्या अनेक ठिकाणी देव

१२. हे अश्वी हो, [तुम्ही आपल्या] त्रिकोणी रथांत [भरून] सुवीरयुक्त संपत्ती आम्हांसाठीं इकडे आणा. ऐकून घेणाऱ्या तुम्हां उभयतांस [मी] पुनःपुनः साहाय्याकरितां हाका मारीत असतों. तर संग्रामांत आम्हांस जय मिळेल असें करा.

12. Carry hither unto us, As'vins, by [means of] your triangular car opulence accompanied by good heroes. Ye that hear I invoke again and again for help. Be [ye], therefore, the givers of victory to us in battle.

तेहतीस आहेत असे वेदांत सांगितलें आहे. हे जे तेहतीस देव ते कोणते तें शतपथ ब्राह्मणामध्यें' (४. ५. ७. २) असें सांगितलें आहे कीं, ८ वसु, ११ रुद्र, आणि १२ आदित्य, आणि द्युलोक आणि पृथ्वी मिळून तेहतीस. परंतु संहितेमध्यें जे तेहतीस सांगितले ते शतपथ ब्राह्मणांत सांगितल्याप्रमाणें तेहतीस समजावयाचे किंवा कसे याविषयीं निश्चयानें सांगवत नाहीं. परंतु कसेंहि असलें तरी एक ऋचा (ऋ. ३. ९. ९.) खेरीज करून सर्व ठिकाणीं देव तेहतीसच आहेत असें सांगितलें आहे. ही जी तेहतिसांची संख्या तिजपासूनच अर्वाचीन काळीं पुराणांतरीं वगैरे तेहतीस कोटि देव आहेत अशी कथा निष्पन्न झाली असावी यांत संशय नाहीं. हे तेहतीस कोटि देव जर पुराणांत सांगितल्याप्रमाणें खरोखरच असते तर आर्यावर्तांत प्रत्येक मनुष्याच्या हिशानें दीड देव आला असता. (आमच्या आर्यावर्तांतील सांप्रत प्रजेची संख्या अजमासें बावीस कोटि आहे).

'नाहींसे करा'='निर्मृक्षतं'. हें रूप मृज् धातूपासून आहे असें समजावें. सायणाचार्य 'मृश' धातूनें निर्वचन करितात. अर्थांत भेद पडत नाहीं.

१२. या ऋचेंत विशेष टीका करण्यासारिखें नाहीं. सूक्ताचा उपसंहार यांत आहे. 'हे अश्विदेव हो, तुम्ही आपल्या त्रिकोणी रथांत घालून संपत्ती इकडे आणा आणि आम्हांस संपत्ती द्या. आणि ती नुसती संपत्ती नव्हे, तर तिजबरोबर सुसंततीहि आम्हांस मिळे असें करा. मी पुनः पुनः तुमचा धांवा करीत असतों, तर त्या त्या प्रसंगीं मात्र तुम्ही संरक्षण करा; आणि संग्रामाच्या वेळची प्रार्थना ही आहे कीं, युद्धांत जेव्हां जेव्हां तुमचा धांवा मी करीन तेव्हां तेव्हां मला तुम्ही साहाय्य करा आणि मला यश मिळे असें करा', असा भावार्थ.

देवापाशीं ज्या चांगल्या चांगल्या वस्तु मागावयाच्या त्यांत श्रेष्ठ ही असे कीं त्याणें युद्धांत जय होई असें करावें, असें या मंत्रावरून स्पष्ट दिसून येतें. या सूक्ताचा कर्ता ब्रह्मर्षि होता म्हणून सांगायचास नकोच. प्राचीन काळीं आमचे आर्य पूर्वज युद्धाविषयीं किती उत्सुक असत आणि त्यांत आपणांस जय प्राप्त व्हावा म्हणून करीत प्रार्थना

सूक्तम् ३५.

आङ्गिरसो हिरण्यस्तूप ऋषि । सविता देवता । आद्यायास्तु अग्निर्मित्रावरुणौ रात्री सविता च । त्रिष्टुप् छन्द । १. ९ इत्येतयोर्जगती ॥

ह्वया॑म्य॒ग्निं प्र॑थ॒मं स्व॒स्तये॒ ह्वया॑मि मि॒त्रावरु॑णावि॒हाव॑से ।
ह्वया॑मि॒ रात्रीं॒ जग॑तो नि॒वेश॑नीं॒ ह्वया॑मि दे॒वं स॑वि॒तार॑मू॒तये॑ ॥ १ ॥

ह्वया॑मि । अ॒ग्निम् । प्र॒थ॒मम् । स्व॒स्तये॑ । ह्वया॑मि । मि॒त्रावरु॑णौ । इ॒ह । अव॑से ।
ह्वया॑मि । रात्री॑म् । जग॑तः । नि॒ऽवेश॑नीम् । ह्वया॑मि । दे॒वम् । स॒वि॒तार॑म् । ऊ॒तये॑ ॥ १ ॥

भाषायाम्.

१ [अहं] प्रथम[भूत]म् अग्निं स्वस्तये (=अस्माकमविनाशाय) ह्वयामि, मित्रावरुणौ इह अवसे (=अस्मद्रक्षणाय) ह्वयामि, जगतो निवेशनीं (=निवेशयित्रीम् =उपवेशनहेतुभूता) रात्रीं ह्वयामि, देवं सवितारम् ऊतये (=अस्मद्रक्षणार्थ) ह्वयामि ॥

करीत ते या मंत्रावरून समजते, आणि शूर असे पुत्र व्हावे म्हणून त्याची प्रार्थना कशी होती तीहि पाहा आली-कडे तर आम्हांपैकी एका ब्राह्मणा-नें मातें आर्यभूमीचे शूर पुत्र एकवीस वेळा नाहीसे करून टाकिले म्हणून आम्ही (दुःख करावें तसें न करितां उलटा) फार आनंद मानितो आणि ढोल मारितो तो पाहा! आणि कांहीं मागावयाचें झालें तर आम्हांस चांगली भिक्षा मिळो, आणि भिक्षा मागण्याचा जो आमचा मोठा हक्क तो दुसरा कोणी हिरावून न नेओ इतकेंच मागत असतों !

'इकडे'='अर्वाञ्चम्' 'अर्वाञ्चम्' हे व्याकरणदृष्ट्या पाहिलें तर येथें 'रश्मिम्' याचें विशेषण आहे, पण 'अर्वाक्'='इकडे' या अर्थासारिखा क्रियाविशेषणाप्रमाणे त्याचा अर्थ केला पाहिजे याप्रमाणे दुसरे प्रयोग पुष्कळ आहेत "अर्वाञ्च त्वा सुखे रथे वहताम् इन्द्र केशिना" (ऋ ३ ४१.९) इत्यादि उदाहरण आहेत.

सूक्त ३५.

ऋषि–हिरण्यस्तूप, पूर्वील सूक्ताचा जो तोच. देवता–सविता. वृत्त–त्रिष्टुप्, (परंतु पहिलें आणि नववी ह्यांचं वृत्त जगती).

१. [सर्वांपक्षा] प्रथम [जो] अग्नि [या]ला [मी] [माझ्या] कल्याणासाठीं बोलावितों; [मी] मित्रावरुणास येथें संरक्षणासाठीं बोलावितों; जगताला विश्रांति देणाऱ्या रात्रीला [मी] बोलावितों, [मी] सवित्या देवाला रक्षणासाठीं बोलावितों.

Hymn 35.

To *Savitá* or the Sun-God. Author *Hiranyastúpa* as before. Metre–*Trishṭup*, except in the first and the ninth, where it is *Jagati*.

1. I invoke Agni [as] the first for blessing, I invoke Mitra and Varuna hither for help, I invoke Night the giver of rest to the creatures, I invoke divine Savitá for protection.

---

१. 'जगताला विश्रांति देणाऱ्या रात्रीला'='रात्रीं जगतो निवेशनीम्'. म्हणजे सर्व प्राणी दिवसभर श्रम करितात आणि रात्रीच्या वेळीं विश्रांति घेतात असें तात्पर्य.

मित्र, वरुण, आणि सविता ह्या कोणत्या देवता त्याविषयीं पूर्वी सांगितले आहे. सविता म्हणजे सूर्यरूप देवता. या सवित्याविषयीं जरी हें सूक्त मख्यत्वें करून आहे, तथापि त्याजबरोबर अग्नि, मित्र, वरुण आणि रात्री यांचाहि धांवा या मंत्रांत केला आहे सवित्याविषयीं या सूक्तांत काय सांगितलें आहे तें लक्षांत ठेवावें.

आ कृष्णेन रजसा वर्तमानो निवेशयन्नमृतं मर्त्यं च ।
हिरण्ययेन सविता रथेना देवो याति भुवनानि पश्यन् ॥ २ ॥
आ । कृष्णेन । रजसा । वर्तमानः । निऽवेशयन् । अमृतम् । मर्त्यम् । च ।
हिरण्ययेन । सविता । रथेन । आ । देवः । याति । भुवनानि ।
पश्यन् ॥ २ ॥
याति देवः प्रवता यात्युद्वता याति शुभ्राभ्यां यजतो हरिभ्याम् ।
आ देवो याति सविता परावतोऽप विश्वा दुरिता बाधमानः
॥ ३ ॥
याति । देवः । प्रऽवता । याति । उत्ऽवता । याति । शुभ्राभ्याम् ।
यजतः । हरिऽभ्याम् ।
आ । देवः । याति । सविता । पराऽवतः । अप । विश्वा । दुःऽइता ।
बाधमानः ॥ ३ ॥

भाषायाम्.

२ सविता (=सूर्य) देव, कृष्णेन रजसा (=कृष्णवर्णेन लोकेन=अन्धकारमयेन अन्तरिक्षमार्गेण) आवर्तमान (=आगच्छन्), अमृत (=मरणरहित देवजन) मर्त्य च (=मनुष्यांश्च) निवेशयन् (=स्वस्वस्थाने विश्रान्त्यर्थम् अवस्थापयन्=स्थापयन्), [मार्ग च] [विविधानि] भुवनानि (=लोकान्) पश्यन् [सन्], हिरण्ययेन रथेन (=सुवर्णनिर्मित रथमधिष्ठाय) आयाति (=अस्मत्समीपम् आगच्छति) ॥

३ [सविता] देव. [क्वचित्] प्रवता याति (=प्रवणवता मार्गेण गच्छति), [क्वचिद्] उद्वता याति (=ऊर्ध्वदेशयुक्तेन मार्गेण गच्छति), स यजतो (=यजनीयो) [देव] [क्वचित्] शुभ्राभ्याम् [अश्वाभ्यां] [क्वचिच्च] हरिभ्यां (=शिशङ्गाभ्यामश्वाभ्यां) याति । सविता देव, विश्वानि दुरितानि (=पापानि=संकटानि) अपबाधमान. (=अपास्यन्-विनाशयन्), परावत (=दूरदेशाद्) आयाति ॥

२. अंधकारानें भरलेल्या आकाशप्रदेशांतून फिरत फिरत, [आणि] अमर्त्यांस आणि मर्त्यांस विश्रांति देत देत, सविता देव भुवनें पाहात पाहात सोन्याच्या रथांत बसून येत असतो.

2. Travelling hither through dark space, sending to rest the immortals and the mortals, divine Savitâ in [his] golden car comes, observing different worlds.

३. [सविता] देव [केव्हां केव्हां] सखल मार्गानें चालतो, [केव्हां केव्हां] उच्च मार्गानें चालतो, [तो] पूजनीय [देव] [केव्हां केव्हां] शुभ्र [घोड्यां]च्या जोडीनें जातो, [आणि केव्हां केव्हां] पिवळ्या घोड्याच्या जोडीनें जातो; सविता देव सकल संकटें नाहींशीं करीत करीत दूर अंतरावरून येत असतो.

3 The divine [Savitâ] [now] travels on a descent, [and now] he travels on an ascent; the worshipful [Savitâ] [now] goes by a pair of white [horses] [and now] a pair of tawny horses Divine Savitâ comes hither from a distance driving forth all dangers [before him]

२. भावार्थः—'सविता देव म्हणजे सूर्य जो देव तो अंधकारमय अंतरिक्षांतील मार्गानें फिरत फिरत येत असतो; तो येतां येतां मार्गांत अमर्त्यांस म्हणजे देवांस आणि मर्त्यांस म्हणजे मनुष्यादिक जे प्राणी त्यांस विश्रांतीकरितां निजवीत निजवीत येतो. म्हणजे सूर्य अंतरिक्षमार्गानें येऊं लागला म्हणजे प्रथम अंधकार असतो; मग तो पुढें येऊं लागला म्हणजे त्याच्या मार्गें रात्र पडते, तेव्हां सूर्य अस्ताला गेल्यामुळें झालेला दिवस असें दर्शन काम करून थकलेले जे अमर्त्य आणि मर्त्य ते विश्रांति घेण्याकरितां निजावयास जातात. या प्रकारें करून अनेक भुवनें पाहात पाहात हा सूर्य देव आपल्या सोन्याच्या रथांत बसून येत असतो.'

हा आमचा अर्थ सायणाचार्यांस संमत आहे.

'अंधकारानें भरलेल्या आकाशप्रदेशांतून'='कृष्णेन रजसा.' रजस् शब्दाचा अर्थ 'काळोखाच्या प्रदेशानें' अथवा 'मार्गानें.' याच सूक्ताचा पहिला व नववा मंत्र पाहा. शिवाय ऋ. १. ७०. ४; ८. ४३. ६, आणि ८. ७२. ५ हे मंत्र पाहा.

'विश्रांति देत देत'=निवेशयन्.' याच अर्थी 'निवेशनी' हा शब्द याच सूक्तांत आला आहे. शिवाय सविताविषयींचा ऋ. ७. ४५. १, 'आ देव यातु सविता सुरत्न. अन्तरिक्षप्रा.

अभीवृतं कृशनैर्विश्वरूपं हिरण्यशम्यं यजतो बृहन्तम् ।
आस्थाद्रथं सविता चित्रभानुः कृष्णा रजांसि तविषीं दधानः ॥ ४ ॥

अभिऽवृतम् । कृशनैः । विश्वऽरूपम् । हिरण्यऽशम्यम् । यजतः । बृहन्तम् ।
आ । अस्थात् । रथम् । सविता । चित्रऽभानुः । कृष्णा । रजांसि । तविषीम् । दधानः ॥ ४ ॥

भाषायाम्.

४ यजतो (=यष्टव्य =पूजनीयश्च), चित्रभानु (=सु दरतेजोयुक्त), कृष्णानि रजांसि (=अन्धकारमयान्=अन्तरिक्षावकाशप्रदेशान्) [अभित] तविषी (=प्रताप) दधानो (=धारयन्=प्रसारयन्) सविता कृशनै (=मुक्ताभि =मुक्ताहारै) अभिवृत (=परिवेष्टित=तेषा परिवेष्टनेन अलकृत) विश्वरूप (=नानारङ्ग) हिरण्यशम्य (=सुवर्णकृता अश्वाना स्कन्धेषु रथयोजनवेलाया नियन्तु प्रक्षेप्यमाणा शङ्कवो यस्य त) बृहन्त रथम् आस्थात् (=आरूढवान्भवति) ॥

वहमान अर्थे निवेशयन् च प्रसुवन च भूम" असा मत्र आहे तो पाहा

'भुवन'=भुवनानि' भुवन'शब्दाचा अर्थ प्राणी असा जरी वेदात होतो, तरी 'लोक' पृथ्वीसारिखा दुसरीं भुवनें असाहि पुष्कळ मत्रात होतो हा शेवटचा आम्हीं येथें घेतला आहे

'सो याच्या रथात बसून'=हिरण्ययेन रथेन' शब्दश 'सुवर्णमय रथान' असा अर्थ आहे सवित्याच सर्वच सुवर्णमय आहे त्याचे डोळे सुवर्णाचे आहेत (खाला आठवा मत्र पाहा) त्याचे हात सो याचे आहेत त्याची जीभ सो याची आहे (ऋ ६ ७१ ३) तो सो याचें कवच घालितो (४ ५३ २), त्याच्या प्रभावती सो याची प्रभावळ आहे (३ ३८ ८, ७ ३८ १), आणि प्रस्तुतच्या मत्रात सांगितल्याप्रमाणें त्याचा रथहि सो याचाच आहे

३ 'सविता म्हणजे सूर्य चालत असतां केव्हां केव्हां त्याला खोलगटांतून चालाव लागत, केव्हां केव्हां उचवट्यांतून चालावें लागतें, त्याच्या रथास केव्हां केव्हां (म्हणजे दोन प्रहरच्या वेळा) पांढरे शुभ्र घोड्यांचा जोडी जोडलेली असते आणि केव्हां केव्हां (सकाळच्या वेळा अरुणोदया वगैरे) पिवळ्या घोड्यांची जोडी जोडलेली असते या प्रकार करून दूर अंतरावरून, सर्व सकट म्हणजे

४. मोत्यां[च्या हारां]नी वेष्टून सजविलेला, चित्रविचित्र रंगाचा, सोन्याच्या शिवळींचा [आणि] मोठा [असा जो] रथ [त्याज]वर पूजनीय, सुंदरतेजस्क, [आणि] [सर्व] अंधकारमय अंतरिक्ष[भर] [आपल्या] प्रतापाने प्रगट करणारा [असा] सविता आरूढ होतो.

4 The adorable Savitâ of beautiful splendor, manifesting [his] energy [throughout] the dark regions of space, mounts his car, friezed with [garlands of] pearls, of variegated colours, possessed of golden yokepins and of great magnitude.

रस्त्यावरच्या अडचणी वगैरे नाहींशा करीत करीत तो येत असतो.'

या मन्त्रांत केलेल्या सूर्यमार्गक्रमणाविषयींच्या वर्णनापेक्षां दुसरें चांगले वर्णन आधुनिक कोणत्या कवीस करावयाला येईल ?

---

४. 'सविता म्हणजे सूर्य देव रथांत बसून आपल्या प्रतापाने सर्व अंधकारमय अंतरिक्षावकाशप्रदेश व्यापून टाकून येत असतो' हेच या मन्त्रांत सांगितले आहे.

यांत सवित्याच्या रथाची जीं विशेषणे आहेत त्याजकडेस लक्ष्य द्यावें. तो 'मोत्यां[च्या हारां]नीं वेष्टून सजविलेला' आहे. म्हणजे मोत्यांच्या झालरी त्याच्या सभोंवती बांधलेल्या आहेत. आलीकडचे तरी जे रथ असतात, अथवा किती एक गाड्या, त्यांलाहि सुताच्या वगैरे जाळ्यांच्या झालरी लाविलेल्या आढळतात. ही मोत्यें म्हणजे पाहाटेस जे दहिंवराचे थेंब असतात तेच की काय ?—शिवाय तो रथ 'चित्रविचित्र रंगाचा' आहे, आणि 'सोन्याच्या शिवळींचा' (='हिरण्यशम्य') आहे. हा अर्थ सायणाचार्यांप्रमाणे केला आहे. पण रथाचे इतके दुसरे प्रसिद्ध भाग असतात त्याविषयीं न सांगतां जुकडाच्या शेवटाला ज्या बैलाच्या बाजूला शिवळ्या असतात त्या 'सोन्याच्या' असतात म्हणून ऋषि कां सांगतो ? सायणाचार्यांचा अर्थ खरा असेल तर, हे सूक्त रचिलें तेव्हां रथाला घोडे आतां टांग्याला जोडतात तसे मानेवर जुकड घालून जोडीत, 'हार्नेस' घालून पाठीवर जुकड ठेवीत नसत असें अनुमान केलें पाहिजे.

'मोत्यां[च्या हारां]नीं वेष्टून सजविलेला ' ='अभिवृतं कृशनैः.' 'अभिवृत' हे 'अभि + वृ' चें रूप होय; सायणाचार्य 'अभि + वृत्' चें समजतात आणि 'आसपास असणारा' असा अर्थ करून, 'कृशनैः' याचा संबंध 'विश्वरूपम्' याशीं घेऊन, 'सुवर्णानें नानारूपी' असें भाष्य करितात. आम्हीं केलेल्या अर्थास युक्तीशिवाय आणि सदर्भयोग्यतेशिवाय, " इन्द्रः हर्यन्तम् अर्जुनं वज्रं शुक्रैरभीवृतम् अपावृणोत् " (ऋ ३. ४४. ५) या मन्त्रावरील

वि जनाञ्छ्यावाः शितिपादो अख्यन्रथं हिरण्यप्रउगं वहन्तः ।
शश्वद्विशः सवितुर्दैव्यस्योपस्थे विश्वा भुवनानि तस्थुः ॥ ५ ॥

वि । जनान् । श्यावाः । शितिऽपादः । अख्यन् । रथम् । हिरण्यऽप्रउगम् । वहन्तः ।
शश्वत् । विशः । सवितुः । दैव्यस्य । उपऽस्थे । विश्वा । भुवनानि । तस्थुः ॥ ५ ॥

भाषायाम्.

५. शितिपादः (=श्वेतपादाः), हिरण्यप्रउगं (=सुवर्णमयम् ईषयोरग्रं युगबन्धनस्थानं यस्य तं) रथं वहन्तः श्यावाः (=सवितुः विश्वाश्वाः) जनान् (=प्राणिनो) व्यख्यन् (=व्याख्यापयन्=विशेषेण प्रकाशितवन्तः) । दैव्यस्य सवितुः (=सवितुः ईश्वरस्य) उपस्थे (=उदरे) [हि] शश्वत् विशः (=शश्वत्यो विशः=सकलाः प्रजाः) विश्वा[नि] भुवनानि [च] तस्थुः (=तिष्ठन्ति=आसते) ॥

सामर्थ्यविशेषाचाहि आधार आहे. दुसरेहि अर्थ आहेत.

'[पार्थि]वोभयरजस अंतरिक्ष[भर]' ='पृथ्वीचे रजांसि.' 'रजांसि' ही द्वितीयेची द्विवचने समजावी.

'प्रगट करणारा'='दधानः.' अक्षरशः अर्थ 'धारण करणारा.' पण वस्त्रादिक पदार्थ प्रसिद्ध रीतीने धारण करणे म्हणजे 'प्रगट करणे' हाच अर्थ होतो.

५. ज्यांचे पाय शुभ्र होत, [आणि] [जे] सोन्याच्या आढ्याचा रथ वाहून आणणारे [ते] [सवित्याचे] पिवळे घोडे सर्व जग प्रगट करितात. [कारण कीं] सविता देवाच्या उदरांत सकळ प्रजा [आणि] सकल भुवनें असतात.

5. [Savitâ's] tawny horses, with white legs, [and] drawers of the chariot that has a golden end to its pole have manifested the people. [For] all people [and] all worlds remain in the womb of divine Savitâ.

५. या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'सफेत पायांचे जे सूर्यदेवाचे पिवळे घोडे (म्हणजे किरण) ते पाहा सकळ जगाला प्रगट करीत आहेत! हें जग अरुणोदयाचे पूर्वी दिसत नव्हतें तें आतां ह्या सूर्यकिरणांच्या योगानें दिसूं लागलें आहे तर हें दिसण्याच्या पूर्वीं कोठें होतें! सूर्याचे पोटीं सर्व प्रजा आणि सर्व लोक आईच्या उदरांत मूल राहतें तसे राहतात. तेथून सूर्यानें ह्या जगाला जन्म देऊन हें जग आज आमच्या दृष्टीस पाडलं आहे' म्हणजे रात्रीच्या वेळीं जग नाहींसे होतें; म्हणजे तें सवित्याच्या पोटीं राहतें आणि तो जेव्हां सकाळीं उगवतो तेव्हां माता प्रसूत होऊन तिच्या पोटांतलें मूल बाहेर पडतें आणि प्रगट होतें तसें हें जग सूर्य प्रसवून प्रगट करितो. म्हणूनच त्यास 'सविता' म्हणजे 'प्रसवणारा' असें नांव पडलें आहे उदाहरणार्थ, यास्कानें सुद्धां 'सविता' नांवाचा हाच अर्थ सांगितला आहे शिवाय "देवो नो अत्र सविता नु अर्थं प्रासावीद् द्विपत् प्र चतुष्पद् इत्यै" (ऋ. १ १२४. १) आणि "प्रासावीद् देव. सविता जगत् पृथक्" (ऋ १. १५७.१) इत्यादि अनेक स्थळं आहेत.

आपण अशी कल्पना केली पाहिजे कीं, सूक्तकर्ता पहांटेस उठून पूर्वकडेस पाहत उभा राहिला आहे, आणि सूर्यकिरण नुकेच दिसत आहेत आणि प्रभातदर्शन होत आहे, आणि तें पाहून त्याला जो परमानंद होत आहे तो या सूक्तानें तो वर्णीत आहे.

'सोन्याच्या आढ्याचा रथ वाहून आणणारे'='रथं हिरण्यप्रउगं वहन्त.' 'आढा' म्हणजे रथाच्या घोड्याच्या शेवटीं जो खालीं वांकविलेला भाग असतो तो. हाच अर्थ 'प्रउग' शब्दाचा सायण सांगतात. अजून तरी गुजराथेंत (आणि कोठें कोठें खानदेशांतहि) असे रथ असतात इतकेंच नव्हे, पण हा जो 'आढा' तो पितळेच्या अथवा रुप्याच्या पत्र्यानें मढविलेला अथवा पितळेचा किंवा रुप्याचा केलेला असतो तेव्हां सूर्याच्या रथाचा 'प्रउग' (आढा) सोन्याचा असला म्हणून नवल नाहीं. या आढ्यावरून असा विचार सुचतो कीं, आमच्या देशांत आणि पुरातन काळीं अनेक

तिस्रो द्यावः सवितुर्द्वा उपस्थाँ एका यमस्य भुवने विराषाट् ।
आणिं न रथ्यममृताधि तस्थुरिह ब्रवीतु य उ तच्चिकेतत्
॥ ६ ॥ ६ ॥

तिस्रः । द्यावः । सवितुः । द्वौ । उपऽस्था । एका । यमस्य । भुवने ।
विराषाट् ।
आणिम् । न । रथ्यम् । अमृता । अधि । तस्थुः । इह । ब्रवीतु । यः ।
ऊम् इति । तत् । चिकेतत् ॥ ६ ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. द्याव (=द्युलोकाः) तिस्रः [सन्ति] । [तासां] द्वौ [द्यावौ] सवितुः उपस्था (=उपस्थे=उदरे) [वर्तेते], एका (=शिष्टा द्यौः) यमस्य (=यमदेवस्य) भुवने (=लोके) विराषाट् (=मनुष्याणां संग्रहकर्त्री=धारयित्री)·[वर्तते] । अमृता (=अमृतानि) [चन्द्रनक्षत्रादीनि ज्योतींषि] [सवितारं], रथ्यं (=रथस्य) आणि (=रथाद्बहिरक्षच्छिद्रे प्रक्षिप्तकीलं) [रथ] इव, अधितस्थुः (=आधितिष्ठन्ति=सवितारम् अधिगम्य स्थितानि) । य उ (=यस्तु) तत् (=द्यावां त्रित्वं, तासां द्वयोः सवितुरुपस्थे स्थितत्वम्, एकायाः शिष्टाया यमस्य भुवने स्थितत्वम्, अमृतानां ज्योतिषां सवितरि अधिष्ठितत्व च) चिकेतत् (=ज्ञातवान् स्यात् [स] इह ब्रवीतु (=कथयतु) ॥

वस्तु आणि त्याचा घाट व कारणी जशी होती तशीच आता आहे, फेरफार कांहीं झालेला नाहीं. आणि हें म्हण केल्यावर असें अनुमान काढावें लागतें कीं, आता या कलियुगात आम्ही आणि आमचे घोडे, रथ, गाड्या ही जशीं (बरीं असोत अथवा वाईट असोत) आहीं तशींच (बरी वाईट) वैदिक युगात म्हणजे कृतयुगात होतों, यापेक्षा भिन्न अथवा चांगलीं नव्हतों, वर्माच होतों. पुढचा मंत्र पाहता त्यावरून असें दिसून येईल कीं, वैदिक युगात जे रथ अथवा गाड्या होत्या त्या आलीकडे जे तांगे अथवा गुजराथेंत बुरख्याच्या गाड्या किंवा साधारण खेड्यापाड्यांनीं गाड्या असतात त्यापेक्षा चांगल्या नव्हत्या. कारण कीं, प्रस्तुतकाळीं संभावित अथवा प्रतिष्ठित मनुष्याची गाडी म्हटली म्हणजे तिच्या आंसास चाकाबाहेर कण्या असणार नाहींत, विलायती किंवा देशी तरी तेल वगैरे घालण्याचा डबा असेल. चाक आडवें पडण्यास त्याला खिळा उभा घातलेला असणार नाहीं.

६. द्युलोक तीन [आहेत]; [त्यांतून] दोन सवित्याच्या उदरात, [आणि] एक यमाच्या भुवनांत [असून] [तो] मनुष्यसंग्राहक [होय] रथाच्या कुनीवर [राहून रथ चालतो] तशीं [चंद्रतारादि] अमर [नक्षत्रें] [सवित्या]वर वसून चालतात पण ज्या कोणी ते पाहिले असेल त्याला येथे [पुढे येऊन] [तसें] बोलूद्या.

6 [There are] three heavens, two in the womb of Savitâ [and] one in the world of Yama, which receives the men. The immortal [stars] are mounted as on the axle-pin of a car. Here let him, who has seen that, [come forward and] say so

---

६. या मंत्राचा भावार्थ असा आहे की, 'द्युलोक अथवा स्वर्गलोक तीन आहेत, त्यापैकी दोन सूर्याच्या उदरात म्हणजे जितक्या प्रदेशावर सूर्याचा प्रकाश पडतो तितक्या प्रदेशाचे आंत आहेत, आणि तिसरा राहिला तो यमाच्या भुवनांत म्हणजे यमलोकांत असून मनुष्ये मेल्यानंतर ज्या स्वर्गलोकांत जातात तोच तो होय; आणि चन्द्रतारकादि अमर वस्तु ज्या आहेत त्या प्रथम सांगितलेल्या सूर्योदरस्थित दोन स्वर्गांत राहतात, आणि त्या सूर्यलोकावर (म्हणजे सवितृलोकावर) अशा रीतीनें सुरक्षित राहतात की, गाडीच्या आंसाच्या शेवटी चाकाच्या बाहेर खिळ्यांत खिळा घातला म्हणजे चाक मजबूत राहिल्यानें गाडी जशी पडत नाही तशी ती सूर्योदरांतून पडत नाहीत या प्रकारची रचना आहे म्हणून आम्ही ऐकिलें; परंतु तेथे जाऊन या सर्व गोष्टी पाहून आलेला कोण आहे? जर असेल तर त्यानें पुढें येऊन तसें आम्हास सांगावें. आम्हास तर वाटतें की, त्या गोष्टी ज्याला ठाऊक आहेत असा या पृथ्वीवर कोणी नाही.'

'द्युलोक तीन [आहेत]'='तिस्रो द्याव ' द्युलोक अथवा स्वर्ग हे तीन आहेत असें ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे आणि असेंहि सांगितलेले आढळतें की, या तिहींतून एक द्युलोक अति उच आहे त्याला 'उत्तम' असें नांव आहे, दुसरा त्याच्या खालचा त्याला 'मध्यम' असें नांव आहे, आणि त्याच्याहि खालचा तिसरा त्याला 'अवम' असें नांव आहे "यत् उत्तमे मरुत: मध्यमे वा यत् वा अवमे सुभगास: दिवि स्थ अत. न ....ह-विष दिन"=हे सौभाग्यशाली मरुतांनो, तुम्ही अगदी वरच्या द्युलोकांत अथवा मधल्या द्युलोकांत अथवा अगदीं खालच्या द्युलोकांत असलां तरी तेथून आमचे हे हवि स्वीकारण्या करितां या, (ऋ. ५. ६० ६) 'तरोर्विरा ....अस्मात् विरा दिवं अधिरोहागुरुश्रतिं "=उत्तम-

तेजस्क अग्नि आपल्या महिम्याने तीनहि द्युलोकांस एकामागून एक प्रगट करिता झाला. २. ३. २ "त्रि अन्तरिक्ष सविता महित्वना त्री रजांसि परिभूः त्रीणि रोचना। तिस्रो दिव. पृथिवी. तिस्रः इन्वति...."='सविता आपल्या महिम्याने त्रिगुणित अंतरिक्षाला, त्रिभुवनाला, त्रिलोकाला, तीन द्युलोकाला आणि तीन पृथ्वीला व्यापून राहतो,' ४. ५३. ५. "तिस्रो द्यावो निहिता अन्तरस्मिन्.... । गृत्सो राजा वरुणश्चक्रे एत दिवि प्रेङ्ख हिरण्ययं शुभे कम्"=या वरुणाच्या पोटांत [अगदी वरचा, मधला आणि खालचा असे] तीन द्युलोक आहेत स्तवनीय वरुणराजाने ह्या सवर्णमय सूर्याला झोपाळ्याप्रमाणे शोभेसाठीं द्युलोकांत ठेविले आहे' ७ ८७. ५. शिवाय ऋ. ७ १०१. ४; २. २७. ८; ५ ६९. १ हे मंत्र पाहा वर जे ४. ५३. ५ आणि ७. ८७ ५ हे मंत्र दिले त्याजवरील सायणभाष्य पाहतां असें दिसून येतें कीं, हे तीन द्युलोक अथवा स्वर्ग म्हणजे वेगवेगळे लोक नव्हेत; तर एकच द्युलोक अथवा स्वर्ग असून त्याचे वरचा, मधला, आणि खालचा असे तीन जे भाग तेच तीन द्युलोक समजावयाचे. आणि वर सांगितलेल्या सर्व मंत्राचा लक्ष्यपूर्वक विचार करितां तसेंच दिसतें खरें

'[आणि] एक यमाच्या भुवनांत [असून] मनुष्यसमाहक होय'='एका यमस्य भुवने विराषाट्.' म्हणजे तिसरा जो स्वर्ग राहिला तो यमलोकांत आहे, आणि मेलेले मनुष्य तेथें जातात त्याचा संचार स्थान होतो तीन द्युलोक (अथवा द्युलोकभाग) सांगितले' त्यांतून यमभुवनांतला जो तो कोणता, म्हणजे अगदी वरचा, मधला कीं खालचा, ते समजत नाहीं. सायणाचार्य तीन द्युलोक म्हणजे द्युलोक, अंतरिक्ष आणि पृथ्वी हे जे तीन लोक तेच होत असें म्हणतात, आणि अंतरिक्ष लोक तोच यमभुवनांतला द्युलोक असें म्हणतात

'रथाच्या कण्यांवर [राहून रथ चालतो] तशीं [चंद्रतारकादि] अमर [नक्षत्र] [सवित्या]वर बसून चालतात'=आणि न रथ्यम् अमृता अधि तस्थुः..' हा अर्थ आम्ही सायणास अनुसरून केला आहे. पण ही उपमा आणि यांतील शब्दरचना ही विलक्षण आहेत यांत संशय नाहीं.

'त्याला येथें [पुढे येऊन] [तसें] बोलू द्या'='इह ब्रवीतु' अशा प्रकारचाच प्रयोग दुसऱ्या एका ठिकाणीं आला आहे. 'इह ब्रवीत य ईम् अङ्ग वेद अस्य वामस्य निहितं पदं वेः'='आकाशांत चालत असतांना या प्रियकर अग्निरूपी सूर्याचें पाऊल उमटलेलें जो जाणत असेल त्याला येथें पुढे येऊन तसें बोलू द्या,' ऋ. १. १६४ ७.

एकंदरींत हा प्रस्तुतचा मंत्र कठिण आहे. कितीएक शब्द कठिण असून, मंत्रकर्त्याच्या मनांत खरोखर काय कल्पना आहे तें नीट समजत नाहीं, आणि एक उपमा आहे तीहि संदिग्ध आहे. 'उपस्था' ही आम्हीं सायणाप्रमाणें सप्तमी घेतली आहे, तथापि 'उपस्थ' शब्दाची 'उपस्था' ही सप्तमी होईल कीं नाहीं याविषयीं संशय आहे. पण ऋ. १ १२४. ५ यांतहि (तो मंत्र व भाष्य पाहा; त्यांत, 'उभा'=उभौ' शब्दाचा सायणांनीं केलेला निर्वाह

चांगला आहे) 'उपस्था' शब्द आला आहे तेथें सायणाचार्य ती सप्तमीच समजतात. यावरून आणि 'उपस्था' ही प्रथमेची द्विवचनविभक्ति म्हणावी तर ऋग्वेदांत 'उपस्थ' शब्द पुष्कळ ठिकाणीं आला आहे तरी द्विवचनीं कधीं नाहीं, एकवचनींच नित्य येतो यावरून, 'द्वौ उपस्था' म्हणजे 'दोन स्वर्ग सवित्याचे उपस्थ होत' असें न करितां 'द्वे द्यावौ उपस्थे' असें आम्हा सायणानुसरानें केलें आहे तथापि 'तिस्रो द्याव' असें मन्त्रार्भी स्त्रीलिंगी आहे तेव्हां (द्युशब्द उभयलिंगी आहे तथापि) 'द्वे उपस्था' असे असावयाचे होते कारण एकच पादांत उभयलिंगी शब्दाचा झाला तरी उभयलिंगानीं प्रयोग असंभवनीय आहे दुसरें; 'अमृता' शब्दाचा अर्थ सायण देखील निश्चयानें सांगू शकत नाहीत. "चन्द्रतारकादि अमर नक्षत्रें" अथवा 'उदकें' असा अर्थ ते करितात

'यमाच्या भुवनांत' यमदेवतेविषयीं अर्वाचीन ग्रंथांत म्हणजे पुराणादिकांत ज्या कथा आहेत त्यांत आणि वेदांत जें सांगितलें आहे त्यांत बरेंच अंतर आहे अर्वाचीन काळीं यम हा पातकी मनुष्यास मरणानंतर दंड करितो आणि चित्रगुप्तादि त्याचे कारकून मनुष्यांनीं जीं पुण्ये आणि पातकें त्यांचा हिशोब राखतात असे सांगितलें आहे; यम म्हणजे भयंकर काळ, क्रूर, दयाहीन देव आहे अशी बहुत करून आपली समजून आहे. पण वेदांत यमाविषयीं असें सांगितलें आहे कीं, यम आणि यमी हीं बहीणभावंडें 'अध्वर्याचीं' अथवा विवस्वताचीं (म्हणजे आकाशाचीं अथवा सूर्याचीं ऋ १०. १० ४ यावरील सायणभाष्य पाहा) मुलें होत त्यांची आई 'अप्या अथवा 'सरण्यू' (म्हणजे उषा अथवा उषःकाळ) ही होय विवस्वताचा पुत्र म्हणून यमास वैवस्वत असें नांव आहे. त्याला पितरांचा राजा बाप (विश्पति पिता पुराणाम् ऋ १०. १३५ १) असें म्हटलें आहे. जे पुण्यवंत प्राणी मरणानंतर स्वर्गीं जातात त्याला तो तेथें जागा तयार करून ठेवितो असें ऋ. १० १८ १३ यांत दर्शविलें आहे म्हणून जे प्राणी स्वर्गांत जातात त्यांचा राजा यम आहे (ऋ. १० १४ ७) यावरून यम म्हणजे पहिला मरून स्वर्गांत गेलेला मनुष्य असावा असें वाटतें यम याला एका मन्त्रांत मृत्यु असें म्हटलें आहे असें दिसतें ('यस्य दूत प्रहित एष एतत्तस्मै यमाय नमो अस्तु मृत्यवे' ऋ १०. १६५. ४) याशिवाय यम क्रूर आहे अथवा तो पीडा करितो याविषयीं ऋग्वेदांत कांहीं सांगितलेलें आढळत नाहीं मात्र इतकें आढळतें कीं, यमाचे सारमेय म्हणून दोन कुत्रे आहेत त्यांस चार डोळे आहेत आणि त्यांच्या नाकपुड्या विकाळ आहेत. ते मेलेल्या मनुष्यास अडवितात आणि स्वर्गांत जाऊं देत नाहींत; आणि ते यमाचे दूत आहेत आणि मनुष्यामध्यें ते फिरत असतात असें सांगितलें आहे ऋ १० १४ १० यांत प्रेताला (सायणाचार्य म्हणतात प्रेतप्राणाला घेऊन जाणाऱ्या अग्नीला) असें म्हटलें आहे कीं, 'हे प्रेता, यमाचे जे दोन सारमेय (सरमा कुत्रीला झालेले) चित्रविचित्र रंगाचे आणि चार डोळ्यांचे कुत्रे, त्यांस चुकवून तूं चांगल्या मार्गानें जा. आणि यमाबरोबर सुख

वि सुपर्णो अन्तरिक्षाण्यख्यद्गभीरवेपा असुरः सुनीथः ।
क्वे३दानीं सूर्यः कश्चिकेत कतमां द्यां रश्मिरस्या ततान ॥ ७ ॥

वि । सुऽपर्णः । अन्तरिक्षाणि । अख्यत् । गभीरऽवेपाः । असुरः । सुऽनीथः ।
क्व । इदानीम् । सूर्यः । कः । चिकेत । कतमाम् । द्याम् । रश्मिः । अस्य । आ । ततान ॥ ७ ॥

भाषायाम्.

७ गभीरवेपा (=गम्भीर दूरगामि वेप पक्षयो कम्पन पक्षाघातेन कृत नीचै-स्थितवस्तूनां कम्पन यस्य स) सुनीथ (=शोभनप्रापण =मार्गप्रकाशनेन अभीष्टदेश प्रापयन्) असुर सुपर्ण (=देव सवितृरूपी पक्षी) अन्तरिक्षाणि (=अन्तरिक्षप्रदेशान्) व्यख्यत् (=प्रकाशयति) । इदानीं (=रात्रौ=अपररात्रे) [स] सूर्य क्व [वर्तते] ? [एतत्] कश्चिकेत (=को वेद)? [इदानीं] कतमां द्यां तस्य रश्मि (=प्रकाश) आततान (=व्याप्नोति)?

भोगणारे जे आम्हा लोकांचे सुखी वाड-वडील त्यांस जाऊन मीळ' ("अति द्रव सारमेयौ श्वानौ चतुरक्षौ शबलौ साधुना पथा । अथा पितॄन्सुविदत्रॉ उपेहि यमेन ये सधमादं मदन्ति") गरुडपुराणांत यमाविषयीं, यमराज्याविषयीं, यमलोकाच्या रस्त्याविषयीं, त्या रस्त्यावरच्या नद्यांविषयीं आणि अनेक दानें दिलीं तरच त्यापलीकडे जावयास मिळतें याविषयीं वगैरे ज्या भयंकर आणि प्रचंड कथा आहेत, त्यांचा पत्ता ऋग्वेदांत नाहीं इतकेंच नव्हे, पण त्यांचें बीज सुद्धां येथ आढळत नाहीं.

७. ज्याचें चालन गभीर [होय], [आणि] [जो] उत्तम मार्गदर्शक [होय] तो देव सुपर्ण अंतरिक्षप्रदेशाला प्रकाशानें प्रगट करीत आहे या वेळीं [तो] सूर्य कोठें आहे? [आणि तो कोठं आहे तें] कोणास ठाऊक आहे? त्याचा प्रकाश आता कोणत्या द्युलोकावर पसरला आहे [वरें]?

7 The great Divine Bird, the motion [of] whose [wings] is [felt] deep [below] [and] whose guidance is excellent shines upon and makes visible the aerial regions Where is the sun now? Who knows? What heaven is his light enlightening?

७ आपण अशी कल्पना केली पाहिजे का रात्र सपत आली आहे आणि आकाशात नुकाच थोडथोडा उझेड दिसल्यासारिख होत आहे, आणि दिशा फाकत आहेत तेव्हां कवि आकाशाकडेस पाहून म्हणतो का 'सविता देव हाच जो कोणी आकाशातून नडत जाणारा मोठा पक्षी (सुपर्ण) तो अतरिक्षप्रदेशास नुकताच प्रगट करीत आहे म्हणजे अधकारातन बाहेर काढीत आहे त्याचे चालन म्हणजे प्रकाशान सर्व भूतांकडून हलन चलन करविणें हे गभीर आहे=तो दर पृथ्वीच्या खालीं खोल असतानाहि तेथून अथवा उच आकाशात असता तेथून खालीं सर्व प्राण्यास पुनर्जीवित करितो, तो आपल्या प्रकाशानें मानवादिक प्राण्यास मार्ग दाखविणारा होय तर असा जो सूर्य, तो यावेळा कोठे आहे? आाण कोठ आहे त कोणास ठाऊक आहे? वरच्या मत्रांत जे तीन स्वर्ग सांगितले, त्यांतन तो कोणत्या स्वर्गास (द्युलोकास) आपल्या प्रकाशान या वेळीं प्रज्वलित करीत आहे?"

'ज्याचें चालन गभीर'— गभीरवेपा' म्हणजे जो क्षितिजाच्या खालीं असतांहि अथवा आकाशात उच असतांहि त्याचे किरण पृथ्वीवर आणि आकाशात पसरतात आणि सकल प्राण्यादिकांस जसे काय पुनर्जीवित कारतात अक्षरश अर्थ ज्याच कांपण किंवा हालणें खोलपर्यंत जात' हें विशेषण सूर्यरूपी सुपर्णाच म्हणजे पक्ष्याचे आहे जसा मोठा पक्षी उडू लागला म्हणजे त्याच्या पाखांचा वारा आसपास आाण खाली पुष्कळ अतरावर लागतो तसा हा सूर्यरूपी सुपर्ण उडू (=जाऊ) लागला म्हणजे त्याच्या उडण्याचा वारा लागून दूरदूरचे आणि पुष्कळ अतरावरील खालचे वृक्षादिक पदार्थ जणु काय हालत असतात

'सुपर्ण' या ठिकाणीं 'सुपर्ण म्हणजे सूर्यरूपी जो सविता देव तोच होय त्याला 'सुपर्ण' म्हणजे चांगला उड-

अ॒ष्टौ व्य॑ख्यत्क॒कुभः॑ पृथि॒व्यास्त्री धन्व॒ योज॑ना स॒प्त सिन्धू॑न् ।
हि॒र॒ण्या॒क्षः स॑वि॒ता दे॒व आगा॒द्दध॒द्रत्ना॑ दा॒शुषे॒ वार्या॑णि ॥ ८ ॥

अ॒ष्टौ । वि । अ॒ख्य॒त् । क॒कुभः॑ । पृ॒थि॒व्याः । त्री । धन्व॑ । योज॑ना ।
स॒प्त । सिन्धू॑न् ।
हिर॑ण्यऽअक्षः । स॒वि॒ता । दे॒वः । आ । अ॒गा॒त् । दध॑त् । रत्ना॑ । दा॒शुषे॑ ।
वार्या॑णि ॥ ८ ॥

भाषायाम्.

८ [पश्य पश्य] हिरण्याक्ष (=हिरण्मयाक्षो) देव सविता पृथिव्या अष्टौ ककुभ (=दिशो) व्यख्यत् (=प्रकाशितवान्=प्रकाशेन=दृष्टिगोचरा करोति), [पश्य पश्य] त्रीणि योजनानि (=आ त्रियोजनेभ्यो) धन्वानि (=भूमिप्रदेशान्) सप्त सिन्धून् (=मेघोदकोपलक्षितान् अन्तरिक्षप्रदेशान) [च], दाशुषे (=हविर्दत्तवते=उपासकाय) वार्याणि (=वरणीयानि=उत्तमानि) रत्नानि (=धनानि) दधत् (=धारयित्वा आनयन्), [व्यख्यत्] ॥

णारा पक्षी' असें म्हणण्याचे कारण असें की, तो आकाशांतून जणु काय पूर्वेकडून पश्चिमेकडे पक्ष्याप्रमाणें दररोज पुष्कळ उडतच जातो सूर्याला दिव्य सुपर्ण' म्हणजे 'सुरेखांतून फिरणारा पक्षी' असे ऋग्वेदांतील कित्येक मंत्रांत म्हटलें आहे, (ऋ १ १६४ ४६ "इन्द्रं मित्रं वरुणम् अग्निम् आहु अथो दिव्य स सुपर्णो गरुत्मान्") तसाच त्याला केव्हां केव्हां 'अरुण' वर्णाचा म्हणजे 'आरक्त वर्णाचा पक्षी' असे वेदांत म्हटलें आहे (ऋ ५ ४७ ३ "उक्षा समुद्रो अरुषः सुपर्णः पूर्वस्य योनिं पितुरा विवेश । मध्ये दिवो निहित" इ०) आणि त्याला अरुण' (म्हणजेहि 'आरक्तवर्णाचा पक्षी') असे नांव आहे आकाशांतून पक्ष्याप्रमाणे फिरतो म्हणून सूर्यास जसे 'सुपर्ण' म्हणतात तसेच चंद्रहि तसाच फिरतो म्हणून त्यालाहि वेदांत 'सुपर्ण' असे पुष्कळ ठिकाणी म्हटलेलें आढळतें. जसें "चन्द्रमा अप्स्व अन्तरा सुपर्णो धावते दिवि" (ऋ १ १०५ १) "सु पक्षी चंद्रमा आकाशांत धावतो " ऋ १ १६४ २० हाहि मंत्र पाहा

'देव'='असुर' 'असुर' शब्दाचा अर्थ 'देव' असा कसा होतो त्याविषयी सूक्त २८ मंत्र १४ यावरील टीप पाहा

८. तो पृथ्वीच्या आठ दिशा प्रकाशित करीत आहे [पाहा], [आणि] तीन योजने[पर्यंत] भूमि [आणि] अंतरिक्ष यांस प्रकाशित करीत आहे [पाहा]; हिरण्याक्ष सविता देव हविर्दात्यासाठीं उत्तम धनें घेऊन येत आहे [पाहा].

8. [Lo] he shines upon and makes visible the eight quarters of the globe, [and] [makes visible] the dry land and the firmament for three leagues; [lo !] the golden-eyed God Savitâ comes, bringing choice wealth for the worshipper.

---

८. नुकाच अरुणोदय होऊन दिशा फाकत आहेत, आणि पूर्वेकडील थोडासा भूमिभाग व थोडासा अंतरिक्षभाग उजळत चालला आहे असे पाहून सूर्यरूपी सोन्याच्या डोळ्यांचा देव येत आहे आणि येतांना आपणाबरोबर उउपासकाकरितां उत्तम उत्तम संपत्ति आणींत आहे अशी सप्रेम स्वभावोक्ति या मंत्रांत केली आहे.

'तीन योजनें [पर्यंत]'='त्री योजना.' 'योजन' शब्दाचा मूळ अर्थ '[घोड्यांची] जोडी' त्यापासून गाडीस घोड्यांची एक जोडी जोडून (युज् धातूचा अर्थ 'जोडणं', 'जुपणं' असा होतो) जितके अंतर जाववेल तितके अंतर त्यापासून चार कोस असा पुढे अर्थ होऊ लागला. प्रस्तुत मंत्रांत 'योजन' म्हणजे अशा प्रकारचेंच एक लहानसें माप घेतलें पाहिजे अजून तरी 'बांवेइतका' किंवा 'वीतभर' सूर्य उगवला होता तेव्हां मी अमुक काम केलें असें म्हणण्याची चाल गुजराथेंत आणि महाराष्ट्रांत आहे 'त्री धन्व योजना' या शब्दाचा अर्थ सायणाचार्य "प्राण्यांकडून आपआपल्या भोग्य वस्तूंचा उपभोग घेवविणारे जे पृथिवी, अंतरिक्ष, आणि द्यु असे तीन लोक त्यांस" असा करितात. पण 'योजन' शब्द वेदांत अन्य ठिकाणीं आला आहे तेथें कोणत्याच स्थळीं 'आपल्या उपभोग्य वस्तूंचा उपभोग घेवविणारा' असा तो अर्थ करीत नाहींत.

'अंतरिक्ष'='सप्त सिन्धून्.' शब्दशः अर्थ 'सात सिंधु' असा आहे सिंधु याचा अर्थ प्रथम नदी असा होता. नंतर सिंधु म्हणून जी मोठी नदी तिचें नांव हा दुसरा अर्थ. (हा अर्थ ऋ. ५. ५३ ९; १० ६४ ९; आणि ३. ३३. ३ या स्थळीं विवक्षित दिसतो). नंतर सिंधु आणि (तिच्या आसपासच्या) दुसऱ्या नद्या मिळून सात नद्या यांस 'सप्त सिंधु' (=सात नद्या) असें पुष्कळ ठिकाणीं आलेलें आढळतें. या 'सात नद्या' म्हणजे कोण कोण त्याविषयीं निश्चयानें सांगवत नाहीं सायणाचार्य गङ्गा, यमुना 'सरस्वती' शुतुद्री परूष्णी, असिक्री आणि वितस्ता ह्या (ऋ १०. ७५ ५ यांत लिहिलेल्या) सात नद्या असें म्हणतात; तें म्हणणं मान्य केलें तर सिन्धु आणि शुतुद्री या एकच असें ३. ३३. ३ यावरून दिसून येईल. पण ह्याच त्या सात नद्या

हिरण्यपाणिः सविता विचर्षणिरुभे द्यावापृथिवी अन्तरीयते ।
अपामीवां बाधते वेति सूर्यमभि कृष्णेन रजसा द्यामृणोति
॥ ९ ॥

हिरण्यऽपाणिः । सविता । विऽचर्षणिः । उभे इति । द्यावापृथिवी इति ।
अन्तः । ईयते ।
अप । अमीवाम् । बाधते । वेति । सूर्यम् । अभि । कृष्णेन । रजसा ।
द्याम् । ऋणोति ॥ ९ ॥

भाषायाम्.

९. हिरण्यपाणिः (=सुवर्णमयहस्तो) विचर्षणिः (=विशेषेण द्रष्टा=विश्वस्य भुवनस्य द्रष्टा) सविता उभे द्यावापृथिवी अन्तः (=उभयोर्द्यावापृथिव्योर्मध्ये) ईयते (=गच्छति); [सः] अमीवां (=रोगम्) अपबाधते (=निराकरोति), [सः] सूर्यं वेति (=गमयति), द्यां (=द्युलोकं) [च] कृष्णेन रजसा (=अन्धकारमयेन अन्तरिक्षमार्गेण) अभि ऋणोति (=अभिगच्छति=अभिधावति) ॥

असाव्या असे म्हणण्यास कारण हे की, वैदिक युगांत आर्यजन यमुने गङ्गे पर्यंत आले नव्हतेच. कोणत्याहि सात नद्या असल्या तरी 'सात नद्या' (=सप्त सिन्धु) असे प्रसिद्ध नदीसप्तकाविषयी ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणी आलें आहे जसे —"यः ऋक्षान् अंहसः मुचत यः वा आर्यान् सप्त सिन्धुषु"='जो इंद्र सात सिंधूंच्या तीरी म्हणजे सप्त सिंधु प्रदेशांत राहणाऱ्या उपासकांस राक्षसांनी (=अनार्यांनी) अथवा आर्यांनी केलेल्या उपद्रवापासून रक्षितो' (ऋ ८. २४. २७), 'त्वम् इन्द्र इमे प्रवतो सप्त सिन्धवः यत्र सर्पन्ति'='त्याच इन्द्राच्या अनुरोधाने ह्या सात नद्या धान्य पिकवितात.' (ऋ. १० ४३. ३) शिवाय ऋ. ९ ६६. ६, आणि ८. ९६. १ हेहि मंत्र पाहा. 'प्रसिद्ध सात नद्या' या अर्थावरून त्या प्रसिद्ध सात नद्यांतील पाणी ज्यांपासून येतें तो 'मेघोदकें' असा मागाहून अर्थ होऊं लागला, आणि तो मेघोदकें कोट्यावधि किंबहुना असंख्य कोट्यावधि धारांनी जरी जमिनीवर पडतात आणि तो सर्वच 'प्रसिद्ध सात नद्यांत' न पडतो आणि जमिनीवर पडतो तथापि त्या मेघोदकांस 'सप्तसिन्धु' असें नांव पडलें. मेघोदकांस 'सप्त सिन्धु' असें ज्यांत म्हटलें आहे तसे अनेक मंत्र वेदांत आहेत. उदाहरणार्थ,— "यः हत्वा अहिम् अरिणात् सप्तसिन्धून्" ='जो इन्द्र वृत्ररूप सर्पास मारून सप्त सिन्धूंस म्हणजे मेघोदकांस वाहवितात्रा झाला.' (ऋ. २. १२. ३; ४. २८. १; १०. ६७. १२.) "य सुविष्मान्

९. हिरण्यपाणि [आणि] सर्वदर्शी सविता द्यु[लोक] [आणि] पृथ्वी [या] उभयतामधून चालतो; [तो] रोगाला नाहींसा करितो, [आणि] सूर्याला चालवितो [आणि] अंधकारमय अंतरिक्षमार्गानें द्यु[लोका]कडे गमन करितो.

9. The golden-handed [and] far-seeing Savitâ travels between both heaven [and] earth; [he] chases away disease, [he] makes the sun to go, [he] ascends the heaven through the dark [regions of] space.

अवासृजत् सर्तवे सप्त सिन्धून्'='जो बुद्धिमान् इन्द्र सप्त सिन्धूंस म्हणजे मेघोदकांस, वाहण्यासाठीं, खालीं ओतिता झाला' (ऋ. २. १२. १२.) इत्यादि प्रयोग आहेत. यावरून ज्या प्रदेशांत मेघोदकें असतात त्या प्रदेशास म्हणजे अंतरिक्षास जसें 'आप' (=उदकें) आणि 'समुद्र' (म्हणजे सागर) हें नांव आहे (ऋ. १. ५५. ३; १. १०५ १; ८ १२. २; १. ४७ ६) तसेंच 'सप्त सिन्धु' हें नांव प्रस्तुत मन्त्रांत अंतरिक्षास दिलें आहे, आणि यांत विशेष नवल वाटण्यासारिखें नाहीं. कारण कीं जसें पांच नद्या ज्यांत वाहतात त्या भूमिप्रदेशास 'पंजाब' हें नांव आहे, तसेंच अंतरिक्षप्रदेशांत 'सप्त सिन्धु' म्हणजे मेघोदकें अभ्ररूपानें असतात म्हणून त्या अंतरिक्षप्रदेशालाहि 'सप्त सिन्धु' हें नांव पडलें.

'हिरण्याक्ष' सवित्या देवाचें म्हणजे सूर्याचें सर्वच सुवर्णमय आहे म्हणून या सूक्ताच्या आरंभीं सांगितलेंच आहे. प्रभातकालीं क्षितिजाच्या कांठावर सूर्यबिंबाचा उदय होत असतांना ज्यांनीं कविदृष्टीनें त्याजकडेस कधीं तरीहि पाहिलें असेल त्यास या विशेषणाविषयीं कांहीं सांगावयास नको.

---

९. 'सोन्याच्या हाताचा आणि विश्वदर्शी सविता द्युलोक आणि भूलोक या दोहोंच्या मधून मार्गक्रमण करितो; आणि तो जसजसा चालतो तसतसा रोगाचा नाश करीत करीत जातो. तो सूर्याला (म्हणजे आम्हांस तेजःपुंज जो सूर्यगोल दिसतो त्याला) चालवितो. आणि तो येण्यापूर्वी ज्या अंतरिक्षप्रदेशांत अंधकार भरलेला असतो त्या प्रदेशांतील मार्गानें चालत चालत द्युलोकाकडेस जातो' असा कवीचा अभिप्राय आहे. या मंत्रांत केवळ स्वभावोक्तीचें वर्णन आहे. त्यांत विशेष इतकें आहे कीं, सविता आणि सूर्य हे निराळे मानिले आहेत. त्याचा हेतु असा कीं, सूर्य आणि सविता हे जरी वस्तुतः एकच आहेत तथापि सविता म्हणजे सूर्यावरची देवता आणि सूर्य म्हणजे जो आमच्या दृष्टीस पडतो तो तेजःपुंज गोळ असा भेद केव्हां केव्हां वेदांत दृष्टीस पडतो. बहुतकरून हा भेद राखिलेला नाहीं, तथापि क्वचित् आढळतो खरा. उदाहरणार्थ—ऋ. १. १२३. ३ यांत 'कुदक्षिर्गाचन्द सविता

हिरण्यहस्तो असुरः सुनीथः सुमृळीकः स्ववाँ यात्वर्वाङ् ।
अपसेधन्रक्षसो यातुधानानस्थाद्देवः प्रतिदोषं गृणानः ॥ १० ॥

हिरण्यऽहस्तः । असुरः । सुऽनीथः । सुऽमृळीकः । स्वऽवान् । यातु । अर्वाङ् ।
अपऽसेधन् । रक्षसः । यातुऽधानान् । अस्थात् । देवः । प्रतिऽदोषम् । गृणानः ॥ १० ॥

भाषायाम्.

१०. हिरण्यहस्त (=सुवर्णमयहस्तः) सुनीथ (=सुष्ठु नेता=सुप्रापण॰) सुमृळीक (=सुष्ठु सुखयिता) स्ववान् (=धनवान्, स्ववा=शोभनरक्षणोपेतो वा) असुरो (=देव) [सविता] अर्वाङ् यातु (=आयातु) । प्रतिदोषं (=प्रतिरात्रि) गृणान. (=गीर्यमाण॰=गीर्ण॰=स्तुतो) देव. [सविता] रक्षसः (=अहितकारिणो) यातुधानान् (=असुरान्=राक्षसान्) अपसेधन् (=निराकुर्वन्) अस्थात् (=तिष्ठनि=आस्ते) ॥

देव हा आम्हीं सूर्याविषयीं पातक केलेलें नाहीं असें म्हणो' ('देवः न अत्र सविता दृशूनाः अनागस॰ वोचति सूर्याय'') असें सांगितलें आहे; ऋ ५. ८१. ४ यांत सविता देव सूर्याच्या किरणांत जाऊन मिळतो ("उत सूर्यस्य रश्मिभिः समुच्यसि") असें सांगितलें आहे; ऋ १०. १३९. १ यांत सवित्यास 'सूर्यरश्मि' असें विशेषण दिलें आहे. हा व दुसरीं सूर्य आणि सविता यांच्या भिन्नत्वाविषयीं उदाहरणें झालीं. आतां दोघांच्या एकत्वाविषयीं तर पारच आहेत. ऋ ४. १४ २, १०. १५८ १ इत्यादि मंत्र पाहा. प्रस्तुत मंत्रांत सायणाचार्य म्हणतात कीं, "जरी सविता आणि सूर्य दोघेच आहेत तरी मूर्तिभेदामुळें (म्हणजे रूपान्तरदा- मुळे) सूर्याला सविता" चालविती असें म्हटलें आहे.

'सर्वदर्शी'='विचर्षणि..' हा अर्थ आम्हीं सायणास अनुसरून केला आहे, आणि ऋग्वेदांत हा शब्द पुष्कळ स्थळीं आला आहे तीं सर्व स्थळें तपासून पाहतां आणि 'चर्षणि'.'विश्वचर्षणि' इत्यादि शब्दांचे प्रयोग वेदांत आले आहेत ते सर्व तपासून पाहतां आचार्यांचा अर्थ योग्य दिसतो. जे विद्वान् 'विचर्षणि' याचा अर्थ 'चपल' असा करितात त्यास कांहींच योग्य आधार नाहीं असें आम्हांस वाटतें. 'विचर्षणि' हें विशेषण अग्नीस, इंद्रास, सोमास, इंद्राग्नींस व सवित्यास वगैरे देवतांस लाविलेलें आढळतें; त्याचा अर्थ 'वि-

१०. हिरण्यहस्त, मार्ग दर्शविणारा, सुख देणारा, [आणि] धनवान् [सविता] देव इकडे येओ. ज्याचे प्रतिरात्रीं [मनुष्यें] स्तवन करितात तो [सविता] देव उपद्रवकारक राक्षसास हाकून देत राहतो.

10. May the golden-handed spirit [Savitâ], the excellent guide, the giver of happiness [and] possessed of riches, come hither-ward; [that] god praised every night [by men] drives off the harmful sorcerers

---

शेषेंकरून पाहणारा,' 'विश्वदर्शी' अथवा 'प्रज्ञावान्' असा होत असतो

'सूर्याला चालवितो'='वेति सूर्यम्' सायणाचार्य 'सूर्यप्रत जातो' असा अर्थ करितात. आम्हीं केलेल्या अर्थास ऋ. ६ १२. ६, ३ ८ ७ हे मन्त्र आणि त्यांजवरील सायणभाष्य यांचा, आधार आहे. शिवाय ऋ. ७ १९ ६ हाहि मन्त्र पाहा. ऋ. ७. २७ ५, आणि १ १२७ ५. हे मन्त्र पाहू गेले असता 'वेति सूर्यम्' म्हणजे 'सूर्याला घेऊन येतो' असाहि अर्थ चांगला संभवतो

'अंधकारमय आरिक्ष मार्गानें'='कृष्णेन रजसा ' याच सूक्ताचा मन्त्र २ याजवरील टीप पाहा

---

१० 'सूर्य मावळल्यावर अंधकारांत सर्व जग बुडून जातें आणि आम्ही निराधार मनुष्यें सवित्या देवाची रात्रीच्या वेळीं प्रार्थना करीत असतो की, हे सवित्या, तू गेला आहेस आणि हा सर्वव्यापी अंधकार जिकडे तिकडे पडल्यामुळे जादूकार, राक्षस, निशाचर वगैरे आम्हांस त्रास देतील, तर हे देवा सवित्या, यांस तू हाकून लाव तर अशी प्रतिरात्रीं आम्ही सवित्याची प्रार्थना करितों तेव्हां जो त्या सर्वांस हाकून लावितो असा सविता आतां उगवो आणि इकडे येओ' असा कवींचा भावार्थ

'धनवान्'=रत्नवान्' हा अर्थ आम्हीं सायणाचार्यांस अनुसरून केला आहे. आणि ते जो हा अर्थ करितात तो 'रत्नऽवान्' असा पदांत पाठ आहे त्यावरून करितात यांत संशय नाहीं. परंतु 'स्ववान्' हा शब्द ज्या ज्या मन्त्रांत आला आहे ते सगळे मंत्र वाचून पाहतां कितीएक मन्त्रांत 'धनवान्' हा सायणाचार्यांनीं केलेला अर्थ जरी चालेल, तथापि 'सु+अवस्'='स्ववास् ='स्ववान्' अशी व्युत्पत्ति करून 'सुरक्षणकारक' असा अर्थ बऱ्याच मन्त्रांत इष्ट दिसतो 'स्ववसम्', 'स्ववसा' आणि 'स्ववस ' हीं रूपें जेथें आलीं आहेत (ऋ. ५ ६०, १, ५. ८. २, १०. ३६ २, १. ९३ १, ४ ३३ ८, ६. ५१. ११.) तेथें पदपाठांत 'सुऽअवसम्,' 'सुऽअवसा' आणि 'सुऽअवसः' असा छेद असल्यामुळे, त्या बहुत करून सर्व स्थळीं सायणाचार्य 'सुरक्षणकारक' असा अर्थ करितातच. तेव्हां 'स्ववान्' हें 'स्ववास्' याबद्दल आर्ष

ये ते पन्थाः सवितः पूर्व्यासोऽरेणवः सुकृता अन्तरिक्षे ।
तेभिर्नो अद्य पथिभिः सुगेभी रक्षा च नो अधि च ब्रूहि
देव ॥ ११ ॥ ७ ॥ ७ ॥

ये । ते । पन्थाः । सवितरिति । पूर्व्यासः । अरेणवः । सुऽकृताः ।
अन्तरिक्षे ।
तेभिः । नः । अद्य । पथिऽभिः । सुऽगेभिः । रक्ष । च । नः । अधि ।
च । ब्रूहि । देव ॥ ११ ॥ ७ ॥ ७ ॥

भाषायाम्.

११. हे सवितः, ये तव पूर्व्याः (=पूर्वसिद्धा) अरेणवो (=धूलिरहिता) सुकृता. (=सुष्ठु कृता:=सुसंपादिताः) पन्थानः अन्तरिक्षे [सन्ति], तैः सुगै (=सुष्ठु गन्तु शक्यैः) पथिभि. [आगत्य] अद्य न. (=अस्मान्) रक्ष च नश्च (=अस्मांश्च) अधिब्रूहि (=साधु साधु भूय स्तुयेति कथय) ॥

रूप मानून 'सुरक्षणोपेत' असा अर्थ चांगला समवतो व प्रसंगवशात् तसा आम्हांस पुढे करावा लागेल.

'उपद्रवकारक राक्षसांस'='रक्षसः यातुधानान्'. हा अर्थ सायणाचार्यांस अनुसरून केला आहे. या स्थळी 'रक्षस.' हे 'यातुधानान्' याचें अथवा 'यातुधानान्' हें 'रक्षस.' याचें विशेषण आहे असें दिसतें. (ऋ. १०. ८७. २५ "यातुधानस्य रक्षसो बल विरुज वीर्यम्" हा मंत्र पाहा). 'यातुधान' याचा अर्थ 'इंद्रजाल अथवा गारुड करणारा', 'जादु करणारा' आमचा 'जादु' हा शब्द 'यातु' शब्दापासून निघाला आहे, आणि वेदांत तरी 'यातु' शब्दाचा अर्थ तोच होतो. यावरून जादु करणाऱ्या लोकांस आमचे पूर्वज आर्य लोक 'निशाचर,' 'राक्षस,' 'असुर' म्हणत असें दिसतें. 'जादु' शब्द किती जुना आहे पाहा !

११. हे सवित्या, तुझे जे धूलिरहित, [आणि] चांगले बांधलेले पुरातनचे मार्ग अंतरिक्षांत [आहेत] त्या सुगम मार्गांनीं [येऊन] आज आमचें रक्षण कर, आणि हे [सवित्या] देवा, आम्हांस आश्वासन दे.

11. By those thy ancient paths, Savitâ, which [are] dustless [and] well-made in the firmament—by those easy paths [come and] protect us to-day and, O god [Savitâ], commend us.

---

११. सगळ्या सूक्ताचा उपसंहार या मन्त्रांत आहे. सवित्याविषयीं परोक्षत्वानें (म्हणजे तृतीयपुरुषीं) स्तुति आणि वर्णन करून आतां शेवटीं सवित्यास अपरोक्षत्वानें (म्हणजे द्वितीयपुरुषीं) म्हणतो, 'हे सवित्या, या अंतरिक्षांत ज्या पुरातनच्या सुगम, सपाट, धूलिरहित मार्गांनें तूं येत असतोस त्या मार्गांनें तूं आज ये आणि आमचें रक्षण कर, आणि, आम्हो हे प्रिय उपासकांनो भिऊं नका, तुमचें स्तवन ऐकून मी फार संतुष्ट झालों असें म्हणून आम्हांस आश्वासन दे'.

प्रभातकाळीं उठून भाविक मनानें सवित्यासारिख्या प्रसिद्ध आणि प्रत्यक्ष देवाची स्तुति करावयाची असली तर ह्या सूक्ताचा मासला उत्तम आहे. त्यांत किती प्रसाद आहे पाहा, प्रासयमकादि खोटे अलंकार नाहींत तरी त्यांतील स्वभावोक्तिच किती सुंदर आहे पाहा, आणि अतिशयोक्तीच्या अनन्वित कल्पना आंत नाहींत तरी ह्या स्तुतीचा व तिच्या साधेपणाच्या सौंदर्याचा ठसा मनावर कसा उमटतो पाहा! अर्वाचीन काळच्या म्हणजे पुराणादिक ग्रंथ रचणाऱ्या एकाद्या कृतक कवीस सूर्यावर स्तोत्र करावयास सांगा, म्हणजे बहुतकरून असा आरंभ करील : 'हे राजपुताच्या आज्यापणज्या, ब्रह्माण्डजनक कर्मकाण्डतत्पर ब्राह्मणांनीं अर्घ्य दिल्यावर उगवणाऱ्या, प्रचण्डब्रह्माण्डीं ताण्डव करणाऱ्या, दण्डायमान भूतलाच्या वरून मण्डपाकार आकाशांत ब्रह्मशापाबरोबर खण्डित होऊन महापण्डितानें जिंकलेल्या मनुष्याप्रमाणे निष्प्रभचन्द्रमण्डित आकाशांत तटस्थ राहणाऱ्या सूर्या'!

'धूलिरहित'='अरेणव' रस्ता चांगला असें वर्णन करावयाचें असलें म्हणजे त्याजवर 'धूळ नाहीं' असें म्हणणे अथवा तो 'चांगला बांधलेला' आणि त्याजवरून चालावयास' श्रम

सूक्तम् ३६

घोरपुत्रः कण्व ऋषिः । अग्निर्देवता । १३,१४ इत्येते यूपदेवताके भवत इति सम्प्रदायः । अयुजा बृहती च्छन्दः । युज सतोबृहत्यः ॥

प्र वो यह्वं पुरूणां विशां देवयतीनाम् ।
अग्निं सूक्तेभिर्वचोभिरीमहे यं सीमिदन्य ईळते ॥ १ ॥

प्र । वः । यह्वम् । पुरूणाम् । विशाम् । देवऽयतीनाम् ।
अग्निम् । सुऽउक्तेभिः । वचःऽभिः । ईमहे । यम् । सीम् । इत् । अन्ये ।
ईळते ॥ १ ॥

भाषायाम्.

१. हे विश. (=प्रजा), पुरूणां (=बहूनां) देवयतीनां (=देवान्सेवितुमिच्छन्तीनां) व (=युष्माक) यह्वं (=महान्तम्) अग्निं सूक्तैः (=सुष्ठु गीतैः) वचोभि (=स्तोत्रैः) ईमहे (=प्रयाचामहे=प्रार्थयामहे)—यम् अन्ये [ऋषयः] ईळते (=स्तुवन्ति) सीमित् (=तमेव) [अग्निं ईमहे] ॥

होत नाही ('सुगम') असें म्हणणे हे स्वाभाविक आहे

'पुरातनचे' सविस्याच्या आकाशमार्गास हे विशेषण कसें शोभते तें सांगावयास नकोच.

'आम्हांस आश्वासन दे'='न अधि ब्रूहि.' सायणाचार्य "आमची शिफारस देवांकडेस कर" असा अर्थ करितात. आम्ही केलेल्या अर्थास आधार ऋ. १० १५ ५ (ते आगमन्तु ते इह श्रुवन्तु अधिब्रुवन्तु ते अवन्तु अस्मान्) हा मंत्र आणि त्याजवरील सायणाचार्यांचे भाष्य व इतर कितीएक मंत्र यांचा आहे.

सूक्त ३६.

ऋषि—घोर या नावाच्या मनुष्याचा पुत्र कण्व म्हणून कोणी एक. देवता—अग्नि; पण १३ आणि १४ यांची देवता यूप असे मानितात. (तथापि पुढें १३ व्या ऋचेवरील आमची टीप पाहा). वृत्त—विषम ऋचा आहेत त्यांचें बृहती, आणि ज्या सम आहेत त्यांचे वृत्त सतोबृहती.

१. देवाची सेवा करूं इच्छिणाऱ्या तुम्हा अनेक जनांचा [कैवारी] [असा जो] मोठा अग्नि त्याची [आपण] सुंदर स्तोत्रांनीं प्रार्थना करूं—ज्याला दुसरे [ऋषि] स्तवितात, त्याचीच [आपण प्रार्थना करूं].

Hymn 36.

To *Agni*, but 13 and 14 are conventionally but wrongly regarded as addressed to the *Yúpa* (i e, the post or stake to which the victim is tied before being sacrificed). By *Kanva* the son of *Ghora.* Metre—the *Brihati*, of those couplets that are unequal, and the *Satobrihati* of those that are of equal parts.

1 Let us pray to great Agni, [the helper] of you many people desirous of serving the gods, with sweet hymns—the very same [Agni] whom others praise.

---

१ या छत्तिसाव्या सूक्तापासून त्रेचाळिसाव्या सूक्तापर्यंत आठ सूक्तांचा कर्ता घोर या नावाच्या मनुष्याचा पुत्र कोणी एक कण्व म्हणून ऋषि होता तो होय

'हे भाविक जन हो, तुम्ही भाविक जनांतून अनेकांचा (म्हणजे तुम्हास साहाय्य करणारा) जो मोठा अग्नि, आणि दुसरे ऋषि ज्या अग्नीची प्रार्थना करितात त्याच अग्नीची आपण प्रार्थना करूया' असा या पहिल्या मंत्राचा भावार्थ आहे. अशी कल्पना करणे आधार आहे की मंत्रकर्ता अग्निनिमित्त पुष्कळ भाविक जनांच्या गोष्टी एकून त्यास अनुलक्षून बोलत आहे. आणि म्हणतो आहे की, तुम्हास अग्नि रक्षितो असें मी ऐकितो, तर त्याच अग्नि आणि इतर ऋषि ज्या अग्नीची स्तुति करितात त्याच अग्नीची मी आता प्रार्थना करितो.

या ऋचेचे वृत्त बृहती; हिच्या तिसऱ्या पादांत आठ अक्षरे असावयाची त्याबद्दल बारा आहेत म्हणून ही विषम होय, आणि ज्या विषम आहेत त्यांचे वृत्त बृहती म्हणून वर लिहिलेंच आहे.

जनासो अग्निं दधिरे सहोवृधं हविष्मन्तो विधेम ते ।
स त्वं नो अद्य सुमना इहाविता भवा वाजेषु सन्त्य ॥ २ ॥
जनासः । अग्निम् । दधिरे । सहःऽवृधम् । हविष्मन्तः । विधेम । ते ।
सः । त्वम् । नः । अद्य । सुऽमनाः । इह । अविता । भव । वाजेषु ।
सन्त्य ॥ २ ॥

भाषायाम्.

२ हे अग्ने, सहोवृध (=सहसा मथनरूपेण बलेन वर्धमान) त्वां [वयं] हविष्मन्त (=हविर्युक्ता सन्तो) विधेम (=परिचरेम) [इति हेतो] त्वां जनाः (=अनुष्ठातारो जना) दधिरे (=विदधिरे=समिन्धितवन्त)। स त्वं, हे वाजेषु सन्त्य (=संग्रामेषु धनस्य प्रापयित), अद्य इह (=अत्र स्थले) नः (=अस्माकं) सुमना (=शोभनमनस्क) अविता (=रक्षिता) भव ॥

२. हे अग्नी, बळापासून वाढणारा [असा जो तू त्या] तुला आम्हीं हवि देऊन भजावें [म्हणून] तुला [या] लोकांनीं सिद्ध केला आहे तर हे संग्रामांत धन मिळवून देणाऱ्या [अग्नी], तू आज येथें आमचा सौमनस्ययुक्त सरक्षिता हो.

2 Agni, the people have kindled thee that growest out of strength, that we with libations [in our hands] may propitiate thee Do thou, therefore, [Agni], giver [of booties] in battles, become here our benevolent protector today

---

२ हा मंत्र समजण्यास अशी कल्पना केली पाहिजे असें आम्हांस वाटतें का, कित्येक उपासक लोक अग्नीस पेटवून तयार राहिले आहेत, आणि कवीस (ऋषीस) सूक्त रचावयास सांगत आहेत, ते पाहून ऋषि म्हणतो कीं, 'हे अग्नी, आम्हा तुला हवि अर्पण करावें म्हणून या उपासकजनांनीं तुला पेटवून तयार केला आहे, आणि आम्हीं तुला हवि अर्पण करीत आहों यास्तव हे अग्नी, हे युद्धांत लूट मिळवून देणाऱ्या अग्नी, तू या यज्ञस्थळीं आम्हांवर आज प्रसन्न हो आणि आमचा सरक्षिता हो'

'हे अग्नी,' इ० या मंत्राच्या शैलीविषयां असें ध्यानांत ठेवावें कीं प्रथम पादांत अग्नीविषयीं तृतीयपुरुषी सांगून द्वितीय पादांत आणि तृतीय आणि चतुर्थ पादांत द्वितीयपुरुषीं बोलतो आहे त्यामुळें पहिल्या आणि दुसऱ्या पादाचें अक्षरशः भाषांतर केलें तर जन बळापासून वाढणाऱ्या अग्नीस पेटविते झाले आहेत, तर आम्ही हवि देऊन [हे अग्नी], तुझी परिचर्या करावी' असें होईल

'बळापासून वाढणारा'='सहोवृधम्' (ऋ ३ १० ९ 'तं त्वा विप्रा विपन्यवो जागृवांसः समिन्धते । हव्यवाहम् अमर्त्यं सहोवृधम्'' हा मंत्र आणि त्याजवरील सायणभाष्य पाहा) हातानें जोर करून मथनानें अग्नीस उत्पन्न करीत म्हणून, त्यास 'सहसो यहु,' 'सहसो नपात्' 'सहस पुत्र,' 'सहस सूनु', 'सहसो युवा,' ऊर्जो नपात्' 'ऊर्जः पुत्र' असें वेदांत अनेक ठिकाणी म्हटलें आहे, त्या सर्वांचा अर्थ बळाचा पुत्र' असा आहे त्याच अनुरोधानें त्याला 'बळापासून वाढणारा' असें या मंत्रांत म्हटलें आहे प्रस्तुत मंत्रांत सहोवृध्' म्हणजे बळातें वाढविणारा असा सायणाचार्य अर्थ करितात, पण ऋ ३ १० ९ याजवरील त्यांचेंच भाष्य पाहा

'संग्रामांत धन मिळवून देणाऱ्या' ='वाजेषु सानस्य' 'सानस्य' हें पद वेदांत बरेंच ठिकाणीं येतें, पण तें सर्वत्र संबोधन आणि अग्नीविषयी आहे. त्याचा 'दाता अथवा देणारा' असा अर्थ आम्हीं सायणांस अनुसरून केला आहे कित्येक विद्वान् सायणांप्रमाणं

प्र त्वां दूतं वृणीमहे होतारं विश्ववेदसम् ।
महस्ते सतो वि चरन्त्यर्चयो दिवि स्पृशन्ति भानवः ॥ ३ ॥
प्र । त्वा । दूतम् । वृणीमहे । होतारम् । विश्वऽवेदसम् ।
महः । ते । सतः । वि । चरन्ति । अर्चयः । दिवि । स्पृशन्ति ।
भानवः ॥ ३ ॥

देवासस्त्वा वरुणो मित्रो अर्यमा सं दूतं प्रत्नमिन्धते ।
विश्वं सो अग्ने जयति त्वया धनं यस्ते ददाश मर्त्यः ॥ ४ ॥
देवासः । त्वा । वरुणः । मित्रः । अर्यमा । सम् । दूतम् । प्रत्नम् । इन्धते ।
विश्वम् । सः । अग्ने । जयति । त्वया । धनम् । यः । ते । ददाश
मर्त्यः ॥ ४ ॥

भाषायाम्.

३. [हे अग्ने], विश्ववेदसं (=सर्वज्ञं) होतारम (=आह्वातारं) त्वां [वयं] दूतं प्रवृणीमहे (=अस्माभिर्देवानामर्थे अर्प्यमाणस्य हविषो वहनाय दूतं कुर्महे) । त्वं [हि] महान् असि, तव अर्चयो (=दीप्तयो) विचरन्ति (=विविधासु दिक्षु प्रचरन्ति) [तव] भानवः (=किरणाश्) [च] दिवि (=द्युलोके) स्पृशन्ति (=तिष्ठन्ति) ॥

४. [हे अग्ने], प्रत्न (=पुरातन) दूतं त्वां वरुणः, मित्रः, अर्यमा [इत्येते] देवाः समिन्धते (=सम्यग् दीपयन्ति) । हे अग्ने, यो मर्त्य ते (=तुभ्य) ददाश (=हविर्दत्तवान् अस्ति) स त्वया [सहायभूतेन] विश्वं धनं (=युद्धे प्राप्तव्य वैरिणो धनं) जयति ॥

'सन्' धातूपासून व्युत्पत्ति न करितां 'सन्', 'सन्त्' (=चांगला) अशा अस् धातूच्या रूपापासून अर्थ करितात, आणि तो अर्थ आम्हीं सूक्त १५ मंत्र १२ यांत घेतला आहे. पण पुनर्विचाराअंतीं आम्हांस वाटतें कीं, त्या ठिकाणींहि सायणाचार्यप्रमाणें 'दानशील,' 'दाता' हाच अर्थ घ्यावा.

३. [हे अग्नी,] सर्वज्ञ [असा] होता [जो तू त्या] तुला [आम्ही] आपला दूत करून घेतों [कारण कीं], तू मोठा आहेस आणि तुझ्या दीप्ति सर्व बाजूस पसरतात, [आणि] [तुझे] किरण द्युलोकास लागलेले आहेत.

४. [हे अग्नी], तुला पुरातनकाळच्या दूताला वरुण, मित्र [आणि] अर्यमा [हे] देव प्रदीप्त करितात. हे अग्नी, जो मर्त्य तुला हवि देतो तो तुझ्या [कृपे]नें [प्रसादात] सर्व धन जिंकितो.

3. Thee, [Agni], the omniscient invoker, we choose [as] [the conveying] messenger [of our oblation] [for] of thee, [who] art great, the splendors extend in all directions, [and] the rays rest in heaven

4 The gods Varuna [and] Mitra [and] Aryamâ kindle thee the ancient messenger That mortal conquers all booty through thee, who gives, Agni, [an oblation] to thee

---

'येथे'='इह' म्हणजे जेथे बोलतो आहे तेथे तेथेच संरक्षण करावयाचें असें इष्ट दिसत नाहीं तर तेथ अग्नीनें येऊन प्रसन्न होऊन संरक्षक व्हावें असें विवक्षित दिसतें

3 अग्नीस ऋषि म्हणतो, 'आम्ही आज देवांला जे हवि अर्पण करणार आहों ते देवांकडेस पोंहचते करण्यासाठीं, हे अग्नी, तुला आम्ही दूत करितों म्हणजे आमचा जासूद नेमितों स्वर्गी राहणारे जे देव त्यांजप्रत लहानसा यज्ञशाळतील अग्नि हवि कसा प्रविष्ट करील अशी शंका नको, कारण अग्नि हा मोठा आहे, आणि त्याचा प्रकाश जिकडे तिकडे पसरलेला आहे आणि त्याचे किरण स्वर्गापर्यंत जाऊन तेथें लागलेले आहेत' हा मंत्र बराच चमत्कारिक आहे या मंत्रावरून अग्नीचें स्वरूप समजून येते. अग्नि म्हणजे केवळ जाळणारा लौकिक अग्नि इतकाच अर्थ नव्हे, तर सूर्याचे अगचे तेज जे सर्वत्र पसरते आणि स्वर्गापर्यंत पोंहचतें ते अग्नीचेंच रूप आहे असा मंत्रवचनाचा भावार्थ ऋषि बोलतो आहे तो जरी यज्ञशाळेतील लहानशा प्रदीप्त केलेल्या अग्नीस बोलतो आहे आणि त्यांतच हवि टाकीत आहे, तथापि या त्रिभुवनात ज सूर्योदिकांचें तेज पसरून स्वर्गाच्या पाठापर्यंत जाऊन राहिल आहे, तो सगळा अग्नीच होय असें मनांत आणून बोलत आहे ऋ ४ ४९. २ यांत अग्नीविषयी असें म्हटलें आहे कीं, 'तो धर्मपालक अग्नि उपजताच अति उच्च आकाशांत धर्म संरक्षिता झाला, प्रज्ञावान आणि सकलहितकारक अग्नि उपजताच अंतरिक्षभर पसरला आणि आपल्या मोठेपणानें स्वर्गास जाऊन लागला' (='स जायमान

मन्द्रो होता गृहपतिरग्ने दूतो विशामसि ।
त्वे विश्वा संगतानि व्रता ध्रुवा यानि देवा अकृण्वत ॥ ५ ॥ ८ ॥

मन्द्रः । होता । गृहऽपतिः । अग्ने । दूतः । विशाम् । असि ।
त्वे इति । विश्वा । सम्ऽगतानि । व्रता । ध्रुवा । यानि । देवाः । अकृण्वत ॥ ५ ॥ ८ ॥

भाषायाम्.

५. हे अग्ने, [त्वं] मन्द्रो होता (=हर्षहेतुः=प्रियो होता देवानामाह्वाता) [आसि], [त्वं] [मन्द्रः=प्रियो] गृहपतिः (=गृहस्य ईशः) [आसि], [त्वं] विशां (=प्रजानां) दूतोसि । यानि ध्रुवाणि (=शाश्वतानि) व्रतानि (=कर्माणि, पृथिव्या धारणं, पर्जन्यस्य वर्षणं, सूर्यस्य प्रकाशनम् इत्येवमादीनि) [अनेकाः] [पृथिवीपर्जन्यसूर्यादयो] देवा अकृण्वत (=कृतवन्तः=कुर्वन्ति) [तानि] विश्वानि त्वे (=त्वयि) [एकस्मिन्] संगतानि (=त्वमेकस्तानि सर्वाणि करोषि) ॥

परमे व्योमनि व्रतानि अग्निः व्रतपाः अरक्षत । वि अन्तरिक्षम् अमिमीत सुक्रतुः वैश्वानरः महिना नाकम् अस्पृशत").

'सर्वज्ञ [असा] होता'='होतारं विश्ववेदसम्' होता नेमावयाचा तो चांगला विद्वान् ज्ञानी पाहून नेमीत असत. याविषयीं पूर्वी सूक्त २६, मंत्र ३ याजवर दिलेली टीप पाहा. अग्नि हा इतका चांगला होता होय की, त्याला कण्व ऋषि 'सर्वज्ञ' हे विशेषण देतो.

'तूं मोठा आहेस आणि तुझ्या दीप्ति सर्व बाजूस पसरतात'='महः ते सतः विचरन्ति अर्चयः.' अक्षरशः अर्थ 'तुझ्या मोठा असणाऱ्याच्या दीप्ति सर्व बाजूस पसरतात'. याचा अर्थ 'तूं मोठा होतोस तेव्हां तुझ्या दीप्ति इ०' असा नाहीं, परंतु 'तूं मुळचाच इतका मोठा आहेस की, तुझ्या दीप्ति इ०' असा आहे

४. या मंत्राचा भावार्थ उघडच आहे. पण यांत अग्नीला 'वरुण मित्र आणि अर्यमा' हे तीन देव पेटवितात असें सांगितलें याचा अर्थ काय? आम्हांस वाटतो तो असाः–पूर्वोक्त मंत्रांत पृथ्वीपासून तों स्वर्गापर्यंत जें तेज आहे तें अग्नीचेंच रूप होय असें ऋषीनें जाणविलें; तेव्हां ऋषीच्याच मनांत असा प्रश्न निघाला कीं, भूलोकावर अग्नीचें स्वरूप आम्हांस दिसतें तें नीटच आहे, का कीं येथें त्याला मनुष्ये प्रज्वलित करितात; परंतु अंतरिक्ष आणि द्युलोक यांत जो सूर्यप्रकाशरूपानें, विद्युद्रूपानें आणि नक्षत्रप्रकाशरूपानें वगैरे अग्नि प्रज्वलित

५. हे अग्नी, [तूं] प्रिय होता [आणि] गृहपति [होस], [तूं] जनाचा दूत होस. [हे अग्नी], [अनेक] देव जीं [जीं] शाश्वत कामें करितात तीं सर्व तुझ्या [एकटयाच्या] आगीं मिळालेलीं [आहेत].

5. Agni, [thou art] a dear invoker, [a dear] lord of the house, [thou] art the messenger of the people. In thee are united all the eternal works that the [many] gods perform.

असतो तो कोणी पेटविलेला असतो? या प्रश्नाला ऋषि असें उत्तर देतो कीं, तो 'वरुण, मित्र आणि अर्यमा' यांणी पेटविलेला असतो. मित्रदेव अग्नीस पेटवितो असें म्हणण्याचें कारण हे आहे की, 'मित्र' म्हणजे दिवसाचा जो प्रकाश तद्रूपीच देवता होय. अर्यमा आणि वरुण ह्याहि द्युलोकांतील प्रकाशाच्याच देवता आहेत, तेव्हां ह्या तीनी मिळून अग्नीस प्रदीप्त करितात असें म्हणणें हे साहजिक दिसतें. ऋ. १. १४१. ९ यांत अग्नीच्या योगानेंच वरुण, मित्र आणि अर्यमा यांचा महिमा वाढला आहे ("त्वया हि अग्ने वरुणो धृतव्रतो मित्रः शाशद्रे अर्यमा सुदानव.") असें सांगितले आहे. ऋ. ३. १४. ४ यांत मित्र, वरुण आणि मरुत् हे अग्नीस पूजितात ("मित्रश्च तुभ्यं वरुण, सहस्यो अग्ने विश्वे मरुतः सुम्नम् अर्चन्") असें म्हटले आहे. अग्नीला वरुण, मित्र आणि अर्यमा हे देव प्रदीप्त करितात असे जे प्रस्तुतच्या मंत्रात सांगितले, त्यांत अग्नीची सेवा केवळ मनुष्येच करितात असे नाहीं, तर देवहि करितात असेंहि सांगण्याचा उद्देश आहे.

'पुरातन काळच्या दूताला'='प्रत्नं दूतं.' अग्नीस देवांचा आणि मनुष्यांचा दूत असें वेदांत म्हटले आहे. देवांचा दूत म्हणण्याचे कारण हे कीं, तो देवांची कृपा आणि प्रसाद मनुष्यांना पोंहचवितो, आणि मनुष्यांचा दूत असा करितात कीं, तो मनुष्यांनी दिलेले हवि आणि त्यांनी केलेलीं स्तोत्रे देवांप्रत पोंहचवितो ("दूतो देवानाम् असि मर्त्यानाम् अन्तर्महांश्चरसि रोचनेन"= 'हे अग्नी, तूं देवांचा आणि मर्त्यांचा दूत आहेस; मोठा असा जो तू तो प्रकाशयुक्त प्रदेशांतून ह्या दोघांच्या मध्ये जात येत असतोस') ऋ. १०. ४. २

---

५. या मंत्रात अग्नीचें अनेककर्तृत्व सांगितलें आहे. ऋषि म्हणतो, 'अग्नि हा निरनिराळ्या मनुष्यांनी करावयाचीं कामें एकटा करितो इतकेंच नव्हे, पण निरनिराळ्या देवांनी करावयाचीं कामेंहि तो एकटाच करितो. होत्याचें काम, यजमानाचें (गृहपतीचें) काम, आणि दूताचें (म्हणजे यज्ञातील हवि देवांकडे घेऊन जाणाराचें) काम अशीं तीन कामें तीन वेगवेगळ्या मनुष्यांना करावयाचीं, तथापि तीं सर्व एकटा अग्नीच करितो; इतकेंच नाहीं, पण पुष्कळ देवां-

त्वे इदग्ने सुभगे यविष्ठ्य विश्वमा हूयते हविः ।
स त्वं नो अद्य सुमना उतापरं यक्षि देवान्त्सुवीर्या ॥ ६ ॥

त्वे इति । इत् । अग्ने । सुऽभगे । यविष्ठ्य । विश्वम् । आ । हूयते । हविः ।
स । त्वम् । नः । अद्य । सुऽमनाः । उत । अपरम् । यक्षि । देवान् ।
सुऽवीर्या ॥ ६ ॥

भाष्यम्.

६ हे यविष्ठ्य (=युवतम) अग्ने, विश्वं हविः सुभगे (=कल्याणकारिणि) त्वे इत् (=त्वय्येव) आहूयते (=प्रक्षिप्यते। स त्वं सुमनाः (=प्रसन्नो) [भूत्वा] नः (=अस्मभ्यं) सुवीर्याणि (=सुवीर्योपेतानि पुत्रपौत्राद्यपत्यानि) [उद्दिश्य] अद्य अपरम् उत (=उत्तर काले च) देवान् यक्षि (=यज=हविषाभितृप्तान् कुरु)॥

नें जगाला धारण करण्याचे काम सदैव करावें पर्जन्यदेवानें वेळावर पाऊस पाडावा सूर्यदेवानें नित्य प्रकाशावे उषनें नित्य पहाटेस यावं हा ज्या अनेक देवांनीं करावयाचा कामें, ताहि एकला अग्नीच करितो'

'प्रिय होता'='मन्द्रो होता' 'मन्द्र' म्हणजे ज्याला पाहल्यामुळें आनंद होतो तो ज्याला पाहतांच आह्लाद उत्पन्न होतो असा या विशेषणावरून असें अनुमान काढता येईलसें वाटतें का पुरातन काळीं होत्याचें काम मोठ्या महत्त्वाचे असे इतकच नव्हे पण त्याजवर लोकांची फार प्रीति असे

'गृहपति' हा मूळांतीलच शब्द आम्ही भाषांतरांत ठेविला आहे त्याचा अर्थ घरचा यजमान,' 'घरचा मालक' जो होत्याकडून यज्ञ करवितो तो

'जनांचा दूत' लोकांना दिलेले हवि देवांप्रत पोंहचवितो म्हणून पूर्वाल मंत्रावरची टीप पाहा

या मंत्रावरून असं समजलें पाहिजे कीं, अग्नीला सर्वमनुष्यात्मक आणि सर्वदेवात्मक ईश्वराची सत्ता आहे असें ऋषि समजत आहे

या मूळमंत्रांत जो 'व्रत' शब्द आला आहे त्याजकडेस लक्ष्य द्यावं हा शब्द वेदांत मोठ्या महत्त्वाचा असे त्यामुळे त्याचा प्रयोग जेथें जेथें येईल तेथे तथें त्याचा अर्थ काय होतो आणि हल्लीं त्याचा अर्थ काय होतो त्याचा विचार केला पाहिजे

त्वे इद॑ग्ने सुभगे यविष्ठ्य विश्व॒मा हू॑यते ह॒विः ।
स त्वं नो॑ अ॒द्य सु॒मना॑ उ॒ताप॒रं यक्षि॑ दे॒वान्त्सु॒वीर्या॑ ॥ ६ ॥

त्वे इति॑ । इत् । अ॒ग्ने॒ । सु॒ऽभ॒गे॒ । य॒वि॒ष्ठ्य॒ । विश्व॑म् । आ । हू॒य॒ते॒ । ह॒विः ।
सः । त्वम् । नः॒ । अ॒द्य । सु॒ऽमनाः॑ । उ॒त । अ॒प॒रम् । य॒क्षि॒ । दे॒वान् ।
सु॒ऽवीर्या॑ ॥ ६ ॥

भाष्यम्.

६ हे यविष्ठ्य (=युवतम) अग्ने, विश्व हविः सुभगे (=कल्याणकारिणि) त्वे इत् (=त्वय्येव) आहूयते (=प्रक्षिप्यते) । स त्व सुमनाः (=प्रसन्नो) [भूत्वा] न (=अस्मभ्यं) सुवीर्याणि (=सुवीर्योपेतानि पुत्रपौत्राद्यपत्यानि) [उद्दिश्य] अद्य अपरम् उत (=उत्तर काले च) देवान् यक्षि (=यज=हविषाभितृप्तान् कुरु)॥

नें जगाला धारण करण्याचें काम सदेव करावे, पर्जन्यदेवानें वेळावर पाऊस पाडावा, सूर्यदेवाने नित्य प्रकाशावे, उषेने नित्य पहाटेस यावे ही जी अनेक देवांनीं करावयाची कामे, तीहि एकला अग्नीच करितो'

'प्रिय होता'='मन्द्रो होता' 'मन्द्र' म्हणजे ज्याला पाहल्यामुळें आनंद होतो तो, ज्याला पाहतांच आह्लाद उत्पन्न होतो असा या विशेषणावरून असे अनुमान काढतां येईलसे वाटतें कीं, पुरातन काळीं होत्याचें काम मोठ्या महत्त्वाचें असे इतकेच नव्हे, पण त्याजवर लोकांची फार प्रीति असे

'गृहपति' हा मूळांतीलच शब्द आम्ही भाषांतरांत ठेविला आहे. त्याचा अर्थ 'घरचा यजमान,' 'घरचा मालक,' जो होत्याकडून यज्ञ करवितो तो.

'जनांचा दूत,' लोकांनीं दिलेले हवि देवांप्रत पोहचवितो म्हणून. पूर्वीळ मंत्रावरची टीप पाहा.

या मंत्रावरून असें समजलें पाहिजे कीं, अग्नीला सर्वमनुष्यात्मक आणि सर्वदेवात्मक ईश्वराची सत्ता आहे असें ऋषि समजत आहे.

या मूळमंत्रांत जो 'व्रत' शब्द आला आहे त्याजकडेस लक्ष्य द्यावें हा शब्द वेदांत मोठ्या महत्त्वाचा अस-ल्यामुळे त्याचा प्रयोग जेथें जेथें येईल तेथें तेथें त्याचा अर्थ काय होतो आणि हल्लीं त्याचा अर्थ काय होतो त्याचा विचार केला पाहिजे.

OXFORD, *August* 10th 1876.

I have examined the numbers of the Vedarthayatna published up to the present date and am glad to be able to bear testimony to the merit of the great and useful work on which Mr ——— is engaged. He is well known to me as an able and accurate Scholar, and his Attempt to give his fellow country-men a correct interpretation of the Veda will in my opinion, not only advance his literary reputation but render incalculable service to the cause of progress and enlightenment by dissipating the false notions prevalent every where in regard to the books commonly appealed to in support of many objectionable practices and superstitious observances.

I have great pleasure in recommending the *Vedârthayatna* to the patronage of the Indian Governments.

MONIER WILLIAMS M. A., D. C. L.

Boden Professor of Sanskrit in the University of Oxford,

Honorary Doctor in Law of the University of Calcutta.

POONA *August* 17

MY DEAR MR ——

I have to thank you for the numbers of your *Vedârthayatna* which you have been good enough to send me. I have read the first number and I have no hesitation in saying that your periodical will be a very useful one, chiefly because it will show to your countrymen *for the first time* what the Rigveda really contains. At first I felt inclined to question the necessity of reprinting the Sanskrit texts, but it is only fair to you to say that the natives with whom I have spoken on the subject entirely approve of the plan which you have adopted. Of the accuracy of your Marâthi translation I can hardly judge but the English translation appears to have been prepared with *great* care, and, so far as I can see it is intelligible without the original. I feel sure that your work well deserves the patronage of Government.

Yours truly,

F. KIELHORN

Mr.———'s *Vedárthayatna* is a very valuable contribution to Vedic philology. It appears to be based on the most trustworthy materials and shows, as might be expected from a scholar like Mr ———, very careful and conscientious work.

It possesses a very great importance for India, as it is the first attempt to interpret to the Indian public at large the most ancient and the most important work of the Brahminical religion. I trust that eventually the *Vedarthayatna* will find a place in all public libraries of India.

G. BUHLER.

5th September 1876.

I have no hesitation in stating that your work will prove of great use in spreading a knowledge among the people of a work which enjoys the highest veneration but of the contents of which they really know little or nothing. Every intelligent friend of this country ought to feel grateful to you * * * As far as I can judge at present your translations both English and Marathi appear to me fair and reasonable.

KRISHNA SHASTRI CHIPLONKAR.

The *Vedarthayatna* "gives the text, a Marathi version and an English translation * * * * * The attempt when completed will prove useful in India in giving to the people an opportunity of reading the most ancient monument of Aryan thought, which most of them can never expect to study in the original." *The Friend of India*.

"In order to show the correctness of reasoning in assigning to particular words and phrases a meaning different from that given by Sayana the translator should show the grounds on which he proceeds. And this the present translator has done * * * The present translation (both in Marathi and English) is scholarly and accurate throughout though we might differ with the translator in the interpretation of single words or passages. For the better understanding of the Veda the Pada text and its rendering into classical Sanskrit are added * * * The foot notes in Marathi are explanatory and critical. Whenever a new deity is mentioned for the first time, we have a note as to its functions attributes, mode of worship &c., as derived from the collation of various passages bearing upon the subject,

Some of these notes trace the current mythological legends to the early times of the Vedas and show the reader, how religion in the hands of an unimaginative priesthood degrades into absurd stories * * * We cannot but admire the perseverance and the patience of the translator, which are so rare amongst us and for the want of which we are always taunted by other nations We hope that this work is the first of a long Series which will serve for a complete refutation of the opinions of those who think that the Hindus are behind other civilized nations in patient investigation and scientific research." *Native Opinion.*

"We do not hesitate to say that this is the most important publication in Sanskrit literature up to this date, which has been produced in Bombay a very faithful translation of the text into English and into Marathi together with a commentary —*The Englishman* 2nd June 1876.

"We have been thus particular in noting what in our opinion are the only inaccuracies in the generally excellent translation of the first eight hymns of the first book contained in the first number of the Vedarthayatna, in order that we might be able to show how really intrinsically good the work is What we have called errors are of course, really matters of opinion The Editor's rendering in each case can be backed by some respectable authority."—*The Englishman* 24th June 1876

We wish the projector every success in his spirited and patriotic undertaking —*Madras Journal of Education* July 1876

"It appears that the translator is performing his difficult task with due care and attention He is not closely following like Professor Wilson the commentaries of Sayana, nor is he servilely adopting the interpretation of any particular European Sanskrit Scholar" *The Bengalee* 10th July 1876

Though the work is directly intended for Marathi readers, it will be useful to others also on account of its English translation. While it serves as a good guide to every Sanskrit Scholar in his Vedic study and initiates him into it, and thus benefits him as an easy Marathi exegesis for the Vedas It is the duty of every Hindoo to encourage such a noble and patriotic work and hail a new literary luminary enlightening the most sacred province of Sanskrit literature, which is sunk in impenetrable darkness We congra-

"tulate the author on his literary patriotism and earnestly hope that he will meet with good encouragement and munificent patronage —"

Native Public Opinion 14th June 1876

सायणाचार्यभाष्यादिदुरूहग्रन्थेभ्यो वेदार्थं ज्ञातुमसमर्थानां भूयसां जनानां महोपकारकमतुल्यं कर्म पश्यन् भवतां भूयोभूयो धन्यवादान् करोमि । प्रार्थये च परेशमचिरेण ग्रन्थसमाप्त्यै साहाय्यं कुरुताद् भगवानिति ।

महाराष्ट्रभाषायां कृतस्यानुवादस्य भाषाटीकायाश्च विषये स्वीयमाशयमेवमाविष्करोमि । अथ त्वनेककार्यगणव्यापृतो **वेदार्थयत्नं** साकल्येन निरीक्षितुमशक्नुवानो यावति तस्य पत्राण्यवाचयं तावत्सु स्थितौ भाषाटीकानुवादौ मूलार्थानुगुणावेव समुपलभ्य स्थालीपुलाकन्यायेन भूयसोऽदृष्टभागस्यापि मूलार्थानुसारितामनुमिनोमि । कुत्रचित्स्थलविशेषेष्वन्यथाभावः स्याच्चेदपि, "गच्छतः स्खलनं क्वापि यत्र क्वचन जायते । हसन्ति दुर्जनास्तत्र समादधति सज्जनाः" इति ।बन्नामण्डुकयनुसारेण **वेदार्थयत्नमेनं** श्लाघनीयकार्याणामेकतममिति हृदयेनाभिनन्दन्नुररीकरोमीत्यलं सुज्ञवरेषु बहुना लेखनीव्यापारेणेति । शुभम् ।

वाराणसीनिवासी रानडोपनामक

बाळशास्त्री

वेदार्थयत्नपुस्तके संहितालेखनं पदलेखनं टीकालेखनं च अतीव शुद्धम् अतः लोकोपयोगि च । टीकालेखनं भाष्यान्तरं चातीव सुबोधमपि । एतादृग् लोकोपकारको यत्न इतः प्राक् केनापि न कृत इति मे भाति ॥

दातारोपनामकगङ्गाधरशर्मशास्त्रिणः

संमतमिदम् ।